# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूर शिक्षण केंद्र

# मराठी वाङ्मयाचा इतिहास

**अभ्यासपत्रिका क्रमांक ९ आणि १४**
**तृतीय वर्ष कला**
**(मराठी)**

(शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून)

**मराठी वाङ्मयाचा इतिहास**
बी. ए. भाग-३
मराठी : ऐच्छिक
अभ्यासपत्रिका क्रमांक - ९ व १४
२०१५ पासून होणाऱ्या परीक्षांसाठी

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** जून २०१५
तृतीय वर्ष कला करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** २०००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्र. कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-81-8486-229-4

★ दूर शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४ (महाराष्ट्र राज्य) (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
मा. कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
मा. कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
मा. प्र-कुलगुरू,
इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. अनिल गवळी**
अधिष्ठाता, कला व ललितकला विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील**
अधिष्ठाता, सामाजिक शास्त्रे विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे**
अधिष्ठाता, विज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. आर. जी. फडतरे**
अधिष्ठाता, वाणिज्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य डी. आर. मोरे**
संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एन. व्ही. कोंगळे**
वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**कॅ. डॉ. एन. पी. सोनजे** (सदस्य सचिव)
प्रभारी संचालक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ अभ्यासमंडळ : मराठी ■

अध्यक्ष : **डॉ. अनिल पांडुरंग गवळी**
यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर

- **प्रा. डॉ. कृष्णा किरवले**
  प्रमुख, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. एकनाथ बाबुराव आळवेकर**
  दत्ताजीराव कदम आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर
- **डॉ. सुनील वामन चंदनशिवे**
  राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, सदर बझार,
  कदमवाडी रोड कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती सुमन कृष्णाजी चव्हाण**
  विश्वासराव नाईक महाविद्यालय, शिराळा, जि. सांगली
- **डॉ. शिवाजी महादेव होडगे**
  सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड,
  ता. कागल, जि. कोल्हापूर
- **डॉ. संजय दशरथ पाटील**
  दूधसाखर महाविद्यालय, बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर
- **डॉ. बळवंत तुरंबेकर**
  डी. आर. माने महाविद्यालय, कागल

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**मराठी वाङ्मयाचा इतिहास**
**(प्रारंभ ते इ.स. १८००)**

**अभ्यास घटकांचे लेखक**

| लेखक | घटक क्रमांक आणि शीर्षक |
|---|---|
| **सत्र पाचवे** | |
| **डॉ. ब. ना. तुरंबेकर**<br>डी.आर.माने महाविद्यालय, कागल | १. **आद्य कवी मुकुंदराज व महानुभाव संप्रदायाचे गद्य वाङ्मय** |
| **डॉ. सुनीता लेंगडे**<br>कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली. | २. **आद्य कवयित्री : महदंबा व महानुभावांचे पद्य वाङ्मय** |
| **श्री. सर्जेराव जाधव**<br>यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, पन्हाळा. | ३. **वारकरी संप्रदाय : ज्ञानदेव, नामदेव व इतर समकालीन संतकवी** |
| **डॉ. जी. पी. माळी**<br>यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर. | ४. **संत एकनाथ व संत तुकाराम यांचे समग्र साहित्य** |
| **सत्र सहावे** | |
| **डॉ. अनुराधा कुलकर्णी**<br>एन. डी. पाटील नाईट कॉलेज, सांगली. | १. **समर्थ संप्रदाय, समर्थ रामदास यांचे समग्र साहित्य** |
| **डॉ. शिवशंकर उपासे**<br>'बिल्वदल', रवळनाथ कॉलनी, आजरा, जि. कोल्हापूर | २. **पंडित कवी**<br>३. **शाहिरी काव्य** |
| **डॉ. दीपक स्वामी-जंगम**<br>मालती पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, जि. सांगली. | ४. **बखर वाङ्मय** |

■ **संपादक** ■

**डॉ. ब. ना. तुरंबेकर**
प्रमुख, मराठी विभाग,
डी.आर. माने महाविद्यालय,
कागल

**डॉ. अनिल गवळी**
अध्यक्ष,
मराठी अभ्यास मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो !

दूर शिक्षण केंद्रांतर्गत बी. ए. भाग-३ साठी विद्यार्थी म्हणून आपण प्रवेश घेतलेला आहे. बी. ए. भाग-३ अभ्यासपत्रिका क्रमांक ९ व १४ साठी असलेल्या अभ्यासक्रमावर मान्यवर व तज्ज्ञांकडून तयार केलेले हे 'स्वयं अध्ययन मार्गदर्शन साहित्य' आपल्या हाती देताना अतिशय आनंद होत आहे. मागील वर्षाच्या मार्गदर्शन साहित्याचा आपणास निश्चितच उपयोग झाला असणार. या वर्षी अभ्यासपत्रिका क्रमांक ६ : मराठी वाङ्मयाचा इतिहास : प्रारंभ ते इ.स. १८०० या अभ्यासपत्रिकेसाठी आपल्याला मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील काही महत्त्वाच्या ग्रंथकारांचा व त्यांच्या साहित्यकृतींचा अभ्यास करावयाचा आहे.

हा अभ्यासक्रम शंभर गुणांचा असून, तो द्वितीय वर्षापेक्षा अधिक सूक्ष्म आणि आशयनिष्ठ असेल. या अभ्यासक्रमावर तयार केलेले 'स्वयं अध्ययन मार्गदर्शन साहित्य' आपणास उपयुक्त ठरणार आहे. यातील सर्व घटक साध्या, सोप्या, आणि आपणास समजेल अशा भाषेत स्पष्ट केले आहेत. मूळ ग्रंथाची व त्यातील भाषाशैलीची कल्पना येण्यासाठी काही उदाहरणेही दिली आहेत. कठीण शब्दांचे अर्थही दिले आहेत. परीक्षेच्या दृष्टिकोणातून नमुना वस्तुनिष्ठ प्रश्न, लघुत्तरी-दीर्घोत्तरी प्रश्न, टीपा आणि नमुना उत्तरेही दिली आहेत. शेवटी अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ दिले असून, अभ्यासपूरक उपक्रमही दिले आहेत. या सर्वांचा आपण उपयोग करून घ्यायला हवा.

प्रस्तुत अभ्यासपत्रिकेच्या पहिल्या घटकात आद्यकवी मुकुंदराज यांच्या साहित्यसंपदेचा परामर्श घेतला आहे. तसेच महानुभाव संप्रदायाची ओळख करून देऊन त्यांचा गद्य वाङ्मयाचा अभ्यास मांडला आहे. त्यातून मराठीच्या प्रारंभकालातील गद्याची कल्पना येऊ शकेल. दुसऱ्या घटकामध्ये महानुभावांच्या पद्य वाङ्मयाचा अभ्यास मांडला आहे. धवळे आणि सातीग्रंथ यांची ओळख करून दिली आहे. घटक क्रमांक तीनमध्ये वारकरी संप्रदायाचा परिचय करून देऊन संत ज्ञानदेव, संत नामदेव यांच्या साहित्यनिर्मितीबरोबरच संतमेळ्यातील इतर कवींच्या साहित्यसेवेचाही अभ्यास मांडला आहे. त्यातून आपणास वारकरी संप्रदायाचे स्वरूप व कार्य यांचे महत्त्व लक्षात येईल. घटक क्रमांक चारमध्ये संत एकनाथ व संत तुकाराम यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास मांडला आहे. घटक क्रमांक पाचमध्ये समर्थ रामदास यांच्या कार्याचा परामर्श घेऊन, इतर धर्मियांनी मराठी भाषेच्या केलेल्या

सेवेचा परिचय करून दिला आहे. घटक क्रमांक सहा मध्ये पंडिती काव्याचा अभ्यास मांडला आहे. घटक क्रमांक सातमध्ये शाहिरी काव्याचा तर घटक क्रमांक आठमध्ये बखर वाङ्मयाचा अभ्यास मांडला आहे.

या सर्व अभ्यासातून मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा एक पट आपल्यासमोर उलगडत जाईल आणि या साहित्याचे आजचे महत्त्वही लक्षात येईल. मध्ययुगीन मराठी साहित्याने मराठी माणसाच्या मनाचे भरणपोषण केले आहे. सुसंस्कार आणि मूल्यशिक्षण यांच्या संदर्भात या साहित्याला विशेष महत्त्व आहे. साहित्याच्या अभ्यासातून व्यक्तिमत्त्वाचा विकास होत असतो. यासाठी हे साहित्य निश्चितच उपयोगी पडेल.

**– संपादक**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| **मराठी अभ्यासपत्रिका क्रमांक ९** | | |
| **सत्र पाचवे** | | |
| घटक १ | आद्य कवी मुकुंदराज व महानुभाव संप्रदायाचे गद्य वाङ्मय | १ |
| घटक २ | आद्य कवयित्री : महदंबा व महानुभावांचे पद्य वाङ्मय | २८ |
| घटक ३ | वारकरी संप्रदाय : ज्ञानदेव, नामदेव व इतर संतकवी | ६० |
| घटक ४ | संत एकनाथ व संत तुकाराम यांचे समग्र साहित्य | ११३ |
| **मराठी अभ्यासपत्रिका क्रमांक १४** | | |
| **सत्र सहावे** | | |
| घटक १ | समर्थ संप्रदाय, समर्थ रामदास यांचे समग्र साहित्य | १४३ |
| घटक २ | पंडित कवी | १७० |
| घटक ३ | शाहिरी काव्य | १९४ |
| घटक ४ | बखर वाङ्मय | २१८ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्यासस‌ाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१५-१६ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

सत्र पाचवे

# घटक : १

# आद्यकवी मुकुंदराज : विवेक सिंधू, परमामृत व पवनविजय महानुभाव संप्रदाय : स्थूल परिचय, आचारधर्म व तत्त्वज्ञान, महानुभवांचे गद्यवाङ्मय : लीळाचरित्र, श्रीगोविंदप्रभूचरित्र, दृष्टांतपाठ, सूत्रपाठ, स्मृतिस्थळ

## १.१ उद्दिष्टे

या घटकाचे वाचन केल्याने आपणास पुढील गोष्टी समजून येतील.

- मराठी आद्यकवी मुकुंदराज यांच्या वाङ्मयाचा परिचय होईल.
- महानुभाव संप्रदायाचा, त्यांच्या आचारधर्माचा व तत्त्वज्ञानाचा परिचय होईल.
- लीळाचरित्र या आद्यगद्यग्रंथाची ओळख होईल व तत्कालीन मराठीचे व्यावहारिक स्वरूप लक्षात येईल.
- महानुभवांच्या चरित्रात्मक व सूत्रात्मक अशा वैविध्यपूर्ण वाङ्मयाचा आस्वाद घेता येईल.
- धर्मजागृती आणि समाजप्रबोधन ही या कालखंडातील वाङ्मयनिर्मितीची प्रमुख प्रेरणा होती, हे लक्षात येईल.

## १.२ प्रास्ताविक

महाराष्ट्राला गौरवशाली वाङ्मयाची उज्ज्वल परंपरा लाभली आहे. संतत्व आणि वीरत्व हे मराठी मनाचे दोन महत्त्वाचे गुणधर्म आहेत. मराठी वाङ्मयात यांचे प्रतिबिंब उमटलेले पाहावयास मिळते. मराठी मन आणि मराठी संस्कृती यांची साक्ष देणाऱ्या मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप आपणास पाहावयाचे आहे. पण त्यासाठी आपणास महाराष्ट्राची आणि मराठी भाषेची परंपरा प्रथम पाहावी लागेल.

महाराष्ट्राचा उल्लेख वररूचीच्या व्याकरणात असून या देशाच्या भाषेला 'महाराष्ट्री' असे नाव आहे. म्हणजे इसवी सनाच्या पहिल्या शतकात या देशाला महाराष्ट्र असे नाव असावे. 'एरण' येथील स्तंभ लेखातही महाराष्ट्राचे नाव येते. (शक ३६५) चिनी प्रवासी हुएनत्संग (इ.स. ६२९ ते ६४५) याने महाराष्ट्राचा उल्लेख 'मोहोलाश' असा केला आहे.

महाराष्ट्र हे नाव कसे पडले याबद्दल वेगवेगळी मते आहेत. महाराष्ट्र या शब्दावरून असे दिसते की, महान राष्ट्र म्हणून महाराष्ट्र असे नाव पडले असावे. महारांचे राष्ट्र म्हणून महाराष्ट्र अशीही एक व्युत्पत्ती

देण्यात येते. 'महारथ' किंवा 'महारठ' या लोकांचे राष्ट्र ते महाराष्ट्र अशीही एक व्युत्पत्ती आहे. या देशात प्राचीन काळी 'रट्ट' नावाचे राजे राज्य करीत होते. त्या शब्दाचे संस्कृतात राष्ट्र असे रुपांतर झाले व त्यांच्या प्रांताला 'महाराष्ट्र' असे संबोधण्यात येऊ लागले.

मराठी भाषेच्या पूर्वपरंपरेविषयी पुढीलप्रमाणे अंदाज करता येतो. नागलोक दक्षिणपंथात आले. त्यावेळी ते वैदिक अपभ्रंश बोलत. यांचा काळ शकपूर्व ३१०० ते शकपूर्व १००० हा होता. शकपूर्व ६०० ते ७०० च्या सुमारास राष्ट्रीक, वैराष्ट्रिक व महाराष्ट्रीक असे तीन संघ किंवा लोक इकडे आले. यांच्या एकत्रिकरणाने मरहट्ट किंवा मराठे झाले. महाराष्ट्रिक लोक महाराष्ट्री भाषा बोलत. वैदिक + अपभ्रंश + महाराष्ट्रि यांच्या मिश्रणाने मराठी भाषा सिद्ध झाली.

मराठीचा उत्पत्तिकाल ठरविताना ऐतिहासिक प्राचीनतम असे ताम्रपट, शिलालेख आणि ग्रंथ यांचे आधार घ्यावे लागतात. शके ७०० मध्ये उद्यानसूरि याने रचलेल्या 'कुवलयमाला' या ग्रंथात मरहट्ट भाषेचा उल्लेख आहे. राजशेखरच्या 'कर्पूर मंजरी' या नाटकात महाराष्ट्री भाषा आहे. राजशेखरचा 'काव्यमीमांसा' हा ग्रंथ महाराष्ट्रीत आहे. या नंतर साधारणत: २०० वर्षांनी या भाषेचे अपभ्रंश प्रकार सिद्ध झाले. 'महाराष्ट्री अपभ्रंश' हा शके १००० मध्ये प्रचारात असावा. या पुढील दोनशे वर्षांत महाराष्ट्री अपभ्रंश नाहीसा होऊन मराठीत ग्रंथ रचना सुरू झाली. शके १०६१ मध्ये सोमेश्वराने लिहिलेल्या 'मानसोल्लास' किंवा 'अभिलषितार्थ चिंतामणी' या ग्रंथात मराठी भाषेची शब्दरुपे व मराठी पद्येही दिसून येतात.

शिलालेख आणि ताम्रपट यांचा विचार करता असे दिसून येते की, श्रवणबेळगोळ (म्हैसूर) येथील शिलालेख हा शके ९०५ मधील आहे. 'श्रीचामुण्डराजे करवियले' हे पहिले मराठी वाक्य शके ९०५ मध्ये कोरले आहे. पळसदेव येथील शिलालेख हा शके १०७९ मधील आहे. हा राष्ट्रकुटांच्या राजवटीतला असून, या काळी मराठी भाषा प्रचलित होती असे दिसते. परळचा शिलालेख हा शके ११०९ मधील आहे. यात दोन ओळी मराठीत आहेत. पाटणचा शिलालेख शके ११३२ मधील आहे. या नंतर पंढरपूर येथील चौऱ्याऐंशीचा शिलालेख महत्त्वाचा ठरतो. हा शके ११९५ चा असून त्यात मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी दिलेल्या देणग्यांचा उल्लेख आहे. तात्पर्य, आठव्या शतकाचा प्रारंभ हा मराठीचा उत्पत्तिकाल म्हणून मानावयास हरकत नाही.

## १.३ विषयविवेचन

मराठी वाङ्मयाचा गौरवशाली प्रारंभ ग्रंथरूपात झाला तो देवगिराच्या यादवराजे (इ. ११७८–१२१८) यांच्या कारकीर्दीत. यातील भिल्लम राजाने महाराष्ट्रात यादवांच्या राज्यांची प्रस्थापना केली. व देवगिरी येथे राजधानी स्थापन केली. मराठी भाषेतील आद्यकवी श्रीमुकुंदराज यांच्याच कारकीदीर्त होऊन गेला. याचा पुत्र जैत्रपाळ व जैत्रपाळाचा पुत्र सिंघणराजा होय. याचाच कुळात पुढे कृष्णदेवराव यादव, महादेवराव यादव व रामदेवराव यादव होऊन गेले. महानुभाव पंथीयांचे वाङ्मय, ज्ञानदेवांचे वाङ्मय यादवांच्या राज्यात निर्माण झाले. हेमांडपंतांचा 'चतुर्वर्गचिंतामणी' हा ग्रंथ याच काळातील. देवगिरीच्या

यादवांच्या इतिहासापासून मराठी भाषा व साहित्य यांचा इतिहास सुरू होतो.

'विवेकसिंधू' हा मराठीतील पहिला ग्रंथ शके ११९० मध्ये रचला गेला. मध्यंतरीच्या काळात 'विवेक सिंधू' सारखा ग्रंथ दिसत नाही. मात्र या मधल्या काळात असे वाङ्मय मराठीत झालेच नाही असे म्हणता येत नाही. काळाच्या ओघात ते लुप्त झाले असावे. या ग्रंथरचनेपूर्वीही मराठीत ग्रंथरचना होत असली पाहिजे. पण ती आज उपलब्ध नाही. ओवी, गाणी, स्तोत्रे या स्वरूपात हे वाङ्मय उपलब्ध असावे व त्यातून हळूहळू विवेकसिंधूसारखा किंवा ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ निर्माण होण्याला आवश्यक अशी भाषिक आणि तत्त्वज्ञानात्मक पार्श्वभूमी तयार झाली.

'विवेकसिंधू' व 'लीळाचरित्रा'सारखे महानुभावांचे वाङ्मय निर्माण होण्यास तत्कालीन सामाजिक आणि धार्मिक परिस्थितीही कारणीभूत आहे. या काळात तत्त्वज्ञानपर आणि धार्मिक लेखनाच्या क्षेत्रात संस्कृत भाषेचे वर्चस्व होते. त्यामुळे सर्वसामान्य लोक खऱ्या धर्मापासून दूर राहिले होते. या लोकांसाठी त्यांच्याच भाषेत असे साहित्य निर्माण होणे आवश्यक होते. ती काळाची गरज होती. तसेच यज्ञयाग, क्षुद्र देवतांची उपासना, व्रतवैकल्ये, जातीयता, वर्णवर्चस्व यांनी सर्व समाज बोकाळला होता. अशा समाजापर्यंत अद्वैत तत्त्वज्ञान पोहचविणे अगत्याचे होते. म्हणून मुकुंदराजांनी उपनिषदांतील तत्त्वज्ञान मराठीत आणले. भक्ती, ज्ञान, वैराग्य यांचे महत्त्व प्रतिपादन करून मराठी भाषेचा पुरस्कार केला. तर चक्रधर स्वामींनीही मराठीचा सार्थ अभिमान बाळगून आपल्या द्वैती तत्त्वज्ञानाचा प्रसार केला. अनेक देवतावाद, वर्णवर्चस्व, यज्ञयाग, हिंसा, कर्मकांड यांचा निषेध करून संपूर्ण अहिंसा व कडकडीत वैराग्य यांचा पुरस्कार केला. ज्ञान आणि भक्ती यांचा समन्वय साधला या सर्वांसाठी जाणीवपूर्वक लोकभाषेचा (मराठीचा) पुरस्कार केला. या कालखंडातील वाङ्मयनिर्मितीच्या या प्रमुख प्रेरणा आहेत. म्हणून मुकुंदराजांची वाङ्मयनिर्मिती आणि महानुभावांची गद्यवाङ्मयनिर्मिती यांची ओळख आपण करून घेणार आहोत.

## १.४ आद्यकवी मुकुंदराज

मुकुंदराज हे मराठी भाषेतील आद्यकवी असून, त्यांच्या स्थळकाळाबद्दल संशोधकांत मतभेद आहेत. तसेच या कवीचे चरित्रही अज्ञात आहे. 'विवेकसिंधू' मध्ये या ग्रंथाचा कालनिर्देश करणारी ओवी पुढीलप्रमाणे आहे. **'शके अकराशे दाहोत्तर । साधारणनाम संवत्सर । तै राजा शारंगधर । ग्रंथ उभार तैं जाला ।।'** या ओवीनुसार **शके १११०** म्हणजे **इ.स. ११८८** हा या ग्रंथाचा निर्मितीकाळ स्पष्ट होतो. परंतु सदरची ओवी विवेकसिंधूच्या सर्व उपलब्ध प्रतींत सापडत नाही. तसेच या ओवीत सांगितल्याप्रमाणे शके १११० ला साधारण संवत्सर येत नाही. विवेकसिंधूची भाषाही ज्ञानेश्वरीनंतरची वाटते त्यामुळे या ग्रंथाला आद्यत्वाचा मान देण्याबद्दल संशोधकांत मतभेद आहेत. साधारण संवत्सर, **शके १११२** ला येतो असे ल. रा. पांगारकर म्हणतात. (पांगारकर ल. रा., मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग पहिला, पृ. ३९१) वि. ल. भावे, शं. गो. तुळपुळे, डॉ. रा. द. रानडे यांनीही अशी शंका उपस्थित केली आहे. मात्र प्रा. सुरेश म. डोळके यांनी अनेक कालगणनापद्धतीचा अभ्यास करून, सिद्ध केले आहे की, 'शके १११० मध्ये साधारण

संवत्सर अचूक येतो. (प्रा. डोळके सुरेश म., नवभारत, मे १९६०, पृ. ४८) 'कृ. पां. कुलकर्णीही शक व संवत्सराचा मेळ तंतोतंत बसतो असे म्हणतात. (कुलकर्णी कृ. पां., श्रीविवेकसिंधु : प्रस्तावना, पृ. ७६) भाषिक दृष्ट्याही या ग्रंथाचे प्राचीनत्व प्रा. सुरेश म. डोळके व कृ. पां. कुलकर्णी यांनी सिद्ध केले आहे. 'विवेकसिंधू' ग्रंथ तत्कालीन परंपरांत लोकप्रिय असल्याने मौखिक स्वरूपात त्यांचे अर्वाचिनीकरण झाले आहे. त्यामुळे त्याचा आद्यत्वाचा मान काढून घेता येत नाही. 'पण या ग्रंथाचे पूजन, पठन, मनन सर्व पंथीयांकडून होत होते, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. त्या अर्थी ते भिन्न पंथ सुरू होण्यापूर्वीच हा ग्रंथ निर्माण झाला असला पाहिजे' असे स्पष्ट करून डॉ. नसिराबादकरही या ग्रंथाला आद्यत्वाचा मान देतात. (नसिराबादकर ल. रा., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, पृ. ५) त्यामुळे शके १११० हा 'विवेकसिंधू'चा रचनाकाळ आहे व तो मराठीतील आद्यग्रंथ आहे, असे मानावयास हरकत नाही.

मुकुंदराजांच्या स्थळाबद्दलही संशोधकांत मतभेद आहेत.'**वैन्यगंगेचिये तीरी । मनोहर अंबानगरी । तेथ प्रकटले श्रीहरी । जगदीश्वरु ।।**' यातील वैन्यगंगा नदी कोणती ? अंबानगरी कोणती ? असे प्रश्न निर्माण होतात. ही अंबानगरी म्हणजे भंडारा जिल्ह्यातील वैन्यगंगा नदीच्या काठी असलेले 'आंभारे' हे होय. असे मत आजगावकर, कृ. पां. कुलकर्णी, रा. चिं. ढेरे, डोळके यांनी मांडले आहे. तर शं. गो. तुळपुळे,मोडक, कानोले यांनी ही अंबानगरी म्हणजे बीड जिल्ह्यातील बाणगंगेच्या काठी असलेले 'अंबेजोगाई' हे होय असे मत मांडले आहे. मुकुंदराज झाडीमंडळीतील असावेत असेही एक मत आहे. (झाडीमंडळ – बुलढणा जिल्ह्यातील राजूर घाटाजवळील प्रदेश) हरिनाथ–रघुनाथ–मुकुंदराज ही मुकुंदराजांची गुरुपरंपरा असून, त्यांच्या आयुष्यातील बऱ्याच घटना 'आंभारे' या ठिकाणी घडल्या आहेत. मुकुंदराजांचे परात्पर गुरु हरिनाथांचा अवतार, त्यांनी केलेल्या होमातून प्रकट झालेला शंभू, हरिनाथांना लागलेली समाधी, रामचंद्रांनी मुकुंदराजांना केलेला उपदेश या घटना अंभोऱ्यास घडल्या असून, मुकुंदराजांनी आपला विवेकसिंधू हा ग्रंथही आपल्या गुरुंच्या समाधीजवळ आंभोऱ्यास लिहिला. हरिनाथ आणि रामचंद्र यांच्या समाधीही आंभोऱ्यास आहेत. आंभारे येथील हरिनाथ संप्रदायाच्या मठात यांच्या शिष्यपरंपरांही सापडतात. यावरून, मुकुंदराज हे **आंभोऱ्याचे** असावेत हे स्पष्ट होते. मुकुंदराजांची समाधी भोपाळजवळील **खेडले** या गावी आहे. मुकुंदराजांनी आपला ग्रंथ ज्या जैत्रपाळ राजाला उद्देशून लिहिला तो यादव घराण्यातील राजा होय.

### १.४.१ मुकुंदराजांची गुरुपरंपरा

'विवेकसिंधू'च्या उत्तरार्धतील १८ व्या प्रकरणात मुकुंदराजांनी आपल्या गुरुपरंपरेविषयीची माहिती दिली आहे. मुकुंदराज म्हणतात 'आदीगुरु श्रीआदिनाथु । तेथौनि श्रीहरीनाथु । तेयाचा शिष्य श्रीरघनाथु । जो गुणसिंधु ।।' याप्रमाणे श्रीआदिनाथ – श्रीहरिनाथ – श्रीरघुनाथ (श्रीरामचंद्र) मुकुंदराज अशी ही गुरुपरंपरा दिसते. श्रीहरिनाथाने बारा वर्षे अनुष्ठान करून पार्वतीसह शंभूला प्रसन्न केले. अंबानगरमध्ये मोठा यज्ञ केला. त्या होमातून श्रीआदिनाथ प्रकट झाले व त्यांनी हरीनाथाला दर्शन दिले. आदिनाथाच्या दर्शनाने मोठी तन्मयावस्था श्रीहरिनाथाला प्राप्त झाली. या प्रसंगाचे सविस्तर वर्णन मुकुंदराजांनी केले आहे. आपले गुरु रघुनाथ यांचे वर्णन करताना मुकुंदराज म्हणतात, 'राम गुणाचा सागरु । महीमेचा मेरु । बह्मविद्या देता उदारु। तोचि येकु ।।'

## १.४.२ विवेकसिंधू

'विवेकसिंधू' हा मुकुंदराजांचा महत्त्वाचा प्रसिद्ध ग्रंथ. ब्रह्मतत्त्वनिरूपण हा या ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय आहे. हा ग्रंथ ओवीवृत्तात असून ही ग्रांथिक ओवी आहे व साडेतीन चरणी आहे. यात तत्त्वज्ञानाचे निरूपण गुरुशिष्यसंवादरूपाने केले आहे. तापत्रयाने गांजलेला शिष्य गुरूना शरण जातो. तेव्हा शरण आलेल्या शिष्याला गुरु उपदेश करतात. गुरुशिष्यांच्या नात्याचा आविष्कार, शिष्याच्या उद्धारासाठी गुरूंना वाटणारी तळमळ इत्यादी गोष्टी गुरुशिष्यसंवादातून स्पष्ट होतात. येथे ब्रह्मसुखाचा स्वानंद गुरुशिष्यांच्या संवादातून प्रकट झाला आहे. या संदर्भात मुकुंदराज म्हणतात, 'म्हणौनि विवेकसिंधु येणे नावे । ग्रंथु कीजैल स्वानुभवे। तऱ्ही श्रोती अवधान देयावे । म्हणे मुकुंदराजु ।। गुरुशिष्याचेनि संवादे । जैं बोलिजैल विनोदे । तें आइकतु आनंदे । महानुभावें ।।' या ग्रंथाच्या श्रवणाने सायुज्यमुक्ती सहजासहजी मिळेल. याच देहामध्ये मुक्तीचा सोहळा उपभोगता येईल. 'येचि देही येचि डोळां । भोगिते मुक्तीचा सोहळा ।' एवढेच नव्हे तर, मुकुंदराज पुढे म्हणतात, 'विवेकसिंधूभीतरी । जो मुमुक्षू अवगाहन करी । तेयासि सेवि श्रीहरी । भेटे साक्षात्कारे ।। विवेकसिंधूची शब्दरत्ने । जरि कंठी धरिजेती प्रेत्ने । तरी जनकाचिये महीमाने । श्लाघ्याता होये ।।' संपूर्ण ग्रंथात आत्मविचारच असल्यामुळे येथे केवळ शांतरस अथवा ब्रह्मरसच आहे. केवळ परब्रह्मच रसपूर्ण आहे, असा मुकुंदराजांचा स्वानुभव आहे. 'शृंगारादिक नवरस । ते हि जेथे आर्तविरस । ते परब्रह्म येक रस । जाणावे योगिराजे ।।' हा ग्रंथ आपण वेदशास्त्रे, उपनिषदे यांच्या मंथनातून रचला आहे, असे मुकुंदराज सांगतात. 'तैसे उपनिषदांचे निर्मंथन । करौनि केला ग्रंथ निर्माण ।' किंवा '...... वेदशास्त्राचा मथीतार्तु । मिया बोलीला हा परमार्थु ।'

सर्वसामान्यांना ब्रह्मप्राप्ती व्हावी म्हणून हा ग्रंथ मऱ्हाटी भाषेत लिहिला गेला. अल्पबुद्धीमुळे जे सर्वसामान्य लोक शास्त्र जाणू शकत नाहीत. ज्यांच्या जवळ योगधारणेची शक्ती नाही व प्रबळ तर्कही नाही, अशा लोकांबद्दल कणव येऊन मुकुंदराजांनी हा ग्रंथ त्यांच्याच मराठी भाषेत लिहिला. वेदशास्त्रांतील पारमार्थिक ज्ञान मराठीतून ग्रहण करण्यास काय हरकत आहे ? **'वेदशास्त्रांचा मथितार्थु । मऱ्हाटिया जोडे फलितार्थु। तरि चतुरी परमार्थु। कां नेघावा ?'** पारमार्थिक ज्ञान मातृभाषेतून (बोली भाषेतून) घेतल्यास ते अधिक परिणामकारक होते, हे येथे सूचित केले आहे. मराठी भाषा असली तरी येथे '**उपनिषदांचीच राहाटी**' आहे असे मुकुंदराज सांगतात.

'विवेकसिंधू' हा ग्रंथ पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा दोन भागांत विभागलेला असून, ग्रंथाची एकूण ओवीसंख्या १६९८ आहे. योगवासिष्ठ भागवत, भगवद्गीता, ब्रह्मपुराण, विष्णुपुराण, गुरुगीता, उपनिषदे, वेदान्तशास्त्र इत्यादी ग्रंथांतील विषय विवेकसिंधूत आले आहेत. हा पूर्ण आध्यात्मिक आणि शास्त्रीय ग्रंथ आहे. त्यामुळे अनेक पारिभाषिक व संस्कृत शब्द येथे पाहावयास मिळतात. या ग्रंथाच्या पूर्वार्धात स्वरूपसमावेश, स्वानुभवदृढीकरण, तत्त्वसृष्टीकथन, ईश्वरतनुत्रयकथन, त्वंपदकारण, लिंगदेहविवरण, स्थूलदेहकथन व सर्वं ब्रह्मति विवरण ही प्रकरणे आली आहेत. उत्तरार्धात स्थूलदेहनिरसन, लिंगदेहनिरसन, कारणदेहनिरसन, महाकारणदेहनिरसन, ईश्वर तनुत्रयप्रपंचप्रलयविवरण, तत्पदार्थशोधन, जीवपरमात्मातादात्म्यपूर्वक मुक्तिस्वरूप

विवरण, भेदखंडनपूर्वक अद्वयस्वरूपप्रतिपादन, अद्वैतप्रतिपादन, सच्चिदानंदपदत्रयविवरण, गुरुमहात्म्यकथन ही प्रकरणे आहेत.

पूर्वार्धाच्या पहिल्या प्रकरणात सद्‌गुरूची व सच्छिष्याची लक्षणे सांगितले आहेत. दुसऱ्या प्रकारात गुरुमाहात्म्य कथन करून ब्रह्मानुभूतीचे वर्णन केले आहे. पुढे ईश्वराच्या लिंगदेहाचे वर्णन असून, नंतर स्थूलदेहाच्या उत्पत्तीविषयी निवेदन आहे. पाचव्या प्रकरणात जीवसृष्टी कशी निर्माण झाली, याबद्दलचे वर्णन येते. सातव्या प्रकरणात वेदान्तातील 'सर्वं ब्रह्मेति' या पदाचे विवरण आले आहे. अशी एकूण सात प्रकरणे पूर्वार्धात आहेत.

'तत्त्वमसि' या महावाक्याच्या विवरणाने विवेकसिंधू'चा उत्तरार्ध सुरू होतो. या महावाक्याचा आशय विवरूण सांगताना नैयायिक, वैषेशिक, चार्वाक इत्यादींचा उल्लेख येतो. मुकुंदराजांनी चार्वाकमताचे खंडण केले आहे. तेराव्या अध्यायात अविद्या व माया यांचे विवरण आहे. चौदाव्या प्रकरणात सायुज्यमुक्तीचे वर्णन आहे. सतराव्या प्रकरणात सच्चिदानंदपदाचे विवरण आहे. आठराव्या प्रकरणात गुरुमाहात्म्य वर्णन केले असून, आपली परंपरा सांगितली आहे.

मुकुंदराजांना वेदान्तदर्शनाबद्दल अत्यंत प्रेम आहे. इतर पाच शास्त्रे ही कोल्ह्याप्रमाणे असून वेदान्तशास्त्र हे सिंहाप्रमाणे आहे. वेदान्तशास्त्रासमोर इतर शास्त्रे तुच्छ आहेत. हे स्पष्ट करताना मुकुंदराज म्हणतात –

**पाचही दरुषणे जंबुके । वेदान्त सिंहाचे ये हाके ।**
**आईकौनि म्हणती राख राखे । भजलो मी तुज ।।**
**म्हणौनि वेदान्त बोलावे । तेंचि साच मानावे ।**
**येर वावो सांडावे । पाखांड मत ।।**

मुकुंदराज स्वत: नाथपंथी असल्यामुळे 'विवेकसिंधू'त योगानुभवाचेही वर्णन आहे. 'विवेकसिंधू'त भक्तिमार्गाचाही पुरस्कार मुकुंदराजांनी केलेला आहे. या भक्तिमार्गालाच ते राजयोग म्हणतात. गुरुकृपेने हा राजयोग प्राप्त झाल्यावर वेदशास्त्र, अष्टांगयोग यांचा अभ्यास करावा लागत नाही. भक्ती, ज्ञान आणि वैराग्य हे भवरोगावरील औषध आहे. असे मुकुंदराजांनी स्पष्ट केले आहे. या दृष्टीने त्यांच्या पुढील दोन ओव्या चिंतनीय आहेत.

**न पडे वेदशास्त्राचा पांगु । अभ्यासावा न लगे अष्टांग योगु ।**
**जरी पाविजे राजयोगु । श्रीगुरुप्रसादे ।।**
**भक्ति ज्ञान वैराग्य । हे श्रवणाचे सौभाग्य ।**
**भवरोगिया आरोग्य । तेणेचि औषधे ।।**

भारतीय परंपरेत अध्यात्ममार्गात सद्‌गुरुंना विशेष महत्त्व आहे. मुकुंदराजांनीही हा वारसा जपला आहे. गुरु सूर्यापेक्षाही श्रेष्ठ आहे. कारण सूर्य बाहेरील अंध:कार नाहीसा करतो, तर गुरू अंत:करणातील अज्ञानरूपी अंध:कार नाहीसा करतात. म्हणून मुकुंदराजांना मुक्तीपेक्षाही गुरुप्रेम श्रेष्ठ वाटते.

मुकुंदराजांचा हा ग्रंथ तत्त्वज्ञानात्मक आणि आध्यात्मिक स्वरूपाचा असल्यामुळे त्यात काव्य अथवा कलात्मकता फारशी आढळत नाही. कठीण आध्यात्मिक विषय सुस्पष्ट करण्यासाठी काव्याचा आणि वेगवेगळ्या दृष्टांतांचा आधार घेतलेला दिसतो. समर्पक उपमा, दृष्टांतांमुळे ग्रंथाला सुलभता व रसमयता प्राप्त झाली आहे. आपले मऱ्हाटे बोल ओबडधोबड असले तरी रसमय आहेत, त्यात विवेकाचा झळाळा आहे; हे सांगताना कवी म्हणतो –

**ऊस किरू दिसे काळा । परि घेपे रसाचा गळाला ।**
**तैसे आरूष बोल परि झळाळा । दिसे विवेकाचा ।।**

शृंगारादी नवरसांपेक्षा ब्रह्मरसाचे महत्त्व मुकुंदराजांना अधिक वाटते. म्हणून अ. ना. देशपांडे 'विवेकसिंधू' हा कवितारतीचे विलासवन नव्हे तर तो योगेश्वराचा आश्रम आहे' असे म्हणतात. (देशपांडे अ. ना., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग पहिला, पृ. २५४) परतत्त्वाचा स्पर्श झाल्यामुळे मुकुंदराजांची वाणी अंत:करणाला जाऊन भिडते. यातील रुपके, दृष्टांत पाहण्यासारखे आहेत. आरंभी ब्रह्म, मध्ये प्रपंचस्वरूप व अंती ब्रह्म हा विषय स्पष्ट करण्यासाठी मुकुंदराज दृष्टांत देतात. 'आदी अंती साळी देखिली । मध्ये तृणाकारे विरूढली । परि सर्व साळी येणे शब्द बोलिली । विबुधजनी ।।' चुंबक जवळ येताच ज्याप्रमाणे लोखंड विचित्र रीतीने फिरू लागते, त्याप्रमाणे अकर्ता व स्वतंत्र असा जो तू (परमात्मा) त्या तुझ्यामुळे जडदेह फिरू लागतो. हा दृष्टांत उल्लेखनीय आहे. पाणीच लाटांच्या रूपाने आकार धारण करते किंवा सोनेच अलंकारांच्या रुपानी नटते, त्याप्रमाणे अव्यक्त ब्रह्मच विश्वाच्या रूपाने व्यक्त होते. हे पारंपरिक दृष्टांतही मुकुंदराजांनी दिले आहेत. तात्पर्य 'विवेकसिंधू'त नवरस नसले तरी परतत्त्वस्पर्श आहे; आणि हेच या ग्रंथाचे सामर्थ्य आहे. येथील ब्रह्मरस अथवा शांतरस विद्वज्जनांना मोहवील असा आहे, यात शंका नाही.

'विवेकसिंधू' ची भाषा त्याच्या आद्यत्वाच्या तुलनेने प्राचीन वाटत नसल्याचे अनेकदा सांगितले जाते. 'मात्र विवेकसिंधूची लोकप्रियता, पाठांतर, मनन, चिंतन, वाचन, प्रसार इत्यादी कारणांमुळे व अनेक प्रतींच्या हस्तांतरांमुळे भाषेस अर्वचीनत्व आले असण्याची शक्यता आहे.' असे डॉ. प्र. न. जोशी म्हणतात. तसेच 'वेदान्तशास्त्र, ब्रह्मनिरूपण, आध्यात्मविचार यांची परिभाषा मुकुंदराजांनी सिद्ध केली.' (जोशी प्र. न., मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, पृ. ९५) तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने विवेकसिंधू आणि अमृतानुभव या दोन ग्रंथात बरेच साम्य आहे. 'विवेकसिंधू' आणि 'गुरुचरित्र' या दोन ग्रंथांतही शब्द, अलंकार आणि प्रयोग या दृष्टीने बरेच साम्य आहे. 'विवेकसिंधू'तील अनेक विषय दासबोधात आले आहेत. मृत्यूंजय, रेणुकादास, दासोपंत, संत तुकाराम, वामनपंडित, केसरीनाथ, कृष्णदायार्णव, मोरोपंत, महिपती इत्यादी कवींनी मुकुंदराजाचा गौरव केला आहे. त्यावरून या ग्रंथाची थोरवी व प्रभाव दिसून येतो.

### १.४.३ परमामृत

'परमामृत' हा छोटासा ग्रंथही मुकुंदराजांच्या नावावर असून, त्यात 'विवेकसिंधू'तील विषयच संक्षेपाने आले आहेत. हा ग्रंथ शके १११० च्या दरम्यान रचला असावा. 'योगवासिष्ठा'तील 'अमृतं परम'

या शब्दांवरून 'परमामृत' हे नाव ग्रंथकाराला सुचले असावे. प्रामुख्याने मुमुक्षूसाठी हा ग्रंथ लिहिला आहे. यात चौदा प्रकरणे व ३२३ ओव्या आहेत.

**'शके अक्राशे दाहोत्तरी । श्रीअंबा नाम नगरी ।**
**परमामृत ग्रंथ निर्धारी । प्रगट झाला ।।'**

या ओवीवरून हा ग्रंथही अंभोरे येथेच लिहिला असावा असे वाटते. मंगलाचरणातील गुरुमाहात्म्य, अन्य मतांचे खंडण करणारे दुसरे प्रकरण, महावाक्यविवरण, स्थूलदेह, सूक्ष्मदेह, कारणदेह, महाकारणदेह यांचे निरसन, शून्यखंडण, अज्ञानखंडण, मुक्तिरहस्य, साक्षात्कार इत्यादी विवेकसिंधूतील विषय या ग्रंथात संक्षेपाने आले आहेत.

परमार्थामध्ये सद्गुरुंचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. गुरुकडूनच आत्मानुभूती प्राप्त होते. पूजाअर्चा, तीर्थदाने, मंत्रयंत्र इत्यादी साधनांनी आत्मसाक्षात्कार होत नाही. हे सांगताना मुकुंदराज म्हणतात –

**परमामृत ग्रंथ प्रमाण । केलें परमार्थाचें कथन ।**
**जयासि पाहिजे गुरुखूण । तेणें हाचि पाहावा ।।**
**पूजा स्नाने तीर्थे दाने । मंत्रयंत्र याग हवने ।**
**कीजे तितुके फळ भोगणे । स्वर्गादिक सर्वथा ।।**
**जपतप अनुष्ठानें । आणि नातापरिंची साधने ।**
**मोक्ष न पाविजे आत्मज्ञाने । वांचोनिया सर्वथा ।।'**

आत्मस्वरूप प्राप्त झाल्यास जी अनुभूती येते त्याचे मोठे नेटके वर्णन बाराव्या प्रकरणात केले आहे. मुकुंदराज म्हणतात, 'स्वेदकंपादि उठती । अष्ट सात्विक भाव प्रकटती । पावे साम्राज्य संपत्ति । रंक जैसा ।।' यज्ञयागादी कर्मे, स्वर्गसुखादी वस्तू ब्रह्मसुखावरून ओवाळून टाकाव्यात असे मुकुंदराज सांगतात. परमार्थातील तत्त्वज्ञानात्मक विचार विविध उपमा, दृष्टांतांनी सुलभ करून सांगण्याचा प्रयत्न मुकुंदराजांनी केला आहे.

### १.४.४ पवनविजय

परंपरेने मुकुंदराजांच्या नावावर नोंदविलेला हा आणखी एक ग्रंथ. 'हा ग्रंथ पवनविजय । सर्व कामनेचा करी जय । विवेकसिंधूचा अन्वय । सारांश येथे कथियेला ।।' असे या ग्रंथात शेवटी म्हटले आहे. शिवपार्वती संवादरूपाने सांगितलेल्या या ग्रंथात 'विवेकसिंधू' तीलच विषय आलेले आहेत. कृ. पा. कुलकर्णी यांच्या मते कोणी हरिहरदास या ग्रंथाचा कर्ता असावा.

आपल्या तत्त्वज्ञानाविषयी मुकुंदराजांनी 'शंकरोक्तीवरी । मियां बोलली हे वैखरी' असे स्वत:च म्हटले आहे. मात्र ही शंकरोक्ती कोणती ? शिवस्वरूपी आदिनाथाच्या परंपरेतील की आद्यशंकराचार्यांच्या अद्वैतमतास अनुसरणारी ! असे विद्वानांमध्ये मतभेद आहेत. कृ. पां. कुलकर्णी, मा. श्री. अणे, ल. रा. पांगारकर यांनी मुकुंदराजांनी शंकराचार्यांचा अद्वैत सिद्धांतच आपल्या ग्रंथांत प्रतिपादन केला आहे, असे म्हटले आहे. या विषयी शं. दा. पेंडसे म्हणतात, 'मुकुंदराजांनी 'विवेकसिंधूत' शांकरतत्त्वज्ञानाचा स्वीकार

आणि विवेचन केल्याचे स्वत:च सांगितले आहे. तेव्हां अद्वैत आणि माया किंवा विवर्तवाद यांचा त्यांनी पुरस्कार केला हे वेगळे सांगावयास नकोच'. (पेंडसे शं. दा, श्रीज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान, पृ. ४१८) या संदर्भात लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात की, 'मुकुंदराज संपूर्णपणे शांकरमतास अनुसरत नाहीत. शंकराचार्यांचे ब्रह्मसूत्रभाष्य व उपनिषदभाष्ये यांचे मंथन करून मुकुंदराजांनी ब्रह्मविचार व साध्यसाधनविचार हे विवेकसिंधूत मांडले आहेत. मात्र शांकरगीताभाष्याची परंपरा मुकुंदराजांनी स्वीकारलेली दिसत नाही.' (जोशी लक्ष्मणशास्त्री, नवभारत, ऑगस्ट, १९५९)

अशा रीतीने **मुकुंदराजांनी मराठी साहित्याची मुहूर्तमेढ रोवली** आणि आपल्या वाङ्मयाद्वारे धार्मिक आणि सामाजिक प्रबोधनाचे कार्यही केले. विद्यार्थी मित्रहो, आपण यानंतर महानुभाव संप्रदाय व त्यांची वाङ्मयीन कामगरी यांचा परिचय करून घेणार आहोत.

### १.५.१ महानुभाव संप्रदाय : स्थूल परिचय

श्रीज्ञानेश्वरांच्या काही काळ अगोदर महाराष्ट्रात महानुभाव संप्रदाय उदयास आला. या पंथाची स्थापना श्रीचक्रधर स्वामींनी केली. शके १११६ ते ११९४ (इ.स. ११९४ ते १२७२) हा चक्रधरांचा कालखंड मानला जातो. या कालखंडात चक्रधरांना बरेच शिष्य मिळाले होते. त्यातील काही शिष्य तर विद्वान पंडित होते. या पंथाचे स्वत:चे असे तत्त्वज्ञान आणि आचारधर्म होता. या पंथीयांनी मराठी भाषेत अद्वितीय अशी वाङ्मयनिर्मिती केली. गद्यवाङ्मयाची मुहूर्तमेढ रोवली. नंतरच्या काळात '**सकळ**' नावाच्या गुप्त लिपीत महानुभवांचे वाङ्मय गेल्यामुळे लोकांपासून महानुभावीय दुरावले गेले.

या नंतर वा. ना. देशपांडे, य. खु. देशपांडे, नी. ब. भवाळकर, ह. ना. नेने इत्यादी संशोधकांनी या पंथाविषयी माहिती उजेडात आणली. या सर्वांत डॉ. वि. भि. कोलते यांचे कार्य महत्त्वाचे आहे. पुढे महानुभवांचे ग्रंथ देवनागरी लिपीतून लोकांपुढे येऊ लागले व भाषेच्या आणि साहित्याच्या दृष्टिकोनातून या ग्रंथांचे महत्त्व लक्षात येऊ लागले. तसेच या पंथाचे तत्त्वज्ञान आणि आचारधर्मही महत्त्वाचा आहे, हे लक्षात येऊ लागले. ऋद्धिपूर (रिधपूर) आणि माहूर ही या पंथाची दोन प्रमुख तीर्थक्षेत्रे आहेत.

या पंथाचे मूळ नाव '**परमार्ग**' असे आहे. श्रीचक्रधर हे या पंथाचे प्रवर्तक. श्रीकृष्ण आणि दत्तात्रय ही या पंथाची दोन दैवते. श्रीदत्तात्रेयापासून चांगदेव राऊळांना, श्रीचांगदेवापासून श्रीगोविंदप्रभूंना व श्रीगोविंद-प्रभूपासून श्रीचक्रधरांना उपदेश वा ज्ञानशक्ती प्राप्त झाली. ही परंपरा पुढीलप्रमाणे दाखविता येईल.

श्रीदत्तात्रेय - श्रीचांगदेव राऊळ (श्रीचक्रपाणी) - श्रीगोविंदप्रभू - श्रीचक्रधर.

या पंथात (१) श्रीकृष्ण चक्रवर्ती, (२) श्रीदत्तात्रेय प्रभू, (३) श्रीचांगदेव राऊळ, (४) श्रीगोविंद प्रभू (गुंडम राऊळ) आणि (५) श्रीचक्रधर यांना 'पंचकृष्ण' म्हटले जाते. 'महानुभावांच्या मते श्रीकृष्ण हा विष्णूचा मर्यादित अवतार नसून, परब्रह्माचा साक्षात असा व्यापक अवतार आहे. भारतीय परंपेतील श्रीकृष्ण व महानुभावांचा श्रीकृष्ण यात याखेरीज अन्य भेद नाही' ('डॉ. जोशी, प्र. न., मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, पृ. १०७) महानुभावांचे दुसरे दैवत म्हणजे श्रीदत्तात्रेय प्रभू. श्रीदत्तात्रेय प्रभू हेच या संप्रदायाचे

आदिकारण असल्याचे चक्रधरांनी म्हटले आहे. 'या मार्गासि श्रीदत्तात्रेय प्रभू आदिकरण: श्रीदत्तात्रेय प्रभूचा चतुर्युगी अवतारू :' असे दत्तात्रेयाचे माहात्म्य महानुभावांनी वर्णन केले आहे. हा दत्त म्हणजे अत्रीऋषीपासून अनसूयेच्या उदरी जन्मलेला प्रत्यक्ष परब्रह्म परमेश्वराचा अवतार होय. त्याचे स्वरूप 'तीन शिरे सहा हात' असे नसून, तो एकमुखी व चतुर्भुज असा आहे.

श्री दत्तात्रेयांनी श्रीचांगदेव राऊळ (चक्रपाणी) यांना दीक्षा दिली. अकराव्या-बाराव्या शतकात फलटण येथे कऱ्हाडे ब्राह्मणाच्या कुळात जनकनायक व जनकाइसा यांच्या पोटी श्रीचांगदेव राऊळ यांचा जन्म झाला. ते माहूरगड (श्रीदत्तात्रेयांचे निद्रास्थान) येथे गेले असताना त्यांना श्रीदत्तात्रेय प्रभूपासून ज्ञानशक्ती प्राप्त झाली. वाघाच्या रूपात दत्तात्रेयांनी त्यांना दर्शन दिले व आपल्या पायाचा चवडा त्यांच्या मस्तकावर ठेवला. त्यानंतर ते तेथेच सहा महिने राहिले व नंतर द्वारावतीस (द्वारका) गेले. तेथे ते गोमतीच्या काठी एका गुंफेत राहात असत. द्वारावतीला असताना ते एका हातात खराटा आणि दुसऱ्या हातात सूप घेऊन गावातील रस्ते झाडीत व केरकचरा गोमतीत नेऊन टाकीत. आपल्या दर्शनाला येणाऱ्या पुरुषांच्या डोक्यावर हातातील सूप ठेवून त्यांना खराट्याने पाठीवर मारीत. शक्तिदान करण्याची त्यांची ही पद्धती होती. ऋद्धिपूरचे श्रीगोविंद प्रभू उर्फ गुंडम राऊळ अशा प्रकारे एकदा द्वारावतीला आले असता त्यांनाही श्रीचांगदेव राऊळांनी याच पद्धतीने ज्ञानदान केले. यानंतर काही काळाने श्रीगोविंदप्रभू आपल्या गावी ऋद्धिपूरला येऊन राहिले.

दरम्यान इकडे द्वारावतीला श्रीचांगदेव राऊळ काळ घालवत असताना, त्यांची कीर्ती सर्वदूर पसरली. ती ऐकून काउरळीची कामाख्या नावाची एक हटयोगिनी त्यांच्याकडे आकर्षित होऊन द्वारावतीला आली; व त्यांच्याकडे रतिसुखाची इच्छा करून त्यांच्या गुंफेच्या दाराशी सात दिवस धरणे धरून बसली. शेवटी ती ऐकत नाही म्हणून चांगदेव राऊळांनी योगसामर्थ्याने देहत्याग केला व त्याच वेळी गुजरातमधील भरवस किंवा भडोच येथील स्मशानात आणलेला प्रधानपुत्र हरिपालदेव यांच्या मृत देहात प्रवेश करून त्यांनी नवीन अवतार स्वीकारला हाच चक्रधर होय.

श्रीचक्रधरांचे पूर्वचरित्र अद्‌भुत असे आहे. गुजरातमधील भडोच येथील मल्लदेव राजाचा प्रधान विशालदेव यास श्री दत्तप्रभूंच्या कृपेने शके ११९६ मध्ये पुत्र झाला. त्याचे नाव हरिपालदेव. हा मोठा पराक्रमी असून त्याने आपल्या देशावर स्वारी करणाऱ्या यादवराज सिंघणाचा पराभव केला. शके ११४३ मध्ये वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी त्याचे निधन झाले. प्रेत स्मानात नेले असता द्वारावतीच्या चांगदेव राऊळांनी त्याच्या मृत देहात प्रवेश केला. हरिपालदेव जिवंत झाला. वास्तविक हा हालपाळदेव नव्हता, तर द्वारावतीचा चांगदेव राऊळ होता. तो काही दिवस तेथे राहिला. पण संसारात त्याचे मन रमेना. नंतर रामटेकच्या यात्रेचे निमित्त करून तो घरा बाहेर पडला व रामटेकला न जाता ऋद्धिपूरला श्रीगोविंदप्रभू यांचेकडे आला. तेथे त्याने श्रीगोविंदप्रभूकडून ज्ञानशक्तीचा स्वीकार केला. (कारण द्वारावतीला असताना चांगदेव राऊळांनी ही ज्ञानशक्ती श्रीगोविंदप्रभूंना दिली होती.) ती त्यांच्याकडून त्याने पुन्हा ग्रहण केली व येथून पुढे हा हरपाळदेव चक्रधर या नावाने प्रसिद्ध झाला. हे चक्रधर हेच महानुभाव पंथाचे संस्थापक होत. त्यानंतर चक्रधर सालबर्डीच्या डोंगरात येऊन राहिले. तेथे त्यांनी बारा वर्षे तपश्चर्या करून अनेक ठिकाणी भ्रमण केले. पुढे भोगावतीकाठी श्रीदत्तात्रयाचे दर्शन झाल्यावर त्यांनी संन्यासदीक्षा धारण केली. यानंतर एलिचपूर

वडनेर, पैठण इत्यादी ठिकाणी भ्रमण करून शिष्यसंप्रदाय वाढविला. रामदेव, नागदेव, नागांबिका, म्हाइंभट, सारंगपंडित यांसारखे शिष्य मिळवून त्यांनी ज्ञानमार्गाचा व प्रेममार्गाचा प्रसार साऱ्या महाराष्ट्रात केला. स्वतंत्र तत्त्वज्ञान आणि आचारधर्म निर्माण करून स्वतंत्र संप्रदायाची स्थापना केली. तोच महानुभाव संप्रदाय होय.

### १.५.२ महानुभावांचा आचारधर्म

महानुभावांचा आचारधर्म प्रामुख्याने 'सूत्रपाठा'तील 'आचार' व 'आचारमालिका' या दोन प्रकरणांतून व्यक्त होतो. महानुभवांचे आचार नित्य व नैमित्तिक स्वरूपाचे असून, ते साधकाची योग्यता जाणून सांगितले आहेत. संन्यासी वर्गासाठी नित्याटन, भिक्षाभोजन, एकांतवास व परमेश्वर स्मरण ही मुख्य कर्तव्ये सांगितली आहेत. गृहस्थ वर्गासाठीही प्रापंचिक कर्मे व आचार सांगितले आहेत. महानुभाव पंथाची दीक्षा घेणे म्हणजे महान तेजाची व बलाची दीक्षा घेणे होय. पंथाची दीक्षा घेण्यापूर्वी द्यूत, मद्य, मांस, वेशा, शिकार, चोरी, परद्वारसेवा या सात दुर्गुणांचा त्याग करणे आवश्यक मानले आहे.

चक्रधरांनी साधकांना सर्वप्रकारच्या संबंधाचा त्याग करावयास सांगितले आहे. कारण सर्वसंगपरित्याग हे वैराग्याचे मूळ आहे. म्हणून ''स्वदेशसंबंधु त्याज्य: स्वग्रामसंबंधु त्याज्य: संबंधियांचा संबंधु तो विशेषतां त्याज्य.'' असे स्पष्ट केले आहे. महानुभावाना विवेकयुक्त वैराग्य अभिप्रेत आहे. दिखाऊ वैराग्याचाही उपयोग नाही. जीवाला वैराग्याचा देखावा करण्यास आवडणे हाही एक विकारच आहे. (''जीवासि वैराग्य मिरउं आवडे हाही एक विकारुचि की गा:'') म्हणून साधकाने स्त्री आणि नातेवाईक यांचा त्याग केला पाहिजे. महानुभावांनी स्त्रीला उत्पादकद्रव्यांचा राजा असे संबोधून ''चित्रींची स्त्री न पाहावी'' असा उपदेश केला आहे. इतर द्रव्यांचा उन्माद येण्याला ती द्रव्ये सेवन करावी लागतात, पण ''स्त्री दर्शनमात्रेंचि माजवी'' असे असल्याने तिचे सेवन सर्व प्रकारे वर्ज्य मानले आहे. धर्मकारणात विषयलोभ उपयोग नाही. तात्पर्य, ''कोमल ज्ञानी विखो विघ्न''.

साधकाने विकारशून्य व विकल्पशून्य झाले पाहिजे. त्यासाठी स्वभावाचे म्हणजे देहधर्माचे नियमन केले पाहिजे. याचे मूळ क्षुधा किंवा रसना. क्षुधेला किंवा रसनेला नियमित केले की, स्वभावाचे आपोआप नियमन होते. म्हणून युक्ताहार व तोही जगण्यापुरता असावा. ''प्राणासि आहारु देयावा : इंद्रियांसि नेदावा:'' हे युक्ताहाराचे मुख्य सूत्र सांगितले आहे.

यासाठी भीक्षाव्रत सांगितले आहे. भिक्षेला चक्रधरांनी 'पारधी' व 'राज्य' म्हटले आहे. पारधी म्हणजे स्वातंत्र्य. ''ही भिक्षावृत्ती म्हणजे कामक्रोधादि रिपूंच्या दमनाचे व वैराग्याचे धडे देणारी पाठशाळाच होय.'' असे डॉ. कोलते म्हणतात. (कोलते वि. भि., महानुभावांचा आचारधर्म, पृ. ११०) महानुभवांनी भिक्षेसाठी काही पथ्येही सांगितली आहेत. भिक्षा मागताना घर निवडू नये. (''घर न निवडीत भिक्षा कीजे:'') भिक्षेसाठी ओळखीच्या घरी व तोरण बांधलेल्या घरी जाऊ नये. एकाच घरी भिक्षा मागू नये. जो पदार्थ मिळेल तो घ्यावा. ('भिक्षे पडिला पदार्थ हाती घेईजे:') भिक्षान्न 'पवित्राचे पवित्र' मानले आहे. भिक्षान्न चवीने व खाता काला म्हणजे रेदाचेंदा करून खावा. (''रेंदेया चेंदेया दरू भरीजे:'') जेवताना आवड, गोडी यांचा

विचार करू नये. आहारही दिवसातून एकदाच घ्यावा.

झाडाच्या तळी गावाच्या बाहेर साधकाचा मुक्काम असावा. एकाच झाडाची व एकाच स्थानाची सवय असू नये. झाडही फुलाफळांनी बहरलेले असू नये. परनिंदा, परवार्ता करू नये. कामक्रोध, मद, मत्सर यांचा त्याग करावा. अहंकार मुळातून नाहीसा करावा. ('अहंतेचे मूळ सकंदी उपडावे.') वस्त्रे मळकट व फाटकीतुटकी वापरावीत. ती स्मशानातून प्रेताच्या अंगावरील आणलेली असावीत.

देवाशिवाय इतर विषयांविषयी बोलणे साधकाने टाळावे. कोणाचेही अंत:करण दुखवू नये. प्रिय व सत्य बोलावे. सेवाधर्म, सहनशीलता, अहिंसावृत्ती हे साधकाचे महत्त्वाचे गुण आहेत. अहिंसेचे वृत्त तर चक्रधरांना फार महत्त्वाचे वाटते. ''तुमचेनि मुंगी रांड नोहावी'' असे चक्रधर सांगतात. म्हणून त्यांचा साधकांना उपदेश आहे, ''तुम्हा मारीता पुजीता समानचि होआवा की गा :''

साधकांनी परस्परांशी प्रेमाने वागावे ''तुम्हां परस्परें परमप्रीती होआवी:'' ही परमप्रीती नि:स्वार्थ असावी. ''स्वातंत्र्य हा मोक्षु: पारतंत्र्य हा बंधु:' हे स्वामींचे विचार नित्य मननीय आहेत. 'निरंतर परमेश्वराची आर्ति करावी: निरंतर परमेश्वराचा विरहो भावावा.' 'पुजा पुरस्कारू न स्वीकारावा: संपन्नांचा घरी न वसावे, विषयाचा संगु न करावा:' हा चक्रधरांनी सांगितलेला आचारधर्म आजही महत्त्वाचा आहे. ''आपण कवणा आधीन होआवे नाही: आपणया अधीन कवणाते करावे नाही: जावे परमेश्वराधीन होआवे:'' असे हा पंथ सांगतो.

चक्रधरांचा महानुभाव पंथ समन्वयवादी आहे. तो वेदांविषयी आदर बाळगणारा असला तरी वेदांना प्रमाण मानणारा नाही. असे डॉ. कोलते यांचे मत आहे. (डॉ. कोलते वि. भि., महानुभाव संशोधन, १९६२ – महानुभाव पंथांचे अवैदिकत्व, पृ. ५९-७६) तर 'वेदपूर्वकालापासून चालत आलेल्या सिद्ध संस्कृतीची महानुभाव पंथ ही एक शाखा आहे.' असे मत लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मांडले आहे. (जोशी लक्ष्मणशास्त्री, महानुभाव संत, पुरस्कार पृ. ११) वेद, गीता, भागवत, श्रीकृष्ण, दत्तात्रेय यांना मानणारा हा पंथ आहे. त्यामुळे तो भागवतधर्मापासून फारसा भिन्न नाही असे सांगून ल. रा. पांगारकर म्हणतात, ''........... पण भागवत धर्माचा हा एक पंथ आहे, असे या पंथाचे वाङ्मय पाहिले असता निभ्रांत वाटते ? (पांगारकर ल. रा., मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला, पृ. ४७९-८०)

साधकांनी कोठे वास्तव्य करावे ? याविषयी चक्रधर सांगतात, 'महाराष्ट्री असावें' स्वामींना महाराष्ट्र देशाबद्दल विशेष अभिमान होता. त्यांच्या वरील सूक्तावरील टीकाकारांचे भाष्य आजच्या काळीही आपणास स्फूर्ती देणारे ठरेल. ते पुढीलप्रमाणे –

''महंत राष्ट्र म्हणोनि महाराट्र । ........महाराष्ट्र निर्दोष आणि सगुण । ........ आपण अनाचार न करी। आणिकांसि करू नेदीति, ते महाराष्ट्र । धर्म सिद्धी जाए ते महाराष्ट्र।'' म्हणून महानुभावीयांचा आचारधर्म आजही चिंतनीय आहे.

### १.५.३ महानुभवांचे तत्त्वज्ञान

'सूत्रपाठ' या ग्रंथातून या पंथाचे सारे तत्त्वज्ञान सविस्तरपणे आलेले दिसते. महानुभाव हा पूर्ण द्वैती तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणारा पंथ आहे. या पंथाच्या तत्त्वज्ञानात चार वस्तू नित्य मानल्या आहेत. **१) जीव, २) देवता, ३) प्रपंच, ४) परमेश्वर.** त्याच्या मते या चारही वस्तू स्वतंत्र, नित्य, अनादि व अनंत आहेत. त्यांच्यात पूर्णभेद वा द्वैत आहे. म्हणून हा पंथ द्वैती मानला जातो. चक्रधरांच्या मते प्रपंच हा जड, परमेश्वर नित्यमुक्त, देवता नित्यबद्ध आणि जीव बद्धमुक्त आहे. जीव आणि ईश्वर यांचे ऐक्य महानुभावीयांस मान्य नाही. ईश्वर स्वरूपाची प्राप्ती होऊन जीव मुक्त झाला तरी तो जीवच राहतो. ईश्वर किंवा ब्रह्म होत नाही. याचाच अर्थ हे तत्त्वज्ञान द्वैती आहे. त्यात जीवेश्वरांचे ऐक्य नसून द्वैत अभिप्रेत आहे. त्यांच्या मते जीव हा स्वतंत्र पदार्थ असून तो अनादी व अनंत आहे. 'अनंत ब्रह्मांडे: अनंत देवता: अनंत जीवु: अनंत परमेश्वरु:' असे महानुभाव मानतात. हा जीव अनादीकाळापासून अविद्येने युक्त आहे. ही अविद्या अनादी असली तरी स्वतंत्र नसल्यामुळे परमेश्वराच्या कृपेने तिचा नाश होऊ शकतो. या जीवावर नाना दोषांची पुटे चढलेली असतात. अविद्या, अज्ञान, अन्यथाज्ञान, जीवत्व व आदिमळ या 'पाचपिशी' आणि विकार, विकल्प व स्वभाव हे तीन दोष जीवाच्या ठिकाणी निर्माण होतात. असे असले तरी तो ईश्वराच्या बोधाला म्हणजेच मुक्तीला पात्र आहे. जीव ज्याच्या संगतीत राहील त्याप्रमाणे होईल.

महानुभवाच्या मते दुसरी नित्य वस्तू म्हणजे देवता होय. देवताही अनेक असून, त्या सर्वांचे मिळून एक देवताचक्र होते. प्रत्येक ब्रह्मांडात एकूण ८१ कोटी, सव्वालक्ष, दहा देवता आहेत. या देवतांची स्वरूपे चेतन असून त्यांच्या ठिकाणी ज्ञान, सुख, सामर्थ्य, ऐश्वर्य व प्रकाश या पाच प्रकारांची समृद्धी असते. या देवता अधीनत्व, अज्ञान आणि अविद्या यांनी नित्यबद्ध आहेत. त्यामुळे त्या नेहमी ईश्वराच्या अधीन असतात. त्या नित्यबद्ध असल्याने मोक्षाला पात्र नाहीत. त्या ज्ञान, सुख, ऐश्वर्य देऊ शकल्या तरी मोक्ष देऊ शकत नाहीत. म्हणून 'ईश्वर एकु सोडविता:' असे महानुभवांचे मत आहे.

महानुभवांचा तिसरा नित्य पदार्थ म्हणजे प्रपंच. यात कारणप्रपंच आणि कार्यप्रपंच असे दोन भाग आहेत. यातील कारणप्रपंच नित्य आहे, तर कार्यप्रपंच अनित्य आहे. कार्यप्रपंच हा पंचमहाभूते व त्रिगुण (सत्त्व, रज, तम) यांच्यापासून बनला आहे. कारणप्रपंच अव्यक्त असून तो अष्टभैरवांच्या स्वरूपात आहे. कार्यप्रपंच हा गंधर्वनगरीच्या हत्तीप्रमाणे सृष्टीकाळी दिसतो; आणि संहारकाळी पुन: अदृश्य होतो.

महानुभवांचा चौथा नित्य पदार्थ म्हणजे परमेश्वर होय. हा परमेश्वर एक विद्यमान, भावरूप व सचेतन पदार्थ असून तो अनादी व नित्य आहे. त्याला परमेश्वर म्हणण्याचे कारण तो मायेच्याही पर, म्हणजे पलीकडे आहे. तो सर्वात्मक, सर्वातीत, आनंदमय, ज्ञानमय, नित्यमुक्त व शुद्ध आहे. तो माया व ब्रह्म यांच्या पलीकडील, सर्वात्मक, सर्वसाक्षी सर्वकर्ता, व सच्चिदानंदरूप आहे. हा परमेश्वर, कृपाळू, कनवाळू व उदार आहे. त्यालाच फक्त सृष्टीरचना, संहार, जीवोद्धारण यांसारखी कार्ये करता येतात. याउलट ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणी काही कर्तृत्व नाही. म्हणून जीवाच्या उद्धाराच्या दृष्टिकोनातून परमेश्वरच महत्त्वाचा आहे. महानुभवांचा परमेश्वर ब्रह्म, माया व ईश्वर मिळून होतो. हा परमेश्वर सर्वशक्तियुक्त असून त्याच्या या शक्ती चक्रधरांनी

''सकळही देवता: सकळही गुण: सकळही धर्म: ज्ञान: विज्ञान:'' याप्रमाणे सांगितलेल्या आहेत.

महानुभाव तत्त्वज्ञानात अवतार कल्पनेवर विशेष भर आहे. जीवाला ज्ञानदान करून त्याला उद्धाराचा मार्ग दाखविण्यासाठी परमेश्वरही मनुष्यदेह धारण करून पृथ्वीतलावर येतो. अशी ही अवतार कल्पना आहे. परमेश्वराचे हे अवतार धारण करण्याचे तीन प्रकार आहेत. १) गर्भी येणे: सृष्टिनियमानुसार मातेच्या उदरी जन्म घेणे. २) दवडणे : एखाद्या स्त्रीच्या उदरात वाढत असल्याला गर्भाला दवडून त्याची जागा आपण घेणे (गर्भातील जीवाला घालवून देऊन त्याची जागा घेणे. उदा. श्रीगोविंदप्रभूंचा अवतार. ३) पतित उठविणे. म्हणजे मृत शरीरात प्रवेश करून ते पुन्हा सजीव करणे. (उदा. चक्रधरांचा अवतार) कधी कधी परमेश्वर 'गर्भ स्वीकारति: कां पतिताते उठवीति: कां जीवाते दवडीति.' अशी महानुभवांची धारणा आहे. शक्तिस्वीकाराच्या दृष्टीने या अवतारांचे तीन मुख्य प्रकार आहेत. १) परदृश्यावतार (उदा. गोविंदप्रभू), २) अवरदृश्यावतार (उदा. चांगदेव राऊळ), ३) परावरदृश्यावतार (उदा. श्रीदत्तात्रेय, श्रीकृष्ण, चक्रधर) यांपैकी पहिला केवळ परशक्ती, दुसरा केवळ अवरशक्ती व तिसरा पर आणि अवर या दोन्ही शक्ती स्वीकारतो. म्हणून हा तिसरा अवतारच जीवोद्धारणाचे खरे कार्य करू शकतो.

स्वातंत्र किंवा मोक्ष प्राप्तीसाठी आत्मज्ञान आवश्यक आहे. पण ज्ञानापेक्षा प्रेम (भक्ती) उत्तम आहे. (''ज्ञानापासि प्रेम उत्तम'') म्हणजे ईश्वरप्राप्तीचे ज्ञानमार्ग आणि प्रेममार्ग (भक्तिमार्ग) असे दोन मार्ग आहेत. ज्ञानमार्गाने जीव ब्रह्मस्वरूपात पावन होतो, तर भक्तिमार्गाने तो ईश्वरस्वरूपात पावन होतो. ज्ञानदाता एक परमेश्वरच आहे. प्रेम म्हणजेच भक्ती (''प्रेम बोलिजे: भक्ति बोलिजे:'') प्रेमसंचार झालेल्या भक्ताचा व परमेश्वराचा नित्य संबंध असतो. ज्ञानी पुरुष ईश्वराला अनुसरल्या वाचून, म्हणजेच पूर्णपणे त्याच्या अधीन झाल्यावाचून मुक्त होऊ शकत नाही. ''अनुसरलेयाचा देवो:'' संपत्तीचा मोह, आप्तांचे प्रेम यांचा सर्वसंगपरित्याग करून जीवाने परमेश्वराला अनुसरले पाहिजे.

चक्रधरांनी आत्मज्ञान, भक्ती (प्रेम) आणि गुरुकृपा यांना विशेष महत्त्व दिले आहे. महानुभाव गुरुचे स्तोम माजवीत नाहीत. गुरुवर निष्ठा असावी, पण गुरू म्हणजे परमेश्वर नव्हे असे त्यांचे मत आहे. महानुभाव संन्यासी अस्पृशता पाळत नाहीत. चारही वर्णांकडून भिक्षा घ्यावी असे त्यांनी सांगितले आहे. महानुभाव पंचकृष्णांच्या वचनांनाच प्रमाण मानतात. चक्रधरांची वचने ही महानुभावांची 'श्रुती' आहे. नागदेवाचार्यांच्या वचनास ते 'स्मृती' म्हणतात.

## १.६ महानुभवांचे गद्य वाङ्मय

महानुभाव पंथ, त्याचे तत्त्वज्ञान, आचारधर्म यांचा परिचय करून घेतल्यानंतर आता आपण त्यांच्या प्रमुख गद्य ग्रंथाची ओळख करून घेणार आहोत. 'लीळाचरित्र', 'श्रीगोविंदप्रभूचरित्र', 'सूत्रपाठ', 'दृष्टांतपाठ' आणि 'स्मृतिस्थळ' हे महानुभवांचे महत्त्वाचे गद्यग्रंथ आहेत. चक्रधर आणि नागेदवाचार्य यांनी आपल्या ग्रंथकारांना जाणीवपूर्वक मराठीतच ग्रंथरचना करण्यास सांगितले. कारण हे सर्व वाङ्मय हे पंथीय तत्त्वज्ञान आणि आचारधर्म यांचा प्रसार करणे व त्याचे जतन करणे या प्रेरणेतून निर्माण झाले आहे. हे सर्व ग्रंथ पंथीय तत्त्वज्ञानाने व समर्थ अशा वाङ्मयीन वैशिष्ट्यांनी संपन्न आहेत.

### १.६.१ लीळाचरित्र (शके १२००)

मराठी भाषेतील आद्यगद्यग्रंथ व आद्य चरित्रग्रंथ म्हणून 'लीळाचरित्रा'चे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हा ग्रंथ चक्रधरांचा एकनिष्ठ शिष्य म्हाइंभट याने इ.स. १२७८ मध्ये रचला. म्हाइंभट हा मराठी भाषेतील पहिला चरित्रकार होय. म्हाइंभट हे मूळचे सराळे गावचे गर्भश्रीमंत ब्राह्मण. गणपती आपयो या गुरुपाशी त्यांनी पारंपरिक विद्यांचे अध्ययन केले. तेलंगणातील विद्यानगरीत राहून 'प्रभाकर-दर्शन' हे शास्त्र आत्मसात केले. त्यामुळे त्यांना आपल्या विद्वतेचा असा काही गर्व चढला की, आपण इतरांना तृणासमान लेखतो याचे गमक म्हणून ते आपल्या पायात गवताची वाकी घालत असत. आकाशात एक सूर्य आणि पृथ्वीवरील मी 'अपरसूर्य' असे ते स्वत:स म्हणवीत. पुढे आपल्या गुरुच्या सूचनेवरून त्यांनी डोमेग्राम येथे जाऊन चक्रधरांची भेट घेतली. त्यांच्याशी झालेल्या वादात चक्रधरांच्या निरुपणाने आणि त्यांच्या मराठी व संस्कृत भाषेवरील प्रभुत्वाने ते प्रभावित झाले. व त्यांना चक्रधरांविषयी 'हा ईश्वर' अशी प्रचीती आली. या प्रसंगानंतर वर्षभराने त्यांनी ऋद्धिपूरला जाऊन श्रीगोविंदप्रभूकडून महानुभाव पंथाची दीक्षा घेतली. ते सोन्याचांदीचा व्यापार करून मिळालेला पैसा गुरुसेवेसाठी खर्च करीत. म्हाइंभट बुद्धिमान व विद्वान होते. आपल्या गुरुकुलाशी ते अखेरपर्यंत एकनिष्ठ राहिले. ''म्हाइंभटाते श्रीप्रभुदास्यवेगळे जो दाखवी तयासि मी महावाक्य वाखाणीन'' अशी पैज नागदेवाचार्यांनी घातली होती. यावरून म्हाइंभटांची गुरुनिष्ठा लक्षात येते. गोविंदप्रभू आणि चक्रधर यांची आमरण सेवा करून व त्यांची चरित्रे लिहिण्याचे कार्य पूर्ण करून म्हाइंभट शके १२२५ च्या दरम्यान निधन पावले. त्यांच्या निधनाचा प्रसंग 'स्मृतिस्थळात उत्कटतेने वर्णिला आहे. 'तुम्हां देवो होईल' (तुम्हाला देवत्वाची प्राप्ती होईल) या नागदेवाचार्यांनी दिलेल्या आश्वासनाने समाधान पावून त्यांनी हात जोडले व 'माझे काही वोखटे नेघावे' अशी सर्वांना प्रार्थना करून देह ठेवला.

म्हाइंभटांनी 'लीळाचरित्र' (शके १२००) व 'श्री गोविंदप्रभूचरित्र' (शके १२१०) हे दोन चरित्रग्रंथ निर्माण केले. त्यांच्या नावावर काही स्फुट स्वरूपाची पद्यरचनाही आहे. 'लीळाचरित्र' सिद्ध करण्यासाठी त्यांनी अतिशय परिश्रम घेतले. या कार्याविषयी त्यांना विलक्षण तळमळ होती. एकदा ते या कामासाठी खेइभट नावाच्या स्वामींच्या (चक्रधर) भक्ताकडे गेले असताना खेइभट शेतावर होते, तेव्हां त्यांच्या मागे मागे हिंडून त्यांनी त्यांच्याकडून चक्रधरांच्या आठवणी गोळा केल्या. या विषयी शं. गो. तुळपुळे म्हणतात, 'ते (लीळाचरित्र) लिहून त्यांनी एका महापुरुषाची अमर अशी वाङ्मयीन मूर्तीच निर्माण करून ठेवली आहे. म्हाइंभटाच्या या कार्यास खरोखरच तोड नाही.' (तुळपुळे शं. गो., महानुभाव पंथ आणि त्यांचे वाङ्मय, पृ. १४७)

'लीळाचरित्रांची निर्मिती कशी झाली हे पाहण्यासारखे आहे. शके ११९६ च्या सुमारास श्रीचक्रधरांचे 'उत्तरापंथे गमन' झाल्यानंतर त्यांची नागदेवादी शिष्यमंडळी ऋद्धिपुरास श्रीगोविंदप्रभूंच्या आश्रयास आली. श्रीगोविंदप्रभूंच्या निर्याणापर्यंत (शके १२०९) त्यांचा निवास तेथेच होता. या काळात ही शिष्यमंडळी आपल्या गुरुंच्या (चक्रधर) 'लीळा' आठवून दु:ख हलके करीत असत. त्यातून या सर्व लीळा एकत्रित करण्याची कल्पना म्हाइंभटाना सुचली. त्यांनी नागदेवाचार्यांच्या प्रोत्साहनाने एक एक लीळा जमविण्यास प्रारंभ केला व त्यातून 'लीळाचरित्र' हा एक ग्रंथ सिद्ध झाला. 'म्हाइंभटांनी वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन

चक्रधरांच्या सहवासात राहिलेल्या लोकांकडून लीळा गोळा केल्या. नागदेवाचार्याकडून त्यांचा खरेपणा पारखून त्यांच्या परवानगीने संकलित केल्या. 'सत्यनिष्ठेच्या कसोटीमुळे त्यात विश्‍वसनीयता आली आहे.' (नसिराबादकर ल. रा, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, पृ. १९)

'लीळाचरित्रा'त एकूण सुमारे साडेनऊशे लीळा असून, एकाकात ७४, पूर्वार्धात ३५८ व उत्तरार्धात ४८८ लीळा येतात. डॉ. प्र. न. जोशी व शं. गो. तुळपुळे यांचे मत असेच आहे. 'लीळाचरित्रा'तील लीळांची साडेनऊशे ही संख्या त्याच्या नेनेप्रतीवरून दिली आहे. मात्र डॉ. वि. भि. कोलते यांनी संपादित केलेल्या 'लीळाचरित्रा'मध्ये १४२५ लीळा भरतात. 'लीळाचरित्रा'चे एकाक, पूर्वार्ध व उत्तरार्ध असे तीन भाग असून या तीन विभागांची रचना मात्र उत्तरार्ध-पूर्वार्ध-एकाक अशा क्रमाने झाली असावी, असे शं. गो. तुळपुळे यांना वाटते. कारण चक्रधरांचे 'उत्तरापंथे गमन' झाल्यानंतर त्यांच्या अलीकडील म्हणजे उत्तरार्धातील लीळा अगोदर आठवणे सहाजिकच होते. त्यानंतर त्यांच्या पूर्वार्धातील लीळा व शेवटी त्यांच्या एकाकी जीवनातील लीळा संकलित करण्यात आल्या. त्यामुळे आधी 'उत्तरार्ध', नंतर 'पूर्वार्ध' व शेवटी 'एकाक' अशा क्रमाने हा ग्रंथ निर्माण झाला. (तुळपुळे शं. गो., मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला, पृ. २५७) या तिन्ही भागांत मिळून चक्रधरांच्या आयुष्यातील पाच प्रमुख घटना आल्या आहेत. १) अवतार स्वीकार, २) शक्तिस्वीकार, ३) नागांबिकेला प्रेमदान, ४) नागदेवाचार्यांचे अनुसरण व ५) चक्रधरांचे प्रयाण अर्थात उत्तरापंथे गमन. 'एकाका'त चक्रधरांनी गुजराथेतील भरवस किंवा भडोच येथील प्रधानपुत्राच्या मृतदेहात प्रवेश करून अवतार धारण केल्यापासून तो, ते पैठण येथे येईपर्यंतचा भाग आला आहे. या काळात चक्रधर एकाकी अवस्थेमध्ये होते. म्हणून या भागाला 'एकाक' म्हटले आहे. पूर्वार्धाचा प्रारंभ चक्रधरांनी पैठण येथे नागांबिकेला केलेल्या प्रेमदानाने व शेवट खडकुली येथे नागदेवांना केलेल्या बोधदानाने होतो. तेथून पुढे उत्तरार्ध सुरू होतो व त्यात त्यांच्या प्रयाणकाळापर्यंतचा भाग येतो.

'लीळाचरित्र' लिहून पूर्ण झाल्यावर खालसैयाच्या धाडीत, चक्रधरांच्या अनुयायांची पळापळ झाली व त्या गडबडीत 'लीळाचरित्रा'ची हस्तलिखित पोथी कोठे हरवली. मात्र या पंथातील हिराइसेसारख्या काही मंडळींना संपूर्ण 'लीळाचरित्र' मुखोद्गत होते. त्यावरून परशुरामबासांनी हा ग्रंथ पुन्हा लिहून काढला. यालाच 'पिढीपाठ' म्हणतात, व महानुभाव पंथात हाच प्रमाण मानला जातो.

'लीळाचरित्र' हा ग्रंथ अनेक दृष्टींनी महत्त्वाचा आहे. तो मराठी भाषेतील पहिला चरित्रग्रंथ आहे. चक्रधरांविषयीच्या या सर्व लीळा/आठवणी घरगुती गद्यात सांगितल्या असल्यामुळे तत्कालीन मराठी भाषेचे व्यावहारिक स्वरूप कळण्यास मदत होते. लीळाचरित्राची भाषा फार साधी, सोपी व सरळ आहे, आणि यातच तिचे सौंदर्य आहे. 'मऱ्हाटी अनावर बोलताति' अशी चक्रधरांची ख्याती आहे. त्यामुळे यादवकालीन मराठीचे यथार्थ आकलन होण्याच्या दृष्टीने म्हाइंभटांचा हा चरित्रग्रंथ केवळ अमोल आहे, असे शं. गो. तुळपुळे यांना वाटते. (तुळपुळे, शं. गो. महानुभाव पंथ आणि त्याचे वाङ्मय, पृ. १५२) रसपूर्ण निवेदन, भाषेचा साधेपणा, छोटीछोटी वाक्ये, आठवणीतील जिव्हाळा, अल्पाक्षरमणीयत्व ही म्हाइंभटाच्या निवेदनशैलीची वैशिष्टे आहेत. अधूनमधून येणारे नित्य परिचयाचे दृष्टांत, संवादात्मकतेमुळे आलेली

नाट्यात्मकता यांमुळे हे चरित्र वाचनीय झाले आहे. या ग्रंथात तत्कालीन महाराष्ट्रातील समाजजीवनाचे प्रतिबिंबही पडले आहे. तत्कालीन समाजातील चालीरीती, व्रतवैकल्ये, सणवार, वस्त्रेप्रावरणे, खाद्यपदार्थ, व्यापार यांचे दर्शन 'लीळाचरित्रा'तून होते. तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक जीवनातील घडामोडी, वृत्ती-प्रवृत्ती यांचे दर्शनही 'लीळाचरित्रा'तून होते. यामुळे या ग्रंथाला सांस्कृतिक दस्तऐवजाचे (Cultural Document) महत्त्व प्राप्त झाले आहे, असे डॉ. नसिराबादकर नमूद करतात. (नसिराबादकर, ल. रा., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, पृ. १९) या ग्रंथात चक्रधरांच्या व्यक्तिचित्रणाबरोबर त्यांच्या परिवारातील नागदेव, बाईसे, महदंबा, आउसे, सारंगपंडित, जानोपाध्ये इत्यादी व्यक्तींची स्वाभावचित्रेही आलेली आहेत. ही व्यक्तीचित्रे विविधतेने नटलेली असून, त्यातून मनुष्यस्वभावाचे निरनिराळे नमुनेच आपल्या समोर प्रकट होतात.

महानुभवीय तत्त्वज्ञानाचा आणि वाङ्मयाचा मूलाधार म्हणूनही या ग्रंथाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या ग्रंथातूनच पुढे सूत्रपाठ, दृष्टांतपाठ, रत्नमालास्तोत्र इत्यादी ग्रंथ निर्माण झाले. 'लीळाचरित्र' हा स्मरणभक्तीचा एक अतीव सुंदर आविष्कार असून त्याला मराठी वाङ्मयाच्या इतिहासात तोड नाही.' (तुळपुळे शं. गो., महानुभाव पंथ आणि त्यांचे वाङ्मय, पृ. १५३).

श्रीचक्रधर स्वामी हा या ग्रंथाचा विषयच मोठा उदात्त आणि उद्‌बोधक आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची विविध रूपे येथे पाहावयास मिळतात. चक्रधर दिसायला अत्यंत सुंदर होते. पाण्यात पडलेल्या त्यांच्या सावलीने जलचर आकृष्ट होत. ब्रह्मचर्य, विरक्ती हा त्यांचा स्थायीभाव होता. म्हणून कान्हरदेवाने अर्पण केलेल्या सोन्याच्या नाण्यांना ते स्पर्श करीत नाहीत. अहिंसा हा त्यांच्या व्यक्मित्त्वाचा एक विलोभनीय विशेष आहे. म्हणून ते होडेच्या सशाला 'एथ सरण आलेयां काइ मरण असे' असे म्हणून अभय देतात. ईश्वरत्व हाही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग आहे. गायी राखणारे चक्रधार ब्राह्मणास साक्षात श्रीकृष्ण वाटतात. आदर्श शिष्य, भक्तवत्सल गुरु, शिस्तप्रिय धर्म संस्थापक, समत्वदृष्टीचे क्रांतिकारक द्रष्टे इत्यादी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू, 'लीलाचरित्रा'तून दिसून येतात.

विद्यार्थी मित्रहो, पुढील काही 'लीळां'वरून तुम्हांस 'लीळाचरित्रा'चे स्वरूप, भाषा, वाङ्मयीन सौंदर्य यांची कल्पना येईल.

### १) भटां देऊळ पाहों धाडणे

तेथौनि गोसावी जवळगावां बीजे केलें: गावांबाहीरी आसन जालें: भटांते देउळ पाहों धाडिले: तेहीं पाहिलें: तवं अवखूळें जालें होतें: आलें: गोसावी पुसिले: ''देऊळ कैसे असे गा?'' भटी म्हणीतलें: ''जी जी: माहादाश्रमाचेया एंत्रासनासारिखे असे'' तंव गोसावी कोपले: सर्वज्ञें म्हणीतलें: ''तुम्ही माहात्मे कीं गा: मारितापूजिता समान होआवा की गा:'' तंव भटी म्हणीतले: ''जी जी: आम्ही ऐसें म्हणौनिचि:''।।

### २) स्त्रीपानाळव्येथा बाईसां कोपणें

गोसावीयांचेया दरीसनां स्त्री एकि आली: तेयांतें एतां देखिले: आणि गोसावी लवकरि बाहीरि बीजें केलें: तो गोसावीयांचा श्रीमुगटी पानाळु लागला: आणि बाइसीं म्हणीतलें: ''हे काइ वो जालें यां रांडांसि: बाबाचा श्रीमुंगुट दुखवला:'' ऐसीया सवीया दीधलीया: देतां सर्वज्ञें म्हणीतलें: ''बाइ: तुम्ही सवीया कैसीया देतें असा ? प्राणीयें एथ आलेयां जळतां जावें: तरि नीवावे ते कोठें ?'' मग गोसावी तेयां आवेकु अवस्वरू दीधला : मग पाठवणी दीधली: ।।

### ३) सूर्पमार्जनी क्रीडा

माहादाइसांप्रति सर्वज्ञे म्हणीतलें: ''बाइ: तेथिची क्रीडा ते ऐसी कीं: स्रीचांगदेवोराऊळाचां उजवीयें स्रीकरी सुप: डावीये स्रीकरी खरांटा: बीदी गोदरीया झाडीति: सुपीं पुंजे भरीति: श्रीमुगटावरि ठेवीति: नेउनि गोमतीमध्ये घालीति: आणि खुदुखुदुकरि हांस्य करीति: ऐसे अनंता दान देति:।।''

## १.५.२ श्रीगोविंदप्रभूचरित्र (शके १२१०)

'श्रीगोविंदप्रभूचरित्र' हा महानुभाव पंथातील आणखी एक महत्त्वाचा ग्रंथ. या ग्रंथालाच 'ऋद्धिपुरलीळा' किंवा 'ऋद्धिपुरचरित्र' असेही म्हटले जाते. यात गोविंदप्रभूंचे चरित्र आठवणींच्या स्वरूपात आले आहे. या ग्रंथाचे कर्तृत्वही म्हाइंभटाकडेच जाते. या चरित्राचे चरित्रनायक श्रीगोविंदप्रभू हे वऱ्हाडातील असल्यामुळे वऱ्हाडी भाषेतील खास मराठी शब्द व वाक्प्रयोग या ग्रंथात आढळतात. अत्यंत साधी आणि प्रासादिक भाषा, नेमक्या-नेटक्या शब्दांतून केलेली प्रसंगनिर्मिती, व्यक्तिस्वभावदर्शनातील विविधता ही म्हाइंभटांच्या लेखनाची वैशिष्ट्ये येथेही दिसून येतात. यात गोविंदप्रभूंच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत सुमारे सव्वातीनशे लीळा संग्रहित केल्या आहेत.

परमेश्वराचे अवतार घेण्याचे गर्भ, पतित, दवडणे असे तीन प्रकार आहेत. श्रीगोविंदप्रभूंचा अवतार हा दवडण्याच्या प्रकारापैकी आहे. त्यात गोविंदप्रभूंनी ज्याला आपल्या आईच्या गर्भातून दवडले होते, तो जीव वेडापिसा असल्यामुळे त्याचे देहधर्म गोविंदप्रभूंना स्वाकारावे लागले. त्यामुळे गोविंदप्रभूंचा अवतार वेडापिसा झाला. त्यांच्या ठिकाणी ईश्वरत्वाबरोबर अवलियाची काही लक्षणे दिसून येतात. त्यांचे लोकविलक्षण वर्तन व अकृत्रिम साधुत्व म्हाइंभटांनी अचूकपणे टिपले आहे. श्रीगोविंदप्रभूंचे खाणेपिणे, वेषभूषा, बोलणेचालणे, बसणे-उठणे, घेणे-देणे कसे होते याची माहिती या ग्रंथात मिळते. 'ऐस वेष आरिख मळवट, कुंकुम भरणे: माथां भांग खोपा जवादि भरणें: कर्णी सुकडी लावणे: पायी वांकि: गळां सांखळ: मुकुटी तेल: वेणी: नाभिचुंबित खाड (दाढी) ..... ना पुराचे (शरीराचे) सौंदर्य ते नाही. आन मूर्ति शामगौर:' या वर्णनावरून गोविंदप्रभूंच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना येऊ शकेल. श्रीगोविंदप्रभूचरित्राविषयी शं. गो. तुळपुळे म्हणतात, ''त्यात (श्रीगोविंदप्रभूचरित्रात) आहेत एका वेड्यापिशा अवताराच्या तितक्याच वेड्यापिशा लीळा. पण या लीळांचे साधेपणच इतके मोहक आहे की, त्यामुळे त्या अधिकाधिक वाचाव्याशा वाटतात व त्यातून उभी राहणारी गुंडम राऊळांची 'नाभिचुंबित खाड (दाढी) आणि 'उत्तरिये वस्त्र' अशी 'गगनाची वास' पाहणारी

ती श्याममूर्ती आपले मन वेधून घेते. 'गोविंदप्रभूचरित्रा'चे सौंदर्य त्याच्या साधेपणात एकवटले आहे.' (तुळपुळे, शं. गो., महानुभाव पंथ आणि त्याचे वाङ्मय, पृ. १५६) पर्जन्याला बोलविणे, मुक्याला वाचा देणे, दूरुन गाईचे दूध काढणे, सर्पाचे विष उतरविणे अशा प्रकारचे अलौकिक सामर्थ्य असणारे गोविंदप्रभू येथे पाहावयास मिळतात. सर्व प्राणिमात्रांबद्दल समतादृष्टी, असहाय स्त्रियांबद्दल अपार कळवळा, नैष्ठिक ब्रह्मचर्य, कडकडीत वैराग्य अशा गुणांनी संपन्न असणाऱ्या या व्यक्तिमत्त्वापुढे आपण नतमस्तक होतो. हा ईश्वरी अवतार किंवा देवता अवतार असल्याची खात्री पटते.

प्रस्तुत ग्रंथातील आख्यायिकांतून तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे चित्र उमटलेले दिसते. तत्कालीन खाद्यपदार्थ, वेशभूषा यांची माहिती यातून मिळते. म्हाइंभटास गोविंदप्रभूंचे सान्निध्य बराच काळ लाभले होते. म्हाइंभटांनी गोविंदप्रभूंची त्यांच्या अंत्यसमयापर्यंत सेवा केली. या संदर्भात डॉ. ल. रा. नसिराबादकर म्हणतात, ''चरित्रलेखकाला आवश्यक असणारा निकटचा सहवास, जिव्हाळा आणि त्याचसोबत सत्यान्वेषी दृष्टी ही तिन्ही वैशिष्ट्ये म्हाइंभटाजवळ असल्यामुळे त्याचा हाही ग्रंथ वाङ्मयगुणसंपन्न झाला आहे.'' (नसिराबादकर, ल. रा., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, पृ. २२) पुढील लीळेवरून या चरित्रग्रंथाची व म्हाइंभटाच्या शैलीची आपणास कल्पना येऊ शकेल –

**मातंग विनवणी स्वीकारुः ।।**

एकुदी मातांगी विनविले: ''राउळो: आम्हीं पाणीयेंवीन मरते असों: तरि काइ करूं जी?'' राउळासि अनुकंपा उपजली: मग गोसांवी म्हणीतलें: ''मेला जाए ना म्हणे:'' म्हणौनि तेथ बीजें केलें: ''आवो: एथ खाणावें म्हणे: न खाणावे म्हणे: आवो एथ खाणावेंचि म्हणे:'' म्हणौनि श्रीचरणींचेनि आंगुठेनिं दाखवीले: तेथ तीहीं खाणीतले: तवं अमर्याद पाणीं लागले: मग म्हणेति: ''राउळ माय: राउळ बापु: राउळाचेनि प्रसादें आम्ही पाणी पीत असों:''

### १.५.३ सूत्रपाठ

विद्यार्थी मित्र हो, या नंतर आपण केशिराजबास यांच्या 'सूत्रपाठ' या ग्रंथाची थोडक्यात ओळख करून घेऊ. केशिराजबास हे पापदंडी रामपुरीचे 'विद्वांस व्याख्याते' असल्याचा उल्लेख स्मृतिस्थळात आढळतो. यांनी नामदेवाचार्यांकडून महानुभाव पंथाची दीक्षा घेतली होती. यांचे ठिकाणी शुकाचार्यांसारखे कडकडीत वैराग्य होते. त्यांचे वैराग्य पाहून 'माझा केशवु शुकयोगींद्र कीं गा' असे आनंदाचे उद्‌गार नागदेवाचार्यांनी काढलेले आहेत. आपल्या आचरणाविषयी हे नेहमीच सावध असत. यांना धर्मचर्चा करणे फार आवडत असे. वैराग्य, गुरुभक्ती, पंथनिष्ठा, आचारविचारांची शुद्धता इत्यादी बाबतीत यांना महानुभाव पंथात फार मोठा मान होता. ते संस्कृत पंडित होते. त्यांना संस्कृत भाषेत ग्रंथरचना करण्याची आवड होती. 'रत्नमालास्तोत्र' हा यांचा पहिला ग्रंथ असून, तो संस्कृत भाषेतच आहे. 'लीळाचरित्रा' मधील काही लीळांचा यांनी सुरेख संस्कृत अनुवाद केला आहे. परंतु संस्कृतमध्ये ग्रंथरचना करणे नागदेवाचार्यांना योग्य वाटत नव्हते. कारण सर्वसामान्य माणसांसाठी मराठीमध्येच ग्रंथरचना केली पाहिजे असा दंडक चक्रधरांनी

घालून दिला होता. म्हणून नागदेवाचार्य एकदा केशिराजबास यांना म्हणाले, 'नको गा केशवदेया: येणे माझीया म्हातारीया नागवतील'. 'पंडिता: केशवदेया: तुमचा अस्मात-कस्मात् मी नेणे गा: मज चक्रधरे निरूपिली मऱ्हाटी: तियांचि पुसा'. अध्यात्मचर्चा, धर्मचर्चा, ग्रंथनिर्मिती मराठीमध्येच झाली पाहिजे. या महानुभावांच्या धोरणानुसार केशिराजबास यांनी 'सूत्रपाठ', 'दृष्टांतपाठ' आणि मूर्तिप्रकाश' हे आपले तीनही ग्रंथ मराठीमध्ये लिहिले. यातील पहिले दोन ग्रंथ गद्यात असून, तिसरा 'मूर्तिप्रकाश' हा ग्रंथ ओवीबद्ध काव्यग्रंथ आहे. त्यामुळे येथे आपण 'सूत्रपाठ' आणि नंतर 'दृष्टांतपाठ' या ग्रंथांची ओळख करून घेणार आहोत.

'लीळाचरित्रा'त चक्रधरांच्या तोंडी आचारधर्म, तत्त्वज्ञान या विषयी जी सूत्रे आली आहेत त्यांचे क्रमवार संपादन केसोबास यांनी शके १२१२-१३ च्या (इ.स. १२९०) सुमारास केले. महानुभावांचे तत्त्वज्ञान या ग्रंथाच्या आधारेच तयार झाले आहे. सूत्रपाठाचा आधार घेऊन नंतरच्या महानुभाव कवींनी विविध ग्रंथांची रचना केली. त्यामुळे या ग्रंथाला पंथात महत्त्वाचे स्थान आहे. '' 'सूत्रपाठ' म्हणजे चक्रधरस्वामींची वाङ्मयमूर्ती असून महानुभाव पंथीयांना तो 'शास्त्रवचनरूप परमेश्वर' असल्याप्रमाणे आहे.'' (तुळपुळे शं. गो, महानुभाव पंथ आणि त्यांचे वाङ्मय, पृ. १७५) चक्रधरांच्या तोंडची वचने निवडून, त्यांचे वर्गीकरण करून व त्यांचा परस्परांशी संबंध लावून 'सूत्रपाठ' सिद्ध केला आहे.

'सूत्रपाठा'तील सूत्रांची संख्या सुमारे साडेबाराशे असून (यात मतैक्य नसून ही संख्या १२०० ते १८०० पर्यंत दिलेली आढळते) ती पुढील प्रकरणात विभागली आहे. (१) पूर्वी, (२) पंचकृष्ण, (३) पंचनाम, (४) अन्यव्यावृत्ती, (५) युगधर्म, (६) विद्यामार्ग, (७) संहार, (८) संसरण, (९) उद्धरण, (१०) असती परी, (११) महावाक्य, (१२) निर्वचन, (१३) आचार, (१४) आचार मालिका, (१५) विचार, (१६) विचार मालिका.

वाङ्मयीन सौंदर्याच्या दृष्टीने विचार करताही 'सूत्रपाठा'चे मराठी वाङ्मयातील स्थान अनन्यसाधारण आहे. त्याचा विषय तात्विक असला तरी त्यातील अनेक सूत्रे वाङ्मयीन दृष्ट्या सुद्धा सुंदर आहेत. परणिामकारक आहेत. अल्पाक्षरमणीयत्वामुळे ती मनावर ठसतात. मनाची पकड घेऊन वाचकाला अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य या सूत्रांत आहे. खालील काही सूत्रांवरून याची कल्पना येऊ शकेल.

१) स्वदेशसंबंधु त्याज: स्वग्रामसंबंधु त्याज: संबंधियंचा संबंधु तो विशेषत: त्याज्य:।।

२) पुरुष जेतुलजेतुल विषयसेवा करी: तेतुलतेतुल धर्मी निबळु जाए ।।

३) नरवीरु आति: परि विषयवीरु नाहीं ।। धर्मनष्टु आति: परि विषयनष्टु नाहीं।।

४) जीवासि वैराग्य मिरवुं आवडे: हाही एकु विकारुचि कीं गा ।।

५) घर न निवडीत भिक्षा कीजे ।।

६) प्राणासि आहारु देयावा: इंद्रियांसि नेदावा ।।

७) तुम्हा शयनासनी: भोजनी: परमेश्वरूचि होआवा कीं गा ।।

८) देवाची आर्ति होआवी: मार्गाची प्रीति होआवी: विषयांची निवृत्ति होआवी ।।

९) कर्म: धर्म: विधि: विखो परित्यजौनि परमेश्वरा शरण रीगावे ।।

१०) जीतेनि मृताचां धर्मी वर्तावे:।।

''सारांश, चक्रधरोक्त 'सूत्रपाठ' हा महानुभावांच्या तत्त्वज्ञानाचाच केवळ नव्हे तर त्यांच्या सर्व भावी साहित्याचा पाया ठरला. 'सूत्रपाठ' ही महानुभवांची गीता झाली. तो संकलित करणाऱ्या केशिराजांचे हे कृत्य, 'इतिहास'कारांच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे, 'व्यासायोग्य' झाले.'' अशा शब्दांत शं. गो तुळपुळे यांनी या ग्रंथाचा आणि त्यांच्या निर्मात्याचा गौरव केला आहे.

### १.६.४ दृष्टांतपाठ

केशिराजबास यांचा आणखी एक गद्य ग्रंथ म्हणजे 'दृष्टांतपाठ' होय. चक्रधरांनी तत्त्वविवेचनासाठी सांगितलेले एकूण ११४ दृष्टांत व त्यांवरील केशिराजांचे दार्ष्टान्तिक अशी याची रचना आहे. मूळ सूत्र, दृष्टांत व दार्ष्टान्तिक अशा तीन विभागांतून 'दृष्टांतपाठ' सिद्ध झाला आहे. मूळ सूत्र व त्यावरील दृष्टांत हे चक्रधरांचे आहेत; आणि त्यांवरून निष्कर्षरूपाने सांगितलेले दार्ष्टान्तिक केशिराजांचे आहेत. अशी 'दृष्टांतपाठा'ची दुहेरी रचना आहे. 'दृष्टांतपाठा'तील सूत्र व दार्ष्टान्तिक या भागांतून महानुभवीयांच्या तत्त्वज्ञानाचे दर्शन घडते, तर दृष्टांत भागातून समाजदर्शन घडते. चक्रधरांनी दिलेले वेगवेगळे दृष्टांत तत्कालीन समाजजीवन व धार्मिकजीवन दर्शविणारे आहेत. हे दृष्टांत दररोजच्या व्यवहरातील, कृषी जीवनातील आणि मानवी स्वभावाशी संबंधित आहेत. यातील प्रतिमासृष्टीही तिच्या वैचित्र्यामुळे विलोभनीय वाटते. या दृष्टांतातून चक्रधरस्वामींचे मानवी स्वभावाचे व लौकिक सृष्टीचे अवलोकन किती सूक्ष्म होते, याची कल्पना येते. त्यातील सूत्रांची भाषा शास्त्रीय, दृष्टांतांची भाषा लौकिक, तर दार्ष्टान्तिकांची भाषा पंडिती वळणाची आहे. सूत्रांची व दृष्टांतांची भाषा साधी, सोपी व सुटसुटीत आहे, कारण ती चक्रधरांच्या तोंडची आहे, तर दार्ष्टान्तिकांची भाषा पंडिती वळणाची आहे, कारण ती केशिराजांची आहे. तत्त्वज्ञान आणि अध्यात्मशास्त्र पेलण्यास समर्थ अशी शब्दसंपत्ती मराठी भाषेत रूढ करण्याचे केशिराजांचे कार्य महत्त्वाचे आहे. तत्त्वज्ञान, समाजदर्शन, दृष्टांतसौंदर्य अशा अनेक दृष्टींनी हा ग्रंथ अभ्यासनीय झाला आहे. यादवकालीन मराठी गद्याचा तो आदर्श म्हणता येईल.

'दृष्टांतपाठा'त उपमानांसाठी चराचर सृष्टीतील विविध वस्तूंचा व मानवी स्वभावाच्या वैशिष्ट्यांचा वापर केला आहे. काही वेळा एकच उपमान अनेक दृष्टांतांत वापरलेले दिसते. उदा. मातेचे उपमान एकूण सहा दृष्टांतांत वापरलेले दिसते. याशिवाय अहीरदेशीच्या म्हातारीचा, गुळहारियाचा, इसाळुवाचा, तुपाभाताच्या घासाचा, फुटाणेकाराचा हे सर्व दृष्टांत भोवतालच्या जिवंत सृष्टीतून घेतले आहेत. तसेच 'दृष्टांतपाठा'त परिसाचा, चंदनाचा, चातकाचा, राजहंसाचा असे रूढ, सांकेतिक दृष्टांतही येतात. खालील उदाहरणावरून 'दृष्टांतपाठा'ची कल्पना येऊ शकेल.

**१) वर्तेचा दृष्टांत**

**सूत्र :** जीवापासौनि पुरुषु उठी तयाचें नेणो कोण सिद्धी ने।।

**दृष्टांत :** कव्हणी एकि वर्तेवरि चाले: ते डावेयाकडे न पाहे: उजवीयाकडे न पाहे: आपणेयाकडे न पाहे: सभेकडे न पाहे: मग तयासि वर्त साधे: तयासि दाएपसाए: होती : ना तेचि डावेयाकडे पाहे: उजवीयाकडे पाहे: आपणेयाकडे पाहे: सभेकडे पाहे: तो पडे: तयाचे हाडगुड नुरे:।।

**दार्ष्टान्तिक :** तैसे अनुसरला पुरुषु विकार विकल्पु न सेवी: कीर्ति न भोगा: वितरीत बुद्धि येवों नेदी: तेयासि दाएपसाए होति: दावो म्हणिजे वेवस्थेचे कारण: पसावो म्हणजे प्रसन्न होउनि अपूर्व देणे: हाडगुड नुरे म्हणिजे काइ नाही: आंगुळियांचिया संदी आदिकरुनि चीरटिया होति: तैसे धर्माची संदी आदिकरूनि नुरे।। हाडस्थानी मोक्षु अंतरे: गुडस्थानी कणवही नुरे: म्हणौनि नित्य नरक होति:।।''

**२) सेवाळलेया खडकाचा दृष्टांत**

**सूत्र :** राजसा तामसा धर्मी अधिकार नाही.

**दृष्टांत :** सेंवाळले खडक असें: तयावरि पावो देउंचि तथा ठेउंचि नए: ऐसाही ठेवीजे तरि नीरसौनि पाडी: गुडघे कोपर झांजरीती: ।।

**दार्ष्टान्तिक :** तैसे सामसाप्रति धर्म बोलोचि नए: ऐसांही बोलीजे तरि दु:खातेचि दे:।।

### १.६.५ स्मृतिस्थळ

नरेंद्र आणि परशराम यांचा 'स्मृतिस्थळ' हा एक गद्य चरित्रग्रंथ असून त्यात नागदेवाचार्यांचे चरित्र आठवणींच्या स्वरूपात आले आहे. या ग्रंथाची रचना नागदेवाचार्यांच्या मृत्यूनंतर म्हणजे सन १३१३ च्या सुमारास झाली असावी. स्मृतिस्थळात नागदेवाचार्यांच्या २६१ स्मृति संग्रहीत केल्या आहेत. य. खु. देशपांडे 'स्मृतिस्थळा'चा उल्लेख 'नागदेवाचार्यचरित्र' असा करतात. या ग्रंथात नागदेवाचार्यांबरोबरच लक्ष्मीधरभट, केसोबास, म्हाइंभट या महानुभावीय ग्रंथकारांचीही माहिती मिळते. या पंथातील अनेक घडामोडींची आणि महत्त्वपूर्ण अशा प्रसंगांची माहितीही स्मृतीरूपाने या ग्रंथात आली आहे. महानुभावीय पंथातील अनेक हकीकती, अनेक प्रसंगी झालेल्या धर्मचर्चा यांचा समावेश या ग्रंथात आहे. त्यामुळे 'वाङ्मयीन व सामाजिक दृष्टीनीही 'स्मृतिस्थळा'चे महत्त्व अनन्यसाधारण आहे.' (डॉ. जोशी प्र. न., मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, पृ. १३३)

नागदेवाचार्य हे या पंथातील पहिले आणि महत्त्वाचे आचार्य. नागदेवांचे घराणे पुरी (सध्याचे पांढरे, जि. बीड) येथील राहणारे असून नागदेवांचा जन्म महादेवभट व आबाइसे यांच्या पोटी झाला. चक्रधरांच्या पश्चात त्यांच्या लीळा संग्रहित करविण्याचे, पंथाचा प्रसार करण्याचे आणि ग्रंथकारांना मार्गदर्शन करण्याचे

कार्य नागदेवाचार्यांनी केले. पूर्ववयात रंगेल असलेल्या पण उत्तर वयात चक्रधरांचा एकनिष्ठ सेवक बनलेल्या भटोबासांच्या (नागदेवाचार्यांच्या) व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू या ग्रंथात मोठ्या हृद्त्वाने प्रकटले आहेत. अत्यंत निरंहकारी, व्यवहारी व कर्तृत्ववान अशी ही व्यक्ती आहे. यांच्या नंतर एवढी मोठी व्यक्ती महानुभावांमध्ये दुसरी झाली नाही. नागदेवांना मिळालेली दीक्षा, श्रीचक्रधरांच्या विरहाने वेडा झालेला नागदेव, नागदेवांची गुरुनिष्ठा, त्यांची विनम्रता, त्यांच्या वाणीतील माधुर्य, त्यांचे संघटना चातुर्य, नागदेवांचा मराठीचा अभिमान इत्यादी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे गुण येथे पाहावयास मिळतात.

चक्रधरांच्या निर्णायाच्या दु:खाने वेडेपिसे झालेल्या नागदेवांना महादाइसेने गोविंदप्रभूकडे जाण्याचे सुचविले. तेव्हां त्यांनी तिला स्पष्टपणे सांगितले, ''नेणों मा तुझा श्रीप्रभू: माझा देवो तो श्रीचक्रधर:'' चक्रधरांचे शब्द त्यांना अत्यंत शिरोधार्य आहेत. म्हणून चक्रधारांना आठवीत ते देह ठेवतात. नागदेवांची स्वामीनिष्ठा जिव्हाळ्याची पण डोळस होती. त्यांनी पंथाचे आचार्यपद निष्ठेने व सेवाबुद्धीने सांभाळले. आपल्या पंथाची सतत चिंता वाहिली. त्यांनी आपले आचार्यपद कोणास खपवू दिले नाही, आणि शेवटी ''गोसावीयांचा व्यापारू चालविता केण्हां माझे वेकास गेले असैल: तरि तुम्हीं समस्तीं क्षेमा करावी'' असे शिष्यवर्गाला हात जोडून प्रार्थन करून त्यांनी त्यांचा अखेरचा निरोप घेतला.

नागदेवांचे कर्तृत्व पंथीय व वाङ्मयीन असे दुहेरी स्वरूपाचे आहे. गोविंदप्रभूंच्या पश्चात त्यांनी या मार्गाची धुरा सुमारे पंचवीस वर्षे वाहिली व महानुभाव पंथाला स्थैर्य व सुसंघटित स्वरूप प्राप्त करून दिले. मराठीचा अभिमान बाळगला. ''नागदेवाचार्यांनी घेतलेला हा मराठी भाषेचा कैवार एका दृष्टीने मराठी समाजाचा कैवार होता.'' (तुळपुळे शं. गो., मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला, पृ. २११) ते शूद्रांनाही आपल्या मार्गाची दीक्षा देत. ग्रंथनिर्मितीला प्रेरणा देऊन, पंथीय लेखकांना मार्गदर्शन करणे हे त्यांचे दुसरे महत्त्वाचे कार्य. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन लक्ष्मीधरभट, केशिराज, व म्हाइंभट यांनी ग्रंथरचना केली. त्यामुळे त्यांनी स्वत: एकही ग्रंथ लिहिला नसला, तरी अभ्यासकांनी त्यांना 'ग्रंथकारांचे ग्रंथकार' म्हटले आहे.

स्मृतिस्थळातील सर्व स्मृती रसाळ उतरल्या आहेत. या ग्रंथाची भाषा सुखदु:खांचे प्रसंग आणि तत्त्वज्ञानासारखा विषय पेलण्यास समर्थ आहे. ती साधीसुधी, पण विलक्षण प्रभावी आहे. 'स्मृतिस्थळा'तील पुढील स्मृतींवरून 'स्मृतिस्थळांच्या स्वरूपाची व शैलीची कल्पना येऊ शकेल. चक्रधरांच्या नियार्णानंतर नागदेवाचार्य वेडेपिसे झाले. त्यावेळी महदाईसेने त्यांची समजूत काढून त्यांना गोविंदप्रभूजवळ घेऊन आली. तो प्रसंग;

'मग महादाइसी म्हणितलें: 'नागदेवा: गोसावियांपासि चाला जावो।: भटोबासी म्हणितले: 'के असति गोसावी ?: माहादाइसी म्हणितले. 'हे नव्हेति रुधिपुरी: श्रीप्रभु गोसावी बोलाऊ पाठवीलें असे: भटोबासी म्हणितले: 'नेणो मा तुझा श्रीप्रभू: माझा देवो तो श्रीचक्रधरू ओ: तंव माहादाइशी म्हणितले: 'नागदेया: तुते गोसावी श्रीप्रभूसि नीरोविले असें की: आणि मज तुज नीरोविले असे की: चाल: म्हणौनि पाटकुळीए वाउनि नीगाली।। (स्मृती ३)

## १.७ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न आणि उत्तरे

**योग्य पर्याय निवडा**

१. मराठी वाङ्मयाचा वैभवशाली प्रारंभ कोणाच्या कारकीर्दीत झाला ?

(देवगिरीचे यादवराजे / राष्ट्रकुट राजे / शालिवाहन राजे)

२. मराठीतील आद्यगद्यग्रंथ कोणता ?

(विवेकसिंधू / लीळाचरित्र / स्मृतिस्थळ)

३. श्रवणबेळगोळच्या शिलोलेखाचा शक कोणता ?

(९०५ / ११५० / १०५०)

४. विवेकसिंधू हा ग्रंथ कधी लिहिला गेला ?

(शके १११० / शके १२१० / शके १०५०)

**उत्तरे :** १) देवगिरीचे यादवराजे, २) विवेकसिंधू, ३) शके ९०५, ४) शके १११०

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. मुकुंदराजांच्या वाङ्मयीन कामगिरीचा आढावा घ्या.

**प्रास्ताविक :** मराठी वाङ्मयाचा वैभवशाली प्रारंभ देवगिरीच्या यादवराजे यांच्या कारकिर्दीत – विवेकसिंधू हा मराठीतील पहिला ग्रंथ शके १११० मध्ये रचला गेला – तत्कालीन आणि धार्मिक परिस्थिती कारणीभूत – मुकुंदराजांनी उपनिषदातील तत्त्वज्ञान मराठीत आणले. मराठी भाषेचा पुरस्कार केला. मुकुंदराजांच्या स्थळकाळाद्दल संशोधकात मतभेद आहेत – मुकुंदराजांची गुरुपरंपरा.

**विवेचन :** ब्रह्मतत्त्वनिरुपण हा विवेकसिंधूचा प्रतिपाद्य विषय – तत्त्वज्ञानाचे निरूपण गुरुशिष्यसंवादरूपाने केले आहे. शांतरस – ब्रह्मरस महत्त्वाचा – सर्वसामान्यांना ब्रह्मप्राप्ती व्हावी म्हणून मराठीत ग्रंथरचना – विववेकसिंधूचा पूर्वार्ध व उत्तरार्थ – व या दोन विभागातील विषय – महावाक्यविवरण – वेदान्तदर्शन – समर्पक उपमा–दृष्टांतांमुळे ग्रंथाला सुलभता व रसमयता प्राप्त झाली आहे. विवेकसिंधूची भाषा – 'परमामृत' ग्रंथाचा परामर्श – पवनविजय ग्रंथाची ओळख.

**समारोप :** मुकुंदराजांचे तत्त्वज्ञान (शंकरोक्तीवरी) – ज्ञानयोगाबरोबर भक्तियोगाचाही पुरस्कार. असे वाङ्मय निर्माण होणे ही काळाची गरज होती. संस्कृतचे वर्चस्व असलेल्या काळात मुकुंदराजांनी मराठीत ग्रंथनिर्मिती केली. व मराठी वाङ्मयाची मुहूर्तमेढ रोवली. तत्त्वज्ञानाची परिभाषा सिद्ध केली. मराठी तत्त्वज्ञान पेलण्यास समर्थ आहे, हे सिद्ध करून दाखविले. उपनिषदे, वेदान्त, योगमार्ग यांचे ज्ञान प्रथमच सर्वसामान्य मराठी माणसाला झाले. नंतरच्या वैभवशाली मराठी वाङ्मयाची पार्श्वभूमी मुकुंदराजांनी

निर्माण केली. हे त्यांचे कार्य वाङ्मयीन, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे.

२. महानुभाव ग्रंथातील 'लीळाचरित्र', 'श्रीगोविंदप्रभूचरित्र' आणि 'स्मृतिस्थळ' या चरित्रग्रंथांचा परिचय करून द्या.

उत्तरासाठी : १.६, १.६.१, १.६.२, १.६.५ हे मुद्दे पाहावेत.

**लघुत्तरी प्रश्न**

महानुभाव पंथाचा थोडक्यात परिचय करून द्या.

उत्तरासाठी १.५.१ हा मुद्दा पाहावा.

**टीपा लिहा**

महानुभाव पंथाचा आचारधर्म

उत्तरासाठी १.५.२ हा मुद्दा पाहावा.

## १.८ सरावासाठी प्रश्न

**योग्य पर्याय निवडा.**

१. पवनविजय हा ग्रंथ यांचा आहे.

(मुकुंदराज / श्रीज्ञानेश्वर / म्हाइंभट)

२. 'लीळाचरित्रा'त यांचे चरित्र आठवणींच्या रूपात आले आहे.

(श्रीगोविंद्रभू / चक्रधर / नागदेवाचार्य)

३. परशरामबासांनी लिहून काढलेल्या लिळाचरित्राच्या प्रतीला काय म्हणतात ?
(पिढीपाठ / दृष्टांतपाठ / सूत्रपाठ)

४. 'सूत्रपाठा'तील सूत्रांची संख्या सुमारे इतकी आहे.

(१२५० / १३५० / १५००)

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. महानुभावांचा आचारधर्म व तत्त्वज्ञान यांचा परिचय करून द्या.

**लघुत्तरी प्रश्न**

१. महानुभावांच्या दृष्टांतपाठ' या ग्रंथाची थोडक्यात ओळख करून द्या.

**टीपा लिहा**

१. 'सूत्रपाठ'

## १.८ समारोप

विद्यार्थी मित्रहो, वरील सर्व ग्रंथांचा विचार करता आपल्या असे लक्षात येते की, इसवीसनाच्या तेराव्या शतकापासून मराठीमध्ये वाङ्मयनिर्मिती होऊ लागली. मराठीतील पहिलाच ग्रंथ तत्त्वज्ञानप्रधान, आत्मनात्मविवेक सांगणारा असावा, आणि त्याचे शीर्षकही 'विवेकसिंधू' असावे, हे विशेष होय. विवेकसिंधू, लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी या तीन ग्रंथांचेच नव्हे तर, पुढे सतत चार-पाच शतकांपर्यंत जे मराठी ग्रंथ निर्माण झाले त्यांचे विषय, धार्मिक, पारमार्थिक आध्यात्मिक अथवा ईश्वराच्या अवतारकथा वर्णन करणारे आहेत. म्हणजेच चरित्रात्मक आहेत. जीव-शिव, आत्मा-परमात्मा यांच्या संबंधाचे ब्रह्मनिरूपण करणारी ब्रह्मविद्या हाच एक आधार प्रामुख्याने मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा दिसतो. हे तत्त्वज्ञान आबालवृद्धांना आणि अठरापगड जातींना सहजसुलभ व्हावे म्हणून उपमादृष्टांतांच्या आधाराने ते सरस, काव्यमय करण्याचाही प्रयत्न केला आहे. या मराठीच्या प्रारंभीच्या लेखकांनी महाराष्ट्राबद्दल आणि मराठी भाषेबद्दल जो अभिमान व्यक्त केला, तोही विचार करण्यासारखा आहे. महानुभावांनी केलेला महाराष्ट्राचा गौरव आजही स्फूर्तिदायक आहे. त्यांची मराठी भाषेची जाण, ग्रंथरचनेसाठी मराठीचा जाणीवपूर्वक केलेला वापर, या गोष्टी मराठी माणसाच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे हे ग्रंथ जवळजवळ ८०० वर्षानंतर आजही वाचनीय झाले आहेत. त्यांचे वाङ्मयीन, सामाजिक व आध्यात्मिक मूल्य केवळ त्यांच्या काळापुरतेच नाही, तर सार्वकालीक आहे. या वाङ्मयनिर्मितीने मराठी वाङ्मयाला समृद्ध केले. चरित्रलेखनाचा आदर्श घालून दिला. आणि आपल्या वाङ्मयाला परतत्त्वाचा स्पर्श करून ब्रह्मरसाच्या आणि शांतरसाच्या अवीट गोडीचा प्रत्यय मराठी जनमानसाला आणून दिला.

## १.९ अधिक वाचन


१. प्राचीन मराठी वाङ्मयाचा विवेक इतिहास : भाग पहिला, डॉ. अ. ना. देशपांडे.

२. महानुभव पंथ आणि त्याचे वाङ्मय : शं. गो. तुळपुळे.

३. प्राचीन मराठी साहित्यसंशोधन : डॉ. वि. भि. कोलते

४. विवेकसिंधू : संपादक : कृ. पां. कुलकर्णी

५. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला, शं. गो. तुळपुळे.

६. स्मृतिस्थळ : संपादक, वा. ना. देशपांडे.

७. लीळाचरित्र : संपादक, वि. भि. कोलते.

## १.१० उपक्रम

१. तुमच्या परिसरातील महानुभावीय मठांना भेट द्या व या पंथाची अधिक माहिती मिळवा.

२. मुकुंदराजांच्या 'अंभोरे' या स्थळाला भेट देऊन माहिती मिळवा.

३. ऋद्धिपूर व माहूर या महानुभवांच्या तीर्थश्रेत्रांना भेट देऊन, महानुभाव पंथाच्या सद्यस्थितीची माहिती मिळवा.

❑❑❑

# घटक : २

## महानुभावांचे पद्य वाङ्मय : आद्य कवयित्री महदंबा–धवळे, मूर्तिप्रकाश, सातीग्रंथ : रुक्मिणी स्वयंवर, शिशुपालवध, उद्धवगीता, वछाहरण, ज्ञानप्रबोध, सह्याद्रिवर्णन, श्रीऋद्धिपूरवर्णन

### २.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास;

- आद्य मराठी कवयित्री महदंबा हिच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय होईल.
- 'धवळे' या तिच्या काव्यग्रंथाचा परिचय होईल.
- महानुभवांच्या पद्य वाङ्मयाचे म्हणजेच 'साती ग्रंथां' चे स्वरूप समजेल.
- 'धवळे' आणि 'साती ग्रंथ' यांचे तेराव्या शतकातल्या एकूण वाङ्मयातील स्थान समजेल.

### २.१ प्रास्ताविक

प्राचीन मराठी वाङ्मय हे पंथनिष्ठेतून निर्माण झालेले वाङ्मय आहे. पंथांचे संस्थापक, प्रणेते, पंथीय तत्त्वज्ञान, आचारधर्म, लीला या सर्वांचा प्रसार करणे हे त्याचे खरे उद्दिष्ट होते. यासाठी जाणीवपूर्वक गद्य आणि पद्य अशा दोन्ही माध्यमातून आपले उद्दिष्ट या साहित्यिकांनी साध्य केले. काव्ये, प्रबंधकाव्ये, चौपद्या, पदे, आरत्या, स्तोत्रे, अष्टके, स्थलवर्णने, चरित्रे, स्थलमहात्म्ये, दैनंदिनी, भाष्ये, महाभाष्ये, व्याकरण ग्रंथ, शब्दकोश अशा विविधतेने महानुभावीय वाङ्मय नटलेले आहे. हे गद्यवाङ्मय प्रौढता, परिपक्वता, युक्तिवादचातुर्थ अशा अनेक गुणविशेषांनी परिपूर्ण झाले. पण यातील बरेचसे वाङ्मय अजून प्रकाशात आलेले नाही. म्हणूनच प्रा. व. दि. कुलकर्णी म्हणतात, 'मराठीतील वैभवपूर्ण गद्य आद्यापही अप्रकाशितच आहे. ते प्रकाशात आल्यास महाराष्ट्र शारदेच्या दरबारातील एक नवे दालन उघडले जाणार आहे.' (मराठी स्वाध्याय संशोधनपत्रिका, अंक ४ : १९६९, प्रा. व. दि. कुलकर्णी.)

गद्य वाङ्मयाच्या परिचयानंतर आपण आता महानुभावांची 'धवळे', 'मूर्तिप्रकाश' आणि 'साती ग्रंथ' या कविताग्रंथांचा परिचय आपण करून घेणार आहोत. तत्पूर्वी महदंबा आणि तिचे 'धवले' याविषयी आपण माहिती घेऊ.

### २.२ विषयविवेचन

या घटकामध्ये महदंबेचे 'धवळे', केसोबांसाचा 'मूर्तिप्रकाश' आणि महानुभवांचे 'साती ग्रंथ' :

रुक्मिणी स्वयंवर, शिशुपालवध, उद्धवगीता, वछाहरण, ज्ञानप्रबोध, सह्याद्रिवर्णन व श्रीऋद्धिपूरवर्णन या सात ग्रंथांची माहिती दिली आहे

प्रथम महदंबा उर्फ महदाइसा या कवयित्रीविषयी माहिती घेणे अधिक संयुक्तिक ठरेल.

### २.२.१ महदंबा / महदाइसा

महानुभाव पंथामध्ये ग्रंथरचना करणाऱ्या ग्रंथकारांत आद्य मराठी कवयित्री महदंबा हिचे कार्य मोलाचे आहे. तिच्या व्यक्तिगत जीवनाविषयी जी माहिती उपलब्ध होते ती अशी की, लहानपणीच तिचा विवाह झाला होता. पण तिला वैधव्य आले आणि ती पाईकाप्रमाणे राहू लागली. नंतर ती चक्रधरांच्या सहवासात आली आणि तिने त्यांचे शिष्यत्व पत्करले. महानुभावांचे पवित्र धर्मक्षेत्र आणि तीर्थक्षेत्र ऋद्धिपूर येथे ती जाऊन राहिली होती. चक्रधरस्वामी आणि श्रीगोविंदप्रभू यांचे सान्निध्य तिला बराच काळ लाभले. ऋद्धिपूरला असताना तिने त्यांची खूप सेवा केली. मूळ नाव **'रुपाई'** असलेल्या महदंबेचे **'महदाइसा'** असे नाव चक्रधरांनी तिच्या विदुषी पणजीवरुन ठेवले. ही महदाइसा कोणा महादेवरायाची पुरोहित होती. आद्याचार्य नागदेव व महदाइसा ही चुलतभावंडे होत.

गोविंदप्रभूंच्या सहवासात असतानाच तिला काव्यलेखनाची स्फूर्ती मिळाली होती. गोविंदप्रभूंच्या विवाह प्रसंगाच्या निमित्ताने तिने धवळ्यांचा पूर्वार्ध रचला होता. तिचा जन्म आणि मृत्यू याविषयी काहीच माहिती उपलब्ध नाही. मात्र **नवगाव (हैद्राबाद)** येथे तिचा अंत झाल्याचे मानले जाते. महदंबेने आपले एकूण आयुष्य सत्पुरुषांच्या सेवेत आणि तीर्थयात्रा करण्यात घालविले.

महदंबेचे व्यक्तिमत्त्व अतिशय कलासंपन्न होते. चांगल्या रांगोळ्या काढण्यात ती पटाईत होती. ती सुगरणही होती. चक्रधर काशीयात्रेला जाणार होते, त्याआधी तिने त्यांना 'श्वेत उपहार' (सर्व पदार्थ पांढऱ्या रंगाचे) दिला होता. पंथाबद्दल तिला स्वत:ला फार मोठा अभिमान होता. पण तिचा स्वभाव मात्र परखड होता. पंथातील लोक तिला घाबरत, एवढा तिचा वचक होता. कठोर शिस्तीचे पालन ती स्वत: करी आणि इतरांनाही करायला लावी. शिष्यांनी दुपारी झोपलेले तिला आवडत नसे. इतरांशी चर्चा करायला तिला आवडे. प्रश्नोत्तरे करून आपले ज्ञान वाढविण्यासाठी तिची धडपड असे. या तिच्या गुणांवरून तिची स्तुती करताना चक्रधर म्हणतात, 'म्हातारी जिज्ञासक : म्हातारी चर्चक : म्हातारी एथ काही पूसतचि असे,' तर तिच्या देहावसानानंतर नागदेवाचार्य तिच्याविषयी म्हणतो, 'म्हातारी धर्मरक्षक, प्रीतिरक्षक, सुहृदत्वे दु:ख-निर्वेदु :'

मराठी काव्य रसिकांनीही तिचे कार्यकर्तृत्व लक्षांत घेऊन तिच्या व्यक्तिमत्त्वाविषयी 'आद्य' मराठी कवयित्री' असे कौतुकाचे उद्‌गार काढले. मराठीतील कथाकाव्यलेखन करणारी पहिली स्त्री हा बहुमान महदाइसेचा आहे.

### २.२.१ धवळ्यांच्या निर्मितीची घटना

श्रीचक्रधरांच्या निर्याणानंतर रिधपूर येथे वास्तव्य करणाऱ्या शिष्यमंडळीत श्रीगोविंदप्रभूंच्या आश्रयाला महदंबा होतीच. 'श्रीगोविंदप्रभूचरित्र' या चरित्रग्रंथातील लीला क्र. २२४ ही श्रीगोविंदप्रभूंच्या 'वीव्हावो

स्वीकारू' संबंधीची आहे आणि तिच्या संदर्भातच महदंबेने धवळे गाइले असल्याची माहिती आपणांस मिळते.

खरे पाहता, श्रीगोविंदप्रभूंनीच 'वीव्हावो स्वीकारू'ची लीला आरंभिली आहे आणि त्या निमित्ताने महदंबेला विवाहासंबंधीची गीते गाण्यासाठी सांगितले. तो प्रसंग असा –

वधूवरांसाठी बाशिंग घेऊन चाललेल्या एका तेलिणीला श्रीगोविंदप्रभूंसाठी एक बाशिंग देण्याची विनंती महदंबेने केली. मग ते बाशिंग तिने गोविंदप्रभूंच्या मुकुटी बांधले. कांकण बांधले, हळद लावली, श्रीप्रभूंच्या सांगण्यावरून 'तुरे वाजो लागली: वडे मांडे केले : फक्त नवरीमुलगी ठरवावयाची राहिले आणि गोसावियांसि वीव्हायाची प्रवृत्ती जरि होईल तरि मी आपुली कन्या देईन' असे ईश्वर नायकांनी जाहीर करून टाकले. गोसाव्यांना म्हणजे श्रीप्रभूंना मुलगी स्वीकारण्याची जेव्हां विनंती केली तेव्हां 'कोपु नटेले:' लग्न झाले नाही पण 'आवघेयां लोकां जेवणावळी केली:' मग महदांइसेने धवळे गायिले, 'गोसावी म्हणीतले: आवो मेली जाए गाए गाए म्हणे: महदाइसी म्हणीतले: काई गाओ जी: गोसावी म्हणीतले: आवो कृष्ण रुक्मिणी गाय म्हणे: तुरया थाट, गाय म्हणे:' अशा रितीने महदाइसेने श्रीप्रभूंच्या उत्तेजनाने धवळे रचले आणि गायिले.

धवळ्यांचा पूर्वार्ध ज्ञानेश्वरीपूर्वी निर्माण झाला असावा व उत्तरार्ध शके १२३४ पूर्वी केव्हातरी तयार झाला असावा. असा तर्क संशोधक करतात. (वा. ना. देशपांडे, आद्य मराठी कवयित्री, पृ. १२)

## २.२.२ धवळे–पूर्वार्ध

धवळे म्हणजे लग्नप्रसंगी वरासंबंधी गावयाची गाणी. या धवळ्यांतून महदंबेने श्रीकृष्ण रुक्मिणीच्या लग्नाची म्हणजे रुक्मिणीस्वयंवराची कथा सांगितली. या प्रसंगी धवळ्यांची रचना अपूर्णच राहिली. धवळ्यांच्या निर्मितीची ही कथा आहे. यावेळी रचलेल्या धवळ्यांच्या पूर्वार्धातील धवळ्यांची संख्या ८३ इतकी आहे.

धवळ्यांच्या पूर्वार्धात रुक्मिणीहरणाचा कथाभाग आला आहे.

धवळ्यांचा पूर्वार्ध हे एक पारंपरिक स्वरूपाचे कथाकाव्य असल्याने एक स्वतंत्र काव्यकृती म्हणून त्याचे मोल खूप महत्त्वाचे आहे. ही कलाकृती निर्माण करीत असताना एखादी अभिजात कलाकृती निर्माण करताना जातिवंत कलावंतांची जी भूमिका असते, तीच भूमिका महदंबेची होती.

धवळ्यांचे कथासूत्र सुरूवातीला 'वीव्हावे स्वीकारू' या प्रसंगाशी निगडीत असले तरी या प्रसंगाचे प्रसंगत्वच ते नष्ट करून टाकते. धवळ्यांच्या सुरूवातीचे कडवे पहा –

**'श्री सर्वेश्वराचे शिरी धरूनिया चरण:**
**मग धवळी गाइन गोविंदराणा :**
**जेणे रुक्मिणी हरीयली तेणें पवाडे केले अद्‌भूत**
**पाविजे परमगती भक्ती, आइकतां श्रीकृष्ण चरित्र:'**

खरे तर वरील पंक्तीतील 'श्री सर्वेश्वर, गोविंदूराणा' हे शब्द महानुभाव पंथातील काही व्यक्तींचा निर्देश करण्यासाठी योजिले गेले आहेत. पण हे शब्द त्याचवेळी श्रीकृष्णाचाही निर्देश करतात. मग धवळी गाइन गोविंदराणा' हा धवळ्यांचा जन्महेतू आहे. तो प्रकट होतो न होतो तोच 'जेणे रुक्मिणी हरियलि तेणे पवाडे केले अद्भूत' असे विशेषणात्मक चरण योजून महदंबा श्रीगोविंदप्रभूंच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या कथेचा ओघ सुरूवातीलाच मोठ्या कुशलतेने श्रीकृष्णचरित्राच्या दिशेने वळवून घेते.

धवळे हे एक कथात्मक काव्य आहे. एकाच वेळी ती जशी एक कथा आहे तसेच ते काव्यही आहे. 'रुक्मिणीहरणा'च्या घटनेस लाभलेले हे कथात्मक काव्यरुपही पुन्हा एक परंपरा निर्माण करताना दिसते. धवळ्यांनंतरच्या काळात या कथेने मग वेगवेगळी रूपे धारण केलेली दिसतात.

धवळ्यांच्या पूर्वार्धातील रुक्मिणीहरणाची कथा म्हणजे तेराव्या शतकातील, एका कविमनाला एका पुराणप्रसिद्ध कथेचे, एका मर्यादित अर्थाने भावलेले नवे रूप आहे. श्रीकृष्ण चरित्रानेच या कविमनाचे लक्ष या कथेकडे वेधले असले, तरी ही घटना स्वतंत्र साहित्यकृतीत आविष्कृत करण्याचे कौशल्य प्रथम महदंबेने दाखविले आणि हे करीत असताना महदाइसेने पंथीय तत्त्वज्ञानाच्या आहारी न जाता कथामूल्यांची बूज राखली आहे. भागवतकारांच्या तत्त्वज्ञानाचा अभिनिवेश जेथे जेथे प्रकट झाला त्या सर्वच प्रसंगांचे अंधानुकरण करण्याचे तिने टाळले आहे.

या धवळ्यांतून लोकसाहित्याचे चैतन्य, लोकजीवनाचे रंग व लोकभाषेची सहज सुंदर आणि लयबद्ध वळणे प्रकट होतात. त्यामुळे पुढे समृद्ध पावलेल्या मराठी आख्यान काव्यपरंपरेहून धवळ्यांचे स्वरूप पृथगात्म, अकृत्रिम आणि प्रत्ययकारी वाटते.

### २.२.३ उत्तरार्ध

धवळ्यांच्या उत्तरार्धाचे कर्तृत्व पूर्णपणे महदाइसेकडे जात नाही तर ते म्हाइंभट आणि लक्ष्मींद्रभट यांच्याकडेही जाते. एके दिवशी या दोघांनी 'रुक्मिणीसैंवर का न करा ?' अशी महदाइसेला विचारणा केली. तेव्हां पूर्वी गोविंदप्रभूंच्या निमित्ताने जमले, पण आता मला हे कसे जमणार ? असे तिने उत्तर दिले. तेव्हा त्या दोघांनी महदंबेला सांगितले, 'आम्ही शब्द घडवुनि: तुम्ही गा.' असे म्हटल्यावर महदंबेने हे धवळे गायिले व म्हाइंभट व लक्ष्मींद्रभट या दोघांनी ते लिहून घेतले. म्हणून धवळ्यांच्या उत्तरार्धाचे कर्तृत्व महदंबा, म्हाइंभट व लक्ष्मींद्रभट या तिघांकडे जाते. उत्तरार्धातील धवळ्यांची संख्या ६३ इतकी आहे.

धवळ्यांच्या उत्तरार्धात रुक्मिणीस्वयंवराचा कथाभाग झाला आहे.. सुरूवातीला 'सर्वेश्वराचे शिरी धरूनिया चरण: मग धवळी गाइन गोविंदुराणा' असे ईश्वराला वंदन केले आहे आणि मग रुक्मिणीहरणाची कथा सांगितली आहे. 'ज्याने रुक्मिणीहरणाचे अद्भूत पवाडे केले त्या श्रीकृष्णाची कथा भक्तिभावाने ऐकल्यास परमगती प्राप्त होईल.' असा महदंबेचा विश्वास आहे. भागवतातील काही प्रसंगांचे उदा. विप्राचा निरोप, कृष्णागमन, अंबिकापुरात त्याचे वास्तव्य आणि अंबिकेच्या दर्शनास आलेल्या रुक्मिणीचे हरण इ. चे चित्रण यात आले आहे.

महदंबा स्त्रीस्वभावाचे बारीक निरीक्षण करते आणि त्याचे वर्णन करते. उदा. कृष्णाला पाहिल्यानंतर रुक्मिणीची अवस्था;

**''सौंदर श्रीकृष्ण देखियला झळकता :**

**तवं तियेचे आकर्षले चीत**

**कैसी संभ्रमीत जाली माडांवरूनिया घालू पाहे झेप**

**तवं वीप्रे सांवरीली बाळी म्हणे देवी नव्हे**

**तुमचे उचीत.'**

अशा झाली कृष्णाचे रूप पाहिल्यानंतर इतर स्त्रियांच्या मनात त्यांच्याविषयी अभिलाषा निर्माण झाली. पण या गोष्टीचा संशय रुक्मिणीला घेऊ नये म्हणून 'तुझा पती आम्हां पिता, दुजा न आठवे विचारू' अशी सारवासारव त्या करतात. याशिवाय रुक्मिणी, श्रीकृष्ण, बलिभद्र, विप्र यांची व्यक्तिचित्रेही महदंबा जिवंतपणे रेखाटते. यातील काही प्रसंगांतून महदाइसेच्या विनोदी शैलीचाही प्रत्यय येतो. अशा या वैशिष्ट्यपूर्ण काव्याचे वर्णन करताना वा. ना. देशपांडे म्हणतात, ''महदाइसा ही जशी आद्य कवयित्री, तसे तिचे 'धवळे' हे या विषयावरील स्वतंत्र काव्यामधील आद्य काव्य होय. नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवरात सर्वत्र उपमा उत्प्रेक्षांच्या चंद्रज्योती व युश्नळे सरसरत आहेत. तसा लखलखाट, धवलपणा नसला तरी त्यात नीरांजनाची शुचिता खचित आहे. साधेपणा  हा तर या काव्याचा प्राणच होय. साधे वर्णन, साधी भाषा व साधे विचारविकार असूनही एखादे काव्य हृदयंगम कसे होते, याचा धवळे हा उत्कृष्ट आदर्शच म्हटला पाहिजे.'' (वा. ना. देशपांडे (सं.) महदंबा: आद्य मराठी कवयित्री, पृ. २१)

स्वाभाविकता, गतिमानता, सहजसुंदरता आणि स्त्रीसुलभता हे धवळ्यांचे उठून दिसणारे असे विशेष आहेत. या कथाकाव्यातून प्रसंगचित्रण आणि व्यक्तिचित्रण अशी दोन मुख्य अंगे प्रगट होतात. ही स्वयंवरकथा असली तरी रुक्मिणीच्या श्रीकृष्णावरील शृंगारिक प्रेमाची कथा नाही, तर भक्तिभावाची कथा आहे. मराठीतले हे पहिले कथाकाव्य भक्तिरसाने परिपूर्ण आहे.

### २.२.४ महदंबेच्या कवितेचे विशेष

विद्यार्थीमित्रांनो, या धवळ्यांचे स्वरूप पाहू जाता आपल्याला काही वैशिष्ट्ये ठळकपणे जाणवतात. कथाकाव्याची दोन मुख्य अंगे म्हणजे प्रसंगचित्रण आणि व्यक्तिचित्रण. या दोन्हींच्या बाबतीत या काव्यात एक अकृत्रिम साधेपणा आहे. सुरूवातीपासून शेवटपर्यंत काव्यात गतिमानता आहे. कथानकात अनेक प्रसंगांची गुंफण कौशल्याने केली आहे. रुक्मिणी, श्रीकृष्ण, बळीराम, सुदेव, रुक्मी, भीमकराजा, रुक्मिणीच्या सख्या इ. व्यक्तींच्या मनाचे विविध तरंग व्यक्तिचित्रणाच्या रूपात कवयित्रीने मोहक पद्धतीने रंगविले आहेत. काव्याच्या सुरूवातीला –

**'श्री सर्वेश्वराचे' सीरी धरूनियां चरण ।**

**मग धवळी गाईन गोविंदराणा ।'**

असे सर्वेश्वराला वंदन ती करते आणि मग..

**'जेणे रुक्मिणी हरीयली तेणे पवाडे केले अद्‌भूत ।**

**पाविजे परमगती भक्ती आइकता कृष्णचरित्र ।'**

अशी कथानकाची सुरूवात करते. संपूर्ण कथा थोडाही फाफट पसारा न करता सरळ, साध्या, आकर्षक पद्धतीने ती निवेदन करते. मुळात रुक्मिणी स्वयंवराची कथा म्हणजे शृंगाराला अवसर देणारा विषय आहे; पण महदाइसेचे वेगळेपण असे की, शृंगाराला कथेच्या जवळपासही फिरकू दिलेले नाही. पण कथेचा आस्वाद घेताना त्याची उणीव कुठेही भासत नाही. श्रीकृष्णकथेकडे ती शृंगारिक प्रेमकथा म्हणून पहात नाही, तर भक्तिभावाने पहाते. महानुभावांच्या इतर बहुतेक ग्रंथांमधून जसा श्रीकृष्णभक्तीचे संवर्धन करण्याचा प्रयत्न दिसतो. तसाच महदाइसेचाही स्वयंवरकथा लिहिण्यातला हेतू श्रीकृष्णाविषयीचा भक्तिभाव अभिव्यक्त करण्याचा व भक्तांच्या मनात हा भक्तिभाव रूजविण्याचा आहे.

'आइकतां कृष्णचरित्र' शृंगारला थोडाही अवसर न देता रंजकता आणि ललित्य यांच्या साहाय्याने सत्वशील शब्दसृष्टी कशी निर्माण करता येते हे महदाइसेच्या या काव्याने दाखवून दिले आहे. रुक्मिणीस्वयंवराची ही कथा नंतर अनेक कवींनी आपल्या कवितेतून रंगविली. पण मराठीत ही कथा स्वतंत्रपणे रेखाटण्याचे काम महदाइसेने केले.

मित्रांनो मागे उल्लेखिल्याप्रमाणे या कथाकाव्याचा पूर्वार्ध हा श्रीप्रभूंच्या निधनापूर्वी म्हणजे शके १२०९ पूर्वी केव्हांतरी रचला असावा असा अभ्यासकांचा अंदाज आहे. धवळ्यांच्या उत्तरार्धाच्या बाबतीत तो १२३४ च्या पूर्वी केव्हां तरी रचला गेला असावा, असे मानण्यात येते. तत्कालीन महाराष्ट्रातील विवाहपद्धतीचा तपशील समजण्याच्या दृष्टीनेही 'धवळ्या'तील सामाजिक उल्लेख खूप उपयुक्त ठरण्यासारखे आहेत.

### २.२.५ मूर्तिप्रकाश (शके १२११)

'मूर्तिप्रकाश' हा केसोबासांचा तिसरा महत्त्वाचा ग्रंथ होय. 'दृष्टांतपाठ' आणि 'सूत्रपाठ' हे गद्यग्रंथ आहेत. तर 'मूर्तिप्रकाश' हा ओवीबद्ध पद्यग्रंथ आहे. त्याचा रचनाकाल शके १२११ (इ.स. १२८९ हा आहे. म्हणजे कालदृष्ट्या हा ग्रंथ 'साती ग्रंथां'च्या अगोदरचा ग्रंथ आहे. तर महदंबेच्या 'धवळ्या'नंतरचा ग्रंथ आहे. म्हणून याचा विचार येथे करणे अधिक संयुक्तिक ठरते.

'मूर्तिप्रकाश' हा ग्रंथ वर्णनपर असून त्यांची ओवीसंख्या तीन हजारांवर आहे. श्रीचक्रधरांची मूर्ती हा त्याचा मुख्य वर्ण्य विषय आहे. चक्रधरांचे हे वर्णन त्यांच्या डोमेग्राम येथील पूजावसराच्या प्रसंगाच्या आधारे केले आहे. त्यामुळे येथे साहजिकच डोमेग्रामचे वर्णनही आले आहे; व कवीने ते विस्ताराने केले आहे. श्रीमूर्तीच्या प्रत्येक अवयवाचे वर्णन केले आहे. ही सर्व वर्णने अलंकारांनी नटली असली तरी ती साचेबंद

वाटतात. त्यात फारसा जिवंतपणा जाणवत नाही. ही वर्णने करताना केशिराजाची विषयांतरे फारच लांबतात. या विषयांतरात तात्विक स्वरूपाची शास्त्रचर्चा असते. महानुभावांचा आचारधर्म, देवताफळांचे अनित्यत्व, हंसावताराचा वृत्तांत व ब्राह्मण मृतपुत्रांचे आख्यान यांसारखे अनेक विषय या ग्रंथात आलेले आहेत.

प्रस्तुत ग्रंथात तात्त्विक चर्चा अनेक ठिकाणी असली, तरी ग्रंथ निरस झालेला नाही. 'मूर्तिप्रकाश' हे एक अत्यंत भावमधुर काव्य आहे. साधे मूर्तिवर्णनच, पण ते भावपूर्ण अंत:करणाने केले असल्याने त्याला अवीट गोडी प्राप्त झाली आहे. पुढील काही ओव्यांवरून मूर्तिप्रकाशाचे स्वरूप व शैली लक्षात येईल.

**साहित्यांचा सेजारी : सुख श्रिघोरेंसी गोष्टी करी :**
**म्हणे धन्य धन्य ते वैखरी : जे देवां दुर्लभ ।।**
**ऐसी कवितेची चाली सुरंग सरळ : जैसे अनुराग ज्ञान केवळ :**
**तैसे शब्द दिसती पदी प्रांजळ: अर्थपुष्ट ।।**
**ब्रह्मविद्येचा आरिसां : उमटे कैवल्याचा ठसा :**
**तो दृष्ट करीन राजहंसा : रसाळांसी ।।**

चक्रधरांनी प्रयाण केल्यानंतर भटोबासांना जे विरहदु:ख झाले त्याचे शब्दचित्र केशिराजांनी भावोत्कटतेने काढले आहे. 'गोसावी गेल्यावर पाण्यावेगळा मासा' तळमळतो तसे नागदेवाचार्य तळमळू लागले. 'जीविताचे ओझे' त्यांना सहन होईना. ते मी-माझे विसरले, त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. ते सतत आगदी भिक्षा मागतानाही चक्रधर म्हणू लागले.' नागदेवाचार्यांची ही विरहावस्था कवीने मोठ्या जिव्हाळ्याने वर्णन केली आहे. त्यामुळे कशिराजांच्या ठिकाणी विद्वत्तेबरोबर रसिकताही वास करीत होती असे दिसते. ''मूर्तिप्रकाश हे केशिराजबासांच्या काव्यवैजयंतीमधील अत्यंत प्रकाशमान असे रत्न होय.'' हा डॉ. कोलते यांचा अभिप्राय यथार्थ आहे. (वि. भि. कोलतें, मूर्तिप्रकाश, पृ. ३०) 'मूर्तिप्रकाशा'चा समारोप केशिराज पुढीलप्रमाणे करतात. त्यावरून या ग्रंथाच्या मागील प्रेरणा व उद्दिष्ट यांची कल्पना येते. केशिराज म्हणतात,

**हा ज्ञानभक्तिवैराग्याचा आवांका : मीया बोलिला सप्रेमळा वाणी देखा :**
**आइकता पाविजे परमसुखा : परब्रह्मातें ।।**
**हे साध्यसाधनांचे कारण : केवळ गाभेयाचे स्मरण :**
**चींतीता नीवारे जन्ममरण : लाहीजे कैवल्यसुख ।।**
**तया श्रीचक्रधराची श्रीमूर्ती : जे आवडी अखंड अवलोकीती :**
**तेचि तया सुखाते पावती : आर्तजन ।।**
**ऐसा साळांकृत सर्वेश्वरु : नागार्जुनाचा दातारू :**
**हृदइं ध्याइला श्रीचक्रधरू : जो जीवन संताचे ।।**

### २.२.६ महानुभावीयांचे पद्य वाङ्मय (साती ग्रंथ)

विद्यार्थीमित्रांनो, आता महानुभावीयांच्या ‘साती ग्रंथां’चा परिचय करून घेऊया.

महानुभाव पंथाच्या विचारांची बैठक श्रीकृष्णभक्तीनेच भारलेली आहे. हा पंथ श्रीकृष्णाला पूर्ण परब्रह्म परमेश्वराचा अवतार मानतो. त्यामुळे महानुभाव पंथातले साती पद्यग्रंथ हे पंचकृष्ण आणि श्रीचक्रधरोक्ती यांना वाहिलेले आहेत. हे सारे काव्यग्रंथ आहेत. सात ग्रंथांपैकी एक ग्रंथ सोडून इतर सर्व सहा ग्रंथांच्या निर्मितीमागे श्रीकृष्णभक्तीची प्रेरणा आहे. श्रीकृष्णभक्तीने उजळलेले महानुभावीय ‘साती ग्रंथ’ ही सगळी प्रबंधकाव्ये आहेत. या साती ग्रंथांचे लेखक व रचनाकाल पुढीलप्रमाणे आहेत.

| | ग्रंथ | कवी | रचनाशक |
|---|---|---|---|
| १) | रुक्मिणीस्वयंवर | नरेंद्र | १२१४ |
| २) | शिशुपालवध | भास्कर कवीश्वर व्यास | १२३५ |
| ३) | एकादशस्कंध (उद्धवगीता) | भास्कर कवीश्वर व्यास | १२३६ |
| ४) | वछाहरण | दामोदर पंडित | १२३८ |
| ५) | ज्ञानप्रबोध | पंडित विश्वनाथ | १२५३ |
| ६) | सह्याद्रिवर्णन | रवळो उर्फ राघो व्यास | १२५५ |
| ७) | ऋद्धिपूरवर्णन | नारायण पंडित | १२८५ |

**१) रुक्मिणीस्वयंवर : इ.स. १२९२ (श. १२१४)**

नरेंद्रांच्या रुक्मिणीस्वयंवराचा ‘साती ग्रंथा’त कालदृष्ट्या पहिला क्रमांक लागतो. तसा काव्यगुणदृष्ट्याही हा अतिशय सरस ग्रंथ आहे. मूळ ग्रंथ १८०० ओव्यांचा असला तरी या ग्रंथाची उपलब्ध ओवीसंख्या ८७९ इतकी आहे. आणि त्यात सुदेव ब्राह्मण द्वारकानगरीपर्यंत येतो एवढाच कथाभाग आला आहे. परंतु हा अपूर्ण अवस्थेतला ग्रंथ जरी पाहिला तरी असे म्हणावेसे वाटते की, हा एक कलासंपन्न अणि रसपूर्ण असा ग्रंथ आहे. अभ्यासकांनी तर या ग्रंथाविषयी असे म्हटले आहे की, ‘‘हे काव्य म्हणजे मराठी शारदेच्या अंगावर चढविलेले एक दिव्य लेणे आहे.’’

या काव्यग्रंथातून रुक्मिणीच्या श्रीकृष्णावरील भक्तियुक्त प्रीतीचे विदग्ध दर्शन घडविले आहे.

**‘ते देवांचे सौंदर्य वानु कैसे : जे मदनु अपत्य लाहिला आपैसे**
**रुपाचा वेधु नारीसि असे : तैसाचि मुनीश्वरां ।’**

असे किन्नराच्या तोंडून श्रीकृष्णाचे सौंदर्यवर्णन रुक्मिणी ऐकते. आणि विरहाने अस्वस्थ होते. रुक्मीणीने तिला शिशुपालाला द्यावयाचे ठरवलेले असते. त्यामुळे तर ती आणखी दु:खी होते. मग तिच्या विरहावर उपचार करण्यासाठी अनेक शीतलोपचारांची योजना केली जाते. पण विरह सहन न होऊन –

**'तया मी शरण सर्वभावी : तनु–मनु–प्राण अर्पिले देवी ।**

**तो माझिया जीविताचा गोसावी : रावो यादवांचा ।'**

आपली अशी अवस्था ती आपल्या सखीला सांगते. विरह दु:खावरचा उपाय म्हणून सुदेवाची श्रीकृष्णाकडे रवानगी केली जाते. एवढाच भाग या काव्यात उपलबद्ध आहे.

हे सारे काव्य देशोदेशींच्या राजांची वर्णने, श्रीकृष्णसौंदर्याची वर्णने, अस्ताचलावरील सूर्याची वर्णने, दिव्यांची वर्णने, चंद्रोदयांची वर्णने, वनोपवनांची वर्णने, द्वारका नगरीची वर्णने इ. वर्णनांनी खचाखच भरलेले आहे. पण नरेंद्राचे कथासूत्रावर व त्याच्या प्रमाणबद्ध मांडणीवर लक्ष आहे. वर्णनांच्या अतिरेकापायी तो कथेचा रसभंग होऊ न देण्याची काळजी घेतो आणि ती 'बहु बोलता अति प्रसंगु । कथे होईल रसभंगु' या शब्दात व्यक्तही करतो. तरीही कथानकाचे निवेदन करताना मात्र नरेंद्राला वर्णनांचा अतिशय हव्यास असल्याचे वाचकाला जाणवत राहाते. शिवाय ही वर्णने अत्युक्तियुक्त आहेत. उदा. वसंतऋतूंचा झाडांवरही परिणाम झाला आहे. इतका की त्यांनाही स्त्रीसुख भोगण्याची इच्छा झालेली आहे. असे कवी वर्णन करतो.

**'तया रितुरायाचेनि रजें । कामिनियांचा वेधु कवणां नुपजे ?**

**झाडें डोहेळैंजतातिं माजें । स्त्रीसुख भोगावया ।'**

त्याच्या वर्णनातला कल्पनाविलास वाचकाला थक्क करून सोडणारा आहे. तो असा –

**'तवं गगनी नक्षत्रें उमटत । जैसी आकाशी घाटौलि फुलत**

**ना तरि मेघ वीणि साधित । मोतियांची '**

नरेंद्रांचे कवित्व, कल्पकता आणि सौंदर्यदृष्टी अतिशय भव्य आहे, हे नि:संशयपणे मान्य करावे लागते. हा 'रसकवी' आहे. अमृतासारखे त्याचे बोल रसाळ आहेत. त्यात पुन्हा श्रीकृष्णभक्तीही पहावयास मिळते. म्हणूनच –

**'श्रीकृष्णाचा वर्णिता कीर्तिचंद्रु । चढवीन सुखाचा समुद्रु'**

असा विश्वास तो व्यक्त करतो.

**'श्रीकृष्णाचा गुणी जीविनला । माझा जिऊ श्रीचक्रधरा विनटला**

**तो आंतुल आनंदु वोसंडला । कवितेचेनि मिसे'**

त्याच्या काव्यलेखनाचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, त्याच्या काव्यलेखनात सद्‌भिरूचीचा संयम आहे. रसिकता आणि उदात्तता यांचा सुंदर संगम रुक्मिणीवर्णनात पहावयास सापडतो. त्याबरोबरच त्याच्या कल्पनाविलासाचे सामर्थ्यही त्यातून प्रगट होते.

**'तिया आंगभारे चालती राजसा : हांसेनि उजळति दाहि दिशा**

**दाटेति डोळेयांचा वळसां : सभेचे लोक**

**कास्मिराचिये करंडिये जैसे : भीतरिल मूर्ति प्रकासे**

**पातळा लुगडेयांतुनि तैसे । आवएव दिसताती**

**तयांमाजि रुक्मिणीचे रूप । जैसे सिद्धरसाचे लेप**

**की ते चंद्राचे पूडिव निकोप । कांडारिले**

**की ते भुवन–मठिंची अंबिका । कीं सौंदर्य लोकिची तारका**

**ना तरि जन्म–पत्रिका । मन्मथाची'**

असे रुक्मिणीचे उत्प्रेक्षापूर्ण वर्णन तो करतो. पण ते करीत असताना सद्भिरूचीच्या मर्यादा तो सांभाळतो.

**'येकेका अवेवाचे बरवेपण । बोलतां विषया होईल माजवण**

**पुन साधूंचे घडैल दूशण । जऱ्हीं मुनी जाले ।'**

रम्य कल्पनाविलास हे या कवीच्या प्रतिभेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. अलंकारांमध्ये उत्प्रेक्षा हा या प्रतिभेचा आवडता अलंकार आहे. या दृष्टीने रुक्मिणीच्या विरहोपचारातील पुढील उदाहरण पाहाण्यासारखे आहे. रुक्मिणीच्या विरहोपचाराची तयारी सुरू आहे. अर्धचंद्राच्या खलात चांदण्याचा पारा आणि नक्षत्रांचे मोती खालून काढावयाची आहेत.

**'खली अर्धचंद्राचा । पारजु शोधुनि चांदिणेयांचा**

**मारु केला मोतियांचा । नक्षत्राचेया ।'**

कधी कवीची अत्युक्ती साधेच पण भावपूर्ण रूप धारण करते. विरहाने दु:खी असलेली रुक्मिणी झोपलेली आहे आणि तिने डावा हात उशाखाली ठेवला आहे. तर उजवा हात हृदयावर आहे. त्याचे कारण कवी सांगतो.

**'डावा हातु उसिसां घातला; उजवा हृदयावरि ठेविला**

**जैसा जिवेंसी देवो धरिला : निसटैल म्हणौनि ।'**

कवी शब्दब्रह्माची उपासना करतो पण या उपासनेचा ओघ साहजिकच श्रीकृष्णगुणवर्णनाकडे वळतो. काव्याला पारमार्थिकतेचे अधिष्ठान असले पाहिजे. कवीच्या लेखणीला संयमशील वळण लागावे अशी अपेक्षा नरेंद्र पूर्ण करतो. सद्भिरूचीसंपन्न अशा संयमाचे उत्तम उदाहरण म्हणून नरेंद्राने केलेले रुक्मिणीवर्णन पाहाण्यासारखे आहे.

**रुक्मिणीचे राजसपण : जगीं वानीतसे कवण**

**परब्रह्म ग्रहिस्थ करी आपण : जेणें रूपेसी'**

नरेंद्राच्या मनातील मराठी भाषेबद्दलचा अभिमान हा ही त्याच्या कवित्वाचा आणखी एक गुणविशेष आहे.

**'ते मऱ्हाटे बोल रसिक । वरि दावीन देशियेचें बिक**

**म्हणैन सव्वाख्यान श्लोक । मिसें वोवियेचेनि ।'**

असा हा नरेंद्र रामदेवराव यादवाच्या दरबारातील कवी होता. दोन बंधूंनी (सालकवी व नृसिंह कवी यांनी) अनुक्रमे रामायण व नलोपाख्यान लिहिलेले पाहून श्रीकृष्णभक्त नरेंद्राने त्यांची निर्भर्त्सना केली. तेव्हा दोघा बंधूंनी त्यास श्रीकृष्णकथेवर काव्यलेखन करण्याचे आवाहन केले. या प्रसंगातून मूळ १८०० ओव्यांच्या 'रुक्मिणीस्वयंवरा'चा जन्म झाला. या काव्यावर रामदेवराव यादव काही अमिष दाखवून हक्क सांगू लागला. असे केल्याने आमच्या कविकुळाचा बदलौकिक होईल असे स्पष्टपणे सांगून या तिघा बंधूनी एका रात्रीत सुमारे ९०० ओव्या (८७९) नकलून काढल्या. पहाटे राजाचा मनुष्य आला व मूळ समग्र 'रुक्मिणी स्वयंवर' ग्रंथ घेऊन गेला. इकडे ९०० ओव्यांचा आपला अपूर्ण ग्रंथ घेऊन नरेंद्र भटोबासापाशी आला आणि त्याने महानुभाव पंथाची दीक्षा घेतली. मग हा काव्यग्रंथ पंथात मान्यता पावला. संपत्तीला वश न होण्याची नरेंद्राची बाणेदार वृत्ती पाहून रामदेवराव यादव मनात चांगलाच चरकला. पैशाच्या बळावर कवीलाही विकत घेता येईल हा राजाचा प्रयत्न असफल ठरला.

नरेंद्राने श्रीकृष्णकथेचे लेखन जरी केले असले तरी पंथीय तत्त्वज्ञान मात्र या ग्रंथात कुठेच आलेले नाही. अर्थात कवित्वाच्या विदग्ध जाणिवेतून हे काव्य लिहिलेले असल्यामुळे त्याकडून पंथीय तत्त्वज्ञानाची अपेक्षा करणे हे चूक ठरेल. दुसरे असे की, नरेंद्राने या पंथाची दीक्षा घेण्याच्या अगोदरच हे काव्य निर्माण झाले आहे. त्यामुळे महानुभावांचे तत्त्वज्ञान या ग्रंथात येणे शक्य नाही. मात्र आलंकारिकतेने नटलेले कल्पनासौंदर्य, भावमाधुर्य, ज्ञानेश्वरकुलीन शैली, सौंदर्यासक्त वृत्ती, आत्मविश्वास, विनय आणि श्रीकृष्णकथेवरील प्रेम अशी अनेकविध वैशिष्ट्ये या काव्यग्रंथातून व्यक्त होताना दिसतात.

नरेंद्रांच्या कवित्वाचे, कल्पकतेचे आणि सौंदर्यदृष्टीचे अंग नि:संशय उज्ज्वल आहे. निसर्गचित्रणात त्याने दाखविलेली सौंदर्यदृष्टी तर प्राचीन मराठी साहित्यात तर तुरळकच दिसते. कवित्वाचे, रसाचे आणि भावनात्मकतेचे जे दुसरे अंग आहे त्याचाही परिपोष या ग्रंथात झालेला दिसतो. नरेंद्राचे बोल हे अमृतापेक्षा रसाळ आहेत. आणि त्या रसाळपणातच श्रीकृष्णभक्तीही आहे. नवरससिद्धी हे कवित्वाचे प्रधान कार्य आहे आणि हे नवरससिद्धीचे सामर्थ्य शारदेच्या कृपेने कवीला प्राप्त होते. अशी कवीची भूमिका आहे म्हणूनच शारदेचा गौरव करताना तो म्हणतो,

**'ते आपुलिया कणवा महाकवी :**

**नवरसांचे मेघ वोळवी :'**

रसप्रतीती हे काव्यलेखनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. ही गोष्ट नरेंद्राला मान्य आहे. पण श्रीकृष्णकथा या रसप्रतीतीचा विषय असला पाहिजे, असा मात्र त्याचा आग्रह आहे. ही आपली भूमिका फार सुरेख शब्दात

तो व्यक्त करतो. कवी म्हणतो, 'शारदा ही शब्दब्रह्मीची देवता असली तरी राया मुरारीची मात्र ती विद्यावंती म्हणजे स्तुतिपाठक गायिका आहे.

**'ते देवता तरी शब्द ब्रह्मींची :**

**पुन विद्यावंती राया मुरारीची '**

या वर्णनानंतरच्या काही ओव्यांतून कवी पुन्हा पुन्हा रुक्मिणी वर्णन करतो. तेथे कवीने सुंदर उत्प्रेक्षांनी परिपूर्ण अशा ओव्यातूंन तिच्या सौंदर्याचे वर्णन केले आहे. त्याच्या सत्त्वशील सौंदर्यदृष्टीचे उदाहरण म्हणून पुढील उत्प्रेक्षा पहाण्यासारख्या आहेत. 'रुक्मिणीचे रूप म्हणजे जणू काही चंद्राचे पुडीव निकोप स्वरूपात कांडारलेले आहे, असे तो म्हणतो.

'नरेंद्र हा केसोबासांप्रमाणे प्रबंधकवी आहे आणि प्रबंधकाव्यातले तीन विशेष नरेंद्राच्याही काव्यात अवतरले आहेत. एक नरेंद्राला महाकवित्वाची ओढ आहे. ज्यांनी देवाला जाणले व जे देवाला प्रिय झाले अशा महाकवींबद्दल त्याला आदर आहे. 'ते महाकवी मानिले : जे जाणौनि देवा वालभैले' असे तो म्हणतो. सर्गबद्धतेचे बाह्यलक्षण नसले तरी त्याच्या काव्यरचनेचा एकंदर घाट महाकाव्यरचनेच्या वळणावर गेलेला आहे. दोन त्याची प्रतिभा ही अत्युक्तिप्रिय आहे आणि तीन, 'तैसे देवाचा गुणी विसंवता : मि ब्रियाळ बोले उसणता' असे म्हणून कवीने आपली कवित्वविषयक नम्रता प्रगट केली आहे.

नरेंद्रांची भूमिका भक्तापेक्षाही रसिक कवीचीच अधिक आहे, हे या ग्रंथातील वर्णनातून सहजपणे प्रकट होते. म्हणूनच नरेंद्राला 'महानुभावीय सारस्वतातील कवींद्र' अशी पदवी देऊन रा. चिं. ढेरे म्हणतात 'जीवनाचा व्यापक अनुभव डोळसपणे घेऊन त्याचा गाभा शोधू पाहणारी, जीवनाचे वेध घेऊ शकणारी दृष्टी जर नरेंद्रास लाभली असती, तर त्याने एकीकडे कालिंदासाशी पैजा मारल्या असत्या आणि दुसरीकडे भक्तिप्रवणतेमुळे ज्ञानेश्वराशी जवळीक साधली असती.' (रा. चि. ढेरे (संपा.) नरेंद्र विरचित रुक्मिणीस्वयंवर, प्रस्तावना, पृ. ४६)

### २) शिशुपालवध : इ.स. १३१३ (श. १२३५)

शिशुपालवध हा ग्रंथ भास्करभट्ट बोरीकराने लिहिला. याचे मूळ नाव भानुभट होते आणि तो एक वैदिक पंडित होता. बाईदेवव्यासांनंतर पंथाचा तिसरा आचार्य म्हणून त्याला बहुमान लाभलेला होता.

भटोबासाचे शिष्यत्व भास्कराने स्वीकारले तेव्हा त्यांनी त्याचे नाव कवीश्वर ठेवले, पण त्यासोबत तो वागीश्वरही होता. मठापुढे तो पुराण सांगायला बसला की, आसमंतांतले सगळे लोक हातातली कामे टाकून ते ऐकायला प्रवृत्त होत. इतकी त्याची वाणी रसोत्कट आणि चित्रवेधक होती. एकदा भागवत ऐकविल्यानंतर भास्कराने भटोबासांना विचारले, 'भटो ! आता श्रीगीताव्याख्यान म्हणो ?' त्यावर भटोबास म्हणाले, 'तू नको म्हणो: तू म्हणतासि: आन माझे अंत:करण अवघे चंद्रमय होते : आन बाह्याचा व्यापारू अवघा प्रतिबंधतो: ऐसा रसू वोडवतो:' असे वेधवंती वक्तृत्व भास्कराजवळ होते. चर्चेमध्ये तर विद्वानांनाही तो

निरूत्तर करून टाकत असे. भास्करभट हा संस्कृतप्रेमी शीघ्रकवी होता. त्यांच्या संस्कृतप्रेमाला शृंगारप्रेमाची जोड होती. भटोबासांनीही त्याला 'श्रृंगारीया कवी' हे बिरुद अर्पण केले.

'शिशुपालवध' लिहित असताना श्रीकृष्णभक्ती, संसारनिवृत्ती आणि विरक्ती यांचे संस्कार त्यांच्या मनावर असल्याचे जाणवते. पण या संस्कारांशी विसंगत अशी शृंगारासक्ती त्याच्या मनात कायम आहे, याचे भान त्याची शैली वाचकांना सतत देत राहते. या त्याच्या अवस्थेचे वर्णन अभ्यासक 'बाणा विरक्त जोगिणीचा, पण ओठांवर तरंगत असलेला आलापित शब्दसमूह मात्र शृंगारगीताचा' असे करतात. (डॉ. अ. ना. देशपांडे, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास) १०८७ ओव्यांच्या या काव्याच्या सुरूवातीला आपल्या काव्याचे स्वरूपवर्णन करताना तो म्हणतो,

**''म्हणौनि शिशुपालवधी कथा : जे भक्तिरसाची त्रिपथा**

**किं सोनवै कैवल्यपथा: पाजळिली**

**किं मुक्तिवनितेची दूंतिका: कि ज्ञानांजनाची साळांका**

**किंवा कैवल्य-मंदिराची पताका: झळाळीत दीसे**

**ना तरि शांतरसें सपिंता: सांसिनली ज्ञानलता**

**किंवा विवेकाची सौभाग्य-देवता: मूर्त जाली.'**

वरील काव्यपंक्तीवरून असे दिसते की, भक्ती आणि शांत या रसांचा आस्वाद घडविणारी काव्यसृष्टी कवीला निर्माण करावयाची आहे. पण प्रत्यक्ष काव्य करताना भक्ती अणि शांत रसांऐवजी शृंगाररसाचाच आविष्कार जास्त प्रभावी होत गेला. त्यामुळे १०८७ ओव्यांच्या या प्रबंधात युद्धवर्णनाला केवळ अडीचशे-पावणेदोनशे ओव्या खर्ची घातल्या आहेत. बाकी सर्व ओव्या श्रीकृष्ण-रुक्मिणी यांच्या प्रणयवर्णनासाठी वापरल्या आहेत.

कवीला उत्तान शृंगाराची ओढ इतकी आहे की, विविध दृश्यांची वर्णने मदनप्रवाहाने प्रभावित आहेत. उदा. 'वसंतऋतू इतका मातवळा झाला की जड वस्तूंच्या ठिकाणीसुद्धा कामकळा उपजली, झाडांना कामाचे पिसे लागले. श्रीकृष्णाचे सावळे रूप पाहून वैराग्याला कामकळेचे स्फुरण आले आणि पुरुषांना कमनीपणाचे डोहाळे उपजले. श्रीकृष्णाच्या उघड्या मूर्तीकडे पाहून ब्रह्मविद्याही डोळे मोडू लागली,' ही सगळी वर्णने पाहून डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, 'कवीला श्रीकृष्णाइतकाच मदनाचाही सहवास प्रिय आहे.' (डॉ. अ. ना. देशपांडे - प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास)

कवी आपल्या काव्याला 'त्रि पथा' म्हणतो, ते खरे आहे. कारण या ग्रंथात मुख्य प्रवाह आहे तो शृंगाराचा. त्यानंतर थोडा जोराचा प्रवाह तो वीररसाचा आणि आणखी एक लहान प्रवाह आहे तो भक्ती-विरक्तीचा आहे. श्रीकृष्णभक्तीच्या एका मोठ्या प्रवाहात या तिन्ही प्रवाहांचा यथाप्रमाण समावेश करण्याचा

कवीने प्रयत्न केला आहे. त्यांचे गुरू आचार्य बाईदेवव्यासांनी 'शिशुपालवधा'ला पंथाच्या दृष्टीने नापसंती दर्शविली. 'शिशुपालवधा'तून महानुभावीय तत्त्वदर्शनापेक्षाही पांडित्य, रसिकता आणि आत्यंतिक शृंगारासक्ती यांचेच दर्शन अधिक घडते. असे मत त्यांनी व्यक्त केले. पण यालाही एक कारण आहे, आणि ते म्हणजे संस्कृत कवींच्या लेखनशैलीचा प्रभाव भास्कराच्या मनावर खूप आहे आणि त्यामुळे आपल्या कवितेला सुशोभित करताना तो जयदेव, माघ आणि कालिदास यांसारख्या कवींच्या शैलीचे अनुकरण करतो, म्हणजे संस्कृत महाकाव्यातील काव्यगुणांच्या अनुकरणाची ईर्ष्या ही भास्करभटांच्या काव्यलेखनात प्रकर्षाने जाणवते. ही गोष्ट भास्करभट 'देखौनि महाकवींचा पंथु । मज होत असे मनोरथु । वर्णावया यादवनाथु। श्रीकृष्णराओ ।' या शब्दांत कबूलही करतो. संस्कृत महाकाव्याच्या प्रेमापोटीच भास्कराचे अत्युक्तिप्रेम हे अलंकार वगैरेच्या रूपाने त्याच्या कवितेत व्यक्त झाले आहे. ही अलंकार योजना रसपरिपोष करणारी आहे. उदा. श्रीकृष्ण निघून गेल्यानंतरचे द्वारकेचे वर्णन पाहाण्यासारखे आहे. 'निघालेया यदुपती । न शोभेचि द्वारावती । जैसी नुसधी शांति । विवेकेवीन ।' शिशुपालवधाची ही कथा त्रिपथा असली तरी तिच्यात हास्यरसाचा किंवा विनोदाचा एक धागा कवीने आणून जोडला आहे. उद्धवाने नारदाची चेष्टा करणे, श्रीकृष्णाने रुक्मिणीला माकड म्हटल्यानंतर तिने चिडून जाणे या दोन प्रसंगात विनोद दिसतो. महाकवींच्या अनुकरणाची ओढ कवीला आहे. त्यामुळे इथे अलंकार आणि श्रृंगार यांचा अतिरंजित सोस दिसतो. उदा. पांडवांच्या सैन्याचे वर्णन पहा.' सर्व चातुरंग चाले नीट: जैसी जयाची राजवाट: की घनचक्र उठावलें अलोट: काळरात्रिचे:' कधी कधी कवीची रंकवृत्ती जाणवत असली तरी त्याचे व्यक्तित्व आत्मश्रद्धेच्या दीप्तीने उजळून निघालेले आहे असेही दिसते. 'मज नाही मतीचा प्रकाशु। केवि वर्णु राणा परेशु ।' असे म्हणून तो विनयभाव प्रदर्शित करतो.

अतिरिक्त शृंगारासक्तीचा दोष या काव्यात दिसत असला तरी भास्करभटाचा साहित्यशास्त्रीय दृष्टीकोण म्हणून हा ग्रंथ महत्त्वाचा ठरतो. त्यासोबतच भास्कराचे आणखी एक वैशिष्ट्य या ठिकाणी जाणवते की, मराठी साहित्यात भक्तीला रसपदवी देणारा हा पहिला कवी होय.

**३) उद्धवगीता / एकादशस्कंध : इ.स. १३१४ (श. १२३६)**

भास्करभटाचे गुरू आचार्य बाईदेवव्यास यांनी 'निवृत्तीजोगा नव्हेचि।' असे उद्‌गार शिशुपालवधाविषयी काढल्यानंतर भास्करभट 'उद्धवगीता' लिहिण्यास प्रवृत्त झाले. 'उद्धवगीता' म्हणजे भागवताच्या एकादशस्कंधावरील मराठीतील पहिले टीकाभाष्य. म्हणून त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

श. १२३६ मध्ये लिहिलेल्या या ग्रंथात श्रीकृष्णाने उद्धवास केलेला उपदेश भास्करभटाने ८२७ ओव्यांत सांगितला आहे. श्रीकृष्णभक्ती ही याही काव्याची प्रेरक शक्ती आहे आणि श्रीकृष्ण व उद्धव यांचा संवाद असे या काव्याचे स्वरूप आहे.

**'मज नाही प्रेमाचा सौरस्सु । वरि अज्ञानाचा डोळेलांसु ।**
**तेया केवि आंतुडे मोसू । तेया निरुपणाचा ?'**

हा संवाद कवितारूपाने मांडण्यास आपण असमर्थ आहोत असे कवी म्हणतो. पण श्रीकृष्ण निरूपणातील केवळ एक अक्षरसुद्धा 'संसार-वागुर' चुकविण्याइतके प्रभावी असल्याने कवीने या निरुपणावर प्रबंध लिहिला आहे. आपल्या या रसिक प्रबंधाच्या आकर्षणशक्तीबद्दल मात्र कवीला आत्मविश्वास आहे. तो म्हणतो,

**'काइ भवरासि कमळीं । कांही मानिलें हातातलीं**

**किं कोकिळा रसाळी । नेसो दिघलें**

**ना तरि मेघमंडळे । काई चातक लांचाविले**

**किं चंद्रे मुळ पाठविले । चकोरांसि ?'**

या कवितालतेवर ब्रह्मविद्येची फुले फुलविलेली आहेत. ही फुले तोडावयास कोण बरे हात पुढे करणार नाही ? या साहित्याच्या देव्हाऱ्यात प्रत्यक्ष शांतरस अवतरविणारी माझी वाणी कोण बरे ऐकणार नाही ? माझी कविता कोकिळा, किन्नर आणि कलहंस यांना कमीपणा आणणारी आहे. तेव्हा माझे वेधवंती बोल ऐकायला श्रोते आपणहून येतील. त्यांना विनंती करावयाची काय जरूर आहे ? असे तो म्हणतो.

कवीच्या व्यक्तिमत्वाच्या या दोनपदरी स्वरूपाचा पडसाद 'शिशुपालवधा' प्रमाणे उद्धवगीतेतही उमटला आहे. कवीला फक्त ब्रह्मविद्या नको. त्यासोबत कामतत्त्वही पाहिजे. त्यामुळे शांतरसाचा अनुभव देण्यासाठी लिहिलेल्या या कथेत संधी मिळेल तेथे शृंगाररसाची लयलूट तो करतो. भागवतात ऋष्यशृंगाच्या कथेच्या अनुषंगाने फक्त एकच श्लोक आलेला आहे. पण भास्करभटाने मात्र ऋष्यशृंगाच्या या कथेत एका श्लोकासाठी सुमारे बावन्न ओव्या खर्ची टकल्या आहेत. साहजिकच शृंगारात उत्तानतेची झळक आलेली आहे. इतके करून पुन्हा भास्करभट वर म्हणतो की, हा प्रबंध मुनिजनांसाठी, वीतराग्यांसाठी लिहिलेला आहे. या कथेच्या निमित्ताने 'म्हणौनि प्रमदाचे गाणे वाणे: नाइकावे ध्यान परायणे' असा कवी उपदेश करतो. पण स्वत: मात्र उन्मादकारी वर्णनाचा पुरेपूर आस्वाद घेतो. यावरून या कवीची शृंगाराची चटक अनिवार्य आणि खोल रुजलेली आहे हे जाणवते. मुळात त्याचा पिंडा हा रसिक कवीचा पिंड आहे, हे जाणवते. या कवीला शृंगाराचे इतके अनिवार्य आकर्षण आहे की, श्रीकृष्ण व उद्धव यांच्या संवादाचे वर्णन करताना या संवादात भक्तीला, विरक्तीला प्राधान्य आहे हे माहित असूनही हा संवाद ब्रह्मविद्येचा यौवनमद आहे, असे तो म्हणतो.

भास्करभटांच्या मनाला संस्कृतातील काव्यलेखनादर्शाची विलक्षण ओढ आहे. उत्कट भावनाशीलता आणि चमत्कृति जनक कल्पकता ही काव्याची दोन मुख्य अंगे या त्यांच्या कवितेत बहराला आलेली दिसतात. रुक्मिणी आणि उद्धव यांना श्रीकृष्णाच्या वियोगाचे जे दु:ख झाले त्यात भावनेचा जिवंत आवेग प्रकट झाला आहे. त्यांचा कल्पनाविलास आकर्षक स्वरूपाचा असून अनेक उत्प्रेक्षा, उपमा, रुपक यांच्या रूपाने साकार झालेला आहे; पण त्यात प्रमाणबद्धतेचे भान कविला राहिलेले दिसत नाही.

उद्धव-नारद संवाद आणि श्रीकृष्ण-रुक्मिणी यांच्यातील संवादात थोडाफार विनोदही दिसतो. प्राचीन मराठी वाङ्मयाला विनोदाचे हे अंग नवीन होते. पण हास्यरसाच्या निर्मितीच्या नादात भास्करभटाकडून

औचित्य हानी बरीच झाली आहे.

हा ग्रंथ श्रीकृष्णाने भक्त चक्रवर्ती उद्धवाला वैराग्य, ज्ञान, भक्ती यांचे जे रहस्य सांगितले, जो मोक्षाविषयी उपदेश केला, त्याविषयी विवेचन करण्याकरिता लिहिला आहे. अशा विषयाच्या विवेचनात शांतरसाचे महत्त्व स्वाभाविकपणे आहे. पण तरीही कवीकडून तसा प्रयत्न कितपत झाला, याविषयी साशंकताच निर्माण होते.

पुरुरव्याच्या कथेच्या निमित्ताने कवी स्त्रीची भरपूर निर्भर्त्सना करतो. त्यादृष्टीने खालील काव्यपंक्ती पहा.

**''हे पापाची उत्तरबेंठ: नरकाची राजवट**

**मूक्तिचें वज्रकपाट : कामिनि हे**

**दुर्गंधिचिये ढाकशाले: अमेध्याचे पहिलें मोप पडिलें**

**तेया नाव जगीं ठेवींले: स्त्रि ऐसे''**

असे असले तरी शांतरसाचा संस्कार करण्याच्या दृष्टीने मात्र उद्धवगीता काहीशी फिकीच पडते. कारण कवीच्या मनाचा पिंडच तसा आहे. त्याचा मन:पिंड शृंगाररसाला अतिशय अनुकूल आणि शांतरसाला अतिशय मध्यम आहे. त्यामानाने करूणरसाचा आविष्कार थोडाबहुत चांगला झालेला दिसतो. आपल्याला श्रीकृष्णाचा वियोग होणार या जाणिवेने उद्धवाला जे दु:ख झाले ते कवीने परोपरीने आणि प्रभावी पद्धतीने वर्णन केले आहे. उद्धवाची श्रीकृष्णावरील जी मनापासूनची भक्ती आहे तिचे अधिष्ठान या दु:खवर्णनाला मिळाले आहे आणि त्यामुळे त्या वर्णनाला एक भावस्निग्धपणाचा स्पर्श लाभला आहे.

'उद्धवगीते'चा समारोप करताना भास्कर भट्ट लिहितो

**'पाहुनी ते ते प्रक्रण : बोलिलें भक्तिज्ञान लक्षण**

**ते पांतु विचक्षण : ग्रंथवेत्ते**

**एकादशेसीं सरिसी : भांजुनि साहित्य देसी**

**मियां आवरू केले जगासि : ज्ञानामृताचे'**

उद्धवगीतेतील भक्तिज्ञानलक्षण हे आपण भागवतातील एकादश स्कंधातील ते ते प्रकरण पाहून लिहिलेले आहे असे कवी म्हणतो, पण त्यात कितपत तथ्य आहे. याविषयी साशंकता निर्माण होते. विचारांचा आराखडा हा 'उद्धवगीता' व मूळचा एकादशस्कंध यात अर्थातच स्वाभाविकपणे एकच आहे आणि तसे असणे हे कवी सांगतो, त्याप्रमाणे (पाहुनी तें तें प्रकरण) सुसंगत आहे. दोन्हीतील कल्पनासादृश्यही दाखविता येण्यासारखे आहे. उदा. उद्धवगीतेतील

**'आपुलिए दाढे : आपुलिचि जीभ रगडे**

**तरि कोपें दगडगुंडे : घेयावे कवणावरि ?'**

या ओवीत एकादशस्कंधातल्या एका ओळीतला विचारच प्रतिध्वनित झालेला आहे. असे वरवर थोडेफार सादृश्य जाणवत असले तरी तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने मात्र 'उद्धवगीते'ची बैठक भागवताहून पुष्कळच वेगळी असल्याचे दिसून येते. भास्करभट्टांनी श्रीकृष्णोद्धव संवादाचा उपयोग श्रीचक्रधरांचे द्वैती तत्त्वज्ञान समजावून सांगण्याकरिता व अद्वैतमताचे खंडन करण्याकरिता केलेला आहे. पण गंमत अशी की, पंथाच्या अभिमानाने मोठ्या उत्साहाने हा कवी द्वैताचे गीत आळवीत असताना त्याच्या तोंडून अधूनमधून एकादा दुसरा अद्वैताचा सूर उमटलेला आहे. काही ओव्यांवर तर अद्वैताची झाक स्पष्टपणे दिसते.

**''किंबहुना चराचराचेनि मिसें: पुडतेंरैलें चीद्दप पढीयासे**

**म्हणौनि मी नव्हे ऐसे : काहीचि नाही**

**हे सकळै सांडुनि दृश्ये : जिवा होए ब्रह्मेंसी समरस्ये**

**हेचि मोक्षाचे रहस्ये : उद्धवदेवा**

**या आश्कतां उद्धवगीता: प्रबोधु उपजे श्रोतेंयांचिया चित्ता**

**परब्रह्मेसी होत सायूज्जता : म्हणे कवि भास्करू'**

द्वैतवाद हा या कवीच्या जीवनदृष्टीचा एक आवडता भाग असूनही त्यांची जीवनदृष्टी चालता चालता दोन तीन कटाक्ष अद्वैतपादाकडे टाकते हे खरे.

एकूण काय, तर सर्व सामग्री चांगली उपलब्ध असूनही शांतरसाच्या आविष्काराच्या दृष्टीने हा ग्रंथ तसा निष्प्रभच ठरला आहे. पण उद्धवाची श्रीकृष्णावरील अपरंपार भक्ती, तिचे अधिष्ठान यातील दुःखवर्णनाला मिळालेले असल्यामुळे त्या वर्णनात भावस्निग्ध अशी आर्तता आली आहे. याचे महत्त्वाचे कारण कवीच्या मनाला असलेली शृंगाराची आवड.

**४) वछाहरण : इ.स. १३१६ (श. १२३८)**

कालक्रमानुसार 'उद्धवगीते'नंतर वछाहरणाचा क्रमांक लागतो. या ग्रंथाचे कर्ते दामोदरपंडित हे होत. भास्करभट्ट आणि नरेंद्र यांच्यापेक्षा दामोदरपंडित हा मातब्बर होता. तो अतिशय पंथनिष्ठही होता. पण त्याहीपेक्षा त्याची पत्नी हिराइसा उर्फ हिरांबिका ही त्यांच्याहून अधिक पंथनिष्ठ होती. तिने नवऱ्याच्या आधीच पंथात प्रवेश केला, भिक्षा केली. पण संसाराच्या आसक्तीपोटी मुलाचे लग्न होईपर्यंत भिक्षा करू नये असे दामोदरपंडितास वाटत होते. पत्नीने त्यासाठी परवानगी दिली. पण मुलाचे लग्न झाल्यानंतरही पंडितांचे मन संसारातून मुक्त होईना. तेव्हां चिडून जाऊन हिराइसा नवऱ्याला म्हणाली, 'जिये चुलीची खीर खादली: तिये चुलीची काई राख खाल:' या शब्दांनी दामोदरपंडित खडबडून जागा झाला आणि त्याने

लवकरच नागदेवाचार्याजवळ भिक्षा केली.

दामोदरपंडित हा संस्कृततज्ज्ञ आणि संस्कृतप्रेमी होता. त्याचबरोबर तो धर्मचर्चाप्रेमीही होता. त्याच्याबरोबर केसोबास आणि राघवभट ही मित्रमंडळीही शास्त्रसंवादात नेहमी रस घेत. दामोदरपंडिताला गायनकलेचीही जातिवंत आवड होती. 'गीतु विखो' असा चक्रधरांचा पंथात आदेश होता. एकदा असेच दामोदरपंडित गीत आळवीत असताना नागदेवाचार्यांना आढळले. त्याचे मधुर गायन ऐकूण नागदेवाचार्यांनी 'पंडिता आजिलागौनि तुज गीत गावया अनुज्ञा गा:' असे म्हणून त्यास गाण्यास परवानगी दिली.

वछाहरणांची रचना दामोदरपंडितांने इ.स. १३१६ मध्ये केली. भागवताच्या दशमस्कंधातील १२, १३ व १४ या अध्यायात अधासूरवध व वत्साहरणाची कथा आली आहे. त्या कथेच्या आधारे दामोदरपंडिताने ५०३ ओव्यांचे हे काव्य लिहिले. महानुभाव पंथातील सर्वच ग्रंथनिर्मितीला श्रीकृष्णभक्तीचा परमोत्कर्ष हा प्रेरक ठरलेला दिसतो. अघासुरवध आणि वत्साहरण या भागवताच्या दशम स्कंधातील कथाप्रसंगांवर मराठीत लिहिलेले हे पहिले काव्य आहे.

वछाहरण किंवा वत्साहरण अशी दोन्ही नावे या प्रबंधकाव्याची रूढ आहेत. वत्साहरण म्हणजे वत्सांचे आहरण. आहरण म्हणणे आणणे. ब्रह्मदेवाने वत्सांचे हरण केले होते. ही कथा सांगणारा हा ग्रंथ आहे किंवा ही कथा या ग्रंथाचा विषय आहे. अधासुरहनन, ब्रह्मदेवाकडून गोपवासरांचे हरण आणि ब्रह्मदेवाकडून श्रीकृष्णाचे स्तवन–असा जो भागवतातल्या दशम स्कंधातल्या बाराव्या, तेराव्या व चौदाव्या अध्यायांतला कथेचा क्रम आहे, तोच दामोदरपंडिताच्या वत्साहरणांत सांभाळलेला आहे. फक्त भागवतातील कथा गतिमान आहे. 'वत्साहरणा'तील कथा थांबत थांबत पुढे सरकते.

महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान हे निवृत्तिवादाचे तत्त्वज्ञान आहे. श्रीचक्रधरांचे सूत्र असेच सांगते की, ''नीरसा: निरीशा: निराश्रया: होऊनि असावे' आणि ही निवृत्ती आत्मसात करण्याच्या बाबतीत नरेंद्र आणि भास्करभट्ट यांच्याही पेक्षा दामोदरपंडित हे अग्रणी आहेत. आपल्या प्रबंधरचनेतील कथेचे महत्त्व सांगताना तो म्हणतो, 'उपमा या अलंकारांचा आणि नागर बोलाचा उपयोग करून, ज्यात सर्व रसांचा परिपोष झालेला आहे, अशी प्राकृत लोकांना, सामान्य जनांना आवडणारी कथा लिहिणे आणि तीमधून लोकांचे रंजन करणे हा काव्यलेखनाचा एक मार्ग, तर श्रृंगारादी नऊ रसांची आसक्ती बाजूला सारून परब्रह्माचे म्हणजे श्रीकृष्णाचे चरित्र, गुणगान करणे हा काव्य लेखनाचा दुसरा मार्ग होय.' दामोदरपंडित या पद्धतीनेच आपले लेखन संतजनांकरिताच केले असल्याचे सांगतो. तो म्हणतो,

**'तैसे सकौतुक श्रीकृष्णचरित्र । वर्णिजैल, विचित्र**
**जेणें चमत्तकरैल चित्त । संतजनांचे ।'**

तो पुढे असेही सांगतो;

**पर कुलस्त्रियेची गुणसंपत्ति । भोगावि एकेचि पति**
**तैसी हरिकथा रसीं रति । भगतावाचौनि नाहि ।'**

त्यानी हरिकथारस निर्माण केला आहे आणि या हरिकथारसाचा आस्वाद घेण्याचा अधिकार फक्त भक्तांनाच आहे.

पंडिताची श्रीकृष्णभक्ती निस्सीम आहे, म्हणूनच त्यांचे म्हणणे असे आहे की, श्रीकृष्णकथा ही नित्यनूतन आहे. सगळ्यातून निवृत्ती आणि श्रीकृष्णाच्या ठायी परमप्रीती या गोष्टी ज्याच्याजवळ आहेत त्याला 'वत्साहरणां'तील श्रीकृष्णकथा श्रवणाने प्रसन्नतेचा, शांतीचा लाभ होणार आहे.

संपूर्ण ग्रंथलेखन करताना दामोदरपंडित आपल्या पारमार्थिक भूमिकेशी एकनिष्ठ राहतो आणि श्रीकृष्णचरित्र गाताना जराही शृंगाररसाला अवसर देत नाही. आपली परमार्थदृष्टी तो अखंडपणे जागृत ठेवतो. कशाचाही आश्रय न घेता तो जी अलंकार योजना करतो तिच्यामुळे त्याच्या परमार्थदृष्टीचे वैभव वाढलेले आहे.

शिवाय या ग्रंथातील काही वर्णनातून दामोदर पंडिताच्या भावगर्भ कल्पकतेचाही प्रत्यय येतो. तर काही वर्णने करताना कवीची प्रतिभा अतिशयोक्तीत रंगलेली दिसते.

उदा. **'एकेकि अवेवीचा बरवेपणिं । मदनाचि किजे ॐवालाणी ।**
**तेया श्रीमुखाचि सारीख वाटली । चंद्रासि कैंचि ।'**

या ग्रंथातील एका प्रसंगात सगळे गोपाळ हसत खेळत, टाळ्या वाजवीत बकासुराच्या प्रसंगाने दिलेली हिंमत बाळगून, अधासुराच्या तोंडात शिरले याचे भागवतात साधे, सरळ, निरलंकृत वर्णन आले आहे, हाच प्रसंग दामोदरपंडित समर्पक अलंकारयोजनेने विभूषित करतो आणि त्यातून आपल्या काव्य लेखनाशी सुसंगत असा परमार्थही साधतो. दामोदरपंडिताचा मनोहर प्रतिभाविलास या ग्रंथातील वृंदावनवर्णन, यमुनावर्णन व श्रीकृष्णमूर्तिवर्णन या वर्णनातून पाहावयास सापडतो. या वर्णनांना भागवताचा आधार नाही. यातील यमुनावर्णन तर भावपूर्ण आहे आणि ते सुंदर कल्पनांनी नटलेले आहे. आणखी एक वैशिष्ट्य असे की, कवीच्या काव्यदृष्टीपेक्षा त्याची परमार्थदृष्टी जास्त प्रभावी आहे. काव्यनंदापेक्षाही ब्रह्मानंद त्याला जास्त प्रिय आहे. आणि शृंगारादी रसांपेक्षा त्याला शांताधिष्ठीत भक्तिरसाची जास्त गोडी आहे.

पंडितांची श्रीकृष्णभक्ती निस्सीम आहे तशी अपरंपारही आहे. त्यांच्या 'वत्साहरणां'च्या समग्र कथा प्रवाहात सर्वत्र या भक्तिभावाचा मंद आणि मंजूळ ध्वनी उमटलेला आहे. त्यांच्या मते श्रीकृष्णकथा ही 'नित्यनौतन' आहे. सगळ्यातून निवृत्ती आणि श्रीकृष्णाच्या ठायी परमप्रीती या गोष्टी ज्याच्याजवळ आहेत, त्याला वत्साहरणा'तील श्रीकृष्णकथा श्रवणाने प्रसन्नतेचा, शांतीचा लाभ होणार आहे.

**'जया सकलापासौनि निवृत्ती । श्रीकृष्णि परमप्रिती**
**तेचि जन निवति । एणें चरित्रामृतेसी ।'**

ईश्वराचे अवतार अनंत आहेत. पण त्यात सहज लीलेने मुक्ती देणारा एकटा श्रीकृष्णच आहे.

**'जैसे तरंग सागरा । तैसे अनंत अवतार ईश्वरा**
**परि लिला मुचिजे संसारा । ऐसा एकु श्रीकृष्णचि होए ।'**

म्हणून तर कवी कळकळीने सांगतो की,

**सांडा सांडा अन्य भजनें । काई नाईका वेद पुराणें ।**

**मुचिजे ना आने कव्हणें । एकु श्रीकृष्ण सेवा ’**

ज्यांना भक्तिरसात गोडी नसेल आणि ज्यांना शृंगाराची अभिरूची असेल त्यांचीही अपेक्षा ‘सौंदराचा सौंदरू’ असलेल्या श्रीकृष्णाच्या चरित्रश्रवणाने पूर्ण होण्यासारखी आहे.

या ग्रंथातून प्रवृत्ति-निवृत्तीच्या प्रश्नासंबंधी दामोदर पंडिताने केलेले मार्गदर्शन निस्संदिग्ध आहे. ते सांगतात, द्वैता-अद्वैतापेक्षा प्रवृत्ति-निवृत्तीचा प्रश्न अधिक महत्त्वाचा आणि अधिक जिव्हाळ्याचा आहे. मुक्ती मिळवावयाची असेल तर ती निवृत्तीतूनच शक्य आहे. कर्मयोगाचा किंवा प्रवृत्तीचा त्या कामी काहीही उपयोग नाही. असा या प्रश्नासंबंधी अत्यंत योग्य निर्णय पंडितांनी घेतला आहे. ते पुढे म्हणतात की, ‘जे कर्मासक्त आहेत. त्यांना श्रीकृष्णदर्शन’ असंभव आहे. लोकांना ‘प्रवृत्तीचे-मायेचे-देवताराधनेचे स्वाभाविक प्रेम आहे. त्यात पुन्हा तेथे फलप्राप्तीचे आकर्षण आहे. त्यामुळे लोकांची या मार्गावरची आसक्ती दुप्पट वाढली आहे. आता ती कसची सुटणार ?

**‘साहाजेचिं आवडे प्रकृति । वरि आईकिली फलांची श्रृति**

**तेणें दुणावलि प्रिति । ते आतां जिवे न सांडवे ।’**

प्रवृत्तिमार्गी लोकांच्या प्रवृत्तीची ओळख पंडित करून देतात आणि म्हणतात,

**‘जे प्रव्रत्तले कर्ममार्गी । नवसींए सुति बंधनालागि ।**

**ते म्हणति मासिलें वीतरागी । सांडिले प्रवृत्तितें ।’**

प्रवृतिमार्गी लोक निवृत्तिमार्गाचा धर्मनिष्ठ म्हणून उपहास करतात, वेश्यांनी कुलवती स्त्रियांचा उपहास करावा, तशातला हा प्रकार आहे. काही लोक प्रवृत्तिमार्गाचा उपदेश करतात. या मार्गाने आम्ही तरलो असा प्रचार करतात आणि आपसात आपले आपल्यावर दिवे ओवाळून घेतात आणि ब्रह्मविंदाची निंदा करतात, असे सांगून पंडित पुढे म्हणतात, ‘अहो चिखलाने भरलेली वस्तू चिखलाचाच उपयोग करून स्वच्छ करता येईल काय ? ‘असा कर्ममार्गाचा, प्रवृत्तीचा निषेध पंडित करतात आणि निवृत्तीचा पुरस्कार करतात. हा विचार संतत्वाच्या भूमिकेशी नाते सांगतो. संतपणा हा पेटलेला दिवा आहे आणि निवृत्ती ही या दिव्यातली परममंगल अशी ज्योती आहे. प्रवृत्तीच्या पाशांनी बद्ध झालेल्या या जगताला संतत्व हे सदैव, सर्वत्र निवृत्तीच्या अमृतत्वाचा संदेश देत आलेले आहे. पंडिताच्या या ग्रंथात याच निवृत्तीचे निरूपण आहे, म्हणूनच दामोदरपंडित हे महाराष्ट्रातल्या संतकवींच्या परंपरेतील कवी ठरतात.

दामोदरपंडित हे परमार्गाचे अनुयायी होते आणि परमार्ग हा द्वैतीमताचा. त्यामुळे पंडितांच्या वत्साहरणातही द्वैतवादाचे समर्थन आढळते आणि ते स्वाभाविक आहे.

तेव्हा विद्यार्थीमित्रांनो, एक प्रबंधकवी म्हणून दामोदर पंडिताचे नरेंद्र आणि भास्कर यांच्यापेक्षा

असलेले वेगळेपण असे चटकन जाणवते.

काही संशोधकांच्या मते 'वत्साहरण' हे काव्य दामोदर पंडिताचे नसून ते केशिराजबासाचे आहे. पण हा ग्रंथ केसोबासाचा असता तर 'मूर्तिप्रकाश' व 'वत्साहरण' यांच्या शैलीत एकरूपता दिसली असती आणि दुसरी गोष्ट अशी की, 'सह्याद्रिवर्णन' हा ग्रंथ रवळोव्यासांनी लिहिलेला असला तरी या ग्रंथात त्याने त्याला गुरुस्थानी असलेल्या हिरांबिकेचे नाव घातलेले आहे. तेव्हा यापासून असा बोध घेता येतो की, 'वत्साहरणा'त केशिराजाचे नाव आलेले असले तरी हा ग्रंथ दामोदरपंडितांनीच रचलेला आहे.

**५) ज्ञानप्रबोधन : इ.स. १२३१ (शक १२५३)**

पंडित विश्वनाथ बाळापूरकर यांनी लिहिलेला १२०४ ओव्यांचा 'ज्ञानप्रबोध' हा ग्रंथही वैशिष्ट्यपूर्ण आहे. पंडित विश्वनाथ हे आश्वलायन ब्राह्मण. लाड कामराज नावाच्या धनाठ्य व्यापाऱ्याचे ते कोषाध्यक्ष होते. काही कारणांनी त्यांचे कामराजाशी बिनसले आणि कामराजाने त्यांना बंदीत टाकले. कमलाकर नावाचे सत्पुरुष की ज्यांचा अनुग्रह त्यांच्यावर होता, त्यांनी विश्वनाथांना सोडविले. सुटका होताच विश्वनाथांनी गृहस्थाश्रम व संसार दोन्हीचा त्याग केला आणि संन्यासदीक्षा घेतली. शिवव्यासाजवळून मंत्रोपदेश घेतला, तरी विश्वनाथ पहिल्या गुरुविषयी कृतज्ञ राहिले. आपल्या दोन्ही गुरुंना नमन करताना ते म्हणतात,

**'तैसे मुनी कमळाकरू । लाऊनी गेला बोधांकुरू ।**

**तो पाळिला शिवराजें उपचारू । करोनिया ।'**

ज्ञानप्रबोध हे गीतेचे पाच श्लोकांवरचे भाष्य आहे. 'ज्ञानप्रबोधाची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. संपूर्ण प्रबंध हा वैराग्याची व भक्तीची शिकवण देणारा एक सलग ग्रंथ आहे. ग्रंथारंभी भवमोचक शक्तींना व व्यक्तींना लेखक वंदन करतो. नंतर गीतेतील उपरोक्त पाच श्लोकांचे स्पष्टीकरण आणि मग त्या स्पष्टीकरणाचा धागा सांभाळून त्यात वैराग्यपर, भक्तिपर अशा स्वतंत्र विचारांचे व आपल्या भाषेत विरक्तभक्तीचे विस्तृत विवरण असे स्थूलमानाने या 'ज्ञानप्रबोधा'चे स्वरूप आहे. मोक्ष, मोक्ष प्राप्तीला उपकारक असे ज्ञान आणि त्या ज्ञानाची लक्षणे हा 'ज्ञानप्रबोधा'तला प्रमुख प्रतिपाद्य विषय आहे. या बाबतीत आपल्या भाष्याचे स्वरूप सांगताना 'यालागी करोनि गीतेची भिंती । ज्ञानचित्र पाडिले ।' असे तो म्हणतो.

विरक्ती आणि ईश्वरभक्ती यांचे रहस्य सांगणारा आणि त्यांची मोक्षदृष्टीने महती पटवून देणारा 'ज्ञानप्रबोध' हा एक तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ आहे. या आपल्या ग्रंथाला तो 'परमार्गी ज्ञानाची पव्हे', 'भक्तिची जन्मपत्रिका' 'ज्ञानप्रबोधाचा आरिसा' असे संबोधतो. शृंगारादी रसांचे पोषण करणाऱ्या लौकिक काव्यातील गोडी विश्वनाथांना मान्य आहे. पण त्यांच्या मते अमृतासारखे अंगचेच अमरत्व, अंगचेच मोक्षदायित्व फक्त भक्तिरसाच्या ठिकाणी आहे. आपण ही भक्तीची गोड मंगलदायक कथा 'साहित्याचे बीक' चढवून सांगितलेली असल्यामुळे ती पवित्र आणि सुरस झाली आहे, असा कवीचा आत्मविश्वास आहे. आपला हा प्रबंध 'साहित्यरसा'त घोळून तो रसाळ बनविण्याचा त्याचा प्रयत्न आहे.

**'सिद्धांन्त कर्पूरवासें । घोळून साहित्य रसें ।**

**भावविडा प्रबंधमिषे । स्वामी देईन ।**

**लटके वाग्जाळ । न बोले पाल्हाळ ।**

**बोल भावगर्भ रसाळ । तैसे बोलैन ।**

या ग्रंथात परमेश्वरावाचून ज्याला काही आवडत नाही अशा विरक्त भक्ताच्या वर्णनाच्या निमित्ताने आलेल्या काही ओव्या अवीट गोडीच्या आहेत.

**'जो नित्यसुखाचा सेवटुं । सदा सेविता सु-रस अ-विटु ।**

**जियाचिया सौंदर्या नाही ओहटु । वयसा लोटलिया ।**

**तयाचें लावण्य नीच नवे । रूप पातां चढतें बरवें ।**

**तेथचे सौभाग्य कवणा वर्णवे । सृष्टी निरूपम ।।'**

या ग्रंथात विश्वनाथांनी ज्ञानलक्षणाचे विवरण केले आहे. आणि अविद्येचे खंडेनही केले आहे. त्यावर ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव यांचा बराच प्रभाव जाणवतो. पण याचा अर्थ या ग्रंथात स्वतंत्र विचार आणि स्वतंत्र अनुभव यांची उर्मी नाही असे म्हटले तर ते योग्य होणार नाही. या संतकवीच्या ठिकाणी वैराग्य आणि भक्तीची प्रेरणा जिवंत आहे. त्यामुळेच तर यातील विवेचनाचा कल हा वैराग्य आणि भक्ती यांच्या कलाने अधिक आहे, असे जाणवले. शिवाय हे विवेचन अतिशय उत्साहपूर्ण व वक्तृत्वपूर्ण असे झाले आहे.

विरक्तीची ज्यांना प्रेरणा झालेली आहे, ईश्वराच्या वियोगाचे ज्यांना दुःख झालेले आहे अशा मुमुक्षूंच्या मनाची पकड होईल असे या प्रबंधाचे स्वरूप आहे.

**'निर्वाहापुरता योगक्षेम । करी निर्हिंसक उद्यम**

**आगत्य गृहस्थाश्रम । चाळी ऐसा ।।**

**मीन जाळां सापडंला । वागरू मृग पडिला**

**गृह बंदीशाळे घातला । अडनी असे**

**म्हणे यथोनि कैं सुटेन । मग योग-सौख्य पावेन ।**

**गृहमिषें बंदिस्थान । मांडले हे।।'**

अशी ज्यांच्या मनाची संसारविन्मुख व ईश्वरोत्सुक अवस्था झालेली आहे, त्यांच्याच जीवनपंथ ज्ञानप्रबोधातल्या ज्ञानप्रकाशाने उजळून निघणार आहे.

भक्तीप्रमाणे विश्वनाथांची द्वैतनिष्ठाही महत्त्वाची आहे. अद्वैताचे खंडन करून त्यांनी आपल्या द्वैतमताची प्रस्थापना केली आहे. खंडन मार्मिक आहे. अद्वैतवादाचे खंडन करताना त्यांनी त्यावर काही मर्मभेदक प्रहारही केले आहेत. विश्वनाथांनी दै्वतमताचे समर्थन केले असले तरी त्यातील काही थोड्या ओव्यांतून अद्वैताचा

सूर अगदी अस्पष्टपणे उमटलेला आहे. त्यादृष्टीने पुढील ओव्या पाहाण्यासारख्या आहेत –

**'तरी आत्मवंते भूते । ऐसें घेतलें जयाचेनि चित्ते ।**

**हेचि वर्ग नरुतें। अहिंसेचे ।।**

**असो हे भूतजात खेदें । जयाचा आत्मा भेदें ।**

**ज्ञानसपरिवारी नांदे । तयांचा ठायी ।।'**

ल. रा. पांगारकर यांनाही 'ज्ञानप्रबोधा'तल्या अद्वैत विचारांच्या पाऊल खुणा जाणवल्या. म्हणूनच ते असे म्हणतात की, 'ज्ञानेश्वरांबरोबर विश्वनाथकवी अविद्याखंडना पुरते चिदाकारात वर उडायला गेले. पण पुढे त्यांना जणु घेरी येऊन ते खाली द्वैताच्या खोड्यात पडले.

प्रबंधाच्या शेवटी कवीने त्याला स्वत:ला जे ईश्वरवियोगाचे दु:ख झाले, ईश्वराजवळ त्याने करूणेची जी याचना केली, त्यांचे वर्णन केले आहे. या वर्णनात आत्माविष्काराचा जिव्हाळा आहे, तो वाचकांच्या मनाला चटका लावतो.

आत्मनिवेदनामुळे या ग्रंथात जो मूळ शांतरसाचा प्रवाह आहे, त्यास करूणरसाचा प्रवाह मिसळून गेला आहे. त्यामुळे शांत, करूण आणि भक्ती अशा तीनही रसांचा एकत्रित आविष्कार इथे झालेला दिसतो. तसेच विश्वनाथ पंडित या ग्रंथात अद्वैतमताचे खंडन करून द्वैतमताचे समर्थन करतात.

**६) सह्याद्रिवर्णन : इ.स. १३३३ (शक १२५५)**

साती ग्रंथांत रवळोव्यासाचा हा ग्रंथ सहाव्या अनुक्रमाला येतो. रवळो व्यास उर्फ राघोपाध्याय पाथरीकर असेही त्यांचे नाव आहे. कारण हे मूळचे पाथरीचे. हिराइसा उर्फ हिरांबिका ही त्याची दीक्षागुरु होय. त्यामुळेच तो स्वत:चा उल्लेख 'हिरांबिकेचा सुतु : रायु येणे नामे विख्यातु' असा करतो.

५१७ ओव्यांच्या या काव्यग्रंथातील रवळोव्यासाची भूमिका कवीपेक्षाही भक्तीची किंवा उपासकाची अधिक आहे. श्रीचक्रपाणीपासून ते हिरांबिकेपर्यंतच्या गुरुपरंपरेला तो नमन करतो. म्हणतो –

**'म्हणे तुमचेनि प्रसादे पवित्रे । बोलैन श्रीदत्ताची चरित्रे ।**

**जयाचेनि श्रवणमात्रे । जीव चोखाळती ।'**

सह्याद्रीवर्णन म्हणजे सह्याद्रीच्या परिसरात वावरणाऱ्या श्रीदत्तात्रेयांच्या चरित्राचे वर्णन. याच्या श्रवणाने श्रोत्यांची वाणी मंगलरूप व्हावी, ही कवीची अपेक्षा आहे. पण हे वर्णनही मोठ्या भावनात्मकतेने तो सजवितो.

**'कनकगिरिचा गाभा सोलुनि । वरि सूर्यप्रभा संचरौनि ।**

**वोप सारिल्या घोटाळुनि । तऱ्हीं उपमा नव्हे।'**

अर्थात या वर्णनात बरेचसे नरेंद्र-भास्कर आदी कवींचे अनुकरण दिसते.

सह्याद्रिवर्णनाचा मुख्य हेतू वाचक आणि श्रोते यांच्या मनावर ईश्वरभक्तीचे आणि इंद्रियनिग्रहाचे संस्कार करणे हाच आहे.

**'दृष्टीरुपे चित्रही न पाहावे । ऐसी तिये लावविली सवे**
**निर्विकार स्वभावे । नियमनिली चांगी ।**
**रसना संयमाचिये बांदौडी । घालौनि रसादि आहार मोडी ।**
**निग्रहें लवणीही पाडी । तोंडी धुळि तियेचां ।**
**वोखटे तीरस्कार विरोध । आन कश्मळ नाना दुर्गंध ।**
**पावतां नाक न मुरडी हा निर्बंध । घ्राणासि केला ।**
**वाचा मारांक कैसी । जे शब्दवेधीपणें उसासी ।**
**जियेचिया घायासी । वना पादाचि नाही ।'**

कवीच्या या कल्पनाविलासात आणि भावनात्मकतेत साधारणपणा असला तरी हे काव्य प्रखर पंथनिष्ठेने भरून राहिले आहे, हे खरे.

इंद्रियनिग्रहनातून साधावयाच्या परमार्थिकतेला या ग्रंथात महत्त्व आहे. प्रसंगचित्रण आणि व्यक्तिदर्शन या दृष्टीने हे काव्य एकसंध नाही. पण संपूर्ण काव्य परमार्गावरील श्रद्धेच्या सूत्रात गुंफलेले असल्यामुळे त्याला एक व्यापक अधिष्ठान प्राप्त झाले आहे. महत्त्वाचे म्हणजे साती ग्रंथातले हे पहिलेच पूर्णपणे स्वतंत्र असलेले काव्य होय. आणि श्रीदत्तात्रेयांचे स्तोत्र असेच या ग्रंथाचे स्वरूप आहे.

'सह्याद्रिवर्णना'तली दत्तभक्ती ही सरस्वती गंगाधराच्या 'गुरुचरित्रा'तील दत्तभक्तीहून प्राचीन आहे. परमार्गातले दत्ताचे स्वरूप थोडे भिन्न आहे. रवळो व्यासांनी वर्णिलेला दत्त हा एकमुखी व दोन हातांचा आहे. दत्ताला परमार्गात अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. कारण तो 'या मार्गासी आदिकारण' असे, म्हणूनच 'श्रीदत्तात्रेय चरित्र' हे नाव या काव्याला अधिक समर्पक होईल असे 'महाराष्ट्र सारस्वत'चे पुरवणीकार डॉ. शं. गो. तुळपुळे म्हणतात. (महाराष्ट्र - सारस्वत - वि. ल. भावे.)

रवळोव्यासांनी आपल्या काव्याला 'सह्याद्रिवर्णन' असे नाव दिले आहे. ते या ग्रंथाला कितपत लागू पडते याविषयी थोडी साशंकता निर्माण होते. श्रीदत्तात्रेयाचे चरित्र असे आपण म्हणू. पण ते तरी या ग्रंथात किती आले आहे. याचा विचार करू जाता असे लक्षात येते की, श्रीदत्तांनी अलर्क, कार्तवीर्य व परशुराम यांच्यावर कृपा केल्याचा फक्त उल्लेख आला आहे. श्रीदत्तात्रेयांच्या निमित्ताने सह्याद्री पर्वताचे थोडेसे वर्णन आलेले आहे. पण दत्तचरित्र असे कुठे दिसत नाही. ५१७ ओव्यांच्या काव्यात दत्ताशी संबंधित अशा ओव्या फारच कमी म्हणजे अंदाजे पावणेदोनशे निघतील. यात गोविंदप्रभूला मिळालेले शक्तिदान आहे, श्रीचक्रधरचरित्र आहे. कलियुगवर्णन आहे, गुरुद्रोहाचे भयंकर परिणाम दिलेले आहेत. श्रीचक्रधर निर्याणानंतर भक्तांची

झालेली विरहावस्था दिलेली आहे. डॉ. अ. ना. देशपांडे यांच्या मते या गोष्टींनी दत्तचरित्राची सांगता होत नाही. त्यामुळे हा सर्व आशय लक्षात घेता या ग्रंथाला 'सह्याद्रिवर्णन' हे नाव अपुरे वाटते.

रवळोव्यास हे श्रीचक्रधरांचे भक्त आहेत. श्रीचक्रधरांच्या परमार्गाचे उपासक आहेत. तरीही रवळोव्यासांनी रेखाटलेले दत्ताचे चित्र आणि श्रीचक्रधरांनी दिग्दर्शित केलेले दत्ताचे चित्र यात थोडा फरक आहे. यासाठी एक उदाहरण पाहू. 'श्रीचक्रधरांचे दत्त हे अलर्काला मातंग वेषात भेटले आहेत. रवळोव्यासांनी मातंग वेशाचा उल्लेख टाळलेला आहे. एवढेच नव्हे तर वेदांबद्दल आणि वर्णाश्रमधर्माबद्दल रवळोव्यासांनी आदर सूचित केलेला आहे. दत्तांना वर्णादी आश्रमांचे नाव नसले तरी त्यांच्या गळ्यात रवळोव्यासांनी जानवे असल्याचे वर्णन केले आहे. कलियुगात वर्णाश्रमधर्म लोपल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली आहे.

**७) ऋद्धिपूरवर्णन : इ.स. १३६३ (शक १२८५)**

'साती ग्रंथा'तला हा कालानुक्रमे शेवटचा सातवा ग्रंथ. परंतु गुणानुक्रमे मात्र सहाही ग्रंथांपेक्षा वेगळा आहे. पंडित नारायण व्यास बहाळिये यांनी हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ म्हणजे नारोव्यासाची स्वतंत्र निर्मिती म्हटली पाहिजे. या ग्रंथाची ओवीसंख्या ६४१ इतकी आहे. सुरूवातीला श्रीनागांबिका, श्रीनागदेवाचार्य यांचे महत्त्व स्पष्ट करून कवीने त्यांना वंदन केले आहे. तसेच परमेश्वराच्या मार्गालाही तो वंदन करतो.

आपल्या पूर्वायुष्यात आपल्या हातून घडलेल्या हिंसेचा आणि काही अविवेकी कृत्यांचा किंवा पारमार्थिक दृष्टीने आपल्या अंगी असलेल्या अक्षमतेचा त्यांनी ग्रंथाच्या सुरुवातीच्या भागात उल्लेख केला आहे. परमार्गासारख्या निरुपम मार्गाने जाण्यास आपण अपात्र आहोत, अशी ते मनाची प्रांजळ कबुली देतात.

नारोव्यासाचा हा ग्रंथ दुसऱ्या कोणत्याही ग्रंथाचा आधार नसलेला ग्रंथ आहे. त्याच्या स्वतंत्र प्रतिभेतून तो जन्मास आला आहे. या ग्रंथात वस्तुनिष्ठा आणि आत्मनिष्ठा यांचा संगम सहजगत्या साधला गेलेला आहे. ऋद्धिपूरवर्णन हा ग्रंथ सुरूवातीपासून ते शेवटपर्यंत आत्मनिवेदनाने पुरेपूर ओथंबून गेला आहे.

ऋद्धिपूराचे दर्शन झाल्याबरोबरच कवीच्या मनाची जी अवस्था झाली ती अतिशय आनंदी आणि उत्कट आहे. ती वर्णन करताना तो म्हणतो,

**'जे आर्तासि कारणे : संसारश्रमाचे विसंवणे :**
**ते श्रीऋद्धिपुर देखिलें तेणें : दुरौनिया ।।**
**भोळिकारां धांडोलितां राने : जेवि मोळिए जोडले बावनें**
**नातरि दुर्भक्षी पक्वाने : रांकू लाहे ।।**
**दारिद्री आडुंखुळे रिद्धी : अनाचार्याने वरीति सिद्धी :**
**नि:कंचना उपाधि: टाकौनि ।।**

**रोगिया अमृतपानु : लाहे तान्हैला जीवनु :**
**स्वामी जालेया प्रसनु : जैसें सेवकां होए**
**सासुरवासें शिणली : तिये भेटे जेवि माऊली :**
**असो हे तैसी परि जाली : श्री ऋद्धिपुर देखिलेआं ।**

अशी उत्कटता नागर प्रवेशाचे वर्णन करताना संत, महिमा गाताना, राजमठ, आरोगणास्थान इ. वर वर्णनाचा साज चढविताना आणि शेवटी श्रीप्रभूमूर्तिवर्णन करुन ग्रंथाचा समारोप करताना तशीच जाणवत राहते.

नारायण पंडितांनी ज्या परमार्गाची, ज्या महात्मा पंथाची दीक्षा घेतली, त्याचे सर्वश्रेष्ठ वैशिष्ट्य संसाराची यातायात दूर करणे हेच आहे. या परमार्गाचा महिमा नारायण पंडिताने अचूक शब्दांत आणि यथार्थरित्या गायिलेला आहे.

**'आता अहिंसे नि:संगु । निवृत्ति भक्तियोगु**
**तो नमस्कारु परमार्गु । दातारांचा ।।'**

नारायण पंडितांनी या ग्रंथात सर्वत्र वर्णनविलासाला आत्मप्रत्ययाची बैठक दिली आहे.

ऋद्धिपूर हे महानुभवाचार्य पवित्र धर्मक्षेत्र आणि तीर्थक्षेत्र होय. पंथाची स्थापना आणि श्रीगोविंदप्रभूंचे वास्तव्य या दोन्ही गोष्टी इथेच घडल्याने पंथांच्या दृष्टीने ही पवित्र भूमी मानली जाते. साहजिकच ऋद्धिपुराविषयीचा अपरंपार भक्तिभाव हा या ग्रंथाचा महत्त्वाचा आस्थाविषय आहे. वस्तुनिष्ठा आणि आत्मनिष्ठा या दोन्ही गोष्टींचा सुंदर समन्वय हे या ग्रंथाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. हा ग्रंथ म्हणजे एक आत्मनिवेदन आहे.

नारायणव्यास हे मूळचे खानदेशातील बाहाळिये या गावचे राहणारे. आपल्या पूर्वायुष्यीील आपल्या हातून घडलेल्या काही हिंसक आणि अविवेकी कृत्यांचा त्यांना पश्चाताप झाला. म्हणून त्यांनी परमार्गाची दीक्षा घेऊन संन्यासाश्रम स्वीकारला, त्यानंतर ते ऋद्धिपूर येथे येऊन राहिले. तिथे त्यांचा विश्वनाथ पंडित यांच्याशी संबंध आला. त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन त्यांनी हा काव्यग्रंथ रचला.

अलंकारांनी परिपूर्ण अशी सरस रचना करण्याचे सामर्थ्य स्वत:जवळ असूनही नारायण पंडितांची वृत्ती विनयशील आहे आणि आध्यात्मिक सामर्थ्याच्या बाबतीतही त्यांची भूमिका अतिशय नम्र आहे. 'ईश्वरी ज्ञान हे चांदणे. त्याचा आस्वाद घ्यावयाला जे चकोरपण लागते ते आपल्या अंगी कोठे आहे ? आपण केवळ दगड, त्या चांदण्याने आम्ही केवळ निवणार. त्याचा वेध आम्हांला थोडाच लाभणार ?' अशी लीनता दाखवीत आणि समर्पक निसर्ग-उपमाने वापरीत शेवटी या ग्रंथाची फलश्रुती सांगताना ते म्हणतात की, 'हा ग्रंथ सुधाकरासारखा म्हणजे अमृतत्व देणारा आहे.'

वर्णनविलासाला आत्मप्रत्ययाची बैठक आणि वर्णननिरपेक्ष आत्मनिवेदनाला हृदयस्पर्शी जिव्हाळ्याचा स्पर्श ही या ग्रंथाची वैशिष्ट्ये ठळकपणे जाणवतात.

संपूर्ण प्रबंध अतिशय भावपूर्ण आणि रसमय उतरलेला आहे.

खरे तर नारायण पंडित अतिशय सरस आणि सालंकृत काव्यरचना करण्यात कुशल असणारा कवी, पण त्याची वृत्ती मात्र अतिशय विनयशील आहे. पुढील ओवीतून याची प्रचीती येईल.

**ऐसा जात्यंधु अधस्तुः वरि भवरोगी ग्रस्तु,**

**तया मज तो वाङ्मला पथु : केवि टाके'**

नरेंद्र-भास्कराप्रमाणे रस आणि त्यापासून साधलेले शब्द यांचा नारायण पंडितांनी आपल्या प्रबंधात मेळ घातलेला नसला तरीही त्यांचा हा ग्रंथ भावपूर्ण आणि रसमय उतरला आहे. कारण त्यांचे अंत:करण रसभरित आहे आणि त्यात उत्कट भाव आहे.

### २.२.७ 'साती ग्रंथां' चे विशेष

आपल्या देशात वैदिक अणि अवैदिक अशा दोन विचारधारा आहेत. त्यापैकी अवैदिक विचारधारेचे पोषण महानुभाव पंथाने केले. अवैदिक म्हणजे मुख्यत: कर्मकांडाला आणि प्रवृत्तिवादाला मोक्षप्राप्तीच्या दृष्टीने मुळीच महत्त्व न देणारी परंपरा किंवा विचारधारणा.

परमार्ग म्हणजे संसारातून पूर्णपणे निवृत्त होऊन सर्वभावे ईश्वराला शरण जा, ईश्वराला सारे जीवन अर्पण करा, असे लोकांना कळवळून सांगणारा पंथ. हे विरक्तीचे तत्त्वज्ञान मराठी भाषेतून भरघोसपणे आणि उत्कटपणे या साती ग्रंथांतून व्यक्त झाले आहे. हे श्रेय चक्रधरस्वामींचे आहे.

कोणताही नवा विचार मांडायचा, तर कोणत्या ना कोणत्या (उपनिषदे, ब्रह्मसूत्रे व गीता) दर्शनाआधारे मांडायचा, ही या देशातील रूढ पद्धती, पण चक्रधर स्वामींनी हा शिरस्ता मोडला अणि त्यांना जे सांगायचे होते ते स्वतंत्रपणे सांगितले. या त्यांच्या स्वतंत्र काव्यातून त्यांचा आत्मविश्वासच व्यक्त होतो.

पंचकृष्णांविषयीची निस्सीम भक्ती ही या साती ग्रंथांच्या निर्मितीमागची प्रमुख प्रेरणा शक्ती आहे. साती ग्रंथांच्या ग्रंथकारांपैकी नरेंद्र व भास्कर यांची व्यक्तित्वे ही कविताप्रधान आहेत. दामोदरपंडितांपासून पुढचे जे कवी आहेत त्यांच्या ठिकाणी कवित्व वृत्तीसोबत संतत्वाची स्निग्ध वृत्तीही दिसते.

साती ग्रंथांची वर्णनशैलीही एक सारखीच वाटते. अलंकारप्रियता आणि अत्युक्तिप्रियता प्रत्येक कवीजवळ आहे. त्यातील उपमा आणि उपमाने यांचा जर सूक्ष्म दृष्टीने अभ्यास केला तर या सर्व काव्यलेखनाचा जो एक साचा आहे त्याची स्वरूपनिश्चिती करण्यास या काव्यग्रंथाची मदत होऊ शकते.

साती ग्रंथांपैकी रुक्मिणीस्वयंवर, शिशुपालवध, उद्धवगीता व वत्साहरण यांना भागवताचा आधार आहे. ज्ञानप्रबोधनातील विवेचनात गीतेच्या तेराव्या अध्यायातील काही श्लोक आहेत. सह्याद्रिवर्णन व ऋद्धिपूरवर्णन ही मात्र स्वतंत्र काव्ये आहेत. तेव्हां महानुभाव पंथात समाविष्ट झालेल्या 'साती ग्रंथा'चा भागवत हा आधार ग्रंथ आहे. ही गोष्टी या पंथाच्या श्रीकृष्णभक्तीशी सुसंगत आहे.

हे सारे ग्रंथ त्यातील काव्ये आणि भक्ती–विरक्तीच्या सौंदर्यामुळे उजळून निघालेले आहेत. भावनेची उत्कटता आणि कल्पनेची रमणीयता काहीशी उत्तान आहे. पण तरीही ती शांतीची आणि भक्तीचे मनोरम दर्शन घडविते. असे हे 'साती ग्रंथ' म्हणजे तेराव्या शतकातील महानुभाव पंथातली खास मान्यता मिळालेली वाङ्मयनिर्मिती आहे.

## २.३ स्वयंअध्ययन प्रश्न आणि उत्तरे

**योग्य पर्याय निवडा**

१. रवळोव्यासाची दीक्षागुरू कोण ?

(महदाइसा / कामाइसा / हिरांबिका)

२. नरेंद्राच्या मूळ रुक्मिणी स्वयंवरांची ओवीसंख्या किती ?

(१००० / १८०० / १५००)

३. अघासुरवध आणि वत्साहरण या भागवताच्या दशम स्कंधावर लिहिलेले पहिले काव्य कोणते?

(वछाहरण / ज्ञानप्रबोध / उद्धवगीता.)

४. महानुभावीगांचे पवित्र धर्मक्षेत्र आणि तीर्थक्षेत्र हे आहे.

(रामटेक / ऋद्धिपूर / देवगिरी)

५. ग्रंथाचे स्वरूप श्रीदत्तात्रेयाचे स्तोत्र असेच आहे.

(वाछाहरण / उद्धवगीता / सह्याद्रिवर्णन)

उत्तरे : १) हिरांबिका, २) १८००, ३) वछाहरण, ४) ऋद्धिपूर, ५) सह्याद्रिवर्णन.

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. महानुभाव पंथाचे भाषिक कार्य सोदाहरण सांगा. अथवा

महानुभाव पंथाच्या वाङ्मयीन कार्याचे स्वरूप लिहा.

**प्रास्ताविक :** प्राचीन मराठी वाङ्मयात महानुभाव संप्रदायाची कामगिरी मोलाची, या पंथाला चक्रधरांसारखे व्यक्तिमत्त्व लाभले. महाराष्ट्रभर भ्रमण करून पंथाचा प्रभावीपणे प्रसार मराठीतून मोठ्या प्रमाणात ग्रंथनिर्मिती, अनेकांना स्फूर्ती. 'साती ग्रंथ ' ही उल्लेखनीय कामगिरी.

**विवेचन :** 'साती ग्रंथा'चा पंथात आदराने उल्लेख, ही सगळी प्रबंधकाव्ये श्रीकृष्णभक्तीने उजळलेली, रुक्मिणीस्वयंवर, शिशुपालवध, उद्धवगीता, वछाहरण, ज्ञानप्रबोध, साह्याद्री वर्णन, ऋद्धिपूरवर्णन इ. ग्रंथांचे स्वरूप वैशिष्ट्यपूर्ण, महदंबेचे धवळे–मराठीतील आद्यकाव्य व स्वरूपही वैशिष्टपूर्ण.

**समारोप :** विनयशीलता, रसाळपणा, प्रासादिकता, ओघवती व साधी भाषा इ. अनेकविध वैशिष्ट्ये या ग्रंथांमुळे मराठी वाङ्मयात बहुमोल भर. ही कामगिरी नेत्रदीपक व अनन्यसाधारण.

२. 'साती ग्रंथा'चा परिचय करून द्या. अथवा

तुम्ही अभ्यासलेल्या ग्रंथांआधारे 'साती ग्रंथा'ची वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा.

**प्रास्ताविक :** महानुभाव पंथातील 'साती ग्रंथा'चे स्थान, या सर्वांच्या निर्मितीमागे श्रीकृष्णभक्तीची प्रेरणा.

**विवेचन :** श्रीकृष्णभक्तीने उजळलेले महानुभावांचे 'साती ग्रंथ'. (२.२.५ हा मुद्दा पाहणे)

**समारोप :** ही सगळी प्रबंधकाव्ये, पद्यबद्ध काव्ये, पारमार्थिक मूल्यांच्या प्रतिपादनाच्या दृष्टीनेही महत्त्व, पंचकृष्णांविषयी निस्सीम भक्ती, रंकवृत्तीने प्रदर्शन पण त्यातही विनयशीलता, वर्णनशैली अलंकार बहुल आणि अत्यक्तिप्रिय, बहुतेक ग्रंथांना भागवताचा आधार, सह्याद्रिवर्णन व ऋद्धिपूरवर्णन ही स्वतंत्र, हे काव्यग्रंथ त्यातील काव्य आणि भक्तिविरक्तीमुळे उजळलेली उत्कटता, रमणीयता, एकूण सर्वच काव्ये रस आणि अलंकारांनी परिपूर्ण.

**लघुत्तरी प्रश्न**

१) महदाइसेच्या व्यक्तिमत्त्वाचा थोडक्यात परिचय करून द्या.

आद्य मराठी कवयित्री, बालपणीच विवाह, वैधव्य, नंतर पाईकाप्रमाणे जगणे, चक्रधरांचे शिष्यत्व, गोविंदप्रभूंच्या विवाह प्रसंगी धवळ्यांची रचना केली. याचे कारण तिच्या ठिकाणचे शीघ्र व उत्फूर्त कवित्व. उत्तर आयुष्य सत्पुरुषांच्या सेवेत व तीर्थयात्रेत व्यतीत, विदुषी, कलासंपन्न व्यक्तिमत्त्व, पंथाभिमानी, स्पष्टवक्ती इ.

२) नरेंद्रकृत 'रुक्मिणीस्वयंवरा'चे स्वरूप थोडक्यात विषद करा.

उत्तरासाठी २.२.५ मधील रुक्मिणी स्वयंवर हा मुद्दा पाहा.

**टीपा लिहा**

१) महदंबेचे धवळे :

मराठीतील आद्यकाव्य म्हणजे धवळे, लेखनकाल इ.स. १२८७ पूर्वार्धाची रचना श्रीगोविंदप्रभूंच्या विवाह प्रसंग निमित्ताने, पूर्वार्धात एकूण ८३ धवले, उत्तरार्धाचे कर्तृत्व महदंबा–म्हाइंभट व लक्ष्मींद्रभट या तिघांकडे, उत्तरार्धातील धवळ्यांची संख्या ६३ लेखनकाल इ.स. १३०८, रुक्मिणीहरणाची कथा, प्रसंगांचे वर्णन परिणामकारक, स्त्रीमनाचे सुंदर दर्शन, जिवंत व्यक्तिचित्रे, सहजसुंदर विनोद, स्त्री सुलभता ही वैशिष्ट्ये, स्वतंत्र आद्यकाव्य.

२) भास्करभट्ट बोरीकर :

व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्यपूर्ण, मूळ नाव भानुभट, भटोबासांनी कवीश्वर असे नामकरण केले. बाईदेवव्यासानंतर तिसरे आचार्य होण्याचा बहुमान भास्करभटाला, पंथनिष्ठा, प्रज्ञा आणि प्रतिभा यांचा मिलाफ, रसाळ वक्तृत्व रसाळ संस्कृत पंडित, वादपटू, व्यासंगी विद्वान आणि शीघ्रकवी असे बहुपैलू व्यक्तिमत्त्व, 'शिशुपालवध' व 'उद्धवगीता' या काव्यांची निर्मिती, आणखी इतर १२ ग्रंथांचे कर्तृत्वही भास्करभट्टाकडे जाते, हे सगळे ग्रंथ साहित्यशास्त्रीय अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे.

## २.४ सरावासाठी प्रश्न :

**योग्य पर्याय निवडा.**

१. 'वछाहरण' या ग्रंथाची ओवीसंख्या किती ?

(५०५ / ५०१ / ५०३)

२. महानुभावांनी श्रीकृष्णाप्रमाणेच कुणाला पूर्णावतार मानले आहे ?

(रामाला / विठ्ठलाला / श्रीदत्तात्रेयाला)

३. 'ज्ञानप्रबोधा'चे साम्य कोणत्या ग्रंथाशी आहे.

(सह्याद्रिवर्णन / वछाहरण / ज्ञानेश्वरी)

४. 'मातृकी रुक्मिणीस्वयंवर' हे कथाकाव्य कोणाचे ?

(महदाइसा / म्हाइंभट / नागदेवाचार्य)

५. 'मराठी शारदेच्या अंगावर चढविलेले एक दिव्य लेणे' हे उद्‌गार कोणत्या ग्रंथाला लागू पडतात?

(रुक्मिणीस्वयंवर / शिशुपालवध / सह्याद्रिवर्णन)

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. 'साती ग्रंथा' पैकी एक अपवाद वगळता जवळ जवळ सर्वच ग्रंथांच्या निर्मितीमागची प्रेरणा श्रीकृष्णभक्ती हीच आहे' कसे ते सांगा. किंवा

'श्रीकृष्णभक्तीने उजळलेले महानुभावांचे 'साती ग्रंथ' ही सगळी प्रबंधकाव्ये आहेत' या विधानाची सार्थकता पटवा.

२. मराठीतील कथाकाव्य लेखन करणारी पहिली स्त्री म्हणून महदाइसेच्या काव्यग्रंथांआधारे तिची ओळख पटवा. किंवा

'गतिमानता, सहजसुंदरता आणि स्त्रीसुलभता हे महदंबेच्या कवित्वाचे विशेष आहेत' या विधानाची सत्यता तिच्या काव्याआधारे पटवा.

**लघुत्तरी प्रश्न**

१. 'निवृत्तिवाद हा महानुभाव पंथाच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे.' कसे ते सांगा.

२. पंडित विश्वनाथाच्या 'ज्ञानप्रबोध' या ग्रंथाचा परिचय करून द्या.

**टीपा लिहा**

१. नरेंद्राची काव्यशैली.

२. 'उद्धवगीते'ची भाषाशैली.

## २.५ समारोप

शक कालगणणेप्रमाणे बाराव्या शतकाच्या साधारण दहा बारा वर्षांत महाराष्ट्रात महानुभाव पंथाचा किंवा परमार्गाचा वृक्ष वाढला आणि तेरावे शतक संपण्याच्या सुमाराला हा बहर ओसरून गेला. तेरावे शतक हा मराठी भाषेच्या दृष्टीने तसा संपन्नतेचा काळ होता. आणि ही संपन्नता अधिक बहराला आणण्यात महानुभाव पंथ अधिक कारणीभूत ठरला.

तसे पहाता हा काल म्हणजे मराठी वाङ्मयाच्या सुरूवातीचा काळ; पण तरीही या काळात जे साहित्य आणि विशेषत: साती ग्रंथा निर्माण झाले त्यातून परिपक्वता, प्रौढता अणि पारमार्थिकता दिसते. या ग्रंथांतून जी तेजस्विता, जी परिणामकारकता प्रकट झाली तशी नंतरच्या साहित्यात इतक्या प्रभावीपणे व्यक्त झालेली दिसत नाही. विशेषत: नरेंद्र, भास्करभट्ट, दामोदरपंडित, नारायण पंडित या ग्रंथकर्त्यांचे स्थान फार मोलाचे आहे. अर्थात हे ही लक्षांत घेतले पाहिजे की, श्रीचक्रधर आणि महानुभाव पंथ हे मराठी भाषेच्या उद्धाराकरिता निर्माण झाले नव्हते, तर जीवाला मोक्षाभिमुख बनविण्याकरिता, जीवांचा उद्धार करण्याकरिता निर्माण झाले होते. म्हणजे इथे भाषा हे केवळ साधन होते. तिचे स्थान फार गौण होते आणि जीवाचा उद्धार आणि विरक्तीयुक्त भक्तीचा, ईश्वराला अनन्यभावे शरण जाण्यासंबंधीचा प्रचार यांवर त्यांचे लक्ष केंद्रित होते. पण काही असले तरी त्यामुळे मराठी वाङ्मयात मैलिक भर पडली हे मात्र खरे !

## २.६ अधिक वाचन

१. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : डॉ. अ. ना. देशपांडे.

२. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : डॉ. ल. रा. नसिराबादकर.

३. प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप : प्रा. ह. श्री. शेणोलीकर,

४. मराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड तिसरा, संपा. प्रा. रा. श्री. जोग.

## २.७ उपक्रम :

१. स्वत: ऋद्धिपूरला जाऊन महानुभावांच्या मठास भेट देऊन तेथील सांकेतिक लिपीची ओळख करून घ्या.

२. महदंबेचे 'धवळे' हे काव्य मिळवून वाचा.

❑❑❑

# घटक : ३

# वारकरी संप्रदायाचा स्थूल परिचय व वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे संतकवी अ) ज्ञानदेव, ब) नामदेव, क) संत मेळ्यातील इतर कवी : गोरा कुंभार, सावता माळी, चोखामेळा, सेना महाराज, मुक्ताबाई व जनाबाई

## ३.१ उद्दिष्टे

या घटकाचे वाचन केल्यास आपणास पुढील गोष्टी समजून येतील.

- वारकरी संप्रदायाचा परिचय होईल.
- वारकरी संप्रदायाचा पाया रचनारे संत ज्ञानेश्वर आणि विस्तार करणारे संत नामदेव व इतर संत कवींच्या कवितेचा व कार्याचा परिचय होईल.
- वारकरी संप्रदायातून निर्माण झालेल्या संत गोरा कुंभार, सावता माळी, संत चोखामेळा, सेना महाराज, मुक्ताबाई व जनाबाई यांच्या कवितेचा व कार्याचा परिचय होईल.
- वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान स्पष्ट करणाऱ्या महत्त्वाच्या ग्रंथांचा परिचय होईल.
- 'हाती काम मुखी नाम' हे संतमेळ्यातील कवींचे ब्रीद आहे हे लक्षात येईल.

## ३.२ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रांनो ! तेराव्या शतकात महाराष्ट्रात महानुभाव आणि वारकरी असे दोन प्रमुख संप्रदाय उदयास आले. या काळात महाराष्ट्रात यादवांची वैभवशाली सत्ता प्रस्थापित झाली होती. ही सत्ता एकीकडे वैभवसंपन्न तर दुसरीकडे सनातन धर्माभिमानी असल्यामुळे समाजात व्रतवैकल्य, वर्णभेद यांचे स्तोम माजले होते. चातुवर्ण्यावर, कर्मकांडावर व जातिभेदांवर विभागला गेलेला समाज व्रतवैकल्ये, तीर्थयात्रा, नवसायास, श्राद्धविधी, दानधर्म यांमध्ये प्रामुख्याने गुरफटून गेला होता. निरनिराळे उपासनाग्रंथ, उपास्यदैवते पूजली जात होती. समाजावर मंत्र-तंत्र, भूते-खेते इत्यादी कल्पनांचा पगडा असल्यामुळे सर्वसामान्य माणसांची धार्मिक कुचंबना होत होती. अशा समाजाला गावोगावची देवळे ही मोठी सांस्कृतिक केंद्रे आधार देत होती. या देवळांमधून पुराण, कीर्तन, प्रवचनांबरोबर विद्‌वान पंडितांच्या धर्मसभा होत होत्या. शास्त्रार्थांची चर्चा चालत होती. पण या धर्मसभा, चर्चा सर्वसामान्यांच्या बाबतीत उदासीन होत्या. खऱ्या धर्माचे स्वरूप ग्रंथात अडकून पडल्यामुळे खऱ्या परमार्थापासून फार मोठा समाज वंचित राहिला होता. अशा समाजाला भक्तीची वाट दाखवण्यासाठी चक्रधरस्वामींनी प्रयत्न केला आणि पारंपरिक सनातनी मूल्यांना नाकारत मानवतावादी  विचारांची पेरणी केली. याच दरम्यान आपेगावच्या ज्ञानेश्वरांनीही गिरीकंदरात, ऋषीमुनींच्या

गोतावळ्यात अडकून पडलेला शुद्ध परमार्थ आणि ईश्वरविषयक भक्तिभाव सर्वसामान्यांच्या दारात आणून उभा केला. धर्म मूठभर लोकांचा नसतो. तो सर्वांसाठी आहे. भक्तीची आणि मुक्तीची वाट कोणीही चालू शकतो असे सांगत, कृष्ण, विष्णू, हरी आणि शिव यांचे ऐक्य असलेल्या पंढरीच्या विठ्ठलासारखे दैवत पुढे आणून, सर्वधर्मीयांना भागवत धर्माच्या पताकाखाली एकत्रित आणले; आणि युगे अठ्ठावीस विटेवर उभ्या असलेल्या विठ्ठलाही पुढे ज्ञानदेव-नामदेवाच्या रूपाने लडिवाळ भक्त मिळाले. चक्रधर जसा महानुभवीय वाङ्मयाचा मध्यबिंदू आहे, तसा पंढरीचा विठ्ठल ज्ञानदेवांनी पाया रचलेल्या भागवतधर्मीय मराठी वाङ्मयाचा मध्यबिंदू आहे.

या कालखंडात पुढे विठ्ठल महिमा आणि पंढरीवर्णन करणारे अनेक संत निर्माण झाले. वर्णाश्रयाची घट्ट पकड असलेल्या समाजात उच्चवर्णियांकडून क्षुद्रांना अन्यायाची, गुलामगिरीची वागणूक मिळत होती. समाज हलाखीचे जीवन जगत होता. अशा परिस्थितीतून समाजाला बाहेर काढण्याची तळमळ या संतांना होती. धर्माचे खरे रूप सामान्य जनतेला दाखवावे आणि भक्ती हेच शुद्ध चारित्र्याचे साधन बनवावे या उद्देशाने ज्ञानेश्वरांनी भागवत संप्रदायाचा पाया घातला. सुबोध मराठी भाषेत 'ज्ञानेश्वरी' सारखी भगवद्गीतेवरील टीका लिहून (टीका म्हणजे कठीण तत्त्वज्ञान सोपे करून सांगणे) साहित्य हे सर्वांसाठी आहे, साहित्याचा आस्वाद घेणे आणि साहित्यरचना करणे हे फक्त विद्वानांचे, पंडितांचे क्षेत्र आहे असे नाही, अशी जाणीव सर्वसामान्यांना करून दिली. त्याचाच परिणाम म्हणून या संप्रदायात अठरापगड जातीचे लोक सहभागी झाले. त्यांना या संप्रदायात भक्तीच्या पातळीवर समानतेचा अनुभव आला. या संतांनी आपल्या दैवताशी भक्त म्हणून संवाद साधला, आपली सुखदु:खे त्याला सांगितली. संतमेळ्यात जो आनंद लाभला तो त्यांना सांगावासा वाटला. भक्तीच्या मार्गावरचा आपला प्रवास कसा होत गेला हे सांगावेसे वाटले. त्यातून पुढे बहुतेक संतांची अभंगरचना झालेली पाहावयास मिळते.

ज्ञानदेवांचे भक्तीचे भागवतधर्मी तत्त्वज्ञान समाजातील सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वाचे कार्य संत नामदेवांनी केले. अठरापगड जातीतील लोकांचे नेतृत्व करणाऱ्या नामदेवांनी भागवतधर्माची पताका थेट पंजाबपर्यंत फडकविली. या संप्रदायातील ज्ञानदेव-नामदेवांसारख्या प्रमुख संतांनी व संतमेळ्यातील कवींनी निर्माण केलेल्या साहित्याने आध्यात्मिक समता प्रस्थापित करण्याचे महत्त्वाचे कार्य पार पाडले. भक्ती आणि तत्त्वज्ञान यांचा सुंदर मिलाफ यांच्या कवितेत पाहावयास मिळतो. मराठी वाङ्मयाच्या प्रारंभिक अवस्थेत निर्माण झालेल्या या कसदार संतकाव्याची जनमानसावरील पकड अद्याप टिकून आहे. याचे कारण संतकाव्याच्या प्रेरणा संतांच्या वैयक्तिक जीवनात नव्हे, तर व्यापक अशा समाजजीवनात असलेल्या पाहावयास मिळतात. या काळात महानुभवीय व संतकवितेने लोकभाषेचा केलेला स्वीकार हा ही या कवितेचा महत्त्वाचा विशेष सांगता येईल. अशा पार्श्वभूमीवर आपण आता वारकरी संप्रदाय, या संप्रदायातील महत्त्वाचे कवी आणि त्यांची कविता पुढीलप्रमाणे समजावून घेऊ.

## ३.३ विषयविवेचन :

### ३.३.१ वारकरी संप्रदाय : स्थूल परिचय

पंढरपुरामधील भक्त पुंडलिकाच्या पितृभक्तीवर संतुष्ट झालेल्या श्रीकृष्णाने पुंडलिकास वर मागण्यास सांगितले. पुंडलिकाने 'येथेचि राहावे' असा वर मागताच प्रत्यक्ष परमेश्वर विटेवर विठ्ठलाच्या सगुणरुपात उभा राहिला. साक्षात देवाच्या वास्तव्याने पुढे पंढरपुरास तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त झाला. अशी आख्यायिका सांगितली जाते. आणि यातूनच पुढे गळ्यात तुळशीची माळ घालून कार्तिकी, आषाढी एकादशीला भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन या विठ्ठलाची नित्यनेमाने वारी करणाऱ्याला वारकरी असे भक्तनाम मिळाले. या वारकऱ्यांच्या, माळकऱ्यांच्या, भागवतधर्मीयांच्या उपासनापंथाला वारकरी संप्रदाय असे नाव रूढ झाले. असा वारकरी संप्रदायाचा उगम सांगितला जातो.

पंढरपुरातील या भक्तीसंप्रदायाचा प्रारंभ पुंडलिक मुनी नावाच्या एका भक्तापासून झाल्याने 'पुंडलिक वर दे हरिविठ्ठल' असे ब्रीद या संप्रदायाला मिळाले. कोणताही संप्रदाय स्थापन होताना तीन गोष्टी महत्त्वाच्या असतात. त्यापैकी पहिली संस्थापक, दुसरी दैवत आणि तिसरी मतप्रणाली असे सांगता येईल. त्याप्रमाणे या संप्रदायाला संस्थापक पुंडलिक, दैवत विठ्ठल आणि मतप्रणाली ज्ञानेश्वरांची मिळाली. ज्ञानेश्वरांच्या मतप्रणालीतून निघालेल्या विठ्ठल भक्तीच्या रोपाचा वेल पुढे गगनापर्यंत गेला. ज्ञानदेवांनी समाजाला समानता, भूतदया, परोपकार, शुद्ध चारित्र्य यांच्यावर आधारलेला शुद्ध परमार्थ शिकविला. ज्ञान आणि कर्म यांचा समतोल साधत महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन घडविले.

'ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया' या संत बहिणाबाईंच्या उक्तीप्रमाणे संत ज्ञानेश्वरानी आपल्या शुद्ध व पवित्र विचाराने वारकरी संप्रदायाचा पाया घातला. या संप्रदायाला पुढे भक्तश्रेष्ठ नामदेवांच्या रूपाने नेतृत्वसंपन्न प्रसारकर्ता मिळाला. एकनाथांच्या 'एकनाथी भागवत' सारख्या ग्रंथाने मजबूत खांब मिळाले. आणि तुकारामाच्या अभंगरूपाने स्वयंप्रकाशमान तेजस्वी असा कळस लाभला. संत बहिणाबाईंच्या 'संतकृपा झाली। इमारत फळा आली' या रूपकात्मक अभंगातून त्याचे स्वरूप स्पष्ट होते.

ज्ञानदेवांच्या विचारसरणीवर उभारलेल्या वारकरी संप्रदायातील संतांचे जगण्याचे असे स्वत:चे तत्त्वज्ञान आहे. त्यांनी स्वत:च्या जीवनावर काही बंधने घातलेली आहेत. वारी करणे, सत्य बोलणे, परस्त्री मातेप्रमाणे समजणे, मद्य-मांस वर्ज्य मानने, ग्रंथांना पूज्य मानने, संप्रदायाची खूण म्हणून कपाळाला बुक्का, टिळा, गळ्यात तुळशीची माळ घालणे, अहिंसा, ग्रंथवाचन, कीर्तन-भजन, समता, बंधुता, सदाचार इ. गुणांचे नियमन हा पंथ करतो.

वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान अद्वैती आहे. जीव-शिव ऐक्य मानणारे आहे. आत्माच सर्वत्र भरलेला आहे. विश्वातील प्रत्येक चैतन्यवस्तूमध्ये परमेश्वराचा अंश आहे; असे मानणारा हा पंथ आहे. हे विश्व म्हणजे आत्म्याचा विकास, क्रीडा आहे. यालाच ज्ञानदेव 'चिद्‌विलासवाद' म्हणतात. 'रामकृष्णहरी' हा या संप्रदायाचा षडाक्षरी मंत्र आहे. याचे स्मरण किंवा नामस्मरण म्हणजे ईश्वरभक्ती या साध्या तत्त्वावर पंथाची उभारणी झाली आहे. प्रपंचातून परमार्थ साधता येतो हे ज्ञानदेवांनी 'गृहस्थाश्रम न सांडिता । कर्मरेखा नोलांडिता'

अशा शब्दांत सांगितले आहे. ज्ञानदेवांना त्यांच्या या सद्‌विचारामुळेच वारकऱ्यांनी 'माउली' ही पदवी बहाल केली आहे.

ज्ञानदेवांनी पाया घातलेला व नामदेवांनी विस्तार केलेला हा वारकरी संप्रदाय सर्वसामान्यांसाठी निर्माण झालेला भक्तीसंप्रदाय आहे. ज्यामध्ये पुढे अठरापगड जातीचे लोक सहभागी झाले व संतत्वास पोहोचले. या वारकरी पंथाने ज्ञानाचे महत्त्व मान्य करून भक्तीला अग्रस्थान दिले आहे. नामसंकीर्तनासारखे सुकर साधन लोकांपुढे ठेवून आध्यात्म मंदिराचे प्रवेशद्वार जास्तीत जास्त रुंद केले. यातील बहुतेक संत कुटुंबवत्सल आणि गृहस्थाश्रमी होते. आपआपल्या व्यवसायात भक्तीचा मळा फुलवीत होते, समाजाभिमुख बनत होते. विद्यार्थी मित्रांनो ! पंढरपूरसारख्या ठिकाणी (तीर्थक्षेत्री) या संप्रदायाचे विराट रूप आज पाहावयास मिळते. या संप्रदायातील महत्त्वाच्या संतकवींच्या कवितेचा अभ्यास आपण आता पुढे करणार आहोत.

### ३.३.२ वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे संतकवी

## संत ज्ञानेश्वर यांचे समग्र साहित्य

**संत ज्ञानेश्वर : (इ.स. १२७५–१२९६)**

गोविंदपंत व निराई (गहिनीनाथांच्या उपदेशावरून विठ्ठलाची उपासणा करणारे ज्ञानेश्वरांचे आजे, आजी)

|

विठ्ठलपंत व रुक्मिणी

| निवृत्तिनाथ | ज्ञानेश्वर | सोपान | मुक्ताबाई |
|---|---|---|---|
| (इ.स. १२७३) | (इ.स. १२७५) | (इ.स. १२७७) | (इ.स. १२७९) |

ज्ञानेश्वरांचे मुळचे घराणे पैठणपासून चार कोसावर गोदावरीच्या उत्तरतीरी असणाऱ्या आपेगावचे. उपलब्ध असणाऱ्या साधनांच्या आधारे गेविंदपंत कुलकर्णी हे या घराण्याचे मूळ पुरुष ठरतात. गोविंदपंत विठ्ठलाची उपासना करीत असल्याने आपल्या पुत्राचे नाव त्यांनी विठ्ठलच ठेवले. या विठ्ठलांनी संस्कृत काव्यकारण आणि वेदपठण केल्याने पुढे ते मोठे निपुनशास्त्रवक्ते झाले. उपजतच वैराग्यवृत्ती असल्याने तीर्थयात्रा करीत ते आळंदीस आले. तेथे विठ्ठलपंतांना आळंदी येथील सिद्धेश्वराचे पुजारी सिधोपंत कुलकर्णी भेटले. सिधोपंतांची कन्या रुक्मिणीशी त्यांचा विवाह झाला. संसारी जीवन त्यांनी स्वीकारले. पण संसारात त्यांचे मन रमेना. ते उदासीन राहू लागले. वैराग्य प्रबळ झाल्याने ते काही निमित्त काढून घरातून बाहेर पडले व काशीस जाऊन संन्यास घेतला. पुढे योगायोगाने त्यांचे गुरू श्रीपादस्वामी आळंदीला आले असताना तेथील वास्तव्यात रुक्मिणीने त्यांना वंदन केले. तेव्हां त्यांनी 'पुत्रवती भव' असा आशीर्वाद दिला. साहजिकच तिला हसू आले. स्वामींनी हसण्याचे कारण विचारताच विठ्ठलपंत संन्यासाश्रमी असल्याचे त्यांना समजले. ते

काशीला परत आले व त्यांनी विठ्ठलपंतांना संन्यासाश्रमातून गृहस्थाश्रमात जाण्याची आज्ञा केली. संन्यास घेतलेल्या माणसाने पुन्हा संसारी होणे आळंदीच्या धर्मपंडितांना मान्य नव्हते. त्यांनी विठ्ठलपंतांना वाळीत टाकले. गावाबहेरच्या झोपडीत विठ्ठलपंत राहू लागले. तेथे त्यांना दोन-दोन वर्षांच्या अंतराने निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव व मुक्ताबाई अशी चार मुले झाली. ती आळंदीच्या समाजापासून दूर झोपडीत वाढू लागली. मुलांना सामाजिक जीवनात प्रवेश मिळावा व त्यांचे व्रतबंध (मूंजी) व्हावे यासाठी आळंदीच्या ब्राह्मणांना विठ्ठलपंतांनी खूप आर्जव केली. धर्मशास्त्र पाहून आम्हाला निर्णय द्या व क्षमा करा, असे त्यांनी ब्राह्मणांना सांगितले. यावर त्यांना 'देहान्त प्रायश्चित' असा निर्णय आळंदीतील ब्राह्मणांनी दिला. अखेरीस उभयतांनी नाशिकच्या प्रयागामध्ये देहान्त प्रायश्चित घेतले.

ज्ञानेश्वरादी भावंडांच्या वाट्याला लौकिक जीवन आले नाही. त्यांचा निर्णय आळंदीच्या शास्त्री पंडितांना घेता येईना, तेव्हां त्यांनी निवृत्तीस सांगितले की, 'पैठणच्या ब्राह्मणाकडून शुद्धिपत्र आणा, ते आम्ही मान्य करू.'' पुन्हा ही भावंडे पैठणला आली. पैठणला या भावंडांच्या प्रश्नाचा निवाडा करण्यासाठी मोठी धर्मसभा भरली. सभेत झालेल्या निर्णयाचा स्वीकार करून ती भावंडे परतणार, तो कांही ब्राह्मणांनी ज्ञानदेवांच्या नावाची कुचाळी केली. तेव्हा अतिशय प्रतिभावंत आणि जीवनाची मोठी समज असणाऱ्या ज्ञानदेवांनी आपल्या ज्ञानाचे दर्शन घडविले. रेड्याकरवी वेद वादविले तेव्हां शास्त्रीमंडळींनी 'तुम्ही संन्याशाची मुले खरी, पण अवतारी आहात, आम्ही कुटुंबाचे दास आहोत, भक्ती, ज्ञान, वैराग्याचा लवलेशही आमच्या अंगी नाही' असे प्रांजळपणाने कबूल केले. ज्ञानदेवांना वंदन करून त्यांचा जयजयकार केला. त्यांना शुद्धिपत्र मिळाले. तेथून नेवाशास येऊन मोहिनीराजाच्या मंदिरात निवृत्तिनाथांच्या आज्ञेवरून ज्ञानदेवांनी भगवद्गीतेवर नऊ हजार ओव्यांचे मराठी भाष्य लिहिले. श्रोत्यांसमोर वाचन करीत या ग्रंथांची रचना झाली. हीच 'भावार्थदीपिका अथवा ज्ञानेश्वरी' होय. त्यानंतर आळंदी, आपेगाव, पंढरपूर असे मुक्काम या भावंडांनी केले. पंढरपूरला ज्ञानेश्वर-नामदेव यांची भेट झाली. पुढे प्रसिद्ध योगी पंडित चांगदेवही ज्ञानेश्वरांचा शिष्य बनला. विठ्ठल भक्तांना एकत्र आणून ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाचे संघटन केले.

पुढे ज्ञानेश्वरांनी वयाच्या एकविसाव्या वर्षी म्हणजे इ.स. १२९६ मध्ये आपले अवतारकार्य संपल्याचे सांगून आळंदी येथे समाधी घेतली. त्यांच्यापाठोपाठ इतर भावंडांनीही समाधी घेतली. ज्ञानेश्वरांच्या जीवनाचा आणि त्यांनी घेतलेल्या समाधीचा परिणाम भागवतधर्मी संतमेळ्यावर दीर्घकाळ होत राहिला. कारण ज्ञानदेवांची गुरूपरंपरा आदिनाथ $\longrightarrow$ मच्छिंद्रनाथ $\longrightarrow$ गोरक्षनाथ $\longrightarrow$ गहिनीनाथ $\longrightarrow$ निवृत्तिनाथ $\longrightarrow$ ज्ञानदेव अशी नाथसंप्रदायी आहे. नाथ संप्रदायामध्ये योग साधनेला महत्त्व आहे. पण तत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन ज्ञानदेवांनी कर्मयुक्त भक्तीचा पुरस्कार केला. हे त्यांचे महत्त्वाचे कार्य आहे. विद्यार्थी मित्रांनो ! ज्ञानेश्वराचा जीवनपट आणि गुरुपरंपरा सांगण्याचा उद्देश हाच की, ज्ञानदेवांच्या साहित्याच्या प्रेरणा या जीवनपटात पाहावयास मिळतात. त्या पुढीलप्रमाणे आपण पाहू.

**ज्ञानेश्वरांची वाङ्मयनिर्मिती**

वारकरी संप्रदायातील पहिलेच आणि सर्वश्रेष्ठ संत म्हणजे ज्ञानेश्वर. ज्ञानदेवांचे जीवन, वाङ्मय

आणि व्यक्तिमत्त्व हे सारेच केवळ लोकोत्तर आहे. ज्ञानदेवांच्या चरित्राबद्दल अनेक वाद आहेत. त्यातील त्यांच्या वाङ्मयाशी संबंधीत असा महत्त्वाचा वाद म्हणजे गीतेवर टीका लिहिणारे ज्ञानेश्वर आणि अभंग रचणारे ज्ञानेश्वर या दोन भिन्न भिन्न व्यक्ती असाव्यात हा होय. पण या वादाचा अखेरचा निर्णय अद्याप झालेला नाही. अभ्यासकांच्या मते ज्ञानदेवांच्या नावावरील बरेच अभंग त्यांचे नसावेत. 'भावार्थदीपिका उर्फ ज्ञानेश्वरी'', 'अमृतानुभव', 'चांगदेव पासष्टी' आणि स्फूट अभंग निर्विवादपणे ज्ञानदेवांचे आहेत. गेली सातशेहून अधिक वर्षं ज्ञानदेवांची कविता अजरामर होऊन राहिली आहे. तिचे स्वरूप पुढीलप्रमाणे पाहता येईल.

**ज्ञानेश्वरी उर्फ भावार्थदीपिका**

गीतेच्या सातशे श्लोकांवर नऊ हजार ओव्या असलेले आणि क्रम न बदलता १८ अध्यायांचे टीकाभाष्य म्हणजे ज्ञानेश्वरी. इ.स. १२९० (शके १२१२) मध्ये या ग्रंथाची रचना नेवासे येथे झाली. असा उल्लेख खुद्द ज्ञानेश्वरीतच सापडतो. तो असा,

**शके बाराशे बरोत्तरे। तैं टीका केली ज्ञानेश्वरे।**
**सच्चिदानंद बाबा आदरें। लेखकु जाहला ॥**

मूळ भगवद्गीता संस्कृतमध्ये आहे. सर्वसामान्यांना संस्कृत भाषेचे ज्ञान नसल्याने या ग्रंथातील ज्ञानापासून ही माणसे वंचित होती. हे ओळखून ज्ञानयोग, कर्मयोग आणि भक्तियोग यांचे गीतेमधील तत्त्वज्ञान सामान्य माणसांपर्यंत त्यांच्या भाषेतून पोहोचवावे अशा शुद्ध हेतूने ज्ञानदेवांनी गीतेवरील 'ज्ञानेश्वरी' हे मराठी भाष्य रचले. 'ब्रह्मरसाचे महत्त्व' मानवी जीवनात अत्यंतिक आहे. 'ब्रह्मविद्येचे ज्ञान प्रत्येकाला होत नसले तरी त्याची जाणीव होणे, हे जगणे अर्थपूर्ण करण्यास पुरेसे आहे. म्हणून ज्ञानदेवांनी 'इथे मराठीचिये नगरी' 'ब्रह्मविद्येचा सुकाळू करि' अशी प्रतिज्ञा केली आहे.

ज्ञानेश्वरांनी हा ग्रंथ एकांतात बसून लिहिलेला नाही, तर समोर बसलेल्या सर्व जातीतील सर्वसामान्य लोकांना ऐकविला आहे. त्यामुळे तत्त्वज्ञानचर्चा येथे अवघड न होता रसाळपणे वक्त्याचा श्रोत्यांशी संवाद साधताना दिसते. ग्रंथरचनेवेळी ज्ञानदेवांनी भाष्यकारांना वाटही पुसली आहे. पण ही टीका तर्ककर्कश होऊ दिलेली नाही. ज्ञानेश्वरीतील मंगलाचरणात तत्त्वज्ञान आणि काव्य यांचा सुरेख मेळ झालेला पाहावयास मिळतो. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ अनुभवाचा विषय आहे. जन्ममृत्यूच्या कक्षेत मनुष्याने शुद्ध आचरण ठेवावे असा आदर्श या ग्रंथाने घालून दिला आहे. एक ओवी वाचली की दुसरी वाचावी असे वाटणे हेच या ग्रंथाचे रहस्य आणि सामर्थ्य आहे.

ज्ञानदेवांनी 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथात ज्ञान्, कर्म, भक्ती, योग यांची गुंफण करताना श्रीगणेशस्तवन, शारदावंदन, संत महिमा, गुरूवंदन, गीताथोरवी, श्रोतृवंदन, आत्मविश्वास, नम्रता अशा अनेक विषयांचे सुसंगत व सविस्तर वर्णन केले आहे. ज्ञानेश्वरीतील रससौंदर्यही वाचकाचे लक्ष वेधून होते. 'शृंगाराच्या माथा पावो' ठेवणारा शांतरस ज्ञानेश्वरीचा प्राणविशेष आहे. प्राणचैतन्य राहण्यासाठी अवयवांचे अस्तित्व जाणवते. तसे इतर रसही येथे डोकावतात. शांतरसाबरोबरच अद्‌भूतरस, वत्सलरस, भक्तिरस असे इतर रसही येथे आले आहेत. निवृत्तिनाथांच्या आज्ञेने गीतेच्या अक्षरांमध्ये विविध अलंकार व श्लेष यांसारख्या

गुणांच्या सहाय्याने ज्ञानदेवांनी नवरसांच्या माध्यमातून सुलभ करून सांगितलेला आहे. ज्ञानेश्वरांनी आपल्या निरूपणात लोकभाषेतील शब्द, निसर्गातील, लोकव्यवहारातील व पंचमहाभूतांसंबंधीचे समर्पक दृष्टांत वारंवार योजल्यामुळे ज्ञानेश्वरीचा सुबोधपणा वाढला आहे.

ज्ञानेश्वरीतील प्रतिमासृष्टीचे गोचरत्वही मानसिक पातळीवर अनुभवावे लागते. ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायात ज्ञानदेवांनी वेदविद्येवर गणेशरूपक केले आहे. गणेशाच्या एकेका अवयवाच्या जागी ज्ञानेश्वर विविध अर्थपूर्ण प्रतिमा योजतात. ज्ञानेश्वरांची शैली उपमा-उत्प्रेक्षादी अलंकारांनी नटलेली आहे. ज्ञानेश्वरीची भाषा पाहिली की, त्यांचे शब्दभांडार मोठे असल्याचे जाणवते. संतकृपेने आपले गीताटीकारूप धर्मकीर्तन सिद्धीस गेल्याचे ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या उपसंहारात स्पष्ट केले आहे.

मराठी विषयीचा अभिमान हा तर ज्ञानदेवांच्या आवडीचा विषय.

**माझा मराठाचि बोलु कौतुके। परि अमृतातेहि पैजा जिंके।**

**ऐसि अक्षरे रसिके । मिळवीन।।**

हे त्यांचे उद्‌गार सुप्रसिद्ध आहेत. ज्ञानेश्वरीच्या शेवटी मागितलेल्या

**'दुरिताचे तिमिर जावो। विश्व स्वधर्म सूर्ये पाहो।**

**जो जे वांछील तो ते लाहो। प्राणिजात।।'**

या पसायदानात ज्ञानदेवांनी विश्वकल्याणाच्या भावनेने विश्वात्मक देवाजवळ जे मागणे मागितले आहे ते वैयक्तिक लाभाचे नाही; तर प्राणिमात्रांच्या सुखाचे, कल्याणाचे मागणे त्यांनी मागितले. यात त्यांचे विश्वात्मक मोठेपण सामावलेले दिसते. ''उपमा, भाषासौंदर्य, तत्त्वज्ञान, साक्षात्कार, भक्ती आणि अद्वैत यांची सांगड, अलौकिक निरीक्षण शक्ती, अप्रतिहत कवित्वशैली, अलोट वाङ्मयाधुर्य या सर्व गुणांच्या संमिश्र भावाने ज्ञानेश्वरी हा ग्रंथ 'न भूतो न भविष्यती' असा झाला आहे'' हे रा. द. रानडे यांचे उद्‌गार ज्ञानेश्वरीची यथार्थ ओळख पटवितात. (संतवचनामृत : रा. द. रानडे. पृष्ठ १४)

विद्यार्थी मित्रांनो ! रा. द. रानडे यांनी वरीलप्रमाणे 'ज्ञानेश्वरी' चा केलेला गौरव पाहिला की, ज्ञानेश्वरीच्या अंतरंगाकडे मनाने ओढ घेणे स्वाभाविक आहे. म्हणून आपण 'ज्ञानेश्वरी'च्या अंतरंगाकडे वळू. ज्ञानदेवांनी भगवद्‌गीतेच्या क्रम न बदलता १८ अध्ययांमधील सातशे लोकांचे विवरण करण्यासाठी नऊ हजार ओव्यांचे परमसुंदर असे रचलेले भाष्य म्हणजे ज्ञानेश्वरी.

ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या 'अर्जुनविषादयोग' या पहिल्याच अध्यायात कुरुक्षेत्रावर युद्ध करावे की न करावे अशा द्विधा मन:स्थितीत सापडून आपल्या कर्तव्यापासून ढळणाऱ्या अर्जुनाचे आणि त्याच्या प्रज्ञावादाचे सुंदर चित्र उभे केले आहे. या अध्यायात ज्ञानदेवांनी रचलेले गणेश रूपक विघ्नहर्त्या ॐकार स्वरूपी गणेशदेवाच्या मूर्तीचे इत्यंभूत वर्णन करणारे आहे; ज्ञानेश्वरीच्या 'सांख्ययोग' या दुसऱ्या अध्यायात ज्ञानदेवांनी शरीर नाशिवंत आहे तर आत्मा अमर आहे हे सांगून विवेकाचे महत्त्व विशद केले आहे; 'कर्मयोग' या

तिसऱ्या अध्यायात ज्ञानदेवांनी प्रत्येक मनुष्याने निष्कामभावपूर्वक आपल्या वर्णधर्मानुसार प्राप्त झालेल्या कर्तव्याचे तत्परतेने पालन केले पाहिजे असे सांगितले; तर चौथ्या 'ज्ञानकर्मसंन्यासयोग' या अध्यायात कर्माला तत्वज्ञानाची जोड दिली आहे. 'कर्मसंन्यासयोग' या पाचव्या अध्यायात कर्तव्यकर्माचे पालन करीत षड्विकारांना दूर लोटणारा खरा संन्याशी असे प्रतिपादन केले आहे; 'ध्यानयोग' या सहाव्या अध्यायात ज्ञानदेवांनी इंद्रिये संयमित करून परमात्म्याचे ध्यान करण्यावर भर दिला आहे; 'ज्ञानविज्ञानयोग' या सातव्या अध्यायात ज्ञानदेवांनी सर्व प्राणी मात्रांमध्ये परमेश्वर ओतप्रोत भरला आहे असे सांगून भक्तीला ज्ञानाचे अधिष्ठान दिले आहे; 'अक्षरब्रह्मयोग' या आठव्या अध्यायात ज्ञानेश्वरांनी परब्रह्म, ब्रह्म, कर्म, आध्यात्म या संकल्पना स्पष्ट केल्या आहेत; 'राजविद्या राजगुह्ययोग' या नवव्या अध्यायात ज्ञानदेवांनी कुळ, वर्ण, जाती यांचे महत्त्व नाकारून भक्तीचा केलेला प्रभावी पुरस्कार अठरापगड जातीतील असंख्य लहानथोर स्त्री पुरुषांना या संप्रदायात समाविष्ट करून घेण्यास कारणीभूत झाला; 'विभूतियोग' या दहाव्या अध्यायात ज्ञानेश्वरांनी परमेश्वराचा विशेष आविर्भाव असणाऱ्या वस्तूपेक्षा भगवंताचेच चिंतन केले पाहिजे असे सांगितले. 'विश्वरूपदर्शनयोग' या अकराव्या अध्यायात श्रीकृष्णाने अर्जुनाला दिव्य दृष्टी देऊन विश्वरूपदर्शन दाखविले. त्या विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि लय भगवंत स्वरूपातच आहे हे ज्ञानदेवांनी अधिक स्पष्ट केले; 'भक्तियोग' या बाराव्या अध्यायात ज्ञानदेवांनी परमात्म्याची श्रद्धापूर्वक भक्ती करणाऱ्या मनुष्याचा भगवंत संसार सागरातून त्वरीत उद्धार करतात असा सर्वसामान्य भक्तांना दिलासा दिला आहे; 'क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग' या तेराव्या अध्यायात ज्ञानदेवांनी ज्ञानांचा प्रकाशक असलेल्या परमात्म्याला जाणल्याने त्याच्याशी एकरूपत्व होऊन अमरत्वाची प्राप्ती होते हे स्पष्ट केले आहे; 'गुणत्रयविभागयोग' या चौदाव्या अध्यायात ज्ञानदेवांनी संपूर्ण जग सत्त्व, रज, तम असे त्रिगुणात्मक आहे. सत्त्वगुण सुख आणि ज्ञानाच्या आसक्तीने, रजोगुण कर्मासक्तीने व तमोगुण प्रमादालस्य व निद्रा यांनी मनुष्याला बंधनात टाकतात. या गुणांच्या अतीत झालेला मनुष्य भगवद्भावास प्राप्त होऊ शकतो हे स्पष्ट केले आहे. 'पुरुषोत्तम योग' या पंधराव्या अध्यायात ज्ञानदेवांनी पुरुषोत्तम परमात्मा हा या विश्वाचा मूळ आधार आहे. त्याला श्रद्धापूर्वक भजल्याने मनुष्य सर्वज्ञ आणि कृतकृत्य होतो हे विशद केले आहे; 'दैवासुरसंपदविभागयोग' या सोळाव्या अध्यायात ज्ञानदेवांनी मनुष्याने सद्गुण व सदाचरण करून संसाराच्या व जन्ममरणाच्या बंधनातून मुक्त झाले पाहिजे असे ठणकावले आहे; 'श्रद्धात्रयविभागयोग' या सतराव्या अध्यायात ज्ञानदेवांनी सर्वसामान्यांना श्रद्धेचे तीन प्रकार सांगून श्रद्धापूर्वक देवाचे स्मरण किंवा नामोच्चारण करून शुभकर्म करण्याविषयी उपदेश केला आहे, तर 'मोक्षसंन्यासयोग' या अठराव्या अध्यायात ज्ञानेश्वरांनी मनुष्याने कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग यांपैकी कोणत्याही एका साधनांचा अवलंब केला तर त्याचा उद्धार होऊन त्याला मोक्षप्राप्ती होते हे स्पष्ट केले आहे.

अशाप्रकारे मराठी साहित्याचे एक अनमोल लेणे असलेला 'ज्ञानेश्वरी' हा सुमारे नऊ हजार ओव्यांचा ग्रंथ वाचकाने वाचण्यास प्रारंभ केला की तो मोहून जातो. समुद्राचे तरंग जसे चित्तवेधक असतात तसे ओवीमागून ओवीचे सौंदर्य त्याच्या मनात विचारांनी वलये निर्माण करतात. अध्यात्माशिवाय अनेक विषयांचे पदर येथे उलगडत जाताना त्याचे मन उत्कंठीत होते. अध्यात्म आणि साहित्य यांचा कलात्मक संगम झालेला येथे पाहायला मिळतो. ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीविषयी ज्ञानदेवांचा संतसखा भक्तश्रेष्ठ नामदेवांनी

म्हटलेच आहे.

**'नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी ।'**

**अमृतानुभव**

सुरुवातीचे पाच संस्कृत श्लोक व त्याचाच विस्तार असलेल्या ज्ञानदेवांच्या या ८०४ ओव्यांच्या तत्त्वज्ञानात्मक स्वतंत्र ग्रंथाला मराठी साहित्यात अनन्यसाधारण महत्त्व आहे. ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या पाठोपाठ म्हणजे इ.स. १२९२ मध्ये 'अमृतानुभव' हा ग्रंथ रचला. ज्ञानेश्वरी लिहून झाल्यावर निवृत्तिनाथ ज्ञानदेवांना म्हणाले, ''हा ग्रंथ उत्तमच उतरला आहे; पण बोलून चालून तो टीकापर, आता काही स्वतंत्र ग्रंथरचना व्हावी'' या बोलावर ज्ञानदेवांनी जो ग्रंथ रचला तो 'अमृतानुभव' होय. लेखन स्वातंत्र्याची गुरुज्ञा झाल्यावर ज्ञानेश्वरांनी आपल्या अनुभवाचे अमृत या ग्रंथात ओतले आहे. त्यामुळे या ग्रंथाला त्यांनी स्वत: 'अनुभवामृत' असे नाव दिले आहे. काव्य आणि तत्त्वज्ञान या दोन्ही दृष्टिनी हा 'ज्ञानेश्वरी'च्या ही वरची पातळी गाठतो, अशा रसिकांचा अभिप्राय आहे.

'अमृतानुभव' हा ग्रंथ एकूण दहा प्रकरणात विभागला आहे. अमृतानुभवाचे अंतरंग पाहिल्यास त्यात शिवशक्तीचे ऐक्य, शब्दमंडन व शब्दखंडन, अज्ञानाचा आणि शेवटी ज्ञानाचाही निरास, स्फूर्तिवाद किंवा विश्वचिद्विलास हा सिद्धान्त आणि आपण ज्ञानाज्ञानातीत आहे हा स्वानुभव, इतके विषय स्थूलमानाने आले आहेत. सद्गुरु निवृत्तीनाथांच्या शिष्योत्तम ज्ञानेश्वरांनी या ग्रंथात जीव-शिव ऐक्यतेचा विषय मांडला आहे. त्यामुळे हा शांकरमताचाच अनुभव वाटतो असे एक मत आहे.

ज्ञानेश्वरांनी 'अमृतानुभव' हा ही ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीछंदात लिहिलेला ग्रंथ आहे. सामान्य वाचकांना किंवा विद्वानांनाही हा ग्रंथ कठीण आणि निरसही वाटण्याचा संभव आहे. मात्र अध्यात्मरहस्य जाणणाऱ्यांना तो स्वसुखाने डोलविणारा आहे. भाषेच्या दृष्टीने ज्ञानेश्वरीप्रमाणेच हा ग्रंथ सुबोध असून काव्याच्या मनोहर भाषेने व उपमादृष्टांतांनी नटलेला आहे. शिवशक्तीचे ऐक्य, प्रथम अज्ञानाचा विनाश आणि नंतर ज्ञानाच्याही पलीकडील अवस्था, तसेच विश्व म्हणजे चिद्शक्तीचा विलास असल्याची धारणा याविषयी विवेचन आहे. अमृतानुभवाच्या सातव्या प्रकरणात ज्ञानदेव म्हणतात. ''दृश्य, दृष्टा आणि दर्शन यांच्या पलीकडे असणारा परमात्मा विश्वरूपाने नटतो व तो अमर आहे. शिव आणि शक्ती हे एकमेकांशी एकरूप असतात हे सांगण्यासाठी ज्ञानदेव समर्पक दृष्टांताची योजना करतात ती अशी -

**स्त्री पुरुष नामभेदे। शिवपण येकले नांदे।**
**जग सगळे आघाधे। पणे जिही।।**
**दो दांडी ये कि श्रुति। दोहों फुली येकि दृति।**
**दोहों दिवीं दीप्ति। येकिचि जेविं।।**
**दो ओटी येकी गोठी । दो डोळां येकि दृष्टि।**

**तेवी दोघी जिहीं सृष्टी। येकिचि जेवीं।।**

अशा दृष्टांतातून ज्ञानदेव स्त्री-पुरुष अशी नावे भिन्न असली तरी त्यांच्यामध्ये एकच शिवपण आहे असे सांगतात. दोन्ही फुले पण वास एक, दोन दांड्या पण आवाज एक, दोन दिवे पण प्रकाश एक, दोन ओठ पण शब्द एक, दोन डोळे पण दृष्टी एक, त्याप्रमाणे ही शिवशक्ती एकच असून तीच या सृष्टीत व्यापून राहिली आहेत. पाणी आणि लाट ही जशी एकमेकांशी सुखेनैव एकरूप असतात. तसेच शिवशक्तीचे एकत्व असल्याचे ते सांगतात.

'अमृतानुभव' म्हणजे मानवी जीवनाचे विश्लेषण आहे. संसारव्यथा व मानसिक चिंता दूर करण्याचे साधन म्हणजे 'अमृतानुभव', श्रीज्ञानेश्वरांनी स्वत: अनुभव घेतलेले अमृततुल्य औषध म्हणजे 'अमृतानुभव', जीवन आनंदमय करण्याचा एकमेव उपाय म्हणजे 'अमृतानुभव' अशा आत्मानुभूतीच्या आनंद सोहळ्याचे वर्णन ज्ञानदेवांनी पुढील शब्दांत केले आहे.

**म्हणोनि ज्ञानदेवो म्हणे। अनुभवामृते येणे।**

**सणु भोगिजे सणे। विश्वचेनि।। १०.३१।।**

**चांगदेवपासष्टी**

'चांगदेवपासष्टी' हे एक प्रासंगिक प्रकरण आहे. चांगा वटेश्वर या हठयोग्याला भक्तियोगी ज्ञानेश्वरांनी लिहिलेले पत्र म्हणजे चांगदेवपासष्टी होय. ६५ ओव्यांचे हे लघुकाव्य आहे. पत्ररूपाने केलेल्या संवादासारखे या लहानशा ग्रंथाचे स्वरूप आहे.

'चांगदेवपासष्टी' ची रचना आळंदीस इ.स. १२९४ च्या सुमारास झाली असावी. ज्ञानदेवांची कीर्ती ऐकूण चौदाशे वर्षांच्या चांगदेवांनी त्यांना पत्र पाठविले. अनुभवाने मोठ्या पण वयाने लहान असणाऱ्या ज्ञानदेवांना नमस्कार लिहावा की आशीर्वाद अशा संभ्रमात पडल्यामुळे शेवटी चांगदेवांनी कोरेच पत्र ज्ञानदेवांना पाठवून दिले. पुढे निवृत्तिनाथांच्या आज्ञेने चांगदेवांच्या पत्रास ज्ञानदेवांनी उत्तर दिले, हे उत्तरादाखल पत्र म्हणजे चांगदेवपासष्टी होय. पासष्ट ओव्यांतून येथे ज्ञानदेवांनी चांगदेवांना पूर्णबोध केला आहे. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास - ल. रा. नासिराबादकर पृष्ट क्र. ६५, ६६)

ज्ञानदेवांचे हे अद्वैतानुभूतीपर काव्य होय. ज्ञानेश्वरांनी चांगदेवांशी केलेला संवाद तत्त्वज्ञानाच्या स्वरूपाचा आहे. वैयक्तिक सुखदु:खापेक्षा निराळी अशी ही विचारांच्या पातळीवरची देवघेव आहे. 'स्वस्ति श्री वटेशु' असा मायना लिहून -

**स्वस्ति श्री वटेशु। जो लोपोनि जगदाभासु ।**

**दावि मग ग्रासु। प्रगटला करी ।। चां. १।।**

**प्रगटे तवं तवं न दिसे। लपे तवं तवं आभासे ।**

**प्रगट ना लपाला असे। ना खोमता जो ।। चां. २ ।।**

अशा आत्मानात्म विचारापासून प्रारंभ करून दृष्टांतांच्या सहाय्याने अद्वैत आणि स्फूर्तिवादाचा पुरस्कार करीत, अवघ्या पासष्ट ओव्यांत ज्ञानदेव आणि चांगदेव किंवा 'मी' आणि 'तू' अशा संवादातून ऐक्य साधत ज्ञानदेव गेले आहेत. या ग्रंथाविषयी संतवाङ्मयाचे अभ्यासक ह. श्री. शेणोलीकर म्हणतात. ''नामरूपात्म जगताचे अधिष्ठान ब्रह्माहून वेगळं नाही, सोने हे सोनेपणाच्या वजनात किंवा कसात कमी न होता जसे अलंकार रूपात येते. तद्वतच परब्रह्म हे आपल्या पूर्णत्वात कमी न होता विश्वरूपाने विलसते. हा सिद्धांत ३ ते ६ ओव्यांत सांगितला असून त्याचा विस्तार पुढे केला आहे.'' ज्ञानेश्वरांच्या सर्व ग्रंथांत अद्वैतानुभवाचे आणि भक्तीप्रेमाचे एकत्र सूत्र अनुस्युत आहे. फक्त 'अमृतानुभव' व 'चांगदेवपासष्टी' यांत ज्ञानेश्वरीच्या मानाने काव्याचा भाग कमी आहे इतकेच, पण काव्यापेक्षा एका हठयोग्याला एका ज्ञानयोग्याने धाडलेले अध्यात्मबोधपर असे पत्र म्हणून या प्रकरणाचे महत्त्व विशेष आहे. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास :
ह. श्री. शेणोलीकर. पृष्ठ ४६)

अमृतानुभवातील तत्त्वज्ञान 'पासष्टी'त अधिक सूत्रबद्धपणे मांडून चिद्विलासवादाच्या भूमिकेनेच पूर्णाद्वैताचा बोध ज्ञानदेवांनी केला आहे. विश्वाचे स्वरूप या ओव्यांमधून ज्ञानेश्वरांनी उलगडले आहे. जगामध्ये आपल्याला विविधता आणि भिन्नता दिसत असली तरी शेवटी सर्व गोष्टी अभिन्नच आहेत. एकाच चैतन्याची ही विविध रूपे आहेत. ज्ञानेश्वरांनी समर्पक दृष्टांत प्रासादिक व माधुर्यपूर्ण भाषेत देऊन ही कठीण संकल्पना समजावण्याचा प्रयत्न केला आहे. आत्म्याच्या दृष्टीने आपण दोघे एक आहोत. यामुळे द्वैतदृष्टींने भेट घेण्याचे कारण नाही. असा आपला अभिप्राय ज्ञानदेवांनी चांगदेवांना या पत्रातून कळविला आहे.

**चांगदेवा तुझेनि व्याजें । माऊलिया श्रीनिवृत्तीराजे ।**
**स्वानुभाव रसाळ खाजे । दिधले लोभें ।।**

ज्ञानदेवांनी असे विनयपूर्ण उद्‌गार काढून या लेखनाचे सारे श्रेय निवृत्तिनाथ व चांगदेव यांना दिले आहे.

### ज्ञानेश्वरांची अभंगवाणी

विद्यार्थी मित्रांनो ! आतापर्यंत आपण ज्ञानदेवांची ग्रंथरूप रचना पाहिली. आता आपण त्यांच्या स्फूटरचनेकडे वळणार आहोत. ज्ञानेश्वरांचे अभंग गेली सातशेहून अधिक वर्षे मराठी माणसाच्या ओठावर खेळत आहेत. केवळ मौखिक परंपरेने हे अभंग आपल्यापर्यंत आल्याने त्यांची भाषा थोडी बदलली आहे. त्यामुळेच अभंग रचनारे ज्ञानेश्वर आणि 'अमृतानुभव' लिहिणारे ज्ञानेश्वर वेगळे असावेत, अशी मते काहींनी व्यक्त केली आहेत. असे असले तरी ज्ञानेश्वरांच्या मनाचा एक पदर त्यांच्या अभंगांमधून वेगळेपणाने जाणवल्याशिवाय राहात नाही. भक्तीच्या वाटेवरचा एका संताचा प्रवास म्हणजे ज्ञानदेवांचे अभंग होत. ईश्वरभेटीची लागलेली तळमळ, मनाची उदासी, बेचैनी, प्रपंचाविषयीचा अलिप्तपणा आणि परमेश्वराच्या विरहाने होणारे दु:ख, पंढरीवर्णन, विठ्ठलवर्णन, बालक्रीडा यांविषयीचे जवळजवळ सातशे पासष्ट अभंग ज्ञानदेवांनी लिहिले आहेत. त्यांपैकी काही अभंग सांप्रदायिक विषयावर लिहिले असून, आपली जीवनदृष्टी

व तत्त्वबोध सर्वसामान्यापर्यंत पोहोचवावा हा त्यामागील ज्ञानदेवांचा हेतू स्पष्ट दिसतो. ज्ञानेश्वरांनी हे अभंग पंढरीच्या संतमेळ्याशी संबंध आल्यावर व नामदेवांच्याबरोबर तीर्थयात्रा करताना लिहिले असावेत. अभंगाच्या शेवटी ज्ञानेश्वर स्वत:बरोबर आपल्या मातापित्यांचा 'बापरखुमा देवीवर' असा उल्लेख करताना दिसतात. हा उल्लेख जसा त्यांच्या मात्यापित्यांचा, तसा पंढरीच्या विठ्ठल रखुमाईचाही असावा, असे जाणकारांचे मत आहे. ज्ञानेश्वरांचे हरिपाठाचे अभंग म्हणजे वारकऱ्यांची नित्यपाठाची 'संध्या'च होय. (प्राचीन मराठी वाङ्.मयाचा इतिहास: ल.रा. नासिराबादकर, पृष्ठ ६६, ६८) भजन, कीर्तन, पुराण, प्रवचन या निमित्ताने ही अभंगरचना झाली असावी.

ज्ञानदेवांच्या अभंगांत नामसंकीर्तनाचा महिमा वर्णिला आहे. योगयाग, तीर्थव्रत, जपतप यांपेक्षा हरिनामस्मरण श्रेष्ठ आहे. या हरिस्मरणात जन्मांतरीची पापे जाळण्याचे, संसारातून तारण्याचे सामर्थ्य आहे. गुरूकृपा, संतसंगती आणि हरिनाम म्हणजे हमखास मोक्षप्राप्ती. हरिनामाने मृत्युलोक वैकुंठ होते. सारे शरीर ब्रह्मरूप होते.

**देवाचिया द्वारी उभा क्षणभरी । तेणे मुक्ती चारी साधियेल्या ।**

**हरिमुखे म्हणा हरि मुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी ।। ४८ ।।**

अशाप्रकारे ज्ञानदेव परमार्थ साध्या आणि सोप्या शब्दांतून सांगतात.

पंढरपूर ही वारकऱ्यांची दक्षिणकाशी आणि श्रीविठ्ठल हे त्यांचे परमदैवत. प्रत्येक वारकऱ्याला या तीर्थक्षेत्राची आणि आपल्या श्रीहरीची आस लागलेली असते. त्याचे मन तिकडे धाव घेत असते. ज्ञानदेवांनी ही आवड पुढील शब्दांत व्यक्त केली आहे.

**माझे जीवींची आवडी । पंढरपुरा नेईन गुढी ।। २२० ।।**

**जाईन गे माये तया पंढरपुरा । भेटेन माहेरा आपुलिया**

**सर्व सुकृतांचे फळ मी लाहीन । क्षेय मी देईन पांडुरंगी ।। २२१ ।।**

असे पंढरीचे वर्णन व परमेश्वराचे चिंतन करताना ज्ञानदेव आनंदाने तल्लीन होतात. हरीच्या सगुण-निर्गुण रूपांचे वर्णन करताना ज्ञानदेव

**रूप पाहता लोचनी । सुख झाले हो साजणी ।**

**तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा ।।**

**बहुता सुकृतांची जोडी । म्हणुनि विठ्ठली आवडी ।**

**सर्व सुखाचे आगरू । बापरखुमादेवीवरू ।।**

असा कलात्मक सौंदर्याचा आविष्कार घडवितात.

ज्ञानदेवांच्या बालक्रीडेच्या अभंगातील कल्पद्रुम, टिपरी, पाळणा, घोंगडी, हमामा, फुगडी अशी

कितीतरी रूपके भक्तीचे तत्त्व सामांन्यापुढे विशद करतात. कृष्णाच्या भेटीसाठी आसुसलेली गोपी ज्ञानदेवांच्या गौळणीमधून भेटते.

ज्ञानदेवांची विराणी तर लोकप्रिय आहे. या विराण्या मधुराभक्तीने ओथंबलेल्या आहेत. ईश्वरप्राप्तीची मनाला लागलेली ओढ, ईश्वराच्या विरहाने होणारे दु:ख अशा विविध भावना ज्ञानेश्वरांच्या अभंगांमधून काव्यमयरूप होताना दिसतात.

**'चंदनाची चोळी । माझे अंग अंग जाळी'**

**'जागृती पुसे सजणी । कवन बोलिले अंगणी'**

या त्यांच्या विराण्या प्रपंच आणि परमार्थाचा सुंदर समन्वय घडवितात.

**'पैल तो गे काऊ कोकताहे । शकून गे माये सांगताहे'**

आणि

**'घनुवाजे घुणुघुणा । वारा वाहे रूणझुणा**
**भवतारकु हा कान्हा । वेगी भेटवा कां ।।**

यासारख्या ज्ञानदेवांच्या विराण्या म्हणजे उत्कट आणि सोज्वळ भावनांचा सात्त्विक आविष्कार आहे.

अशाप्रकारे ज्ञानदेवांच्या अभंगांतून पंढरीमाहात्म्य, आत्मसाक्षात्कार, ब्रह्मज्ञानमाहात्म्य, अद्वैतबोध, हरिकीर्तन, विठ्ठलमाहात्म्य, संतसमागम, नामस्मरण, सदाचाराचा उपदेश असे विविध विषय आले आहेत. हे अभंग ज्ञानदेवांनी साध्या आणि उत्कट शब्दांत लिहिले असल्यामुळे आजही सऱ्हदय माणसाला ते आवडल्याशिवाय राहात नाहीत. ज्ञानेश्वरांनी या अभंगांत सर्वसामान्य प्रापंचिकाना उपदेश केलेला दिसतो.

**उपसंहार**

वरील सर्व वाङ:मयनिर्मितीचा विचार केल्यानंतर ज्ञानदेवांच्या कृतीची आणि वाङ:मयाची आपणास कल्पना येऊ शकेल. ज्ञानदेवांनी आपल्या कृतीतृन आणि वाङ:मयातून सामान्य माणसासाठी मोक्षप्राप्तीचे दरवाजे खुले केले. धर्म मूठभर लोकांचा नसतो, तो सर्वांसाठी असतो हे त्यांनी दाखवून दिले. भक्तीची आणि मोक्षाची वाट कोणीही चालू शकतो असे त्यांना वाटत होते. मात्र त्यांनी कधी संन्यासाचा आणि विरक्तीचा उपदेश केला नाही. संसारात राहून ईश्वरभक्ती शक्य आहे, असा दिलासा त्यांनी समाजाला दिला. आणि कर्मे करीत राहण्याचा उपदेश केला. विद्यार्थी मित्रहो ! ज्ञानदेवांची अभंगवाणी त्यांच्या भावंडांच्या सहाय्याने फुलून आली. निवृत्तिनाथ, सोपान, मुक्ताई ही त्यांची भावंडे आणि योगी चांगदेव यांच्या अभंगरचनेचाही येथे उल्लेख करणे आवश्यक आहे. यांच्या अभंगानंतर वारकरी संप्रदायातील पहिले आवर्तन पूर्ण होते. व या आवर्तनातच संत नामदेवांच्या अभंगवाणीने दुसरे आवर्तन गुंफले. ते पुढे पाहूया.

## संत नामदेव यांचे समग्र साहित्य

**संत नामदेव : (इ.स. १२७० – १३५०)**

ज्ञानदेवांचे समकालीन, काहीसे निराळे व्यक्तिमत्त्व असलेले; पण तितकेच कर्तृत्ववान असलेले वारकरी संप्रदायातील दुसरे संत म्हणजे नामदेव.

**'ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।**

**नामा तयाचा किंकर। तेणे केला हा विस्तार।।'**

या संत बहिणाबाईंच्या उक्तीप्रमाणे ज्ञानेश्वरांनी उभारलेल्या वारकरी संप्रदायाच्या पायावर खरीखुरी विकसित धर्मरूपी इमारत बांधण्याची बहुमोल कामगिरी नामदेवांच्या अभंगवाणीने आणि कृतीने पार पाडली. अशा नामदेवांच्या चरित्राविषयी काही वादस्थळे आहेत. उपलब्ध पुराव्यांच्या आधारे नामदेवांची कुळकथा, जन्मकथा व व्यवसायकथा खालीलप्रमाणे सांगता येईल.

यदुशेट (शिंप्याचा व्यवसाय करणारे नामदेवांच्या घराण्यातील मुळ पुरुष)

↓

हरिशेट (यदुशेटचा मुलगा)

↓

गोपाळशेट (यदुशेटचा नातू)

↓ ↓

गोविंद राघव (पंढरीची वारी अव्याहतपणे चलवणारी गोपाळशेटची दोन मुले)

↓ ↓

शिवाजी नरहरी (गोविंदशेटींची मुले)

↓

दामाशेटी (नरहरी शेटींचा मुलगा, आऊबाई या कन्येनंतर पोटी पुत्र नाही म्हणून आपल्या गोणाई पत्नीसह इष्ट दैवताकडे पंढरपुरास वास्तव्यास आले)

↓ ↓

आऊबाई नामदेव (दामाशेटींची मुले)

वरील माहितीवरून नामदेवांचा जन्म दामाशेटी व गोणाईच्या पोटी शके ११९२ प्रमोदनाम संवत्सरे, कार्तिक, शुक्ल ११, रविवार दिनांक २६ ऑक्टोबर १२७० सूर्योदयास मराठवाड्यातील परभणी नजिकच्या नरसी–बामणी या गावी झाला असा उल्लेख नामदेवांच्या

**अधिक ब्याण्णव गणित अकरा शते। उगवतां आदित्य तेजोराशी ।**

**शुक्ल एकादशी कार्तिक रविवार। प्रमोद संवत्सर शालिवाहन शक।।**

या अभंगात आला आहे. तर 'शिंपीयाचे कुळी जन्म माझा जाला' या अभंगातून नामदेवांनी जन्म, कुळ, व्यवसाय इ. विषयी सांगितले आहे. याबरोबरच नामदेवांना जन्म देणारी गोणाई म्हणते –

**'नवमासवरी म्यां वाहिलासी उदरी।।**

**गोणाई म्हणे नाम्या राहिलासी उदरी । तैहूंनि मी करी आस तुझी।।'**

तर जनाबाई म्हणते –

**'गोणाईने नवस केला। देव पुत्र देई मला**

**शुद्ध देखोनिया भाव। पोटीं आले नामदेव।।'**

अशा काही अभंगांत नामदेवांचा जन्म पंढरपूर येथे झाला असाही उल्लेख आहे.

**नामदेवांचे कौटुंबिक जीवन**

आपल्या इ.स. १२७० ते १३५० अशा ऐंशी वर्षांच्या दीर्घ आयुष्यात भक्तीचे भागवतधर्मी तत्त्वज्ञान समाजाच्या सर्व थरापर्यंत पोहोचविणारे व महाराष्ट्रात नव्हे तर महाराष्ट्राबाहेरही ज्यांनी भक्तिसंप्रदायाचा विस्तार केला त्या नामदेवांचे घर वारकऱ्याचे होते. म्हणून त्यांच्यावर लहानपणापासूनच भक्तीचे संस्कार झाले होते.

विठ्ठलभक्तीत रमलेल्या नामदेवांचे संसारिक जीवन समृद्ध होते. त्यांची पत्नी राजाई, नारा, विठा, गोंदा आणि म्हादा अशी चार मुले, लिंबाई ही मुलगी, आऊबाई ही बहिण आणि लाडाई, गोडाई, येसाई आणि म्हादाई अशा चार सूना याखेरीज आई वडील आणि जनाबाई असे नामदेवा व्यतिरिक्त चौदा माणसांचे ते घर होते. विठ्ठलाचे प्रेम, त्याचा ध्यास, सतत नामस्मरण, सत्संगती, कीर्तन आणि भगवद्चिंतन यातच नामदेवांचे आरंभिचे आयुष्य गेले. नामदेवांचा प्रपंच तर मोठा आणि नामदेवांचे चित्त तर प्रपंचात नाही.

**'चवदा मनुष्ये आहेत माझ्या घरी**

**हिंडती दारोदारी अन्नासाठी ।।'**

ही राजाईची तक्रार व्यर्थ कशी म्हणावी ? पण आईच्या आणि पत्नीच्या तक्रारींना नामदेव कुठची भीक घालणार ?

**आम्ही जेवलो जेवलो। नामामृते तृप्त झालो ।**

अशा संतुष्ट वृत्तीने नामदेव परमार्थाचा मार्ग चोखाळताना दिसतात.

### नामदेव-ज्ञानेश्वर भेट

ज्ञानदेव-नामदेव भेट ही वारकरी संप्रदायातील एक ऐतिहासिक घटना. आळंदी येथे नामदेवांची ज्ञानेश्वरांशी भेट झाली आणि त्यांचे आयुष्य बदलले. भावूक असलेली नामदेवांची भक्ती पुढे अधिक डोळस बनली. नामदेवांना गोरोबाकाकांनी कच्चा ठरवून व विसोबा खेचर यांचेकडे पाठवून दिले. भेटीतील साक्षात्काराने विसोबा खेचर यांना नामदेवांनी गुरु करून घेतले. त्यानंतर ज्ञानदेव-नामदेव यांनी भागवतधर्माचा प्रचार, प्रसार केला. ज्ञानदेवांच्या सहवासास नामदेव आसुसले होते. तर नामदेवांच्या सगुण प्रेमास ज्ञानेश्वर लोभावले होते. पंढरीच्या विठ्ठलाचा हा लडिवाळ भक्त ज्ञानदेव व निवृत्तिनाथांनाही आपल्या संप्रदायात हवा होता. यानंतर पंढरपुरास भीवरेच्या तीरावर ज्ञानदेव-नामदेव यांची भेट झाली. आणि त्यांच्यात अनेक प्रकारची चर्चा होऊन परस्परांना पोषक असे वातावरण तयार झाले. या वातावरणातून पुढे सर्व स्तरातील संतांची एक मालिकाच निर्माण झाली. भक्तिगंगेचा प्रवाह आठरापगड जातींमध्ये पोहोचला व एक प्रकारची आध्यात्मिक लोकशाहीच निर्माण झाली. यातून प्रेरणा घेऊन अनेक संतांनी पुढे अभंगरचना केली.

### पंजाबमधील नामदेवांचे कार्य

महाराष्ट्रात जशी नामदेवांची अंगणवाणी प्रसिद्ध आहे. तशी हिंदी भाषिक प्रदेशात नामदेवांची हिंदी पदावली लोकप्रिय आहे. पंजाबमध्ये नामदेवांचे वास्तव्य इ.स. १३४९ पर्यंत होते. तेथे त्यांनी आपल्या अनेक हिंदी पदांमधून भागवद्‌भक्तीचा मार्ग विशद केला आहे. पंजाबमधील शिखांच्या 'गुरुग्रंथसाहेब' या ग्रंथात नामदेवांची ६३ पदे समाविष्ट आहेत. 'भक्त नामदेव की मुखबाणी' ही नामदेवांची काव्यकृती सर्वांच्या आदरास प्राप्त झाली आहे. त्यात त्यांनी आपल्या शिंपी जातीविषयी, गुरु विसोबा खेचरांविषयी व उपास्यदैवत विठ्ठलाविषयी निर्देश केला आहे. मराठी 'अभंगवाणी' आणि हिंदी 'मुखबाणी' मध्ये नामस्मरणाचा महिमा कर्मकांडाचा निषेध, जाती-पाती न मानने इ. बाबतीत आशयाच्या दृष्टीने साम्य आढळते.

नामदेवांनी उत्तर भारतात अनेकदा पदयात्रा करून कीर्तनाद्वारे साध्या-भोळ्या व अबाल-वृद्ध स्त्री पुरुषांना ईश्वरी भक्तीच्या प्रेमानंदात रंगविले. पंजाबमध्ये असणारा नामदेवसमाज, नामदेव मठ अथवा मंदिरे, त्यांच्या हिंदी अमृतवाणीचा आदरपूर्वक केला जाणारा नित्यपाठ इ. गोष्टी त्याच्या साक्षी आहेत. उदाहरणादाखल 'विठ्ठलमयजगत' ही पदावली पाहू.

**आंनिले कुम्भ भराइले उदक । ठाकूर कऊ इसनानू करवू ।**
**बइआलीस लख जी जल मई होते । बीढलु भैला काइ करऊ ।। १।।**
**जत जाऊ तत बीढलू भैला । महा अनंद करे सद केला ।। १ ।।। ।। रहाऊ ।।**

(श्रीनामदेव : चरित्र, काव्य आणि कार्य : ग. वि. कविटकर)

देवाला ज्या पाण्याने स्नान घालावे त्या पाण्यात अगोदरच बेचाळीस लक्ष जीवांनी स्नान केले होते, पूजेकरिता फुले आणून माळ गुंफली, पण त्यांचा गंध परमेश्वराचा अंश असलेल्या भ्रमरांनी अगोदरच घेतला होता, नैवेद्याला दुधाची खीर केली तर परमेश्वररूपी वासराने ते आधीच उष्टावले होते. असे अनेक दृष्टांत

देऊन नामदेवांनी या पदामधून भगवंतावाचून रिता ठाव नाही, हे स्पष्ट केले आहे. पृथ्वीवरील जळी, स्थळी सर्व ठिकाणी तो व्यापून राहिला आहे. असा जीव–शिव ऐक्याचा वेगळा अनुभव नामदेवांनी घडविला आहे.

**नामदेवांची अभंगवाणी**

नामदेवांच्या नावावर आज जवळजवळ अडीच हजार अभंग उपलब्ध आहेत. उत्कट भाववृत्ती, अभिजात कवित्व, विशाल सामाजिकता, उत्कट सगुणभक्ती, डोळस निर्गुणोपासना, आत्मनिष्ठ भावदर्शन, ईश्वरी साक्षात्कार इ. सर्व गोष्टी नामदेवांच्या अभंगांच्या मुळाशी आहेत. ईश्वरी साक्षात्काराच्या प्रवासातील आणि परमार्थिक वाटचालीतील भावनात्मक अनुभव त्यांनी आपल्या अभंगांत मांडले. त्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे पाहता येईल.

**आत्मचरित्रात्मक अभंग**

मराठीतील पहिले आत्मचरित्रकार म्हणून नामदेवांचा उल्लेख केला जातो. नामदेव गाथेत नामदेवांच्या ४९१ आत्मचरित्रपर अभंगांचा समावेश झाला आहे. नामदेवांनी या अभंगांमध्ये आपल्या जीवनातील सलगपणे नि संपूर्ण घटना प्रसंगांचे चित्रण केले नसले, तरी त्यांनी विविध मानसिकतेतून आत्मचरित्रपर असे काही लेखन केल्यामुळे ते मराठी साहित्यातील आद्य आत्मचरित्रकार ठरतात. या अभंगांमध्ये नामदेवांच्या लौकिक आणि पारमार्थिक जीवनातील संघर्षमय प्रसंगांचे हळुवार चित्रण पाहावयास मिळते. या अभंगांमधून खुद्द नामदेव स्वतःच जन्म, कुळ, गृहजीवन, व्यवसाय व भक्तिमार्ग ते 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी' अशा आत्मसुखप्राप्तीच्या जीवनप्रवासाबद्दल बराच तपशील पुरवताना दिसतात.

विद्यार्थी मित्रहो ! नामदेवांच्या जीवनातील प्रमुख अशा चार प्रसंगांचे निवेदन त्यांच्या आत्मचरित्रपर अभंगांत आले असून त्यातून त्यांच्या आध्यात्मिक अंतरंगाचे दर्शन घडते. ते पुढीलप्रमाणे पाहू या.

१. नामदेवांच्या भक्तीला त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींनी केलेला विरोध.

२. ज्ञानेश्वरादिकांसमोर (नमस्कार न केल्यामुळे) मुक्ताबाईने केलेले अहंकारहरण.

३. 'अंतरिचा कोरा' राहिल्यामुळे गुरूकडे झालेली रवानगी व गुरू विसोबा खेचर यांनी दिलेले दर्शन.

४. 'शतकोटी तुझे करीन अभंग' अशी नामदेवांनी केलेली प्रतिज्ञा.

असे चार प्रसंग उत्कटपणे व तितक्याच निःसंकोचपणे त्यांनी या अभंगांतून मांडले आहेत. नामदेवांना बालपणीच विठ्ठलाने झपाटले आहे. आणि हेच नामदेवांच्या कुटुंबियांना त्यांच्या संबंधीत वाटणाऱ्या दुःखाचे मुळ कारण आहे. आपला नामा पंढरीरायाने भुलविला म्हणून

**अगा ये विठोबा पाहे मजकडे । कां गा केले वेडे बाळ माझे**

अशी गोणाई (नामदेवाची आई) विठ्ठलाबरोबर भांडते. माझे बाळ मला परत दे नाहीतर तुझ्यासहीत

पंढरी गिळून टाकीन, असा आपला निर्धार ती सांगून टाकते. विठ्ठल भक्तीत रमलेले नामदेव आपल्या आईला 'तू आमची ताटातुट करू पाहातेस तू माझी आई नव्हेस' असे सुनावतात. असा हा गोणाई–नामदेवाचा संघर्ष करूणरूप धारण करतो. नंतर नामदेवांची पत्नी राजाई संसारी स्त्रीसुलभ भावनेने पतीचे मन संसाराकडे वळविण्याचा प्रयत्न करते. पतीच्या संसारविन्मुखतेमुळे राजाईच्या मनात भावनांचे आवर्त उभे राहतात.

**लावोनि लंगोटी जालेती गोसावी । आमुची उठाठेवी कोण करी ।**

**सुखाचा संसार करोनि बारा वाटे । नांव केले मोठे जगामाजी ।।**

**सर्वस्वे सांडोनि धरिला तुम्ही देव । येणें पुसिला ठाव संसारीचा ।**

**आमुचि करूणा न वाटेचि काही । विनविते राजाई नामदेवा ।।**

हे राजाईचे उद्‌गार तिच्या स्त्रीसुलभ भावनेचे मनोज्ञ दर्शन घडवितात. असा हा नामदेवाच्या भक्तीने निर्माण झालेला गोणाई–नामदेव, राजाई–नामदेव यांच्यातील सांसारिक कलह वेधक आहे, तसा त्यांच्यातील आध्यात्मिक पेचही वेधक आहे.

ज्ञानदेव–नामदेव भेट ही वारकरी संप्रदायातील ऐतिहासिक घटना. साक्षात विठ्ठलाने दर्शन दिल्याने नामदेवांची सगुणभक्ती वाढीस लागून अहंकाराचे रूप धारण करते. येथे नामदेवांची बद्धावस्था सुरू होते. अशा स्थितीत ज्ञानदेवादी संतांची आणि नामदेवांची भेट होते. 'पंढरीचा प्रेमा घरी आला' म्हणून संत सज्जनांनी नामदेवांना वंदन केले; पण नामदेवांनी मात्र त्यांना प्रतिवंदन केले नाही.

**'नामा म्हणे काय वंदू यांचे चरण । अंगे परब्रह्म मजपाशी'**

नामदेवांनी प्रतिवंदन केले नाही यातील वर्म मुक्ताईने जाणले ती म्हणाली,

**अखंड जयाला देवाचा शेजार। कां रे अहंकार नाही गेला ।**

म्हणून तिने गोरोबाकाकांकडून त्यांची परीक्षा घेतली. गोरोबा काकांनी नामदेवाच्या भक्तीला अद्वैतबोधाचे अधिष्ठान नाही असे सूचविले. त्यामुळे नामदेवांची चित्तशुद्धी झाली.

ज्ञानदेवादी संतांनी केलेल्या अपमानाने नामदेवांना फार दु:ख झाले. त्या दुखातूनच त्यांच्या मनाने देवाकडे ओढ घेतली. 'श्रीगुरुवाचून मुक्ती तुज नाही' असा नामदेवास विठ्ठलाचा दृष्टांत झाला. पुढे संतसंग व नाममंत्र या श्रद्धास्थानांच्या बळावर नामदेवांची साधकावस्थेतील पूर्वतयारी सुरू झाली. देवळात देवाच्या पिंडीवर पाय ठेवून झोपलेल्या वृद्धाच्या माध्यमातून त्यांना गुरू विसोबा खेचरांचे दर्शन होते. साऱ्या सृष्टीत परमेश्वर भरून राहिला आहे. निव्वळ पाषाणमूर्ती म्हणजे देव नव्हे हा खेचरांचा ज्ञानोपदेश नामदेवांनी लक्षपूर्वक ऐकला; आणि त्यांनी आध्यात्मिक जीवनातील गुरूकृपा हा महत्त्वाचा टप्पा गाठला. सर्व सत्ता हाती आल्याच्या अविर्भावात ते पंढरपुरास आले.

वाल्मिकींनी शतकोटी रामायण रचल्याची कथा नामदेवांनी चंद्रभागेच्या वाळवंटात ऐकिली व विठ्ठलापुढे जाऊन त्यांनी शतकोटी अभंग करण्याची प्रतिज्ञा केली. या प्रतिज्ञेला अनुसरून शतकोटी नसली तरी

लाखमोलाची अभंगरचना नामदेवांनी केलेली पाहायला मिळते.

जीवनातील अशा महत्त्वाच्या प्रसंगांचे चित्रण नामदेवांनी या अभंगांत केले आहे. नामदेवांच्या आत्मचरित्रपर अभंगांविषयी नि. धों. मिरजकर म्हणतात. ''नामदेवांच्या परमार्थ जीवनातील विविध अवस्था आपल्या आत्मचरित्रात फार उत्कटतेने त्यांनी रंगविल्या आहेत. प्रारंभिची बालभक्तीतली गाढ निमग्नता, ज्ञानदेवादी भावंडांच्या भेटीने झालेली अपुरेपणाची जाणीव, विसोबा खेचरांनी केलेला गुरूपदेश आणि त्यामुळे दृष्टीला लाभलेले व्यापकपण या साऱ्या जीवनप्रवासाचा वृत्तांत नामदेव आपल्या आत्मचरित्रपर अभंगांतून वर्णन करतात. त्यांच्या वृत्तीचा विकास होत गेलेला त्यातून स्पष्टपणे जाणवतो.'' (संत नामदेव : चरित्र काव्य आणि कार्य - नि. धों. मिरजकर. पृष्ठ ५१)

**नामदेवांचे संतचरित्रपर अभंग**

नामदेवांच्या चरित्रपर लेखनाची प्रेरणा मुख्यत: भक्ती हीच आहे. संतांविषयीच्या भक्तीभावाने नामदेवांनी त्यांच्या चरित्रकथा लिहिल्या आहेत. त्यामुळे मराठीतील पहिले गद्यचरित्रकार म्हणून म्हाइंभट यांचा उल्लेख केला जात असला, तरी काव्याच्या माध्यमातून पहिले चरित्र लिहिण्याचा मान नामदेवांकडे जातो.

भक्तिमार्गाचा प्रसार करण्यासाठी आपल्या भक्तीने ईश्वरास प्रिय झालेल्या अनेक संतांचे आदर्श नामदेवांनी आपल्या अभंगांतून उभे केले. निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताबाई, गोरोबा कुंभार, जनाबाई, नरहरी सोनार, सांवता माळी, परिसा भागवत, सेना न्हावी या संतांची चरित्रे, तर दशावतार, शुक्र-म्हालसेन, हरिश्चंद्र-श्रीयाळ, प्रल्हाद, ध्रुव, सुदाम, भीष्म अशी पौराणिक चरित्रेही त्यांनी लिहिली आहेत.

सुरवातीस ज्ञानदेवादी भावंडांच्या ज्ञानाचे, तेजस्वीतेचे आणि वैराग्याच्या प्रखरतेचे कौतुक नामदेव -

**'तिन्ही देव जसे परब्रम्हीचे ठसे । जगी सूर्य जैसे प्रकाशले'**

अशा मार्मिक, भावपूर्ण आणि प्रभावी शब्दांत करतात. निवृत्तिनाथांविषयी नामदेवांना फार आदर होता. निवृत्तिनाथ हे ज्ञानदेवांचे गुरू आणि वडील बंधू म्हणून सर्व संतांना वंदनीय होते. अशा निवृत्तिनाथांविषयी

**'नामा म्हणे देवा निवृत्तीसारखा योगी**
**नाही आता जगी दाखवाया।।'**

असे गौरवोद्‌गार नामदेव काढतात. वारकरी संप्रदायातील सर्व संत गोरोबांचा आध्यात्मिक अधिकार मानायचे. नामदेवही गोरोबांना मानायचे

**'गोरा जुनाट पै जुने । हाती थापटणे अनुभवाचे**
**परब्रह्म म्हातारा निवाला अंतरी । वैराग्याचे वरी पाल्हाळला।।'**

असा गोरोबांचा ते गौरव करतात.

भागवत धर्माचा पाया रचणाऱ्या ज्ञानेश्वरासारख्या श्रेष्ठ संताचे आणि आपल्या मित्राचे चरित्र नामदेवांनी लिहावे हे स्वाभाविकच होते. 'आदि-समाधी-तीर्थावळी' अशा तीन प्रकरणांतून त्यांनी लिहिलेले 'ज्ञानेश्वरचरित्र' ही महाराष्ट्रातील भक्तभाविकांना मोठीच देणगी होय. या चरित्राची अभंग संख्या सुमारे साडेतीनशे आहे. ज्ञानदेव-नामदेव यांच्यामध्ये असणाऱ्या जिव्हाळ्याच्या नात्यातून नामदेव ज्ञानदेवांना 'ज्ञानराज माझी योग्यांची माउली' असे म्हणून मातेचे स्थान देतात.

नामदेवांनी लिहिलेल्या ज्ञानेश्वर चरित्राच्या साडेतीनशे अभंगांपैकी ६१ अभंग 'आदि' या प्रकरणात आले आहेत. त्यातून नामदेवांनी ज्ञानेश्वरादी भावंडांची 'संन्याशाची मुले' म्हणून समाजाने केलेली हेटाळणी व त्यामुळे ज्ञानदेवांना झालेल्या मनस्तापाचे चित्रण केले आहे. ज्ञानेश्वरांच्या जीवनचरित्राची उपलब्ध माहिती देण्यावर नामदेवांनी यात भर दिला आहे. संन्यासानंतर पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारणाऱ्या विठ्ठलपंतांना एकापाठोपाठ एक अशी चार अपत्य होणे आणि त्यांनीच महाराष्ट्राच्या संस्कृतीची जडणघडण करणे हे सगळे वास्तव नामदेवांनी या प्रकरणात नेमकेपणाने टिपले आहे (अधिक माहितीसाठी ३.३.२.१ हा विभाग पहावा)

नामदेवांच्या 'ज्ञानेश्वरचरित्र' मधील 'तीर्थावळी' हे प्रकरण बासष्ट अभंगां'चे आहे. तीर्थावळीचा प्रारंभ 'नामयाचे भेटी ज्ञानदेव आले' असा होतो. या भेटीत नामदेव ज्ञानदेवांना विनम्र भावाने लोटांगण घालतात. भक्तीभावाने पूजा करतात. नंतर तीर्थयात्रेत सहभागी होण्याविषयी ज्ञानेश्वरांनी नामदेवांना केलेली विनंती, नामदेवांनी श्रीविठ्ठलाची अनुमती घेण्यासंबंधी ज्ञानेश्वरांना केलेली विनंती, दोघांनी विठ्ठलाची घेतलेली भेट, विठ्ठलाने काहीशा अनिच्छेनेच दिलेली अनुमती, नामदेवांच्या वियोगाने विठ्ठलाला व विठ्ठलाच्या वियोगाने नामदेवांना झालेले दुःख, ज्ञानदेव-नामदेवादी संतांनी तीर्थयात्रेला केलेला प्रारंभ इ. वर्णन येते. तीर्थयात्रेत ज्ञानदेवांचे निराकार, निर्गुण, सर्वव्यापी परमेश्वराचे तत्त्वज्ञान नामदेवांना मानवत नव्हते. आपले सर्व सुख विठ्ठलाच्या पायाशी आहे. 'पंढरीनिवास जीवन माझे' असे नामदेव निर्धाराने सांगतात. ज्ञानदेवांच्या आग्रहावरून नामदेवांनी भजन, नमन, ध्यान, श्रवण, मनन, निदिध्यासन या पायऱ्यांसह आपला निवेदन केलेला भक्तियोग, ज्ञान आणि भक्ती यांचा समन्वय साधणारा तीर्थयात्रेतील उभयतांचा उत्कट संवाद, नामदेवांचा ज्ञानदेवांनी मुक्तमनाने, मुक्तकंठाने केलेला गौरव, ज्ञानेश्वर नामदेवादी संतांचे तीर्थयात्रेहून पंढरपूरला झालेले आगमन, प्रदीर्घ वियोगानंतर नामदेव-विठ्ठल यांची झालेली प्रेमभेट, विठ्ठलाने नामदेवास विधीयुक्त उद्यापन करण्याची केलेली सूचना इ. घटनांचे कथासूत्र 'तीर्थावळी' या प्रकरणात पाहावयास मिळते.

ज्ञानदेवांची संजीवन समाधी हा शोकाकुल करणारा करूण प्रसंग नामदेवांनी 'समाधी' या प्रकरणात रेखाटला आहे. समाधी घेण्याचा ज्ञानदेवांचा निर्णय समजल्यानंतर निवृत्तीची अवस्था केविलवाणी झाली. भाऊ आणि गुरू अशा दोन्ही दृष्टींनी श्रेष्ठ असणाऱ्या निवृत्तिनाथाला ज्ञानेश्वरांच्या कर्तृत्वाची आठवण होऊन शोक अनावर होतो. हे पाहून सर्व संत कासाविस होऊन डोळ्यांना पदर लावतात. निवृत्तीची शोकाकुल अवस्था नामदेवांनी

**'बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट। ओघ बारा वाट मुरडताती।**

**हरिणीविण खोपी पडियेली ओस। दशदिशा पाडसे भ्रमताती।।'**

अशा प्रत्ययकारी शब्दांत चित्रित केली आहे. 'नामा म्हणे देवा पेटला हुताशन। करी समाधान निवृत्तीचे' या ओवीतून निवृत्तीचा शोकावेग तर स्पष्ट होतोच, पण नामदेवांचीही व्याकुळता स्पष्ट होते. ज्ञानेश्वरांच्या प्रत्यक्ष समाधीच्या चित्रणात करूणरसाचा परमोत्कर्ष आणि त्यासोबतच धीरगंभीरता अशा दोन्ही भावनांचे संमिश्र चित्रण आले आहे. इंद्रायणीच्या दोन्ही तीरांवर विविधरंगी जरतारी पताकांचे भार, भोवताली सर्व संतमंडळी, ज्ञानदेवांचा हात विठोबाने आणि दुसरा निवृत्तिनाथांनी धरून त्यांना समाधीस्थानाकडे नेताना भोवतालच्या संतांचा समुदाय अनावर दुःखाने कालवून निघतो. त्याचे वर्णन नामदेव -

**नदीचिया माशा घातले माजवन । तैसे जनवन कालवले।।**

**दाही दिशा धुंद उदयास्तवीण । तैसे ची गगन काळवले।।**

अशा समर्पक उपमांच्या मदतीने करतात. 'नामा म्हणे लोपला दिनकर। बाप ज्ञानेश्वर समाधिस्त' या चरणात नामदेवांनी सर्व संतांची कृतज्ञतेची भावना, आदर यांचे चित्रण करूणरसात भिजवून केले आहे. एक मित्र, महान तत्त्वज्ञ संजीवन समाधी घेतो आहे हा प्रसंग नामदेव प्रत्यक्ष अनुभवतात, पाहतात आणि त्या प्रसंगावर करूणरसमय अभंग लिहितात. नामदेवांचे हे अभंग चरित्रकार आणि चरित्रविषय अत्यंत एकरूप झाल्याचे द्योतक ठरतात.

**नामदेवांचे आत्मनिवेदनपर अभंग**

नामदेवांची कविता 'आपला संवाद आपणाशी' या प्रकारातील आहे. त्यामुळे त्यांच्या भावजीवनात्मक अभंगांतून व्यक्त झालेल्या भावभावना ते विठ्ठलाचे लडिवाळ भक्त असल्याची साक्ष देतात. नामदेव अखेरपर्यंत भक्तच राहिले आहेत. विठ्ठलापाशी मुक्ती नको भक्ती हवी असा त्यांचा आग्रह आहे. प्रथमपासूनच भक्ती-जीवन जगणाऱ्या बालभक्त नामदेवांची सारी जीवनयात्राच अशी देवसान्निध्याची आहे. त्यामुळे नामदेवांचे भावकाव्य त्यांच्या भावक्षुब्ध मनाचा उचंबळून आलेला उद्‌गार वाटतो. त्या कवितेविषयी ल. रा. नसिराबादकर म्हणतात. ''अंतर्मुखता, आत्मपरता आणि जिव्हाळा हा नामदेवांच्या कवितेचा गाभा आहे. यातून निर्माण झालेले त्यांचे अभंग अधिक परिणामकारक बनले आहेत. त्यांच्या भावजीवनातले विविध प्रसंग या अभंगांनी टिपून घेतले आहेत. संसाराशी दुरावा, ईश्वराचे प्रेम, ओढ, आर्तता, शरणागती, त्याच्या दर्शनाची तीव्र तळमळ व तो भेटल्यानंतरचा परमानंद असे अनेकविध भाव या अभंगांतून व्यक्त झालेले आहेत. नामदेवांची ही कविता त्यांच्या भावजीवनाशी पूर्णपणे प्रामाणिक राहिलेली आहे.'' (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : ल. रा. नासिराबादकर, पृष्ठ ७९)

'गुरू वाचूनि मुक्ती नाही' असे मनोमन पटलेल्या नामदेवांचा येथे बद्धावस्थेतून साधकदशेत प्रवेश झालेला पाहायला मिळतो. आत्मविकासाच्या प्रेरणेतून आपल्या आयुष्याचा जीवनपट त्यांच्या डोळ्यांसमोर उभा राहतो. संसाराची क्षणभंगुरता जाणवल्याने ते म्हणतात.

**अंतकाळी मी परदेशी । ऐसे जाणोनि मानसी**

**म्हणोनिया ऋषिकेशी । शरण मी तुज आलो.**

संसारात आपले असे खरे कोणीच नसते. सगेसोयरे हे तेवढ्यापुरतेच. अंतकाली ते पाठमोरे होतात. 'एकलेचि येणे एकलेचि जाणे' हाच येथील न्याय आहे. यातूनच 'अंतकाळी मी परदेशी' ही जाणीव त्यांना बोचते. संसाररूपी मायानदीच्या पुरात मी वाहवत चाललो आहे. तरी 'काढी वेगी हरी मायबापा' अशी आर्त विनवणी ते विठ्ठलाला करतात. संसार सोडवत नसल्याची खंत वाटून ते आपल्या मनाला दोष लावताना म्हणतात–

**'अमृताहूनि गोड नाम तुझे देवा । मन माझे केशवा बा नेघे ।**

**सांग पंढरीराया काय करू यासी । का रूप ध्यानासि न ये तुझे।।'**

विषयवासनेने, विकाराने ग्रासलेले चंचल मन विठ्ठलाच्या भेटीला आसुसलेले आहे. त्यामुळेच नामदेवांच्या तोंडून

**'पाहूं द्या रे मज विठोबाचे मुख। लागलीसे भुक डोळा माझ्या'**

असा उद्‌गार बाहेर पडतो.

विठ्ठलाविषयी मातृभावना हे नामदेवांच्या आत्मनिवेदन कवितेचे एक खास वैशिष्ट्ये आहे. लेकराने मातेकडे आशाळभूत नजरेने पाहावे तसे ते विठ्ठलाकडे पाहतात. विठ्ठलाला ते कासवीची स्नेहाळदृष्टी, धेनूचा वत्सल भाव, पक्षिणीची चित्तवृत्ती असे निसर्गसृष्टीतील समर्पक दृष्टांत देतात. विठ्ठलदर्शनाची अपेक्षा करणारे नामदेव अंत:करणातून दाटून आलेल्या विठ्ठल वियोगाच्या दु:खाने शिणतात, थकतात. तू माझी जन्मदात्री आहेस, वडीलधारी सखी आहेस, पक्षिणी आहेस, हरिणी आहेस म्हणून आळवणी करतात. त्यांची विठ्ठलमाउली कृपामय आहे. केवळ स्मरण करताच ती मायेचा प्रेमपान्हा घालते, असा त्यांचा दृढ विश्वास आहे. अशा जीवनरूपी विठ्ठलाची नित्य वाट पाहताना नामदेव म्हणतात –

**'मी तुझे वच्छ तू माझी माउली । वोरसोनि घाली प्रेमपान्हा**

**नामा म्हणे माझी पुरवावी आस । पाजी तान्हुल्यास प्रेमपान्हा ।।'**

इतके करूनही परमार्थिक तळमळ संपत नाही, तेव्हां नामदेव म्हणतात. 'देवा आमच्यासारख्या भक्तांनी तुला थोरपण दिले आहे, ते आमचा पारमार्थिक विकास करण्यासाठी. तेव्हा तू आपले ब्रीद खरे कर.' जगात रोगव्याधी नसल्या तर वैद्याला कोणी विचारले असते काय ? अशा विष्णूदासाचा श्रेष्ठपणा सांगण्यासाठी तळ्याकाठी बसूनही मेघाची वाट पाहणारा चातक, मेघगर्जना ऐकून रानी नृत्य करणारा मोर अशा प्रतिमा नामदेव वापरतात. जळाशिवाय मासोळी राहू शकत नाही, तसा विष्णूदास तुझ्याविना राहू शकत नाही. असे असताना तू त्याला अंतर देतोस.' असा वारकऱ्यांचा कळवळा ते विठ्ठलासमोर मांडतात. नामदेवांचा विठ्ठलाशी सतत असा संवाद चालतो.

नामदेवांची देवाशी असणारी सलगी मोठी भावपूर्ण आहे. ते बालभक्त आहेत, देवाकडून हट्ट पुरवून घेणारे आहेत. देवाशी त्यांचं भांडण सहज होतं. देवाची पतितपावन अशी कीर्ती ऐकूण महाद्वाराशी आलेले नामदेव विठ्ठलाशी प्रेमकलह करून 'जातो माघारा' म्हणून लटकी धमकीही देतात. ती अशी –

**पतितपावन नाम ऐकोनि आलो मी द्वारा ।**

**पतितपावन नव्हेसी म्हणुनि जातो माघारा ।**

**घ्यावे तेव्हा द्यावे ऐसा अससी उदार ।**

**काय धरूनि देवा तुझे कृपणाचे दार ।**

**सोडा ब्रीद देवा आता नव्हेचि अभिमानी ।**

**पतितपावन नाम तुझे ठेवियले कोणी ।**

**झेंगट घेऊन हाती दंवडी पिटीन तिंही लोकी ।**

**पतितपावन देवा परि तू मोठा घातकी ।**

**नाम म्हणे देवा तुझे न लागें मज काही ।**

**प्रेम असों दे चित्ती म्हणुनि लागतसे पायी ।।**

(अभंग क्र. १६३१)

असे त्यांचे विठ्ठलाशी नाते निर्व्याज, निरागस असलेले त्यांच्या अभंगांतून प्रत्ययाला येते. या प्रेमकलहाबद्दल विठ्ठलाने आपल्याला समजावून घ्यावे. कारण खुंट्याभोवती फिरून स्वत:ला गुंतवून घेणाऱ्या वासराप्रमाणे आपण त्याच्या भावात गुंतलो आहोत. तरी आपला स्वीकार व्हावा असे ते म्हणतात.

नामदेवांच्या मनावर असलेली अशी निराशेची दाट छाया एक दिवस निघून जाते आणि त्यांच्या जीवनात चैतन्याचा प्रकाश येतो. ईश्वरदर्शनाने, साक्षात्काराने फुललेली आपली भाववृत्ती नामदेव

**तू अवकाश मी भूमिका । तूं लिंग मी साळूंका**

**तू समुद्र मी द्वारका । स्वयें दोन्ही ।।**

अशा प्रभावी शब्दांत व्यक्त करतात. अनंतत्वाशी झालेली एकरूपता व देव आणि आपण म्हणजे भक्त या दोन गोष्टी नसून एकच आहेत, असा लोकविलक्षण अनुभव ते व्यक्त करतात. परमेश्वराशी एकरूप झाल्यानंतर येणाऱ्या परमोच्च अनुभवाची प्रचिती किती उत्कट आणि काव्यपूर्ण होऊ शकते, याचा पुरावाच या अभंगातून मिळतो. 'नामदेवांचे अनुभव आणि काव्य 'स्वयें दोन्ही' येथे एकरूप झालेले आहेत'. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल.रा. नासिराबादकर, पृष्ठ क्र. ८०)

ईश्वरतत्वाशी एकरूप झालेले नामदेव कोठेही गेलो तरी नाममहिमा सोडणार नसल्याचा निश्चय करतात. श्वान, पक्षी, झाड, पाषाण, उदक अशा कोणत्याही रूपात जन्म मिळाला तरी 'विठ्ठलाचे सान्निध्य तरी लाभावे' अशी इच्छा व्यक्त करतात. (ही इच्छा त्यांनी समाधीसमयी महाद्वाराच्या पायरीशी आपला देह समर्पित करून स्वत:च पूर्ण करून घेतली आहे.)

आर्ततेच्या सर्व सीमा ओलांडल्या गेल्यावरही त्यांचा निश्चय कोठे ढळलेला नाही.

**'देहे जावो अथवा राहो । पांडुरंगी दृढ भावो ।'**

असे म्हणून स्वत:ला कायावाचामने पांडुरंगाच्या स्वाधीन करतात. असा पांडुरंगाचा धावा करता करता देवाच्या भेटीचा तो मंगलप्रसंग येतो. नामदेवांना देवदर्शन घडते. विठ्ठलाची आपल्यावर कृपा होऊन भेट झाली या भेटीचा आनंद नामदेव –

**त्वरे धावोनिया आलासे गोविंद । सावध सावध नामदेव**

**रूसलासी नामा देवासी न बोले । करे कुर्वाळीले वदन तेव्हा**

**समजावूनि देवे धरिला पोटासी । बोले मजपाशी नामदेवा**

अशा शब्दांत व्यक्त करतात.

नामदेवांच्या या आत्मनिवेदनपर अभंगांत संसारपराङ:मुखता, देवासाठी आर्त तळमळ, विठ्ठलाशी प्रेमकलह, विठ्ठल आणि नामदेव यांची उराउरी भेट यांचे भावसुंदर वर्णन आलेले आहे. या अभंगांतून देवासाठी जीव टाकणारे, त्यांच्या भेटीसाठी आसूसलेले आणि देवदर्शनाने हरकून गेलेले नामदेव आपल्या डोळ्यांसमोर उभे राहतात.

**नामदेवांचे बालक्रीडेचे अभंग**

प्राचीन मराठी कवितेत सर्वच संतांनी श्रीकृष्णाच्या बाललीला वर्णिल्या आहेत. पंढरपूर येथील विठ्ठल म्हणजे श्रीकृष्णाचे रूप असल्यामुळे त्याच्या बालपणापासून ते यौवनावस्थेपर्यंतचे कृष्णजीवनातील विविध प्रसंग नामदेवांनी या अभंगांतून टिपले आहेत. श्रीकृष्णाचे मनोहारी रूप, त्याच्या खोड्या, खोड्यांनी त्रासलेल्या गोपींनी यशोदेकडे त्याच्याविषयी केलेल्या कागाळ्या, यशोदेने गोपीची काढलेली समजूत, श्रीकृष्णाने गोपाळांच्यासह यमुनाकाठावर केलेली क्रीडा, कालियामर्दन, श्रीकृष्णाच्या बालपणीच्या पराक्रमाची अद्‌भूत कृत्ये व श्रीकृष्ण मथुरेला जाताना व गेल्यावर गोपींची व साऱ्या गोकुळाची झालेली विराहावस्था इ. प्रसंग नामदेवांनी या अभंगांत वर्णिले आहेत.

**आक्रुरा आम्ही पसरितो पदर। नेऊ नका श्रीधर मथुरेसी**

**आणि**

**युगोबरोबरी जाताती घटिका । उदास दिसती वने दाही दिशा**

**रोडावल्या गायी करिताती खंती । वत्से न करिती स्तनपान**

**अन्नपाणी तेव्हा वर्जिती गौळणी । आता चक्रपाणी कैंचा आम्हां ।।**

अशा शब्दांत नामदेव हे प्रसंग वर्णन करतात.

गोपिका वस्त्रहरणासारखी रोमांचकारी शृंगार कथा नामदेव एका अभंगात हकिगतवजा सांगून टाकतात. त्यात त्यांचे मन फारसे रमत नाही. पण

**तळवे तळहात टेकींत, डाव्या गुडघ्या रांगत।**

**रंगणी रंगनाथ । तो म्यां देखिला सये ।।१।।**

**गवळणी जसवंती पै सांगे । आले या कृष्णाचेनि मात्रें।**

**येणे येणे वो श्रीरंगे । नवनीत माझे भक्षिले ।।२।।**

असे येणाऱ्या कृष्णाचे वात्सल्यभावाने कौतुक करणाऱ्या गवळणींच्या मनोवृत्तीशी मात्र नामदेव पूर्णपणे रंगून जातात. वारकऱ्यांच्या कीर्तनात अशा गवळणींच्या कथा रंगलेल्या दिसतात. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास: प्र. न. जोशी, पृष्ठ १०९)

**नामदेवांचे उपदेशपर अभंग**

विठ्ठलावरती लोभावलेल्या नामदेवांनी त्याला आपल्या बालपणीच वश करून घेतले असल्यामुळे त्यांना लौकिकाची चाड राहिली नाही. बरोबरीची मुले संसारात असताना हे मात्र त्यापासून अलिप्त राहून विठ्ठलाच्या सगुणरूपाकडे आकर्षिले गेले. शिवण्या-टिपण्यावर पाणी सोडलेल्या नामदेवांची ईश्वरभक्ती दामाशेटी, गोणाई, राजाई यांच्या चिंतेचे कारण बनली.

तत्कालीन समाजात धर्माचे अवडंबर माजले होते. खरा धर्म ग्रंथापुरताच मर्यादित राहिला होता. ढोंगीसाधू भोळ्या भाविकांना फसवित होते. जातीभेदांनी विभागलेल्या समाजात कर्मकांडाचे प्रभुत्व होते. वैदिक धर्माच्या उज्ज्वल परंपरेस कर्मठता व पढिक पांडित्य यांनी काळिमा फासला होता. कर्मकांड, यज्ञयाग, जारण-मारण, उग्रउपवास, तप, उद्यापने, व्रतवैकल्ये यातच सर्वांचा वेळ जात होता. हेमांड पंडितांच्या 'चतुर्वर्गचिंतामणी'त सांगितलेली दोन हजार व्रते यांचा चांगला पुरावा आहे. सर्वसामान्यांची धार्मिक कुचंबना होत होती. विविध देवता, धर्म यांचे प्रस्थ माजले होते. हे सर्व नामदेव उघड्या डोळ्यांनी पाहात होते. त्यामुळे ते घरातील संसार अर्ध्यावर सोडून विश्वाचा संसार करण्यास घराबाहेर पडले.

'कीर्तन' आणि 'नामस्मरण' ही दोन प्रभावी माध्यमे नामदेवांनी वापरून साधा-सोपा भक्तिमार्ग सर्वसामान्यापर्यंत पोहोचविला. प्रारंभी धार्मिक उपदेश करताना शैव आणि वैष्णव यांच्यामध्ये अद्वैत साधून 'हरिहरा भेद अमंगळ' मानला. देव हा एकच आहे आणि तो सर्वत्र भरलेला आहे. हा वैष्णवांचा आवडता सिद्धान्त आहे. हे सांगताना शिव आणि विष्णू यांच्या अद्वैताविषयी नामदेवांनी केलेला निवाडा खालील

अभंगात पाहायला मिळतो. तो असा.

**विष्णुसी भजला शिव दुरावला । अध:पात जाला तया नरा ।**

**शिवपूजा करी विष्णुसी अव्हेरी । तयाचिये घरी यम नांदे ।**

**विष्णूकथा ऐके शिवासी जो निंदी । तयासी गोविंद ठाव नाही ।**

**नामा म्हणे शिवविष्णुमूर्ती एक । वेदाचा विवेक आत्माराम ।।**

असा हा देव एकत्वाने पंढरीत वसला आहे. त्यासाठी पंढरीची वारी करा, कारण पंढरीच्या वारीतच मोक्ष हाती येईल. वैष्णवजन व्हा, भक्त व्हा, देवाचे नाम घ्या. हा नामदेवांनी केलेला उपदेश माणसाला आदर्शप्रत नेणारा आहे.

नामदेव कीर्तनाच्या माध्यमातून भक्तीचा उपदेश करता करता परस्त्री मातेसमान मानावी, परद्रव्य पाषाणासारखे समजावे, दुसऱ्यांची निंदा करू नये, आपली निंदा केल्यास द्वेष धरू नये, दुसऱ्याच्या दु:खाने कळकळावे, दुसऱ्यासाठी प्रसंगी प्राणाचे बलिदान द्यावे, इ. नैतिक उपदेशही करतात. नरदेह दुर्लभ आहे, तो मोठ्या सायासाने मिळालेला आहे. संधी मिळाली आहे तोवर उपयोग करून घ्या; आणि देवभक्तीची त्वरा करा असे ते कळकळीने सांगतात.

**नामदेवांची स्फूटरचना**

नामदेवांचे स्फूट अभंग म्हणजे प्राचीन मराठीमधील पहिली भावकविता आहे. या कवितेतील भाव अर्थातच भक्तीचा आहे. या भक्तीच्या विविध आणि मधुर छटा त्यांच्या आरती, भूपाळ्यांमध्ये साठविलेल्या आहेत.

'युगे अठ्ठावीस विटेवरी उभा। वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा' ही त्यांची आरती तर सर्वतोमुखी आहे. 'आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा। माझिया सकळा हरिच्या दासा' हे पसायदान म्हणजे 'हा विश्वचि माझा संसार' अशा मानवतेच्या व व्यापकवृत्तीतून प्रगटलेला नामदेवाच्या मनाचा आरसाच म्हणता येईल. आपल्या विठ्ठलमय होऊन गेलेल्या मनाची स्थिती नामदेव पुढीलप्रमाणे प्रकट करतात.

**तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल । देव विठ्ठल देवपूजा विठ्ठल ।।**

**माता विठ्ठल पिता विठ्ठल । बंधु विठ्ठल योग विठ्ठल ।।**

**गुरु विठ्ठल गुरुदेवता विठ्ठल । निधान विठ्ठल निरंतर ।।**

**नामा म्हणे मला विठ्ठल सापडला । म्हणून कळिकाळा पाड नाही ।।**

अशाप्रकारे नामदेवांच्या अभंगांमध्ये भक्तीची आर्तता व जिव्हाळा ओतपोत भरलेला आहे.

**उपसंहार**

नामदेव हे वारकरी संप्रदायातील एक लोकप्रिय संत कवी आहेत. विठ्ठलाचे नामसंकीर्तन करणारी

त्यांची अभंगवाणी भागवतधर्मीय संतसज्जनांना अधिक प्रिय होती. नामदेवांच्या कवित्वाचा मुख्य उद्देश विठ्ठलाला वश करण्याचा आहे. नामदेवांच्या अभंगांविषयी शं. गो. तुळपुळे म्हणतात. ''हरिनामाचा महिमा गावा, भक्ती वाढवावी आणि हरिदासांना सकल्प आयुष्य व संतमंडळीस सुख चिंतावे, यापरता अन्य हेतू मनात ठेवून नामदेवांनी ग्रंथरचना केली नाही.'' (पांच संतकवी: शं. गो. तुळपुळे, पृष्ठ १७२). महाराष्ट्रातील भक्तीपंथाचे जे तत्त्वज्ञान सिद्ध झाले. ते तत्त्वदर्शन ज्ञानदेवांनी आपल्या कवितेतून घडविले, तर ज्ञानेश्वरांच्या परमार्थ प्रांतातले किंकरत्व पत्करणाऱ्या नामदेवांनी तत्त्वविस्तार केला. हे संत बहिणाबाईंच्या

**ज्ञानदेव रचिला पाया । उभारिले देवालया ।**

**नामा तयाचा किंकर । तेणे केलासे विस्तार ।।**

या उद्गारातून अधिक सूचित होते. नामदेवांनी आपल्या अभंगांतून परमार्थ क्षेत्रातील आर्त, जिज्ञासू, अथार्थी आणि ज्ञानी या चारही पायऱ्या पार करून आत्महित केल्याचे जाणवते. नामदेवांची एकूणच कविता ईश्वरनिष्ठा जोपासणारी, ईश्वरतत्त्वाशी सतत संवाद साधणारी आणि ईश्वराशी एकरूप होण्याची इच्छा बाळगणारी आहे. प्रारंभी शरीराने प्रपंचात आणि मनाने परमार्थाकडे असणारी नामदेवांची वृत्ती शेवटी कायावाचामने परमार्थाकडे झुकलेली पाहायला मिळते.

विठ्ठल हा नामदेवांचा प्राणसखा आहे. विठ्ठलाविषयी त्यांच्या मनात मातृभाव आहे. म्हणून ते विठ्ठलाला जननी, धेनू, पक्षिणी, कासवी अशी मातृरूपे देतात. प्रसादिक भाषेत असलेले नामदेवांचे अभंग विविध प्रतिमा-अलंकारांनी नटलेले आहेत. नामदेवांचा एकेक अभंग म्हणजे उत्कृष्ट 'भावगीत' आहे असे म्हणण्यास हरकत नाही. विद्यार्थी मित्रहो !

**घालीन लोटांगन वंदीन चरण । डोळ्यांनी पाहीन रूप तुझे ।**

**प्रेमे अलिंगन आनंदे पूजीन । भावे ओवाळीन म्हणजे नामा ।।**

भागवत संप्रदायातील कोणताही उत्सव सोहळा नामदेवांच्या वरील भावोर्मींची आळवणी केल्याविना संपत नाही. देवाच्या भेटीला लोटांगण घालीतच जायचे, देवाचे समचरण हाती लागल्यावरच ते लोटांगणं थांबायचे, तोआनंद मनात मुरत असतानाच दोन्ही डोळ्यांत देवाचे सुकुमार सावळे रूप साठवायचे, त्या अवस्थेतच देवाला अलिंगन द्यायचे आणि भानावर येताच त्याची पूजा करायची, त्याला ओवाळायचे. या ध्यासाचा सहजोद्गार म्हणजे हा अभंग. नामदेवांनी आपल्या अभंगांतून भाविकांचा क्रमबद्ध भावक्रियेचा आविष्कार घडविला आहे. नामदेवांचा प्रत्येक अभंग म्हणजे त्यांच्या काव्यसौंदर्याचे भिन्न भिन्न पैलू आहेत. याविषयी हे.वि. इनामदार म्हणतात. ''नामदेव हे थोर भक्त होते, तसेच ते कुशल संघटकही होते. वारकरी सांप्रदायाच्या संघटनेचे कार्य त्यांनी ज्ञानेश्वरांच्या हयातीत तर केलेच; पण ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्यानंतरही ५० वर्षे महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर नामदेवांनी विठ्ठल भक्तीचा ध्वज फडकविला.'' (संत नामदेव : इनामदार हे. वि., पृष्ठ क्र. १६९)

मराठीतील पहिले पद्यचरित्रकार, भावकवी, आत्मचरित्रकार, भागवत धर्माचे पहिले संघटक, प्रचारक, कीर्तनपरंपरेचे आद्य प्रवर्तक अशी नामदेवांच्या व्यक्तिमत्त्वाला बिरूदे लागलेली पाहायला मिळतात.

## समकालीन संत कवी

### ३.३.३ संतमेळ्यातील इतर कवी

विद्यार्थी मित्रांनो ! मागे आपण वारकरी संप्रदायाचा पाया रचनारे संत ज्ञानेश्वर आणि त्याचा विस्तार करणारे संत नामदेव यांच्या अभंगांचे स्वरूप पाहिले. संतांची ही अभंगवाणी महाराष्ट्राचे आणि मराठी भाषेचे परमभूषण आहे. तिचा उगम निवृत्तिनाथ म्हणजे ज्यांनी भागवत धर्मरूपी मंदिराचा पाया रचला त्या ज्ञानेश्वरांचे गुरू आणि त्याची परिणती मंदिरावर कळसरूप झालेल्या तुकारामशिष्य निळोबाराय यांच्यात झालेली पहायला मिळते. या अभंगवाणीच्या पायापासून ते कळसापर्यंतच्या अवकाशात अनेकांनी आपआपले सूर मिळवत तिला आपआपल्या प्रतिभेचे लेणे अर्पण करून समद्ध केले आहे. त्यात ज्ञानदेव, तुकारामांसारखे चित्सूर्य आहेत. भक्तिमार्गाचा पुरस्कार करणारे भक्त श्रेष्ठ नामदेव आहेत. तिला मजबूत खांब देणारे संत एकनाथ आहेत, संत चोखामेळ्यासारखे पायिक आहेत, आपला व्यवसायच विठ्ठलमय करून टाकणारे नरहरी सोनार व सांवता माळ्यासारखे वारकरी आहेत. मुक्ताबाई, जनाई सारख्या साध्याभोळ्या स्त्रिया आहेत. या अभंगवाहिनीला वेगळ्या मार्गाने येऊन मिळालेला एखादा रामदासी खळाळही दिसतो. अशा अखंड वाहणाऱ्या विविध निर्झरांनी अभंगवाणीची पवित्र गंगा दुथडी भरून वाहताना दिसते.

ज्ञानेश्वरांच्या भारदस्त व्यक्तिमत्त्वाने व नामदेवांच्या कुशल संघटकतेने अबालवृद्धांना भारलेले होते. ज्ञानदेव, नामदेवांनी उभारलेल्या वारकरी संप्रदायात पुढे अठरा पगड जातीचे लोक सहभागी झाले. ज्यांनी जातीयवाद आणि कर्मकांडाला मूठमाती देऊन 'रामकृष्ण हरी' हा षडाक्षरी मंत्र आळवत आपल्या व्यवसायातच परमेश्वर प्राप्तीचा मार्ग शोधला. 'हाती काम मुखी नाम' हे या संतकवींचे ब्रीद होते. याला अनुसरून संसारात व व्यवसायात राहून परमार्थ साधता येतो त्यांनी दाखवून दिले. ज्ञानेश्वर – नामदेवादी कवितेतून जे विचार भाव मांडले गेले, त्याचे प्रतिध्वनी संतमेळ्याच्या काव्यातून उमटून मराठी भावकविता येथून दुथडी भरून वाहू लागली. या संतमेळ्यातील कवी आधी संत होते व नंतर कवी होते. या संतमेळ्याविषयी विठ्ठल अनंत कुलकर्णी म्हणतात. ''वसंतऋतू प्राप्त झाला म्हणजे असंख्य तरूलता पल्लवित व पुष्पित होतात. त्याप्रमाणे एखादा महापुरुष उदयाला आला म्हणजे त्याच्या स्फूर्तीने अनेक लहान मोठे लोक निर्माण होतात. असाच प्रकार मराठी वाङ्मयात झालेला आढळून येतो. श्री ज्ञानेश्वर – नामदेवांनी जो ज्ञानभक्तीचा संप्रदाय स्थापन केला त्यात पुष्कळ लहान मोठ्या अधिकाराचे संत उत्पन्न झाले.'' (मराठी काव्यसमीक्षा : विठ्ठल अनंत कुलकर्णी, पृष्ठ क्र. ५०). चंद्रभागेतीरी हा संतमेळा हरिनामाच्या गजरात स्वत:ला विसरू लागला. आणि सांस्कृतिक जीवनात एका नव्या आध्यात्मिक व धार्मिक लोकशाहीचा जन्म झाला. या संतमेळ्यातील काही प्रमुख संत पुढीलप्रमाणे –

**गोरा कुंभार : (इ.स. १२६७ – १३०९)**

संत गोरा कुंभार यांचा जन्म इ.स. १२६७ मध्ये पंढरपूर परिसरातील 'तेरढोकी' या गावी झाला. ते व्यवसायाने कुंभार होते. संतमंडळात ज्ञानदेव पंचकानंतर गोरोबाचा विचार केला जातो. वयाने वडील असल्याने संतमंडळात त्यांना सर्वजण 'गोरोबा काका' म्हणत. गोरोबांचा परमार्थमार्गातील अधिकार मोठा असल्याने ज्ञानदेवादी भावंडांच्या भेटीस आलेल्या नामदेवांचा 'हा घट कच्चा की पक्का' ठरविण्याचे काम त्यांच्याकडे आले. त्यांनी अनुभवाचे थापटणे थापटून नामदेवांचा घट कच्चा असल्याचा निवाडा केला. आणि त्याप्रसंगापासून नामदेवांची सगुण भक्ती डोळस झाली. 'गोरा जुनाट पै जुना । हाती थापटणे अनुभवाचे' असे खुद्द नामदेवांनी गोरोबाकाकांविषयी गौरवोद्‌गार काढलेले आहेत. कर्तव्यकर्माने आलेल्या व्यवसायामध्ये माती मऊ करण्याकरिता, तीमध्ये नाचताना मुखाने ते विठ्ठलाचे नामस्मरण करावयाचे.

**विठ्ठलाचे नाम स्मरे सर्वकाळ। नेत्रीं वाहे जळ सद्‌गदित'**

अशी गोरोबांची स्थिती होत होती. गोरोबा सदासर्वकाळ हरिभक्ती करीत असल्याने माती तुडविता तुडविता 'ब्राह्मनंदी टाळी लागली' व मातीबरोबर त्यांनी मूलही तुडविले, अशी आख्यायिका सांगितली जाते. पत्नी संती ने घातलेली आण ते आयुष्यभर पाळत राहिले.

गोरोबांचे एकूण अभंग अवघे वीस–एकवीस आहेत. त्यापैकी निम्मे अभंग त्यांनी नामदेवांना उद्देश लिहिलेले आहेत. या अभंगांवरून नामदेव आणि त्यांच्यात एकप्रकारचा जिव्हाळा निर्माण झालेला दिसतो. या जिव्हाळ्यातूनच त्यांनी पारमार्थिक अनुभवांच्या गूजगोष्टी केलेल्या पाहायला मिळतात.

**''अंतरीचे गूज बोलूं ऐसे काही । वर्ण व्यक्त नाही, शब्द शून्य**
**जयजय झनकुट जयजय झनकुट । अनुहात झांगट नाद गर्जे**
**परतल्या श्रुति म्हणती नेति नेति । त्याही नादा अंती स्थिर राहे**
**म्हणे गोरा कुंभार सत्रावीचे नीर । सेवि निरंतर नामदेवा ।।''**

यासारखी गुढवादी अनुभवाची नोंद करताना गोरोबांची कविता अनाहत नाद ऐकिल्याचे सांगते. आत्मतत्त्वाचा साक्षात्कार हा श्रेष्ठ दर्जाचा गूढवादी अनुभव. या अनुभवातूनच ते नामदेवांना मार्गदर्शन करताना दिसतात. असे काही गूढवादी अनुभव सोडले तर गोरोबांची कविता ही कष्टकऱ्याची, कारागिराची कविता असलेली पाहायला मिळते.

**देवा तुझा मी कुंभार । नासी पापाचा डोंगर।**
**ऐशा संतप्त हो जागती । घडे साधूंची संगती**
**म्हणे कृपा भगवंताची । गोरा कुंभार मागे हेचि ।।**

अशी आपल्या व्यवसायाची ओळख करून देणाऱ्या गोरोबांच्या कवितेला एक वेगळी उंची लाभते ती तीमधील प्रासादिकतेमुळेच. गोरोबांची कार्यसंस्कृतीचा गौरव करणारी ही कविता तत्कालीन मराठी समाजाला कार्यप्रवृत्त करणारा वस्तूपाठच आहे.

संतांचे अभंग हे सर्वसामान्यांना, अज्ञजनांना वेळोवेळी उपदेश करतात, तसे ते भक्तांनाही उपदेश करतात. गोरोबा ही त्याला अपवाद नाहीत.

**मुकीया साखर चाखाया दिधली । बोलता हे बोली बोलवेना ।**

**तो काय शब्द खुंटला अनुवाद । आपुला आनंद आधाराचा ।**

**आनंदी आनंद गिळूनि राहणे । अखंडित होणं न होतिया ।**

**म्हणे गोरा कुंभार जीवन्मुक्त होणे । जगं हे करणे शहाणे बापा ।**

साखर गोड असतें खरी, पण मुक्या माणसाला ती खायला दिली तर तिची गोडी तो काय वर्णन करणार ? त्याचं बोलणं थांबतं. मग तो आत्मानंद काय वर्णन करणार ? त्या आनंदात गुंतून राहाणव्यतिरिक्त दुसरा पर्याय त्याला सापडत नाही. पण भक्तानं ईश्वरप्राप्तीची सिद्धावस्था प्राप्त झाल्यानंतर तिथंच स्वत:ला गुंतवून न ठेवता, त्यानं अखेरची जीवन्मुक्तावस्था अनुभवली पाहिजे. व स्वत:ला झालेला आनंद जगाला दिला पाहिजे. आपल्या अज्ञानी बांधवांना शहाणं करावं अशीच मनीषा गोरोबांची या अभंगातून दिसते. सात्त्विक ज्ञानानुभवाचा खजिना हा या अभंगाचा विशेष आहे.

देहातीत अवस्थेचे वर्णन करताना गोरोबांच्या कवितेची भाषा गूढ बनते. 'केशवाचे भेटी लागले पिसे। विसरले कैसे देहभान' अशी साक्षात्कारी अनुभव घेतलेल्या योग्याची अवस्था गोरोबा वर्णन करतात.

तत्त्वचिंतन हा गोरोबांच्या अभंगांचा गाभा आहे. ईश्वरनिष्ठा आणि ईश्वरमय होण्याची तळमळ हा त्यांच्या कवितेचा स्थायीभाव असल्याने त्यांच्या कवितेला एक वेगळी उंची प्राप्त होते. श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व विशद करणारे गोरोबांचे लोकप्रिय अभंग प्रसिद्ध गायकांनी आपल्या सुमधूर आवाजात स्वरबद्ध केले आहेत.

**सांवता माळी (इ.स. १२५० – १२९५)**

आपल्या कर्तव्यकर्मावर विश्वास ठेवणारे आणि आपला सबंध माळी व्यवसायच हरिरूप मानणारे एक थोर संत म्हणजे सांवता माळी होय. पंढरपुरापासून दहा मैलांवर असलेल्या मोडलिंबाजवळील 'अरणभेंडी' या गावी इ.स. १२५० मध्ये त्यांचा जन्म झाला. त्यांचे सर्वच कुटुंब विठ्ठलभक्तीत रमले होते. सांवताची पत्नी सांवताना ईश्वरदर्शनासाठी पंढरीस जाण्यास विनवनी करीत असे. पण सांवता विठ्ठल पंढरीतच नाही तर तो सर्व वस्तू, सर्व प्राणी यांच्यामध्ये भरून राहिला आहे असे समजावीत असत. अशा संत सांवताचे भक्तीने भरलेले एकूण सदतीस अभंग गाथेत उपलब्ध आहेत. सांवता माळी आपल्या व्यवसायातच भक्तीचे फुलझाड फुलविताना म्हणतात –

**कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ।।**

**लसूण मिरची कोथंबिरी । अवघा झाला माझा हरि ।।**

**मोट नाडा विहिर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ।।**

**सांवता म्हणे केला मळा । विठ्ठलापायी गोविला गळा ।।**

असा आपला सारा संसारच ते विठ्ठलमय करून टाकतात. मळ्यातील प्रत्येक वस्तूमध्ये श्रीहरी भरून राहिला आहे, अशी त्यांची धारणा आहे.

सांवता विठ्ठलाचे निस्सिम भक्त असल्याने त्यांचे सर्व कुटुंबच भक्तीमय वातावरणात वावरत होते. त्यांची आठ वर्षांची मुलगीही विठ्ठलभक्तीत रमली होती. तिने आपल्याला विठ्ठल भेटावा म्हणून हट्ट धरला. विठ्ठलासाठी ती कडक उपास-तपास करू लागली. ती काही खाईना की पिईना, मुखाने अखंड भजन चालूच होते. मातापित्यांनी खूप समजाविले पण ती ऐकेना, हळूहळू ती अशक्त होऊ लागली, तिला बसल्या जागेवरून उठवेना, सांवताने विठ्ठलाची प्रार्थना केली, शेवटी विठ्ठलाला आपल्या भक्ताची दया आली. तो सगुणरूपाने रात्रीच्यावेळी सावंताच्या झोपडीत प्रगट झाला. विठ्ठलाला पाहून सांवता, त्याची पत्नी व मुलगी या सर्वांना धन्यता वाटली. सांवता म्हणतात -

**विकसला नयन स्फूरण आले बाही । दाटले ऱ्हदयी करूणाभरिते**

**जातां मार्गी भक्त सावता तो माळी । आला तयाजवळी पांडुरंग**

**माथा ठेवूनि हात केला सावधान । दिले अलिंगन चहूभुजी**

**चरणी ठेवूनि माथा विनवितो सावता । बैसा पंढरीनाथा करिता पूजा ।।**

तिघांनी मनोभावे पूजा केली. अशाप्रकारे विठ्ठल त्यांना भेटला.

एकनिष्ठेने श्रीहरीला भजल्यावर कोणताही दोष उरत नाही हे सांवताच्या उदाहरणावरून पटते. आपल्या हीन यातीबद्दल विषाद वाटण्याऐवजी त्यांना आनंदच वाटतो. आपल्या हीन यातीबद्दल परमेश्वराने क्षमा करून आपल्यावर कृपा करावी असे सांगताना सांवता एका अभंगात म्हणतात -

**भली केली हीन याती । नाही वाढली महंती ।।**

**जरी असता ब्राह्मण जन्म । तरी हे अंगी लागते कर्म ।।**

**स्नान नाही संध्या नाही । यातिकूळ संबंध नाही ।।**

**सावता म्हणे हीन याती । कृपा करावी श्रीपती ।।**

सोवळ्या-ओवळ्याचे पाश तोडणाऱ्या सांवताच्या मनाच्या मोठेपणाचे लक्षण या अभंगातून जाणवते. हे उदाहरण म्हणजे तत्कालीन सामाजिक, धार्मिक स्थितीतील विषमतेचे बोलके उदाहरण आहे. असा आपल्या

हीन यातीबद्दल अभिमान बाळगणारे सांवता आणखी एका अभंगातून -

**नको तुझे ज्ञान नको तुझे मान । माझे आहे मन वेगळेची ।।**

**नको तुझी भुक्ती नको तुझी मुक्ती । मज आहे विश्रांती वेगळीच ।।**

**चरणी ठेवूनि माथा विनवीतसे सांवता । ऐका पंढरीनाथा विज्ञापना ।।**

वरील शब्दांतून सांवता देवाजवळ मागणे मागतात. सांवताच्या या मागणीविषयी ल. रा. पांगारकर म्हणतात - ''मला ज्ञान नको, मानसन्मान नको, भुक्ती नको, मुक्ती नको, एक तुझी निर्मळ भक्ती पाहिजे; ''स्नान नाही संध्या नाही । यातिकुळसंबंध नाही '' असा मी हीन याती पामर तुलाच सतत हृदयी बाळगणारा आहे. असे त्यांनी अभंगातून म्हटले आहे. गौळियांच्या भक्तीला भुलून परतंत्र झालेला व विटेवर उभा राहिलेला हा परब्रह्मपुतळा ! त्याजवरून 'तनुमनाची कुरवंडी' करून त्याच्या प्रेमात व नामचिंतनात अहोरात्र तन्मय होऊन राहणे, यापरते मला काही नको असे त्यांचे मागणे आहे.'' (मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला, ल. रा. पांगारकर, पृष्ठ ४६०)

गोरा कुंभार काय किंवा सांवता माळी काय त्यांच्या आयुष्यातील चमत्कारांपेक्षा त्यांच्या अभंगांतून प्रकट होणारी सामाजिक जाणीव आणि भक्तीची तीव्रता यांचेच मोल अधिक मानावे लागेल. अत्यंत साधी प्रेमळ वाणी आणि भावनावेग ही सांवतांच्या अभंगांची वैशिष्ट्ये सांगता येतील, 'सावता सागर, प्रेमाचा आगर' अशा वेचक शब्दांत नामदेवांनी त्यांचा गौरव केला आहे.

**संत चोखामेळा : (अंतकाळ १३३८)**

मंगळवेढ्याचे संत चोखामेळा हे नामदेव समकालीन मंडळीतील थोर संत. अस्पृश्य जातीत जन्मलेले चोखोबा विठ्ठलाचे परमभक्त होते. चोखोबांच्या घरात विठ्ठलभक्तीची परंपरा त्यांच्या आजी-आजोबांपासून चालत आली असल्यामुळे त्यांना विठ्ठलाचे वेड लागणे स्वाभाविक आहे. त्यामुळे ते अधूनमधून पंढरपुरास जात असत. पंढरीत त्यांना नामदेवांची कीर्तने ऐकायला मिळाल्याने त्यांचे मन विठ्ठलाकडे धाव घेऊ लागले. नामदेवांना तर त्यांनी आपला गुरूच मानले होते. विठ्ठलाच्या या निस्सिम भक्ताचे विठ्ठलाशी मनोमन मीलन झाले होते. यासंबंधीचे अनेक उल्लेख त्यांच्या अभंगांत सापडतात. चोखोबांची पत्नी सोयराबाई, मुलगा कर्ममेळा, बहिण निर्मळा आणि मेव्हणा बंका हे सर्व चोखोबांच्या प्रभावाखाली अभंगरचना करीत असत. चोखोबांना ते गुरूस्थानी मानीत.

चोखोबांची राहणी फार स्वच्छ होती. आपले काम संपल्यावर सायंकाळी स्नान करून ते पांडुरंगाचे ध्यान करीत. हीन जातीत जन्मल्यामुळे होणारी उपेक्षा व संसारदु:खाने त्यांचे मन अगदी कंटाळून गेले होते. त्यातूनच ते म्हणतात -

**'एकापुढे एक पडती आघात। सारिता न सरत काय करू ?'**

मनाला शांती व आराम मिळावा म्हणून चोखोबांनी अनेक तीर्थयात्रा केल्या. पण कोठेही त्यांचे मन रमले नाही. म्हणून ते म्हणतात.

**बहुत हिंडलो देश देशांतर । परि मन नाही स्थिर झाले कोठे ।**

**बहुत तीर्थे फिरोनिया आलो । मनासवे झालो वेड्गलची ।**

**बहुत प्रतिमा ऐकिल्या पाहिल्या । मनाच्या राहिल्या येरझारा ।**

**चोखा म्हणे पाहता पंढरी भूवैकूंठ । मनाचे हे कष्ट दूर झाले।।**

पंढरपुरास संतसमागम, हरिनामाचा गजर, चंद्रभागेचे वाळवंट, विठ्ठलाची सुंदर मूर्ती पाहून चोखोबांचे मन तेथे रमले. यानंतर चोखोबांनी पंढरीची वारी कधीही चुकू दिली नाही. पंढरीचे वारकरी पाहिले म्हणजे त्यांचे मन संतुष्ट होई. चोखोबाच्या मनाने विठ्ठलभक्ती व विठ्ठलदर्शन याकडे ओढ घेतल्याने ते सर्व कुटुंब पंढरपुरास वास्तव्यास आले.

पंढरपुरातील मुक्कामात मनाची झालेली तृप्ती ते 'खटनट यावे शुद्ध होऊन जावे' अशा शब्दांत करतात. तेथील वास्तव्यातील रोजच्या अनुभवाचे वर्णन चोखामेळा -

**विठ्ठल विठ्ठल गजरी । अवघी दुमदुमली पंढरी ।।१।।**

**होतो हरिनामाचा गजर । दिंड्या पताकांचा भार ।।२।।**

**निवृत्ती ज्ञानदेव सोपान । अपार वैष्णव ते जाण ।।३।।**

**हरिकीर्तनाची दाटी । तेथे चोखा घाली मिठी ।।४।।**

अशा भावपूर्ण शब्दांत करतात. विठ्ठलनामाच्या गजराने भारावून गेलेले चोखामेळा आपल्या कर्तव्यकर्माची जाणीव झाल्याने विठोबाच्या देवळाच्या महाद्वारापर्यंतचा रस्ता स्वत: झाडीत, तेथूनच ते विठ्ठलाचे दर्शन घेत. पंढरपूरचे बडवे त्यांना मंदिरात जाऊ देत नसत. एकदा चोखोबाची उत्कट भक्ती पाहून विठ्ठलानेच त्याला दर्शन दिले व प्रसाद म्हणून त्याच्या गळ्यात रत्नहार व तुळशीची माळ घालून कपाळास बुक्का लाविला. दर्शनानंदी लय लागलेल्या चोखोबास पुजाऱ्याने पाहिले व त्याच्यावर देवाच्या रत्नहार चोरीचा आळ घेऊन त्याला पुष्कळ मार दिला. तेव्हां चोखोबा विठ्ठलाचा धावा करताना म्हणतात -

**धांव घाली विठो आता चालू नको मंद ।**

**बडवे मज मारिती ऐसा काय तरी अपराध ।।**

**विठोबाचा हार तुझ्या कंठी कसा आला ।**

**शिव्या देऊनी म्हणती महारा देव बाटवीला ।।**

**कर जोडूनि चोखा विनवितो देवा ।**

**बोलिलो उत्तरे परि राग नसावा ।।**

पुजाऱ्यांनी चोखोबाला पंचायतीपुढे उभे केले. पंचायतीने त्यांना पंढरपूरात व विठ्ठल मंदिराच्या आसपास कधीही न येण्याची शिक्षा दिली. या शिक्षेने चोखोबांना फार दु:ख झाले. शिक्षा म्हणून चोखोबा आता चंद्रभागेच्या पलीकडे झोपडी बांधून उदासपणे राहू लागले. आपल्यावर झालेला चोरीचा आळ विठ्ठलाने दूर करावा असे त्यांना वाटत होते. ते भावविवश होऊन विठ्ठलाची आळवणी करताना म्हणतात –

**काही तरी अभय न मिळे उत्तर। ऐसे का निष्ठूर जाला तुम्ही**

**मी तो कळवळोनि मारितसे हांक। तुम्हा पडे धाक कासयाचा**

**बोलोनि उत्तरे करी समाधान। एवढेचि दान मज द्यावे**

**चोखा म्हणे माझी पुरवावी आस। न करी उदास माझे माये।**

तरीही चोखोबांचे अखंड भजन चालूच होते. कारण देव पुजाऱ्यांपाशी नव्हता तर तो चोखोबाजवळ होता. विठ्ठलनामाच्या निरंतर चिंतनाने ज्ञानेश्वर–नामदेवादी वैष्णवांच्या मेळ्यात चोखोबांचाही समावेश झाला आहे हे यामुळेच.

१३ व्या शतकात महाराष्ट्रात वर्णव्यवस्था कठोर होती. जातीभेद पाळला जाई. कामाची विभागणी वर्ण–धर्मानुसार केली जाईल. त्यामुळे चोखोबांना महाराची सर्व कामे करावी लागत. चोखोबा अस्पृश्य. त्यामुळे त्यांच्या हातचे पाणीही कुणाला चालत नसे. एवढेच काय त्यांच्या सावलीचाही विटाळ मानला जाई. आपल्याला मिळणाऱ्या अशा वागणुकीबद्दलची खंत चोखोबांच्या अनेक अभंगांतून व्यक्त झाली आहे. दलितांवर होणाऱ्या सामाजिक अन्यायाची बोच व्यक्त करताना चोखोबा –

**कोण तो सोवळा, कोण तो ओवळा**

**दोन्हीच्या वेगळा विठू माझा।**

अशा आध्यात्मिक उंचीवर जातात तर, 'उस डोंगा परि रस नोहे डोंगा। काय भुललासी वरलिया रंगा ।' अशा परखड शब्दांत समाजनिर्मित खोट्या जातीव्यवस्थेचा दंभ स्फोट करतात; आणि समाजाला डोळस बनविण्याचा प्रयत्न करतात. आपल्या कवितेतून सामाजिक वेदना व्यक्त करणारे चोखोबा हे मराठीतील पहिले कवी आहेत. चोखोबांच्या नावावर ३४९ अभंगांची नोंद आहे. तर 'विवेकदर्पण' हे एक प्रकरण त्यांच्या नावावर उपलब्ध आहे. यांपैकी नाममाहात्म्य, पंढरीवर्णन करणारे चोखोबांचे अभंग उठावदार झालेले आहेत.

चोखोबांच्या संतत्त्वाने भारावलेल्या त्यांच्या कुटुंबानेही केलेली अभंगरचना मराठी कवितेत मोलाची ठरलेली आहे. सकलसंतगाथेत चोखोबांची पत्नी सोयराबाई यांच्या नावावर ६२,अस्पृश्यतेविषयी प्रथमच आपल्या कवितेतून विद्रोह प्रकट करणारा चोखोबांचा मुलगा कर्ममेळा यांच्या नावावर २७ तर चोखोबांचे मेव्हणे बंका महार यांच्या नावावर ३९ अभंग आहेत. अशा चोखोबांबद्दल प्रकाश देशपांडे केजकर म्हणतात– ''एखाद्या संतकवीचे सगळे कुटुंब भक्तिरसात बुडून जावे, इतकेच नव्हे तर या कवित्त्वाच्या, या सृजनाच्या

सोहळ्यात सर्वस्वाने सामील व्हावे हे मराठी कवितेच्या आणि संस्कृतीच्या इतिहासाला अभिमानास्पद वाटावे असे दुर्मिळ उदाहरण आहे. ही चोखोबांच्या संतत्त्वाची आणि कवित्वाची जादू आहे. आपल्या हीन जातीवर, दैन्य-दारिद्र्यावर मात करून आपले सगळे कुटुंबाच्या कुटुंब एवढ्या आध्यात्मिक उंचीवर नेणे आणि त्या उंचीला सृजनाचा स्पर्श देणे हे चोखोबांनी मराठी संस्कृतीला आणि मराठी कवितेला दिलेले मोठे योगदान आहे.'' (संत कविता : एक दृष्टिकोन : डॉ. प्रकाश देशपांडे केजकर, पृष्ठ क्र. १६७) नामदेवांनी पंढरीस चोखोबांची समाधी बांधली आहे. यावरून चोखोबांचे वारकरी सांप्रदायातील कार्याचे मोल आपल्या लक्षात येते.

**सेना महाराज : (जन्म इ.स. १३०१)**

विद्यार्थी मित्रांनो ! तेराव्या शतकात संतमेळ्यात अठरापगड जातीचे लोक सहभागी झाले. त्यांपैकी आणखी एक संत म्हणजे संत सेना महाराज. हे मुळचे मध्य प्रदेशातील जबलपूर जवळच्या बांदुगडे या गावचे रहिवासी. तिथल्या बादशहाच्या पदरी ते नोकरीस होते. संत नामदेवांचे ते समकालीन. तीर्थाटन करता करता ते पंढरपुरास येऊन स्थिरावले. अनेक तीर्थे हिंडुनही त्यांच्या मनाला न मिळालेली शांती त्यांना पंढरपुरात संतांच्या सहवासात मिळाली, पंढरीच्या रूपाने जणू त्यांना माहेरच मिळाले. अशा पंढरपूरचे वर्णन ते

**जाता पंढरीसी सुख वाटे जीवा । आनंदे केशवा भेटताचि ।।**

अशा प्रभावी शब्दांत करून, आपल्याला पंढरी पाहून झालेला आनंदही पुढे ते व्यक्त करतात. संतांचे आराध्य दैवत म्हणजे पंढरीचा विठ्ठल, ज्याच्या स्पर्शाने पंढरी पावन झाली आहे. या विठ्ठलाच्या सगुणरूपाचे वर्णन हा प्रत्येक संताच्या आवडीचा विषय. त्याला सेना महाराज कसे अपवाद ठरतील ?

**विटेवरी उभा । जैसा लावण्याचा गाभा ।**
**पायी ठेवूनिया माथा । अवघी वारली चिंता ।**
**समाधान चित्त । डोळां श्रीमुख पाहता।**
**बहुजन्मी केला लाग । सेना देखे पांडुरंग ।।**

असे सेनांनी केलेले विठ्ठलवर्णन त्याच्या उत्कट विठ्ठलभक्तीचे द्योतक म्हणता येईल. पंढरीमाहात्म्य, विठ्ठलमाहात्म्य वर्णनाबरोबरच ते भक्त पुंडलिक, संत निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई यांचा आपल्या अभंगांतून गौरव करून 'उदार तुम्ही संत। मायबाप कृपावंत' असे त्यांचे ऋण मान्य करत 'मायबाप' म्हणून त्यांना संबोधतात. पंढरपुरात संतांच्या सहवासात परब्रह्म भेटल्याच्या आनंदात ते

**धन्य महाराज पुंडलिक मुनी । वैकुंठीचा सखा आणला भूतलालागोनि।**

अशी पुंडलिका विषयी आपली कृतज्ञता व्यक्त करतात तर,

**शिव तो निवृत्ती । आदिमाया मुक्ताई**

**ब्रह्मा तो सोपान । विष्णू ज्ञानदेव पाही ।।**

अशा आत्यंतिक आदरापोटी सेना महाराज ज्ञानदेवादी भावंडांचे अवतारीकरण करतात.

संतसज्जन कथा-कीर्तन करू लागले की साक्षात विठ्ठलही डोलायला लागतो. कीर्तनभक्तीतून लाभणारं हे सुख प्रत्यक्ष ब्रह्मालाही मिळत नसल्याचे सेना महाराज सांगतात.

**उभा राहे कर्तनात । हर्षे डुले पंढरीनाथ**

**सेना म्हणे हेंचि सुख। नाही ब्रह्मयासि देख ।।**

अशा प्रभावी शब्दांत ते कीर्तनभक्तीही साधतात. सेना महाराज आपल्या अभंगातून सामाजिक नीतीवर, साधूसंतांच्या ढोंगीपणावर खरमरीत शब्दांत टीका करतात.

सेना महाराजांचे अभंग इतर संतमेळ्यांच्या अभंगापेक्षा वेगळेपणाने येतात, ते त्यांच्या व्यवसायावरील अभंगरूपाने. इतर संतांप्रमाणे त्यांनीही आपल्या व्यवसायावर रूपक रचले आहे. आपल्या व्यवसायाचा उपमान (ज्याच्याशी तुलना करावयाची ते) म्हणून सुंदर उपयोग त्यांनी केलेला आहे. सेना महाराज जातीने वारीक म्हणजे न्हावी. आपला न्हाव्याचा व्यवसाय हलका आहे आणि त्याला प्रतिष्ठा नाही याची जाणीव त्यांना होती. तशीच त्यांची जातही हीन समजली जात होती. त्यामुळे सामाजिक अवहेलना वाट्याला येऊनही आपल्या भक्तीच्या आणि वैराग्याच्या जोरावर ते संतपदी पोहोचले. त्यांनी आपला व्यवसाय हेच आपल्या भक्तीचे साधन बनविले. आपल्या व्यवसायाला त्यांनी जे आध्यात्मिक अधिष्ठान दिले ते पाहण्यासारखे आहे.

**आम्ही वारीक वारीक । करू हजामत बारीक ।।**

**विवेक दर्पण आयना दाऊ । वैराग्य चिमटा हालऊ ।।**

**उदक शांती डोई घोळू । अहंकाराची शेंडी पिळू ।।**

**भावार्थाच्या बगला झाडू । काम क्रोध नखे काढू ।।**

**चौवर्णा देऊनी हात । सेना राहिला निवांत ।।**

वर्णधर्मानुसार वाट्याला आलेली कर्मे करून सेना महाराज निवांत होतात. विहित कर्म करीत करीत सेना महाराजांनी स्वत:चा उद्धार तर केलाच; पण त्याचबरोबर आपली कविताही समाजप्रबोधनाची साधन बनवली.

पुढील एका अभंगात ते आपल्या काळातील धनलोभाने पछाडलेल्या सर्व मानव जातीचा

**धन कोणा कामा आले । पाहा विचारूनि भले ।**

**ऐसे सकळ जाणती । कळोनिया आंधळे होती ।।**

अशा शब्दांत निषेध करतात.

आध्यात्मिक साधनेमुळे सेना महाराजांना दिव्यदृष्टी लाभली होती. ती त्यांच्या कृष्णभक्तीपर गौळणीतून ओसंडून वाहताना दिसते. त्यांनी लिहिलेल्या नऊ गौळणी उपलब्ध आहेत. त्यामध्ये त्यांनी वर्णिलेल्या कृष्णगोपींच्या प्रणयात शृंगारकवितेच्या खुणा ठळक झाल्या आहेत. सेना महाराजांनी या गवळणीतून उत्तान शृंगाराच्या माध्यमातून राधेची कृष्णभक्ती रंगविली आहे. ह्या गौळणींना कृष्णभक्तीची अनावर धुंद चढलेली आहे. त्यांच्या एका गौळणीत कृष्ण अचानक आल्याने त्याला भेटण्यासाठी आतूर झालेल्या गोपींची कशी धांदल उडाली याचे वर्णन सेना महाराज करतात. ते असे – ''एकीने काजळ डोळ्यांना लावण्याऐवजी तोंडाला लावले, एक पतीजवळ बसली असता धावत बाहेर आली. एकीने गळ्यातील दागिने पायात घातले तर पायातील गळ्यात, वाक्या कानात बांधल्या, एकीने चुकून बाळाला शिंक्यात ठेवले आणि शिंक्यातील माठ कडेवर घेऊन बाहेर पडली, इ. वर्णने केली आहेत. या गौळणीत विनोद आणि शृंगार यांचे बेमालूम मिश्रण आहे. पुढील शृंगारकवितेचा धागा या कवितेशी जोडलेला जाणवतो. अशाप्रकारच्या काव्यातून येणारी रंजकता हे लोकप्रिय कवितेचे खास अंग म्हटले पाहिजे. शृंगाराला आध्यात्माचे रूप देण्याचा हा प्रयत्न दिसतो.'' 'संत कविता, एक दृष्टिकोन : प्रकाश देशपांडे केजकर, पृष्ठ १६६)

अशाप्रकारचे दीडशे अभंग सेना महाराजांच्या नावावर सकल संतगाथेत उपलब्ध आहेत. त्यांच्या कवितेत उत्तर भारतीय संत कविता आणि मराठी संतकविता यांचा संगम झालेला पाहायला मिळतो. म्हणून त्यांच्या कवितेला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त होते. कबीराप्रमाणे तेही रामानंदाचे शिष्य होते. हिंदी ही त्यांची मातृभाषा असून त्यांनी मराठीत अभंगरचना केली. त्यांचे एक पद शिखांच्या पवित्र मानलेल्या 'गुरूग्रंथसाहेबा'त समाविष्ट करण्यात आले आहे. मराठी संतकवीने हिंदी कवितेच्या परंपरेला केलेले हे योगदान अल्प असले तरी प्रतिकात्मक म्हणून ते ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. सेना महाराजांची कविता कष्टकऱ्यांची, कामकऱ्यांची कविता असून, ती आपला न्हाव्याचा पारंपरिक व्यवसाय निष्ठेने आणि आनंदाने करणाऱ्या एका कर्मयोगी संतकवीची कविता असलेली दिसते.

**मुक्ताबाई : (इ.स. १२७९–१२९७)**

विद्यार्थी मित्रहो ! विठ्ठलपंत कुलकर्णी यांच्या पोटी जन्माला आलेली निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव व मुक्ताबाई ही चार भावंडे. कर्ण जसा कवचकुंडलासहित जन्मास आला; त्याप्रमाणे ही भावंडे परिणत आध्यात्माचे उंची लेणे घेऊन जन्मास आली. हे त्यांच्या अभंगांवरून सिद्ध झालेले आहे. सर्वसामान्यांसारखे लौकिक जीवन वाट्याला आले नसले, तरी त्यांच्या परमार्थक्षेत्रातील तेजस्वी कार्याचा परिणाम भागवतधर्मी संतमंडळावर दीर्घकाळ होत आला आहे. अशा भावंडापैकी एक म्हणजे संत मुक्ताबाई होत.

संत मुक्ताबाईचा जन्म इ.स. १२७९ मध्ये झाला. ती आपल्या भावांप्रमाणे विद्वान असून त्यांच्याप्रमाणे विरक्त वृत्तीने राही. तिने आजन्म कौमार्यव्रत पाळले होते. समाधीसमयी ही १८ वर्षांची होती. निवृत्तीनाथांसारखा विद्‌वान तत्त्वज्ञ त्यांना गुरू म्हणून लाभला. ज्ञानदेवादी भावंडांमध्ये मुक्ताबाई लहान असल्या तरी मनानं त्या

प्रौढ आहेत. त्यांच्या हरिपाठ, नाममाहात्म्य, संतसमागम, ताटीचे अभंग, कूट अभंग व आध्यात्मिक अंगाईगीते इ. काव्यप्रकारांतून त्यांच्या प्रौढ व प्रगल्भ वृत्तीची साक्ष पटते.

सकलसंतगाथेत मुक्ताबाईंच्या नावावर ४२ अभंग उपलब्ध असले तरी त्यांनी चांगदेवांना उद्देशून लिहिलेले सहा अभंग, ताटीचे अभंग या प्रकरणातील पाच अभंग, आणि 'नामदेव भक्तीगर्वपरिहार' या मथळ्याखालील दहा-पंधरा अभंग अशी एकूण पाऊणशेच्या घरात असणारी त्यांची अभंगरचना संख्येने थोडी असली तरी काव्यगुणांनी ती समृद्ध आहे. या सर्व अभंगांतून मुक्ताबाई ज्ञानदेवादी संतांप्रमाणे सर्वसामान्यांशी संवाद साधताना दिसतात. आपल्या काही अभंगांतून त्या चांगदेवांशी आणि नामदेवांविषयी बोलत असल्या तरी त्यातून सर्वसामान्यांना उपदेश करताना दिसतात.

काव्याच्या दृष्टीकोनातून मुक्ताबाई आपणास प्रथम भेटतात त्या 'हरिपाठाच्या' अभंगातून. निवृत्ती, ज्ञानदेव आणि सोपानदेवांनी रचलेल्या हरिपाठाच्या अभंगांचे संस्कार त्यांच्या अभंगांवर झाले असले, तरी त्या वारंवार आपला नामोल्लेख करून या अभंगांचा वेगळेपणा सूचित करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. आपल्या अभंगांतून त्या सतत स्वत:च्या आध्यात्मज्ञानासंबंधी व त्याने मिळालेल्या मुक्तावस्थेसंबंधी बोलत राहतात. हे खालील अभंगावरून आपल्या लक्षात येईल.

**मुक्ताईचे चित्त निरंतर मुक्त । हरि हेचि संचित आम्हां घरी.**

**मुक्ताई मुक्तलग सांडिली हे वासना । मुक्तामुक्ती राना हरिपाठ**

**मुक्ताई अद्वैती द्वैती द्वैतातीत । अवघाचि अनंत दिसें देही**

**मुक्ताई चैतन्य अवघे चिद्धन । आदि अंती खूण निवृत्तीची**

**मुक्ताई संपन्न मुक्त पै सैजुळे । सर्वत्र उभविले मुक्ति जैसव**

**मुक्ताई चिंतने मुक्त पै जाली । चरणी समरसली हरिपाठे ।।**

वरील अभंगातून 'मुक्ताईचे चित्त निरंतर मुक्त', 'मुक्तता पूर्ण मुक्ताई साधिली', असे मुक्तीचे चौफेर उल्लेख येतात. मुक्ताई नावाप्रमाणे खरोखरच सर्वमुक्त होत्या. मुक्ताईची ही संसार मुक्ती होती; तशी जीवनमुक्ती होती आणि विशेष म्हणजे ही नारीची देहमुक्ती होती. मुक्तीकडे असा त्यांच्या जीवनाचा आणि अभंगांचा अलौकिक प्रवास झाला. यातच त्यांच्या जीवनाचे आणि कवितेचे मोठेपण सामावले आहे.

मुक्ताईचे एक प्रसिद्ध पाच अभंगांचे प्रकरण म्हणजे 'ताटीचे अभंग' होय. मुक्ताईच्या कार्यकर्तृत्वाची विशेष फडकलेली सर्वपरिचित अशी पताका म्हणजे तिने रचलेले ताटीचे अभंग. हे एक प्रासंगिक प्रकरण आहे. पण हे अभंग क्षेपक आहेत, असे वारकरी संप्रदाय मानतो. तो प्रसंग असा - एक दिवस एका गृहस्थाने ज्ञानेश्वरांस पाहून म्हटले की, ''या संन्याशाच्या मुलाचे दर्शन घडले, हा मोठा अपशकून झाला.'' हे बोल ऐकूण ज्ञानेश्वर फार निराश झाले व झोपडीत जाऊन बसले. झोपडीचे दार उघडून मुक्ताईस ते आत घेईनात. त्यावेळी मुक्ताबाईंनी हे अभंग रचले. 'रागे भरावे कवनाशी। आपण ब्रह्म सर्वदेशी' या शब्दांत त्यांनी

ज्ञानदेवांची समजूत घातली असून -

**मजवरी दया करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।**

**संत जेणे व्हावे । जगी बोलणे सोसावे ।।**

**तरीच अंगे थोरपण । जया नाही अभिमान ।।**

**थोरपण जेथे वसे । तेथे भूतदया असे ।।**

**योगी पावन मनाचा । साहे अपराध जनाचा ।।**

**विश्व झालीया वन्ही । संती सुखे व्हावी पाणी ।। १।।**

ज्ञानदेव आणि आपले कौटुंबिक नाते बाजूला ठेवून अशा शब्दांत त्यांनी ज्ञानदेवांना उपदेश केला आहे. ज्ञानेश्वरांचा रूसवा धाकट्या बहिणीने काढावा हा प्रसंगच मोठा भावपूर्ण आणि नाट्यपूर्ण आहे. ज्ञानदेवांचा अधिकार मोठा; पण त्यांना उपदेश करून कार्यप्रवृत्त करावे अशी तळमळ मुक्ताबाईंच्या शब्दाशब्दांतून व्यक्त होताना दिसते. असे असले तरी -

**शुद्ध ज्याचा भाव झाला । दुरी नाही देव त्याला ।**

**अवघी साधन हातवटी । मोलें मिळत नाही हाटी ।**

**कोणी कोणां शिकवावे । सार शोधुनिया घ्यावे ।**

**लडिवाळ मुक्ताबाई । जीव मुद्दल ठायीचे ठायी ।**

**तुम्ही तरूनी विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।। ५।।**

असा ज्ञानेश्वरांना उपदेश करण्याचा अधिकार तिला 'लडिवाळपणातूनच' आला आहे. केवळ नऊ वर्ष वय असताना केलेल्या या रचनेत 'तुम्ही तरूनी विश्व तारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा' अशी भावनेची कोवळिक त्यांच्या ताटीच्या अभंगांत पदोपदी जाणवते.

संत मुक्ताबाईंच्या चरित्रात चांगदेवांच्या आख्यायिकेला एक वेगळेच परिमाण लाभलेले पाहायला मिळते. मुक्ताबाईंनी आध्यात्मिक साधना करून जे गूढवादी अनुभव घेतले, ध्यानमग्न अवस्थेत जे साक्षात्कारी अनुभव घेतले, त्या अनुभवाच्या जोरावर तिने सिद्धहस्त योगी, मंत्र-तंत्र, योगाविद्यादी शास्त्रांत पारंगत असलेले, समाधिस्त होणे, गुप्तरूपाने वावरणे, मध्येच प्रकट होणे, मृत्यूकाळ जवळ आला की योगबलाने समाधी लावून मृत्युला परतवून लावणे व शेकडो वर्ष दीर्घायुष्य लाभलेल्या अशा वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध चांगदेवाला आपल्या आध्यात्मिक अधिकाराने 'कोराच्या कोरा' ठरवून, त्याच्याशी जो संवाद साधला तो मुक्ताबाईंनी आपल्या कूट अभंगांत नोंदविला आहे. तो असा -

**मुंगी उडाली आकाशी । तिने गिळीले सूर्याशी ।**

**थोर नवलाव झाला । वांझे पुत्र प्रसवला ।**

**विंचू पाताळाशी जाय । शेष माथां वंदी पाय ।**

**माशी व्याली घार झाली । देखोन मुक्ताई हसली ।।**

मुक्ताबाईंच्या या अभंगाविषयी डॉ. प्रकाश देशपांडे केजकर म्हणतात – ''मुक्ताबाईंचा हा कूट अभंग अतिवास्तववादी कवितेचा एक उत्तम नमुना आहे. तर्काला, बुद्धिप्रामाण्याला पार करणारा तसेच वास्तवाचे सार्वभौमत्व नाकारणारा हा अतिवास्तववादी अनुभव आहे. यात 'वांझे'ची प्रतिमा ही एकमेव मानवी प्रतिमा आहे. आणि तीही नकारात्मक आहे. उरलेल्या विंचू, शेष या हिंस्त्र आणि विषारी प्राणी प्रतिमा आहेत. माशी ही किटक प्रतिमा आहे तर घार ही हिंस्त्र पक्षी प्रतिमा आहे. साप आणि घार यांचे वैर आपल्याला माहीत आहे. अमानवीकरणाची प्रक्रिया सुचविणाऱ्या या प्राणी प्रतिमा अतिवास्तववादी कवितेतील खास प्रतिमा आहेत. म्हणून मुक्ताबाईंची कविता आजही आपल्याला जवळची वाटते.'' (संतकविता एक दृष्टिकोन : डॉ. प्रकाश देशपांडे केजकर, पृष्ठ १८६-८७). मुंगी म्हणजे जीवात्मा, सूर्य म्हणजे परमात्मा, जीवात्म्याला मीच ब्रह्म आहे, अशी जाणीव झाली की तो जीवात्मा सर्व विश्वाला व्यापून टाकतो असा या अभंगाचा आशय आहे. मुंगी, वांझ स्त्री, विंचू आणि माशी या जीवात्म्याच्या ठिकाणी आणि सूर्य, पुत्र, शेष, घार हे सर्व परमात्म्याच्या ठिकाणी मुक्ताबाईंनी कल्पिलेले आहे. मुक्ताबाईंच्या प्रतिभेची मोठी झेप आपल्याला येथे जाणवते.

अशा संवादाने चांगदेव शरण येताच त्यांचे द्वैताद्वैत मुक्ताबाईंनी फेडले व गुरूपदेश देऊन आत्मपदी बसविले. पुढे त्यांनी चांगदेवांना आपल्या कृपाकटाक्षाने पुनर्जन्म दिला. आध्यात्माच्या मोठ्या अधिकाराने त्यांनी चांगदेवांचे स्वखुषीने मातृत्व स्वीकारले. चांगदेवासारख्या वृद्ध हठयोग्यावर वात्सल्याचा अमाप वर्षाव केला. ज्ञानदेवांची 'चांगदेवपासष्टी' ही मुक्ताबाईंनीच चांगदेवांना समजावून दिली. तिच्या ठिकाणी दाटून आलेल्या या वात्सल्यपूर्ण भावनेतून त्यांनी चांगदेवांशी संवाद साधताना अंगाईगीत (पाळण्यांचा) माध्यम म्हणून स्वीकार केलेला आहे. हे खालील अंगाई गीतावरून लक्षात येईल.

**गुण ना निर्गुन शब्दातीत । तेथे तू निश्चिंत बाळा निज ।।**

**पाळणा लाविला ऱ्हदयी कमळी । मुक्ताई जवळी सदाविते ।।**

**शांति क्षमा विदेह पै वर्णिती । नांव पै ठेविती अद्वैतासी ।**

**वटेश्वर सूत चांगा अवधूत । मुक्ताई शांतवीत ज्ञानदृष्टी ।।**

(मुक्ताई – चांगदेव संवाद अभंग क्र. ७)

अशाप्रकारच्या संवादातील एकूण सहा पाळणागीते म्हणजे एक एक स्वतंत्र आध्यात्मिक अंगाईगीतच आहे. मुक्ताईंची ही अंगाई गीते उपदेशच करीत असतात, फक्त उपदेशकाची भूमिका मातृत्त्वाची असते. जीवनातील एवढीच मातृत्वाची स्त्रीसुलभ कोमल भावना मुक्ताबाईंनी अनुभवली आहे.

नामदेव-ज्ञानेश्वरादी भावंडांच्या भेटीत मुक्ताबाईंची भूमिका तिच्या प्रौढपणाची साक्ष देते. नामदेव ज्ञानदेवादी भावंडांना भेटण्यास आळंदीस येतात. तेव्हां ही भावंडे 'पंढरीचा प्रेमा घरी आला' म्हणून त्याचे स्वागत करतात. भेटीत सर्व भावंडांनी नामदेवांना नमस्कार केला. पण नामदेवांनी त्यांना प्रतिनमस्कार केला नाही. यातील गूढ मुक्ताबाईंनी ओळखले आणि 'अखंड जयाला देवाचा शेजार । कां रे अहंकार गेला नाही' अशा परखड सवालातून नामदेवांचा अहंकार घालवून मुक्ताबाईंनी त्यांना भक्तीसन्मार्गावर आणले.

अशाप्रकारे निवृत्तीसारख्या तत्त्ववेत्त्याला गुरू मानणारी, ज्ञानदेवांचा लडिवाळपणे रूसवा काढणारी, योगी चांगदेवाला बाळ समजून पोटाशी घेत उपदेश करणारी, नामदेवांचा गर्वपरिहार करणारी मुक्ताबाई आपल्या कूट आणि प्रासादिक अभंगांनी मराठी साहित्यात प्रकाशमान झाली आहे. त्यांचे मराठी कवितेला मोठे योगदान लाभले आहे, हे निसंशय ! अशी मुक्ताबाई वैशाख वद्य १२ शके १२१९ (इ.स. १२९७) मध्ये वीजेच्या प्रचंड गडगडाटांत मेहुण या ठिकाणी परमात्म्याशी एकरूप झाली. आणि खऱ्या अर्थाने मुंगी आकाशात उडाली ! एदलाबाद जवळच्या माणगांव येथे तिची समाधी आहे.

**संत जनाबाई : (समाधी इ.स. १३५०)**

विद्यार्थी मित्रहो ! तेराव्या शतकातील संत मुक्ताबाई, सोयराबाई, जनाबाई आणि कान्होपात्रा या संतकवयित्रींनी मराठी कवितेला आपल्या अभंगांद्वारे मोठे योगदान दिलेले आहे. आध्यात्म निरूपणाबरोबरच स्त्रीसुलभ भावनांचे मनोज्ञ दर्शन त्यांच्या या अभंगांतून घडते. या संत कवयित्रींपैकी संत जनाबाईंच्या कवितेचा विचार आपण येथे करणार आहोत.

गोदावरी नदीच्या काठी वसलेल्या गंगाखेड या गावी राहणाऱ्या दमा नावाच्या एका शूद्र भगवद्भक्ताची जनाबाई ही मुलगी. दमा आणि करुंड ही पतीपत्नी नित्य नेमाने पंढरीची वारी करीत. विठ्ठल दर्शनाने त्यांना समाधान मिळत होते.

जनाबाई वयाच्या दहाव्या वर्षी आई वडिलांसोबत वारीसाठी पंढरपूरास आल्या. विठ्ठलाचे दर्शन घेतले. बालपणापासूनच जनाबाईंना भगवद्भक्तीचे बाळकडू मिळाले असल्याने 'विठ्ठलमूर्तीचे दर्शन दररोज व्हावे' असा हट्ट धरून त्या पंढरपूरात राहण्याचा हट्ट धरतात. योगायोगाने दामाशेठी त्यांना भेटतात व जनाबाईंचा हट्ट पुरविला जातो. दमा आणि करूंड त्यांना दामाशेठींच्या घरी ठेवून गंगाखेडला परततात. जनाबाईंवरून दामाशेठींच्या घरीही मोठे वादंग माजते. कुटुंबामध्ये अगोदरच इतकी मनुष्ये आहेत, त्यात ही 'खायला काळ आणि भूईला भार कशाला' अशी आपली प्रतिक्रिया गोणाबाईंनी (नामदेवांची आई) व्यक्त केली आहे. जनाबाई दामाशेठींच्या (नामदेवांचे वडील) घरचे काम करून राहू लागली. त्यांना त्यावेळपासून भक्तशिरोमणी नामदेवांचा भक्तीसहवास लाभला. झाडलोट करता, धुणेभांडी करता करता, दळण दळताना त्यांना नामदेवांच्या कृपेने विठ्ठलाचा वेध लागला. शूद्राघरच्या एका साध्या पोरीच्या आयुष्यात सोनेरी किनार लाभली. नामदेवांच्या संगतीत जनाबाईस विठ्ठल कृपेचा लाभ झाला. म्हणून त्यांचा उल्लेख 'नामयाची दासी जनी' असा केला जातो. आईबाप लवकरच निर्वतल्यामुळे नामदेवांखेरीज त्यांना कोणाचा आधार राहिला नाही. अशा आर्त

अवस्थेत जनाबाई विठ्ठलाचा धावा करताना म्हणतात.

**माय मेली बाप मेला । आता सांभाळी विठ्ठला ।।**

**मी तुझें गां लेकरूं । नको मजशी अव्हेरू ।।**

**अंत किती पाहता देवा । थोर श्रम झाला जीवा ।।**

**सकळ जीवाच्या जीवना । म्हणे दासी जनी नारायणा ।।**

(जनाबाई अभंग क्र. ५८)

असा जनाबाईचा पुकार तिच्या अवीट अभंगवाणीत सर्वत्र दिसतो. ज्ञानदेव आणि नामदेव यांच्या अभंगवाणीचे संस्कार झालेले जनाबाईंचे विठ्ठलमहिमा, संतचरित्रपर, बालक्रीडा, आख्यानकविता, आरत्या, पदे अशा वैविध्यपूर्ण रचनेतील साडेतीनशे अभंग उपलब्ध आहेत.

विठ्ठलभक्ती हा तर सर्व संतांच्या आवडीचा विषय. नामदेवांना तर त्यांच्या विठ्ठलभक्तीने 'भक्तशिरोमणी' या पदवीला पोहोचविले. अशा नामदेवांच्या घरी जनाबाईंचं उभं आयुष्य व्यतीत झाल्याने नामदेवांच्या विठ्ठलभक्तीचा प्रभाव जनाबाईंवर होणे स्वाभाविक आहे. या प्रभावातूनच जनाबाई –

**ये ग ये ग विठाबाई। माझे पंढरीचे आई ।।**

**भीमा आणि चंद्रभागा। तुझे चरणीच्या गंगा ।।**

अशा स्त्रीसुलभ व कारूण्याने भरलेल्या सोप्या भाषेत साद घालतात, तेव्हां शेकडो भाविकांची ऱ्हृदये आजही गलबलून जातात.

विठ्ठलाचा धावा करून त्याला साद घालणाऱ्या जनाबाई पुढे विठ्ठलनामाचा गजर करून

**नाम विठ्ठलाचे घ्यावे । मग पाऊल टाकावें ।**

**नाम तारक हे थोर । नामें तारिले अपार ।**

**अजामेळ उद्धरिला । चोखामेळा मुक्तीस नेला ।**

**नाम दळणी कांडणी । म्हणे नामयाची जनी ।।**

असा त्याच्या स्मरणातच मोक्ष असल्याचे सांगतात. नामस्मरणाने मोक्षाप्रत गेलेल्या चोखोबांचे उदाहरण देऊन, अजामेळ या पातक्याचा नामस्मरणाने उद्धार झाल्याचे सांगतात.

संतांच्या जीवनातील साक्षात्कार हे ते विठ्ठलाशी किती एकरूप झाले होते याचे जिवंत दाखले आहेत. मातीची भिंत चालविणारे ज्ञानेश्वर विठ्ठलातच विलीन झाले, दगडाच्या विठ्ठलमूर्तीने नामदेवांचा नैवेद्य खाल्ला, तुकारामांच्या वह्या इंद्रायणीवर तरंगू लागल्या. असाच साक्षात्कार जनाबाईंच्या अनुभवाला आला. नामदेवांच्या घरी जनाबाई दळण-कांडण, झाड-लोट, धुणे-भांडी, शेणी-काटक्या गोळा करण्यासारखी कामे करीत

होत्या. अशा कष्टकरी कामकरी जनाबाई जेव्हां विठ्ठलाशी मनोभावे एकरूप होतात तेव्हां आपल्या मनाचा अनुभव त्या –

**झाडलोट करी जनी । केर भरी चक्रपाणी ।।**

**साळी सडायास काढी । पुढे जाऊनी उखळ झाडी ।**

**सांडूनिया थोरपण । करी दळण कांडण ।**

**राना जाये शेणीसाठी । वेचूं लागे विठोबा पाठी ।।**

**जनी  जाई पाणीयासी । मागे धावे ऋषीकेशी ।।**

अशा प्रभावी शब्दांत सांगतात. जनाबाईंनी ईश्वरास इतके ऋणी केले होते की, देव त्यांना हरएक कामात साहाय्य करीत होता, अशी त्यांची साक्ष आहे.

जनाबाईंचा विठ्ठलावर इतका अधिकार निर्माण झाला होता की, त्या अधिकारातून विठ्ठलाला 'रागा येऊनी काय करिसी । तुझे बळ आम्हा पाशी। अरे विठ्या अरे विठ्या । मूळ मायेच्या कारट्या ।।' अशा शिव्या देताना दिसतात. विठ्ठलाला मूळं मायेचं कारटं असे संबोधून मायेच्या पलीकडचा तो परमात्मा निर्गुण, निराकार, निर्विकल्प व निरंजन आहे. पण मायेनं माखलेल्या रूपात तो सगुण साकार असल्याचं आपल्याला जाणवतं. म्हणून तो मायेच्या पोटी जन्माला आलेला मुलगा आहे, असे जनाबाईंनी त्याचे केलेले वर्णन आध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे.

नामदेवांच्या सहवासाने जनाबाईंचीही संतचरित्रे उत्तम साधलेली आहेत.आपल्या समकालीन संतांविषयीच्या भावना फार आपुलकीने त्यांनी आपल्या अभंगांत व्यक्त केल्या आहेत. त्यांचे सर्व संतसख्यांशी फार जिव्हाळ्याचे नाते होते. उदाहरणदाखल आपल्याला त्यांचा 'ज्ञानेश्वरचरित्र'पर अभंग पाहता येईल. नामदेवांनी 'आदि-समाधी-तीर्थावळी' अशा प्रकरणांतून ज्ञानदेवांचे चरित्र संगितले आहे. त्या ज्ञानदेवांविषयी जनाबाई –

**ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर ।**

**मरोनिया जावे । बा तुझ्याच पोटा यावे ।**

**ऐसें करी माझ्या भावा ।  सख्या माझ्या ज्ञानदेवा ।**

**जावे वोवाळुनि । जन्मोजन्मी दासी जनी ।।**

अशा वडीलकीच्या भूमिकेतून आदरभाव व्यक्त करताना दिसतात.

ज्ञानदेव, नामदेवादी संतांच्या तीर्थयात्रेत जनाबाई मनोभावे सहभागी होत्या. या तीर्थयात्रेत अठरापगड जमातीतून निर्माण झालेले लोक विठ्ठल भक्तीच्या जोरावर भक्तीमार्गातील आपले अनुभव अभंगांतून व्यक्त करीत होते. एका विठ्ठलाच्या ठिकाणी वारकऱ्यांची झालेली अलोट गर्दी जनाबाईंना भारावून टाकते. या भारावलेपणातच जनाबाई विठ्ठल आणि त्याला मिळालेले लडिवाळ भक्त यांच्यावर एक रूपक रचतात. ते

असे -

**विठो माझा लेकुरवाळा । संगे लेकुरांचा मेळा ।**

**निवृत्ती हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी ।**

**पुढे चाले ज्ञानेश्वर । मागे मुक्ताई सुंदर ।**

**गोरा कुंभार मांडीवरी । चोखा जीवा बरोबरी ।**

**बंका कडियावरी । नामा करांगुळी धरी ।**

**जनी म्हणे रे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ।।**

माझा विठोबा लेकुरवाळा आहे. मुलाबाळांचा धनी आहे. आपल्या मुलाबाळांना खेळवत तो निघाला आहे. असा एक चैतन्यदायी सोहळा जनाबाई या अभंगाद्वारे रेखाटतात. संतमेळ्यातील संतांच्या गाठीभेटीचे प्रसंग जनाबाईंनी पाहिले होते. ते वरील अभंगातून प्रकट झाले आहेत.

**'धरिला पंढरीचा चोर । गळा बांधोनिया दोर**

या दुसऱ्या एका रूपकात्मक अभंगात संत जनाबाई संतमेळ्याचा सांभाळ करणाऱ्या विठ्ठलाला आपल्या-हृदयरूपी तुरुंगात कोंडून ठेवल्याचे सांगतात. श्रीविठ्ठल आणि आपल्यात आता द्वैत उरले नाही असा एकरूपत्वाचा अनुभव त्या सांगतात.

जात्यावरील लोकगीतांचा आविष्कार जनाबाईंच्या अभंगांत झालेला पाहायला मिळतो. तो असा - (जाते हे रूपक त्यांनी गतिमान संसारासाठी कल्पिलेले आहे.)

**सुंदर माझे जातें ग फिरे बहुतेकें । ओव्यां गाऊ कौतुके तूं येरे बां विठ्ठला ।**

**जीव-शिव दोनी खुंटे गे प्रपंचाचे नेटेंगे । लावूनि पांची बोट गें तू येरे बां विठ्ठला ।**

**सासू आणि सासरा दीर तो तिसरा । ओव्यां गाऊ भ्रतारां तू ये रे बां विठ्ठला ।**

**प्रपंच दळण दळिले पीठ भरिले । सासूपुढे ठेविलें तू ये रे बां विठ्ठला ।।**

अशा जात्यावरील ओवीगीतांतून जनाबाईंनी श्रममुक्ती साधलेली आहे. फिरत्या जात्याला जीव आणि शिव असे दोन खुंटे आहेत. जातं फिरवायला आणि ओव्या गायाला मैत्रिणी आल्या आहेत. प्रपंचाच दळण दळून पीठ भरून सासूपुढं ठेवलेलं आहे. सत्त्वाच्या आधणात पुण्य वैरलं आहे. त्यातील पाप ऊतू जाऊन संपलं आहे. असे जात्यावरील हे गीत गायील्याने आपल्याला विठ्ठलप्रीतीचा लाभ घडेल असे म्हणून जनाबाईंनी समस्त सासूरवाशीणींचे श्रम या अभंगाद्वारे हलके केले आहेत.

ज्ञानदेवांनी पायाभरणी केलेल्या वारकरी संप्रदायातील संतांची विठ्ठलभक्ती ही वत्सलतेची पावनगंगा आहे. अशा संप्रदायाच्या जनाबाईंही पाईक आहेत. त्यामुळे विठ्ठलाला विठाई किंवा विठू माउली म्हणण्या इतका अधिकार त्यांनाही प्राप्त झालेला होता. सर्वच संतांनी विठ्ठलाला मातृरूपे दिलेली आहेत. तशी मातृरूपे

जनाबाईंही एका अभंगात देताना दिसतात तो अभंग असा -

**पक्षी जाय दिगंतरा । बाळकांसी आणी चारा ।**

**घार हिंडते आकाशी । झांप घाली पिलांपाशी ।**

**माता गुंतली कामाशी । चित्त तिचे बाळापाशी ।**

**वानर हिंडे झाडावरी । पिल्लां बांधूनि उदरी ।**

**तैसी आम्हांसी विठ्ठल मायें। जनी वेळोवेळीं पाहें ।।**

अशाप्रकारे देव आणि भक्त यांच्यामधील नातेसंबंध कल्पून विश्वाचा संसार सांभाळणारी विठाई संतांच्या कल्याणाची अखंड चिंता वाहते. मातेप्रमाणे देवाचाही आधार आपल्याला आहे असा दिलासा त्यांनी सकल भक्तांना दिलेला पाहायला मिळतो.

ज्ञानदेव-नामदेव संतांच्या कार्यकर्तृत्वाने भारलेल्या जनाबाईंनी नामदेवांनी पाया घातलेल्या कीर्तनपरंपरेचाही आपल्या अभंगांतून गौरव केला आहे. कीर्तनाचा महिमा सांगून अज्ञानी व सामान्य भक्तांसाठी कीर्तनाची पायवाट मोकळी केली आहे. या भक्तीवाटेवरील कीर्तनप्रेमरस आपल्याला लाभावा असे जनाबाई विठ्ठलाकडे मागणे मागतात.

या अभंगांव्यतिरिक्त जनाबाईंनी हरिश्चंद्राख्यान, कृष्णजन्म, बालक्रीडा, काला, दशावतारवर्णन, थालीपाक अशी काही आख्याने रचिली आहेत. मराठी संतवाङ्‌मयात जनाबाईंची आख्यानकाव्ये उठावदार आणि सरस ठरली आहेत. जनाबाईंच्या आख्यान काव्याविषयी डॉ. ब. ना. तुरंबेकर म्हणतात - ''जनाबाईंची आख्यानपर रचना तिच्या भक्तिमय अंत:करणाशी पूर्ण तादात्म्य पावली आहे. स्त्रीमनाची कोमलता, परमेश्वर विषयीचा दृढभाव, कारूण्य आणि वात्सल्य यांचा प्रत्यय तिच्या आख्यानरचनेतूनही येतो.'' (मागोवा : डॉ. ब. ना. तुरंबेकर - पृष्ठ १४०). जनाबाईंच्या वरील आख्यान कवितेतून आलेल्या श्रीकृष्ण, विश्वामित्र, हरिश्चंद्र, दुर्योधन, दुर्वासऋषी, पांडव, द्रौपदी व रोहिदास इ. पौराणिक व्यक्तिचित्रणातून व त्यातील अनेक दृष्टांतांवरून जनाबाईंना पुराण ग्रंथांची आवड असलेली पहायला मिळते. अशा वैविध्यपूर्ण रचनेतून संत जनाबाई संतमेळ्यात लोकप्रिय झाल्या आहेत.

अशाप्रकारे स्त्रीमनाचा हळुवारपणा आणि भक्तीची उत्कटता यांनी जनाबाईंचे अभंग ओथंबून भरलेले आहेत. हे अभंग श्रेष्ठ तत्त्व आणि भक्ती याबरोबरच स्त्रीमुक्ती आणि श्रममुक्तीचेही आहेत. जनाबाईंच्या या अभंगांत तत्त्वज्ञान आणि आध्यात्म यांचा सुरेख संगम होऊन, त्यातून योगाच्या खुणा आणि ज्ञानदेवांविषयी अत्यादर स्पष्ट झाला आहे. नामदेवांच्या घरी दळण-कांडण करणारी, आई-बापा विना पोरकी असलेली एक सामान्य दासी सत्संगतीने आणि शुद्ध आचरणाने केवढ्या महत्पदास जाऊन पोहोचते हे जनाबाईंनी आपल्या कार्यकर्तृत्वाने दाखवून दिले आहे. त्यामुळे वारकरी संतमेळ्यात जनाबाईंचा उल्लेख 'संतवाटिकेतील जाईची वेल' असा केला जातो. तर जनाबाई स्वत: आपल्या अभंगांत 'नामयाची दासी जनी' असा उल्लेख

करताना दिसतात. अशा शुद्धभाव आणि आचरण असलेल्या जनाबाईंचा समाधीकाळ आषाढ वद्य शके १२७५ (इ.स. १३५०) असा आहे.

**उपसंहार**

मित्रानो ! या घटकात आपण वारकरी संप्रदायाचा स्थूल परिचय करून घेतला. या संप्रदायाचा पाया रचणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या आणि त्याचा विस्तार करणाऱ्या नामदेवांच्या वाङ्मयाचा परिचय करून घेतला. महाराष्ट्राच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक जीवनाची साक्षेपी घडण या दोन संतांनी केली, 'इथे मराठीचिये नगरी ब्राह्मविद्येचा सुकाळू' करण्याची प्रतिज्ञा ज्ञानेश्वरांची होती; तर 'नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी' ही नामदेवांची आकांक्षा होती. महाराष्ट्र शारदेच्या मंदिरात ज्ञानेश्वरांनी जो ज्ञानदीप प्रज्वलीत केला त्याच्या ज्योतीवर असंख्य दीपिका उजळून समाजजीवनातला सारा अंध:कार नाहीसा करून टाकण्याची नामदेवांची महत्त्वाकांक्षा होती. नामदेवांनी आपल्या ऐंशी वर्षांच्या आयुष्यात मोठ्या निष्ठेने व तन्मयतेने वारकरी पंथाचा प्रसार करून बहुजन समाजाच्या सुप्त आकांक्षा जागृत केल्या. त्यामुळे हा संप्रदाय खराखुरा जनतेचा संप्रदाय ठरला. ज्ञानेश्वरांनी शूद्रातिशूद्रांना एक नवी ध्येयदृष्टी दिली तर नामदेवांनी आपल्या संसाराचा सारा भार पांडुरंगावर सोपवून भारतभर फिरत आपल्या कीर्तनांनी ईश्वराच्या यथार्थ ज्ञानाचा दीप उजळून दया, क्षमा, शांतीचा सर्वत्र प्रसार करीत, समाजातील अठरापगड जातींमधील लोकांना भक्तीगंगेच्या प्रवाहात सामील करून घेतले, आणि महाराष्ट्रात आध्यात्मिक लोकशाही निर्माण केली. या आध्यात्मिक लोकशाहीत संतमेळ्यातील गोरा कुंभार, सांवता माळी, नरहरी सोनार, संत चोखामेळा, कर्ममेळा, सेना महाराज, परिसा भागवत, संत मुक्ताबाई, संत जनाबाई आणि संत कान्होपात्रा इ. संतांनी भक्तीमार्गातील आपले अनुभव शब्दबद्ध केल्याने वारकरी संप्रदायाला एक विराट स्वरूप प्राप्त झाले. परमार्थाचे अनेकविध मार्ग या संतांनी समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविले. त्यामुळे गेली सातशेहून अधिक वर्षे वारकरी संप्रदाय महाराष्ट्रभर, पर्यायाने मराठी मनावर अधिराज्य गाजवत असल्याचे दिसते. या वारकरी संप्रदायात भारतातील सर्वधर्मीयांचा समावेश झाल्यामुळे आषाढी, कार्तिकीला पंढरपुरात आज भाविकांचा पूर आलेला पहायला मिळतो.

## ३.४ शब्दार्थ व टीपा

- **चित्शक्तीवाद :** विश्व म्हणजे चित्शक्तीचा विलास असल्याची धारणा; विश्व म्हणजे चैतन्याची प्रभा किंवा क्रीडा असे मानने.
- **क्षेम :** कल्याण, सुख, हित.
- **गौळण :** कृष्णाने वेडावलेल्या गोपींच्या भूमिकेतून रचलेले काव्य.
- **विराणी :** भक्ताने गायीलेले देवाच्या विरह, दु:खाचे गाणे.
- **किंकर :** सेवक, दास.
- **ठाकूर :** नामदेवांच्या हिंदी पदावलीत आलेला शब्द 'देव' या अर्थाने योजला गेला आहे.

- **हुताशन :** आहुती, हवनीय द्रव्य
- **कृपण :** कंजुष.
- **झेंगट :** एक वाद्य,
- **साळुंका :** शिवलिंगाखालचा दगड.
- **नवनीत :** लोणी.
- **झनकुट :** झपाटून टाकणे.
- **डोंगा :** वाईट, वाकडा, हीन.
- **उदक :** पाणी.
- **ताटी :** झोपडीचे दार.
- **क्षेपक :** काव्यात नंतर घुसडलेला मजकूर.
- **पतीतपावन :** पापाचा नाश करणारा.
- **अजामेळ :** पातकी पण नामस्मरणाने उद्धरिलेला.

## ३.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न आणि उत्तरे :

**योग्य पर्याय निवडा**

१. वारकरी संप्रदायाचा पाया कोणी रचला ?

(संत नामदेव / संत ज्ञानेश्वर / संत पुंडलिक)

२. 'संत वाटिकेतील जाईची वेल' असे कोणास महटले जाते ?

(संत जनाबाई / संत मुक्ताबाई / संत कान्होपात्रा)

३. अमृतानुभव हा ग्रंथ एकूण प्रकरणात विभागला आहे.

(नऊ / दहा / अठरा)

४. 'सांवता सागर, प्रेमाचा आगर' असा सांवता माळ्याचा गौरव कोणी केला.

(संत गोरा कुंभार / संत ज्ञानेश्वर / संत नामदेव)

**उत्तरे** १. वारकरी संप्रदायाचा पाया ज्ञानेश्वर रचला.

२. 'संत वाटिकेतील जाईची वेल' संत जनाबाईस म्हटले जाते.

३. अमृतानुभव हा ग्रंथ एकूण दहा प्रकरणांत विभागला आहे.

४. 'सांवता सागर, प्रेमाचा आगर' असा सांवता माळ्याचा गौरव संत नामदेवांनी केला आहे.

**दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. तत्त्वज्ञान आणि कवित्व यांचा सुरेख मिलाफ झालेली ज्ञानदेवांची वाङ्मयीन कामगिरी विशद करा.

**प्रास्ताविक :** तेराव्या शतकात महाराष्ट्रात महानुभाव आणि वारकरी संप्रदाय उदयास आले होते. तत्कालीन महाराष्ट्रात वैभवसंपन्न आणि सनातनी धर्माभिमानी अशी यादवांची सत्ता प्रस्थापित होती. समाजात धर्माचे अवडंबर माजले होते. खरा धर्म ग्रंथात आडकून पडल्याने सर्वसामान्यांची धार्मिक कुचंबना होत होती. त्यावेळी महाराष्ट्रात गुजरातच्या चक्रधरस्वामींनी जशी पारंपरिक सनातनी मूल्यांना नाकारत मानवतावादी विचारांची पेरणी केली; तशी ज्ञानेश्वरांनी सर्वसामान्यांना भक्तीची आणि मुक्तीची वाट सोपी केली. 'ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।' या संत बहिणाबाईंच्या उक्तीप्रमाणे संत ज्ञानदेवांनी आपल्या शुद्ध व पवित्र आचरणाने वारकारी संप्रदायाचा पाया घातला. प्रपंचातून परमार्थ साधता येतो, हे ज्ञानदेवांनी 'गृहस्थाश्रम न सांडिता । कर्मरेखा नोलांडिता ' अशा शब्दांत सांगितले. सर्वधर्मीयांना भागवतधर्माच्या पताकाखाली एकत्रित आणले.

**विवेचन :** वारकरी संप्रदायातील पहिलेच आणि सर्वश्रेष्ठ संत म्हणजे ज्ञानेश्वर. लोकोत्तर असे ज्ञानदेवांचे जीवन-व्यक्तिमत्त्व आणि वाङ्मय - १८ अध्यायांच्या ज्ञानेश्वरी सारख्या टीकाभाष्यातून ज्ञानयोग, कर्मयोग व भक्तियोग यांचे गीतेमधील सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविलेले तत्त्वज्ञान - इथे मराठीचिरे नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळू करी' म्हणून केलेला लोकभाषेचा पुरस्कार - ज्ञानेश्वरांच्या काव्यात झालेला तत्त्वज्ञान आणि काव्य यांचा सुरेख मेळ - ज्ञानेश्वरीतून जन्ममृत्यूच्या कक्षेत मनुष्याने शुद्ध आचरण ठेवावे असा घालून दिलेला आदर्श - 'शृंगाराच्या माथां पावो ठेवणारा' शांतरस ज्ञानेश्वरीचा प्राणविशेष. ज्ञानेश्वरीतील रूपके व प्रतिमासृष्टी - विश्वकल्याणासाठी मागितलेले पसायदान - 'अमृतानुभव' हा तत्त्वज्ञानात्मक स्वतंत्र ग्रंथ - अमृतानुभवातून ज्ञानदेवांनी सांगितलेला चिद्‌विलासवाद - शिवशक्ती ऐक्य व प्रकृती - पुरुष यांचे एकरूपत्व निरूपणासाठी ज्ञानेश्वरांची समर्पक दृष्टांत योजना-मानवी जीवनाचे विश्लेषण - 'चांगदेव पासष्टी' एक प्रासंगिक प्रकरण - पत्ररूपाने चांगदेवांशी साधलेला तत्त्वज्ञानविषयीचा संवाद - अमृतानुभवातून अद्वैतानुभवाचे व भक्तीप्रेमाचे गुंफलेले सूत्र - ज्ञानदेवांनी चांगदेवांना केलेला पूर्णाद्वैताचा बोध - ज्ञानदेवांचे अभंग म्हणजे भक्तीच्या वाटेवरील एका संताचा प्रवास - ईश्वर भेटीची तळमळ - देवाच्या विरहाने होणारे दुःख, पंढरीवर्णन, विठ्ठलवर्णन, बालक्रीडा इ. विषयीचे ज्ञानदेवांचे अभंग म्हणजे वारकऱ्यांच्या नित्यपाठाची संध्या, ज्ञानदेवांच्या मधुराभक्तीने ओथंबलेल्या विराण्य म्हणजे उत्कट आणि सोज्वळ भावनांचा सात्विक विलास - ज्ञानदेवांनी सर्वसामान्यांना, प्रापंचिकांना अभंगांद्वारे केलेला उपदेश इ.

**समारोप :** ज्ञानदेवांनी आपल्या कृतीतून व वाङ्मयातून सामान्य माणसांसाठी धर्माचे दरवाजे खुले केले. भक्तीची आणि मुक्तीची वाट कोणीही चालू शकतो असा दिलासा त्यांनी सर्वसामान्यांना दिला. 'गृहस्थाश्रम न सांडिता। कर्मरेखा नोलांडिता' प्रपंच आणि परमार्थ साधता येतो असा ज्ञानदेवांनी आदर्श घालून दिला. गिरीकंदरात योगीजनांच्या गोतावळ्यात अडकून पडलेला परमार्थ आणि ईश्वरविषयक भाव ज्ञानदेवांनी सर्वसामान्यांच्या दारात आणून उभा केला. अशा ज्ञानेश्वरांच्या कृतीचा आणि वाङ्मयाचा दीर्घकाळ महाराष्ट्रावर पर्यायाने मराठी मनावर परिणाम होत आला आहे.

२. 'वारकरी पंथप्रसारक' आणि 'भावकवी' या दृष्टींनी भागवत संप्रदायातील नामदेवांचे कार्य विशद करा.

**प्रास्ताविक :** ज्ञानदेवांचे समकालीन, काहीसे निराळे व्यक्तिमत्व असलेले पण तितकेच कर्तृत्ववान असे दुसरे संत म्हणजे नामदेव. 'नामा तयाचा किंकर । तेणे केलासे विस्तार '' या संत बहिणाबाईंच्या उक्तीप्रमाणे ज्ञानेश्वरांनी उभारलेल्या वारकरी संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राबाहेर पंजाबपर्यंत करण्याची बहुमोल कामगिरी नामदेवांच्या अभंगवाणीने आणि कृतीने पार पाडली. मराठी वाङ्मयात नामदेवांची स्वतंत्र अशी ग्रंथरचना नसली, तरी त्यांचे अडीच हजार अभंग लाखमोलाचे आहेत. या अभंगांतून त्यांनी भक्तियोगाचे निरूपण केल्याने ते 'भक्तशिरोमणी' या पदवीला पोहोचले व ईश्वराचे लडिवाळ भक्त म्हणून प्रसिद्ध पावले.

**विवेचन :** वारकऱ्याच्या घरता जन्मल्यामुळे लहानपनापासूनच झालेले भक्तीचे संस्कार संतुष्ट वृत्तीने नामदेवांनी चोखाळलेला परमार्थ मार्ग – ज्ञानदेव – नामदेव भेट ही वारकरी संप्रदायातील ऐतिहासिक घटना – नामदेवांची डोळस भक्ती – पंजाबमधील शिखांच्या 'गुरूग्रंथसाहिबा' या ग्रंथात झालेला नामदेवांच्या पदांचा समावेश – ईश्वरी साक्षात्काराच्या प्रवासातील आणि परमार्थिक वाटचालीतील भावनात्मक अनुभव – आद्य आत्मचरित्रकार म्हणून नामदेवांच्या आत्मचरित्रात्मक अभंगातून प्रतिबिंबित झालेल्या त्यांच्या आयुष्यातील चार महत्त्वाच्या घटना –नामदेवांचा गृहजीवन व्यवसाय भक्तीगर्व परिहारापासून आत्मसुखप्राप्ती पर्यंतचा जीवन प्रवास – नामदेवांनी लिहिलेली संत व पौराणिक चरित्रे – आदि–समाधी तीर्थावळी – नामदेवांच्या आत्मनिवेदनपर अभंगांतून संसाराशी दुरावा, ईश्वराचे प्रेम, ओढ, आर्तता शरणागती, त्याच्या दर्शनाची तीव्र तळमळ, विठ्ठलाशी प्रेम कलह, विठ्ठल आणि त्यांची झालेली उराउरी भेट व तो भेटल्यानंतरचा परमानंद असे व्यक्त झालेले अनेकविध भाव – नामदेवांच्या मनाचा बद्धावस्थेतून साधकदशेत झालेला प्रवास – नामदेवांनी बालक्रीडेचे अभंगांतून साधलेली कृष्णभक्ती – नामदेवांनी आपल्या उपदेशपर अभंगांतून 'कीर्तन आणि नामस्मरण' या प्रभावी माध्यमाद्वारे 'हरिहरा भेद अमंगळ' असा सर्वसामान्य भक्तांना केलेला उपदेश–शिव आणि विष्णू यांच्या अद्वैताविषयी नामदेवांनी 'विष्णूशी भजला शिव दुरावला / अध:पात जाला तया नरा' असा केलेला निवाडा – नामदेवांच्या अभंगातील प्रतिमासृष्टी आणि त्यांनी विठ्ठलास दिलेली जननी, धेनू, पाक्षेणी, हरिणी, कासवी इ. मातृरूपे – नामदेवांची आरती आणि भूपाळी ही स्फूट रचना म्हणजे प्राचीन मराठीतील पहिली भावकविता – नामदेवांच्या

अभंगात भरलेली भक्तीची आर्तता त्यांना 'भक्तशिरोमणी' या पदवीस पोहोचविते इ. (अधिक उत्तरासाठी ३.३.२.२ हा मुद्दा पहावा)

**समारोप :** नामदेवांनी आपल्या अभंगांतून परमार्थ क्षेत्रातील आर्त – जिज्ञासू–अर्थार्थी व ज्ञानी या चारही पायऱ्या पार करून आत्महित साधले. नामदेवांची एकूणच कविता ईश्वरनिष्ठा जोपासणारी, ईश्वरतत्त्वाशी सतत संवाद साधणारी आणि ईश्वराशी एकरूप होण्याची इच्छा बाळगणारी आहे. नामदेव थोर भक्त होते. तसेच ते कुशल संघटकही होते. वारकरी संप्रदायाच्या संघटनेचे कार्य त्यांनी ज्ञानदेवांच्या हयातीत तर केलेचे; पण नामदेवांनी विठ्ठलभक्तीची ध्वजा सर्वत्र फडकविली.

**लघुत्तरी प्रश्न :**

१. मुक्ताबाईंच्या अभंगांची वैशिष्ट्ये विशद करा :

**प्रास्ताविक :** ज्ञानदेवादी भावंडांमध्ये मुक्ताबाई सर्वांत धाकटी असली तरी आपल्या प्रौढ विद्वत्तेने आणि विरक्त वृत्तीने राहून परमार्थ क्षेत्रातील मोठा अधिकार त्यांनी प्राप्त केला होता. त्यांची विविधतेने नटलेली अभंगरचना वारकरी संप्रदायात आजही प्रकाशमान अशी आहे. या अभंगवाणीतून त्यांच्या प्रौढ व प्रगल्भ बुद्धीची साक्ष पटते. त्यांच्या नावाप्रमाणेच मुक्तीकडून मुक्तीकडे असा त्यांच्या जीवनाचा आणि अभंगांचा प्रवास झाला आहे.

**विवेचन :** मुक्ताबाईंच्या नावावर सकलसंतगाथेत उपलब्ध असणारी अभंगसंख्या अल्प असली तरी ती काव्यगुणांनी समृद्ध आहे. मुक्ताबाईंच्या हरिपाठाच्या अभंगांतून आलेले मुक्तीचे चौफेर उल्लेख हे त्या अभंगांचे खास वैशिष्ट्य – मुक्ताबाईंचे एक प्रासंगिक प्रकरण म्हणजे त्यांचे ताटीचे अभंग होत – कौटुंबिक नाते बाजूला ठेवून धाकट्या बहिणीने ज्ञानेश्वरांचा रूसवा काढण्यासाठी रचलेल्या ताटीच्या अभंगांत भावनेची कोवळिकता पदोपदी जाणवते – आध्यात्मिक साधनेच्या जोरावर प्राप्त झालेल्या अधिकारातून त्यांनी वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध चांगदेवांना 'कोराच्या कोरा' ठरवून त्यांच्याशी जो संवाद साधला तो त्यांनी कूट अभंगांत नोंदविला आहे. अस्तित्ववादी कविता हे त्यांच्या कूट अभंगांचे वैशिष्ट्य – चांगदेव शरण येताच त्यांचे मातृत्व स्वीकारून त्यांच्यावर वात्सल्याचा अमाप वर्षाव करताना त्यांनी गायीलेली अंगाईगीते (पाळणागीते) मराठी वाङ्मयात उठावदार झाली आहेत. – अंगाईगीतांतून त्यांनी स्वीकारलेली उपदेशकाची भूमिका मातृत्वाची आहे हे त्या अभंगांचे नजरेत भरणारे वैशिष्ट्य. नामदेवांचा गर्वपरिहार करून त्यांना भक्तीसन्मार्गावर आणणाऱ्या मुक्ताबाईंची 'अखंड जयाला देवाचा शेजार । कां रे अहंकार गेला नाही' ही रचना त्यांच्या आध्यात्मिक अधिकाराचा उत्कृष्ट नमुना म्हणता येईल – हरिपाठ, नाममाहात्म्य, संतसमागम, ताटीचे अभंग, कूट अभंग व आध्यात्मिक अंगाईगीते असे त्यांचे अभंग विविधतेने नटलेले आहेत.

**समारोप :** निवृत्तिनाथांसारख्या तत्त्वज्ञानाला गुरू मानणारी, ज्ञानदेवांचा लडिवाळपणे रूसवा काढणारी, योगी चांगदेवांना बाळ समजून पोटाशी घेत उपदेश करणारी, नामदेवांचा गर्व परिहार करणारी मुक्ताबाई आपल्या कूट आणि प्रासादिक अभंगांनी मराठी वाङ्मयात प्रकाशमान झाली आहे. त्यांचे मराठी कवितेला मोठे योगदान लाभले आहे.

**टीपा लिहा.**

१. **जनाबाई**

**प्रास्ताविक :** गंगाखेडला राहणाऱ्या दमा आणि करूंड या भगवद्भक्तांची जनाबाई ही मुलगी, बालपणातच गवद्भक्तीचे बाळकडून मिळाल्याने 'विठ्ठल मूर्तीचे दर्शन दररोज व्हावे' असा हट्ट धरून त्या पंढरपूरातच दामाशेटींच्या घरात राहतात. तेथे त्यांना भक्त शिरोमणी संत नामदेवांचा भक्ती सहवास लाभल्याने शुद्राघरच्या एका साध्या पोरीच्या आयुष्यास सोनेरी किनार लाभते. नामदेवांच्या कृपेने त्यांना विठ्ठल कृपेचा लाभ होतो. म्हणूनच त्यांचा 'नामयाची दासी जनी' असा उल्लेख केला जातो.

**विवेचन :** आईबाप लवकरच निर्वतल्यामुळे आधारासाठी जनाबाईंनी केलेला विठ्ठलाचा आर्त धावा – ज्ञानदेव आणि नामदेव यांच्या अभंगवाणीचे त्यांच्या अभंगांवर झालेले संस्कार – जनाबाईंचे विठ्ठलमहिमा, संत चरित्रपर, बालक्रीडा, आख्यानकविता, आरत्या, पदं अशी वैविध्यपूर्ण रचना – विठ्ठलाला स्त्रीसुलभ आणि कारूण्याने भरलेल्या भाषेत घातलेली साद – नामस्मरणाचे महत्त्व – देवास ऋणी केल्याने हर एक कामात जनाबाईस देवाने केलेले साहाय्य – विठ्ठलाला मोठ्या अधिकारानें मूळ मायेचे कारटें' संबोधून त्यांनी विठ्ठलाला घातलेली साद – ज्ञानेश्वर चरित्रातून व्यक्त केलेला आदरभाव – संतमेळ्यातील लडिवाळ भक्त आणि विठ्ठल यांचा वर्णिलेला चैतन्यसोहळा – जनाबाईंच्या अभंगांतून पाहायला मिळणारा 'सुंदर माझे जातें ग फिरे बहुतेके' सारख्या जात्यावरील लोकगीतांचा अविष्कार – कीर्तनपरंपरेचा गौव – जनाबाईंची विविध दृष्टांतानी नटलेली आख्यानकाव्ये इ.

**समारोप :** स्त्री मनाचा हळुवारपणा आणि भक्तीची उत्कटता ओथंबून भरलेले जनाबाईंचे अभंग स्त्रीमुक्तीचे आणि श्रममुक्तीचे श्रेष्ठ तत्त्व सांगणारे आहेत. नामदेवांच्या घरी दळण–कांडण करणारी, आई–बापा विना पोरकी असलेली एक सामान्य दासी, सत्संगतीने आणि शुद्ध आचरणाने केवढ्या महानपदास जाऊन पोहोचते हे जनाबाईंनी आपल्या कार्यकर्तृत्वाने दाखवून दिले आहे. त्यामुळे वारकरी संप्रदायात जनाबाईंचा उल्लेख 'संतवाटिकेतील जाईची वेल' असा केला जातो.

## ३.६ सारावासाठी प्रश्न

**योग्य पर्याय निवडा :**

१. सांवता माळ्याचा जन्म येथे झाला.
   (तेरढोकी / अरणभेंडी / बांदुगडे)

२. 'मुंगी उडाली आकाशी । तिने गिळीले सूर्याशी' हा अभंग यांचा आहे.
   (संत जनाबाई / संत ज्ञानेश्वर / संत मुक्ताबाई)

३. ज्ञानेश्वरांच्या 'ज्ञानेश्वरी'ची आध्यायसंख्या इतकी आहे.
   (सात / नऊ / अठरा)

४. संत जनाबाईंचा जन्म या गावी झाला.

(नरसी-बामणी / गंगाखेड / पंढरपूर)

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. 'संत ज्ञानदेवांची वाङ्मयीन कामगिरी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीस कारणीभूत झाली'. साधार चर्चा करा.

**लघुत्तरी प्रश्न**

१. सेना महाराजांची वाङ्मयीन कामगिरी विशद करा.

**टीपा लिहा.**

१. गोरा कुंभार.

## ३.७ समारोप

विद्यार्थी मित्रानो ! या घटकात आपण गेली सातशेहून अधिक वर्ष महाराष्ट्रावर पर्यायाने मराठी मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या वारकरी संप्रदायाचे स्वरूप पाहिले. या संप्रदायाचा पाया ज्ञानदेवांनी रचिला व नामदेवांनी त्याचा विस्तार केला. या संप्रदायाचा आचारधर्म व तत्त्वज्ञान सर्वसामान्यांना पेलणारे असल्याने पुढे या संप्रदायात समाजातील विविध जाती मधील लोक सामील झाले. परमार्थ क्षेत्रातील आपले अनुभव शब्दबद्ध करून संतत्वास पोहोचले. 'हाती काम मुखी नाम' हे या संप्रदायाचे ब्रीद असल्याने या कालखंडातील संतांनी आपला व्यवसायच विठ्ठलमय करून टाकला. या सर्वांचा परिणाम म्हणून तेराव्या शतकात महाराष्ट्रात आध्यात्मिक लोकशाही निर्माण झाली. या लोकशाहीत विचारस्वातंत्र्य, आचारस्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य स्वीकारून सुद्धा भक्तीवरील श्रद्धा कायम ठेवून त्यांनी परमार्थ साधला. सर्वांना सामावून सर्वांना एकत्र बांधणारी, सर्वांच्या गुणांचा विकास करून आध्यात्मिक क्षेत्रात समता, बंधुता, स्वातंत्र्य प्रदान करून सकल जीवांचा उद्धार करणारी ही परंपरा सर्वांभूती परमेश्वर पाहणारी आहे. त्यामुळे तिला अमरत्व प्राप्त झाले आहे.

## ३.८ अधिक वाचन


१. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : ल. रा. नासिराबादकर

२. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : भाग पहिला उत्तरार्ध : डॉ. अ. ना. देशपांडे.

३. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : प्र. न. जोशी.

४. मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड पहिला : संपादक शं. गो. तुळपुळे.

५. संत कविता : एक दृष्टिकोन : डॉ. प्रकाश देशपांडे केजकर.

६. संत कवी आणि कवयित्री : एक अनुबंध : डॉ. सुहासिनी इर्लेकर.

७. मराठी वाङ्मयाचा इतिहास- खंड पहिला : ल. रा. पांगारकर.

८. श्री नामदेव : (चत्रि, काव्य आणि कार्य) : महाराष्ट्र शासन प्रथम मुद्रण १९७०.

९. संत नामदेव : डॉ. हे. वि. इनामदार.

१०. नामदेव गाथा : (संपा.) ह. श्री. शेणोलीकर.

## ३.९ उपक्रम

१. पद्माकर गोवईकर यांची मुळ कथा असलेला 'मुंगी उडाली आकाशी' हा मराठी चित्रपट पहावा.

२. पद्माकर गोवईकर यांची भूमिका असलेला निर्माता शशी गोडांबे यांचा 'संत नामदेव' हा चित्रपट पहावा.

३. आषाढी/कार्तिकी एकादशीला स्वत: पंढरपुरास जाऊन ज्ञानदेवांनी उभारलेला व नामदेवांनी विस्तारलेल्या वारकरी संप्रदायाचे आजचे विराट रूप पहावे. संत समाधी स्थळे पहावीत.

❑❑❑

# घटक : ४

# संत एकनाथ व संत तुकाराम यांचे समग्र साहित्य, तुकाराम शिष्या बहिणाबाई

## ४.० उद्दिष्टे

या घटकाचे अध्ययन केल्यामुळे आपल्याला,

- संत एकनाथांच्या विविध प्रकारच्या वाङ्मयनिर्मितीची कल्पना येईल.
- संत तुकारामांच्या अभंगवाणीचे स्वरूप व वैशिष्ट्ये समजतील.
- तुकाराम शिष्या बहिणाबाईंच्या अभंगलेखनाचे स्वरूप समजेल.

## ४.१ प्रास्ताविक

मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचा अभ्यास करताना त्या त्या काळातील संप्रदायांचा आणि संतकवींचा विचार केला जातो. नाथ, महानुभाव, वारकरी, समर्थ आणि दत्त इत्यादी प्रमुख संप्रदाय या कालखंडात उदयास आले आणि विकसित झाले. मुकुंदराज, चक्रधर, ज्ञानेश्वर, नामदेव यांच्यासारख्या असामान्य कामगिरी बजावणाऱ्या संतांचा अभ्यास करत असतानाच महदंबा, गोरा कुंभार, सांवता माळी, नरहरी सोनार, चोखामेळा, कर्ममेळा, सेना न्हावी, मुक्ताबाई, जनाबाई इत्यादी लहानमोठ्या संतांच्या वाङ्मय निर्मितीचा परामर्श घेणे क्रमप्राप्त ठरते. याच परंपरेतील पुढील महत्त्वाचा टप्पा म्हणजे एकनाथ आणि तुकाराम. या दोघांनीही विपुल लेखन करून संत वाङ्मय समद्ध बनविण्यास हातभार लावला. त्यांचे लेखन जनमानसापर्यंत पोहचले. प्रभावी आणि परिणामकारक लेखन करणारे संतकवी म्हणून त्यांना उदंड लोकप्रियता प्राप्त झाली. या दोघांच्या महत्त्वपूर्ण वाङ्मय निर्मितीचा आणि सांस्कृतिक कार्याचा परामर्श घेतल्यानंतर या काळातील एक प्रमुख संत कवयित्री बहिणाबाई यांच्या लेखनकार्यावर दृष्टिक्षेप टाकणे संयुक्तिक ठरते.

## ४.२ विषयविवेचन

ज्ञानदेव-नामदेवांच्या नंतरचे दोन मोठे संतकवी म्हणजे एकनाथ आणि तुकाराम. समन्वयकार एकनाथ आणि प्रबोधनकार तुकाराम असे त्यांचे यथार्थ वर्णन करता येईल. एकनाथांनी विविध प्रकारचे विपुल लेखन केले. त्यांच्या वाङ्मयनिर्मितीतून जशी प्रतिभासामर्थ्याची ओळख पटली. त्याचप्रमाणे संपन्न व्यक्तिमत्त्वाची प्रचिती आली. संत तुकाराम हे तर प्रतिभासंपन्न साहित्यिक आणि लोकशिक्षक. आपल्या अभंगवाणीतून विठ्ठल भक्ती बरोबरच त्यांनी समाजप्रबोधनालाही तितकेच महत्त्व दिले. या दोहोंच्या सर्वांगीण कामगिरीचा सविस्तर परामर्श घेतल्यानंतर तुकारामांची शिष्या बहिणाबाईंच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणे आवश्यक ठरते.

## ४.३ संत एकनाथ

### कविपरिचय

भक्तीची परंपरा असलेल्या पुण्यपावन घराण्यात पैठण येथे इ.स. १५२८ मध्ये नाथांचा जन्म झाला. ज्यांनी विजयनगरहून श्रीविठ्ठलाची मूर्ती पंढरपुरास परत आणली, त्या संत भानुदासांचे नाथ हे पणतू होत. कृष्णाची आणि विठ्ठलाची उपासना करत करत भक्तिमार्ग अनुसरणाऱ्या भानुदासांचा मुलगा चक्रपाणी. या चक्रपाणीचा मुलगा म्हणजे सूर्यनारायण. सूर्यनारायणाच्या पोटी एकनाथांचा जन्म झाला. वर्षभरातच त्यांना माता पित्याच्या सहवासाला कायमचे पोरके व्हावे लागले. तेव्हा आजोबांनी नाथांचे पालनपोषण केले.

नाथांनी वयाच्या बाराव्या वर्षांपासून गुरुसेवेला प्रारंभ केला. अठराव्या वर्षी 'सुलभ' पर्वतावर त्यांना सगुण साक्षात्कार झाला. नंतर त्यांनी काही काळ आपले गुरू जनार्दन स्वामींच्या सोबत तीर्थयात्रा केली. त्यानंतर त्यांनी गृहस्थाश्रम स्वीकारला व पैठण येथेच वास्तव्य केले. इ.स. १५९९ मध्ये फाल्गुन वद्य षष्ठी शके १५२१ या तिथीला त्यांनी देहत्याग केला. विशेष म्हणजे याच तिथीला नाथांचे गुरू जनार्दन स्वामी यांचा जन्म, आत्मसाक्षात्कार, नाथांवर अनुग्रह आणि नाथांचा देहत्याग या चार गोष्टी घडल्या. यात काही विशिष्ट संकेत असावा, असे अभ्यासकांना वाटते.

भागवत धर्माची इमारत भक्कम पायावर उभी करून एकनाथांनी आपल्या अलौकिक कार्याचा परिचय घडवला. या त्यांच्या कामगिरीचा विचार करताना त्यांची गुरूपरंपरा लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते. परंपरागत समजुतीप्रमाणे एकनाथांची गुरूपरंपरा नारायण-अत्री-दत्तात्रेय-जनार्दन-एकनाथ अशीच असून आपल्या लेखनांतून त्यांनी स्वत: ही परंपरा नमूद केलेली आहे. वा. सी. बेंद्रे यांच्यासारख्या अभ्यासकांनी मात्र ही परंपरा नाकारलेली आहे. त्यांच्या मते नाथांची गुरुपरंपरा साक्षात दत्तात्रेय-जनार्दन अशी नसून ती सुफी सांप्रदायिक चांदबोधल्यांची आहे. चांदबोधले हे मूळचे चंद्रभट ब्राह्मण कालांतराने सुफी झाले. तेच जनार्दन स्वामींचे गुरू होत. रा. चिं. ढेरे यांनीही हीच परंपरा मान्य केलेली आहे. अर्थात, शं. दा. पेंडसे यांनी मात्र परंपरागत मतच मान्य केलेले असून, बहुसंख्य अभ्यासकांनीही परंपरागत गुरूपरंपरेलाच पुष्टी दिलेली आहे.

### नाथकालीन महाराष्ट्र

नाथांचा काळ हा इस्लामी राजवटीचा होता. या काळात खऱ्या धर्माचा ऱ्हास होत चालला होता. स्वत:ला श्रेष्ठ म्हणणारे ब्राह्मण यवनांच्या चाकरीत सुख मानत होते. सर्वत्र अनाचार वाढलेला होता. फसवेगरी, बुवाबाजी, ढोंग यांना ऊत आला होता. नवी कर्मकांडे आणि नवससायास यातच लोकांना धन्यता वाटत होती. खऱ्या आत्मज्ञानापासून लोक दूर गेले होते. भोंदू गुरुंच्या भोवती अगतिक लोकांची गर्दी होत होती. क्षुद्र देवदेवतांचा बडेजाव माजला होता. सर्वत्र दु:ख, दारिद्र आणि अज्ञानच दृष्टीस पडत होते. महाराष्ट्राच्या संस्कृतीची आणि मराठी भाषेची गळचेपी सुरू होती. पैठणसारखे तीर्थक्षेत्र तर कर्मठपणाचे माहेरघर बनले होते. परिणामी ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञानाचा सर्वांनाच विसर पडत चाललेला होता. ही परिस्थिती लक्षात

घेऊन भक्तिमार्गाचे पुनरूज्जीवन करण्याचे आव्हान नाथांनी समर्थपणे स्वीकारले आणि जनार्दन स्वामींच्या आज्ञेनुसार कार्यरत राहून त्यात ते यशस्वी झाले.

**नाथांची ग्रंथसंपदा**

संत एकनाथांनी विविधप्रकारच्या वाङ्मयकृतींना जन्म दिला. आपल्या प्रतिभा सामर्थ्याच्या जोरावर त्यांनी विपुल आणि वैविध्यपूर्ण रचना केली. भोवतालच्या राजकीय, धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीचा बारकाईने अभ्यास केला. त्यांची निरीक्षण शक्ती असामान्य होती. त्यामुळेच नेमके आणि नेटके चित्रण करण्याची हातोटी त्यांना साधली. प्रतिकूल परिस्थितीतून लोकांना बाहेर काढून त्यांना खऱ्या ज्ञानाची ओळख करून द्यावी, असा त्यांचा उदात्त दृष्टिकोण होता. याच भूमिकेतून ते ग्रंथ लेखनाकडे वळले. लोकांना सहज समजेल व पचेल अशा लोकभाषेचा त्यांनी जाणीवपूर्वक अवलंब केला. म्हणजेच ज्ञानदेवांची परंपरा त्यांनी पुढे चालू ठेवली. लोकभाषेचा पुरस्कार, ढोंगीपणाचा तिरस्कार आणि लोकोद्धाराची तळमळ या त्रिसुत्रींच्याद्वारे त्यांनी आपल्या वाङ्मयाची निर्मिती केली.

**चतु:श्लोकी भागवत**

समाजाच्या सर्व स्तरांतील लोकांच्यासाठी लिहिण्याची नाथांची भूमिका होती. म्हणूनच पंडितश्रेष्ठ, मध्यमवर्गीय आणि सर्वसामान्य अशा तीनही समाजघटकांचा समन्वय साधणारे लेखन त्यांच्या हातून झाले. 'चतु:श्लोकी भागवत' हा नाथांचा पहिला ग्रंथ. पंडितांसाठी हा ग्रंथ लिहिला गेला. गुरू जनार्दन स्वामींच्या आज्ञेने नाथांनी हा ग्रंथ सिद्ध केला. भागवताच्या दुसऱ्या स्कंधामधील नवव्या अध्यायाच्या ३२ ते ३५ या चार श्लोकांवर नाथांनी हे १०३६ ओव्यांचे भाष्य लिहिले. अनुताप-विवेक-वैराग्य व आत्मज्ञान ही परमार्थिक साखळी त्यांनी या ग्रंथात मोठ्या कौशल्याने गुंफलेली आहे. भागवत धर्माचे तत्त्वज्ञान आणि आचारधर्म नाथांनी या ग्रंथाद्वारे विशद करून सांगितला आहे.

'चतु:श्लोकी भागवत' या ग्रंथात भगवंताने ब्रह्मदेवाला सृष्टिनिर्मितीविषयीचे परम गुह्य ज्ञान सांगितले आहे. हे गुह्य ज्ञान थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल. 'भगवंताचे ज्ञान त्याच्या कृपेमुळेच होऊ शकते. विश्वाच्या आदि, अंती आणि मध्ये एक भगवंतच भरून राहिला आहे. अन्वय व्यतिरेकाच्या वैचारिक प्रक्रियेने हे ज्ञान जाणून घेता येते. हरि-विरंची संवादातून हे ज्ञान प्रकट झाले आहे. हे ज्ञान जसे पुरातन, जुनाट आहे तसे नित्यनूतनही आहे. ''तेवी कल्पादी हे गुह्यज्ञान । गुरुमुखे ऐकता सावधान। साधक होती ज्ञानसंपन्न । यालागी नित्यनूतन कथा हे ।।'' असे नाथांनी म्हटले आहे.

हा टीकाग्रंथ असला तरी नाथांच्या स्वतंत्र प्रतिभेच्या काही खुणा येथे पाहावयास मिळतात. 'स्वतंत्र दृष्टांत स्वतंत्र रुपके, स्वतंत्र विचार, स्वतंत्र विवेचन पद्धती, स्वतंत्र शैली असा मौलिकतेचा बहुविध थाट या टीकेत प्रकट झालेला आहे.' असे अ. ना. देशपांडे म्हणतात. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग चौथा, पृ. ७६) मूळ चार श्लोकांत भक्तिविचार नसतानाही नाथांनी आपल्या टीकेत ईश्वरभक्ती व गुरुभक्ती महत्त्वाची मानली असून, तिचे स्वरूप आणि महत्त्व स्पष्ट करण्यासाठी कित्येक ओव्या खर्च केलेल्या

आहेत. नाथ म्हणतात, ''न करिता भगवद्‌भक्ती । ब्रह्मयास नव्हे ज्ञानप्राप्ती । तेथे इतरांची कोण गती । अभजनी प्राप्ती पावावया पै ।।'' किंवा ''माझी पावावया निजप्राप्ती । अन्वये करावी माझी भक्ती ।।'' हठयोगादी साधने, संन्यास, मंत्रजप, शास्त्रपठण यांचा त्याग करून ईश्वरभक्ती करण्याचा आदेश नाथांनी येथे केला आहे. येथे नाथांनी भक्तीचा आणि भागवतधर्माचाच प्रचार केला आहे. नाथांच्या चतु:श्लोकी भागवतावर ज्ञानेश्वरी, अमृतानुभव आणि चांगदेवपासष्टी या तिन्ही ग्रंथांची छाप पडलेली आहे. आपल्या या ग्रंथलेखनाचे श्रेय त्यांनी गुरु जनार्दनस्वामी यांना दिले आहे.

रुपक योजना, गुरुविषयीची श्रद्धा आणि विनयशीलता, स्वभाषेविषयीचा अभिमान आणि भक्तितत्त्वाचे सुबोध विवरण ही या ग्रंथाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

**एकनाथी भागवत**

भागवताच्या एकादशी स्कंधावरील भाष्य म्हणजे नाथांचा हा दुसरा ग्रंथ. सुमारे तीन वर्षे या ग्रंथाचे लेखन चालू होते. इ.स. १५७० मध्ये लेखनाचा प्रारंभ पैठण येथे झाला. तर काशीक्षेत्री इ.स. १५७३ मध्ये लेखन पूर्ण झाले. भागवताच्या एकादश स्कंधात मुळात ३१ अध्यायात १४६७ श्लोक आहेत. नाथांची यावरील टीका १८८०० ओवींच्याद्वारे प्रकट झालेली आहे. हा ग्रंथ वारकरी पंथीयांना ज्ञानेश्वरीइतकाच महत्त्वाचा वाटला व आवडला. भागवत धर्माच्या समग्र स्वरूपाचे दर्शन नाथांनी या ग्रंथात कथात्मक पद्धतीने घडविले आहे. भागवत धर्माची ख्याती व महती याविषयीचे मार्मिक भाष्य त्यांनी विशद केले आहे. देवभक्त संबंध, नामस्मरणमहिमा, सद्‌गुरुमहिमा, बंधमोक्षवर्णन, वर्णाश्रम, धर्म, ज्ञानोत्तर भक्ती इत्यादी विषयांवर त्यांनी रसाळ विवेचन केले आहे. 'भक्ती ते मूळ ज्ञान ते फळ/वैराग्य केवळ तेथीचे फूल' अशा शब्दात त्यांनी भक्तीचे माहात्म्य स्पष्ट केले आहे.

मराठी भाषेविषयीचा सार्थ अभिमान नाथ याही ग्रंथात प्रकट करताना दिसतात. संस्कृतच श्रेष्ठ असल्याचा डांगोरा पिटणाऱ्यांना त्यांनी 'कपिलेचे म्हणावे क्षीर। मा इतरांचे ते काय नीर।' असा खडा सवाल विचारलेला आहे. याचवेळी श्रोत्यांना-वाचकांना त्यांनी

**'ग्रंथु मराठी देखोन। उपेक्षा न करिता करावा रत्न।**

**पारखोनि चिद्रत्न साधावया।'**

अशी विनंती केलेली आहे. हा ग्रंथ म्हणजे पूर्णत: गुरूकृपेचे फळ आहे, असे नमूद करून नाथांनी आपल्या गुरूभक्तीचे आणि विनयशीलतेचे दर्शन घडविले आहे. ते म्हणतात.

**'धरोनी बालकाचा हात। बाप अक्षरे स्वये लिहवीत।**

**तैसा एकादशाचा अर्थ। बोलविलां परमार्थ जनार्दने।।'**

'एकनाथी भागवत' हा नाथांचा ग्रंथ संत तुकारामापासून ते न्या. माधवराव रानड्यांपर्यंत सर्वांकडून गौरविला गेला आहे. या ग्रंथाविषयी ल. रा. पांगारकर म्हणतात, ''ज्ञानेश्वरीत गुप्त राहिलेले ज्ञानेश्वरांचे

अभिप्राय नाथांनी आपल्या भागवतात विशद करून दाखविले आहेत. ज्ञानेश्वरीचे यथार्थ आकलन होण्यास नाथभागवत अवश्य अभ्यासिले पाहिजे. दोन्ही ग्रंथ मिळून एकच ग्रंथ आहे. इतकी त्यात एकात्मता आहे.'' (मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा, पृ. १३०) नाथांची ही भागवतटीका भागवताचे महान संस्कृत भाष्यकार श्रीधरस्वामी यांच्या 'भावार्थदीपिकेला' अनुसरून आहे. श्रीधर स्वामींचे ऋण नाथांनी अनेक ठिकाणी मान्य केले आहे. या संदर्भात नाथ म्हणतात, 'ते श्रीधरीचे व्याख्यान । भावार्थदीपिका जाण । त्या भावार्थाची सद्भाव खूण । केली निरुपण देशभाषा ।। मूळ वक्ता एक नारायण । त्यास शुक श्रीधर व्याख्यान। त्यांत मुळींचे लक्षूनि गोडपण । एका जनार्दन कविकर्ता ।।'

वर्णधर्मपालनात लवचिकपणा आणावा लागतो. देशकालमान पाहून वर्णधर्मपालनाचे नियम ठरवावे लागतात, हे नाथांनी या ग्रंथात स्पष्ट केले आहे. परमार्थात निरपेक्षवृत्ती महत्त्वाची आहे, हेही नाथ अनेक ठिकाणी सांगतात. भक्ती ही भगवतधर्माचा मुख्य प्रातिपाद्य विषय आहे. भक्ती हा मोक्षप्राप्तीचा सर्वश्रेष्ठ मार्ग आहे. ज्ञानी, कर्मयोगी, वैदिक, शास्त्रीपंडित, हठयोगी या सर्वांपेक्षा भगवंताला भक्त फार आवडतो. ''ज्ञान, योग, कर्म आणि नीती यांच्याशी तुलना केली असता भक्ती हे मूल्य कसे सर्वश्रेष्ठ आहे हे नाथांनी आपल्या भागवतटीकेतून दाखविलेले आहे. नाथांची भक्तीची म्हणजेच भागवतधर्माची कल्पना अतिशय व्यापक आणि उदार आहे. देवद्रोही दुरात्मा किंवा विश्वद्रोही दुष्टात्मासुद्धा भक्तिमार्गाने, भागवतधर्माने तरू शकतो.'' असे अ. ना. देशपांडे नाथांच्या भागवतधर्माचे स्वरूप स्पष्ट करतात. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग चौथा पृ. १०२) भागवतात जातिभेदाला स्थान नाही हे सांगताना नाथ म्हणतात, ''तरी नामरुप जाति गोत। या अवघ्यांसि मी अलिप्त । सकळ कुळेसी मी कुळवंत । गोत समस्त जग माझे ।।'' या ग्रंथात भक्तीबरोबरच विवेकयुक्त वैराग्याला महत्त्व दिले आहे. अनेक सुंदर उपमारूपकदृष्टांतादी अलंकारांनी ग्रंथ सजविला आहे. नाथांचे व्यक्तिरेखाटन कौशल्यही पाहण्यासारखे आहे. हरिकथा कोणत्याही भाषेत सांतिली तरी ती उत्तमच असते. तेथे भाषाभिमान व्यर्थ असतो. हे स्पष्ट करताना नाथ म्हणतात, ''देवासी नाही भाषाभिमान । संस्कृत प्राकृत दोन्ही समान । ज्या भाषा केले ब्रह्मकथन । त्या भाषा श्रीकृष्ण संतोषे ।। संस्कृत भाषा निंदा केली । तरी ते काय पावन जाहली । प्राकृत भाषा हरिकथा केली । ते वृथा गेली म्हणवेना ।।.... ज्या भाषा केले ब्रह्मकथन । ते होय पावन हरिचरणी ।।'' तात्पर्य भक्तिमार्गाचा आचार-विचार सांगणारा नाथभागवत हा एक अद्वितीय ग्रंथ आहे.

### रुक्मिणी स्वयंवर

भागवताच्या निमित्ताने काशी क्षेत्री राहात असतानाच नाथांच्या लेखणीतून उतरलेला लोकप्रिय ग्रंथ म्हणजे 'रुक्मिणी स्वयंवर'. इ.स. १५७१ मध्ये या ग्रंथाचा जन्म झाला. वेदांतांचे विचार बहुजन समाजाला सांगण्याच्या उद्देशाने नाथ या ग्रंथलेखनाकडे वळले. त्यांचे हे पहिलेच आख्यानकाव्य. यात १८ अध्याय असून ओवीसंख्या १७११ आहे. पहिल्या सात अध्यायात रुक्मिणीहरणाचा प्रसंग चित्रित झालेला असून नंतरच्या अध्यायांतून युद्धवर्णन आणि विवाह समारंभाचे वर्णन आढळते. 'रुक्मिणी स्वयंवरा'चे कथानक मूळ भागवताच्या दशम स्कंधाच्या ५२ ते ५४ या तीन अध्यायांतील एकूण १४४ श्लोकांवर आधारलेले आहे.

कृष्ण आणि रुक्मिणीच्या मूळ प्रेमकथेतून नाथांनी ही परमार्थ कथा निर्माण केलेली आहे. यात शृंगार आणि भक्तिरसाचे बेमालूम मिश्रण आढळते. म्हणूनच वरवर पाहता या काव्यात कृष्ण रुक्मिणीच्या विवाहाची कथा असली तरी हे लग्न जीवा-शिवाचे आहे. यातल्या शृंगाराला आणि भक्तिरसाला वीर आणि हास्यरसाची जोड लाभलेली आहे. कथेच्या सुरूवातीलाच रुक्मिणीच्या आई-वडिलांची ओळख करून देताना नाथ लिहितात.

**'जैसा मूर्तिमंत विवेक। तैसा जाण राजा भीमक।**

**सत्त्वाथिला अति सात्त्विक। निष्कलंक शोभत।।'**

कृष्ण आणि रुक्मिणी यांच्या व्यक्तिचित्रणाच्या निमित्ताने नाथांच्या कल्पनाविलासाचा येथे जसा प्रत्यय येतो, त्याचप्रमाणे त्यातील रुपक योजनेचे कौशल्यही प्रकट झाल्याचे दिसते. कृष्ण-रुक्मी युद्ध, रुक्मीची फजिती, कृष्ण-रुक्मिणी विवाह इत्यादी प्रसंगांचे नाथांनी केलेले चित्रण विविध रसांनी नटलेले आहे. विशेषत: यातील विवाह वर्णनातून नाथकालीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक स्वरूपाची प्रचिती येते. हे काव्य वाचत असताना सतत नाथांच्या वर्णनसामर्थ्याची, रूपक कौशल्याची, सूक्ष्म निरीक्षण शक्तीची आणि तत्कालीन समाजस्थितीची प्रचिती येते. नाथांच्या अगोदर नरेंद्र या महानुभावीय कवीने किंवा नंतर श्रीधर, सामराज, मोरोपंत इत्यादी कवींनी हा विषय हाताळला असला तरी नाथांच्या स्वयंवर काव्याचे मोल मात्र अद्वितीय वाटते.

पहिल्या दोन ग्रंथांमधून आध्यात्मिक विषयाचे निरूपण करणाऱ्या नाथांनी 'रुक्मिणी स्वयंवरा'द्वारा परमार्थदृष्टी कायम ठेवून आपण ललितकथाही रंगवू शकतो हे दाखवून दिले आहे. म्हणूनच ल.रा. पांगारकर यांनी पुढील शब्दांत या ग्रंथाच्या लोकप्रियतेविषयीची मीमांसा केलेली आहे, 'ही मंगल कृष्णकथा आहे म्हणून भाविक रमतो, जीवशिवैक्य प्रतिपादक अध्यात्म ग्रंथ आहे म्हणून ज्ञानी रमतो, व सुंदर विवाहवर्णन आहे म्हणून रसिक रमतो.'' (मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा पृ. २२०)

**भावार्थ रामायण**

'भावार्थ रामायण' हा नाथांचा अखेरचा ग्रंथ. या सप्तकांडात्मक ग्रंथात सुमारे ४०,००० ओव्या आहेत. पहिली पाच कांडे आणि सहाव्या कांडातील ४४ अध्याय लिहून झाल्यानंतर इ.स. १५९९ मध्ये नाथांचे निधन झाले. म्हणजेच त्यांच्या हयातीत सुमारे २५००० ओव्या लिहिल्या गेल्या. सहाव्या कांडाचे उरलेले ४८ अध्याय आणि शेवटचे सातवे कांड हा सारा उर्वरित कथाभाग नाथांचा एकनिष्ठ शिष्य गावबा याने लिहून पूर्ण केला. गुरुशी एकरूप होऊन त्यांची कथा बेमालूम सांधा जुळवून पूर्ण करणारा गावबासारखा शिष्य लाभल्यामुळे भावार्थरामायण हा ग्रंथ पूर्णत्वाला गेला. त्याचप्रमाणे हा ग्रंथ दोघांनी लिहिला असूनही त्यात दोघांच्या लेखनातले काहीही वेगळेपण जाणवत नाही, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

ग्रंथलेखन कशा स्वरूपाचे असावे याविषयी नाथांनी सांगितलेले सूत्र पाहण्यासारखे आहे. ते म्हणतात,

**''अफाट न करावा ग्रंथु। ग्रंथी बोलावा मुख्यार्थ।**

**पदी दावावा परमार्थु। हा निजस्वार्थु कवित्वाचा।।''**

हा ग्रंथ स्वयंप्रेरणेने नव्हे तर खुद्द श्रीरामाच्या प्रेरणेनेच लिहिल्याचे नाथांनी सुरूवातीलाच नमूद केले आहे. परमार्थ हेच त्यांच्या रामकथेचे प्रयोजन आहे. आपले प्रयोजन साध्य करण्यासाठी त्यांनी रुपकांचा चातुर्याने उपयोग करून घेतलेला आहे. दशरथ म्हणजे देशेंद्रिये, कौसल्या ही सद्‌विद्या, कैकयी ते अविघा आत्मप्रबोध तो लक्ष्मण, भावार्थ तो भरत, आनंदविग्रही पूर्ण श्रीराम, विश्वामित्र हा विवेक आणि वसिष्ठ हा विचार, अशा पद्धतीने त्यांनी रूपकयोजना केलेली आहे. राम आणि सीता यांचे एकरूपत्व त्यांनी सीता जीवन व राम जीव, सीता साखर तर राम गोडवा, सीता डोळसता तर राम देखणा अशा सुंदर उदाहरणांतून स्पष्ट केले आहे. या ग्रंथाचा मुख्य आधार वाल्मिकी रामायणाचा असला तरी आनंद रामायण, अध्यात्म रामायण, योगवासिष्ठ इत्यादी ग्रंथांचांही आधार घेतल्याचे जाणवते.

तत्कालीन समाजव्यवस्थेचे बारकाईने निरीक्षण करून नाथांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याचा मार्ग म्हणून रामकथा सांगितली आहे. त्यावेळच्या समाजस्थितीचे चित्रण करताना ते लिहितात,

**''तृणाची काडी न मिळे। उष्णे झाडोरे करपले।**

**वृक्ष शेंडियास वाळले। सरितांचे शोषले जलस्त्रोंत।।**

**प्रजा घरोघरी आक्रंदती। गाई हंबरडा फोडिती।**

**द्विजांची नित्यकर्म राहती। हाहाभूत क्षिती प्राणिमात्र।।''**

राम आणि रावण यांच्या युद्धांचा प्रसंग चित्रित करून नाथ स्वातंत्र्य लढ्याचे समर्थन करताना दिसतात. त्याचप्रमाणे स्वधर्माभिमान आणि वीरसाचा पुरस्कार करतात. म्हणूनच -

**''देवद्रोही देवकंटक। भूतद्रोही जीव घातक।**

**धर्मद्रोही दुःखदायक। यांसी आवश्यक मारावे''**

असा संदेश ते रामभक्तांना देतात. रामाच्या रूपाने नीती, त्याग, भक्ती, मानवता, धर्मनिष्ठा, कर्तव्यनिष्ठा यांसारख्या आदर्श मूल्यांची जोपासना करण्याविषयीचे आग्रही प्रतिपादन नाथांनी केले आहे. ज्ञानेश्वरांच्या 'भावार्थदीपिके'चे तत्काळ स्मरण व्हावे असा हा परमसुंदर ग्रंथ असून अनेक रामचरित्रांच्या वाचन-चिंतानातून 'भावार्थ रामायण' साकार झाल्याचे जाणवते.

### भारूडे

ज्ञानदेवांच्या काळापासून भारूडे लिहिली जात असली तरी एकनाथांच्या भारूडांनी मात्र लोकप्रियतेचे शिखर गाठले. भारूडांच्या साह्याने नाथांनी परमार्थ विचार तर घरोघरी नेलाच; पण प्रबोधनाचा हेतूही साध्य केला. नृत्य, नाट्य, संगीत व अभिनय यांमुळे त्यांची भारूडे सजीव झाली. सर्वसामान्य समाजाला संसाराचे

मर्म समजावून सांगण्यासाठी आणि विविध प्रकारचा उपदेश करण्यासाठी त्यांनी भारूडांचा पुरेपूर वापर करून घेतला. नाथांनी सुमारे तीनशे भारूडे लिहिलेली आहेत.

तत्कालीन समाजातील बहुजनवर्गाला मनोरंजनाच्या किंवा रूपकांच्या माध्यमातून उपदेश करण्यासाठी नाथांनी भारूडांची रचना केलेली असली, तरी त्याला अध्यात्माचे अधिष्ठान लाभलेले आहे. त्या काळातील ज्योतिषी, कोल्हाटी, वैदी, डोंबारी, गारूडी, दरवेशी, फकीर, जागल्या, वासुदेव, जोशी इत्यादींच्या माध्यमातून नाथांनी रचना केली. त्याचप्रमाणे पाखरू, पिंगळा, वटवाघूळ, टिटवी, पोपट, सर्प, विंचू, गाय, कुत्रा इत्यादी प्राण्यांचाही भारूडांच्या रचनेसाठी उपयोग करून घेतला. एवढेच नव्हे तर हमामा, हुंबरी, हुतुतु, फुगडी इत्यादी खेळांनाही त्यांच्या भारूडात स्थान मिळाले.

''मला दादला नको ग बाई', 'सत्वर पावगे मला। भवानी आई रोडगा वाहिन तुला !', 'दार उघड बया दार उघड', 'बाई मी भोळी', 'विंचू', 'थट्टा' ही नाथांची अतिशय प्रसिद्ध आणि जनमानसात रूजलेली भारूडे होत. या भारूडांतून लोकजीवनाचे नाथांनी घडवलेले विविधरंगी दर्शन वैशिष्ट्यपूर्ण आहे. उदा.-

**''सत्वर पाव गे मला। भवानी आई रोडगा वाहिन तुला।।**

**सासरा माझा गावी गेला। तिकडेच खपवी त्याला।।**

**सासू माझी जाच करती। लौकर निर्दळी तिला।।**

**नणंदेचे पोर किरकिर करते। खरूज होऊ दे त्याला।।**

**दादला मारुनि आहुती देईन। मोकळी कर गे मला।।**

**एका जनार्दनी सगळेचि जाऊ दे। एकटीच राहू दे मला।।''**

वरील भारुडांत जीवनरूपी सून आपली व्यथा प्रकट करताना म्हणते की, आपला सासरा (अहंकार) आणि सासू (कल्पना-माया) यांच्या जाचाला मी कंटाळले आहे. तेव्हा गावी गेलेला सासरा तिकडेच खपूदे (नाहीसा होऊदे) व सासूचेही निर्दालन होऊदे. अविचाराचा दादला मारुन मी मोकळी होईन. अशाप्रकारे मला एकटीलाच राहूने. तात्पर्य, अहंकार, कल्पना-माया, अविचार या गोष्टींचा त्याग केल्याशिवाय परमेश्वराची प्राप्ती होत नाही. हे नाथांनी येथे सूचविले आहे. 'विंचू' हे नाथांचे एक प्रसिद्ध भारूड आहे. कामक्रोधरूपी विंचू जीवास चावले असता कशा वेदना होतात याचे वर्णन आणि वृश्चिक दंशावरचा उतारा नाथांनी या भारुडात सांगितला आहे. देहतादात्म्यामुळे प्रपंचात रमणाऱ्या आणि परमात्म्यापासून दूर होणाऱ्या माणसाला होणाऱ्या दारूण यातनांचे चित्रण त्यात केले आहे. कामक्रोधादि विकारांचा दंश झाल्यामुळे सर्वांगाचा दाह होतो. पंचप्राण व्याकुळ होतात, इंगळी म्हणजे स्त्रीविषयक आसक्ती अथवा कामवासना जीवाला चावली तर तिच्या वेदना भयंकर असतात. यावरचा उपाय म्हणजे तमोगुणांचा त्याग आणि सत्त्वगुणांचा स्वीकार होय. त्यामुळे वेदना कमी होतात. 'थट्टा' या भरूडातूनही नाथांनी स्त्रीविषयक आसक्तीचे चित्र रेखाटले आहे. परमार्थ मार्गात स्त्रीविषयक आसक्तीमुळे अनेकांचा तपोभंग झाला. फजिती झाली. ब्रह्मा, नारद, दुर्योधन, रावण, शंकर, चंद्र, इंद्र, भस्मासूर, वाली, कीचक हे सारे कामवासनेच्या आहारी गेले. कित्येक

प्राणाला मुकले. या थट्टेपासून सुटले ते म्हणजे शुक, भीष्म, हनुमान आणि कार्तिकस्वामी हे चौघेच. तेव्हा या थट्टेच्या म्हणजे कामवासनेच्या नादी लागू नका असे नाथ येथे सांगतात.

'भारूड' हे एक दृश्य व श्राव्य काव्य आहे. कारण भारूड केवळ ऐकावयाचे नसते. त्याचा प्रयोग सादर केला जातो. त्याचा श्रोतृवर्गही मोठा असतो. भारूड सादर करण्याची अनेक पिढ्यांची परंपरा असलेली अनेक घराणी महाराष्ट्रात आहेत. यावरून 'भारूड' काव्याचे महत्त्व आणि प्रभाव लक्षात येतो. 'भारूड' ही एक रुपकात्मक रचना आहे. नाथांच्या सर्व काव्यात रूपकांना प्राधान्य आहे. किंबहुना रुपकात्मकता हा त्यांच्या सर्वच काव्याचा प्रमुख विशेष आहे. लौकिक आणि आध्यात्मिक अशी दोन रूपे या भारूडात एकवटली आहेत. लौकिक दृष्टांतांतून पारलौकिक आशय सांगण्याचा प्रयत्न त्यातून केलेला दिसतो. नाट्यात्मकता, बोधात्मकता, बोलीभाषेचा वापर, गेयता, विनोद, वेधक ध्रुवपदे ही भारूडकाव्याची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. भारूडातून तत्कालीन समाजजीवनाचे अत्यंत सूक्ष्म असे दर्शन होते. लोकगीतांच्या धर्तीवर भारूडांची रचना केलेली असते. ओवी, अभंग व पदे या तिन्ही प्रकारांचा उपयोग भारूड रचनेसाठी केला आहे.

लोककल्याणासाठी लोकांच्या भाषेत लिहिली गेलेली व तत्कालीन लोकजीवनाची दर्शन घडविणारी भारूडे लिहून नाथांनी तत्कालीन समाजस्थितीचे यथार्थ चित्रण केले आहे.

**अभंगवाणी**

संतांच्या अभंगवाणीत एकनाथांनी मोलाची भर घातलेली आहे. कृष्णजन्म, बालक्रीडा, पंढरी माहात्म्य, विठ्ठल माहात्म्य, राममहिमा, कीर्तनमहिमा, अद्वैतज्ञान, आत्मानुभूती इत्यादी विषयांवर त्यांनी अभंगरचना केलेली आहे. याशिवाय एकादशी माहात्म्य, तुळशी माहात्म्य, दत्तजन्म, सुदामकथा, शिवशक्तीविवाह अशी काही छोटी पौराणिक आख्यानेही त्यांनी अभंगरूपाने लिहिली आहेत. ज्ञानदेव, मुक्ताबाई, नामदेव, गोरा कुंभार, सांवता माळी, चोखा महार, इत्यादी संतांच्या चरित्रकथाही त्यांनी अभंगाद्वारे रचलेल्या आहेत.

उत्तरार्धामध्ये नाथांनी विठ्ठलभक्ती आळविली असली, तरी पूर्वार्धात त्यांनी दत्ताची तेवढ्याच भक्तिभावाने उपासना केली आहे. दत्ताविषयीचा आपल्या मनातील आदरभाव, श्रद्धा आणि जिव्हाळा व्यक्त करताना ते म्हणतात,

**''आमचे कुळाचे दैवत। श्रीगुरु दत्तराज समर्थ।।**
**तोचि आमुचा मायबाप। नाशी सकळ संताप।।**
**हेचि आमुचे व्रततप। मुखी दत्तनाम जप।।**
**तयाविण हे सुटिका। नाही नाही आम्हा देख।।**
**एका शरण जनार्दनी। दत्त वसे जनमनी।।''**

दत्ताप्रमाणेच नाथांनी नाममाहात्म्य सांगितले आहे.' हास्य विनोदे घेता नाम। तरती जन हे अधम्' असे ते म्हणतात. नाम हे पावन, तारक आणि पशुपक्ष्यांनाही तारणारे आहे, अशी त्यांची श्रद्धा आहे. म्हणूनच 'नामामृतापुढे। कायसे अमृत बापुडे 'असे' उद्‌गार ते काढतात. ते स्वत: उत्तम कीर्तनकार असल्याने 'कीर्तनाची आवडी देवा। वैकुंठाहुनी घाली धावा। नवल वैकुंठीच नसे। तो कीर्तनी नाचतसे' असा कीर्तनमहिमाही त्यांनी गायिला आहे.

'माझे माहेर पंढरी', 'या पंढरीचे सुख पाहता डोळा', 'आवडीने भावे हरिनाम गावे', 'मन रामी रंगले अवघे मनचि....', 'कैवल्याचा पुतळा। प्रगटला भूतळा', 'आनंदे करूनी संसारी असावे' इत्यादी अवीट गोडी आणि उत्कट भक्तिरसाने ओथंबलेली अभंगरचना करून नाथांनी आपली अभंगवाणी फुलवली आहे.

**स्फुट प्रकरणे**

वरील सर्वप्रकारच्या लेखनाप्रमाणेच नाथांनी काही स्फूट प्रकरणेही लिहिलेली आहेत. त्यात 'हस्तामलक', 'स्वात्मसुख', 'शुकाष्टक', 'आनंद लहरी', 'गीतासार', 'चिरंजीवपद', 'गीतामहिमा' इत्यादींचा समावेश आहे. सुमारे चार हजार ओव्यांच्याद्वारे नाथांनी ही प्रकरणे साकार केलेली आहेत. बोध देण्याची आपली भूमिका त्यांनी येथेही समर्थपणे वठविली आहे.

नाथांच्या स्फुट काव्यात हस्तामलक नावाचा छोटासा पण महत्त्वाचा ग्रंथ आहे. आद्य शंकराचार्य आणि हस्तामलक यांच्यात जो संवाद झाला तो या ग्रंथात आला आहे. मुळात यात एकूण १४ संस्कृत श्लोक आहेत. त्यावर नाथांनी ६७४ ओव्यांची टीका लिहिली आहे. तू कोण ? कोठून आलास ? तुझे नाव काय ? असे प्रश्न शंकराचार्यांनी या आठ वर्षांच्या मुलाला विचारले आहेत. व त्यानंतर या मुलाने 'मी मनुष्य नाही, देव नाही, संन्यासी नाही, भिक्षुक नाही, तर परमात्मस्वरूप आहे' असे उत्तर दिले आहे. याचे स्पष्टीकरण नाथांनी केले आहे व आत्मा नाहीच असे म्हणणाऱ्या नास्तिकवाद्याचे मत खोडून काढले आहे.

'स्वात्मसुख' हे नाथांनी रचलेले ५११ ओव्यांचे एक छोटेसे आध्यात्मिक प्रकरण आहे. परमात्मा, जीव, जगत् यांचे स्वरूप, माया, गुरुभक्ती, अद्वैतभजन, अखंड समाधी, इत्यादी आध्यात्मिक विषयांचे नाथांनी या ग्रंथात सुबोध व रसाळ वर्णन केले आहे. 'आनंदलहरी' हे नाथांचे १५४ ओव्यांचे प्रकरण आहे. अद्वैतानुभूतीतून निरामय आनंदमयता कशी प्राप्त होते व त्यासाठी सद्‌गुरुभजन हे एकमेव साधन आहे. हे या प्रकरणात स्पष्ट केले आहे. शुकाचार्यांच्या आठ संस्कृत श्लोकांवरची नाथांची ४४७ ओव्यांची टीका म्हणजे 'शुकाष्टक' होय. आत्मानुभूती ही विधिनिषेधाच्या पलीकडील आहे. ती निद्रा आणि जागृती यांच्या पलीकडील अवस्था आहे. 'तेथे निद्रा ना जागणे । बैसणे ना उठणे । सहज स्वभावे असणे । सदोदित ।।' असे नाथ या अवस्थेचे वर्णन करतात. 'चिरंजीवपद' हे ४२ ओव्यांचे लहानसे प्रकरण साधकाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. साधकासाठी अनुताप आणि सात्त्विक वैराग्य अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळेच चिरंजीवपदाची, शाश्वत आनंदमय स्थितीची प्राप्ती होती असे नाथ सांगतात. 'ॐकार ग्रंथ' या ग्रंथातून विश्व ॐकार रूप असल्याचे सांगितले आहे. तर 'गीतासार', 'गीतामहिमा' या प्रकरणातून भगवद्‌गीतेतील आशय थोडक्यात पण सुबोध आणि रसाळ वार्णात वर्णन केला आहे.

## पदे आणि गौळणी

पदे आणि गौळणी याही स्वरूपाची रचना करून आपल्या वैविध्यपूर्ण लेखनात नाथांनी महत्त्वाची भर घातलेली आहे. ही पदरचना भक्तिरसाचे परिपोष करणारी आहे. यासंबंधीची आपली भूमिका त्यांनी –

**''सगुणचरित्रे परमपवित्रे सादर वर्णावी।**
**सज्जनवृंदे मनोभावे आधी वंदावी।।**
**संतसंगे अंतरंगे नाम बोलावे।**
**कीर्तनरंगी देवसंनिध सुखे डोलावे।।''**

अशा शब्दात स्पष्ट केलेली आहे. 'असा कसा देव बाई ठकडा। देव एका पायाने लंगडा ग बाई' असे ते श्रीकृष्णाच्या रम्य रूपाचं वर्णन करताना म्हणतात. त्यांच्या पदरचनेतून भक्तिरसाप्रमाणेच शृंगार, करूण,अद्‌भुत, वत्सल इत्यादी रसांचाही प्रत्यय येतो. उदा. – 'ते मन निष्ठूर का केले ? जे पूर्ण कृपेने भरले' (करूणरस), 'वारियाने कुंडल हाले। डोळे मोडित राधा चाले' (शृंगार).

पदांप्रमाणे आपल्या गौळणीतूनही नाथांनी शृंगाराच्या माध्यमातून आध्यात्मिक विचार प्रकट केलेला आहे. त्यांनी लिहिलेली पदे अत्यंत लोकप्रिय झाली. म्हणूनच काही गौळणी सर्वतोमुखी झाल्या. उदा. 'तुझी संगती नाही कामाची। मी सुंदरा कोवळ्या मनाची' किंवा 'कृष्णा माझा, पदर धरू नको, सोड। जाऊनि सांगेन मी यशोदेला। मोडिन चांगली खोड।'

भावनेचा ओलावा आणि कल्पनाविलास यांमुळे एकनाथांच्या पदरचनेला आणि गौळणींना अमाप यश आणि अफाट लोकप्रियता प्राप्त झाली. शब्दयोजनेचे त्यांचे कौशल्य या दोन्ही प्रकारच्या रचनांमधून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

## समन्वयकार

आपल्या वैविध्यपूर्ण कामगिरीने मराठी संत वाङ्मयावर ठसा उमटवणारा पहिलाच संत कवी म्हणून नाथांचा आदराने आणि आवजूर्न उल्लेख केला जातो. संत ज्ञानदेव आणि संत नामदेवांची परंपरा सशक्तपणे आणि श्रद्धेने पुढे नेणारा प्रतिभावंत साहित्यिक म्हणजेच संत एकनाथ. सामाजिक उच्चवर्णियासाठी व पंडितजनांसाठी चतु:श्लोकी 'भागवत' व 'एकनाथी भागवत', मध्यमवर्गीयासाठी 'भावार्थ रामायण' व 'रुक्मिणी स्वयंवर' आणि सर्वसामान्य बहुजन समाजासाठी लोकभाषेत 'भारूडे' लिहून नाथांनी सर्व घटकांना आपल्या लेखणीद्वारे सामावून घेतले. समाजाच्या सर्व स्तरांचा समन्वय साधला. सामंजस्य, समन्वय, सहानुभूती आणि व्यापकता या चार खांबावर त्यांच्या व्यापक आणि विविधतेने नटलेल्या साहित्याची इमारत उभी आहे. नाथांच्या या समन्वयवादी भूमिकेचा परामर्श घेताना वाङ्मयाच्या इतिहासाचे आणि संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. ल.रा. नसिराबादकर म्हणतात, ''आपल्या समन्वयवादी दृष्टीने ज्ञानदेव, नामदेवापेक्षाही बिकट अडचणींवर मात केली. दत्त आणि वारकरी या संप्रदायांचा समन्वय त्यांच्या व्यक्तिमत्त्वात यापूर्वीच

झाला होता. प्रपंच आणि परमार्थ, संस्कृत आणि प्राकृत, सुशिक्षित आणि अशिक्षित, भक्तिप्रधान सात्त्विक कविता आणि शृंगार-वीर-हास्यप्रधान आख्यानक कविता, केवळ तत्त्वज्ञानपर ग्रंथ आणि सर्वसामान्य जनांच्या भावभावना रंगविणाऱ्या लोककथा या साऱ्यांची सुंदर सांगड नाथांनी घेतली. व्यासंगी, व्युत्पन्न, कनवाळू आणि भूतदयावादी व्यक्तिमत्त्व हेच नाथांच्या समन्वयवादी विचारसरणीचे प्रेरणास्थान आहे.'' (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, पृ. १३०)

### उपसंहार

एकनाथांचे मराठी संत साहित्यातील स्थान महत्त्वपूर्ण आहे. भागवत धर्माच्या मंदिराचा एक भक्कम आधारस्तंभ म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. मराठी विषयीचा सार्थ अभिमान, बहुजनसमाजाच्या उद्धाराविषयीची उत्कट तळमळ, प्रगाढ ज्ञान, सूक्ष्म निरीक्षणशक्ती, विचारगर्भ व लालित्यपूर्ण रचनाशैली, रसवत्तापूर्ण विवेचन, लोकसंस्कृतीचे यथार्थ चित्रण आणि समन्वयवादी दृष्टिकोन इत्यादी गुणवैशिष्ट्यांमुळे नाथांची वाङ्मयीन कामगिरी लक्षणीय ठेवते. 'हे खरे महाराष्ट्राचे नाथ होत' अशा शब्दांत न्या. म. गो. रानडे यांनी नाथांचा जो गौरव केलेला आहे, तो या वैशिष्ट्यांमुळेच यथार्थ आणि औचित्यपूर्ण ठरतो.

## ४.४ संत तुकाराम

### कविपरिचय

ज्ञानदेवांनी पाया घातलेल्या भागवत संप्रदायाचा कळस होण्याचे सद्‌भाग्य लाभलेला लोकप्रिय संतकवी म्हणजे तुकाराम. त्यांचा जन्म पुण्याजवळीला देहू येथे इ.स. १५९८ मध्ये झाला. तुकाराम बोल्होबा आंबिले (मोरे) हे त्यांचे पूर्ण नांव. त्यांच्या आईचे नाव कनकाई असे होते. त्यांना सावजी नावाचा मोठा तर कान्होबा लहान असे दोन भाऊ होते. तुकारामांची पहिली पत्नी रखमाबाई नेहमी आजारी असायची. म्हणून आप्पाजी गुळवे या सावकाराची मुलगी जिजाबाई उर्फ आवली हिच्याशी त्यांचे दुसरे लग्न झाले.

तुकाराम सतरा वर्षांचे झाले. त्याच दरम्यान त्यांच्यावर काही संकटं कोसळली. त्यांच्या आई वडिलांचे आणि थोरल्या भावजयीचे निधन झाले. याच सुमारास पहिली पत्नी रखमाबाईही मरत पावली. तुकारामांचे थोरले बंधू सावजी विरक्त होऊन तीर्थयात्रेस निघून गेले. पहिला मुलगा संताजीही देवाघरी गेला. या सर्व दुःखद घटनांचा परिणाम तुकारामांच्या भावपूर्ण मनावर झाला. या काळात सावकारी आणि व्यापाराचा भार त्यांच्यावरच पडला. त्यांनी आपली सावकारी बंद केली. याच कालावधीत त्यांना दुष्काळाचाही फटका बसला. त्यांनी दुष्काळग्रस्त ऋणकोंची कर्जे माफ केली. या सर्व प्रकारच्या जीवनानुभूतीचा परिणाम म्हणून त्यांचे मन अध्यात्माकडे वळले. त्यांना ईश्वराविषयीची ओढ लागली. त्यांचे परमार्थप्रवण मन संसाराऐवजी विठ्ठलाकडे आकर्षित झाले. जवळच्या भामनाथच्या डोंगरावर जाऊन भजन, नामस्मरण करणे, ज्ञानेश्वरी नाथ भागवत इत्यादी ग्रंथांची पारायणे करणे असा त्यांचा दिनक्रम सुरू झाला. दिवसेंदिवस मन उन्नत होत गेले. नामदेवांकडून कवित्वाची प्रेरणा मिळाली. आणि तुकोबांची अभंगवाणी फुलत गेली.

तुकोबांच्या अलौकिक प्रतिभाशक्तीचा आविष्कार घडत गेल्यामुळे संत साहित्यात मोलाची भर पडली.

अर्थात, त्यांनी अत्यंत परखडपणे आणि रोखठोक पद्धतीने समाजातील ढोंगावर व दांभिकपणावर परखड शब्दांत हल्ला चढविल्यामुळे अनेक लोक दुखावले. या लोकांनी विविध प्रकारे तुकारामांचा छळ केला. पण तुकारामांनी शेवटपर्यंत दुष्ट प्रवृत्तीशी झुंज दिली. त्यांचा शेवटही इ.स. १६४९ मध्ये संशयास्पदरित्या झाला. ते सदेह वैकुंठाला गेले असे सांगितले जात असले तरी त्यांच्या मृत्युविषयी अनेक मते मांडली गेली आहेत. डॉ. आ. हे. साळुंखे यांच्या सारख्या संशोधकांना तुकारामांचा मृत्यू हा घातपाताने झाला असावा असे वाटते.

तुकारामांना झालेल्या गुरुपदेशाबद्दलही अभ्यासकांनी वेगवेगळी मते मांडलेली आहेत. ओतूर येथील चैतन्य परंपरेतील सत्पुरुष बाबाजी चैतन्य यांनी त्यांना स्वप्नावस्थेत गुरूपदेश केला आणि 'रामकृष्णहरी' हा मंत्र दिला, असे मानले जाते. राघवचैतन्य, केशवचैतन्य, बाबाजी चैतन्य अशी त्यांची गुरुपरंपरा आहे.

## विवेचन

नामदेवांच्या नंतर तितक्याच प्रमाणात विपुल आणि रसाळ अभंगलेखन करणारा संतकवी म्हणजे तुकाराम. कवी, संसारिक, विठ्ठलभक्त, समाज सुधारक आणि लोकशिक्षक अशा विविध भूमिकेतून तुकोबांच्या अभंगवाणीने सर्वांना आपला परिचय घडवला. 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी । आवरिता परी आवरेना' अशा पद्धतीने त्यांनी आपल्या मनातील उत्कट भावतरंगांना अभंगांच्या माध्यमातून वाट करुन दिली. समाजातील ढोंगबाजीवर व अपप्रवृत्तींवर हल्ला चढवत असतानाच त्यांनी लोकांना समुपदेशन केले. नीतीमत्तेचे धडे दिले. हे सर्व करण्यासाठी नामदेवाने स्वप्नात येऊन प्रेरणा दिली. याविषयीची अनुभूती त्यांनी –

**''नामदेवे केले स्वप्नमाजी जागे। सवे पांडुरंगे येऊनिया।**
**सांगितले काम करावे कवित्व। वाऊगे निमित्य बोलो नको।।''**

या अभंगातून प्रकट केलेली आहे. त्यांच्या सर्वच लेखनात जेवढी तळमळ आहे, आर्तता आहे तेवढाच प्रामाणिकपणा आहे. लोकोद्धाराच्या आणि आत्मिक विकासाच्या आंतरिक ओढीतूनच त्यांचे लेखन झाले. सारांश, त्यांचे अभंग म्हणजे अनुभवाचे व प्रांजल मनोवृत्तीचे खडे बोल आहेत.

## विठ्ठलाची ओढ

सर्वच वारकरी संतांच्या मनात विठ्ठलाविषयी अपार श्रद्धा होती. तुकाराम तर कडवा विठ्ठलभक्त आणि परखड समाजसुधारक म्हणूनच ओळखले जात होते. विठ्ठलाविषयीची उत्कट ओढ लागल्यानंतर त्यांना विठ्ठल हाच सर्वस्व असल्याचा भास होऊ लागला. माता, पिता, बंधू, बहिण सखा वगैरे सर्व नातीही त्यांनी विठ्ठलाशीच जोडल्याचे –

**''आमुची मिरास पंढरी। आमुचे घर भीमातिरी।**

**पांडुरंग आमुचा पिता। रकुमाई आमुची माता।।**

**भाऊ पुंडलिक मुनी। चंद्रभागा आमुची बहिणी।**

**तुका जुन्हाट मिराशी। ठाव दिला पायांपाशी।।''**

या अभंगाद्वारे त्यांनी स्पष्ट केले आहे. विठ्ठल हाच आपला जीव, आपला भाव, कुळधर्म देव, गुरू आणि तारू आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले आहे. विठ्ठलाची प्राप्ती हेच त्यांचे अंतिम ध्येय होते. त्यांच्या भेटीसाठी ते अत्यंत आसुसलेले होते. त्याच्या भेटीशिवाय दुसरे काही नको असे मत प्रकट करताना त्यांनी ''न मिळो खावया न वाढो संतान। परी हा नारायण कृपा करो'' अशी भावना स्पष्ट केली आहे.

विठ्ठल माउली ही आपल्या कृपेची सावली आहे असे तुकारामांना वाटते. विठ्ठलाचे मनोहर रूप त्यांनी 'सुंदर ते ध्यान' या अभंगात रेखाटले आहे. वारकरी भजनाच्या आरंभी हा अभंग म्हटला जातो. यावरून प्रस्तुत अभंगाचे महत्त्व लक्षात येते. तुकाराम लिहितात,

**''सुंदर ते ध्यान उभे विटेवरी।**

**कर कटावरी ठेवूनिया।**

**तुळसीहार गळा कासे पितांबर।**

**आवडे निरंतर ते चि रूप।**

**मकर कुंडले तळपती श्रवणी।**

**कंठी कौस्तुभमणी विराजित।**

**तुका म्हणे माझे हे चि सर्व सुख।**

**पाहीन श्रीमुख आवडीने।।''**

तुकाराम आपल्या विठो माउलीला सदैव आदराने आणि आपुलकीने हाका मारतात. कधी लडिवाळपणे हट्ट धरतात तर कधी प्रेमाने भांडतात. प्रसंगी तिचे वर्मही काढतात. 'माये मोकलिले कोठे जावे बाळे। आपुलिया बळे न वंचे ते।।' असा आर्त प्रश्न उपस्थित करतात. आपल्या अभंग लेखनाचे प्रयोजन 'गर्जू हरीचे पवाडे' असे असल्याने' घेई घेई माझे वाचे। गोड नाम विठोबाचे' असे ते सांगतात. सतत धावा करूनही त्याची भेटच होत नाही. तेव्हां ते 'कोणी गावी आहे सांगा हा विठ्ठल। जरी ठावा असेल तुम्हा कोणा?' असा आर्त टाहो फोडतात.

विठ्ठलाची भेट न झाल्यामुळे आपल्या मनाची अवस्था कशी झाली आहे, हे ते खालील दृष्टांतातून व्यक्त करतात.

**''कन्या सासुऱ्यासी जाये। मागे परतोनी पाहे।**

**तैसे जाले माझे जीवा। केव्हां भेटसी केशवा।।**

**चुकलिया माये। बाळ हुरूहुरू पाहे।**

**जीवना वेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी।।**

यावरून विठ्ठलाच्या भेटीसाठी त्यांच्या मनाची किती तगमग होत होती, याची कल्पना येते. भेटीची उत्कटता, भेट होत नाही म्हणून व्यक्त होणारी तळमळ आणि भावनेचा ओलावा व्यक्त करताना तुकारामांचे अवघे व्यक्तिमत्त्वच कसे विठ्ठलमय होऊन जाते याची प्रचिती त्यांच्या अनेक अभंगांतून येत राहते.

**भेटीची अनुभूती**

विठ्ठल भेटीसाठी तुकाराम सतत त्याचा धावा करत राहिले. त्याचे नामस्मरण हाच त्यांचा दिनक्रम झाला. तेव्हा शेवटी त्यांनी केलेल्या तपश्चर्येला फळ आले आणि अलौकिक अनुभूती प्राप्त झाली. या भेटीचे आनंदभराने त्यांनी केलेले वर्णन भारावून टाकणारे आहे. या अत्यानंदाचे वर्णन करताना तुकाराम म्हणतात,

**''आनंदाचे डोही आनंद तरंग। आनंदचि अंग आनंदाचे।।**

**काय सांगो जाले काहीचियाबाही। पुढे चाले नाही आवडीने।।**

**गर्भाचे आवडी मातेचा डोहाळा। तेथीचा जिव्हाळा तेथे बिंबे।**

**तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा। अनुभव सरिसा मुखा आला।।''**

गर्भवती स्त्रीच्या पोटातील जिवाला ज्या गोष्टींची आवड असते त्या गोष्टींची इच्छा तिला होते. गर्भामधला जिव्हाळा आईच्या वृत्तीत प्रकट होत असतो. याच पद्धतीने परमेश्वराच्या अनुभूतीचा जो ठसा आपल्या मनावर उमटला आहे, त्यास अनुसरून माझी वाणी प्रकट होत आहे. अशी त्यांनी आपल्या मनाची अवस्था सांगितलेली आहे. ही आनंदाची स्थिती प्राप्त व्हावी यासाठीच आतापर्यंतचा सर्व आटापिटा केल्याचे त्यांनी –

**''याच साठी केला होता आट्टाहास।**

**शेवटचा दिस गोड व्हावा।।**

**आता निश्चितीने पावलो विसावा।**

**खुंटलिया धावा तृष्णेचिया।।''**

या अभंगातून स्पष्ट केले आहे. आपण आणि विठ्ठल यामधील द्वैत नाहीसे झाल्याचे ते 'जेथे जातो तेथे तू माझा सांगती। चालविसी हाती धरूनिया' या अभंगात नमूद करतात. परमात्म्याच्या भेटीच्या वेळी 'आपुले मरण पाहिले म्या डोळा' अशी दिव्य व अनुपम अनुभूती आल्याचे ते सांगतात. विठ्ठलभेटी विषयीची कृतज्ञता आणि कृतार्थता त्यांनी –

**''अणुरेणूया थोडका। तुका आकाशा एवढा।**

**तुका म्हणे आता। उरलो उपकारापुरता।।''**

या अंभगातून व्यक्त केलेली आहे. परमेश्वर भेटीविषयीची उत्कट ओढ, त्यासाठी घेतलेला शारीरिक आणि मानसिक श्रम, रामायण, महाभारत, वेद, उपनिषदे, ज्ञानेश्वरी इत्यादी ग्रंथांची भक्तिभावाने केलेली पारायणे, चिंतनशीलवृत्तीने आध्यात्मिक तपश्चर्ये विषयीचे केलेले लेखन या सर्व पार्श्वभूमीवर शेवटी त्यांना साक्षात्कार होतो आणि तृप्ततेची भावना दाटून येते. विठ्ठलाच्या भेटीमुळे परिपूर्तीचा त्यांना झालेला आनंद त्यांनी आपल्या अभंगलेखनातून प्रकट केलेला आहे.

**समाज प्रबोधन**

आपल्या अभंगातून विठ्ठलाचा गुणगौरव करणारे तुकाराम जसे कडवे विठ्ठलभक्त होते, तसेच ते समाजाचे प्रबोधन करणारे नीतीशिक्षकही होते. दंभ, ढोंग, उच्चनीचता, भोळसटपणा, स्वार्थीवृत्ती, अनिष्ठ रूढी व परंपरा, अंधश्रद्धा, कर्मकांड, देवभोळेपणा यांच्या विरोधात ठामपणे उभे राहणची भूमिका त्यांनी मांडली. त्यामागे समाजाचा उद्धार हीच त्यांची प्रामाणिक भूमिका होती. म्हणूनच कर्मकांड आणि व्रतवैकल्याद्वारे समाजात भेद व दुर्बलता वाढविणाऱ्या कर्मठ आचरणावर आणि प्रथांवर त्यांनी मार्मिक शब्दात कोरडे ओढले. याप्रकारच्या दुष्ट आणि समाजविघातक प्रचार करणाऱ्यांविषयी 'तुका म्हणे ऐशा नरा। मोजुनी माराव्या पैजारा' अशा रोखठोक शब्दांत त्यांनी आपली भावना प्रकट केलेली आहे. 'तीर्थी धोंडा पाणी। देव रोकडा सज्जनी' ही धारणा असल्यामुळेच त्यांनी देवभोळेपणाला सक्त विरोध केला. खरा देव कोठे आहे सांगताना ते म्हणतात,

**'जे का रंजले गांजले। त्यासि म्हणे जो आपुले।**

**तोचि साधू ओळखावा। देव तेथे चि जाणावा।।''**

समाजामध्ये जे दु:खी कष्टी असतात, दीन दुबळे असतात आणि रंजले गांजलेले असतात त्यांना मोठ्या मनाने जवळ करावे. स्वत:च्या लेकराप्रमाणे त्यांच्यावर मायेची पाखर घालावी. कारण जनसेवा हीच ईशसेवा आहे. खऱ्या संताचे हेच लक्षण आहे. या जनसेवेतच देव वसलेला असतो. असा संदेश तुकोबांनी या अभंगातून दिला आहे. लोकांचे प्रबोधन करताना वेळप्रसंगी कटू आणि कठोर शब्दांत आपली भावना तुकोबा व्यक्त करतात. कारण 'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णूदास। कठिण वज्रास भेदू ऐसे' असा त्यांचा स्वाभाव होता. प्रसंगी आक्रमक होणारे तुकोबा तितकेच हळवे आणि मृदू अंत:करणाचे होते. खोटे बोलणाऱ्या, खोटी साक्ष देणाऱ्या किंवा अहंकारी वृत्तीने समाजाला छळणाऱ्यांचा योग्य तो बंदोबस्त केला पाहिजे. त्यासाठी गरज पडल्यास कठोर उपाय योजले पाहिजेत. अशा लोकांना जशास तसे उत्तर दिले पाहिजे. अशी त्यांची धारणा असल्यामुळे एका अभंगात ते म्हणतात.

**''पाया जाला नारू। तेथे बांधला कापुरु।**

**तेथे बिबव्याचे काम। अधमासि तो अधम।**

**रूसला गुलाम। धणी करितो सलाम।**

**तेथे चाकराचे काम। अधमासि तो अधम।**

**देव्हाऱ्यावरी विंचू आला। देवपूजा नावडे त्याला।**

**तेथे पैजारेचे काम। अधमासि तो अधम।।''**

तत्कालीन परिस्थितीत भोंदू साधूंनी उच्छाद मांडला होता. देवभक्तीचा बाजार मांडून ते आपल्या सर्वांची पोळी भाजून घेत होते. अशा साधुंचा खरपूस समाचार घेताना त्यांनी -

**'टिळा टोपी घालुनि माळा। म्हणती आम्ही साधु।**

**दया धर्म चित्ती नाही। ते जाणावे भोंदू।**

**कलियुगी घरोघरी। संत जाले फार।**

**वीतभरी पोटासाठी। हिंडती दारोदार''**

अशा भाषेत त्यांच्यावर कोरडे ओढले आहेत. माणसाच्या स्वभावधर्माविषयीचे तुकोबांचे आकलन वाखाणण्याजोगे आहे. माणसं शक्यतो सहजासहजी आपला स्वभाव बदलत नाहीत, हे लक्षात आल्यानंतर ते लिहितात,

**''गाढव शृंगारिले कोडे। काही केल्या नव्हे घोडे।**

**त्याचे भुकणे ना राहे। स्वभावासी करील काये।**

**श्वान शिबिके बैसविले। भुंकता न राहे उगले।**

**तुका म्हणे स्वभावकर्म। काही केल्या न सुटे धर्म।।''**

समाज सुखी आणि समृद्ध व्हावा. माणसाने संपत्ती मिळवताना सद्मार्गाचा अवलंब करावा. 'धन मिळवोन कोटी। सवे न येरे लंगोटी' याचे भान ठेवावे. इतराशी व्यवहार करताना कोणती आचारसंहिता पाळावी याविषयी ते सांगतात.

**''जोडोनिया धन उत्तम वेव्हारे। उदास विचारे वेच करी।।**

**उत्तम चि गती तो एक पावेल। उत्तम भोगील जीव खाणी।।**

**परउपकारी नेणे परनिंदा। परस्त्रिया सदा बहिणी माया।।**

**भूतदया गाई पशूचे पालन। तान्हेल्या जीवन वनामाजी।।**

**तुका म्हणे हे चि आश्रमाचे फळ। परमपद बळ वैराग्याचे।।''**

आदर्श गृहस्थाश्रम किंवा प्रपंचविज्ञान सांगून तुकारामांनी लोकांना सदुपदेश केला आहे. सामजाचे सर्व दुर्गुण नाहीसे व्हावेत. समाजाची अधोगती थांबावी, खऱ्या धर्माचे पालन करून लोकांनी एकमेकांशी गुण्या गोविंदाने वागावे. 'मन करा रे प्रसन्न। सर्व सिद्धीचे कारण' असे त्यांनी आवर्जून सांगितले आहे. तुकारामांची लोकशिक्षकाची ही भूमिका आजही प्रेरणादायी आणि अनुकरणीय आहे. त्यांनी केलेले समाज प्रबोधनाचे कार्य आजही तितकेच महत्त्वपूर्ण आणि उपयुक्त आहे. म्हणूनच डॉ. अनिल गवळी म्हणतात, ''तुकारामांचे हे कार्य आजच्या आधुनिक काळात, विज्ञान युगातही तितकेच महत्त्वाचे आहे. आजच्या घाई गर्दीच्या, स्पर्धेच्या जगात माणसाला संतविचारच मानसिक समाधान प्राप्त करून देतात.'' (सर्वात्मभावी तुकाराम – पृ. १५८)

समाज सुधारणेची कास धरल्यानंतर तुकोबांनी कुणाचीही भीडभाड ठेवली नाही. दुष्ट, भ्रष्ट आणि ढोंगी लोकांच्यावर कठोर प्रहार केले. याच्या मुळाशी नीतीयुक्त समाज व्यवस्था निर्माण व्हावी ही त्यांची प्रामाणिक तळमळ होती. तत्कालीन परिस्थितीला अनुसरून तुकोबांनी केलेल्या सामाजिक कार्याचा परामर्श घेताना डॉ. ल. रा. नसिराबादकर म्हणतात, ''केवळ वारकऱ्यांनाच नव्हे, तर साऱ्या समाजाला नीतीमूल्यांची आठवण करून देणे, हे तुकोबांनी आपले कर्तव्य मानले. सामाजिक जीवनात त्यांनी नीती हीच भक्ती मानली. 'नेत्री रूप मुखी नाम' हे या भक्तीचे एकरूप तर 'दया तिचे नाव भूतांचे पाळण। आणिक निर्दाळणं कंटकांचे' ही तिची दुसरी बाजू. रूढ संकेतांच्या, दांभिकपणाच्या आणि अंधश्रद्धेच्या विध्वंसनाने प्रथम समाजाची मनोभूमी नांगरून तिच्यात प्रांजल भक्तिभाव, नीती आणि समाजोद्धाराचे विधायक बी पेरणारा संत म्हणजे तुकाराम. 'अधिकार तैसा करू उपदेश' असा हक्क सांगून अनेक धर्मकंटकांवर त्यांनी हल्ले चढवले, पोटासाठी ढोंग करणाऱ्यांचे वाभाडे काढले. 'वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा। येरांनी वहावा भार माथा' असे सागून तथाकथित वेदविदांना बाजूला सारले. या अर्थाची प्रेरणा देण्यासाठी समाजातील सर्व लहानथोरांना आणि 'याति भलते नारी–नरांना 'एकत्र आणून त्यांनी भक्तीचा डांगोरा पिटला. 'याति कुळ येथे असे अप्रमाण। गुणांचे कारण अंगी असे' या शब्दांत जन्मावर आधारित जातिव्यवस्थेला विरोध केला.'' (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, पृ. १५९)

## रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग

संत तुकारामांच्या वाट्याला आलेले लौकिक जीवन संघर्षमय स्वरूपाचे होते. 'सुख पाहता जवापाडे। दु:ख पर्वता एवढे' याची त्यांना अनेक वेळा प्रचिती आली. वाघोलीचे रामेश्वर भट, चिंचवडचे मंबाजी यांसारख्या लोकांनी त्यांचा छळ केला. त्यांना विविध प्रकारची शिक्षा केली. तुकाराम शूद्र असल्यामुळे त्यांना वेदांचा अधिकार नाही. त्यांनी वेदांतीत ज्ञान प्रकट करू नये असे या दोघांचे मत होते. स्वत:ला श्रेष्ठ समजणाऱ्या ब्राह्मणीवृत्तीचा हा परिपाक होता. खरं म्हणजे तुकाराम केवळ वेदांचा आशयच प्रकट करत

नव्हते, तर अमंगळ आणि अनिष्ठ परंपरांवर प्रखर हल्ले करीत होते. भ्रष्ट, संकुचित व अविवेकी लोकांच्यावर प्रहार करीत होते. अर्थातच, तत्कालीन कर्मठ समाजाला या गोष्टी सहन झाल्या नाहीत. म्हणूनच त्यांनी तुकारामांचा छळ करण्याचा मार्ग पत्करला. त्यांच्यावर खटला भरला. त्यांच्या अभंगांच्या वह्या इंद्रायणीत बुडविण्याची शिक्षा सुनावली. या छळवादाचे स्वरूप तुकारामांच्या -

**''काय खावे आता कोणीकडे जावे। गावात राहावे कोण्या बळे।**
**कोपला पाटील गावाचे हे लोक। आता घाली भीक कोण मज।**
**आता येणे चवी सांडिली म्हणती। निवाडा करिती दिवाणात।**
**भल्या लोकी यास सांगितली मात। केला माझा घात दुर्बलांचा।**
**तुका म्हणे याचा संग नव्हे भला। शोधीत विठ्ठला जाऊ आता।।'**

या अभंगात यथार्थपणे रेखाटले गेले आहे. हद्दपार, बहिष्कार, घराला टाळे लावणे, मानहानी करणे इथंपर्यंत विरोधकांची मजल गेली. पण तुकाराम डगमगले नाहीत. त्यांनी या घटनेविषयी विठ्ठलाला जाब विचारला. अठरा दिवस उपवास करून आपल्यावरील अन्याय अयोग्य आणि अनाठायी असल्याचे पटवून देण्याचा प्रयत्न केला. तुकारामांनी मांडलेले विचार सहन न झाल्यामुळे तथाकथित पंडितांनी आणि हितसंबंध धोक्यात आलेल्या भोंदू साधुंनी तुकारामांना विविध प्रकारचा त्रास दिला. याविषयीची कारणमीमांसा स्पष्ट करताना डॉ. आ. ह. साळुंखे म्हणतात, ''तुकारामांचा एक-एक अभंग पंडितांच्या कसा जिव्हारी लागला असेल, ते पाहण्यासारखे आहे. घोकंपट्टी करून शब्दांचे ओझे वाहिल्याबद्दल या पंडितांना ज्ञानी म्हणावयाचे असेल तर घोड्यांनाही ज्ञानी म्हणावे लागेल, कारण ते काही पंडितांपेक्षा कमी ओझे वहात नाहीत, हा तुकारामांचा युक्तिवाद पंडितांना जहरी डंखासारखा वाटला असणार. साखरेची चव न चाखता नुसत्या गोण्या वाहणाऱ्या बैलांबरोबर आणि ओझी वाहूनही काटे खाणाऱ्या उंटांबरोबर केलेली तुलना त्यांच्या मनाला झोंबली असणार. वांझ असूनही गरोदर व बाळंतीन असल्याचे सोंग करणाऱ्या स्त्रियांबरोबर शाब्दिक पंडितांची केलेली तुलना अर्थाची उपेक्षा करून नुसते पाठांतर करणाऱ्या परंपरेचे वांझपण दाखवून देते आणि त्यामुळेही तुलना ऐकून अशा पंडितांना मेल्याहून मेल्यासारखे झाले असणार. वैदिक पंडितांनी आजवर लोकांना नुसत्या शब्दांचीच कढी पाजली आणि नुसत्या शब्दांचाच भात जेवू घातला, पण जे जेवण जेवून आजपर्यंत समाजातील कोणीही तृप्त झालेला नाही, हा तुकारामांनी काढलेला निष्कर्ष जितका दाहक तितकाच सत्य आहे. वैदिक परंपरेने आजवर समाजाला नुसते पोकळ शब्द दिले, खराखुरा अन्नरस दिला नाही आणि त्यामुळे कित्येक पिढ्या, कित्येक युगे समाजाची उपासमार झाली, तहानमार झाली, हे ऐतिहासिक सत्य त्यांनी लोकांच्या नजरेला आणून दिले. या प्रकारचे विचार मांडणारा तुकारामांचा एक-एक अभंग हा वैदिक पंडितांना चाबकाच्या एकेका फटकाऱ्यासारखा वाटला असणार आणि या प्रत्येक फटकाऱ्याबरोबर त्यांच्या मनात तुकारामाविषयी शत्रुत्वाची, वैराची, सूडाची एकेक ज्वाला भडकली असणार, यात शंका नाही. अर्थात, तुकारामांनी हे वैर स्वत:हून ओढवून घेतले होते. आणि ते काही वैयक्तिक कारणाने ओढवून घेतले नव्हते, तर समाज व्यवस्थेच्या शुद्धीकरणासाठी ओढवून घेतले होते.''

(विद्रोही तुकाराम पृ. ४०-४१)

'जगाल्या कल्याणा संतांच्या विभूती' या उक्तीनुसार कार्यरत राहिल्यामुळेच तुकारामांना सतत संघर्ष करावा लागला. संसारी लोक दुतोंडी असल्याची अनुभूती त्यांना सतत येत गेली. एखादा माणूस कसाही वागला तरी त्याला नांवे ठेवण्याची समाजाची मनोवृत्ती असल्यामुळे तुकारामांना चांगले वागूनही छळवाद सोसावा लागला, हे स्वाभाविकच होते. समाजाची दुतोंडी मानसिकता चित्रित करताना तुकाराम लिहितात.

**''ऐसा हा लौकिक कदा राखवेना। पतितपावन देवराया।।**
**संसार करिता म्हणती हा दोषी। टाकिता आळसी पोटपोसा।।**
**आचार करिता म्हणती हा पसारा। न करी त्या नरा निंदिताती।।**
**संतसंग करिता म्हणति हा उपदेशी। येरा अभाग्यासि ज्ञान नाही।।**
**धन नाही त्यासि ठायीचा करंटा। समर्थासि ताठा लाविताती।।**
**बहु बोलो जाता म्हणती हा वाचाळ। न बोलता सकळ म्हणती गर्वी।।**
**भेटीसि न वजाता म्हणती हा निष्ठूर। येता जाता घर बुडविले।।**
**लग्न करू जाता म्हणती हा मातला। न करिता जाला नपुंसक।।**
**निपुत्रिका म्हणती पहा हो चांडाळ। पातकाचे मूळ पोरवडा।।**
**लोक जैसा ओक धरिता धरवेना। अभक्ता जिरे ना संतसंग।।**
**तुका म्हणे आता ऐकावे वचन। त्यजुनियां जन भक्ति करा।।''**

समाजात जिथे जिथे दोष आढळले किंवा गुन्हेगार दिसले तिथे तिथे तुकारामांनी विरोधाचे फटकारे मारले. अभक्त ब्राह्मण, तोंडी तंबाखुची नळी धरणारे गोसावी, संतांचा मत्सर करणारे नास्तिक इत्यादींची उपहासात्मक शब्दात हेजरी घेतली. सालोमालोसारख्या भुरट्या कवीने आपले कवित्व चोरून स्वत:च्या नावावर खपविलेले पाहून 'उष्ट्या पत्रावळी करोनिया गोळा। दाविलीसे कळा विद्वत्त्वाची।' अशा शब्दात त्याचा निषेध केला, 'विकेल तेथे विका । माती नाव ठेवुनि बुका ।' असा रोखठोक इशारा दिला. 'भलेही देऊ कासेची लंगोटी। नाठाळाच्या माथा देऊ काठी' अशा निर्भयपणे ते सर्वांना सामोरे गेले.

विरोध, संघर्ष, छळ, अपमान, वैर, शिक्षा आणि शेवटी संशयास्पद मृत्यू वाट्याला आल्याने तुकारामांचे जीवन म्हणजे अखंड रणसंग्राम होय. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' असा त्यांचा एकूण जीवनप्रवास आहे.

### भाषिक सौंदर्य आणि वैशिष्टे

संत तुकाराम हे जसे विठ्ठलभक्त होते, प्रापंचिक होते, समाज सुधारक होते, तसेच प्रतिभासंपन्न कवी होते. लोकांच्यासाठी लोकांच्या भाषेत लिहिणारा लोककवी म्हणजे तुकाराम. 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ

गोमटी' याप्रमाणे त्यांनी आपले विचार मांडले. 'अंतरीचा निर्मळ वाणीचा रसाळ। त्याच्या गळा माळ असो नसो' असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. आपण लिहित असलो तरी त्या विश्वंभराचीच कृपा आहे, असे त्यांना वाटते. 'काय म्या पामरे बोलावी उत्तरे। बोलाविता धनी वेगळाचि' असे म्हणून त्यांनी आपल्या लेखनाचे श्रेय ईश्वरी शक्तीला दिला आहे. फारसा आटापिटा न करता त्यांना शब्द सुचत गेले आणि ते लिहित राहिले. म्हणूनच आलंकारिकतेचा अवलंब करूनही त्यांच्या भाषेत क्लिष्टता जाणवत नाही. त्यांचे लेखन अनुभूतीवर आधारलेले आहे. म्हणून ते प्रामाणिक व अस्सल आहे. आपल्याला सुचणाऱ्या धनसंपदेविषयी ते म्हणतात.

**''आम्हा घरी धन शब्दाचीच रत्ने। शब्दाचीच शस्त्रे यत्न करू।**

**शब्द चि आमुच्या जीवाचे जीवन। शब्दे वाटू धन जनलोका।**

**तुका म्हणे पाहा शब्द चि हा देव। शब्दे चि गौरव पूजा करू।।''**

शब्द म्हणजे रत्ने, शस्त्रे, जीवाचे जीवन एवढेच नव्हे तर शब्द म्हणजे साक्षात देव अशी तुकोबांची धारणा होती. ''फोडिले भांडार धन्याचा हा माल। मी तव हमाल भारवाही'' अशी त्यांची विनम्र भावना होती. म्हणूनच ''तुका म्हणे बोल। माझा बोलतो विठ्ठल।'' असे सहजोद्‌गार त्यांच्या वाणीतून बाहेर पडतात. किंबहुना, आपल्या लेखन भांडाराच्या मुळाशी –

**''माझी वदवितो वाणी। ज्याणे धरिली धरणी।**

**तुका म्हणे झरा। आहे मुळचाचि खरा।।''**

ही विठ्ठलरूपी प्रेरणाशक्ती असल्याचे ते विनम्रपणे नमूद करतात. रोजच्या व्यवहारातले वा अनुभवातले दाखले देण्याची हातोटी साधल्यामुळे तुकोबांचे अभंग लोकमानसापर्यंत पोचले. उपमा, उत्प्रेक्षा, दृष्टांत इत्यादी अलंकारांची योजना करून त्यांनी भक्तिरसाचा आणि नीतीविषयक उपदेशाचा आविष्कार घडवला. साधी, सोपी, बोलीभाषा वापरून लोकांच्या हृदयाशी सुसंवाद साधला.

तुकारामांच्या बहुसंख्य अभंगातील चरणांना आज जे सुभाषितांचे, म्हणींचे किंवा सुविचाराचे स्वरूप प्राप्त झाले आहे, याचे कारण त्यातील भाषिक सौंदर्य आणि सामर्थ्य होय. अल्पाक्षरत्व हे या अवतरणांचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. उदाहरणार्थ;

मुलाम्याचे नाणे। तुका म्हणे नव्हे सोने।

विती एवढेसे पोट। केवढा बोभाटा तयाचा।

मोले घातले रडाया। नही आसू नाही माया।

तुका म्हणे तोचि संत। सोशी जगाचे आघात।

दया क्षमा शांती। तेथे देवाची वसती।

निश्चयाचे बळ। तुका म्हणे तेचि फळ।

महापुरे झाडे जाती। तेथे लव्हाळे वाचती।

भिक्षापात्र अवलंबिणे। जळो जिणे लाजिरवाणे।

बोले तैसा चाले। त्याची वंदावी पाऊले।

मुंगी होऊनी साखर खावी। निज वस्तुची भेट घ्यावी।

तुझे आहे तुजपाशी। परि तू जागा चुकलासि।

ज्याचे अंगी मोठेपण। तया यातना कठीण।

आलिया भोगासी असावे सादर। देवावरी भार घालुनिये।

नवसे कन्यापुत्र होती। तरी का करणे लागे पती।

लहानपण देगा देवा। मुंगी साखरेचा रवा।

असाध्य ते साध्य करिता सायास। कारण अभ्यास तुका म्हणे।

नाही निर्मळ जीवन। काय करील साबण।

साधुसंत येती घरा। तोचि दिवाळी दसरा।

आले देवाजीच्या मना। तेथे कोणाचे चालेना।

जन हे सुखाचे दिल्या घेतल्याचे। अंत हे कळीचे कोणी नाही।

विनोद, उपहास, नाट्य, यमकानुप्रास इत्यादींच्या साह्याने लेखन करून तुकोबांनी आपल्या अभंगवाणीचे दर्शन घडविले आहे. मानवी मनाचे सूक्ष्म निरीक्षण करून नेमक्या शब्दात आशय मांडण्याचे त्यांचे कौशल्य प्रत्येक अभंगाद्वारे प्रकट झाले आहे.

**उपसंहार**

तुकारामांच्या जीवनकार्याचे वर्णन करताना बहिणाबाईने 'तुका झालासे कलस' अशा यथार्थ शब्दात त्यांचा गौरव केलेला आहे. विठ्ठलभक्ती प्रकट करताना भक्तिरसात न्हाऊन निघणारी भावपूर्ण शब्दकळा योजणारे तुकाराम समाज प्रबोधनाची भूमिका वठवताना स्पष्ट, प्रांजळ, परखड आणि रोखठोक शब्दांचा वापर करतात. आपल्या मनातील आर्तता आणि उत्कटता प्रकट करतात. त्यांच्या शब्द योजनेत जी सहजता आणि रसवत्ता जाणवते, हेच त्यांच्या लेखन शैलीचे वैशिष्ट्य होय. म्हणूनच डॉ. ल. रा. नासिराबादकर म्हणतात, ''रांजल्या-गांजल्यांना पोटाशी धरून प्रेम आणि वात्सल्याची उधळण करणारा, प्रसंगी कठोर आणि परखड बनून जीवनभाष्ये करणारा, जनांत जनार्दन शोधून मानवतेची द्वाही फिरवणारा तुकाराम हा महाकवी होता.'' (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, पृ. १६०)

## ४.५ बहिणाबाई

### कवयित्री परिचय

तुकारामांच्या सहवासाचा आणि अभंगवाणीचा लाभ झाल्यामुळे कित्येकांना विठ्ठलभक्तीची आणि काव्य लेखनाची प्रेरणा मिळाली. त्यापैकीच एक म्हणजे संत कवयित्री तुकाराम शिष्या बहिणाबाई. तिचा जन्म इ.स. १६२८ मध्ये झाला. तर इ.स. १७०० मध्ये तिला देवाज्ञा झाली. वयाच्या तिसऱ्या वर्षी शिवपूर येथील ज्योतिषी रत्नाकर पाठक या शाक्त पंथीय बिजवराशी तिचा विवाह झाला. यावेळी तिच्या पतीचे वय तीस होते. या नवऱ्याबरोबर पंढरपूर, शिंगणापूर, रहिमतपूर, कोल्हापूर अशा ठिकाणी या साध्वीस जवळ जवळ भिक्षा मागत हिंडावे लागले. कोल्हापूरात जयरामस्वामी वडगावकर यांचा तिला सहवास घडला. त्यांच्याकडून तुकोबाची ख्याती समजली. मूळची भक्तीकडे असणारी तिची वृत्ती पूर्णपणे विठ्ठलमय झाली. याच प्रसंगी मारहाण करून तिच्या नवऱ्याने तिचा फारच छळ केला. पण तिने सतत तुकोबांचा धावा केला. तिचा आंतरिक आर्ततेने तिच्यावर तुकोबांची कृपा झाली. तिच्या नवऱ्याचे वर्तन बदलले. दोघांचा सुखाचा संसार सुरू झाला. बहिणाबाईंना एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये झाली. तिचा एकूणच जीवनप्रवास अद्भूतरम्य आणि चमत्कृतीपूर्ण घटनांनी भरलेला आहे.

### अभंगवाणी

परमेश्वरासाठी एखादा भक्त झुरावा त्याप्रमाणे बहिणाबाई तुकारामाच्या दर्शनासाठी व्याकूळ झाली. तेव्हा तिच्या मनात भेटीची उत्कटता दाटून आली. आपल्या या मनोवस्थेचे वर्णन करताना ती म्हणते,

**''तुकोबाचा छंद लागला मनासी। ऐकता पदासी कथेमध्ये।।**
**तुकोबाची भेटी होईल तो क्षण। वैकुंठासमान होय मज।।**
**तुकोबांची कानी ऐकेन हरिकथा। वैकुंठासमान होय मज।।**
**तुकोबाचे ध्यान करूनी अंतरे। भेटता अपार सुख आहे।।**
**बहिणी म्हणे तुका सद्‌गुरू सहोदर। भेटता अपार सुख आहे।।''**

केव्हां एकदा तुकोबांची भेट होते आणि त्यांच्या अभंगवाणीचा लाभ होतो, म्हणून बहिणाबाई तळमळत होती. तिच्या मनाला केवळ तुकोबांच्या भेटीचा ध्यास लागला होता. त्याच्याशिवाय तिला काही सुचेनासे झाले. तुकोबांचे माहात्म्य लक्षात आल्याने त्यांच्या भेटीचे स्वप्न पूर्ण होण्यातच धन्यता आहे. अशी तिची ठाम मनोवृत्ती तयार झाली. याचवेळच्या आपल्या मनोवस्थेचे चित्रण करताना ती म्हणते,

**'मत्स्य जैसा जळावाचुनी चरफडी। तैसी ते आवडी तुकोबाची।।**
**अंतरीची साक्ष असेल जो प्राणी। अनुभवे मनी जाणील तो।।**
**तृषितासी जैसे आवडे जीवन। तैसा पिंड जाणेवीण तया।।**
**बहिणी म्हणजे हेत तुकोबाची पायी। ऐकोनिया देही पदे त्याची।।''**

तुकारामाविषयीची ही ओढ शेवटी फळाला आली आणि इ.स. १६४८ मध्ये वयाच्या १९ व्या वर्षी बहिणाबाईला तुकोबांचा साक्षात्कार झाला.

बहिणाबाईंच्या आत्मचरित्रांतून त्यांच्या वयाच्या तीन ते अठरा या पंधरा वर्षांतील घडामोडींचे यथार्थ चित्रण पहावयास मिळते. त्यांची ही आत्मकथा सुमारे ७४ अभंगांद्वारे साकार झाली आहे. पंढरीच्या दर्शनावेळची आपली मानसिक अवस्था रेखाटताना त्या लिहितात,

**''पांडुरंगमूर्ती देखेनि पवित्र। संतोषिले नेत्र इंद्रियेसी।**

**वाटे मनामाजी रहावे येथेचि। परी प्राक्तनाची दशा नाही।।''**

तुकोबांच्या भेटीविषयीची उत्कंठा, भेटीनंतरची तृप्तता, स्त्रीदेहाविषयीची पराधीनता आणि वैराग्याची ओढ इत्यादी विषय त्यांनी आपल्या आत्मचरित्रांतून हाताळले आहेत. स्त्रीदेहाची पराधीनता लक्षात आल्यावर आपला संताप व्यक्त करताना त्या म्हणतात,

**''स्त्रियेचे शरीर पराधीन देह। न चाले उपाव विरक्तीचा।**

**पाडिले अंतर विवेकाचे बळे। काय निर्मियले राघोबाने।।''**

त्यांच्या या आत्मनिवेदनात प्रांजलता, स्पष्टता, तेजस्विता आणि कारूण्य यांचा सुरेख संगम झाल्याचे आढळते.

बहिणाबाईंनी लिहिलेले कृष्णभक्तीपर काव्य वाचताना कृष्णाविषयीच्या तिच्या आदरभावाची आणि श्रद्धेची कल्पना येते. कृष्णभक्तीत असणारी तीव्रता, विरहाची आच, मीलनाची उत्कंठा रेखाटत असतानाच पतिव्रतेच्या धर्मासंबंधी तिने बहारदार चित्रण केले आहे. पतिव्रतेप्रमाणे परमेश्वरापाशी चित्त असावे असे सांगताना ती म्हणते,

**''जळावीण मासा जैसा तळमळी। चातक भूतळी मेघ इच्छी।**

**तैसे भक्तिलागी कळवळे मन। भक्ति हे निर्वाण तोच खरी।।**

**एकुलता पुत्र सापडे वैरिया। कुरंगे हा ठाया पारधीये।।**

**पतिव्रता पतिवियोगे तडफडी। भ्रमर प्राण सोडी पुष्पाविण।।**

**तृषाक्रान्त जैसा इच्छित जीवन। चकोर हा जाण चंद्रामृत।।**

**बहिणी म्हणे तैसी आवडी हरिभक्ती। तेव्हां चित्तवृत्ती ओळखावा।।''**

गोपिकांच्या संगे कृष्णाने ज्या अनेक क्रीडा केल्या त्याचेही फार सुंदर वर्णन बहिणाबाईने केले आहे. श्रीकृष्णावरील तिची पदेही प्रसिद्ध आहेत. कृष्णाचे रूपसौंदर्य आणि भक्तिमाहात्म्य याविषयीच्या वर्णनातूनही तिची कृष्णभक्ती प्रकट झाली आहे.

बहिणाबाईने भागवत संप्रदायाचा इतिहास कथन करण्यासाठी लिहिलेला अभंग अतिशय प्रसिद्ध आहे.

आजही सर्व वारकऱ्यांच्या तोंडी हा अभंग आहे. ''एवढा एकच अभंग लिहूनही त्यांची कीर्ती अमर व्हावी इतके त्यांचे मोल आहे.'' असा गौरव शं. गो. तुळपुळे यांनी केला आहे. बहिणाबाई लिहितात,

**''संतकृपा झाली। इमारत फळा आली।।**

**ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।।**

**नामा तयाचा किंकर। तेणे रचिले ते आवार।।**

**जनार्दन एकनाथ । खांब दिधला भागवत ।।**

**तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।।**

**बहिणी म्हणे फडकती ध्वजा। निरूपणा केले वोजा।।''**

तुकारामाची शिष्या म्हणून बहिणाबाई ओळखली जात असली, तरी आपल्या रसाळ आणि भावपूर्ण अभंगलेखनाने तिने संतमंडळात महत्त्वाचे स्थान प्राप्त केले आहे. तिने जवळजवळ सातशे अभंग लिहिले आहेत. तिच्या कर्तृत्वाचा आणि वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मयीन कामगिरीचा यथोचित परामर्श घेताना प्र. न. जोशी म्हणतात, ''बहिणाबाईंच्या सर्व अभंगांतून अवीट गोडवा आहे. नामदेवरायांची प्रेमळवृत्ती व तुकोबांची वैराग्यधारणा बहिणाबाईंच्या अभंगांतून प्रकट झालेली दिसते. स्वानुभूतीचे उद्गार तर फारच श्रेष्ठ पद्धतीचे आहेत. जनाबाईनंतर नाव घेण्यासारखी मराठी भाषेतील संतकवयित्री म्हणजे बहिणाबाईच होय.'' (मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, पृ. ३४३)

## ४.६ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न आणि उत्तरे

**योग्य पर्याय निवडा.**

१. एकनाथ हे कोणत्या संताचे पणतू होते ?

(रामदास / भानूदास / निवृत्तीनाथ)

२. संत तुकारामांचा जन्म कोठे झाला ?

(देहू / पैठण / आळंदी)

३. नाथांना कोणत्या पर्वतावर सगुण साक्षात्कार झाला ?

(सुलभ पर्वत / सह्याद्री पर्वत / माहुरगड)

४. नाथांचे गुरु कोण होते ?

(रामचंद्र पंथ / जनार्दन स्वामी / निवृत्तिनाथ)

**उत्तरे :** १) भानूदास, २) देहू, ३) सुलभ पर्वत, ४) जनार्दन स्वामी.

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. संत एकनाथांच्या समग्र वाङ्मयनिर्मितीचा परामर्ष घ्या. किंवा

संत एकनाथांच्या बहुविध वाङ्मयीन कामगिरीचा परिचय करून द्या. किंवा

एकनाथांना 'समन्वयकार' असे का म्हटले जाते ? साधार विवेचन करा.

**उत्तर : प्रास्ताविक :** एकनाथ हे ज्ञानदेव, नामदेवानंतरचे महत्त्वाचे संत. तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि सासंकृतिक परिस्थितीला अनुसरून त्यांनी बहुविध स्वरूपाचे लेखन केले. मराठी भाषेचा पुरस्कार केला. समाजाच्या सर्व घटकांसाठी लेखन करून विविध प्रकारचा समन्वय साधला.

**विवेचन :** विशिष्ट परिस्थितीत एकनाथांच्या लेखन कार्याचा प्रारंभ - पंडित व उच्चवर्णियांसाठी चतु:श्लोकी भागवत व एकनाथी भागवत - मध्यमवर्गीयांसाठी भावार्थ रामायण व रुक्मिणी स्वयंवर - सामान्य बहुजनासाठी भारूडे - याप्रकारचे लेखन - याशिवाय पदे, गौळणी, अभंग इत्यादी स्वरूपाचे विपुल लेखन - संस्कृत - प्राकृत, दत्त आणि वारकरी, प्रपंच आणि परमार्थ, सुशिक्षित आणि अशिक्षित इत्यादींचा समन्वय - म्हणूनच समन्वयकार एकनाथ - खरे महाराष्ट्राचे नाथ अशाप्रकारचा गौरव - विविध प्रकारचे विपुल लेखन.

**समारोप :** संत साहित्यात महत्त्वपूर्ण स्थान - भागवत मंदिराचा भक्कम आधारस्तंभ - लोकसंस्कृतीचे यथार्थ चित्रण - विपुल, व्यापक आणि वैविध्यपूर्ण लेखन करणारा प्रतिभासंपन्न संत व समन्वयवादी दृष्टिकोण बाळगणारा, मराठी विषयी सार्थ अभिमान बाळगणारा साहित्यिक.

२. ''तुकारामांचा पिंड जसा भावनाप्रधान भक्ताचा होता, तसाच परखड समाज सुधारकाचाही होता'' साधार स्पष्ट करा. किंवा

कडवा विठ्ठलभक्त व परखड समाज सुधारक म्हणून तुकारामांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा परामर्श घ्या. किंवा.

तुकारामांच्या अभंगवाणीच्या साह्याने 'तुका झालासे कळस' या उक्तीची सार्थकता पटवून द्या.

**उत्तर : प्रास्ताविक :** भागवत संप्रदायाचा कळस होण्याचे सद्‌भाग्य लाभलेला संत - कौटुंबिक परिस्थिती - अध्यात्माची ओढ - विठ्ठलभक्ती - पाच हजार अभंगांच्या द्वारे उत्कट भावाविष्कार- संत आणि लोकशिक्षक.

**विवेचन :** कवी, संसारिक, विठ्ठल भक्त, समाज सुधारक आणि लोकशिक्षक अशा विविध भूमिकेतून लेखन - विठ्ठलाविषयीची उत्कट ओढ- भेटीतील तृप्तता-विठ्ठल माहात्म्य. समाजप्रबोधन - दृष्ट, ढोंगी, स्वार्थी मतलबी साधुसंत आणि संसारिकावर कठोर प्रहार-नीतीमूल्यांची शिकवण देणारा, सदाचाराचा मार्ग दर्शविणारे अभंग-माणसाच्या स्वभावधर्माचे सूक्ष्म निरीक्षण करून त्याला सत्कर्म करण्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न. सतत संघर्ष, समाजाकडून आणि हितशत्रुंच्याकडून अपमान-छळ-शिक्षा-मानहानी-संशयास्पद

मृत्यू-'अभंग' व्यक्तिमत्त्व-लेखन 'तुका झालासे कळस'.

**समारोप :** विठ्ठलभक्ती आणि समाजोद्धार यासाठी अखंडपणे अभंग लेखन करणारा भावकवी-तत्त्वज्ञ-विचारवंत-सुधारक आणि लोकशिक्षक. स्पष्ट, प्रांजळ आणि रोखठोक शब्दांत लेखन, अभंगातील चरणांना-सुशोभित, सुविचार यांचे स्वरूप-भाषिक, सौदर्य- शब्दयोजनेचे सामर्थ्य-महाकवी.

**लघुत्तरी प्रश्न**

१. संत एकनाथांच्या भारूडांची वैशिष्टे विशद करा. किंवा

भारूडातून नाथकालीन लोकजीवनाचे कशाप्रकारचे चित्रण झाल्याचे आढळते.

**उत्तर : प्रास्ताविक :**

नाथांनी बहुविध स्वरूपाचे लेखन केले. बहुजन समाजाच्या उद्धारासाठी, उपदेश करण्यासाठी आणि तत्कालीन लोक संस्कृतीचे दर्शन घडविण्यासाठी-विविध प्रकारच्या भारूडांची रचना.

**विवेचन :** भारूड लेखनाची परंपरा, नाथांची प्रेरणा आणि भूमिका-परमार्थ विचार-समाज प्रबोधन-लोकजागृती-रुपक-मनोरंजनाच्या माध्यमातून उपदेश-अध्यात्माचे अधिष्ठान-विविध समाजघटक, पशुपक्षी, खेळ यांच्या माध्यमांतून लेखन-रचना वैशिष्ट्ये-नृत्य, नाट्य, संगीत-तत्कालीन समाजाच्या भाषेत-समाजोद्धार-लोककल्याण-लोकसंस्कृती-बहुजन समाज नजरेसमोर ठेवून झालेले लेखन-लोकप्रियता.

**समारोप :** समाजातील रूढी, परंपरा, देवभोळेपणा, दांभिकपणा, स्वार्थीवृत्ती, भोंदुगिरी यावर प्रहार करण्यासाठी-कामक्रोध इत्यादी विकारांवर विजय मिळवून समाज विचारी व्हावा या उद्देशाने-बहुजन समाजाचे हित आणि प्रगती साधण्यासाठी-लोकोद्धार आणि अध्यात्म यांची सांगड घालून केलेली रचना. संत साहित्याच्या परंपरेतील महत्त्वपूर्ण रचना पद्धती.

२. तुकारामांच्या विठ्ठलभक्तीचे स्वरूप स्पष्ट करा. किंवा

विठ्ठलाविषयीचा भक्तिभाव तुकारामांनी आपल्या अभंगांतून कसा प्रकट केला आहे ?

**उत्तर : प्रास्ताविक :** वारकरी संप्रदायाचं आराध्य दैवत-विठ्ठल-पंढरीमाहात्म्य. तुकाराम त्याच परंपरेतील कडवा विठ्ठलभक्त. भक्तिरसात्मक काव्यलेखन.

**विवेचन :** विठ्ठलावर असीम, अढळ निष्ठा-अभंगवाणीचा भक्कम पाया. विठ्ठल हाच सर्वस्व भेटीची आतुरता-भेटीसाठी तपश्चर्या-विरहावस्थेचे वर्णन-सासरी जाणाऱ्या कन्येचा दृष्टांत-भेटीची अनुभूती-आनंदाचे डोही आनंद तरंग-द्वैत नाहीसे झाल्याचे समाधान.

**समारोप :** विठ्ठलाच्या भेटीची ओढ-त्यासाठी शारीरिक व मानसिक श्रम चिंतनशीलवृत्तीने विठ्ठलाचा केलेला धावा. शेवटी तपश्चर्येला आलेले फळ-विठ्ठल भेटीनंतरची तृप्तता आणि परिपूर्तीची भावना.

**टीपा लिहा**

१. रुक्मिणी स्वयंवर

**उत्तर :** सदर घटकातील ४.३.५ हा मुद्दा पाहावा.

२. संत बहिणाबाई

**उत्तर : प्रास्ताविक :** तुकारामांचा सहवास-प्रेरणा लाभल्यामुळे भक्तीची-काव्यलेखनाची प्रेरणा यापैकी प्रमुख नाव-संत कवयित्री बहिणाबाई.

**विवेचन :** बाला जरठविवाह-भ्रमंती. शेवटी स्थैर्य, जयराम स्वामी वडगावकरांची प्रेरणा, तुकोबांचा धावा, तपश्चर्या, साक्षात्कार, अभंगलेखन, आत्मचरित्रपर लेखन, कृष्णभक्ती, 'तुका झालासे कळस-संत मंडळात महत्त्वपूर्ण स्थान.

**समारोप :** भागवत संप्रदायाची परंपरा. कवयित्रीचे योगदान, मुक्ताबाई, जनाबाई याच परंपरेतील कवयित्री, प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्त्व, तुकारामांची प्रेरणा आणि कृपा-वारकरी संप्रदायाची ध्वजा फडकत ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य.

## ४.७ सरावासाठी प्रश्न

**योग्य पर्याय निवडा**

१. तुकारामांच्या आईचे नाव काय ?

(मुक्ताबाई / कनकाई / जिजाई)

२. भ्रमंतीनंतर बहिणाबाई शेवटी कोठे स्थिर झाली ?

(कोल्हापूर / सोलापूर / पंढरपूर)

३. संत एकनाथांनी कोणत्या तिथीला देहत्याग केला.

(फाल्गुन वद्य षष्ठी / माघ शुद्ध दशमी / चैत्र प्रतिपदा)

४. 'एकनाथी भागवता' ची ओवीसंख्या किती ?

(१८८०० / २२००० / ३३००)

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. एकनाथांच्या बहुविध वाङ्मयीन कार्याची ओळख करून द्या.

२. एकनाथांना समन्वयकार का म्हणतात याविषयी साधार चर्चा करा.

३. 'तुका आकाशा एवढा' या उक्तीची सार्थकता पटवून द्या.

४. तुकारामांच्या अभंगवाणीची विविध वैशिष्टे सोदाहरण सांगा.

**लघुत्तरी प्रश्न**

१. एकनाथांच्या भारूडांना लाभलेल्या लोकप्रियतेची कारणे सांगा.

२. तुकारामांच्या अभंगवाणीतील दृष्टांत सामर्थ्याचा परामर्श घ्या.

**टीपा लिहा**

१. चतु:श्लोकी भागवत.

२. संत बहिणाबाई.

३. एकनाथांच्या गौळणी.

## ४.८ समारोप

एकनाथ आणि तुकाराम या दोघांनीही आपापल्या काळाला आणि भोवतालच्या परिस्थितीला अनुसरून केलेली वाङ्मयीन आणि सांस्कृतिक कामगिरी क्रांतिकारक स्वरूपाची आहे. तत्कालीन महाराष्ट्राची सामाजिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक परिस्थिती सर्वच दृष्टीने खालावलेली असताना, त्याचे भान ठेवून या दोघांनीही आपली वाणी आणि लेखणी झिजवली. आपल्या प्रतिभासामर्थ्याच्या जोरावर उत्तुंग वाङ्मयीन कामगिरी बजावून भागवत संप्रदायाची पताका डौलाने फडकत राहावी म्हणून मोलाचे योगदान दिले. एकनाथांनी तर समाजाच्या सर्व स्तरांचा साकल्याने विचार करून वैविध्यपूर्ण लेखन केले. संस्कृतचे नको तेवढे प्रस्थ माजल्याचे आणि मराठीची गळचेपी होत असल्याचे लक्षात घेऊन 'संस्कृत वाणी देवे केली। मग प्राकृत काय चोरापासूनि झाली?' अशा शब्दात मराठीचा कैवार घेतला. बहुजन समाजाला समजावे व त्यांचा उद्धार व्हावा अशा उदात्त आणि व्यापक हेतूने मोठ्या प्रमाणावर भारूडांची रचना केली. मराठी भाषा आणि बहुजन समाजाबद्दल केवळ कोरडी सहानुभूती व्यक्त न करता लोक भाषेतही तितक्याच सुंदर रीतीने रचना करता येते, हे सप्रमाण सिद्ध करून दाखविले.

संत तुकाराम हे तर समाजाला नीतीमत्तेचे धडे देणारे लोकशिक्षक. 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी। आवरिता परी आवरेना' अशा वृत्तीने त्यांनी अभंग रचना केली आणि मराठी अभंग वाङ्मयात सुमारे ५००० अभंगांची मोलाची भर पडली. कवी, संसारिक, विठ्ठलभक्त, तत्त्वज्ञ, सुधारक आणि लोकशिक्षक म्हणून त्यांनी देदीप्यमान कामगिरी बजावली. हितशत्रूंचा विरोध सहन केला. अपप्रवृत्तीशी सतत झुंज दिली. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' याची सतत अनुभूती येऊनही 'बोले तैसा चाले' हा बाणा सोडला नाही. दुष्ट आणि ढोंगी लोकांना रोखठोक भाषेत सुनावण्याचे काम अखेरपर्यंत केले. शेवटी प्राणाची आहुती दिली, पण तत्त्वाला तिलांजली दिली नाही. लोकमानसाचे सूक्ष्म निरीक्षण करून लोकांना सदाचाराला प्रवृत्त करणारा मध्ययुगीन काळातला जवळ जवळ अखेरचा संत म्हणजेच तुकाराम. रचनेतील सहजता, प्रासादिकता,

उपहासात्मकता, आलंकारिकता आणि प्रांजळपणा इत्यादी वैशिष्ट्यांमुळे तुकोबांची अभंगवाणी जनमानसाच्या काळजाला भिडली.

तुकारामांच्या वाणीचा आणि विचारांचा प्रभाव अनेकांवर पडला. त्यांची प्रेरणा घेऊन अनेकांनी आपले भावविश्व फुलवले. निळोबा, महिपती, कचेश्वर ब्रम्हे ही नांवे वानगी दाखल सांगता येतील. पण प्रामुख्याने ज्या संत कवयित्रीचा आदराने आणि आवर्जून उल्लेख करावा लागेल ती कवयित्री म्हणजे बहिणाबाई. 'ज्ञानदेवे रचिला पाया। तुका झालासे कळस' या उक्तीमुळे तिला संतमंडळात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. तिच्या अभंगलेखनाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. सुमारे ७०० अभंग लिहून तिने संत वाङ्मयात मोलाची भर टाकलेली आहे.

## ४.९ अधिक वाचन


मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास : प्राचीन काल – प्र. न. जोशी

प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : डॉ. ल. रा. नासिराबादकर

सर्वात्मभावी तुकाराम : डॉ. अनिल गवळी

विद्रोही तुकाराम : डॉ. आ. ह. साळुंखे

पुन्हा तुकाराम : दिलीप चित्रे


## ४.१० उपक्रम

- 'संत तुकाराम' हा चित्रपट पहा.
- एकनाथांच्या भारूडांचा संग्रह करा.

❑❑❑

**सत्र सहावे**

# घटक : १

## समर्थ संप्रदाय : स्थूल परिचय, समर्थ रामदास यांची ग्रंथरचना इतर धर्मियांनी केलेली मराठी भाषेची साहित्य सेवा : हुसेन अंबर, शेख महंमद, फादर स्टिफन्स, फादर क्रुआ

### १.१ उद्दिष्टे

या घटकाचे अध्ययन केल्यामुळे आपणास,

- मध्यमयुगीन मराठी वाङ्मय परंपरांचा व इतिहासाचा परिचय करून घेता येईल.
- समर्थ रामदास यांचे चरित्र, तत्कालीन देशपरिस्थिती, सांस्कृतिक परिस्थिती व समाजकारण यांचे ज्ञान होईल.
- समर्थ रामदास यांच्या वाङ्मय – निर्मितीच्या प्रेरणा – देशकालपरिस्थिती अस्मानीसुलतानी, परचक्रनिरूपणा – श्रीरामभक्ती – बलोपासना – प्रयत्नवाद, प्रपंचविज्ञान, लोकसंगठन इत्यादींचा परिचय होईल.
- रामदासांच्या साहित्याचे स्वरूप : – 'दासबोध', करूणाष्टके', 'मनाचे श्लोक', 'एकवीससमासी', 'रामायण', 'स्फुट प्रकरणे', 'स्फुटकाव्ये', 'आरत्या', 'पत्रे' इत्यादी साहित्य, त्याचे स्वरूप, वैशिष्टे, भाषाशैली व सामाजिकताही लक्षात येईल.
- समर्थ संप्रदायाचा स्थूल परिचय – रामदास पंचायतन – शिष्या वेणाबाई यांची ग्रंथरचना समजून घेता येईल.
- समर्थ 'रामदास' हे प्रयत्नवादी, प्रपंचातून परमार्थ सांगणारे, व्यवहार शिकवणारे, राजकारण जाणणारे, असे जागृत आणि प्रवृत्तीवादी व प्रयत्नवादी संतकवी होते हे त्यांचे निराळेपण जाणवेल.
- विविध कालखंडातील इतर धर्मियांनी केलेली मराठी भाषेची साहित्य सेवा, त्याचे स्वरूप, प्रेरणा, भाषावैशिष्ट्ये लक्षात येतील. उदा. – जैनवाङ्मय, लिंगायत वाङ्मय, मुस्लिम वाङ्मय, ख्रिश्चन वाङ्मय या इतर धर्मियांनी मराठी भाषा समृद्ध करण्यास हातभार लावला हे जाणवेल.

### १.२ प्रास्ताविक

संत ही महाराष्ट्राला लाभलेली देणगी आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी असून या सर्व संतांनी अमूल्य कामगिरी पार पाडली आहे. त्यांनी काही निश्चित उद्दिष्ट हे आपले जीवनकार्य मानून जनमानसाला मार्गदर्शन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. अस्थिर समाजव्यवस्थेत सुस्थिरता आणणे, समाजाला योग्य मार्ग

दाखविण्याचे काम करणे, त्यांना परमार्थाची वाट दाखवून त्यांची वाटचाल सुलभ करण्याचा प्रयत्न करण्यासाठी धर्माची शिकवण देण्याचे मौलिक कार्य सकल संतांनी केलेले दिसते. प्रत्येक संत आपआपल्या परीने श्रेष्ठच आहे. या संत प्रभावळीत समर्थ रामदासस्वामी आपल्या वेगळ्या वैशिष्ट्यांसह उठून दिसतात. संत रामदास यांच्या जीवनचरित्राचा आपण थोडक्यात परिचय करून घेऊया, पुढे संत रामदासांनी केलेल्या रेखीव व समृद्ध वाङ्मयाचा परिचय आपण यथावकाश करून घेणार आहोत. याचबरोबर शिव-समर्थ भेट, समर्थ संप्रदाय, रामदासांचे प्रपंचविज्ञान यांबद्दलही आपण अभ्यास करणार आहोत. इतर धर्मियांनी केलेली मराठी भाषेची साहित्य सेवा, विशेषत: फादर स्टिफन्स, फादर क्रुआ, शेख महंमद आणि अंबरखान यांच्या साहित्याचा परिचय आपण करून घेणार आहोत. तत्पूर्वी संतकाव्यातील रामदासांची वैशिष्टपूर्णता पाहण्यासाठी त्यांच्या चरित्राचा विचार आपण करुया.

## १.३ विषयविवेचन

समर्थ रामदास यांचा पंथ वारकरी संप्रदायाला जवळचा असला तरी 'समर्थ' हे इतर संतांहून निराळे ठरतात; ते त्यांच्या प्रपंचविज्ञानामुळे. प्रपंचात राहून परमार्थ करा, लोकसंगठन, राजकारण, अखंड सावधानता या उपदेशामुळे व मनाचे 'श्लोक' व 'दासबोध' यातील बोधामृतामुळे ते वाङ्मयीन दृष्ट्याही निराळे ठरतात.

रामदासांनी आपल्या ग्रंथांतून भक्तिबरोबरच सामान्यजनांना जीवनात वेगवेगळ्या टप्यांवर उपदेश केलेला आहे; तो कालातीत मानावा लागेल. मानवी जीवनाचे महत्त्व, सगुणनिर्गुणभक्ती, मुर्ख लक्षणे, भाषा-लेखन यांचे बारकावे, मैत्री, लोकसंगठन अशा कितीतरी साध्या सोप्या वाटणाऱ्या गोष्टींतून त्यांनी लोकांना उपदेश केला आहे, नेहमी सावधान केले आहे. जीवनाच्या इतिकर्तव्यतेपासून पळून जाण्यापेक्षा प्रयत्नवादाची कास धरा, आणि प्रपंचात राहूनही परमार्थ साधता येतो हे सांगण्यासाठी त्यांनी आपल्या वाङ्मयाचा उपयोग केला.

देश भ्रमंतीतून तत्कालीन समाजाचे जे विदारक दर्शन घडले, त्यामुळे ते व्यथित तर झालेच; पण त्या राजकीय सामाजिक, धार्मिक, परिस्थितीशी दोन हात करण्यास त्यांनी समाजात आदर्श राजाचे श्रीरामाचे गुणगान केले. बलोपासनेसाठी 'हनुमंता'चा आदर्श ठेवला. राजा शिवछत्रपतींचा पराक्रम, स्वराज्य स्थापना यांचा आदर्श समाजापुढे ठेवला. या सर्वांतून त्यांची समाजाबद्दलची कळकळ, स्वराज्य, स्वधर्म यांबद्दलची आस्था दिसून येते. त्यासाठी प्रथम त्यांचे चरित्र आपण पाहूया.

## रामदासांचे चरित्र

समर्थ रामदासस्वामी यांचा जन्म 'जांब' या गावी इ.स. १६०८ मध्ये म्हणजेच शके १५३० मध्ये चैत्र शुद्ध नवमी या दिवशी झाला. रामदास हे सूर्याजीपंत आणि राणूबाई या दांपत्याचे द्वितीय पुत्र. त्यांचे मूळ नाव 'नारायण' असे होते. रामदास ठोसर घराण्यात जन्मले. हे घराणे फार पूर्वी पासून अनेक गावांचे जोशी, कुलकर्णीपण भूषवित होते. सूर्याजीपंताचे घराणे भागवत धर्माची आद्यदेवता भगवान-सविता-सूर्यनारायणाचे

परमभक्त होते. तसेच या घराण्यात अनेक पिढ्या सूर्यकुलोत्पन्न श्रीरामाची उपासना होती. रामदासांचे वडील बंधू 'गंगाधर' हे पुढे 'रामी रामदास' किंवा 'श्रेष्ठ' या नावाने ओळखले जात होते.

बालपणापासून नारायणाची म्हणजे समर्थ रामदासांची तीक्ष्ण बुद्धी आणि त्यांच्या विचारांची व्यापकता दिसून येते. 'विश्वाची चिंता' करणाऱ्या समर्थांनी वयाच्या बाराव्या वर्षी स्वत:च्या प्रपंचाकडे पाठ फिरवली. सर्वस्वाचा त्याग करून 'टाकळी' येथे त्यांनी बारा वर्षे वास्तव्य केले. रामदासाना शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक सामर्थ्याची जन्मजात देणगी लाभली होती. घरातील वडिलार्जित संस्कार हे तपश्चर्येचे व श्रीरामोपासनेचे होते, याची साथ त्यांना लाभली. गायत्रीमंत्राचे आणि त्रयोदशाक्षरीमंत्राचे नित्य पुनश्चरण करताना ते नेहमी सावध होते. आपण प्रदीर्घ तपश्चर्या करून श्रीरामकृपा संपादन करावी आणि त्याआधारानी काही महत्कार्य करावे अशा स्वरूपाचे विचार त्यांच्या मनात लहानपणापासून येत होते. मारुतीच्या मंदिरात ध्यानस्थ असतांना श्रीरामानेच त्यांना मंत्रोपदेश दिला आणि श्रीराम हेच त्यांचे गुरु बनले व नारायणचे रामदास बनले. आपल्या गुरु परंपरेविषयी ते लिहितात –

'श्रीरामें दासासी उपदेशिले । उपदेश देऊनी मजला मारुती । स्वये रघुपती निरविले ।। निरवितां तेणे जालो रामदास । संसारी उदास जीवें भावे ।। म्हणोनि आमुचे कुळी कुळदैवत । राम हनुमंत आत्मरुपी। आत्मरूप जाला रामी रामदास । केला उपदेश दीनोद्धारे।। समर्थांची गाथा : पृ. ८४)

श्रीराम आणि हनुमंत ही समर्थांची कुलदैवते होती. बारा वर्षे टाकळीमधील वास्तव्यात रामदासांनी पुन:चरण व अध्ययन करण्याचा निश्चय केला. पुढील बारा वर्षे त्यांनी भारतखंडाची तीर्थयात्रा केली, भ्रमंती केली. या भ्रमंतीमध्ये त्यांनी आपली चौकस बुद्धी जागृत ठेवून सभोवतालच्या परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण – अवलोकन केले. समाजाची भयानक दैन्यावस्था त्यांच्या ध्यानात आली. समाजावर पसरलेले भीतीचे साम्राज्य, प्रतिकारशून्य बनलेला समाज, तसेच देव, देश आणि धर्म यांचे वास्तवभान त्यांना देशाटनातून आले. संपूर्ण भारतखंडाचा पायी प्रवास करताना त्यांनी जागृततेने समाजाच्या समस्यांचा विचार केला आणि या त्रस्त लोकांचे दैन्य दूर करावे, आधी त्यांना सुखाचे घर द्यावे, प्रपंचाचा आधार द्यावा, बायका मुलांची साथसंगत द्यावी आणि मग त्यांना परमार्थाच्या चार गोष्टी शिकवाव्यात ह्या सामाजिक जाणिवेतूनच – 'कैसी वांचतील जनें ?', 'चिंतेने ऊर फाटतो' या लोकहिताच्या कळकळीतून रामदास लोकोद्धाराकडे वळले. पुढे या विचाराने 'समर्थ' झालेले रामदास 'जांबे'स परत येऊन मातोश्रींना भेटले आणि कृष्णातीरावर येऊन त्यांनी नव्या 'समर्थ' संप्रदायाची उभारणी केली. माघ कृष्ण नवमी शके १६०३ रोजी समर्थांनी राममूर्तीचे अवलोकन करीत सज्जनगडावर देह ठेवला.

## समर्थकालीन देशस्थिती

समर्थांच्या जीवनवृत्तामध्ये,त्यांनी जे कार्य केले, जी समाजजागृती घडवून आणली, त्यासाठी त्यांनी कोणत्या परिस्थितीला तोंड दिले ती पार्श्वभूमी समजावून घेणे आवश्यक आहे.

समर्थ रामदासांच्या कालखंडाची पाळेमुळे समर्थपूर्वकालीन परिस्थितीत आहेत. इ.स. १६६० पर्यन्त

महाराष्ट्र मुसलमानी वर्चस्वाखाली होता. निजामशाही-आदिलशाही, शिया-सुन्नी, दक्षिणी-परदेशी या भेदांमुळे मुसलमानी शाह्यांच्या पदरी असलेल्या जाधव-मोरे-महाडिक, भोसले इत्यादी मराठा सदरांच्या पराक्रमाला व मुत्सद्देगिरीला साहजिकच अधिक वाव मिळू लागला. आपले कर्तृत्व गाजविताना स्वकर्तृत्वाविषयीचा आत्मविश्वास आणि उत्कर्षाची आकांक्षा त्यांच्या मनात वाढत गेली. याचे उत्तम उदाहरण म्हणजे शहाजीराजांचे चरित्र होय. सांस्कृतिक दृष्ट्या मराठी साहित्याच्या दृष्टीने एकनाथांची कामगिरी आणि राजकीयदृष्ट्या शहाजी राजेंची कामगिरी यादृष्टीने महत्त्वाच्या बाबी ठरतात. यातूनच पुढे शिवशाहीचा उदय, स्वराज्याचे तोरण उभारले गेले. यामुळे आदिलशाहीला तडाखा बसला. पुढे मुसलमानी सत्ता हळूहळू खिळखिळी होऊ लागली, मोगली आक्रमणांना पायबंद बसला.

मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा तिसरा कालखंड राजकीय दृष्टीने स्वराज्योन्मुखतेचा, स्वराज्य संपादनाचा व स्वराज्यरक्षणाचा आणि स्वराज्यविस्ताराचा कालखंड ठरतो. सांस्कृतिक दृष्टीने या कालखंडाला 'पुनरुज्जीवन पर्व' असे म्हणता येईल. या कालखंडातील वाङ्मयामध्येही पुनरुज्जीवन प्रवृत्तीचे अधिक्य दिसते. म्हणून या कालखंडास (इ.स. १६५० ते १८५०) 'विस्तार पर्व' किंवा 'विस्तरण पर्व' असेही म्हणता येईल. (प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप : ले. प्रा. ह. श्री. शेणोलीकर, सहावी आवृत्ती : पृ. १४३)

## समर्थांचे कार्य

संत रामदासांनी तीर्थाटन काळात देशात माजलेला अनाचार स्वत: पाहिल्याने त्याचे वर्णन 'अस्मानीसुलतानी' तसेच 'परचक्रनिरूपण' या दोन प्रकरणामध्ये केले आहे. लोकमानसातील आत्मविश्वासाला चालना देण्यासाठी त्यांनी श्रीराम आणि हनुमंताची बलशाली उपासना सांगितली. भवानीमातेचे प्रेरणा स्वरूप स्पष्ट केले. गावोगावी भ्रमंती करून, स्वधर्म प्रचार केला. देश, धर्म, संस्कृती यांविषयी त्यांनी लोकांमध्ये अभिमान निर्माण केला. प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालण्यासाठी स्वत: ग्रंथ लेखन केले. भरकटलेल्या समाजाला मार्ग दाखविण्याचे व सावरण्याचे काम रामदासांनी केले. अशा तऱ्हेने वैदिक वर्णाश्रमधर्माचे पुनरुज्जीवन रामोपासनेच्या बळावर करणारा 'समर्थ संप्रदाय' रामदासांनी सुरू केला. (डॉ. ल. रा. नसिराबादकर : प्र. म. वा. इति. पृ. १६६) वास्तविक पहाता समर्थांचा संप्रदाय हा वारकरी संप्रदायापासून फारसा भिन्न नाही. पण समर्थांनी श्रीराम आणि मारुती यांच्या उपासनेला नवा अर्थ प्राप्त करून दिला. तसेच लोकमानसाच्या जागृतीच्या आणि विकासाच्या तळमळीतून अनेक तऱ्हेने शोषण झालेल्यांना, पोळलेल्यांना, जुलमाने हवालदिल झालेल्यांना रामदासांनी एक नवी उर्मी प्राप्त करून दिली. एक स्वकर्तृत्वाची नवी दिशा प्राप्त करून दिली; आणि आपल्या साहित्यातून कालसापेक्ष प्रपंचविज्ञान मांडले.

समर्थांनी लोकनिरीक्षणात लोक एकमेकांपासून लांब गेल्याचे पाहिले, अनुभवले होते. अशा काळात 'धीर धरा धीर धरा तकवा । हडबडू गडबडूं नका । काळ देखोनि वर्तावे । सांडावे भय पोटिंचे ।' असे सांगणारा समर्थ समाजपुरुष असणे ही समाजाची गरज होती. अनेक तऱ्हेने विभागलेल्या, दुभंगलेल्या लोकांना एकत्रितपणे संगठीत करणे, त्यांच्यात स्वकर्तृत्वाची, स्वाभिमानाची जाणीव निर्माण करण्यासाठी समर्थ

रामदासांनी स्वत: ग्रंथलेखन केले. 'अखंड सावधान रे । प्रयोग प्रेत्न मान रे । नकोचि वेवधान रे ।' हा आपुलकीचा सल्ला ते देतात. लोकवशीकरणाचा मंत्र देताना ते लिहितात –

**'जन हे वोळतु जेथे । अंतरात्माचि वोळवा ।**

**जन हे खौळले जेथें । अंतरात्मचि खौळला ।'**

त्यासाठीच 'जीव जीवांत घालावा । आत्म्यांत मिसळावा' किंवा वोळखीने ओळखी साधावी । बुद्धीने बुद्धी बोधावी । नीतिन्यास रोधावी । पाखंडाची ।। वेष धरावा बावळा । अंतरी असाव्या नाना कळा । सगट लोकांचा जिव्हाळा । मोडू नये ।।

रामदास असे लोगजागृतीचे कार्य करू शकले.

**'दोष देखोनी झांकावे । अवगुण अखंड न बोलावें ।**

**दुर्जन सापडोन सोडावें । परोपकार करुनी ।।''**

त्याच बरोबर

**'दु:ख दुसऱ्याचें जाणावे । ऐकूनी तरी वाटून घ्यावें ।**

**बरे वाईट सोसावें । समुदायाचें ।'**

असा लोकसंगठनेचा मूलमंत्रच ते देतात. 'निशिदिनी जनचिंता लागलीसे ।' या उद्गारातून त्यांचा लोककळवळा दिसून येतो. या लोकजागृतीसाठी त्यांनी आदर्श उभा केला तो शिवरायांचा.

## शिव–समर्थ भेट

छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास यांची भेट हा मराठी साहित्य आणि इतिहास या क्षेत्रांतील विद्वानांमधील वादग्रस्त मुद्दा आहे. समर्थांनी देवकारणातून समाजकारण आणि समाजकारणातून राजकारण साधले. समर्थांचे मुख्य कार्य स्वधर्मस्थापनेचे होते. तर शिवाजी महाराजांचे कार्य स्वराज्य स्थापनेचे होते. त्यादृष्टीने दोघांची कार्ये भिन्न असूनही एकमेकांस पूरक ठरणारी होती. पण दोन्हीही विभूती स्वतंत्र व स्वयंभू व्यक्तिमत्त्वाच्या होत्या. धर्मस्थापन व स्वराज्यस्थापना ही कार्ये एकमेकांच्या सहकार्याने वाढीस लागणारी होती. काळाची गरज ओळखून त्यानुसार दोघांनी कार्य केले, ते समाजाला आत्मभान, आणि स्वत्व प्राप्त करून देण्यासाठी. कामाची आखणी, बांधणी, संघठन, सावधान, सातत्य यांमुळे दोघांना आपापल्या कामात यश आले.

समर्थ आणि शिवराय यांची भेट झाली असली पाहिजे असे निश्चितपणे दर्शविणारे कागदपत्रे आहेत. (डॉ. ल. रा. नसिराबादकर : प्रा. म. वा. इति., पृ. १६५) त्यानुसार श. १५९४ मध्ये श्रावणानंतर केव्हा तरी ही भेट झाली असावी.

## समर्थ संप्रदाय

रामदासांचा पंथ हा धर्माचा – अध्यात्माचा – परमार्थाचा, राजकारणाचा की व्यवहारचातुर्याचा असा वाद उपस्थित केला जातो. पण यापेक्षा रामदासांचा पंथ भक्तिपंथ होता. त्याला त्यांनी स्वत: राघवाचा पंथ म्हटले आहे.

**ग्रंथ नाम दासबोध । गुरुशिष्याचा संवाद**

**येथे बोलिला विशद । भक्तिमार्ग (१–१–२)**

प्रापंचिकास परमार्थ शिकवणारा हा पंथ आहे. ''संसार दु:खे दुखवला । त्रिविध तापें जो पोळला । तोचि अधिकारी झाला । परमार्थासी'' असे सांगून, समाजाची नाकर्तेपणाची परिस्थिती अभ्यासून त्यांनी समाजाला प्रयत्नवाद शिकवला 'केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे ।' या प्रयत्नातून प्रपंचवाद विशद केला.

**'जाणावा रामदासांचा । हाचि संप्रदाय**

**व्रत ज्यांचे ब्रह्मचारी । वस्त्रे ज्याची हुर्मुंजी बरी**

**विवेक वैराग्य ते भारी । तारी जड जीवाते**

**नित्य वाची दासबोध । शोधी सारासार शोध**

**सांगे भाविकांसी बोध । करी रोध इंद्रियां ।।'**

ही रामदासी शिष्याची लक्षणे होत.

'आधी ते करावे कर्म । कर्ममार्गे उपासना । उपासकां सापडे ज्ञान । ज्ञानें मोक्षचि पावणे' हे पंथाच्या आचारधर्माचे सार म्हणता येईल. धर्म, उपासना, कर्म, ज्ञान, व्यवहार, अध्यात्म, राजकारण व श्रीरामभक्ती, मारुतीची बलोपासना यांचा लोकोद्धारासाठी प्रसार करणे हे समर्थांच्या संप्रदायाचे प्रमुख कार्य आहे. समर्थांची विचारसरणी त्यांच्या ग्रंथात पदोपदी प्रत्ययास येते. त्याचा परिचय आपण करून घेऊया.

## समर्थांचे वाङ्मय

समर्थांचे वाङ्मयीन कर्तृत्व मोठे आहे. त्यांनी धर्मकारण, राजकारण आणि समाजकारण करताना विपुल प्रमाणात वाङ्मयनिर्मिती केली. ती जीवनाच्या सर्वांगाला स्पर्श करणारी आहे. त्यांच्या या वाङ्मयामधून त्यांची सूक्ष्म निरीक्षण शक्ती आणि प्रत्येक गोष्टीचा खोलवर विचार करण्याची प्रवृत्ती यांचे दर्शन घडते. ग्रंथरूप आणि स्फुट काव्यस्वरूप अशी द्विविध स्वरूपाची ग्रंथरचना समर्थांनी केली. समर्थ रामदासांच्या साहित्यसृष्टीवर मुकुंदराज, एकनाथ, दासोपंत, त्र्यंबकराज यांचा ठसा आहे. 'विवेकसिंधू' व 'दासबोध' या दोन्ही ग्रंथांत काही बाबतीत साम्य आहे. त्यांनी आपल्या वाङ्मयातून कर्मवादाला प्राधान्य दिले. म्हणून त्यांचे साहित्य सकारात्मक विचारांचे आहे असे म्हणाले लागते. जीवनाचा सर्वांगीण विकास करणारे समर्थांचे विचार

आजही तितकेच मोलाचे ठरतात. 'सामर्थ्य आहे चळवळीचे', 'यत्न तो देव जाणावा' हा प्रयत्नवाद आज आणि पुढेही समाजाला प्रेरणाच देईल. त्यांच्या ग्रंथरूप व काव्यस्वरूप वाङ्मयाचा परिचय आपण आता करून घेऊया.

विद्यार्थ्यांनो ! आपण समर्थ रामदासांचे जीवनचरित्र त्या काळची परिस्थिती, समर्थ संप्रदाय याबद्दल आतापर्यंत माहिती घेतली. आता प्रत्यक्ष त्यांच्या वाङ्मयाचा अभ्यास करूया. समर्थांनी केलेल्या ग्रंथरचनेत 'दासबोध', 'मनाचे श्लोक', 'रामायण', 'करूणाष्टके', 'जुना दासबोध' (एकवीस समासी), 'आत्माराम', 'स्फुट प्रकरणे', 'स्फुट श्लोक', 'अष्टाक्षरी', 'पाच लघुकाव्ये', 'चौदा ओवीशते', 'स्फुट ओव्या', अवांतर व 'प्रासंगिक प्रकरणे' आरत्या इत्यादींचा समावेश होतो.

- **करुणाष्टके**

विद्यार्थी मित्रहो ! रामदासांची 'करुणाष्टके' ही कारुण्याने ओथंबलेली आहेत. मात्र अष्टके म्हटले असले तरी केवळ आठ श्लोकांचे बंधन असे त्यांचे स्वरूप नाही. पाचापासून वीसापर्यंन्त श्लोक असलेली ही रचना आहे. समर्थ नाशिक, पंचवटीला आले, तेव्हां पुनश्चरण काळातील म्हणजेच साधक अवस्थेतील काळात ही करुणाष्टके निर्माण झाली आहेत. त्यांना रामदर्शन घडले नाही म्हणून या काव्यातून रामदासांची साधक अवस्थेतील धडपड व तळमळ प्रतिबिंबीत होते. यास 'करुणाष्टके' हे नाव रामदासांनी दिलेले आहे. शंकरराव देवांनी यास 'रडविणारी कविता' म्हटले आहे. शं. गो. तुळपुळे म्हणतात – 'करुणाष्टकाचे तंत्र म्हणजे एकच, आणि ते म्हणजे त्यात ओतप्रोत भरलेले कारुण्य, असहायता, अगतिकता, आर्त. रामदासांच्या करुणाष्टकात हे तंत्र नीटपणे सांभाळले गेले आहे.'

**'अनुदिन अनुतापें तापलो रामराया**

**परमदिनदयाळा नीरसी मोहमाया**

**अचपळ मन माझे नावरे आवरिता**

**तुजविण शिण होतो धाव रे धाव आता।।'**

अशी रामदर्शनाची आर्तता त्यात आहे. 'भजनरहित रामा सर्वही जन्म गेला। स्वजन जनधनाचा व्यर्थ म्यां गर्व केला.' असा पश्चाताप ते व्यक्त करतात. श्रीराम भेटत नाही म्हणून उदासी अवस्था होते 'पस्तावलो कावलो तप्त झालो । तुझा दास मी व्यर्थ जन्मासी आलो' अशी आर्तता, कारूण्य आणि पस्तावणे हे करुणाष्टकांचे वैशिष्ट्य होय. त्यांच्या ह्या अष्टकात रामदासांचे भक्तिरसात चिंब भिजलेले, कासाविस मन प्रकट झाले आहे. साधक अवस्थेतील मनाचे प्रतिबिंब यातून व्यक्त होते. रामदासांना राम सुखस्वरूप वाटतो.

**'तनुमनधन माझें राघवा ! रुप तुझे**

**तुझविण माज वाटे सर्व संसार ओझे ।'**

संसाराचा पाश तुझ्या कृपेवाचून एकदम सुटत नाही. मन विषयाकडे धावते.

**'चपळपण मनाचे मोडितां मोडवेना**
**सकळ स्वजनमाया तोडिता तोडवेना ।'**

त्यातून सुटण्यासाठी

**'मजवरि करूणेचा राघवा पूर लोटी'**
**'घडिघडि मन आतां रामरुपी भरावें**
**रघुकुळटिळका ! रे अपुलेंसे करावे ।'**

अशी प्रार्थना ते करतात.

करुणाष्टके म्हणजे भक्तिरसाची सरोवरे म्हटली जातात. रामदासांच्या मनातील अनुताप, वैराग्य, कोमलता यांचे चित्र म्हणजे करूणाष्टके होय.

**'नको द्रव्यदारा नको येरझारा । नको मानसी ज्ञानगर्वे फुगारा ।।**
**सगुणी मला लाविं रे भक्तिपंथा । रघूनायका मागणे हेंचि आतां ।।**
**तुझें रुपडें लोचनी म्या पहावें । तुझे गुण गातों मनासीं रहावें ।।**
**उठो आवडी भक्तिपंथेचि जातां । रघूनायका मागणें हेचि आतां ।।**
**सदा सर्वदा योग तुझा घडावा । तुझे कारणी देह माझा पडावा ।।**
**नुपेक्षी मज गुणवंता अनंता । रघुनायका मागणे हेचि आतां ।।''**

रामदासांनी करुणाष्टकांतून अनुताप आणि भेटीची उत्कंठा वारंवार व्यक्त केली आहे. 'करुणाष्टके म्हणजे प्रेमळ प्रार्थना होय.' – (मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड ३ रा, लेखक ल. रा. पांगारकर, पृ. १०७)

करुणाष्टकांची रचना इ.स. १६२५ ते १६३० (श. १५४७ ते १५५२) मध्ये झाली असावी. श्री ज. स. करंदीकर यांना अष्टकात भक्ती असली तरी त्यातील बोध लौकिक नीतिपर वाटतो. तर श्री. र. रा. गोसावी या काव्याविषयी म्हणतात 'परतत्त्वाच्या भेटीच्या उत्कंठतेचे कारुण्यजन्य पडसाद उमटलेले एक उत्कट आणि आत्मनिष्ठ भावकाव्य आहे.' अनुदिनि अनुतापे तापलो रामराया' हे करुणाष्टक समर्थांच्या सर्व करुणाष्टकांचा मुकुटमणी ठरते. येथील हृदयातील तळमळ वैयक्तिक न राहता सार्वत्रिक बनते. करुणाष्टके निरनिराळी असली तरी त्यांतून एकच भाव मांडलेला आहे. उदासीनतेचा, अधीरतेचा, तळमळीचा, विव्हळ व्याकुळतेचा, रघुनाथाविषयीच्या अनावर भक्तीचा. रामचंद्रामुळे आपल्या जीवनात, नित्यवर्तनात पारमार्थिक क्रांती घडून यावी हे मागणे एकच; पण वेगवेगळ्या करुणाष्टकातून व्यक्त होते.

## • एकवीस समासी

साधकावस्थेनंतर सिद्धी प्राप्त होण्याच्या वाटेवर 'एकवीससमासी' ची रचना झालेली दिसते. सांप्रदायिकांच्या नित्यपठणासाठी समर्थांनी 'एकवीससमासी' हा ग्रंथ लिहिला आहे. यालाच 'जुना दासबोध' म्हणतात. समर्थांनी याचा उल्लेख फक्त 'दासबोध' असाच केला आहे. एकवीससमासीची रचना शके १५७०–७१ मध्ये सुरू झाली. या ग्रंथाची ओवी संख्या १३४० आहे. 'स्वानुभवोद्वार आवरेना । यासी काय करू' या प्रेरणेने ते श्रोत्यांना 'ही प्राकृताची टीका' वाचावयास सांगतात.

**'आज्य म्हणतां प्राप्त झालें । तूप म्हणता तेचि आलें'**

**'अन्नाची चाड तरी नका । शब्दी गुंतों'**

असे स्पष्टीकरण करतात. वक्ता अणि श्रोता, निंदा आणि निंदक व दैव आणि प्रयत्न या तीन विषयांवर समर्थांनी उत्कृष्ट शिकवण दिली आहे.

एकवीससमासीचा मूळ विषय परमार्थ विवेचन असून त्यात निवृत्तीचे तत्त्वज्ञान व्यक्त होते. सद्‌गुरु व संत्‌शिष्याची लक्षणे, आदर्श भक्त आणि भक्तीचे स्वरूपही त्यांनी विशद केले आहे.

**'श्रवण केलिया क्रिया पालटे । दिवसेंदिवस देहबुद्धि सुटे ।**
**तरीच हे भवमूळ तुटे । अनंत जन्मांतरीचें ।।**

त्यासाठी **'ज्याचा जो स्वधर्म तो तेणें । त्यागूं नये सर्वथा ।।**

**किंवा – 'ज्याचे हृदयीं संदेह वसे । तेथें समाधान कदा नसें ।'**

असा सल्ला ते देतात.

**'झांकावे आपणासी । आणि शिकवावें पुढीलांसी ।**
**ऐसा हा सकळ सृष्टीसी । दंडकचि आहे ।।**
**म्हणोनि आपण क्रिया करावी । मग पुढिलांसी न लगे सांगावी ।।**
**तुझी क्रिया देखोनि जीवीं । तेही तैसेंचि करितील ।।**

भक्तीने सर्व साध्य होते पण त्यासाठी – 'सर्वस्वाची आस तुटे । तरीच सगुणमूर्ति प्रगटे । दु:ख संसारींचे फिटे । एकसरा ।।' असे निवृत्तीचे तत्त्वज्ञान सांगतात. रामदास स्वत:चा उल्लेख 'पिसाट रामदास', 'ब्रह्मपिसा रामदास' असा करतात. आपल्या या ग्रंथाने श्रोत्यांना मोक्षाचे भांडार मिळेल हे ते निक्षुन सांगतात.

**'डगमगले तिहीं उळून जावें । उरले तिहीं सावध ऐकावें ।**
**आतां येथूनि लुटावें । मोक्षाचे भांडार ।।'**

एकवीस समासीत कोणते विषय आले आहेत, हे समर्थांनी स्वत:च एकविसाव्या समासाच्या सुरुवातीस

एकोणीस ओव्यात थोडक्यात सांगितलेले आहे. १) मंगलाचरण, २) राघववर्णन, ३) श्रोतेवक्ते लक्षण, ४) सद्‌गुरुलक्षण, ५) शिष्यलक्षण, ६) वैराग्य निरुपण, ७) देहाभिमानाचे वृथात्व, ८) आत्मनिवेदन, ९) निरभिमान शांतीचे वर्म, १०) शिकवण, ११) प्रारब्ध व प्रेत्न, १२) संतगौरव, १३) मीपणाचे निर्मूलन, १४) पूर्ण समाधान, १५) रघुनाथचरित्र व रामनाम जपाचे महत्त्व, १६) बोध, १७) दृश्य देखण्याचा उच्छेद, १८) येकंकार निरसन, १९) सत्संग महिमा, २०) शुद्ध ज्ञानातील अडथळे, २१) पुन्हा समाधान.

- **रामायण**

समर्थांनी आपल्या मनीमानसी आद्यपूजा प्रभू रामचंद्राचीच केली आहे. त्यांच्या सकल जीवित कार्यामागची प्रेरणा आणि शक्ती प्रभू रमाचंद्राची कृपाच आहे. समर्थांच्या जीवनाला रामभक्ती व्यापून होती. समर्थांच्या मनात जे तरंग, जे भाव, ज्या कल्पना, जे विचार उठत, उत्पन्न होत त्या सर्वात राम अखंड नांदत होता. श्री समर्थांचे रामायण म्हणून किष्किंधाकांड, सुंदरकांड व युद्धकांड अशी तीन कांडे प्रकाशित झालेली आहेत, पण त्यातील फक्त सुंदरकांड व युद्धकांड समर्थांचे आहे. यालाच 'दीर्घरामायण' म्हणतात.

रामायण आणि मनोबोध यांच्या रचनाकाळांत फारसे अंतर नसावें. दोहोंमध्ये भाषेची धाटणी एकच आहे. 'दिल्हे अक्षई राज्य बीभीषणाला', 'गणाधीश जो ईश सर्वांगुणेसी', 'मरावे परी कीर्तिरुपे उरावें', इ. रामायणातील चरण मनोबोधातही आहेत.

रामदासांची रामायणातली भाषा दणदणीत व ओघवती आहे. रामायणांतील रावणाच्या लंकेचे वर्णन पहा –

**'भयासूर तो भीम सिंधू उडाला । त्रिकुटा चळाहुनि पैलाड गेला ।**
**अकंधित लंकापुरी कांचनाची । पुढे देखिली सौख्यदाती मनाची ।।**
**गुढे गोपुरें देऊळें ते अपारें । हुडे कोट जाळांधरे थोरथोरें ।**
**सुवर्णाचळामाजि तें तेज फांके । तया पाहतां कीरणें दृष्टि झाकें ।।**

अशा या वैभवसंपन्न लंकानगरीत भीतीयुक्त वातावरण असल्याचे सांगताना ते लिहितात –

**'त्रिकुटाचळी मारुती सर्व पाहे । लघुरुप होऊनि तो हिंडताहे ।**
**गृहे गोपुरें पाहिल्या धर्मशाळा । आकस्मात त्या देखिल्या बंदिशाळा ।।'**

या लंकानगरीचे, तेथील वृक्षराजीचे, दऱ्याखोऱ्यांचे वर्णन म्हणजे प्रत्यक्ष लंकादर्शन डोळ्यांसमोर उभे करण्याचे काम रामदासांनी केले आहे.

समर्थांचे युद्धकांड १३०० श्लोकांचे आहे. सुंदर व युद्धकांड मिळून १४६२ श्लोक आहेत. सुंदरकांडात वीररस आहे. भुजंगप्रभात वृत्ताचा वापर आहे. यामध्ये राजनीतीची शिकवण असून सुंदरकांडातील मारुतीने लंकेत उडविलेले हलकल्लोळाचे वर्णन हौसेने व उल्हासाने रंगविले आहे. तसेच श्रीराम व वानरे यांच्या वियोगाचे दु:खही आहे. (अ.ना. देशपांडे : प्रा. म. वा. इति. भाग ५ वा, वृ. ३९५)

'लघुरामायण' यालाच लघुरामचरित्र म्हणतात. लघुरामचरित्र हे त्यांच्या पहिल्या पहिल्या काव्यापैकी एक असावे. रामभक्ती जनांत वाढविण्यासाठी हे १२५ ओव्यांचे सुंदर काव्य रचले आहे. रावणाच्या बंदिवासातील देवांचे वर्णन येथे येते. वानर व राक्षस यांच्या युद्धांच्या खणाखणीचे वर्णन यात येते.

- **मनाचे श्लोक**

हे छोटेखानी पण अत्यंत प्रभावी विचार प्रकट करणारे पुस्तक समर्थांच्या विचारांची व्यापकता स्पष्ट करते. माणसाचे मन हे अतिशय चंचल आहे. या चंचल मनालाच समर्थांनी 'सज्जन' ही उपाधी देऊन श्रेष्ठ स्थान दिले आहे आणि मनालाच सदाचाराचा उपदेश केला आहे. चंचल मनाला आवर घालून योग्य त्या विचारांनी आचरण करावे, पण ते करत असताना सतत भगवंताचे स्मरण ठेवावे अशी शिकवण त्यांनी समाजाला दिली. मनाला वळण लावणारे हे 'मनाचे श्लोक' लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनाच मार्गदर्शक आहेत. समाज मनाला बोध देणारे हे 'मनोबोध' २०५ श्लोकांत आहेत. त्यातून मोक्षार्थी साधकांना अचूक, ठाम व निर्णायक मार्गदर्शन होते. रामदासांच्या ओजस्वी, अस्खलित, प्रवाही व स्फूर्तिप्रद रचनेमुळे 'मनाचे श्लोक' अत्यंत लोकप्रिय बनले. यातील प्रत्येक श्लोक म्हणजे 'स्वानुभवाचे खडे तात्त्विक बोल' आहेत. यातून रामभक्ती, रामभक्तीचे सामर्थ्य, रामनाममहिमा असा भक्तिसंदेश आहे. संसाराला त्रस्त झालेल्यांना उभारी देण्यासाठी ते लिहितात –

१. ''जगी सर्व सुखी असा कोण आहे । विचारी मना तूंचि शोधून पाहे ।

२. मना त्वांचि रे पूर्वसंचीत केलें। तया सारिखे भोगणे प्राप्त झाले ।।''

३. 'मना श्रेष्ठ धारिष्ठ जीवी धरावे'.....

४. 'मना चंदनाचे परि त्वां झिजावें'

५. 'मरावे परि कीर्तिरुपे उरावे'

या बरोबरच रामनाम घ्या तो तारण्यास समर्थ आहे. त्यासाठी

'समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे ।'

असा धीर देत कर्मवादाला अनुसरा असा सल्ला देतात.

'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ पाहे ।'

अशा तऱ्हेने रामदासांच्या ओजस्वी प्रतिभेची ही 'मनाची शते' मनाची प्रसन्नता देऊन जीवनाची सार्थकता विशद करतात.

- **दासबोध**

विद्यार्थी मित्र हो ! 'आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वत: सिद्ध ।।' या समर्थांच्या वाचनाप्रमाणे समर्थांचा 'आत्माराम' असलेला 'दासबोध' या ग्रंथाचा परिचय येथे आपण करुन घेणार आहोत.

समर्थांची वाङ्मयीन मूर्ती म्हणते त्यांचा वीस दशकी 'दासबोध' होय. याची ओवीसंख्या ७७५१ असून त्याची रचना एकटाकी झालेली नाही. त्याचा रचनाकाल इ.स. १६३२ ते १६८१ (श. १५५४ ते १६०३) असा आहे. म्हणजे सुमारे ५० वर्षे याचे लेखन चालू होते. वेगवेगळ्या वेळी लिहिलेले समास एकत्र करून, दशकांमध्ये विभागून त्याची बांधणी मागाहून केली असावी. जुन्या दासबोधाचाही (एकवीस समासी) समावेश याच्या पहिल्या सात दशकांत झाला आहे. समर्थांचे दासबोधातील अनेक विषयांचे आध्यात्मिक श्रवण-मनन-चिंतन अनेक वर्षे चालले होते असे जाणवते.

दासबोधाच्या पहिल्या सात प्रकरणांमध्ये मायावादी वेदान्तच भरला आहे. दासबोधाने भागवतधर्मी नवविधा भक्तीचाच उपदेश केला आहे. तरी देखील त्यात 'विवेक व प्रयत्न' यावर जास्त भर आहे. दासबोधामध्ये समर्थांनी अनेक विषय हाताळले आहेत. प्रपंच, परमार्थ, व्यवहारज्ञान, ब्रह्म म्हणजे काय ? मायेचे स्वरूप कसे आहे; विवेकाचे आपल्या आयुष्यातील स्थान अशा अनेक विषयांची सांगोपांग चर्चा येथे पहावयास मिळते. मठ, महंत, राजकारण, व्यवहार यांच्या अनुरोधाने लौकिक विषय डोकावतात. प्रपंचनिष्ठा, व्यवहार, धर्म व राजनीती यांना दासबोधाच्या उत्तरार्धात मानाचे स्थान मिळाले आहे. त्यामुळे ''जुन्या दासबोधाची बैठक संताची, तर नव्या दासबोधाची (उत्तरार्धाची) महंताची आहे'' असे काही अभ्यासकांचे म्हणणे आहे. (प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप : ले. ह. श्री. शेणोलीकर पृ. १५३) परमार्थाची उपेक्षा न होऊ देता प्रपंचसिद्धीला पाठिंबा देण्याची एकनाथी परंपराच रामदासांनी येथे चालविली आहे. आविष्कारात मात्र रामदासी वेगळेपणा आहे.

दासबोधाची रचना गुरुशिष्य संवादाच्या धाटणीची आहे. शिष्यांच्या मनात वेळोवेळी उद्‌भवणारे प्रश्न, आशंका व आक्षेप यांना अनुलक्षून या ग्रंथातील निरुपण आहे.

''नाना किंत निवारिले। नाना संशयो छेदिले। नाना आशंका फेडिले। नाना प्रश्न।।'' अशी यातील लेखनसरणी आहे. 'त्यांनी या ग्रंथात इतक्या विविध विषयांचा तपशीलवार परामर्श घेतलेला आहे की, तो समर्थसंप्रदायाचा केवळ प्रमाणग्रंथच नव्हे तर लघुज्ञानकोशही आहे असे म्हणावयास हरकत नाही.' (रामदास दर्शन : संपादक : गंगाधर बाळकृष्ण सरदार : प्रथम आवृत्ती १९७२, पृ. २२)

**''ग्रंथ नाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद ।**

**येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग ।।**

**नवविधाभक्ती आणि ज्ञान । बोलिले वैराग्याचे लक्षण ।**

**बहुधा आध्यात्मनिरुपण । निरोपिले ।।''**

दासबोधांत भक्तिमार्ग स्पष्ट करून सांगितला आहे. अज्ञानाची किंवा भोळ्याभावाची भक्ती समर्थांना मान्य नाहीं. भक्ती डोळस असावी असे मानणारा हा ग्रंथ भक्तिज्ञानवैराग्याचा आहे. मात्र यातील मांडणी नावीण्यपूर्ण आहे. 'भक्तीचेनि योगें देव। निश्चये पावती मानव' हा या ग्रंथाचा अभिप्राय आहे.

रामदासांचे श्रवण-चिंतन-मनन आणि विचारांचे सार दासबोधात एकवटलेले आहे. आपल्या आचार-विचारांचे नरूपण रामदासांनी या ग्रंथात गुरुशिष्यसंवादात्मकतेमधून साधले आहे. ब्रह्माचे गूढ अत्यंत सहजपणे उलगडून दाखवले आहे. तसेच देहबुद्धीपेक्षा परमेश्वर हाच सर्वस्व आहे, हे जीवनाचे तत्त्वज्ञान त्यांनी दासबोधातून सांगितले आहे.

**सृष्टिपूर्वी सृष्टि चालता । सृष्टि अवघी संहारितां ।**
**शाश्वत देव तत्त्वता । आदिअंती ।।**
**म्हणोनी सृष्टि नाशवंत । जाणती संतमहंत ।**
**सगुणी भजावे निश्चित । निश्चयाकारणे ।।**
**सगुणाचेनि आधारें। निर्गुण पाविजे निर्धारें।**
**सारासार विचारें । सत्संगे ।।**

हे ज्ञान आपणास रघुनाथ भजनाने झाले आहे. त्यामुळे 'कर्ता राम मी नव्हें आपण । ऐसें सगुण निवेदन।....' मी कर्ता ऐसे म्हणसी । तेणे तूं दृष्टी होसी । रामकर्ता म्हणतां पावसी । यशकीर्तिप्रताप ।।' असे ते विनम्रभावनेने कार्य करण्याचा सल्ला देतात. दासबोधाचा आत्मा त्यांच्याच ओवीतून व्यक्त होतो तो असा-

'पहिले ते हरिकथानिरुपन । दुसरे ते राजकारण । तिसरे ते सावधपण सर्वविषयी ।।' आपल्या ग्रंथाचे वाचन, मनन, केल्यास फलश्रुति सांगताना ते म्हणतात -

**आतां श्रवण केलियाचें फळ । क्रिया पालटे तात्काळ ।**
**तुटे संशयाचे मूळ । येकसरां ।।**
**भ्रांतअवगुणी अवलक्षण । तेचि होती सुलक्षण ।**
**धूर्त तार्किक विलक्षण । समयो जाणती ।।**
**आळशी तेचि साक्षपी होती । पापी तोचि प्रस्तावती ।**
**निंदक तोचि वंदू लागती । भक्तिमार्गासी ।।**

ग्रंथाची ही फलश्रुती विचारणीय आहे.

माणसाने जीवन कसे जगावे, जीवनात काय करावे व काय करू नये हे सांगणारा ग्रंथराज म्हणजे समर्थांचा दासबोध होय.

ग्रंथ म्हणजे काय ? या संबंधीची समर्थांची संकल्पना पाहूया -

**''जेणें परमार्थ वाढे । आंगी अनुताप चढे । भक्तीसाधन आवडे । त्या नांव ग्रंथ ।।''**

**''जेणे धारिष्ठ चढे । जेणें परोपकार घडे । जेणे विषयवासना मोडे । त्या नांव ग्रंथ ।।''**

**''जेणे परत्रसाधन । जेणें ग्रंथे होय ज्ञान । जेणें होईजे पावन । या नाव ग्रंथ ।।''**

ग्रंथाच्या या व्याख्येचे उत्तम उदाहरण म्हणजे 'दासबोध' हा ग्रंथ होय. यात समर्थांनी आध्यात्मिक उन्नतीला निश्चित महत्त्व दिले आहे. समर्थांनी स्वत: आपल्या ह्या दासबोधाबद्दल सांगितले आहे की –

**'नका करु खटपट । पाहा माझा ग्रंथ नीट**

**तेणे सायुज्याची वाट । ठाई पडे '**

दासबोधात एकूण वीस दशक असून प्रत्येक दशकात दहा समास आहेत. एकूण दोनशे समास असून त्यात धर्मकारण, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, वाङ्मय, विज्ञान, व्यवस्थापन, कला, शिक्षण अशा जीवनाच्या सर्वच अंगाना स्पर्श झाला आहे. थोडक्यात 'दासबोध' हा मानवी आयुष्यविषयक तत्त्वज्ञानाचा उत्तम ग्रंथ आहे.

सद्गुरुच्या मार्गदर्शनाप्रमाणे आपण परमार्थाची वाट चालावी, असा उपदेश रामदासांनी १ ते ९ या दशकांत केला आहे. त्यासाठी 'विवेकयुक्त वैराग्य' सांगितले आहे. गुरुशिष्य योग्यता, लक्षणे सांगितली आहेत.

**जैसि नेत्री घालितां अंजन । पडे दृष्टीस निघान ।**

**तैसे सद्गुरुवचनें ज्ञान । प्रकाश होय ।**

**सद्गुरुचेनि अभयकरें। प्रकट होइजे ईश्वरे ।**

**संसार दु:खे अपारें। वासोनि जाती ।।**

**असो जयासी मोक्ष व्हावा । तेणे सद्गुरु करावा ।**

**सद्गुरुविण मोक्ष पावावा । हे कल्पांती न घडे ।।'**

असा सद्‌गुरु महिमा ते सांगतात. त्यांनी यातून सद्‌गुरुंची लक्षणे वर्णिलेली आहेत, त्याच बरोबर उत्तम शिष्य कोणता हे सांगताना ते लिहितात –

**''मुख्य सच्छिष्याचे लक्षण । सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण ।**

**अनन्यभावें शरण । त्या नांव सच्छिष्य ।।''**

त्यांनी मराठीचा अभिमान आणि काव्य लक्षणेही सांगितली आहेत. दासबोधातील परमार्थनिरुपण आणि वैराग्य विवेचन बहुधा आधीचे असावे तर समाजनिरीक्षण, व्यवहारबोध, प्रपंचमहिमा इ. बाबी तद्नंतरच्या असाव्यात.

उपासना, भक्तिभाव, वेदान्त, परमार्थ अध्यात्मविचार याला दासबोधात भरपूर वाव आहे. तर देहाचे सार्थक, महत्त्व, ज्ञानोत्तर भक्ती, आध्यात्मयोग – सद्‌गुरु – सच्छिष्य – सच्छास्त्र, शुद्धज्ञान, बद्ध, मुमुक्षू,

साधक, सिद्ध यांची लक्षणे, अध्यात्मज्ञानाचे महत्त्व, पंचभूतातील देवत्व, सृष्टीची उभारणी व संहारणी, उपासनेचे प्रकार, अंतरात्म्याची ओळख, निर्गुणनिर्विकल्प ब्रह्म, मोक्षाचे स्वरूप, युक्तांची लक्षणे इत्यादी विषयांवरून दासबोधाच्या अंतरंगाची कल्पना येते. जन्म-मृत्यू-जरा-व्याधीचे समर्थांनी केलेले वर्णन वैराग्यासाठी आहे. 'जन्म दु:खाचा अंकुर । जन्म शोकाचा सागर । जन्म भयाचा डोंगर । चळेना ऐसा ।।' पुढे या दशकात ते जन्म, देह, संसार यांचे भयानक वर्णन करतात. देहाबद्दल ते लिहितात - 'वरिवरि दिसे वैभवाचे । अंतरी पोतें तर्काचें । जैसे झाकण चर्मकुंडाचे ।' उघडतांच नये ।।' तर संसातील भयानकतेचे वर्णन करताना त्यांनी त्यातून तरूण जाण्यासाठी गृहस्थाश्रमाची स्तुती केली आहे.

**''नाना वेष नाना आश्रम । सर्वांचे मूळ गृहस्थाश्रम ।**

**जेथे पावती विश्राम । त्रैलोक्यवासी ।।**

**या कारणे गृहस्थाश्रम । सकळांमध्ये उत्तमोत्तम ।**

**परंतु पाहिजे स्वधर्म । आणि भूतदया ।।**

देहनिंदा, संसारनिंदा समर्थांनी दासबोधामध्ये केली असली तरी तो त्यांचा उपदेश नाही. नरदेहाची स्तुतीही त्यांनी केली आहे. परमार्थ साधनेसाठी नरदेह उत्तम पाहिजे असे त्यांना वाटते. 'देहाकरितां सकळ कांही । देहाविना कांही नाही । कारण - 'देह परलोकींचे तारु । नाना गुणांचा गुणागरु । नाना रत्नांचा विचारु देहाचेनी ।। देय ब्रह्मांडाचे फळ । देह दुर्लभचि केवळ ।।''

दासबोधात वैराग्य निरुपणाबरोबर व्यवहारकथन येते, प्रयत्नवाद येतो, 'म्हणोन आळस सोडावा । रत्न साक्षेपें जोडावा । दुश्चितपणाचा मोडावा । थारा बळे ।' 'आलस्य अवघाच दडवावा । यत्न उदंडचि करावा। शब्दमत्सर न करावा । कोणी एकाचा ।' असा ते प्रयत्नवाद सांगतात. त्यासाठी 'एकाग्र करुनिया मन । बळेचि करावें साधन । यत्न आळसाचें दर्शन । होऊंचि नये ।। अवगुण अवघेचि सांडावे । उत्तम गुण अभ्यासावे । प्रबंध पाठ करीत जावे । जाड अर्थे ।।

समर्थांनी प्रपंचाचे सामर्थ्य सांगून उपदेश केला आहे. ''आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका ।' प्रपंच सोडून परमार्थाची वाट करंटपणाचीच असते असे ते सांगतात. पण लगेच प्रापंचिकास सावधानतेचा इशारा देताना -

'परमार्थ सोडून प्रपंच करिसी । तरी तूं यमयातना भोगिसी' असे आवजूर्न सांगतात. रामदास जीवनातील साध्या वाटणाऱ्या गोष्टीतही साक्षेपाने उपदेश करात - 'सुंदर अक्षर, नेमस्त वाचन, अभ्यास यांबद्दलही विवेचन येते. कवित्व कसे असावे याबद्दल ते लिहितात -

**'कवित्व असावे निर्मळ । कवित्व असावे सरळ ।**

**कवित्व असावे प्रांजळ । अन्वयाचें ।।**

**व्युत्पत्तीहीन तर्कहीन । कलाहीन शब्दहीन ।**

**भक्तीज्ञान – वैराग्यहीन । कवित्व नसावें ।।'**

पाल्हाळिक, हीनवृत्तीचे दोषयुक्त काव्य नसावे. भक्तीज्ञानवैराग्यरहित कवित्व नसावे असे ते सुचवितात.

अशा अनेकविध विषयावरील मते-उपदेश यांचे ज्ञान भांडार असणारा दासबोध हा ग्रंथ आहे. म्हणून 'दासबोध हे काव्य नसून एक मोठे विचार भांडार आहे.' असे ज्ञानकोशकार डॉ. केतकर 'महाराष्ट्रीयांचे काव्यपरिक्षण (आवृत्ती दुसरी : पृ. ७९) मध्ये म्हणतात, ते उचित वाटते.

'दासबोधात' प्रसंगोपात उपदेश आहेच. 'उत्तम पुरुषनिरुपण' या समासातून आदर्श पुरुषाची लक्षणे मनावर उमटवतात.

उत्तम पुरुष लक्षणे सांगताना ते लहितात –

**''शरीर परोपकारी लावावें । बहुतांच्या कार्यास यावें ।**
**उणें पडों न द्यावे । कोणी एकाचें ।''**

**''दुसऱ्याचे दु:खें दु:खी व्हावे । परसंतोषे सुखी व्हावें ।**
**प्राणीमात्रास मेळवून घ्यावे बरव्या शब्दें ।''**

**''आळस अवघाच दवडावा । रत्न उदंडचि करावा ।**
**शब्दमत्सर न करावा । कोणी एकाचा ।''**

**''उत्तम गुणी शृगारिला । ज्ञानें वैराग्यें शोभला ।**
**तोचि एक जाणावा भला । भूमंडली ।''**

असे ते उत्तम पुरुषाची लक्षणे सांगून, त्याप्रमाणे वागा असा सल्ला देतात. तर 'मूर्खलक्षणनामांतून' मुर्खांची यादी देवून मूर्खपणा त्याज्य कसा हे ठरवितात. समर्थांनी मूर्ख लक्षणे अपार असल्याची सांगितली आहेत.

**''विद्यावैभव ना धन । पुरुषार्थ सामर्थ्य ना मान ।**

**कोरडाच वाहे अभिमान । तो एक मूर्ख ।।**

**पुत्र कळत्र आणि दारा । इतुकाचि मानूनीयां भारा ।**

**विसरोन गेला ईश्वरा । तो एक मूर्ख ।।**

**देवद्रोही गुरूद्रोही । मातृद्रोही पितृद्रोही ।**

**ब्रह्मद्रोही स्वामिद्रोही । तो एक मूर्ख ।।''**

मूर्खपणा सोडून उत्तमगुणांचा अंगिकार करावा. त्यासाठी शहाणपणाचा उपदेश करून उत्तमगुण सांगितले आहेत.

**''सुखा अंग देऊ नये । प्रेत्न पुरुषें सांडूं नये ।**

**कष्ट करितां त्रासों नये । निरंतरा ।।**

असा प्रयत्नवाद सांगतात.

दासबोधाच्या उत्तरार्धात 'प्रपंच करावा नेटका' असा व्यावहारिक सल्ला देतात. प्रपंचातच परमार्थ साधायचा सल्ला देतात.

**'संसार मुळीच नासका । विवेके करावा नेटका'** त्यासाठी ते

'यत्न तो देव जाणावा । अंतरी धरिता बरे' असा प्रयत्नवाद सांगतात. दुसऱ्यावर विसंबून न राहता संसार करत देहाची सार्थकता म्हणजे 'परमार्थ' जाणावा असा ते सल्ला देतात.

तसेच काळाबद्दलच्या जागरूकतेची व राजकारणविषयक परिस्थितीची जाणीव करून देतात. म्लेछांचे – फितवेखोरांचे राज्य उलथून टाकावें. 'जयास जिवाचे वाटे भय । त्याने क्षात्रधर्म करु नये ।' असा पुरुषार्थ जागा करण्याचा प्रयत्न रामदासांनी केला आहे. तर 'देवद्रोही तितुके कुत्ते । मारुनि घालावे परते ।' यासाठी समाजसंगठन आणि सामजजागरण करावे. त्यासाठी 'जितुके काही आपणास ठावे । तितुके इतरांसी शिकवावे। शहाणे करून सोडावे । सकळ जन ।। या जागृतीसाठी विवेकाचे राजकारण असले पाहिजे, त्यातून बहुतांची अंतरे राखावीत. प्रसंगी जशास तसे वागावे हे सांगण्यासाठी 'काटीने काटी झाडून काढावी' असा रोखठोक सल्ला ते देतात. लोकाश्रय मिळविण्यास 'चळवळ फार महत्त्वाची आहे हे सांगताना 'सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे । अधिष्ठान पाहिजे । भगवंताचे ।। असे सश्रद्ध चळवळीचे महत्त्व विशद करतात. या बरोबरच त्यांनी 'आस्मानी सुलतानी', 'परचक्रनिरुपण', 'आनंदवनभुवन', 'रामवरदायिनी', 'जुनाटपुरुष, चौदा ओवीशते ही स्फूट काव्येही लिहिली आहेत. त्याचाही अभ्यास आपण पुढे करणार आहोत.

- **स्फुट प्रकरणे**

रामदासांची कविता अत्यंत समृद्ध असून त्यात ६९ स्फूट प्रकरणे आहेत. कविता रचने हा रामदासांच्या जीवनसाधनेचा स्वाभाविक आविष्कार होता. या कविता अनेक विषयांवरच्या आहेत. रामदासांच्या कविता अध्यात्माशी जवळीक साधतात, तर काही कवितातून जोरकस व व्यापकपणे प्रयत्नवादाचा पुरस्कार केला आहे. तसेच काही स्फुट प्रकरणांत लोकसंग्रहाचे अपरंपार महत्त्व विशद केले आहे. मातृगौरव, तुळजाभवानी प्रार्थना, परब्रह्म वर्णन, महंत उपदेश असे अनेक विषय यांमध्ये समाविष्ट आहेत. त्यामधील काही स्फुट प्रकरणांचा येथे परिचय करून घेऊया.

तीर्थयात्रा प्रसंगी समर्थांना दिसलेल्या उद्विग्न समाजाचे चित्र 'अस्मानी सुलतानी' या स्फुटप्रकरणात येते. सर्व समाज आपल्या आचारधर्मापासून आचारभ्रष्ट झाला आहे. सर्व समाजात शिरजोरी माजली होती. लोक

पापपुण्याचा विचार न करता भ्रष्ट व्यवहार करु लागले. अशा भ्रष्ट सांस्कृतिक जीवनाचे, समाजाचे चित्रण वस्तुनिष्ठतेने येथे व्यक्त होते. रामदासांनी 'अस्मानी-सुलतानी' या प्रकरणातून निसर्गप्रकोप व नृपतिप्रकोप यांचे उग्रभीषण दृष्ट तांडव मांडले आहे. त्यातील धगधगती तळमळ वाचकास अस्वस्थ करते.

**'देश नासला नासला उठे तोचि कुटी । पिकें होतांचिं होतांचि होती लुटालुटी।**

**काळाकरिता जिवलगां जाली तुटातुटी । अवघ्या कुटुंबा कुटुंबा होतें फुटाफुटी।**

किंवा परचक्राच्या अस्वस्थ वातावरणाने

**'यऊ पळाले पळाले दूरी देशा गेले । बहु कष्टले कष्टले तेथें नागवले ।**

**फिरोनि आले रे आले रे घरीचे लोक मेले । कोठे उपाय दिसेना कासावीस जाले ।।**

असे रामदास टाहो फोडताना दिसतात. त्याचप्रमाणे 'परचक्रनिरुपणातही हेच विषय मांडले आहेत.

**येणे करिता बहुतांला । संकट जाले।।**

**माणसा खावया अन्न नाही । अंथरूण पांघरूण तेंही नाही ।**

**घर कारावया सामग्री नाही । काय करिती ।।''**

'पदार्थ मात्र तितुका गेला। नुसता देशचि उरला' परचक्रामुळे निर्माण झालेल्या सामाजिक परिस्थितीचे चित्र यात येते. 'सामाजिक जीवनात रामदासांना दिसलेली निराशा, विषण्णता येथे वर्णिली आहे. रामदासांनी 'आनंदवनभुवन' हे प्रकरण तीर्थाटनाहून परत आल्यावर लिहिले असावे. कृष्णातीरी परतल्यावर समर्थांना उद्याच्या महाराष्ट्राचे जे दिव्य दर्शन घडले, त्याचे हे चित्र समजावयास हरकत नाही. 'आनंदवनभुवनी' हे 'श्रीवनभुवनी' या नावाने प्रसिद्ध आहे. 'आनंदवनभुवन' म्हणजे 'काशी' त्याला दुजोरा 'रामगंगा', 'विद्यापीठ', तसेच देहत्यागासी येणे हो। आनंदवनभुवनी ।' यातून व्यक्त होत असला, तरी आनंदवनभुवन म्हणजे महाराष्ट्र (नाशिक ते करवीरपर्यंतचा मुलूख) असा अर्थ समर्थांना अभिप्रेत असावा असे वाटते. येथे महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न दिसते. 'बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळावले । अभक्तांचा क्षयो झाला । आनंदवनभुवनी ।। असे समर्थ स्वप्न पाहतात. या काव्यातून समर्थांची सूक्ष्म निरीक्षणशक्ती, जागृतता, धर्मकल्पना आणि दृष्टपणा प्रकटतो. आनंदवनभुवन काव्य म्हणून अनेकांनी गौरविलेले आहे. समर्थांनी मनोमन पाहिलेले उद्याच्या महाराष्ट्राचे उज्ज्वल भविष्याचे हे आशावादी चित्र आहे. 'रामवरदायिनी' हे प्रतापगडाच्या भवानीदेवीस अनुलक्षून म्हटलेले स्तोत्र इ.स. १६७८ (श. १६००) मध्ये रचले आहे. समर्थ प्रतापगड आणि तुळजापूरच्या भवानीस 'रामवरदायिनी' संबोधतात. ही समर्थांची कुलस्वामिनी होती. या कुलस्वामिनीस ते म्हणतात - 'तुझा तू वाढवी राजा । शीघ्र आम्हासी देखता' या मागणी बरोबरच 'रोकडे काही । मूळ सामर्थ्य दाखवी ।' अशी प्रार्थनाही करतात. यातून तुळजाभवानीबद्दलची श्रद्धा, तसेच शिवाजीराजेंबद्दल त्यांच्या कर्तृत्वाबद्दल आस्थाही व्यक्त होते.

**भीमरुपी स्तोत्रे**

समर्थांचे भीमरुपी स्तोत्र हे अत्यंत स्फूर्तिदायी आणि मार्गदर्शनपर असेच आहे. समर्थांनी आपल्या दैवताचे वर्णन करणारी, स्तुती करणारी अशी तेरा मारुती स्तोत्रे लिहिली. या स्तोत्रांमधून स्फूर्ती मिळतेच, तसेच निर्भय आणि पराक्रमी मारुतीरायांचा आदर्श डोळ्यांसमोर उभा राहतो. समर्थांनी या पद्यांतून प्राधान्याने त्याच्या भीमपराक्रमाचेच चित्रण केलेले आहे. अन्यायाचा प्रतिकार, पराक्रम, बलोपासना या विषयांनाच समर्थांनी वेळोवेळी काव्यातून व्यक्त केले आहे. तत्कालीन परिस्थिती ही या स्तोत्रांची निर्मितीप्रेरणा होती. महाबली मारुतीचे वर्णन करताना प्रभंजना, महाबली, महारुद्रा, दीनानाथ, हरीरुपा, लोकनाथा, जगन्नाथा अशा अनेक ओजस्वी विशेषणांचा ते वापर करतात. लयबद्धता, प्रत्ययकारी वर्णनपद्धती आणि श्रद्धायुक्तभक्ती यांमुळे त्यांची ही हनुमंताविषयीची स्तोत्रे, पद्ये जनमानसात प्रभावी ठरली आहेत.

साधुसंतांच्या, गोसाव्यांच्या चमत्कार कथांचे व त्यावर विश्वास ठेवणाऱ्या जनस्वभावाचे चित्रण 'जनस्वभाव गोसावी' या मध्ये येते. 'जुनाटपुरुष' मध्ये विश्वाची जन्मकथा 'जुनाटपुरुष' या रुपकाच्या माध्यमातून व्यक्त होते.' 'निर्गुणध्यान' हे श्रीरामाच्या सगुण रुपावर केलेले निर्गुणाचे रुपक आहे. चाफळच्या मठात आपल्या शिष्याकडे जी नित्यनैमित्यिक कर्मे समर्थांनी सोपविली होती त्याचे वर्णन आणि शिष्यांना केलेला उपदेश म्हणजेच 'मानसपूजा' होय. रामदासांनी लिहिलेली ही स्फुट प्रकरणे बहुतांशी आध्यात्मिक स्वरूपाची आहेत. 'चौदा ओवीशते' हे १०० ओव्यांचे एक शत याप्रमाणे यात १४ ओवीशते आहेत. दासबोधातीलच विषय यात येतात.

आध्यात्मिक लेखनाबरोबरच रामदासांनी काही ऐतिहासिक प्रकरणेही लिहिलेली आहेत. शिवरायांना पाठविलेल्या पत्रात त्यांच्या मनातील शिवरायांबद्दलचे मनोज्ञभाव उत्तम रीतिने प्रतिबिंबित झाले आहेत.

**'निश्चयाचा महामेरु । बहुत जनासी आधारु ।**
**अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ।।**
**'यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।**
**पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ।।'**

या जाणता राजाबद्दलच्या आत्मीयतेतूनच समर्थांनी हे पत्र लिहिले. कारण 'राजकारण उदंड दाटले । तेणें चीत विभागलें । प्रसंग नस्तां लिहिले । क्षमा केलें पाहिजे ।।

१५ ओव्यांच्या या काव्यातून त्यांनी शिवाजी महाराजांच्या कार्याबद्दलचा गौरव व्यक्त केला आहे.

संभाजी महाराजांना रामदासांनी लिहिलेल्या पत्रातही जाणता राजा म्हणून शिवाजी महाराजांचाच आदर्श ते त्यांच्यापुढे ठेवतात – 'शिवराजास आठवावे । जीवित तृणवत मानावें' 'बहुत लोक मेळवावे । एक विचारे भरावे । कष्ट करोनि घसरावें । म्लेच्छावरी ।।' 'महाराष्ट्र राज्य करावे । जिकडे तिकडे' असा संगठन कौशल्याचा पराक्रमाचा, राजकारणाचा सल्ला देतात.

समर्थांनी अनेक प्रकारचे काव्य लिहिले. असंख्य धाट्या, पदे, भूपाळ्या, डफगाणी, आरत्या, स्तोत्रे, गीते लिहिली. त्यांचा पिंड अध्यात्माचा असला तरी त्यांच्या समाजाभिमुखतेमुळे ते इतर संतांपेक्षा वेगळे ठरतात.

## • रामदासांच्या वाङ्मयाचे विशेष

रामदासांच्या शिकवणीत प्रवृत्ती आणि निवृत्ती दोन्ही आढळतात

**'प्रवृत्ती सासुरे निवृत्ती माहेर । तेथे निरंतर मन माझे ।**

**माझे मनीं सदा माहेर सुटेना । सासर तुटेना काय करु ।।'**

ही रामदासांची मानसिकता आहे. रामदासांनी आपल्या बहुतेक ग्रंथातून अध्यात्मनिरुपण केले आहे. पण बऱ्याच ठिकाणी त्यांनी तत्कालीन देशकालस्थितीचे वास्तव चित्रही रेखाटले आहे. प्रपंचविज्ञान, वळणदार अक्षर, मराठा तितुका मेळावा । महाराष्ट्र धर्म पाळावा । अशा अनेक विषयांना सहजी गवसणी घालणारे हे उत्तुंग व्यक्तिमत्त्व होते. तरीही रामदासांची करुणाष्टके सोडल्यास रामदासांच्या काव्यात काही दोषही आहेत. या दोषांपेक्षा त्यांनी केलेले लोकसंग्रहाचे काम, बलोपासनेची उपासना, हरिभक्ती, प्रपंचविज्ञान, अखंड सावधपणा सांगणारे राजकारण, प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड यातून त्यांनी केलेली समाजजागृती हे त्यांचे कार्य मोठेच आहे. त्यांनी काही हिंदी काव्यरचनाही केली आहे. त्यांच्या वाङ्मयाचे विषय येथे आपण पाहुया.

समर्थ रामदासांनी विपुल वाङ्मयरचना केली असली तरी त्यांची मूळ भूमिका ग्रंथकाराची किंवा कवीची नाही; तर ती प्रचारकाची आहे. (प्रा. म. वा. स्वरूप : ह. श्री. शेणोलीकर, सहावी आवृत्ती, पृ. १५३) त्यांचा लेखन व्याप प्रचंड आहे. 'माया ब्रह्मलक्षण' या सारख्या तात्त्विक विषयापासून 'बाग कशी असावी' आक्षर कसे घटवावे', 'इमारत कशी बांधावी' अशासारख्या व्यवहारिक विषयांपर्यंत अनेक तऱ्हेचे विषय त्यांनी हाताळले आहेत. रामदासांची काव्यदृष्टीच स्वतंत्र आहे. रामदासांच्या ओवीबद्ध रचनेत गद्याचे आणि वक्तृत्वाचे सारे गुणदोष एकवटले आहेत.

त्यांच्या वाङ्मयात डळमळीतपणा, गुळमिळीतपणा, औषधालाही नाही. उलट पाल्हाळ आणि पुनरुक्ती मात्र आढळते. रामदासांच्या गंभीर, करारी व कणखर स्वभावधर्माप्रमाणे त्यांच्या एकंदर वाङ्मयाचे रुप आहे. म्हणजेच त्यांचे वाङ्मय गंभीर प्रकृतीचे आहे. त्यात प्रासादमाधुर्यादी ललित गुण नाहीत. समर्थांच्या वाङ्मयात भावनांच्या उद्रेकापेक्षा अनुभवाचा, विचारात्मकतेचा परिपाक आहे. त्यात स्पष्टता, तर्कशुद्धता आणि निश्चयाचा अंगिकार दिसतो. रामदासांना सौंदर्यगुण, रसिकतेची कल्पना असूनही त्यांनी आपल्या वाङ्मयात कल्पना, भावना आणि भाषा यांच्या कौतुकापेक्षा विचारांच्या सामर्थ्यावर भर दिला आहे. त्यामुळेच त्यांचे काव्य 'मृदू, मंजुळ, कोमल' यापेक्षा 'भव्य, अद्भुत, विशाल' असे आहे. म्हणूनच दासबोधात दरारा उत्पन्न करणारी प्रौढ आणि प्रगाढ अशी अधिकार वाणी आहे. तसेच काही वेळा शब्दालंकारांचा खेळही त्यातून प्रकट होतो. रामदासांना कविता लेखनाचा अनावर छंद होता. काहीवेळा शब्दांच्या सौंदर्याकडे किंवा शुद्धतेकडे लक्ष देण्याची त्यांना गरज वाटत नसे. व्याकरण किंवा शुद्धलेखन यांची काव्यगुणाप्रमाणेच पर्वा न करता ते बेधडक नवे शब्द बनवीत. काही व्याकरण दृष्ट्या सदोषता त्यांच्या ओवीत दिसते. त्यांच्या काव्यावर ओबडधोबड, राकटपणाचा आक्षेप घेतला गेला, तरी त्यांचे काव्य ओजस्वी, भेदक, उत्कट, सकस सुभाषितदर्जा असलेले असून, त्यातून विचारांची सूत्रबद्धता, ठाशीव भव्यता दिसते. त्यांच्या लेखनात जनहिततळमळ व रामभक्तीचा आंतरिक ओलावा ठायी ठायी जाणवतो. प्रयत्नवादाचा, प्रपंचविज्ञानाचा ठोस पुरस्कार करणारे संत म्हणून त्यांच्या साहित्याचा वेगळा ठसा उमटतो.

## • अन्य धर्मीयांची मराठी रचना

भारतातील अर्थातच महाराष्ट्रातील संतांचे, भक्तांचे कर्तृत्व हे इस्लामच्या आक्रमणाच्या पार्श्वभूमीवर प्रकट झालेले आहे. गझनीच्या महंमदाने केलेले झंझावती आक्रमण, अकबराच्या काळातील मुसलमान शासनाचा झालेला परमोत्कर्ष, औरंगजेबाच्या काळात मुसलमान सत्तेचा अपकर्ष हा इस्लामी अधिपत्याचा काळ आणि भारतातल्या भक्तिमार्गाच्या उठावाचा, उत्कर्षाचा कालखंड होय. त्याही आधी भारतात भक्तिमार्ग होताच, पण त्याला खरी भरती इस्लामी कालखंडात आली. हे भक्तीचे आंदोलनच होते आणि ते देशपातळीवर होते. इ.स. १३५० पासून इ.स. १६०० पर्यन्तच्या या काळात एकनाथ ते मुक्तेश्वरापर्यंत मराठी संतांनी अनेक प्रकारचे वाङ्मय निर्माण केले आहे.

प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासकारांनी आजपर्यंत ठराविक पंथातील पंथीय वाङ्मयायचीच तेवढी दखल घेतलेली दिसते. जैन, लिंगायत, मुस्लिम ख्रिश्चन इत्यादी अन्य धर्मीयांनीही मराठीत काही रचना केली असली तरी संशोधनाच्या अभावी ती दुर्लक्षितच राहिली आहे. याबद्दलची माहिती आपण घेऊया.

जैन व लिंगायत धर्मीयांचे मराठीतील अवतरण पंधराव्या शतकापासूनच झालेले दिसते. मुस्लिम व ख्रिस्ती धर्मीयांची मराठी वाङ्मय निर्मितीही याच सुमारास आढळते.

## • इस्लाम धर्मियांची मराठी रचना

इस्लाम धर्मातील सूफी पंथीयांच्या द्वारा महाराष्ट्राला इस्लाम धमाची तत्त्वे यादवकालापासूनच परिचित झाली होती. इस्लामच्या धार्मिक व सांस्कृतिक प्रचाराला बहामनी राजवटीपासून मुस्लिम राज्यकर्त्यांचे चांगले पाठबळ मिळाले. सूफींचे मठ उभारले (खानका), गुरुंच्या समाध्या (वर्णे) उभारल्या गेल्या. जत्रा-उरुस यातून हिंदूंना आपल्या धर्माकडे आकर्षित केले गेले. यात सूफी आणि भक्तिमार्गी संतमंडळी यांचा संबंध येत गेला आणि सूफीवरही हिंदू तत्त्वज्ञानाचा, आचारधर्माचा प्रभाव पडू लागला. निर्गुण निराकारी ब्रह्मवादाचे आकर्षण वाटू लागले. त्यातून शहा मुंतोजी ब्रह्मणी, हुसेन अंबरखान, अलमखान व शेख महंमद इ. इस्लामधर्मी साधुसंतांचे मराठी वाङ्मय निर्माण झाला.

**• हुसेन अंबरखान :** (इ.स. १६०३ - १६५३ / श. १५२५-१५७५) हुसेन अंबरखान हा भगवद्गीतेचा मुसलमान भाष्यकार होय. इ.स. १६३० मध्ये रचलेली त्याची गीताटीका 'अंबरहुसेनी' टीका म्हणून प्रसिद्ध आहे. यात त्यांनी कुळाची परंपरा दिली आहे. ही टीका म्हणजे 'गीताभावार्थदीपिका' आहे असे तो लिहितो. ७८१ ओव्यांचे हे काव्य 'भाष्य शंकराचार्यांचे आणि व्याख्यान श्रीधरस्वामींचे' असे तो वर्णितो. मूळ संस्कृत शब्दाला नेमका मराठी शब्द योजना तो करतो. त्यातून संस्कृतचा व्यासंग जाणवतो. पूर्वसूरींची गीताभाष्ये यांचे त्याचे वाचन दिसते. आत्मगौरवही केला आहे. स्वत:ला 'जगद्वंद्य' म्हणवतो.

**• शेख महंमद :** हा कबीराचा महाराष्ट्रातील अवतार, अशी लोकश्रद्धा आहे. (अ.ना. देशपांडे : प्रा. म. वा. इति. भाग ३ पृ. १२४ इ.स. १५६० ते १६६०) 'ज्ञानाचा एका, नामाचा तुका, तसा कबिराचा सेखा' असा मराठीत वाक्यप्रचार रुढ आहे.

दत्तावतारी चांद बोधले. संस्कारांनी हिंदू, गुरुपरंपरेने सूफी होते. त्यांची परमार्थ दृष्टी उदार व समन्वयशील होती. त्यांनी शेख महंमदला इस्लामचे शाश्वत मर्म सांगून त्याला अविरोधी असे हिंदू अध्यात्मज्ञान उपदेशिले. शेख महंमदाने हिंदी, उर्दू, फारसी भाषातही रचना केली आहे. मराठीतील रचना आपण येंथे पाहुया.

'योगसंग्राम' (इ.स. १६४५) शेख महंमदाचा हा तत्त्वज्ञानप्रधान ग्रंथ. ज्ञानेश्वरीच्या संस्कारातून योगसंग्रमात आत्मायोद्धा, मनाच्या घोड्यावर स्वार होऊन अहंकाराच्या सैन्याशी युद्ध करतो व त्यावर विजय मिळवून ब्रह्मांडाचे शिखर जिंकतो हे रुपक आले आहे.

शेख महंमदाची निगुर्ण – निराकारावरच भक्ती होती. त्यामुळे मूर्तिपूजा, नवस, बळी या खुळचट धर्मकल्पनावर व दोन्ही जमातीतील लोकांच्या अंधश्रद्धेवर कबिराप्रमाणेच कठोर आघात स्वत:च्या काव्यरचनेतून केला आहेत. म्हणून मुस्लिम त्यास 'काफर' समजत. तर हिंदू 'मूर्तिभंजक' मानत. शूद्रदैवतोपासनेचा त्यांनी धिक्कार करून सद्‌गुरुसेवा, नामस्मरण व हरिकथाश्रवण यांच्याशी योगसाधनाची सांगड घातली आहे.

'पवनविजय' : संस्कृत ग्रंथाचा हा मराठी अनुवाद आहे. ३ खंड, ४८२ ओवीसंख्या आहे. वैद्यक, ज्योतिष इ. शास्त्रासंबंधी माहिती आहे. 'निष्कलंक प्रबोध' हा अभंगात्मक ग्रंथ अपूर्ण आहे. यात ३०० चरण आहत. हिंदु-मुसलमानांच्या आचारधर्मातील बाह्य अवडंबनावर टीका, शूद्र देवतोपासनावर टीका करून परमार्थ मार्गाचे मर्म सांगितले.

## ख्रिस्त धर्मीयांचे मराठी वाङ्मय

ख्रिस्तधर्मीय प्रचारकांनी त्यांच्या धर्मप्रचारार्थच या कालखंडात मराठी वाङ्मय निर्मिती केली. गोव्यात पोर्तुगीजांची राज्यसत्ता आली तेव्हां अनेकांना ख्रिश्चनधर्म स्वीकारायला भाग पाडले गेले असावे. या स्थानिक ख्रिश्चनांच्या उपयोगासाठी म्हणून ख्रिस्ती संत-महंतांची महात्म्ये वर्णन करणारी पुराणरचना फादर स्टीफन्स, फादर क्रुवा इ. तत्कालीन मराठी / कोकणीत केलेली दिसते. ख्रिस्ती धर्मप्रचारकांनी स्थानिक मराठी शिकावी व प्रचारार्थ मराठी पुस्तिका लिहाव्यात म्हणून येथील ख्रिस्ती परिषदांनी तसे धोरण स्वीकारलेले दिसते.

• **फादर स्टीफन्स :** (इ.स. १५४९ – १६९९) हा ख्रिस्ती मिशनरी २४ ऑक्टोबर १९७९ ला गोव्यात आला. फादर स्टिफन्स हे हिंदुस्थानात आलेले पहिले इंग्रज गृहस्थ. ४० वर्षे ख्रिस्तीधर्म प्रचारकाचे काम केले. कोकणी भाषेवर प्रभुत्व मिळवून कोकणी मराठीचे व्याकरण पोर्तुगीज भाषेत त्यांनी लिहिले.

• **(क्रिस्त) ख्रिस्त पुराण :** (इ.स. १६१४) दहा हजाराहून अधिक ओव्या असून एकूण २५ सर्ग यात आहेत. ख्रिस्ताची कथा हा या पुराणाचा विषय आहे. हिंदू धर्मदेवता यांच्या धर्तीवरच येथील ख्रिस्ताची कथा सांगितलेली आहे. 'क्रिस्त पुराणा'ची प्रस्तावना म्हणजे नाथकालीन मराठी गद्याचा प्रातिनिधिक

अवतार म्हणण्यास हरकत नसावी. मूळ पोर्तुगीज पुराणाला मराठी वेश चढविण्याची फादर स्टीफन्स यांची कामगिरी कौतुकास्पदच आहे. हे पुराण प्रथम रोमन लिपीत लिहून नंतर त्याचे देवनागरीकरण झाले. ख्रिस्तपुराणाचे स्वरूप हे हिंदू पद्धतीच्या ग्रंथाप्रमाणे आहे. हा ग्रंथ बायबलवर आधारित आहे. पण हे बायबलचे भाषांतर नाही. 'पैले पुराण' ओव्या ४१८१, 'दुसरे पुराण' ओव्या६७८१ अशा दोन भागात हा ग्रंथ असून ओवी छंदात आहे. दुसऱ्या भागात ख्रिस्तचरित्र येते. या ग्रंथातील कथाभाग, विचार कल्पना परकी असली तरी रचनापद्धती व भाषा इकडची आहे. ख्रिस्ती मराठी वाङ्मयाचा आरंभबिंदू म्हणून या पुराणालाच मान द्यावा लागतो. ख्रिस्तपुराण हा दहा हजाराहून अधिक ओव्यांचा ग्रंथ साहित्यिक व भाषिक दृष्टीने मराठी साहित्यात महत्त्वाचा ठरतो. तसेच लेखक फादर स्टीफन्सने लिहिलेली गद्य प्रस्तावना म्हणजे समकालीन गद्याचा एक चांगला नमुना म्हणावा लागेल.

• **फादर क्रुआ :** (पाद्री एतिन-द.ला क्रुआ) हा इ.स. १६०९ म्हणजे श. १५२४ मध्ये भारतात आला. याने सेंट पीटरच्या जीवनावर 'महापुराण' रचले. हा ग्रंथ तीन खंडात विभागला गेला आहे. यामध्ये हिंदूंच्या देवता आणि आचार यावर कडक टीका केली आहे. श्रीरामाला स्त्री घातकी, कृष्णाला कळलाव्या, परशुरामाला मातृघ्न, तर विष्णुला पापाचारी म्हटले आहे.

एकंदर ख्रिस्तीधर्मीय मराठी साहित्याचा विचार करता. ख्रिस्ती धर्माचा प्रसार तत्त्वज्ञान आणि आचारधर्म तसेच ख्रिस्त धर्मसंस्थापकांचा मराठीतून परिचय यातून झाला. ही मराठी वाङ्मयात परधर्मीय कवींनी भर घातली आहे.

## १.४ शब्दार्थ आणि टिपा

आकळेना - आकलन होत नाही, अनुभवास येत नाही; अचपळ - उत्पाती, खोडकर, अनहित - अहित; अवचट - अनपेक्षित प्रसंग, उच्चाट - त्रास; कटक - सैन्य; किळा - प्रभा; कोंवसा - कैवारी; जळधर - मेघ; तूक - वजन; सर्व कोंदाटले - सर्वत्र खच्चून भरले आहे; शुद्ध नेमस्त राहो - पवित्र प्रेमळ व सौम्य असावे; दुराशा - दुष्ट वासना; देशाउर - भिक्षाटन; वायचाळा - व्यर्थ बडबड; समंधु - संबंध, श्रीति - चिंता, पर्वा, फिकीर, ची ची घडो - छी थू होते, छपहास; विवर्णे - पृथ:करण, कूसरी - कुशलता, चातुर्य; आडळेना - आढळत नाही; संग - आसक्ती.

## १.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न आणि उत्तरे

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. रामदासांचा जन्म कोणत्या गावी झाला ?

२. 'अस्मानी सुलतानी' व 'परचक्र निरुपणा' या प्रकरणातून रामदासांनी कशाचे चित्रण केले आहे?

३. रामदासांचे मूळ नाव कोणते ?

४. अस्मानी सुलतानी हे प्रकरण कोणाचे ?

**उत्तरे** १. रामदासांचा जन्म जांब गावी झाला.

२. 'अस्मानी सुलतानी' व 'परचक्र निरुपण' या प्रकरणातून रामदासांनी समाजाच्या भ्रष्ट सांस्कृतिक जीवनाचे चित्रण केले आहे.

३. रामदासांचे मूळ नाव 'नारायण' होते.

४. 'अस्मानीसुलतानी' हे प्रकरण समर्थ रामदासांचे आहे.

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. रामदासांच्या वाङ्मयीन कार्याचे वेगळेपण सोदाहरण सांगून त्यांच्या वाङ्मयाचे विशेष लिहा.

**प्रास्ताविक :** 'सावधान' हा शब्द बोहल्यावर ऐकताच अखंडसावधपण जागृत होऊन, स्वप्रपंच, गृह यांपासून दूर जाऊन रामदास अखंड भारत भ्रमणास निघाले. भ्रमणाच्या काळात त्यांनी मुसलमान सत्तेचा जाच, अत्याचार, हिंदूदैवतांची विटंबना पाहिली आणि परतल्यावर सामान्य जनतेतील दौर्बल्य, आळस, निद्रीस्तता घालण्यासाठी अखंड सावधानता, व्यवहारकुशलता, प्रपंचविज्ञान, राजकारण, लोकसंगठन, आणि त्यासाठी नामस्मरण आणि भक्ती यांचे ज्ञान देण्यासाठी मराठीतून ग्रंथ रचना केली. मठ स्थापिले, बलोपासना सांगितली.

**विवेचन :** रामदासांना लोकजागृतीची आस – भ्रमंती – श्रीराम उपासना – हनुमान अनुग्रह – लोकांना भक्ती, अध्यात्म तत्त्वज्ञान सांगण्यासाठी उपदेशपर लेखन – समर्थ संप्रदाय, मठ स्थापना – हनुमानाद्वारे बालोपासना – बहुजनांत स्वधर्माची आस्था निर्माण करण्यासाठी ग्रंथलेखन – रामदासांची ग्रंथसंपदा – करुणाष्टक, मनाचे श्लोक – दासबोध – स्फुटप्रकरणे, रामायण, आरती, स्फूटकाव्य इ. – शिवाजी महाराजांचा आदर्श संभाजी महाराजांपुढे उभा करणे – समाजाचे सत्व जागे केले – समर्थ संप्रदायाचे तत्त्वज्ञान, आचारधर्म, रामाचा आदर्श रामराज्याची कल्पना-स्वप्न (या. अनुषंगाने १.८.१ ते १.८.८ तसेच १.९ हे मुद्दे पाहणे)

**समारोप :** प्रपंचातून परमार्थ, शिकवणारे, हस्ताक्षरापासून ते कवी, कवित्व, मुर्खलक्षणे अशा जीवनाच्या सर्वांगाना स्पर्श करून शहाणे करणारे साहित्य लिहिले. समर्थ संप्रदायाच्या माद्यमातून प्रचार करत मठ स्थापना, लोकांना करारीपणा व कणखरपणा शिकवला. ओजस्विता, उत्कटता व भेदकता हे त्यांच्या वाङ्मयाचे विशेष. सामान्यातील सामान्यास रामदासांचे साहित्य आपले वाटावे असे जिव्हाळ्याने लिहिले आहे. महाराष्ट्रातील जनतेस जागृत केले, प्रयत्नवाद, आशावाद, कर्मवादावर श्रद्धा ठेवणारे साहित्य लोकजागृती, लोकसंगठन, राजकारण आणि समाजकारणास दिशादर्शक ठरले.

२. समर्थ रामदासांच्या वाङ्मयाचा आढावा घ्या.

**प्रास्ताविक :** समर्थ रामदासांचे चरित्र वेगळे आहे. प्रपंचाकडे पाठ फिरवून परमार्थामार्गी झाले. भारतभ्रमण केले या तीर्थाटनात समाजस्थितीचे सूक्ष्म अवलोकन, त्यातून समाजजागृतीसाठी लेखन,

श्रीरामभक्ती, हनुमान या बलशालीची बलोपासना, मठ स्थापना केली. त्यातून वाङ्मय निर्मिती केली.

**विवेचन :** रामदासांचे वाङ्मय – 'दासबोध' – 'मनाचे श्लोक' – 'करुणाष्टके', 'एकवीससमासी', 'रामायण', 'स्फूट प्रकरणे', 'स्फूट ओव्या', 'आरत्या', पत्रे इ. मधून विषयानुषंगाने राजकारण, प्रयत्ननिरुपण, लेखनक्रिया, कवित्वकला, शिष्यांना, महंतांना उपदेश, धर्मजागृती, लोकसंगठन, प्रपंचविज्ञान, राजनीती, श्रीराम–हनुमान–गुरु–शिष्य भक्ती, राजधर्म, क्षत्रियधर्म, चौफेर साधवपण, जागृती आणि राजकारण, प्रयत्नवाद या सर्वांतून समाजजागृती, प्रपंचातून परमार्थ साधला. कर्मवादाचा पुरस्कार करणारे साहित्य (अधिक माहितीसाठी १.८.१ ते १.८.८ हे मुद्दे पहावे)

**समारोप :** प्रयत्नवाद, प्रपंचातून परमार्थ, साधत लोकसंठन केले. श्रीरामाचा आदर्श ठेवून 'आनंदवनभुवनाचे' स्वप्न पहात दैववादापेक्षा कर्मवाद रुजवला. म्हणूनच त्यांचे ओजस्वी मनाचे श्लोक भीमरुपी स्तोत्रे आजही सर्वत्र लोकप्रिय आहेत.

**लघुत्तरी प्रश्न**

१. इस्लामी परंपरेतील मराठी काव्याच्या परंपरेचा थोडक्यात आढावा घ्या.

(उत्तरासाठी मुद्दा क्र. १.११.५ पहा / वाचा / लिहा.)

२. वीरशैव संप्रदायातील मराठी साहित्याचा परिचय करून द्या.

(उत्तरासाठी मुद्दा क्र. १.११.४ पहा/वाचा/लिहा)

## १.६ सरावासाठी प्रश्न

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. आद्य लावणीकाराचे श्रेय श्यामा घोणसे यांनी कोणास दिले आहे ?

२. आनंदवनभुवन याचे दुसरे नाव काय आहे ?

३. 'चौदा ओवीशते' हे काव्य कोणाचे ?

४. 'एकवीससमासी' या ग्रंथाचे दुसरे नाव कोणते ?

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. समर्थ रामदास स्वामींच्या 'दासबोध' आणि 'मनाचे श्लोक' या ग्रंथाचे वैशिष्ट्य स्पष्ट करा.

२. ख्रिस्त धर्मीय मराठी साहित्याचा परिचय करून द्या.

**लघुत्तरी प्रश्न व टिपा लिहा.**

१. करुणाष्टके.

२) ख्रिस्त पुराण.

## १.७ समारोप

समर्थ संप्रदायाचे प्रवक्ते समर्थ रामदासस्वामी हे कुशल समाजसंघटक होते. त्यांनी राजकारण आणि व्यवहार याबरोबर नेहमी सावधानता अंगिकारुन तत्कालिन देशपरिस्थितीचे सूक्ष्म अवलोकन आपल्या संपूर्ण भारतदेशाच्या भ्रमंतीत केले. देश-काल-परिस्थितीचा विचार करून निद्रीस्त, आळशी समाजापुढे शूरवीर स्वराज्याचे निर्माते राजा शिवराय यांचा आदर्श आपल्या साहित्यातून समाजापुढे ठेवला. श्रीरामाच्या अनन्यभक्तीतून समाजाला स्वधर्माचे भान देण्याचा वाङ्मयातून प्रयत्न केला. त्यासाठी दासबोध, करुणाष्टके, मनाचे श्लोक, आरत्या इ. रचना मराठीतून केली. सर्वसामान्यातील सर्वसामान्यांना जागृत व संग्रहित करण्याचा प्रयत्न केला. परमार्थ प्रपंचात राहून करता येतो. त्यासाठी प्रवृत्ती मार्ग विशद केला. समाजाला बलोपासना सांगून बलवान, नीतिवंत, प्रयत्नवादी, कर्मवादी व स्वराज्यवादी नागरिक तयार करण्यास प्रयत्न केला. स्त्रियांना अध्यात्मचर्चेत, महाधिपती करून गौरव दिला. म्हणून इतर संतांपेक्षा रामदासांचे स्थान निश्चितच वेगळे ठरते हे आपण पाहिले. रामदास, तुकाराम, शिवाजी महाराज यांचे कार्य एकमेकास पूरक होते. एकनाथांचाच वारसा रामदासांनी पुढे नेला आहे.

नाथपूर्ण काळात तसेच त्या सुमारास अनेक धर्मियांच्यात वैचारिक व आध्यात्मिक देवघेव होत होती. त्यातूनच इस्लाम, जैन, वीरशैव व ख्रिश्चन या इतर धर्मियांनी मराठी ग्रंथ रचना केली. पण वाङ्मयाच्या इतिहासात त्याचा फारसा उल्लेख होत नव्हता. परंतु त्यांच्या मराठीतील ग्रंथरचनेने मराठी समृद्धीला हातभार लावला असेच म्हणावे लागेल.

## १.८ अधिक वाचन


१. मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास : प्राचीन काल : प्र. न. जोशी.

२. प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप : प्रा. ह. श्री. शेणोलीकर.

३. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : भाग ३, भाग ५ : अ. ना. देशपांडे

४. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : ल. रा. नसिराबादकर

५. महाराष्ट्राचा भागवत् धर्म - ४, राजगुरु समर्थ रामदास : डॉ. शं. दा. पेंडसे.

६. समर्थ रामदास : एक अभ्यास : यशवंत दिनकर पेंढरकर.

७. मनासज्जना : संपादक डॉ. अशोक कामत, विद्याधर ताठे.

८. संत, पंत, तंत : श्री. म. माटे.

९. श्री समर्थ चरित्र वाङ्मय आणि संप्रदाय : प्रा. न. र. फाटक.

१०. मराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड ३ रा : ल. र. पांगारकर.

११. समर्थ रामदासांची करुणाष्टके : डॉ. सुहासिनी इर्लेकर.

१२. महाराष्ट्र सारस्वत खंड - २ : वि. ल. भावे.

## १.९ उपक्रम

१. समर्थ रामदास संप्रदायाच्या अभ्यासासाठी सातारा जिल्ह्यातील 'सज्जनगडास भेट द्या.

२. मनाचे श्लोक पाठांतर करा

३. दासनवमी निमित्ताने होणाऱ्या कार्यक्रमास उपस्थित राहा.

४. दासबोधाचे वाचन करा.

❑❑❑

# घटक : २

## पंडित कवी आणि पंडिती काव्याचे विशेष

## मुक्तेश्वर, वामन पंडित, रघुनाथ पंडित, श्रीधर, निरंजन माधव, मोरोपंत

### २.१ उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास –

- संतकाव्यापेक्षा पंडिती काव्य वेगळे कसे ते लक्षात येईल.
- पंडिती काव्याचे विशेष समजतील.
- पंडिती काव्याच्या भाषेचे स्वरूप कळेल.
- विविध पंडित कवींच्या काव्यसृष्टीची माहिती होईल.
- मुक्तेश्वर, वामन पंडित, रघुनाथ पंडित, श्रीधर, निरंजन माधव आणि मारोपंत यांच्या पंडिती कवितेची वैशिष्टे उमगतील.

### २.२ प्रास्ताविक

प्राचीन मराठी काव्यामध्ये तीन प्रवाह आहेत. संतकाव्य, प्रदीर्घ कथाकाव्य आणि पंडिती काव्य ह्या तीन प्रवाहांनी प्राचीन मराठी काव्य समृद्ध झाले आहे. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत असे परमार्थपर, भक्ति–ज्ञान–वैराग्य यांची शिकवण देणारे तत्त्वज्ञानपर संतकाव्य आणि नामदेव, तुकाराम, गोरा कुंभार, जनाबाई चोखा मेळा इ. संतांचे भक्तिपर व बोधपर अभंग ही रचना संतकाव्यात अंतर्भूत होते. महाभारत, रामायण किंवा भागवत यांवर झालेली आख्यानात्मक रचना ही प्रदीर्घ कथाकाव्यात मोडते. एकनाथ, विष्णुदास नामा, नामा पाठक, श्रीधर, बहिरा पिसा, कृष्ण दयार्णव या कवींनी अशी रचना केली आहे. पंडित कवींनी महाभारत, रामायण व भागवत यांतील वेचक आख्याने घेऊन त्यावर कलापूर्ण स्वरूपाची रचना केली आहे. **पंडिती काव्याला कलाकाव्य, विदग्ध काव्य, पंतकाव्य, आख्यान काव्य असेही म्हटले जाते.** सतराव्या शतकात मुक्तेश्वर, वामन पंडित, रघुनाथ पंडित, श्रीधर, सामराज, नागेश, विठ्ठल, आनंदतनय, निरंजन माधव आणि मोरोपंत या कवींनी पंडिती काव्यात मोलाची भर टाकली. विद्यार्थी मित्र हो, अभ्याসक्रमातील पंडिती काव्यांच्या काव्यसृष्टीचा परिचय आपण यथावकाश करून घेणार आहोत. तत्पूर्वी संतकाव्याहून पंडिती काव्य वेगळे कसे ते पाहून पंडिती काव्याचे विशेष लक्षात घेऊ या.

## २.२ विषयविवेचन

संस्कृत महाकाव्यांच्या सहाय्याने केलेली विदग्ध रचना म्हणजे पंडिती काव्य होय. पंडिती कविता लिहिणारे कवी विदग्ध होते. त्यांच्यासमोर सुशिक्षित व जाणता वर्ग होता. रामायण, महाभारत व भागवत यांचा आधार घेऊन आणि संस्कृत पंच महाकाव्ये व काही नाटके यांच्या सजावटीसाठी उपयोग करून मराठीत मुक्तेश्वर, मानव पंडित, रघुनाथ पंडित, नागेश, विठ्ठल, सामराज इ. कवींनी काव्यरचना केली. त्यांच्या पंडिती काव्यात अभिजात संस्कृत साहित्यरचनेचे पुनरुज्जीवन झाले.

**संतकाव्य व पंडिती काव्य :** बहुजनांच्या पारमार्थिक उन्नतीसाठी संतकाव्याचा आविष्कार झाला. संतकवींच्या अभंगांतून भक्तिमार्गातील विभिन्न अवस्थांचे दर्शन घडते. हे काव्य उत्स्फूर्त व सहज होते. याउलट पंडित काव्य हे जाणीवपूर्वक रचलेले व योजनाबद्ध केलेले काव्य आहे. त्यात पांडित्याला महत्त्व आहे. पंडित कवी प्रवृत्तीपर आहेत. रसोत्पत्ती करण्यात ते जास्त रस घेतात. परमेश्वराच्या सगुण रूपातील कथा सांगताना मानवी व्यवहार व भावना यांचा आरोप करून हे कवी भावनोत्कर्ष साधतात. रसाविष्कारासह पांडित्यप्रदर्शन त्यांच्या काव्यात आढळते. संतकाव्याप्रमाणे निवृत्तीपर व भक्ती-शांत रसांचा आविष्कार पंडिती काव्यात नाही. नवररसांचा जाणीवूर्पक आविष्कार करून रसिकांना त्याचा आस्वाद घडविणे ही पंडिती काव्याची प्रेरणा आहे. मूळ आख्यानावर कलापूर्ण संस्कार केल्यावर निर्माण झालेले विदग्ध काव्य म्हणजे पंडिती काव्य होय.

### पंडिती काव्याचे विशेष

१. पंडिती कवींपुढे संस्कृतज्ञ व व्युत्पन्न वाचकवर्ग होता. संस्कृतची श्रीमंती मराठीला मिळवून देणे ही त्यांची प्रेरणा होते. रामायण, महाभारत, भागवत, संस्कृत महाकाव्ये व नाटके यांच्या आधाराने पंडिती कवींनी आपले काव्य सजविले. त्यामुळे पंडिती काव्याच्या रूपाने अभिजात संस्कृत साहित्याचे पुनरूज्जीवन झाले.

२. पंडित कवींनी संस्कृतमधील विविध वाङ्मयप्रकार मराठीत आणले. महाकाव्य, खंडकाव्य, लघुकाव्य व स्तोत्र हे काव्यप्रकार त्यांच्या वैशिष्ट्यांसह मराठीत आणले. सामराजाचे 'रुक्मिणी हरण' हे महाकाव्य, रघुनाथ पंडितांचे 'दमयंती स्वयंवर' हे खंडकाव्य व 'गजेंद्र मोक्ष' हे लघुकाव्य आहे. निरंजन माधवानी संस्कृतमधील चंपू हा गद्यपद्यमिश्रीत वाङ्मय प्रकार व स्तोत्रे मराठीत आणली.

३. रामायण, महाभारत व भागवत यांतून निवडक आख्याने घेऊन प्रसंगयोजना, कल्पनाविलास, वर्णन पद्धती व भाषासरणी या बाबतीत पंच महाकाव्ये व संस्कृत नाटके डोळ्यांपुढे ठेऊन पंडित कवींनी आपल्या काव्याला सजविले आहे.

४. अभिजात संस्कृत वाङ्मयात आदर्शवाद आहे. नायक-नायिका आदर्श व सर्वगुणसंपन्न असतात, याचे अनुकरण पंडित कवींनी केले. रूपवर्णन, वनवर्णन, नागरीवर्णन इ. ठायी मूल महाकाव्यात व पंडिती

काव्यात आदर्शभाव आढळतो. संस्कृतमधील कविसंकेतही पंडित कवींनी आपल्या काव्यात आणले. उदा. चातक मेघाचे पाणी पितो, कल्पवृक्ष इच्छा पूर्ण करतो. इ.

५. पंडिती काव्यात संस्कृतप्रचुर व समासघटित शब्दांचा सुकाळ आहे. मराठी भाषेला संस्कृत भाषेची प्रौढी व डौल देणे हा हेतू डोळ्यांसमोर ठेवून पंडित कवींनी कवितेत तत्सम शब्द व प्रदीर्घ समास पदे अधिक प्रमाणात आणली. सुभाषित प्रवणता व संस्कृत वाग्‌विशेष, संस्कृतमधील अनेक वृत्ते व अलंकार यांचा सर्रास वापर पंडित कवी आपल्या काव्यातून करताना आढळतात.

## २.३ मुक्तेश्वर

प्राचीन मराठी वाङ्मयात पंडिती काव्याचा प्रारंभ करणारा मुक्तेश्वर हा पहिला कवी होय. कवित्वाचा विलास दाखविण्याची जबरदस्त प्रेरणा मुक्तेश्वरांच्या काव्यामागे आहे. एकनाथांच्या गोदा नावाच्या मुलीचा हा मुलगा. याचे वास्तव्य बहुतेक आजोळीच होते. एकनाथांच्या सहवासात त्याचे शिक्षण झाले. पुढे त्यांनी तीर्थयात्रेच्या निमित्ताने देशभर प्रवास केला. मुक्तेश्वर दत्त संप्रदायी होते. नाथांचे संस्कार, बहुश्रुतता आणि कलाप्रवण वृत्ती यांचा संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आहे. द. सी. पंगु यांच्या मते मुक्तेश्वरांचा जन्मकाळ इ.स. १५७३-७४ तर निर्यात काल इ.स. १६४५-४६ हा आहे. तर वि. ल. भावे, दा. के. ओक व इतिहासाचार्य राजवाडे यांच्या मते मुक्तेश्वरांचा जन्म इ.स. १६०९ मधील तर निधन इ.स. १६६० मध्ये झाले. '**व्यासांच्या ग्रंथातील सोने घेऊन मी त्याचा देशी भाषेत अलंकार घडविला,**' असे मुक्तेश्वर आपल्या महाभारत रचनेबद्दल म्हणतात.

- **काव्यरचना**

मुक्तेश्वरांनी केलेली काव्यनिर्मिती पुढीलप्रमाणे आहे -

१) संक्षेप रामायण - (श्लोकबद्ध) उत्तरकांडासह - श्लोक संख्या १७२५.

२) महाभारताची आदि, सभा, वन, विराट व सौप्तिक ही पाच वर्षे - एकूण ओवीसंख्या १४०७९.

३) स्फूट प्रकरणे - हरिश्चंद्राख्यान, शतमुखरावणवधाख्यान व मुर्खाची लक्षणे, भगवद्‌गीता, शुकरंभा- संवाद, श्रीएकनाथ चरित्र, गजेंद्रमोक्ष, दुर्योधन शल्यस्फोट, हनुमंताख्यान इ. स्फूट प्रकरणे, काही पदे-आरत्या अशी मुक्तेश्वरांची रचना सतरा हजार ओव्यांइतकी आहे.

- **संक्षेप रामायण**

यास कौतुहल रामायण असेही म्हणतात. ओवीसंख्या ६६१. काव्यदृष्ट्या सामान्य. यात कवीचे नवखेपण जाणवते. अनुकरणाची प्रवृत्ती व बाह्य सजावटीचा हव्यास या काव्यात पदोपदी आढळतो. या रामायणात मुक्तेश्वराने जयदेव, भर्तृहरी, जगन्नाथ व कालिदास ह्या विख्यात संस्कृत कवींच्या ग्रंथांतील श्लोकांचे भाषांतर करून ते कथानकात गुंफले आहेत. ही संस्कृत श्लोकांची मराठी रूपांतरे फारशी चांगली नाहीत. व्याकरणाचे नियम, शब्दांची ओढाताण व यमके यांनी हा नवखा कवी गांगरलेला दिसतो.

रामायणाच्या रचनाकाळची मुक्तेश्वरी वाग्वधु अगदीच नवोढा आहे. इथे आध्यात्मिकता फिकट आहे तर कथात्मकता गडद आहे. रचनेतील ओबडधोबडपणावरून ही त्यांची प्रारंभ काळातील रचना आहे, हे जाणवते. शब्दालंकाराच्या हौसेमुळे अनेक ठिकाणी काव्य प्रसादहीन, कृत्रिम व क्लिष्ट झाले आहे.

उदाहरणार्थ, श्रावण वधाची घटना, दशरथाच्या युद्धात कैकेयीची मदत - हे प्रसंग वाल्मिकी रामायणात पुष्कळ पुढे आले आहेत. मुक्तेश्वर हे प्रसंग कथारंभीच सांगून टाकतात. तेथील कलादृष्टी मुक्तेश्वर सांभाळत नाहीत.

दशरथ पुत्रप्राप्तीसाठी यज्ञ करतात. त्यातून निघालेले पायस ते आपल्या तीन राण्यांना विभागून देतात. त्यावेळी मुक्तेश्वर लिहितात - ''वडिल बंधु सुशीला जेष्ठ भागाधिकारी / भजनपर सुमित्रा भागधर्मानुसारी।। तृतीय विहितभागी कैकयी रोष अंगी। झडपुनी तव कर्मे भाग नेला विहंगी।।'' कैकयीचा पायस-भाग पक्ष्याने उचलून गेला - हा कथाभाग मूळ रामायणात येत नाही. येथील कविता रचनेत मोठे सामासिक शब्द आल्याने व लालित्याचा अभाव असल्याने खडबडीतपणा आला आहे.

शिवधनुष्याचा भंग करणाऱ्या श्रीरामाचे वर्णन मुक्तेश्वर बालकांडात असे करतात - शिवधनु जड कैसे कूर्म काठिण्य पृष्ठीं । मदनजनक हा हो ! लोकलावण्य सृष्टी । तव कृत पण ताता ! सिंधु कैसेनि लंघी ? रघुवर विजयी हो चंडकोदंडभंगी ।। संस्कृत श्लोकाचा हा अनुवाद मुक्तेश्वरांची प्रथमावस्थेतील काव्यरचना असल्याचे जाणवून देतो. मुक्तेश्वरी वाङ्मयाचे अभ्यास डॉ. र. बा. मंचरकर यांनी संक्षेप रामायणातील मुक्तेश्वरांच्या नवशिकेपणातील अनुकरण प्रवृत्तीवर चांगला प्रकाश टाकला आहे.

- **मुक्तेश्वरी महाभारत :**

मुक्तेश्वर श्रेष्ठ कवी ठरले ते त्यांच्या महाभारत रचनेमुळे ! त्यामुळेच अभ्यासकांनी 'महाराष्ट्र साहित्यातील कोहिनूर', 'कलाकवी', 'साहित्य सम्राट' अशी बिरूदे त्यांना दिली. महाभारतातील आदि, सभा, वन, विराट व सौप्तिक अशी पाच पर्वे यांनी वयाच्या प्रौढावस्थेत लिहिली. त्यांच्या मनात व्यासाबद्दल आदर आहे. यातील मुक्तेश्वरकृत लीलाविश्वंभराचे भावपूर्ण वंदन, संतगौरव व भक्तीमाहात्म्य लक्षात घेता त्यांचा पिंड रसलुब्ध व लालित्य संपन्न कवीचा आहे, हे लक्षात येते. म्हणून ते मराठीतील पहिले ललित वाङ्मय निर्माण कर्ते आहेत, असे वि. ल. भावे म्हणतात. महाभारत रचनेत त्यांच्या प्रतिभेचा स्वतंत्र विलास आढळतो. त्यांच्या रसिकत्वाला व पांडित्याला जबर व्यासंगाची जोड आहे. तिथे त्याची वाणी सहज व ओघवती बनली आहे. त्यातील उत्कट व समर प्रसंगांत त्यांच्या लेखणीला स्फुरण चढते. त्यांची वाणी अलंकार मंडित भाषेच्या रमणीय विलासात रमणीय आहे. ती अर्थालंकारांनी नटली आहे. कथा निवेदनाच्या प्रवाहात ते उत्प्रेक्षा, व्यतिरेक, श्लेष, स्वभावोक्ती, उपन्हुती, दृष्टांत असे अनेक अलंकार योजितात. कथानिवेदनात ते रूपकाचा वापर मोठ्या प्रमाणात करतात. सुंदर, समर्पक व उठावदार रूपकांची योजना करण्यात मुक्तेश्वरांचा हातखंड आहे. उदा. जनमेजयाच्या यज्ञारंभी तिथे आलेल्या कुत्र्याला निर्दयपणे मारून हाकलून दिले जाते. तेव्हां त्या कुत्र्याची आई म्हणते -

**लक्षूनि राज चूडामणी । म्हणे गा अनीतिवेश्याव्यसनी ।**
**जालासी म्हणोनि धर्मपत्नी । कीर्ति रूसोनि जातसे।।**

''राजा, जेव्हां राजा अनीतिरूपी वेश्यांच्या नादी लागतो तेव्हां त्याची धर्मपत्नीरूपी कीर्ति त्याला सोडून जाते.'' अनीतीने माणसाची बेअब्रू होते, हे सांगण्यासाठी योजिलेले सुंदर रूपक.

मुक्तेश्वर वर्णनविद्या विशारद आहेत. निसर्गदृश्य, व्यक्तिमन, प्रसंग, समाज असे कोणतेही वर्णन वाचकाचे मन भारून टाकील असे आकर्षक व प्रभावी करण्यात ते पटाईत आहेत. आदिपर्वातील समुद्रमंथन, परीक्षितास तक्षक दंश, शर्मिष्ठेने अवमानिलेली देवयानी, पंडुराजा, अंधारी रात्र – ही सर्व वर्णने प्रभावी आहेत. ''या वर्णनांची प्रतिष्ठा त्यांच्या मराठीने परिधान केलेल्या संस्कृत भाषेच्या भरजरी शालूमुळे वृद्धिंगत झालेली आहे,'' असे अ. ना. देशपांडे म्हणतात. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास – भाग चौथा – पृष्ठ ३५०). मुक्तेश्वरांच्या उत्कट मनोवृत्तीला काव्यात्मतेची जोड लाभल्याने त्यांची लेखणी ही विविध रसप्रवाहांचे उगमस्थान बनली आहे. शृंगार आणि वीररस वर्णनात तर ते निष्णात आहेत. नवरस वर्णन करण्यात ते आनंद मानतात. सभा पर्वातील द्रौपदी वस्त्रहरण प्रसंगी द्रौपदीने श्रीकृष्णाचा केलेला धावा म्हणजे मूर्तिमंत करूण रसच ! महाभारतातील युद्धप्रसंग वर्णनात वीर रसाचा उत्कर्ष साधला आहे. त्यातच भयानक व रौद्ररस येतात. भा. श्री. परांजपे म्हणतात, ''वीरश्रीचा आवेश व युद्धप्रसंगाची खणाखण त्यात आहेच. पण त्याचबरोबर राजनीतीचे प्रसंग, शिकारीचे थाट, वने, धबधबे, त्यातील सौदर्यवती प्रमदा यांचेही वर्णन मुक्तेश्वरांनी मोठ्या साक्षेपाने केले आहे. भीम-जरासंध, भीम-किचक, भीम-हिडींब अशा मल्लांच्या युद्ध वर्णनात खल पुरुषाला ठेचू पाहणारी वीरांची ईर्ष्या दिसते. भीम, धर्म, अर्जुन, दुष्यंत, द्रौपदी, शकुंतला, दमयंती व सावित्री यांची मानसिक हालचाल व त्यांची अनेक स्वभाव वैशिष्टे त्यांनी सूक्ष्मपणे रंगवली आहेत. त्यामुळे ही व्यक्तिचित्रे संस्मरणीय झाली आहेत. नारदनीतिसारख्या उपदेश प्रसंगाने किल्ल्यांची व सैन्याची तयारी, शत्रुवरील हल्ला, राष्ट्ररक्षण यांविषयीच्या विचारात मुक्तेश्वराच्या वीरश्रीची तडफ आढळते. साधुंचे पालन व दुष्टांचे दंडन यासाठीच राजनीतीची अंगे अभ्यासिली जावीत, लोकांचा ऐहिक उत्कर्ष साधावा व राष्ट्रातील ब्रह्मक्षेत्र तेजाने अधर्माचा नायनाट करावा, असे विचार मुक्तेश्वरांच्या अंत:करणात सदैव उचंबळताना दिसतात.'' (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास – भाग चौथा – अ.ना. देशपांडे, – पृष्ठ ३५३). मुक्तेश्वरांच्या कवितेतील समाज चित्रणाविषयी नांदापूरकर म्हणतात, ''मुक्तेश्वराने आपल्या कवितेत समाजाचे चित्र अनेक दृष्टांतांनी रंगविले आहे. देशाची हीन, दीन, गलितगात्र, निरूत्साहपूर्ण, किंचित चैतन्ययुक्त स्थिती असलेले हे समाजदर्शन आहे. यावरून मुक्तेश्वरात राष्ट्रीय भावना आहे.'' (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास – भाग चौथा – अ.ना. देशपांडे, – पृष्ठ ३५५). मुक्तेश्वर मूळ भारत कथेत एखादी लहानशी, स्वतंत्र व मार्मिक अशी भरही घालतात.

रसोत्कर्ष, कल्पनाविलास व वर्णनचातुर्य याबाबतीत मुक्तेश्वरांची प्रतिभा सिद्ध हस्त आहे. त्यांची वाणी 'नवरसाची मंदाकिनी' आहे. ती प्रसंगानुरूप कोमल किंवा कठोर, प्रसन्न किंवा प्रक्षुब्ध, लडिवाळ किंवा गंभीर अशी विविध रूपे सारख्याच समरसतेने व कौशल्याने धारण करते. त्यांनी केलेल्या वृक्षांच्या,

पक्वान्नांच्या वर्णनात कुठे कुठे पाल्हाळ, अतिशयोक्ती व स्त्री-शृंगारवर्णनात कुठे उत्तानता तर कुठे अश्लिलता आली आहे. तरीही त्यांचे काव्य गुणवैभवसंपन्न आहे. मुक्तेश्वर रससिद्ध वाणीचे जातिवंत कवी आहेत.

- **स्फुट प्रकरणे**

मुक्तेश्वरांच्या स्फूट प्रकरणांपैकी हरिश्चंद्राख्यान, मूर्खाची लक्षणे व शुकरंभा संवाद ही तीनच सरस आहेत. अध्यात्मज्ञान व भक्ती यांचा उपदेश करणारी मुक्तेश्वरांची पद्यरचना त्यांची नीतिशिक्षकाची भूमिका स्पष्ट करते. ढोंगी गुरू व खोटा शिष्य यांचा ते खरपूस समाचार घेताना म्हणतात - 'गृह त्यागुनी, मठाची माया। शिष्यिणी करूनी, त्यागी जया। सुहृद त्यजोनि, घरी शिष्य समुदाया । तो एक मूर्ख।।' ४६७ ओव्यांचे शुकरंभासंवाद हे तर सर्वोत्कृष्ट आहे. लावण्यखाणी रंभा वैराग्यभूषण शुकाला कामवासनेच्या जाळ्यात ओढण्यासाठी त्याच्यावर आक्रमण करते. एका बाजुला देहसुखाची आसक्ती तर दुसऱ्या बाजुला विवेकयुक्त विरक्ती असा परमार्थ मार्गातील सनातन संग्राम इथे उग्रभीषण व दिव्य स्वरूपात प्रकटला आहे. या संग्रमात देहसुख पूर्णपणे पराभूत होऊन ते आत्मसुखाला शरण गेले आहे. शुकमुनी रंभेला देहसुखाचे निरर्थकत्व दाखवून नरदेहाचा उपयोग ईशप्राप्तीसाठी केला पाहिजे, हे पटवून देतो. शेवटी रंभा शुकमुनीची मनापासून स्तुती करते. उत्कट भाव, ओजस्वी कल्पनाविलास व उत्कृष्ट संवाद कौशल्य ही या काव्याची वैशिष्ट्ये आहेत.

थोडक्यात, ''विशाल कल्पना, उत्कट भावना, उदात्त विचार, संपन्न चित्रण, रेखीव शब्दचित्रे, ओघवती शैली आणि जातिवंत मराठी भाषा या वैशिष्ट्यांमुळे श्रेष्ठ दर्जाचा प्रतिभासंपन्न कलांवत हे मुक्तेश्वराचे स्थान मराठी साहित्यात अढळ होऊन राहिले आहे.'' (प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप - पृष्ठ -११५) असे ह. श्री. शेणोलीकर म्हणतात, ते खरेच आहे.

मुक्तेश्वरांची काव्यविषयक भूमिका आदिपर्वातील शारदा वंदनात प्रकटली आहे. ते म्हणतात, ''आता सारस्वत फल संभारी । कल्पलतिका अति साजिरी । ज्ञानंगेचा ब्रह्मगिरी । वेष ब्रह्मकुमरीचा ।। नवरसांची मंदाकिनी । महिमेने वाही त्रिभुवनी । तिही लोकां वरदायिनी । देवत्रया पढियंती ।।'' कवित्वाची अंगे म्हणून त्यात पांडित्य, कल्पनाविलास, अलंकरण, लालित्य, रसात्मकता यांवर भर दिला आहे. शृंगार आणि पामार्थ या दोन्ही गोष्टींकडे ते कवी म्हणून पाहतात. या दोन्ही गोष्टींचे ते उत्कटपणे रस, अलंकार यांच्या उत्कर्षाने सारखेच परिणामकारक वर्णन करतात. हा त्यांच्या प्रतिभेचा विशेष आहे. ''प्रदीर्घ अशी पहिली श्लोकबद्ध रचना मुक्तेश्वरांनीच केली आहे'' असे रा. श्री. जोग म्हणतात.

मुक्तेश्वरांच्या काव्यकर्तृत्वाचा गौरव करताना अ. ना. देशपांडे म्हणतात, ''मुक्तेश्वराने प्राचीन मराठीतील आख्यानक काव्याचे दालन आपल्या रसालंकार बहल प्रतिभेने निश्चितच समृद्ध केलेले आहे... कथानिवेदन, स्वभाव दर्शन, आणि प्रसंगचित्रण ही कथाकाव्याची तिन्ही अंगे खुलविण्यात व सजविण्यात त्याला स्पृहणीय यश लाभले. त्याच्या कथानिवेदनात ओघ आहे, वेग आहे, जिवंत उत्साह आहे. मधुनच कथा प्रसंगाचे

निमित्त करून तो चार सदुपदेशाच्या गोष्टी सांगतो.... कथेतील व्यक्ती व प्रसंग यांना साक्षात श्रोत्यांच्या – वाचकांच्या डोळ्यांपुढे प्रकट करतो. या तिन्ही अंगांचे भरतकाम करणारे त्यांचे शब्दरूपी मणी पाणीदार, टपोरेदार आहेत. कारण त्याची भाषा संस्कृत शब्द प्राचुर्यामुळे प्रौढ झाली.... रस, कल्पना आणि भाषा या तिन्ही प्रांतातील मुक्तेश्वरांचे प्रभुत्व निर्विवाद आहे.'' (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास – भाग चौथा. अ.ना. देशपांडे,– पृष्ठ ३९९).

## २.४ वामन पंडित

वामन पंडित हे रामदास समकालीन आहेत. ते पंडित कवींचे प्रातिनिधिक कवी आहेत. पांडित्य आणि कवित्व यांचा संयोग त्यांच्या रचनेत आहे. वेदान्तपर व आख्यानपर या त्यांच्या रचनांवरून ते कळते.

त्यांचा जन्म इ.स. १६०८ मध्य झाला असावा. 'यथार्थदीपिका'कार वामन, शांडिल्यगोत्री वामन, वसिष्ठ गोत्री वामन, शृंगारप्रिय व यमकप्रिय वामन असे पाच वामन बा. अ. भिडे यांनी कल्पिले आहेत. वामन पंडितांनी आपल्या 'निगमसार' ग्रंथात गुरूपदेशाची हकीकत सांगितली आहे. काशीत बारा वर्षे अध्ययन करून दक्षिणेकडील अनेक पंडितांना वादात जिंकत ते आले. तुकाराम व रामदास या संतांना ते भेटले. त्यांना गुरू श्रीसच्चिदानंद स्वामींचा उपदेश करवीर परिसरात लाभला. महालक्ष्मी मंदिरात 'नामसुधा' हे प्रकरण त्यांनी रचले. पुढे वारणाकाठी शिगाव–कोरेगाव येथे ते जाऊन राहिले. त्यांनी बरेच ग्रंथ लिहिले. इ.स. १६९५ मध्ये गुऱ्हेगर नजिक भूगावी त्यांनी समाधी घेतली.

वामन पंडितांच्या काव्याचे वेदान्तविषयक, पौराणिक आख्यानपर व भाषांतरित असे तीन भाग आहेत. त्यांच्या काव्यपंक्तीची संख्या सामान्यपणे चाळीस हजार असून, त्यातील अर्धा भाग वेदांत निरूपणास वाहिला आहे. त्यातून वामनाचा सखोल व्यासंग दिसतो. 'निगमसार', 'यथार्थदीपिका', 'चित्सुधा', 'तत्त्वमाला', 'श्रुतिसार', 'कर्मतत्त्व', 'राजयोग' व 'गीतार्णवसुधा' हे त्यांचे ग्रंथ आहेत. छोटी अध्यात्मपर प्रकरणेही आहेत.

- **निगमसार :** इ.स. १६७३ मध्ये रचलेल्या ह्या ग्रंथात वामनाने त्यांच्या गुरुने पढविलेल्या 'भार्गवी वारूणी' विद्येचे विवेचन केले आहे. निगमसार हा ग्रंथ नावाप्रमाणेच वेदान्ताचे थोडक्यात सार सांगतो. 'ग्रंथाचे नाम निगम सार। वेदांमाजी तोचि विस्तार । संक्षेपे करोनि तो प्रकार । बोलिजेल ।।' पुरुष–प्रकृती, ब्रह्म–माया, जग–जगदात्मा यांच्या संबंधांचा विचार या ग्रंथात मांडला आहे. वामनाची येथील मांडणी 'अल्पाक्षर सुबोध' असल्याने हा ग्रंथ विशेष उल्लेखनीय झाला आहे. ग्रंथ मांडणी पंडिती वळणाची आहे. 'ग्रंथ हा निगमसार । शब्द थोडे अर्थ फार ।' असे लेखनशैलीचे मोठेपण इथे सांगितले आहे. 'याचे अध्याय नव । नवहि निधी अभिनव । अनंत वेदांचे वैभव । या इतुकीयामध्ये ।।' नऊ अध्याय असलेल्या या ग्रथात रेखीवपणा व नेमकेपणा यांचे सौंदर्य जाणवते. श्रुतिवचनांचे आधार घेऊन त्यांचे विवरण करण्याची पंडिती शैली इथे दिसते. 'गुळ आणि गोडी दोनी । न कळती शब्दें करुनी । गूळ दावितां कळे नयनी । चाखिता गोडी रसनेसी ।' या अवतरणांवरून वामनांची शब्द चिकित्सक लेखन पद्धती, सुगम पण तार्किक विवेचनरीती यांची कल्पना येते.

● **समश्लोकी टिका :** श्रीकृष्णाने संस्कृत वाणीत जे सांगितले ते अज्ञजनांना मराठीत सांगण्यासाठी वामनांने ही भगवद्गीतेवर टीका लिहिली. येथील श्लोक रचना अनुष्टुभात आहे. यातील भाषानैपुण्य उत्कृष्ट आहे. यतील प्रत्येक अध्यायाला प्रास्ताविक व समारोप आहे. ग्रंथाच्या शेवटी लेखनपूर्तीबद्दल 'माता धन्य पिता धन्य, धन्य धन्य सुहृत्सखे' असे समाधानाचे उद्गार काढले आहेत. ही गीता वाचकाला श्रवण पठण केल्याने मोक्ष देते. अशी फलश्रुती सांगितली आहे. समश्लोकी टीकेचे स्वरूप सांगताना वामन पंडित म्हणतात – ''समश्लोकी इचे नाव, जितुके श्लोक मूळींचे । टीकेचे तितुके श्लोक, सज्जनानंदकारक।।'' मोरोपंत या गीतेचा गौरव असा करतात – ''रीती समश्लोकीची अतुला साधेल काय न त्यास। हा सुयशे होईल का रोमांचव्याप्तकाय न त्यास।।''

● **यथार्थदीपिका :** वामन पंडितांचे व्यक्तिमत्त्व अध्यात्मप्रवण व व्युत्पन्न होते. त्यांना गीतेचे बरेच आकर्षण आहे. गीतेवर 'समश्लोकी' लिहिल्यावर बऱ्याच सूज्ञ जनांनी त्यांना जगाला उपयोगी टीका लिहिण्याचा आग्रह केला. ती ही 'यथार्थदीपिका' होय. अन्य गीताभाष्यांत विपरीत अर्थ आहे. आपला अर्थच 'यथार्थ' आहे, असे ते अभिनिवेशाने सांगतात. इथे केवळ तर्कशुद्ध अर्थाचे विवरण व गीताश्लोकाचा नेमका अर्थ विस्ताराने सांगणे, हा वामनांचा हेतू दिसतो. गीतेवरील ही सुबोध पण वकीली थाटाची टीका आहे. यात ओवी संख्या २२, २२६ आहे. यातून वामनांचे पांडित्य व भाषाप्रभुत्व लक्षात येते. ज्ञानयुक्त सगुण भक्तीमुळेच खरा मोक्ष मिळतो, असे इथे ठामपणे सांगितले आहे. श्रोत्यांची फारशी पर्वा न करता आपली श्रद्धा ईश्वरावर ठेवून वामन पंडित इथे ग्रंथ निरूपण करतात. तर्कशुद्ध विचार आणि 'हाच अर्थ योग्य' अशा अभिनिवेशामुळे हा ग्रंथ काव्यगुणांपासून दूर गेला आहे.

दैवी अधिष्ठान न घेता बुद्धी, तर्क आणि शास्त्रधार यांची कसोटी लावून तर्कशुद्ध विवरणाने अर्थ निश्चिती करण्याचा प्रयत्न इथे वामनाने केला आहे. श्रृतिग्रंथ, योगवासिष्ठ, भागवत इ. चे आधार ते पदोपदी देतात. येथील भाषा सकस व जोरदार आहे. तिच्यात स्पष्टता, सुगमता आहे पण लालित्य अजिबात नाही.

**या द्विविधा ज्ञानिया योगियांत । एक सेविती सगुण भगवंत ।**
**एक निर्गुणोपासक ते अत्यंत। क्लेशें देवकृत विघ्ने परिहरिती ।।**
**जे ज्ञानी होऊनि सगुणाची । कांस न सोडिती त्यांची ।**
**देवकृत विघ्ने हरूनि योगाची । सिद्धी अनायासे ईश्वर देतसे ।।**

या टीकेवरून वामनाचे प्रगाढ पांडित्य, स्वतंत्र प्रज्ञा, नि:स्पृहता व भाषाप्रभुत्व हे विशेष वाचकाच्या लक्षात येतात.

● **आख्यान कविता :**

वरील अध्यात्मप्रवण भाष्यग्रंथांपेक्षा वामन पंडित लोकप्रिय झाले ते आख्यात कवितांमधून ! त्यातूनच त्यांचे रसिक व पंडित व्यक्तिमत्व प्रकटते. ते पंडित कवींचे खरे प्रतिनिधी होते. याची साक्ष ही

आख्यान कविताच देते. त्यांची आख्याने विपुल आहेत. भागवत व रामायण यांतून त्यांनी कथा घेतल्या आहेत. एकनाथांच्या भागवत रचनेचा हा संस्कार असावा. रामजन्म, अहिल्योद्धार, सीतास्वयंवर, भरतभाव, लोपामुद्रासंवाद ही त्यांची आख्याने रामायणातील आहेत. तर कृष्णजन्म, बालक्रीडा, वनसुधा, वेणुसुधा, मृत्तिका भक्षण, भामाविलास, राधाविलास, राधाभुजंग, रासक्रीडा, कंसवध, मुकुंदविलास व कात्यायनीव्रत ही आख्याने लोकप्रिय असून भागवतावर आधारित आहेत. याशिवाय गजेंद्र मोक्ष, वामन चरित्र, शुकरंभासंवाद, दशावतार चरित्र अशी काही वेगळी आख्यानेही उल्लेखनीय आहेत. ही सर्व आख्याने श्लोक वृत्तात आहेत. आख्यानाच्या सुरूवातीला असलेल्या मंगलाचरणात त्याचे सारही सांगितले आहे.

वामनांच्या आख्यान कवितेचे अधिष्ठान अध्यात्म हेच आहे. आत्मशुद्धी व भगवद्‌भक्तीच्या प्रेरणेतून त्यांनी ही रचना केली आहे. ज्ञाननिष्ठ व सगुणोपासक हीच त्यांची भूमिका आहे. लोकरंजक काव्यप्रकारांतून त्यांनी अद्वैत भक्तीचाच प्रसार केला. त्यांनी स्फूट श्लोकातूनही सुबोधपणे अद्वैत सिद्धांत समजावून दिला.

१) जाया सुतादि जग हे, भ्रम तो असा रे,। मायाविलास नटला हरि तोचि सारे, ।
चित्री विचित्र दिसतो परि तंतु एक। विश्वीं अनेक रचना हरि तोचि एक ।।

२) तूं अज, अव्यय, नित्य, निरामय, तूं सच्चिन्मय सौख्यनिधाना ।
हे जगडंबर भासत तद्वत्, बोध तरंग जळावरि नाना ।।

वामनाची कृष्णचरित्रपर आख्याने 'रस व नाद यामुळे मोहक झाली आहेत.' राधाविलास, भामाविलास, राधा भुजंग व रासक्रीडा ही त्यांची आख्याने उत्तान शृंगाराने भरलेली आहेत. कालिंदी तिरावरील रासक्रीडा-वर्णन तर शृंगाराची लयलुटच ! 'भामाविलासात' श्रीकृष्णावर रागावलेली सत्यभामा धरणीवर गडबडा लोळते. रडत रडत मूर्च्छित पडते. गळ्यातील अलंकार तोडते. अशा तऱ्हेने कमी शब्दांत सुंदर व्यक्तिरेखाटन त्यांनी अनेक आख्यानांत केले आहे.

''अहिल्योद्धार, सीतास्वयंवर, भरतभाव, लोपामुद्रासंवाद ही रामायणावर आधारित आख्याने कृष्णकथे-इतकी आकर्षक उतरली नाहीत. भगवती आख्याने ही वामनांची मराठी कवितेला खास देणगी आहे. या आख्यानांत नाट्यपूर्णता, आकर्षकता, कल्पकता व रचनेचा सफाईदारपणा असून वामन पंडितांचे शब्दचित्र रेखाटनाचे कौशल्यही उल्लेखनीय आहे. भागवताच्या दशम स्कंधावर आधारित वामनांनी 'द्वारका विजय' हे काव्य लिहिले. इथे हरीचा गौरव व रूपकात्मकता बरीच आहे. या काव्याद्वारे मराठीतील खंडकाव्य रचनेचा पाया वामन पंडितांनी घातला, असे म्हणावयास हरकत नाही.'' असे डॉ. ल. रा. नसिराबादकर म्हणतात. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास - ल. रा. नसिराबादकर - पृष्ठ १८७).

आख्यान रचनेतील रसवत्ता, वर्णन चातुर्य व नादमाधुर्य यांमुळे सामान्य वाचकांवरही यांची विलक्षण मोहिनी पडते. वामनांची रचना चमत्कृतीपूर्ण असूनही भाव मधुर आहे. अध्यात्माचे अनुसंधान न सोडता वामनांची वाणी शृंगार, अद्‌भूत, करूण, वत्सल अशा विविध रसांत रंगते. करूण-वत्सल या रसांत तर त्यांच्या कवित्वशक्तीचा परमोत्कर्ष पाहावयास मिळतो.

- **पंचसुधा :** नामसुधा, वनसुधा, वेणुसुधा, चित्सुधा व प्रियसुधा या वामन पंडितांच्या पंचसुधा म्हणजे कृष्णभक्तीपर प्रकरणेच आहेत. चित्सुधेत वेदांत विवरण आहे. प्रियसुधा प्रकरणात पत्नीला आत्मज्ञानाचा उपदेश केला आहे. नामसुधेतून नामाचा उपदेश केला आहे. 'जो न गाय हरीचे महिमेला, तो असोनि जित या महीं मेला।' असा तो उपदेश आहे. कृष्णाच्या वेणुवादाने गोपींची झालेली आतुर अवस्था वेणुसुधेत वर्णिली आहे. वनसुधेत कृष्ण व त्याचे बालमित्र यांच्या बालक्रीडांचे वर्णन आहे.

**वनी खेळती बाळ ते बल्लवांचे, तुरे खोविती मस्तकी पल्लवांचे ।**

**फुलांचे गळां घालिती दिव्य हार, स्वनाथासवें ते करीती विहार।।**

वामन पंडितांनी शंकराचार्यकृत अपरोक्षानुभूती, भगवद्गीता, समश्लोकी, जगन्नाथाची गंगालहरी, भर्तृहरीचे नीति-शृंगार-वैराग्य अशी तीन शतके यांची मराठीत भाषांतरे केली आहेत. यांतून त्यांचे भाषाप्रभुत्व लक्षात येते. व्यासंग आणि वृत्तप्रभुत्त्व यांमुळे ही भाषांतरे सरस उतरली आहेत.

- **सुश्लोक वामनाचा :** वामनांची ग्रंथरचना विपुल आहे. त्यात पांडित्य व कवित्व यांचा सुंदर समन्वय पाहावयास मिळतो. विविध वृत्तात्मक श्लोक रचना करून शृंगार व अध्यात्म यात रमणारा हा व्यासंगी कवी आहे. त्यांना यमक व अनुप्रास यांचा हव्यास आहे. त्यांच्या रचनांत व्याकरणदृष्ट्या शिथिल रचना, पुनरुक्ती, ग्राम्य शब्दयोजना, वेळी अवेळी आलेले तत्त्वज्ञान, उत्तान शृंगार व त्यामुळे वर्णनात आलेली बिभत्सता असे अनेक दोषही आढळतात. पण आंतरिक जिव्हाळा व रसाळपणा या गुणांच्या प्रवाहात ते विरून जातात. प्रसंगांची चित्रे ते हुबेहुब रेखाटतात. स्वभावोक्ती हा त्यांचा आवडता अलंकार आहे. काव्यात त्यांचे सूक्ष्म निरीक्षण व व्यापक अनुभव यांचा प्रत्यय येतो. प्र. बा. बापट म्हणतात की, आकर्षक वर्णनशैली, भावुक व रसाळ भाषा, वृत्तवैचित्र्याने व समर्पक अलंकार योजनेने आख्यानास बहारदार उठाव देण्याचे कौशल्य या दुर्मिळ गुणांमुळे मराठीतील सर्वश्रेष्ठ आख्यानक कवीचे मानाचे स्थान त्यास प्राप्त झाले आहे. आपल्या रचना कौशल्यातून व भाषा प्रभूत्वातून वामनांनी 'सुश्लोक वामनाचा' हा गौरव सिद्ध केला आहे.

## २.५ रघुनाथ पंडित :

मराठी आख्यानक कवितेत आपल्या थोड्या पण काव्यगुणसंपन्न रचनेने श्रेष्ठ स्थान मिळविले ते रघुनाथ पंडित यांनी ! त्यांच्या स्थल कालाविषयी मतमतांतरे आहेत. तरीही हा कवी शिवकालीन असावा, असे अ. का. प्रियोळकर व द. सी. पंगु यांना वाटते. इ.स. चे सतरावे शतक हा त्यांचा जीवितकाळ होय.

रामदास वर्णन, गजेंद्रमोक्ष आणि दमयंती स्वयंवर अशी त्यांची मोजकीच रचना आहे. 'रामदासवर्णन' हे त्यांचे पहिले काव्य. यात वसंततिलका वृत्तातील अकरा श्लोक आहेत. त्यात समर्थांच्या गिरीकंदरी विहरण्याचा व लेखन सामग्री साबेत ठेवण्याचा उल्लेख आहे. गजेंद्रमोक्ष हे भगवताधारीत प्रकरण आहे. त्यात विविध वृत्तांतील ५८ श्लोक आहेत.

● **दमयंती स्वयंवर :** काव्यगुणांच्या दृष्टीने प्राचीन मराठीतील श्रेष्ठ काव्य होय. संस्कृतातील पंचकाव्यांचा आदर्श समोर ठेवून रघुनाथ पंडितांनी मराठीत ही रचना केली. श्रीहर्षाचे नैषधीयचरित हे महाकाव्य डोळ्यांसमोर ठेवून पंडितांनी ही रचना केली. पण हे महाकाव्य नाही. या आख्यान काव्यात २५४ श्लोक आहेत. त्यामुळे या स्वयंपूर्ण काव्यास प्रमाणबद्धता व व आकृतिसौंदर्य लाभले आहे. नैषध काव्यात स्वयंवर व त्यानंतरचा नलाचा दु:खद वनवास असा शृंगार व करूण रसपूर्ण कथाभाग आहे. रघुनाथ पंडित प्रस्तावनेत 'कथा बोलो हे मधुर-सुधा धारा । होय शृंगारा करूण रसां थारा ।' असे म्हणतात. प्रत्यक्षात मात्र स्वयंवरांपर्यंतच कथाभाग आहे. वनवास कथेला तिथे फाटा दिला आहे. पंडितांनी काही कल्पना नैषधचरित्रातील घेऊन श्लोक मात्र स्वतंत्र रचले आहेत.

**ती शितलोपचारी जागी झाली हळूच मग बोले**

**औषधे नलगे मजला, परिसुनि जननी बरे म्हणुनि डोले**

ही रम्य कल्पना मात्र स्वत: पंडितांचीच आहे. रसिकांचे मन आकर्षून घेणारी नाजूक कल्पनाशक्ती त्यांच्या काव्यात आहे. त्यांनी केलेल्या प्रसंग निर्मितीमध्ये ती प्रकट झाली आहे. प्रसंगनिर्मितीमध्ये भावनाविष्कार साधून त्यांनी व्यक्तिस्वभावाचे मर्मही व्यक्त केले आहे. या काव्यातील हंस-नल यांची भेट हा प्रसंग लक्षणीय आहे. नलाच्या हातून सुटण्यासाठी प्रथम हंस हरतऱ्हेच्या विनवण्या करतो. तरीही नलाला दया येत नाही, तेव्हा ''तुझ्या सदयतेची व मोठेपणाची कीर्ती ऐकून व त्यावर विश्वसून मी क्रीडा करायला आलो असताना तू माझा घात करतो आहेस. अशा विश्वास घातक्याला वरल्याबद्दल भूमीला लाजच वाटते.'' असा मर्मभेदी उपहास हंस करतो व त्याची सुटका होते. मानवी मनोविकार धारण करणारा हा राजहंस ही पंडितांची हृद्य अशी नवनिर्मिती आहे. त्याची चतुरता व कृतज्ञताबुद्धी यांचे चित्रण वेधक आहे. दमयंती व नळराजा यांची व्यक्तिचित्रे बहारदार रितीने उतरली आहेत. दमयंतीची मर्यादाशीलता, तिचा विनय, तिचे निष्ठायुक्त प्रेम आणि याबरोबरच तिच्याजवळचे चातुर्य यांचे बारीक सारीक प्रसंगांतून होणारे दर्शन विलोभनीय आहे. स्वयंवराला इंद्रादि देव आले असता त्यांना ''तुम्ही मला पित्याप्रमाणे आहात. नलराजाच्या हाती माझा कर देऊन कन्यादान करा,'' असे दमयंती म्हणते. नलाची धीरोदात्तता अशीच तो दमयंतीला ''इंद्राला वर'' हा निरोप पाठवितो यातून व्यक्त झाले आहे. पंडितांनी स्वभाववर्णनासह नलाची विरहावस्था व दमयंतीची व्याकुळता रंगवून भावनाविष्कारही कौशल्याने साधला आहे. वस्तुचे-व्यक्तीचे यथातथ्य वर्णन करून स्वभावोक्ती साधणे हा पंडितांच्या कवित्वाचा आणखी एक विशेष ! नळाला राजहंस प्रथम दिसला. तेव्हाची कवीची स्वभावोक्ती आकर्षक आहे. जलविहाराने दमलेल्या राजहंसाचे वर्णन कवीने असे केले आहे -

**'त्यातील एक कलहंस तटीं निजेला। जो भागला जलविहार विशेष केला**

**पोटीच एक पद, लांबविला दुजा तो। पक्षी तनु लपवि; भूप तया पहातो'**

हा श्लोक स्वभावोक्तीचे सुंदर उदाहरण आहे. नळाच्या विरहाचे वर्णनही मार्मिक आहे -

**'भृंगे विराजित नवीं अरविंद पत्रें। पाहुनि मानुनि तिचीच विशाल नेत्रें**

**घालीन अंजन अशा मतिने तटाकीं। आहा वृथा उतरलो भिजलो विलोकी'**

अशा काही श्लोकांत रमणीय अर्थाचे प्रतिपादन आहे. नलासारखा रसिक, उदार, धीरोदत्त नायक, दमयंतीसारखी चतुर, विनयशील, नळनिष्ठ नायिका आणि या दोहोंना जोडणारा तो चतुर, सुवर्णमयी कलहंस यामुळे कथा व काव्य या दोन्ही दृष्टींनी हे काव्य विलोभनीय झाले आहे. उपमा, रूपक, श्लेष, अनुप्रास व अतिशयोक्ती अशा विविध अलंकारांनी हे काव्य नटले आहे. 'कठीण समय येता कोण कामास येतो' अशी सुभाषितात्मकताही इथे आहे. शार्दुलविक्रीडित, वसंततिलका, शिखरिणी, मालिनी अशा विविध वृत्तांची योजना केली आहे. प्रासात्मक लेखन व प्रदीर्घ सामासिकता यांमुळे प्रसादहानी झाली आहे. कुठे चमत्कृतीमुळे कृत्रिमता आली आहे. वि.पां. दांडेकर म्हणतात, ''पदलालित्य, सुंदर उपमा, विविध बहारीची वृत्ते यांमुळे हे काव्य महाराष्ट्रीयांच्या अत्यंत आवडीचे बनले आहे.'' रघुनाथ पंडितांनी रामायण–महाभारत हे आधार न घेता नैषधचरित या संस्कृत महाकाव्यांच्या आधारे आख्यानकाव्य लिहून कल्पनारम्य कलाविलासाचे ध्येय साकार केले. म्हणून नल–दमयंती स्वयंवर हे काव्य मराठी आख्यानक कवितेच्या इतिहासात एक महत्त्वाचा टप्पा आहे. आजही हे काव्य लोकप्रिय आहे.

## २.६ श्रीधर

ज्याची वाणी सुगम व सरस आहे आणि म्हणूनच ज्याची आख्यानकविता जनसामान्यांपर्यंत पोहोचून भक्तिक्षेत्रात उद्‌बोधन करू शकली, तो लोकप्रिय पंडित कवी म्हणजे श्रीधर होय. इ.स. १६५८ मध्ये त्यांचा जन्म तर इ.स. १७२९ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. हा आनंद संप्रदायी कवी धार्मिक वृत्तीचा होता. आजोबा व वडील यांच्याकडून लेखनाचा वारसा मिळाला होता. हरिविजय, श्रीरामविजय, पांडव प्रताप व शिवलीलामृत हे त्यांचे महत्त्वाचे ग्रंथ. शिवाय वेदांतसूर्य, श्रीपंढरीमहात्म्य, श्रीज्ञानेश्वरचरित्र व मल्हारी विजय ही छोटी प्रकरणे त्यांनी लिहिली. रामायण, महाभारत, अमरकोश, धर्मशास्त्र यांचा त्यांचा व्यासंग होता.

**हरिविजय :** इ.स. १७०२ मध्ये लिहिलेल्या या ग्रंथातील ओवीसंख्या ८१३९ इतकी आहे. श्रीकृष्णाच्या जीवनातील वैशिष्ट्यपूर्ण प्रसंग अनेक पुराणांतून निवडून काढून श्रीधरांनी हा ग्रंथ लिहिला. यशोदा व नंद यांच्याशी श्रीकृष्णाने केलेल्या बालक्रीडा, गोपीबरोबर केलेला रास, युद्धे, यांची वेधक वर्णने यात आली आहेत. सुढाळ निवेदन, सुगम भाषा आणि घरगुती वातावरण यांमुळे हा ग्रंथ सरस झाला आहे. उत्कट प्रसंग, भक्तीची बैठक, ओघवते निवेदन यांमुळे हा ग्रंथ वाचकांच्या मनात ठसतो. त्यात भागवताचे माहात्म्य गायिले आहे. ग्रंथवाचनाची फलश्रुती सांगणे हा श्रीधरांचा नित्याचा विशेष आहे.

''पुरुष हो अथवा नारी । कृपा न करितां श्रीहरी । व्यर्थ कष्टती ते संसारी । नाना दुःखे भोगिती।।'' असा सर्वसामान्यांना मानवणारा नीतिबोध या ग्रंथात आला आहे. ''हस्तीवरी हस्ती लोटिती । रथासी रथ लगटती।। जैशा जळधारा वर्षती। तैसे येती बाण वेगे।।'' असे आवेशपूर्ण युद्धप्रसंग कवी श्रीधर सहजपणे वर्णिताना दिसतात. (प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप प्रा. ह. श्री. शेणोलीकर – पृष्ठ १८७/१८८)

**श्रीरामविजय :** रावणाचे राक्षसी राज्य नष्ट करून श्रीरामाने मिळविलेल्या विजयाचे वर्णन हा या

ग्रंथाचा प्रमुख विषय होय. इ.स. १७०३ मधील हा ग्रंथ २१४७ ओव्यांचा आहे. श्रीरामाची थोरवी गाणे शक्ती बाहेरचे आहे, असे श्रीधर विनयाने म्हणतात. प्रारंभी गजाननास वंदन करुन पुढे श्रोत्यांना वंदन केले आहे. श्रीरामविजयाची कथा त्यांनी सुखान्त बनविली आहे. वाल्मिकीच्या तपश्चर्येच्या निमित्ताने या कथेतून श्रीधरांनी नाममाहात्म्य गायिले आहे. अग्नीप्रवेश करणारी सीता तेजस्वी होऊन बाहेर पडते. युद्धात मेलेले वानर जिवंत होतात - असे वर्णन श्रीधर करतात. सामान्यांना सहज पटणारे उपमा दृष्टांत श्रीधर योजितात. मूळ कथेत प्रसन्न बदल घडविणारा हा एकमेव पंडित कवी आहे. साधी व प्रवाही भाषा, समर्पक दृष्टान्त, श्रीधरांचा प्रसन्न व प्रेमळ दृष्टीकोन यांमुळे हे काव्य मनोवेधक झाले आहे. कवीचे प्रेमळ आणि सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व या काव्यात प्रतिबिंबित झाले आहे.

''की भ्रताराविण कामिनी। की अत्रिसुताविण रजनी। तैसे आत्मप्राप्तीवीण प्राणी। व्यर्थ नाडले संसारी'' असे सांसारिक दृष्टान्त दिल्याने हा ग्रंथ लोकमान्य झाला आहे. ''ज्या ओढवे संकट महाविघ्न। तरी तेणे करितां एक आवर्तन। तत्काळ संकट जाय निरसोन। वाते करून अभ्र जैसे।।'' असे फलश्रुतीचे आकर्षण श्रोत्यांसमोर ते स्वच्छ मनाने ठेवतात.

**पांडव प्रताप :** महाभारतातील पांडवांची जीवन कहाणी कुणालाही आकर्षित करील अशीच आहे. त्यांच्या जीवनातील संघर्ष व नाट्यपूर्ण प्रसंगातील त्यांचा धीरोदात्तपणा श्रीधरांच्या मनावर ठसा उमटवून गेला होता. पांडवांच्याच पराक्रमाची गाथा गाणे हा या काव्यामागचा उद्देश आहे. 'पांडव प्रताप ग्रंथ सुंदर। सकळ साहित्याचे भांडार।' असा त्यांनी ग्रंथ गौरव केला आहे. यातून त्यांनी समाजाला क्षात्र धर्माची जाणीव करून दिली आहे. चौसष्ट अध्यायांच्या या ग्रंथात १३३९७ इतक्या ओव्या आहेत. या विस्तृत ग्रंथातील पहिले पस्तीस अध्याय मुक्तेश्वरांच्या महाभारतावरून श्रीधरांनी सजविले आहेत. काही ठिकाणच्या कल्पना, वर्णने व शब्द एकसारखे वाटतात. दुष्यंत-शकुंतला भेट, दुर्योधनाच्या दुष्ट कृत्यांनी संतापलेली द्रौपदी हे प्रसंग उत्कट उतरले आहेत. श्रीधरांनी करुण, वीर व विनोद या रसांची निर्मिती केली आहे. हा सर्वात मोठा व लोकप्रिय ग्रंथ पंढरपुरात कवीने इ.स. १७४२ मध्ये पूर्ण केला.

श्रीधरांनी व्यास भारतच प्रमाण मानले आहे, असा इथे वारंवार उल्लेख केला आहे. 'दंतकथा सोडोनि सकळा। व्यास भारत आश्रय धरिला। प्रमाणकथा निर्मळा। निरुपित्या त्याच येथे।।' आपण प्राकृत कवीची कास धरली नाही, असे ते म्हणतात. त्यांचे हे म्हणणे यथार्थ नाही. कारण या रचनेसाठी मुक्तेश्वरांचे महाभारत त्यांनी आधाराला घेतले आहे. (मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड तिसरा - संपादक रा. श्री. जोग - पृष्ट १६९)

द्युतात हरल्यानंतर पांडवांसमोर दुर्योधन द्रौपदीस काय म्हणतो ते पाहा, ''जानु उघडी करून। द्रौपदीस दावी सुयोधन। म्हणे बैस अर्धांगी येऊन। पट्टराणी होई माझी।।' त्यावर रागावलेली द्रौपदी वाक्ताडन करते - ''तैशी ते पांडवललना। म्हणे चांडाळा दुर्योधना। गलितकुष्ठ भरोनि रसना। झडो तुझी पापिया।।' येथील दुर्योधन संवादातील कुत्सीतपणा व द्रौपदी संवादातील तेजस्वी आदेश लक्षणीय आहे. श्रीधरांच्या कथानिवेदन-चातुर्यामुळे हा पांडवप्रताप लोकप्रिय ग्रंथ झाला आहे.

**शिवलीलामृत :** इ.स. १७१८ मधील या ग्रंथात ओवीसंख्या २२६० आहे. स्कंदपुराणावर आधारीत या ग्रंथात शिवभक्तीपर कथा आहेत. 'ॐ नम: शिवाय' हा मंत्र दारिद्र्य, दु:ख, शोक यांचा संहारक असून मानवास तारक आहे, असे इथे सांगितले आहे. शिवमंत्र सामर्थ्यावर पापमुक्त झालेल्या दाशार्ह राजाची कथा, शिवरात्री माहात्म्य अशा अनेक कथांचा ग्रंथात समावेश आहे. यातील अध्याय मुळात चौदा आहेत. पंधरावा अध्याय श्रीधरभक्ताने जोडला असावा. शिवमंत्रावरील श्रद्धा व श्रीधरांची लोकमनाची पकड घेणारी ओघवती निवेदनशैली, यांमुळे या ग्रंथाची लोकप्रियता आजही टिकून आहे.

एकंदरीत श्रीधरांचे ग्रंथ त्यांच्या हयातीतच गावोगावी पोचले होते. घरोघरी पूर्वी अणि आजही त्यांची पारायणे झाली व होत आहेत. श्रीधरांकडे अलौकिक प्रतिभा नव्हती. पण विविध प्रसंगांची व भावनांची चित्रे त्यांनी चांगली रंगविली. 'आत्मप्राप्तीवीण साधन। जसे अलंकार गळसरीविण। कीं दीपाविण शून्य सदन। जीवनेंवीण सरिता जैसी।।' असा उपमा-दृष्टांतांचा सहजपणा त्यांच्या भाषेत आहे. एकनाथांच्या वृत्तीतील प्रेमळपणा व वाणीतील सोज्वळता हे विशेष श्रीधरी ग्रंथात सहज रम्यतेने प्रकटतात. गंगौद्यासम शांत, संथ कथाप्रवाह व शुद्ध भावमयता यांमुळे सांसारिकांना हे श्रीधरी ग्रंथ संजीवक वाटतात. भाविकता व प्रेमळपणा हा त्यांच्या वृत्तीचा विशेष असल्याने त्यांची वाणी विलक्षण गोड झाली आहे. संसारश्रांतांना आपली दु:खे विसरायला लावणे हेच श्रीधरांच्या ग्रंथांचे उद्दिष्ट असून तीच त्या ग्रंथांची फलश्रुती होय.

### २.७ निरंजन माधव

जन्म इ.स. १७०२ - मृत्यू इ.स. १७९०. बाजीराव व नानासाहेब पेशवे यांच्या काळात कर्नाटक, तंजावर इ. ठिकाणी पेशव्यांचे वकील म्हणून निरंजन माधवांनी काम केले. राजकारणाप्रमाणे आध्यात्मिक बाजुकडेही त्यांचे लक्ष होते. ते निरंजन संप्रदायाचे होते. माधव हे त्यांच्या पिताजींचे नाव. त्यांचे मूळ नाव बाबाजी. नोकरीमुळे देशभर प्रवास. नोकरीत असतानाच कवीस कवितेची प्रेरणा झाली. सांप्रदाय परिमल, चिद्‌बोध रामायण, सुभद्राचंपू, ज्ञानेश्वरविजय, मंत्ररामचरित्र, निर्वोष्ठ राघवचरित, वृत्तावतंस, वृत्तमुक्तावली, वृत्तवनमाला - अशी त्यांची रचना आहे.

कृष्णानंद सिंधु हा अध्यात्मपर ग्रंथ व ज्ञानसुधा हा निरंजन संप्रदायातील श्रेष्ठ ग्रंथ - हे दोन्ही निरंजन माधवांचे ग्रंथ आज उपलब्ध नाहीत. सांप्रदाय परिमल हा ग्रंथ त्यांनी आपल्या पत्नीस गुरूपरंपरा सांगण्यासाठी लिहिला. यात त्यांचे चरित्र आले आहे. लक्ष्मीधर बर्वे हे त्यांचे गुरू होते. त्यांच्या चरित्रात सूक्ष्म तपशील आला आहे.

'ज्ञानेश्वर विजय' हा ग्रंथ इ.स. १७६५ मधील असून त्यात सात अध्याय व १०३८ श्लोक आहेत. भिन्न भिन्न वृत्तांचे हे महाकाव्य आहे. नामदेवांच्या 'आदि' वर त्यातील पूर्वखंड तर 'समाधी' वर उत्तरखंड आधारीत आहे. काव्यात प्रासादिकता आहे. ग्रंथाचे बाह्यांग महाकाव्याचे असले तरी अंतरंग आख्यानकाव्याचे आहे.

निरंजन माधव ज्ञानेश्वरांचा गौरव करताना ह्या काव्यात म्हणतात - ''चित्ता चेतविसी मना मनविसी।

सर्वेंदियां चाळिसी। प्राणा हालविसी गुणा प्रकटिसी। विद्या स्वयें दाविसी।'' या रचनेत त्यांची ज्ञानेश्वरनिष्ठा व पंडिती विशेष ठळकपणे दिसून येतात.

'चिद्‌बोध रामायण' हे श्रीराम कथेवरील 'श्लोकबद्ध महाकाव्य कवीने इ.स. १७५८ मध्ये पूर्ण केले. आज त्याचे बालकांडच उपलब्ध आहे. त्यात ७ सर्ग व ४२२ श्लोक आहेत. ते विविध वृत्तांतील आहेत. त्यात 'अमृतध्वनी' हे नवे स्वत:चे वृत्त त्यांनी योजिले आहे. के. ना. वाटवे यांनी 'चिद्‌बोध रामायणीची श्लोकरचना अत्यंत प्रौढ व सरस असून महाकाव्याला शोभणारी आहे. असे म्हटले आहे. (पंडिती काव्य – संपादक डॉ. के. ना. वाटवे, डॉ. कुसुम कुलकर्णी – पृष्ठ २५).

निरंजन यांनी शंकराचार्यांच्या 'वाक्यसुधे'वर 'बोधप्रदीपिका' व स्वात्मनिरूपणा'वर 'अद्वैतामृत' अशा दोन गद्य टीका लिहिल्या. पेशवेकाळातील गद्याचे हे नमूने आहेत. त्यांनी छंद शास्त्राचा सखोल अभ्यास केला होता. त्यातूनच वृत्त मुक्तावली (इ.स. १७६१) व वृत्तवनमाला (इ.स. १७६७) या वृत्तपर ग्रंथांचा जन्म झाला. 'वृत्तावंतस' हा ग्रंथ मात्र महालक्ष्मीस्तोत्रपर आहे. वृत्तपर ग्रंथात प्रत्येक वृत्ताचे लक्षण, उदाहरण दिले आहे. या ग्रंथात कवीने बहुतेक सगळ्या वृत्तांची लक्षणे सोप्या रितीने दिली आहेत. उदा. 'मा मा गा गा विद्युन्माला। दो मार्गांनी योजी बाला।।' 'भुजंगप्रयाता घडे चौ यकारी। कवी जाणते योजिती या प्रकारीं।।' (प्राचीन मराठी वाङ्‌मयाचे स्वरूप – प्रा. ह. श्री. शेणोलीकर – पष्ठ २२३) भार्गवरामचरित्र, अद्वैबोध, यती–नृपति संवाद, अद्वैत भावना पंचदशी, वसिष्ठसुशर्मासंवाद अशी पाच स्फुट प्रकरणेही त्यांनी लिहिली आहेत. यती –नृपति संवाद हा राजा व संन्यासी मधील संवाद आहे.

निरंजन माधवांची स्तोत्ररचना विपुल असून तिच्यात रचनेची विविधता आहे. 'स्तोत्रसंग्रह' मध्ये २१ स्तोत्रे आहेत. यातील १३ स्तोत्रे देवांवर तर सहा स्तोत्रे देवतांवर आहेत. श्रीरामकर्णामृत (श्लोक १११), व्यंकटेश स्तोत्र (१०९), सांबशिवस्तुतीध्यान (श्लोक ७६) ही स्तोत्रे प्रदीर्घ आहेत. बाकीची स्तोत्रे ८ ते ५० शलोकांच्या आसपास आहेत. यांतील बरीचशी स्तोत्रे चमत्कृतीयुक्त आहेत.

त्यांच्या स्तोत्रांचा दुसरा गट लघुस्तोत्रांचाच आहे. 'स्वरूपानुभवाष्टक' या स्तोत्रात वेदांतनिरूपण आहे. 'श्रीनारायणाष्टका'त कृष्णस्तुती आहे. 'हनुमंत स्तोत्र' प्रासात्मकतेमुळे श्रुतिमनोहर झाले आहे. उदाहरणार्थ – 'मारुती रामभक्ताग्रणी स्तब्ध हा । ब्रह्मचर्ये विराजे सदा भव्य हा।। शांत हा दांत हा वीर हा शूर हा। दुष्ट रात्रिंचराच्या गणा क्रूर हा।।' यातील अनुप्रास रचनेमुळे हे स्तोत्र म्हणायला गोड वाटते. 'गोदावरी मानसपूजा' या स्तोत्रात पेशवेकालीन सामाजिक स्थितीचे दर्शन घडते. भागीरथी, तुलसी, मल्हारी, व्यंकटेश व हनुमंत यांच्यावरील स्तोत्रे, श्रीसद्‌गुरुस्तव, सांबशिवस्तुतिध्यान, रामकर्णामृत या स्तोत्रांची रचना प्रदीर्घ आहे. 'रामकर्णामृत' स्तोत्रात श्रीरामाचे शौर्य, धैर्य इ. गुणांचे आदरपूर्वक वर्णन केले आहे. कविमनातील भक्तिभाव व रसिकता या दोहोंचे दर्शन त्यांच्या स्तोत्ररचनांतून आढळते. काही ठिकाणी तत्कालीन स्थितीचे चित्रण आले आहे. विविध वृत्तांवर त्यांचे प्रभुत्त्व होते. रचना सफाईदार, काही स्तोत्रें भावमधुर.

मराठी काव्यात निरंजनांचे स्वतंत्र स्थान निर्माण झाले ते त्यांच्या 'सुभद्राचंपू' काव्यामुळे ! मराठीतील हे एकमेव चंपूकाव्य आहे. लेखन इ.स. १७६८. 'चंपू' ह्या संस्कृत साहित्य प्रकारात गद्य व पद्य यांचे मिश्रण असते. सात सर्गाच्या ह्या काव्यात संस्कृत महाकाव्याच्या अंतरंगाचे अनुकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. यातील गद्य विभाग म्हणजे 'चूर्णिका' होय. पद्याचे ३९७ श्लोक विविध वृत्तांतील आहेत. अर्जुन व सुभद्रा यांच्या विवाह कथेवर कवीने भावरम्यतेचा, नाट्यात्मतेचा व विदग्ध महाकाव्याचा सुंदर साज चढविला आहे. यातील प्रेम, विरह कालात्मक आहे. अर्जुन, सुभद्रा, कृष्ण व बलराम या व्यक्तिरेखांचा 'चौखांबी मंडप' कवीने उभा केला आहे. स्वभाव वर्णनात उत्कटता व प्रसंग चित्रणात नाट्यमयता आहे. सृष्टीवर्णनेही रम्य आहेत. उदा. ''प्रथम वर्षागम समयी। नानाद्रुमफलपक्व-भारभूषित नमितशाखा मंडित। खर्जुर जंबु जंबीर रसाल पनसाद्यनेक तरूवर नम्रशिर विनीतवत परम सादर। निज सेवनार्थ तत्पर विलोकित आनंदभरित नाना तरूकोटर स्थितवारणी-रसपानासक्त।'' येथील सृष्टीवर्णन समासप्रचूर झाले आहे. काव्यविलासात त्यांनी भक्तीचे सूत्र कुठेही सुटू दिले नाही.

निरंजन मधवांची रचना अशी विविध, विपुल व वैचित्र्यपूर्ण आहे. स्तोत्ररचना व प्रवासवर्णन यांच्या लेखनाने त्यांनी मराठी कविता समृद्ध केली. त्यांचे 'सुभद्राचंपू' काव्य तर मराठीत अद्वितीय आहे. त्यांनी अभिजात संस्कृत साहित्याच्या व्यासंगात कल्पनाशक्तीची जोड दिली व उत्तम पंडिती काव्य मराठीस दिले. म्हणून रघुनाथ पंडितांच्या श्रेणीत निरंजन माधवांचे स्थान आहे.

## २.८ मोरोपंत

मोरोपंत हे पंडिती परंपरेतील सर्वश्रेष्ठ व कालदृष्ट्या शेवटचे कवी होत. त्यांच्या ठायी परमेश्वर कृपेविषयी तळमळ, पांडित्य, रचनाचातुर्य, प्रचंड लेखनशक्ती, भगवच्चरित्र गायनाची गोडी अशा अनेकविध वैशिष्ट्यांचा संगम आढळतो. त्यांचा जन्म इ.स. १७२९ मध्ये तर मृत्यू इ.स. १७९४ मध्ये झाला. बालपण पन्हाळ्यात गेले. इ.स. १७५२ मध्ये ते बारामतीस बाबुजी नाईक यांच्याकडे पुराणिक म्हणून आश्रयास गेले. त्यावेळेपासून हयातभर त्यांनी उदंड कविता लेखन केले. त्यांच्या सर्वच कवितेची संख्या एक लाखाच्यावर जाते. काव्य, नाटक, छंद, अलंकार, पुराण, धर्मशास्त्र, कोश, सर्व मराठी कविता हे सारे त्यांनी काळजीपूर्वक वाचले होते. ते व्यासंगी अभ्यासक आणि कलाभिज्ञ कवी असल्याने त्यांची कविता गांभीर्य, अभिजातता व रचनेचा नेटकेपणा या गुणांनी मंडित आहे. लालित्यसंपन्न कवितेच्या माध्यमातून ईश्वराची भक्ती, अशी पंतकवितेची भूमिका आहे.

**काव्यलेखनाचे कालखंड :** पंतांची विपुल काव्यरचना क्रमाने वाढली आहे. त्याचे कालखंड पडतात. इ.स. १७५० ते १७६० हे दशक हा पहिला कालखंड. यात कुशलवोपाख्यान व शिवलीलावर्णनपर ब्रह्मोत्तर खंड, कृष्णविजय (पूर्वार्ध) व प्रल्हादविजय हे आख्यान -ही रचना झाली. इ.स. १७६१ ते ६६ - दुसरा कालखंड - यात पंतांनी श्लोकबद्ध आख्याने, कृष्णविजय (उत्तरार्ध), साररामायण, संशयरत्नमाला व काही स्तोत्रे यांचे लेखन केले.

इ.स. १७६६ ते १७७१ तिसरा कालखंड – आर्या – मंत्ररामायण, आर्यामुक्तमाला, आर्या केकावली, नामसुधाचषक, नामरसायन ही स्तोत्रे या काळात लिहिली. इ.स. १७७२ ते १७८१ – महाभारत रचना – गीतार्या–स्फूट प्रकरणे. इ.स. १७८२ ते १७९४ – मंत्रभागवत, संकीर्ण रामायण (१०८ रामायण) मंत्रमय रामायण, मंत्रमय भागवत, आख्याने, देवांची स्तोत्रे, श्लोक केकावली.

**कुशलवोपाख्यान :** १७५० सालातील ५०८ श्लोकांचे हे लक्षणीय पंडिती काव्य आहे. तेरा अध्यायांच्या या काव्यात संस्कृत प्राचुर्याचा अतिरेक, आलंकारिकता व प्रदीर्घ सामासिक शब्दरचना ह्या दोषांमुळे क्लिष्टता आली आहे. सीतात्याग व सीताशोक हे करूणरम्य प्रसंग आहेत. सीतेने लक्ष्मणास उद्देशून केलेल्या संवादात श्रीरामाचे व्यक्तिचित्रण सुंदर झाले आहे. मोरोपंत लिहितात –

**माथां रत्नकिरीट, कुंडलयुग, श्रोती विराजे बरे,**
**बाहु अंगदभूषणें विलसती, सन्मध्य पीतांबरे,**
**कंठी मौक्तिकहार, चंदनउटी अंगी, घनश्यामला**
**ऐशी राघवमूर्ति यावर कधी भेटेल वत्सा ! मला ?**

येथील स्वभावोक्ती अलंकार मनोहर आहे. राघवमूर्तीचे हे वेधक वर्णन लक्षणीय आहे. लव कुशाशी युद्ध करताना रामाच्या मन:स्थितीचे पंतांनी रेखाटलेले चित्र मनोवेधक झाले असून नाट्यपूर्ण बनले आहे.

**आर्याभारत :** पंतांच्या परिणत प्रज्ञेचा प्रभावी आविष्कार म्हणजे त्यांचे आर्याभारत. महाभारताचा आस्वाद श्रोत्यांना द्यावा ही भूमिका. संक्षेप–विस्तार कौशल्य, उत्तम कवित्वशक्ती व संयम या गुणांमुळे श्रीधर व मुक्तेश्वर यांच्यापेक्षा पंतांचे आर्याभारत अधिक उठून दिसते. मुळातील कथानकात असलेली विषयांतरे व सैलसर वर्णने काढून टाकून त्यांनी कथा प्रमाणशीर केली. राधेने कर्णासाठी केलेला विलाप, कर्णाबद्दल कुंती व धर्म यांनी केलेला विलाप पंतांच्या प्रतिभेचा सुंदर विलास आहे. उत्तरेचा विलाप करूणरसपूर्ण आहे. रसयुक्त प्रसंगनिर्मिती हे पंतांचे वैशिष्ट्य. शकुंतला, ययाती यांच्या आख्यानांच्या निमित्ताने आलेला शृंगार, भीमकृत दु:शासन–कीचन वध, भीष्म, द्रोण, कर्ण व विराट पर्वातील युद्ध वर्णनांतून निर्मित वीररस, वस्त्रहरणप्रसंगी द्रौपदीने केलेला धावा, अभिमन्यु वधानंतरचा अर्जुन, सुभद्रा व उत्तरा यांचा शोक, असे अनेक रस इथे निर्माण झाले आहेत. कर्ण, धृतराष्ट्र, द्रोण, अर्जुन, भीम, कुंती, द्रौपदी यांच्या मुळातील व्यक्तिरेखा पंतांनी उजळ केल्या आहेत. कर्ण–शल्य संवाद, कृष्ण कर्ण संवाद हे पंतांच्या मार्मिक संवाद लेखनाचे नमूने आहेत. कर्ण अर्जुनाला युद्धप्रसंगी धर्मयुद्ध नियमांचे पालन कर असे सांगत होता. ते ऐकून कृष्ण कर्णास म्हणाला –

**कृष्ण म्हणे, राधेया, भला बरा स्मरसि आज धर्माते।**
**नीच व्यसनीं बुडता निंदिती देवासि न स्वकर्माते।।**
**जेव्हा सभेसि नेली पांचाली मानिले व मनीं शर्म**

**तेव्हा गेला होता कोठे राधासुता तुझा धर्म।।**

कृष्णाच्या ह्या उद्‌गारात मार्मिकता आणि अजोड युक्तिवाद भरला आहे.

या पांडव कथेत वीररसाचा उत्कर्ष असला तरी तिला भगवत्प्रेमाचा दिव्य स्पर्शही आहे. काव्यातील प्रसंग रंजक आहेत. त्यात सदाचरणाचा बोध आहे. दया-क्षमा इ. सद्‌गुण व दुर्गुणांवर विचार मांडले आहेत.

**संकीर्ण रामायणे :** रामभक्त पंतांनी श्रद्धेने केलेले हे लेखन. ती १०८ आहेत. अशी अनेकांची समजूत. अद्‌भूत, दंडक, दाम, परंतु, पुण्य अशी अनेक रामायणे. मंत्र रामायण विशेष उल्लेखनीय 'मंत्ररामायणात' मोरोपंतांची भाषा प्रौढ व संस्कृतप्रचुर आहे. यातील कथा निवेदन ओघवते आहे. सीतेला रावणाने पळवून नेल्यावर रामाने केलेला हा शोक पहा -

**कोठे जनक सुते' तू गेलीस ? धरासुते ! प्रिये ! जाये !**

**न करी विनोद, जाला व्याकुळ अत्यंत देह माजा, ये.**

**तू काय कोप धरिला अपूर्व मृग नाणिला म्हणून मनी ?**

**तरि चंद्रमृगहि आणुनि देइन, हे तूं असत्यसें न मनीं.**

रामायण रचनेत पंतांनी स्वत:वर अशी बंधने घाालून घेतली आहेत. कोठे मंत्र साधले आहेत. कोठे केवळ लघु अक्षरेच योजिली आहेत. प्रत्येक आर्येत कोठे कोठे 'धन्य', 'परंतु' असे शब्द योजिले आहेत. कित्येक रामायणात ऋषींची, राजांची व तीर्थक्षेत्रांची नांवे गुंफली आहेत. यात चमत्कृती आहे. तशी कृत्रिमता आहे. त्यांच्या रामभक्तीचा उमाळा पांडित्यातून प्रगटला आहे.

**भागवती प्रकरणे :** ध्रुवचरित्र, वामन चरित्र, अंबरिषाख्यान ही उल्लेखनीय आख्याने आहेत. भागवतावरील ही छोटी रचना नेटकी आहे. या आर्या ३३३ नाममंत्रांत गोविल्यामुळे त्याला मंत्रभागवत म्हणतात. ते सरस आहे. त्यातील पहिल्या नऊ स्कंधात पंतांनी बराच संक्षेप केला आहे. मंत्रभागवतात कृष्णचरित्राखेरीज दक्षयज्ञ, ध्रुवकथा, नहुषकथा, प्रल्हादचरित्र, गजेंद्रमोक्ष, समुद्रमंथन, शर्मिला-देवयानी कथा इ. कथा असल्याने वाचक रंगून जातो. पंतांनी रासक्रीडावर्णन अत्यंत संयमाने केले आहे. ते म्हणतात;

**वनितांसह मग तितुक्या मूर्ति धरूनी स्वयें करी रास.**

**गोपी चुंबिती, हुंगिती, आलिंगिती, सुंदरा शरीरास.**

दशमस्कंधात कृष्णलीला वर्णन असल्याने तो मोठा झाला आहे. ही भक्तिप्रवण अशी सुंदर आख्याने आहेत. काही आख्यानांची रचना स्वतंत्र आहे. नारायणकथा, दत्तात्रेयांचे चोवीस गुरू या कथांवर त्यांनी विशेष भर दिला आहे. उद्धवगीतेचा अकरावा स्कंध संक्षेपाने मांडला आहे.

'**कृष्ण विजय**' हा ९० अध्यायांचा ३६७० श्लोकांचा विविध वृत्तांतील काव्यग्रंथ आहे. भागवताच्या दशम स्कंधावरील हे विस्तृत भाष्य आहे. येथील कथाकथन समर्पक संभाषणे व उचित विशेषणे यांमुळे रोचक झाले आहे.

**स्फूटकविता :** 'श्लोक केकावली हे पंतांचे अखेरचे काव्य. यात रचनेची चमत्कृती आहे आणि भावनांची उत्कटता आहे. धिटाई, दुषणे, विश्वास व संतुष्टता हे भक्तीचे तरंग इथे उमटले आहेत. इथे पंतांचे चतुर युक्तिवाद व कुशल संवाद आहेत. पंतांनी इथे ईश्वराशी प्रेमळ वादविवाद करून विनयशीलता पत्करली आहे. त्यात कल्पकतेचा रमणीय आविष्कार आहे. यातील परमेश्वर स्तुती पौराणिक थाटाची नाही. त्यात अभिजात संस्कृताचे देखणेपण आहे. यातील कितीतरी केका जुन्या पिढीच्या तोंडात घोळत असतात. 'दयामृतघना अहो हरि ! वळा मयुराकडे;। रडे शिशु, तयासि घे कळवळोनि माता कडे। असा अतिथी धार्मिक स्तुतपदा ! यदा सापडे ? तुम्हां जड भवार्णवी उतरितां न दासां पडे।।' ही स्वत:च्या उद्धारविषयक केलेली प्रार्थना वेधक आहे.

'**आर्याकेकावली**' श्रीरामास उद्देशून लिहिलेली आहे. यातील निवेदन उत्कट व ओघवते आहे. यातील श्रीराम आणि कृष्णाच्या रूपाने अवतार धारण करणाऱ्या त्या अनंत तत्त्वाचे सगुण सुंदर चित्र व त्यांच्या सावळ्या रंगांची मीमांसा कल्पनारम्य आहे. पंत म्हणतात

**''श्रीरामा ! तू स्वामी अससी माज्या शिरावरी जागा ।**
**आम्हांसि तुझ्या, पायांवाचूनि निर्भय नसे दुजा जागा''**

ह्या दृढ श्रद्धेने व श्रीरामावर भिस्त ठेवून पंतांनी हे लिहिले आहे. राम आणि कृष्ण हे दोघेही सावळे आहेत. ते दोघेही शिवाचे आवडते आहेत. म्हणून ते सावळे आहेत. भावनेच्या खोलीमध्ये हे काव्य भिजले आहे.

याशिवाय नामसुधाचषक, नामार्या, नामरसायन, संशयरत्नावली, गुरुस्तुतिमुक्तांजली, पतिव्रताकीर्तन, सन्मनोरथराजी, प्रश्नोत्तरमाला अशी बरीच स्फुटकाव्ये पंतांनी लिहिली आहेत. नामसुधा चषकात नामाचे माहात्म्य, सन्मनोरथराजीत सज्जनांच्या मनोरथांची माला, संशयरत्नावलीमध्ये ईश्वरदर्शनाची उत्सुकता आहे. ही सर्वच स्तोत्रे सरस, प्रेमळ मनोहारी व उदात्त आहेत.

पंतांची साधी व प्रासादिक रचना म्हणजे स्त्रीगीते. सीतागीत, सावित्रीगीत, आणि रुक्मिणीगीत ही ओवीबद्ध रचना सुबोध व रसाळ आहे. सीतागीतात सीता वनवासातील आठवणी सांगताना दिसते. सावित्रीगीतात सावित्रीने पतीला यमाच्या पाशातून सोडवून घरी नेले, हे वृत्त आले आहे. रुक्मिणीगीतात कृष्णाने रुक्मिणीचे हरण करून केलेल्या विवाहाचे चित्रण आहे. साधेपणा, स्त्रीसुलभता आणि प्रासादिकता ही या स्त्रीगीतांची वैशिष्ट्ये आहेत.

'सीतागीता'मध्ये सीता वनवासातील आठवणी सांगते. ती म्हणते –

**''बाई ! काय सांगो । स्वामींची ती दृष्टी। अमृताची वृष्टी। मज होय।।**
**अत्रींच्या आश्रमीं। नेले मजवाटे। माहेरचि वाटे। रखेखुरे।।''**

यात श्रीरामसीता प्रेमाचे लोभस चित्र रसिकाच्या मनात घर करुन राहते. 'रुक्मिणीगीता'तील रुक्मिणी स्त्रीसुलभ भाषेत बोलते. रुक्मिणीहरण प्रसंगी अंबालयात कडेकोट पहारा करणाऱ्या सैनिकांचे वर्णन करताना

ती म्हणते -

> **''जे मज भोवते। होते उभे मेले। अंबेने ते केले। वेडे सर्व।।**
> **गळाली मेल्यांच्या। हातींची हातेरे। पळांत मातेरे। झाले त्यांचे।।''**

**आर्यापती मोरोपंत –** पंतांचे काव्य विराट आहे. त्यांची पाऊण लाख रचना आर्यावृत्तातच आहे. महाभारत, रामायण व भागवत हे त्यांच्या काव्याचे आधार असले तरी ह्या शब्दप्रभूने मूळ कथांना स्वत:च्या कल्पनेने नवा आकार दिला. त्यांचे संक्षेप–विस्तार–चातुर्य लक्षणीय आहे. त्यांचे कथाकथनकौशल्य परिणामकारक आहे. त्यांची आख्याने त्यांच्या काळात लोकप्रिय झाली. आर्याभारत हे त्यांचे स्वतंत्र असे विश्व आहे. 'ज्या दिवशी हरिचरित–श्रवण नसे, त्यात मज दहा दुखणी' असे कृष्णावर प्रेम व्यक्त करणारी व त्यांची वाट पाहणारी रुक्मिणी, कीचकापासून सुटका व्हावी म्हणून भीमाच्या पौरुषाला आवाहन करणारी द्रौपदी, 'तेव्हा कोठे गेला होता राधासुता तुझा धर्म' असे कर्णाला विचारणारा कृष्ण, 'हासत कर्म करावे भोगावे रडत तोचि परिणामी' असे सत्य सांगणारा श्रीराम अशा व्यक्तिरेखांना पंतांचा वेगळाच रंग आहे. किरात – अर्जुन युद्ध, भीम–जरासंघ युद्ध, द्रौपदीवस्त्रहरण इ. प्रसंगांतील नाट्य त्यांनी कुशलतेने उभे केले आहे. वीररसपूर्ण वर्णन हा तर पंतांचा हातखंडा विषय होय. काही प्रसंगांना त्यांनी चित्रमय रुप दिले आहे. नाट्यपूर्ण व खटकेबाज संवाद हे पंतांचे खास वैशिष्ट्य. संवादात विनोद व उपहास आहे. उपमा, उत्प्रेक्षा, श्लेष, अर्थांतरन्यास इ. विविध अलंकारांनी पंतांचे काव्य नटले आहे. पंतांनी आपल्या कवितेतून समाज मनावर भक्तीचे, नीतीचे व जीवनविषयक जाणिवांचे संस्कार केले आहेत. त्यामुळे ते समाजाचे नीतिशिक्षक ठरतात.

पंत कवितेत काही दोषही आहेत.यमकासक्तीमुळे काही आर्या निरस झाल्या आहेत. अलंकारांच्या हव्यासापोटी काही ठिकाणी सौंदर्यहानी झाली आहे. उदाहरणार्थ

> **चिकित्सक भला भला म्हणूनि फार वाखाणिला,**
> **जरी बहुजनामयद्रुम समुळही खाणिला,**
> **तथापी अतिदु:खह स्वगद शत्रुच्या अत्यया,**
> **विना न हृदयी वरी सरूज पामर प्रत्यया.**

श्लोक केकावलीमधील या आर्येचा अर्थ लावताना मोरोपंतांच्या यमकासक्तीमुळे रसिकांची दमछाक होते. वास्तविक स्त्रीगीते लिहिणारे मोरोपंत सहज सुंदर लेखणी लिलया पेलतात. पण यमकाच्या व्यसनामुळे काव्यातील रसपरिपोष कुठेतरी अडून राहतो. शब्दांशी झटापण करूनच अर्थ लावावा लागतो. म्हणून ही कविता क्लिष्ट व दुर्बोध वाटते. काही ठिकाणी सामासिक शब्दयोजनेमुळे क्लिष्टता व दुर्बोधता आली आहे. मराठी राज्यात पानिपत घडूनही पंत त्याची दखल घेत नाहीत. मराठी कवितेला मात्र शुद्ध भाषेचे लेणे त्यांनीच बहाल केले. त्यांनी प्रदीर्घ रचना करून मराठी कवितेत आर्यावृत्त रुजविले. पंतांच्या आर्येची पकड पुढे शंकर सव्वाशे वर्षे राहिली. पंडिती काव्याचे बहुतेक सारे गुणविशेष त्यांच्या काव्यसृष्टीत असल्याने ती पंडिती संप्रदायाचा कळसाध्यायच ठरते. संस्कृतप्रचुर प्रौढ व गंभीर भाषाशैली, अलंकारप्रचुर रचना,

यमकरचनेचा हव्यास ह्या आख्यान कवितेच्या विशेषांचा प्रकर्ष मोरोपंतांच्या काव्यात दिसतो. मराठीतील अभिजात काव्याच्या युगाचा कळस म्हणून यथार्थतेने मोरोपंत हेच शोभतात.

## २.९ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न आणि उत्तरे

**एका वाक्यात उत्तर लिहा.**

१. वामन पंडितांचे गुरू कोण ?

**उत्तर :** वामन पंडितांचे गुरू सच्चिदानंद होत.

२. वामन पंडितांनी 'भामाविलासांत कोणाचे चित्र रेखाटले आहे.

**उत्तर :** वामन पंडितांनी 'भागाविलासा'त श्रीकृष्णावर रागावलेल्या सत्यभामेचे चित्र रेखाटले आहे.

३. रघुनाथ पंडितांचे 'गजेंद्रमोक्ष' हे आख्यान कशावर आधारित आहे ?

**उत्तर :** रघुनाथ पंडितांचे 'गजेंद्रमोक्ष' हे आख्यान भागवतावर आधारलेले आहे.

४. श्रीधर स्वामींना ग्रंथ लेखनाचा वारसा कुणाकडून मिळाला ?

**उत्तर :** श्रीधरस्वामींना ग्रंथ लेखनाचा वारसा आजोबा व वडील यांच्याकडून मिळाला.

५. निरंजन माधव यांनी 'सांप्रदाय परिमल' ग्रंथ लिहिण्यामागचे प्रयेजन काय ?

**उत्तर :** आपल्या पत्नीला गुरू परंपरेची हकीकत सांगण्यासाठी निरंजन माधव यांनी 'सांप्रदाय परिमल' ग्रंथ लिहिला.

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. ''मुक्तेश्वर हे श्रेष्ठ दर्जाचे प्रतिभासंपन्न कवी आहेत.'' विशद करा. किंवा
मुक्तेश्वरांच्या वाङ्मयीन कामगिरीचा परामर्श घ्या.

उत्तरासाठी सदर घटकातील **२.२.३** हा भाग पहा.

२. 'मोरोपंत हे पंडित परंपरेतील सर्वश्रेष्ठ कवी आहेत' हे स्पष्ट करा. किंवा
कवी मोरोपंतांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा आढावा घ्या. किंवा
''रसोत्कर्ष, कल्पनाविलास व वर्णनचातुर्य याबाबतीत मोरोपंतांची प्रतिभा सिद्ध हस्त आहे'' - कसे ते सांगा.

उत्तरासाठी सदर घटकातील २.२.८ हा भाग लिहा.

**लघुत्तरी प्रश्न**

१. वामन पंडितांच्या आख्यान कवितेचे विशेष स्पष्ट करा.

**प्रास्ताविक :** एकनाथांची टीकात्मक व आख्यानपर लेखनाची परंपरा चालविणारे शिवकालातील अग्रेसर कवी – निगमसार ग्रंथात गुरू सच्चिदानंदांकडून प्राप्त भार्गवी वारूणी विद्येचे विवेचन – यथार्थदीपिका-गीतेतील तत्त्वज्ञान यथार्थतेने मांडणारा ग्रंथ.

**विवेचन :** आख्यान रचना पुष्कळ-रामजन्म, सीतास्वयंवर इ. रामायणी प्रकरणे, कृष्णजन्म, बालक्रीडा, मुकुंदविलास, रासक्रीडा, कंसवध इ. भगवती आख्याने-गजेंद्रमोक्ष, शुकरंभासंवाद इ. अन्य आख्याने, आध्यात्म हेच अधिष्ठान-सगुणोपासक ही भूमिका अद्वैत भक्तीचा प्रसार-भक्तीचा महिमा-रसवत्ता, वर्णनचातुर्य व नादमाधुर्य-वाणी विविध रसात रंगते – वर्णन चातुर्य बहारीचे-भाषाप्रभुत्व-वृत्तवैचित्र्य –

**समारोप :** आख्यान रचनेत अशुद्ध भाषा, शब्दांची विकृत रुपे, दुर्बोध वाक्यरचना. ठराविक यमकानुप्रास पुनरुक्ती हे दोष. तरीही 'सुश्लोक वामनाचा' वामन पंडित सहृदय, रसिक, रचनाकुशल.

२. रघुनाथ पंडितांच्या 'दमयंती स्वयंवर' काव्याचा परिचय करून द्या.

**प्रास्ताविक :** रघुनाथ पंडित शिवकालीन, विद्वान, सुसंस्कृत, व्यवहारदक्ष, राजदरबारात वावरलेला, रामभक्त, 'रामदासवर्णन' ही स्फूट रचना म्हणून रामदासशिष्य.

**विवेचन :** हर्षाच्या नैषधीय चरित्राच्या आधारे 'नल-दमयंती स्वयंवर' काव्य रचना, 'कठीण समय येता कोण कामास येतो' व 'औषध न लगे मजला' हे मुळात नसलेले प्रसंग बहारीचे – दमयंती, हंस, नल-उत्तम स्वभावचित्रे -नल-हंस, हंस-दमयंती-आकर्षक संवाद-भाषा संस्कृतप्रचुर – अलंकार मंडित – रेखीव वर्णन-प्रवाही निवेदन-सुटसुटत बांधणी.

**समारोप :** नाजुक कलाकुसर – नाजुक कल्पनाशक्ती-मानवी मन धारण करणारा हंस ही हृद्य नवनिर्मिती – उत्तम स्वभावोक्ती – उद्यानवर्णन – कुंडिनपूरवर्णन सांकेतिक-रसवत्ता व अलंकारवैभव या दोन्ही बाजुंनी हे काव्य उत्कृष्ट उतरले आहे.

**टिपा लिहा.**

१. श्रीधराच्या ग्रंथाचे वाङ्मयीन विशेष :

श्रीधर-आनंद संप्रदायी कवी-लोकप्रिय ग्रंथकार-ग्रंथांची आजही पारायणे-रामायण, भागवत, महाभारत व अन्य पुराणांतीलआख्यानांचा संक्षिप्त सुबोध, रसाळ,अनुवाद – श्रीकृष्णाच्या जीवनातील वेचक प्रसंगांवर आधारित 'हरि विजय' ग्रंथ, बालक्रीडा, रासक्रीडा, युद्धे, वेधक वर्णन श्रीरामाने रावणावर मिळविलेला विजय 'श्रीरामविजय' ग्रंथात वर्णिला आहे. गणेश श्रोतृ वंदन – नाममाहात्म्य-प्रवाही भाषा, पांडवांची जीवनकथा 'पांडव प्रताप' ग्रंथांत आली आहे. 'शिवलीलामृत' ग्रंथात शिव भक्तीपर अनेक कथा. सर्वच काव्यात – प्रसंगचित्रे उठावदार – उपमा दृष्टांतांचा सहजपणा, शांत कथाप्रवाह, शुद्ध भावनाशील-लेखणी प्रेमळ, सोज्वळ. भाषा गोड-सरस, वाचकावर मोहिनी घालणारी-ज्ञानेश्वरचित्र-मल्हारी विजय ही छोटी प्रकरणे-त्यातून श्रीधरांचे व्यासंगी व प्रेमळ व्यक्तिमत्त्व दिसते.

२. निरंजन माधव यांची स्तोत्ररचना :

निरंजनांचा २१ स्तोत्रांचा 'स्तोत्रकलाप' हा ग्रंथ तेरा स्तोत्रे राम, विठ्ठल, शंकर इ. देवांवर तर ६ स्तोत्रे भवानी, लक्ष्मी, तुळशी इ. देवतांवर – त्यात श्रीरामकर्णामृत्त – व्यंकटेश स्तोत्र व सांबशिवस्तुतीध्यान – ही ३ दीर्घ स्तोत्रे – या सर्वांत भक्तिभाव कमी. रचना चमत्कृती जास्त – 'मंत्ररामचरित्र'मध्ये रामकथा – 'निर्वोष्ट राघव-चरित्र' चित्रकाव्य. 'स्वरूपानुभवाष्टक' मध्ये 'अहं ब्रह्मास्मि' या महावाक्याचे विवरण – श्रीनारणाष्टकस्तोत्र – 'श्री हनुमंतस्तोत्र – अनुप्रासरचनेमुळे गोड – सांबशिवाष्टक – भवान्यष्टक – दोन्ही स्तोत्रे दीर्घ समासांची. संस्कृत शब्दांची गर्दी – क्लिष्ट व दुर्बोध – 'श्री गोदावरी मानसपूजा' भावार्थ व आलंकारिक शब्दयोजना यांमुळे सरस – 'बनशंकरी' मध्ये कवीची दैन्यावस्था – 'महालक्ष्मी स्तोत्र' निर्दोष व कर्णमधुर' – 'श्री ज्ञानेश्वराष्टक' रम्य – कवीचा उत्कट भाव, आत्मोद्धाराची तळमळ व शरणागत वृत्ती यांमुळे स्तोत्रे भावपूर्ण पांडित्य व रचनाकौशल्ये संस्कृत गणवृत्ते – शब्दप्राचुर्य – दीर्घ समास यांमुळे रचना ओजोगुणयुक्त शब्दप्रभुत्व, अर्थगांभीर्य व पदलालित्य. त्यांमुळे भारदस्तपणा – भक्तिरस चांगला.

## २.१० सरावासाठी प्रश्न :

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. महाराष्ट्र साहित्यातील कोहिनूर कोण ?

२. वामन पंडितांच्या 'वनसुधा' आख्यानात कोणता विषय मांडला आहे ?

३. रासक्रीडा व कंसवध ही वामन पंडितांची आख्याने कशावर आधारित आहेत ?

४. श्रीधरांच्या ग्रंथांचा आजच्या काळातील विशेष कोणता ?

५. निरंजन माधव यांच्या 'ज्ञानेश्वरी विजय' या महाकाव्याचा विशेष कोणता ?

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. ''मुक्तेश्वरांचे महाभारत म्हणजे 'महाराष्ट्र साहित्यातील कोहिनूरच'' ह्या विधानाची चिकित्सा करा.

२. ''मोरोपंतांच्या सर्व रचनेत आर्याभारत हे महाभाव्य त्यांच्या काव्यमालेचा मेरूमणीच ठरेल.'' चर्चा करा.

**लघुत्तरी प्रश्न**

१. ''वामन पंडितांच्या 'पंचसुधा' म्हणजे श्रीकृष्णभक्तिपर प्रकरणेच होत.'' कशी ते सांगा.

२. श्रीधरांच्या 'श्रीरामविजय' ग्रंथाचा परिचय करून द्या.

**टिपा लिहा.**

१. निरंजन माधव यांचे 'सुभद्राचंपू' काव्य.

२. मोरोपंतांची स्त्री गीते.

## २.११ समारोप

पंडित कवींनी महाभारत, रामायण व भागवत यांतील निवडक आख्याने घेऊन त्यावर कलापूर्ण रचना केली. सतराव्या शतकात मुक्तेश्वर, वामन पंडित, रघुनाथ पंडित, श्रीधर, सामराज, नागेश, विठ्ठल, आनंदतनय, निरंजन माधव, व मोरोपंत या कवींनी पंडिती काव्य समृद्ध केले. मुक्तेश्वर हे पंडिती काव्याचा प्रारंभ करणारे पहिले कलाकवी. संक्षेप रामायण, महाभारताची पाच पर्वे. हरिश्चंद्राख्यान, शुकरंभासंवाद इ. आख्याने ही यांची काव्यरचना. निसर्ग, व्यक्तिमन, प्रसंग, समाज असे कोणतेही वर्णन मनोहर व प्रभावी करणारी कसदार प्रतिभा त्यांच्याकडे होती. निगमसार, समश्लोकी टीका, यथार्थदीपिका हे ग्रंथ आणि अहिल्योद्धार, कंसवध इ. अनेक आख्यानांचे कर्ते वामन पंडित हे पंडित कवींचे प्रातिनिधीक कवी आहेत. 'नल दमयंती स्वयंवर' हे गुणवत्ताप्रधान आख्यानकाव्य लिहून त्यांनी पंडिती काव्यातील एक टप्पा ओलांडला. हरिविजय, श्रीराम विजय, पांडव प्रताप व शिवलीलामृत ह्या ग्रंथांची आजही पारायणे केली जातात असे सर्वांत लोकप्रिय पंडित कवी श्रीधर हेच ठरतात. सांप्रदाय परिमल, चिद्‌बोध रामायण, ज्ञानेश्वर विजय इ. ग्रंथ व स्फूट आख्याने ही रचना करणारे निरंजन माधव 'सुभद्राचंपू' हे मराठीतील एकमेव चंपूकाव्य लिहिणारे कवी आहेत. आर्या हे वृत्त आपल्या बहुतांशी काव्यात वापरून महाभारत रचना करून अमर झालेल्या मोरोपंतांनी 'केकावली' हे रसाळ काव्य लिहिले आहे. पंडिती काव्यातील हे सर्वश्रेष्ठ व कालदृष्ट्या शेवटचे कवी होत. विविध वृत्तांतील आलंकारिक रचना हे या सर्व कवींच्या काव्याचे स्वरूप होते.

## २.१२ अधिक वाचन

पंडिती काव्य : संपादक डॉ. के. ना. वाटवे, डॉ. सौ. कुसुम कुलकर्णी.

प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास : भाग चौथा, भाग पाचवा – अ. ना. देशपांडे

मराठी वाङ्‌मयाचा इतिहास : खंड तिसरा – संपादक रा. श्री. जोग.

प्राचीन मराठी वाङ्‌मयाचे स्वरूप : ह. श्री. शेणोलीकर.

प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास : ल. रा. नसिराबादकर.

## २.१३ उपक्रम

दूरचित्रवाणीवरील 'महाभारत' मालिकेची ध्वनिचित्रफित पहा.

चातुर्मासात पांडव प्रताप, शिवलीलामृत इ. ग्रंथांचे पारायण केले जाते. त्यावेळी उपस्थित राहून त्यावरील निरूपण ऐका.

मुक्तेश्वरांच्या महाभारताची शक्य ती पर्वे वाचा.

निरंजन माधवाचे 'सुभद्राचंपू' हे काव्य मिळवून वाचा. 'चंपूकाव्याचे' स्वरूप समजून घ्या.

मोरोपंतांचे 'आर्याकेकावली' हे काव्य मिळवून वाचा. त्यातून आर्यावृत्ताची रचना समजून घ्या.

❑❑❑

# घटक : ३

## शाहिरी काव्याचे स्वरूप : पोवाडा व लावणी या काव्यप्रकारांचा परिचय शाहिरांच्या वाङ्मय सेवेचा परिचय : अनंत फंदी, परशराम, रामजोशी, सगनभाऊ, होनाजी बाळा

### ३.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो ! मराठी वाङ्मयाच्या इतिहासातील 'शाहिरी काव्य' ह्या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास;

- मराठेशाहीतील शाहिरी काव्याचा परिचय होईल.
- मराठेशाहीतील पोवाड्यातील वीररस व लावण्यांमधील शृंगाररस यांचा आस्वाद घेता येईल.
- शाहिरी काव्यातून मराठी समाजमनाचे व्यक्त झालेले भावजीवन कळेल.
- शाहिरी काव्यातील शूर पुरुष, ऐतिहासिक प्रसंग, मराठा गडी व मराठमोळी स्त्री यांचे स्पष्ट दर्शन घडेल.
- मराठेशाहीतील मराठी भाषेचे स्वरूप कळेल.

### ३.१ प्रास्ताविक

संतांच्या आध्यात्मिक व पंतांच्या पंडिती कवितेपेक्षा वेगळी व स्वतंत्र धाटणीची कविता म्हणजे शाहिरी कविता होय. 'मराठी काव्याची प्रभात' किंवा 'मराठ्यांची खरी गाणी' अशी शाहिरी काव्याची ओळख आहे. संतांनी लोकजीवनात ईश्वरभक्तीचा सुगंध पसरला. त्यांची दृष्टी आध्यात्मिक होती. रामायण, महाभारत, भागवत व अन्य पुराणे इ. ग्रंथांतील कथांचे संक्षिप्त, सुबोध व ओवीबद्ध अनुवाद पंडित कवींनी वाचकांसमोर ठेवले. कल्पनाविलास आणि आलंकारिकता यांमध्ये पंडिती कविता अडकली. शाहीर आणि शाहिरी वाङ्मय म्हणजे विशिष्ट प्रकारची कविता करणारे कवी आणि त्यांचे काव्य होय. हे दोन्ही मराठी संस्कृतीतीलच आहेत. ''शाहीर लोकजीवनात पुरते समरसले होते. आध्यात्मिकतेचा त्यांना थोडा फार स्पर्श झाला असला तरी तो त्यांचा स्थायीभाव नक्कीच नव्हता. लोकजीवनातील विविध प्रसंग, समोर जीवावर उदार होऊन पराक्रम करणारे वीर पुरुष आणि आपल्या रुपगुणसौंदर्याने मोह घालणाऱ्या रुपयौवना यांचे प्रेमोत्कट भाव; भोवतालच्या वातावरणातील रगेलपणा आणि रंगेलपणा व त्यातून प्रत्ययाला येणारे असंख्य प्रसंग या साऱ्यांच्या संस्कारांतून शाहिरांची कविता जन्माला आली आहे. लोकांच्या भावना, लोकांच्या शब्दांत, लोकांसाठी मांडणारे शाहीर, हे लोककवी होते. ऐहिक जीवनाचा त्यांना अपार लोभ होता. संसाराची लालसा होती आणि पराक्रमाची बेहोशी होती. त्यामुळे समकालीन

जीवनाचा प्रत्यय शाहिरी कवितेतून पुरेपूर येतो.'' (ल. रा. नसिराबादकर : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास - पृष्ठ २६१) वि. पां. दांडेकर यांच्या मते ''मराठ्यांचे मनगट, मराठ्यांचे मन, मराठ्यांच्या भावभावना, मराठ्यांचे आचार विचार, मराठ्यांचा पोशाख आणि मराठ्यांचा मानधनी मोठेपणा या सर्वांचे प्रतिबिंब लावण्यांत व पोवाड्यांत उत्तम प्रकारे पडले आहे. हे खरे मराठी काव्य होय.''

## ३.२ विषयविवेचन

शाहिरी कवितेचे दोन भाग आहेत. पोवाडे आणि लावण्या. विद्यार्थी मित्रांनो ! पोवाडे आणि लावण्या ह्या शाहिरी कवितेच्या प्रकारांचे स्वरूप आपण यथाकाल समजून घेणारच आहोत. पोवाडा म्हणजे शूरांच्या शौर्याचे, विद्वानांच्या बुद्धिमत्तेचे व सामर्थ्याचे काव्यात्मक वर्णन होय. यात स्तुती केलेली असते. म. ना. सहस्रबुद्धे हे पोवाड्यास 'कीर्तीकाव्य' म्हणतात. मराठी प्रदेशात कुलधर्माच्या वेळी गोंधळ घालण्याचा प्रकार फार जुना आहे. या गोंधळातूनच पोवाडा विकास पावला आहे. शिवकालातील आणि पेशवेकालातील ही राष्ट्रीय कविता होय. पहिला पोवाडा शिवकालात रचला गेला आहे.

लावणी ही सामान्य जनांच्या मनोरंजनासाठी रचलेली असते व सादरही केलेली असते. नवे नवे प्रदेश जिंकण्यासाठी बाहेर पडलेल्या तरूण शिपाई वर्गाचे मन ताजेतवाने करण्यासाठी व त्यांच्या जीवनात नवे रंग भरण्यासाठी शाहिरांनी लावण्यांची रचना केली. स्त्री-पुरुषरूपसौंदर्याचे व त्यांच्या शृंगाराचे वर्णन शाहिरांनी अगदीच वेगळ्या ढंगाने केले आहे. पोवाड्यात वीररस तर लावण्यांत शृंगाररस व्यक्त होतो.

पोवाडा आणि लावणी हे दोन्ही कविता प्रकार श्राव्यकाव्य नव्हे; तर ते दृश्यकाव्यही आहे. हे दोन्ही कविताप्रकार श्रोतू समुदायासमोर शाहीर सादर करतात. त्या दृष्टीने ते प्रांगणीय काव्यप्रकार आहेत. अनंत फंदी, परशराम, रामजोशी, प्रभाकर, सगनभाऊ व होनाजी बाळा ह्या शाहिरांच्या लेखणीतून आणि वाणीतून निर्माण झालेले हे काव्य टफ-तुणतुण्याची साथ घेऊन लोकांचे रंजन करीत असे. ह्या शाहिरांनी तत्कालीन मराठी समाजाच्या भावजीवनाचे यथातथ्य चित्र आपल्या कवनांमधून रेखाटले आहे. त्यांच्या वाङ्मयीन कामगिरीचा आढावाही आपण पुढे घेणार आहोत. त्या अगोदर पोवाडा आणि लावणी ह्या दोन शाहिरी कवितांचे स्वरूप समजून घेऊया.

### पोवाडा : परंपरा व स्वरूप

''पोवाड्याचा सर्वात जुना उल्लेख बाराव्या शतकांतील 'महिकावतीची बखर' या पुस्तकात सापडतो. इतिहासाचार्य वि. का. राजवाड्यांनी पोवाड्याची परंपरा चंपू काव्याशी निगडित असल्याचे मत संपादित बखरीच्या विवेचक प्रस्तावनेत व्यक्त केले आहे.'' असे म. पु. केंदुरकर म्हणतात. (मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड तिसरा-संपादक रा. श्री. जोग - पृष्ठ ४०६) राजस्थानातून राजपूत कुळांबरोबर अनेक भाट महाराष्ट्रात यादवकालापूर्वी आलेले होते. त्यांचा उत्तरकालीन आविष्कार म्हणजे शाहीर असेही मानता येते. गोंधळासारख्या परंपराही चालू होत्या. भाटांचे यशोगान, गोंधळ व वेदकालीन कल्पनांचा प्रभाव या सर्वांच्या संकरातून पोवाड्याचे रूढ स्वरूप साकार झाले असे म्हणता येते. पोवाडा म्हणजे कीर्तिकाव्य. पौरुषाची

अगर पराक्रमाची पूजा बांधून त्या व्यक्तीचा गौरव करण्यासाठी कवनाद्वारे मनातील आदर व्यक्त करावा ही यशोगानामागील प्रेरणा आहे. मराठ्यांच्या लौकिक जीवनातील उत्कर्षापकर्षाशी मराठी शाहीर बहुतांशी तादात्म्य पावलेले दिसतात. 'शाहीर देशाबरोबर हसले व देशाबरोबर रडले' हे वि. ल. भावे यांचे मत पोवाड्याच्या स्वरूपापुरते तरी योग्य म्हणावे लागेल. शाहिरांनी आपल्या समोरील भव्यतेपुढे व उदात्ततेपुढे नतमस्तक होऊन त्या वीरांचा व घटनांचा गौरव केला. आज शिवकालातील सातच पोवाडे उपलब्ध आहेत. शाहिरांना त्याबद्दल बक्षिसीही मिळत असे. त्यामुळे अर्थलाभ ही देखील पोवाडा निर्मितीमागील प्रेरणा ठरली आहे.

विद्यार्थी मित्रांनो ! आता आपण पोवाड्याच्या स्वरूपाचा विचार करू या. पोवाडा हे कथाकाव्य असते, हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. हे कथाकाव्य शाहीर सादर करतात. या काव्याची रचना धावती व नाट्यमय प्रसंगयुक्त असते. ही रचना पद्य असून गद्यही असते. म्हणून हे चंपूकाव्य असते, असे राजवाडे म्हणतात. पोवाड्याची रचनापद्धती गोंधळ्याच्या कथा निवेदनासारखी असते. त्यात प्रारंभी देवदेवतांना आवाहन, नमन असते. पुढे मुख्य कथेचा प्रस्ताव येतो. त्यानंतर प्रसंगनिर्मितीतून कथानिवेदन असा क्रम असतो.

**पोवाड्याचे तोंड**

पोवाड्याच्या प्रारंभी देवदेवता यांना वंदन केलेले असते. यमाजीने लिहिलेल्या बाजी पासलकरावरील पोवाड्याचा प्रारंभ असा केला आहे -

**पहिले नमन माझे देवा नारायणाशी**
**दुसरे नमन माझे सद्गुरुच्या चरणाशी**

(मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड तिसरा. संपादक रा. श्री. जोग, - पृष्ठ ४१४) पोवाड्याच्या प्रारंभी देवदेवतांना वंदन करण्याचा संकेत प्रारंभीच्या शाहिरांनी पाळलेला आहे. कधी कधी ज्याच्यापुढे कथा गायिली जाते त्यालाच आवाहन करून शाहीर कथेला सुरुवात करतो. प्रभाकराने पेशवेवंशावर लिहिलेला पोवाडा दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत शब्दबद्ध केला आहे. त्याचा प्रारंभ असा आहे -

**'श्रीमंत ईश्वरी अंश धन्य तो वंश परमपुरुषार्थी।**
**बरोबर तयांची कोण करील पहातार्थी ।।** १

अनेकदा कथावस्तुतील आशयावर प्रारंभ अवलंबून असतो. सवाई माधवरावाच्या रंगाच्या पोवाड्यास प्रभाकर शाहीर पुढीलप्रमाणे प्रारंभ करतो -

**जसा रंग श्रीरंग खेळले वृंदावनिं द्वापारांत ।**
**तसा रंग श्रीमंत खेळले कलियुगात अति आदरात ।।** २

या ओळीत प्रस्तावनेतच आनंदोत्सवाचा भाव खुलला आहे. (१- २ मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड

तिसरा – संपा. रा. श्री. जोग – पृष्ट ७१४) थोडक्यात पोवाड्याच्या पहिल्या चौकात आवाहन – नमन व प्रस्तावना असे दोन्ही भाग पूर्ण होतात.

**पोवाड्याचे चौक**

कथेच्या निवेदनातील प्रत्येक पदबंध एकेका चौकात सादर केलेला असतो. चौक रचनेत ओळी, चरण अथवा वृत्त यांचे बंधन पाळलेले नसते. चौकातील चरण संख्या ही नेमकी नसते. यमाजीने रचलेल्या बाजी पासलकरांच्या पोवाड्यात पहिल्या चार चौकांत दोन दोन चरणांच्या चार चार रचना आहेत. पाचव्या चौकात सहा व सहाव्यात पाच, सातव्यात तीनच तर शेवटी पुन्हा सहा रचना आहेत. एकेका चौकातील चरणांची लांबीही विषम असते. पोवाड्यातील विविध चौकांत ओळींचे, चरणांचे अगर वृत्तांचे बंधन पाळलेले दिसत नाही. कारण चौकाच्या पदबंधामध्ये कथाविकासाचा एक टप्पा, भावनिष्पत्तीचा वा प्रसंगनिर्मितीचा एक छोटासा घटक साकार केला जातो. चौकांच्या संख्येबाबतही निश्‍चित मर्यादा नाही. कुठे १५ चौकांचा प्रदीर्घ पोवाडा असतो तर कुठे ४ चौकांचा लहान पोवाडाही दिसतो. शेवटच्या चौकात यजमानाकडून मिळालेल्या बिदागीचा उल्लेख शाहीर करताना दिसतो. प्रत्यक्ष शाहिराने श्रोत्यांपुढे सादर केले कथाकाव्य असे पोवाड्याचे स्वरूप असल्याने त्यात धावती वृत्ते आली आहेत. प्रारंभी पोवाडारचनेत गद्यसदृश, सोप्या व ओवीसारखे छंद योजिले गेले. पुढे पोवाडा अधिक बंदिस्तपणे वृत्तबद्ध झाला. शाहीर आपल्या रचनेत दंतकथा, तात्कालिक सामाजिक संकेत व पापपुण्य यांच्या कल्पना गोवून कथेमध्ये रंग भरतो. या धावत्या रचनेत रंजकता आणणारे विनोद, रसपरिपोष, प्रसंगनिर्मिती इ. घटकांनी कथेला शाहीर बहार आणतो. असे असले तरी पौराणिक थाटाच्या वर्णनातील अतिशयोक्ती, वस्तुस्थितीबद्दल जागरुकतेचा अभाव व वास्तवदृष्टीची उणीव या दोषांमुळे पोवाड्यांचे महत्त्व ऐतिहासिक प्रमाण म्हणून कमी झालेले दिसते.

**लावणी**

शाहिरी कवितेत लावणी व पोवाडा हे दोन प्रकार समाविष्ट होतात. अनेक शाहीर दोन्ही प्रकारची रचना करीत. गेयता व गायन या दोन्हीत पोवाडा व लावणी यांच्यात साम्य आहे, भेद बरेच आहेत. लावणी सामान्यत: स्फुट रचना असते, तर पोवाडे दीर्घ व कथात्मक असतात. लावणी कधी आत्मनिष्ठ तर कधी नाट्यगीतरूप असते, तर पोवाडा बहुधा निवेदन–कथन–वर्णनात्मक असतो. लावणी रचनादृष्ट्या बंदिस्त असते, तर पोवाडा विस्ताराने निवेदन करतो. संगीतदृष्ट्या लावणी पोवाड्यापेक्षा उजवी ठरते. ती काव्यात्म व सफाईदार असते. कवीचा कल्पनाविलास लावणीत खुललेला असतो. पोवाडा मुख्यत: वीररसपूर्ण असतो. कधी व्यक्तिप्रशंसावर अगर प्रसंगवर्णनपर असतो. लावणी प्राधान्याने शृंगाररसात विहार करते. विषयदृष्ट्या पोवाडे मर्यादित तर लावणी अधिक व्यापक ठरते.

लावणी ही ढोलकी–कड्यांच्या तालावर म्हटली जाणारी भृंगावर्तनी किंवा पद्मावर्तनी काव्यरचना असते. लावणीचा प्रारंभ लोकगीतांमधून झाला असावा. त्यामुळे लावणीचा आशय आणि वृत्त लोकगीतातून

आले असावे. लावणीचा विस्तार महाराष्ट्रातील सर्व भागात पसरलेला दिसतो. स्थानिक देवतांच्या जत्रांमध्ये तमाशाचे फड उभे राहत. त्यातील लावणीरचनांमधून लोकांचे मनोरंजन व उद्‌बोधन केले जात असे. हे लावणीकार बहुजन समाजातील होते.

१. 'हृदयाला चटका लावते ती लावणी' असे अ. ब. कोल्हटकर म्हणतात.

२. शेतात लावणी करताना म्हटले जाते ते लावणीगीत.

३. लावण - सुंदर, लावण्य - सौंदर्य त्याचे दर्शन जीमध्ये होते ती लावणी.

४. ''लावणे म्हणजे व्यवस्थित मांडणी करणे, यावरून व्यवस्थित मांडणी, सुभग रचना जीमध्ये आहे ती लावणी. - प्रा. म. वा. धोंड.'' (मराठी वाङ्‌मयाचा इतिहास - खंड तिसरा - संपा. रा. श्री. जोग. - १९७३, पृष्ट - ४४७) गोंधळी, भराडी, वाघ्या मुरळी इ. मराठी लोकसंस्कृती उपासकांनी महाराष्ट्रातील लावणीची जोपासना केली. गोंधळ-जागरण गीतातील शृंगार व नृत्य लावणीने स्वीकारले असावे. वासुदेवाच्या गाण्यांतून कृष्णाच्या बालक्रीडेची वर्णने, लोकांना केलेला उपदेश या गोष्टी लावणीने घेतल्या आहेत. बोधपर, तात्विक विषयावरील लावण्या भराड्यांच्या गीत परंपरेतून आलेल्या असाव्यात. लावणीतील आध्यात्मिक भाग संत साहित्यातून आला असावा.

लावणी संकलीत स्वरूपात पाहावयास मिळते ती तमाशात ! तमाशा साकारतो तो अनेक विषयांवरील लावण्यांची विशिष्ट तऱ्हेने बांधणी केल्यामुळे ! उत्तर पेशवाईतील तमाशात पुढील गोष्टी अंतर्भूत होत्या - १) गण = गणेशस्तवन, २) गवळणी, ३) शृंगारिक लावण्या, ४) भेदिक लावण्या, ५) मुजरा- जुन्या काळात आजचा वग नसावा त्याऐवजी दीर्घ कथात्मक लावणी असावी. आधुनिक तमाशात कार्यक्रमाची मांडणी अशी असते - १) गण - गवळण, २) संगीत लावण्या, ३) पदे, ४) रंगबाजी व फार्स, ५) वग आणि भेदिक लावण्या.

लावणीकारांची मुख्य प्रेरणा जनसमुदायाचे मनोरंजन करणे ही होती. पुढे पुढे अर्थप्राप्तीसाठीही लावणी रचना होऊ लागली. १) शृंगारिक, २) विविध विषयांवर, ३) आध्यात्मिक व भेदिक - असे लावणीचे विषयानुसार सामान्यपणे तीन प्रकार पडतात. विविध विषयावर लावण्यांत उपदेशपर, देवतावर्णनपर, कथात्मक, विनोदपर, व्यक्तिवर्णनपर अशा अनेक विषयांवर लावण्यांचा अंतर्भाव होतो. भेदिक लावण्या सवाल जबाबात्मक असत. भिन्न पंथांच्या भिन्न मतांच्या विचारांचे प्रश्नोत्तररूप संवाद त्यात असतात. आत्मा, परमेश्वराचे अस्तित्व, द्वैताद्वैत अशा विषयांवर ही प्रश्नोत्तरे रचली जात.

लावणी मुळात लोकगीत असले तरी कालांतराने गीताला नृत्य व नाट्य यांची जोड मिळाली. लावणी ही श्राव्य आणि दृश्य असे दुहेरी स्वरूपाचे वाङ्‌मय आहे. लौकिक जीवनाचे श्राव्य व दृश्य असे चित्र त्यात उमटू लागले. 'सामान्य लोकांची करममणूक करण्यासाठी लावणी सादर होत असल्याने लावणीकार आपला आशय उघडपणे व धीटपणे मांडतो.

उदा. १) सुंदरा मनामध्ये भरली, जरा नाहि ठरलि, हवेलित शिरली, मोत्याचा भांग - रामजोशी.

२) गोड वाटसी म्हणून सखे निर्लज्ज लागलो गळी - अंधारातील लावण्या - ६.

३) तुम्ही नित माझ्या घरी यावे, सुखशयनीं सुरत व्हावे - अंधारातील लावण्या - १८

(मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड तिसरा - संपा. रा. श्री. जोग, पृष्ट ४६३)

**लावणी मुखडा**

श्रोत्यांचे लक्ष चटकन् वेधून घेण्यासाठी लावणीकार आपल्या लावणीचा मुखडा वेधक करीत असे. अनेकदा मुखड्यामध्ये मुख्य आशय सांगून पुढे लावणीत त्याचाच विस्तार करण्यात येई. बंदिस्त, तालबद्ध व आकर्षक मुखडे लावणीला अर्धे यश मिळवून देत. उदा. -

'' १) झुलत झुलत डौलात कमर हलवित नखऱ्याने
ठुमक चाल चौरंगी खबुतर झडपी कुऱ्याने - प्रभाकर.

२) अर्धे उरावर पदर नजर तुझी गरगर फिरे भवताली,
ठमकत चमकत चाल चालशी हसत मुखाने नखऱ्याखाली - अंधारातील लावण्या १७५.

होनाजीने पुढील लावणीच्या मुखड्यात ध्वनिवाचक शब्द पेरून मुखडा श्रवणीय केला आहे.

फण फण फण फण विंचू मारी फणका
सण सण सण सण सणाट निघती विषयाच्या शिणका,
टण टण टण टण टणा लागला सर्वांगी ठणका
दण दण दण दणाणी तीव्र करितो दणका - अंधारातील लावण्य - ३८.

(मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड तिसरा. संपा. रा. श्री. जोग, पृष्ठ ४६३.)

लावणीमध्ये शृंगाररसाचा मुख्यत्वे आविष्कार होत असे. अधूनमधून करूण, वत्सल, अद्‌भूत, हास्य, बीभत्स व शांत रसांनाही लावणीत स्थान मिळे. लावणीतील नायिका नायकाइतकाच उघड आत्माविष्कार करताना दिसते. नवऱ्याच्या लहरीप्रमाणे देहदान करणारी, स्वारीला गेलेल्या पतिराजांची आठवण काढून झुरणारी, त्याला ऐन तारूण्यात आपल्यास विरहात टाकून गेल्यामुळे ''वैरी'' म्हणणारी, म्हाताऱ्या नवऱ्यामुळे होणारी मनोव्यस्था व्यक्त करणारी, संगमोत्सुक स्त्री-अशी अनेक नायिकाचित्रे लावणीतून प्रकट झाली आहेत. लावणीतील नायक पुरुष स्त्रियांच्या शरीर सौंदर्याचे वर्णन करताना दिसतात.

मोहिमेवर गेलेल्या, प्रपंचात थकलेल्या मनाला प्रसन्नता देण्यासाठी शाहिरांनी लावण्या रचल्या व

गायिल्या. लोकजीवनातील अनेक विषयांची व लौकिक भावभावनांची सुंदर चित्रे त्यांनी रेखाटली. पौराणिक व आध्यात्मिक विषयही त्यांनी त्यात गुंफले. शाहिरांचे उपदेशपर फटकेही समाजमान्य झाले आहेत. कृष्ण आणि गोपींवरही शाहिरांनी पेहेराव, भाषा व जीवनविषयक कल्पनांचा अस्सल मराठी साज चढविला. अहिल्याख्यान, उषास्वप्न, सुलोचनाख्यान ह्या कवनांतून मराठमोळेपण स्पष्ट दिसते. शाहिरांनी पौराणिक व उपदेशपर लावण्यांतून गणेश, शिव, विठ्ठल, भवानी, बार्शीचा भगवंत अशा देव-देवतांच्या लावण्या रचल्या आहेत. ह्या कवनातील मराठी वेषभूषा, चालीरिती, भाषा व स्वभाव ही वैशिष्ट्ये मराठमोळ्या जीवनशैलीचे दर्शन घडवितात.

मराठी कविता पौराणिकतेकडून ऐतिहासिकतेकडे आणली ती शाहिरांनी ! कधी हे ऐहिक ऐतिहासिक होते तर कधी समकालीन ! ह्या लावणी कवितेतून मराठी मनाची उत्कट प्रपंचलालसा आणि पौरुषपूर्ण भोगेच्छा व्यक्त झाली आहे. ''शाहीर हे कवी, कलावंत होते. त्यांच्या दृष्टीला 'शौर्य-शृंगार' यांत जसा विरोध दिसत नव्हता तसाच शृंगार-वैराग्य' यांतही नव्हता...... वैराग्यपर लावण्यात वैयक्तिक सुखाबद्दलची जुगुप्सा संताइतक्याच हिरीरीने शाहिरांनी प्रकट केली आहे. लावण्यांतील शृंगार भावनेइतकीच त्यांची पारमार्थिक शिकवण परिणामकारक उतरली आहे. 'सुंदर मूर्ति मदनाची, अमृत वदनाची, मदन कदनाची, विखारी धार' या स्त्री वर्णनाइतकीच 'हटातटाने पटा रंगवूनि जटा धरिशी तू शिरी । मठाची उठाठेव का करी ।।' ही दांभिकतेचा निषेध करणारी रामजोशींची वाणी प्रभावी आहे.'' (प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप - ह. श्री. शेणोलीकर - पृष्ठ २५३-२५४)

**प्रमुख शाहिरांची वाङ्मयसेवा :** अज्ञानदासापासून ते परशुराम-प्रभाकरापर्यंत अनेकानेक शाहिरांनी आपल्या प्रतिभेच्या जोरावर शाहिरी कविता फुलविली. पण या शाहिरांच्याबद्दल विश्वसनीय माहिती मिळत नाही. सहा विख्यात शाहिरांच्या चरित्राची व त्यांच्या वाङ्मय सेवेची माहिती अभ्यासकांना मिळाली आहे. अनंत फंदी, परशराम, रामजोशी, प्रभाकर, सगनभाऊ व होनाजी बाळा यांच्यापैकी बहुतेकांनी पोवाड्यांबरोबर लावण्याही रचल्या आहेत. विद्यार्थी मित्रांनो ! त्या शाहिरांच्या वाङ्मय सेवेचा परिचय आता आपण करून घेणार आहोत !

**(१) अनंत फंदी** (इ.स. १७४४ ते १८१९)

नगर-संगमनेरकडील हा शाहीर गोंधळी व सराफी होता. बालवयातच याला काव्यस्फूर्ती मिळाली. याने अमाप लोकप्रियता व पैसा मिळविला. दुसऱ्या बाजीरावाची त्याच्यावर विशेष मर्जी होती. पूर्ववयात त्याने उत्तान शृंगारपर बऱ्याच लावण्या रचल्या. त्याने तमाशाचे फड चालविले. पोवाडे, कटाव, फटके व लावण्या असे स्फुटकाव्य लिहून त्याने कीर्ती मिळविली. अहिल्याबाई होळकरांच्या उपदेशामुळे फंदीने तमाशाचा त्याग करून कीर्तनकार म्हणून कीर्ती मिळविली. पेशवाईतील हा ज्येष्ठ शाहीर होय. खर्ड्याच्या लढाईच्या वेळी हा शाहीर पुण्यात राहत होता.

सवाई माधवरावांपासून ते दुसऱ्या बाजीरावांच्या काळापर्यंत घडलेली हकीकत स्वत: बाजीरावाने

लिहून दिली आणि फंदीने त्यावर कविता लिहिली. ही ओवीबद्ध कविता 'माधव ग्रंथ' किंवा 'माधवनिधान काव्य' या नावाने ओळखली जाते. ३५९ ओव्यांचे हे काव्य बाजीरावाने फंदीकडून लिहून घेतले. 'ही कथा राघवात्मजे । लिहिली आपुल्या स्वकरांबुजे । लेखाबरहुकुम काय जे । कवित्व केले फंदीने ।।' या ओळींवरून ते स्पष्ट होते. यातील ऐतिहासिक उल्लेखाने सदरचे आख्यानकाव्य लक्षणीय झाले आहे. 'फंदी अनंत कवनाचा सागर' असा होनाजीने ज्या फंदीचा गौरव केला आह, त्या फंदीने या काव्यात दुसऱ्या बाजीरावाची स्तुती केली आहे. तो शाहिरास सद्गुणाचा पुतळा वाटतो. पहिल्या पाच अध्यायायात बाजीरावाचा उदोउदो केला आहे. सहाव्या अध्यायात मात्र बाजीरावाच्या लहरी कारभाराचे, बेबंदशाहीचे व दुष्काळाचे समग्र वर्णन आले आहे. बाजीरावाशी वितुष्ट आल्यानंतर हा अध्याय फंदीने लिहिला असावा. सहाव्या अध्यायाचे अखेरीस ग्रंथाचे स्वरूप सांगितले आहे. समाजाचे काळेकुट भविष्यही वर्तविले आहे. ते असे –

**कळों एकें वर्तमान । येथूनी झाले समाप्त**
**आता पुढे समग्र दुनिया । आरंभ होईल लुटावया ।**
**प्राणिमात्रास नुपजे दया । कठीण हृदय होतील ।।**

अनंत फंदींचे सात पोवाडे उपलब्ध आहेत. त्यापैकी खर्ड्याच्या लढाईवरील पोवाडा प्रसिद्ध आहे. त्यात नाना फडणिसाची स्तुती केली आहे. लढाईत सहभागी सरदारांची नावे त्यात गोविली आहेत. यशवंतराव होळकर व फत्तेसिंगराव गायकवाड यांच्या स्तुतीचे पोवाडे त्याने रचले आहेत. पुण्याची लुट करणाऱ्या यशवंतराव होळखराच्या त्या कृतीचा त्याने गौरव केला आहे. फत्तेसिंगाची बाजीरावाशी तुलना करून दोघांचीही स्तुती त्याने केली आहे. सांगलीकर, मिरजकर पटवर्धन यांच्या राजधान्यांवरही त्याने पोवाडे रचले आहेत.

बाजीरावाची निंदा करणारी कवनेही त्याने रचली आहेत. उदा.

**द्रव्य देऊन आणिक आणिक । नवे तितके केले धनिक ।**
**जुन्याची तिंबुति कणिक। राज्य आपुले हरविले ।।**

बाजीरावाच्या राज्यावर लिहिलेल्या लावणीतून राज्यातील अनागोंदी स्पष्ट होते.

**शिष्य झाले मस्त गुरुची विद्यागुरुवर फिरली.**
**गोरसाला कोणी पुसेना दारू महाग विकू लागली**
**पतिव्रता ही उपाशी मरती तिला मिळेना सावली**
**चंचल नार बांधीत असे नवे घर एक दरसाली।**

फंदीचे सूक्ष्म समाजनिरीक्षणही यातून दिसते. सामाजिक स्थितीचे निरीक्षण व कटू अनुभव यांच्यातून फंदीच्या लेखणीला उपरोधाची धार चढते. त्यातूनच उपरोधपूर्ण लावण्यांची रचना त्याने केली असावी. ''हे मुर्खा खुण तर्का पर्का पुरुष आपला नसे' या लावणीतून 'दिसते तसे नसते' हे सत्य त्याने 'म्यां म्हटले हा

चक रूपया दिसतो माल खरा । वाजून जो पाहतो तो आंत तांब्याचा भुरभुरा' यासारख्या उपरोधगर्भ ओळीतून परिणामकारकपणे ठसविले आहे. ''फंदी आनंदाचे छंद जिव्हारी शस्त्र भोस्कितसे' असा आपल्या शैलीबद्दल त्याला विश्वासही वाटतो.'' असे डॉ. ल. रा नसिराबादकर म्हणतात. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास - ल. रा. नसिराबादकर, पृष्ठ २६९)

'चंद्रावळ' ही त्याची लावणी बरीच प्रसिद्ध आहे. फंदीच्या काळातील स्त्रीसौंदर्यासंबंधी कोणती दृष्टी होती, याची कल्पना या लावणीवरून येते. स्त्रीरूपवर्णन व तत्कालीन खानदानी स्त्रीच्या वेषभूषेचे वर्णन या लावणीत बहारदार रीतीने आले आहे. कृष्णाने राहीचे रूप घेतल्यावर जे अलंकार घातले त्याचे तपशीलवार वर्णन करून त्यात बेलबाळ्या, पानबाळ्या अशा सुमारे बत्तीस बाळ्यांचे उल्लेख आले आहेत. शृंगारवर्णनात मात्र फंदी बेताल झाले आहेत. फंदीची 'त्रिस्तनीची लावणी' किळसवाणी आहे. त्यात चमत्कृतीच भरली आहे. अक्रुरावरील लावणीतून कृष्णावरील गोपीप्रेमाचे हृद्य दर्शन फंदीने घडविले आहे. एका लावणीत त्याने संध्येतील भगवंताची चोवीस नामे एकत्र गुंफून 'अनंत भगवंताची नामे त्यांतुनि ही उत्तम गाइल्या उद्धरती अधम ।' असे आश्वासन दिले आहे.

अनंत फंदीचे फटके म्हणजे उपदेशपर सुंदर कवने होत. सांसारिकांसाठी मौलिक व्यावहारिक उपदेश फंदीने तडफदार व निर्भीड भाषेत केला आहे. 'बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्ग सोडू नको । अंगी नम्रता सदा असावी राग कुणावर धरू नको ।.... कष्टाची बरि भाजिभाकरी तूप साखरे चोरू नको । आल्या अतिथा मुठभर द्याया मागेपुढती पाहु नको ।।' यातील उपदेश प्रमाणिक व सडेतोड आहे. 'स्नेहासाठी पदरमोड कर परंतु जामिन होऊ नको', 'बरी खुशामत शहाण्याची ही मूर्खाची ती मैत्री नको ।' अशी सुंदर सुभाषिते फटक्यांतून दिसतात. शोध करी रे मना । हरिभजनाविण अवघे वृथा', 'देव सोडूनि तरी फंद वाउगे विषयाची तरी काय मजा । हरिनामाची लाव ध्वजा', 'सत्कर्माचा तोटा । समय खोटा रे खोटा ।' असे फंदीचे अनेक फटके लोकप्रिय आहेत. सडेतोड उपदेश आणि प्रासात्मकता यांमुळे हे फटके रसिकांना आजही आनंद देतात. फंदीची भाषा रांगडी आहे. भाषेतील जोश मात्र वाखाणण्यासारखा आहे. त्या उपदेशातील अधिकारवाणी लक्षणीय आहे. सामजजीवनाचे एक नीतिशास्त्रच त्यातून त्याने मांडले आहे. ह्या फटक्यांच्या रचनेमुळे फंदी मराठी जनमानसात आजही लोकप्रिय आहे.

**(२) परशराम** (इ.स. १७५४ ते १८४४)

परशरामाची लावणी त्याच्या काळात बरीच प्रसिद्ध झाली. सिन्नर तालुक्यातील वावी गावचा हा रहिवासी होता, तो शिंपी होता. हा विठ्ठल संप्रदायी भगवद्भक्त होता. देवपूरकर बाबा भागवत हे त्याचे गुरु. त्यांच्या आदेशाने तो पोवाडे व लावण्या यांच्या रचनेकडे वळला. महाभारत-रामायण-संतसाहित्य यांचा त्याला अभ्यास असावा. बहुश्रुततेमुळे त्याचे काव्य समृद्ध झाले आहे. वीणा हाती घेऊन तो स्वत:च्या लावण्या गोड सुरात म्हणायचा. त्याचा तमाशाचा फड होता. बाबा सातभाई, मलुराज, नारायण व भवानी तेली यांची जोड मिळाल्याने त्याचा तमाशा प्रसिद्ध होता. कोपरगावात होनाजीने गंगेवर रचलेल्या लावणीला उत्तर म्हणून परशुरामाने तिथल्या तिथे 'पश्चिम वाहिनी गोदा, प्रतिमूळ गंगा' ही लावणी म्हणून दाखविली.

त्यातील स्वत:ची स्तुती आवडून दुसऱ्या बाजीरावाने जहागीर देऊ केली. पण -

**पोट भराया उभारिला ना तमाशाचा धंदा**

**महाल मोकासे जहरी वळसे करितील अपुरा बंदा**

**सुई दोऱ्याला हयात असो द्या तोचि इनाम मोकासा**

**निजकर्मीरत नर झाल्यावर काय उणा मग त्या पैसा ।।**

असे नि:स्पृह उत्तर देऊन त्याने ती नाकारली. त्याची हीच निरिच्छा त्याच्या कवितेतही उमटली आहे. खेड्यापाड्यातील मोकळ्या मनाचा, हौशी व साधाभोळा मराठा गडी त्याच्या कवितेतून दिसतो.

**पोवाडे –** परशुरामाने देशस्थितीपर व समाजस्थितीपर असे अनेक पोवाडे रचले. सूक्ष्म निरीक्षण आणि परखड निवेदन यांमुळे या पोवाड्यांमधून इंग्रजी अंमलातील मराठी समाजाचे यथातथ्य चित्र उमटले आहे. समाजातील अस्वस्थता आणि सामाजिक जीवनातील विसंगती त्याने अचूक टिपली आहे. देशस्थितीवर त्याने तीन पोवाडे रचले आहेत. त्यातील समाजस्थिती कशी आहे पाहा – 'संकट मोठे । युगांत आलासे वाटे। आचरण खोटे ।।ध्रु।। बुडाला धर्म । हारपले नाणे । विसरले सत्कर्माचे भाणे । नगरी दिसती उदासवाणे । शूर सरदार होऊन दीनवाणे । पुत्र पित्याला क्रोधे ताडी । ..... कथा कीर्तनाची लागेना गोडी । ऐके डफगाण्याची झोडी । नीच हीन जातीचा जोडी !.....'' इंग्रजी राजवटीतील स्थित्यंतराबद्दल परशराम उद्वेगाने लिहितो – ''मोठमोठे उमराव धारकरी..... व्यापरी पिंजऱ्यात कोंडिले... राजधान्या अगदीच बुडाल्या राजाचे झाले फर्जी । चवरी अबदागिरी टागून ठेवल्या । छत्री आपण आपला धरी शिरी ।।'' समाजस्थितीपर पोवाड्यात त्याने शीलहीन घमेंडखोरांचा उपरोधपूर्ण शब्दांत समाचार घेतला आहे – 'हे त्यावर जरी दिली अंबारी, मटकन बसेल भारानं । उदंड झाला ताजा गधडा शोभेल काय तरी त्यास जिन ?' पोकळ अभिमान वाहणारे चारित्र्यहीन लोकांचे बोलणे म्हणजे 'साऱ्या गावाचे ओहळ मिळून गंगेची करिती थट्टा' अशा प्रकारचे आहे, हे पाहून परशरामास चीड येते. इतके प्रांजळ, परखड व स्पष्टपणे मांडलेले देशस्थितीचे चित्र अन्य शाहिरी कवितेत दिसत नाही.

**लावण्या :** परशरामाची लावणी विषयवैचित्र्याने नटलेली आहे. 'उठ झाला प्रात:काल' ही त्यांची लावणी म्हणजे 'घन:शाम सुंदरा' या लावणीची दुसरी आवृत्तीच वाटते. 'सती सुलोचना' हे पौराणिक कथाकाव्य सुंदर आहे. काळीगोरीचे भांडण' व 'मानवी जीवनाची कहाणी' ह्या वेदांतपर लावण्यांतून त्याने मानवी जीवनातील विदारक चित्र उभे केले आहे. त्याचा लावण्या ईशवर्णनपर, अध्यात्मपर, बोधपर, स्थलवर्णनपर, शृंगारिक, समाजस्थितीपर आहेत. त्याच्या लावण्यांची भाषा प्रसादपूर्ण, ओघवती, सुभाषिते, वाक्प्रचार व म्हणी यांनी नटलेली आहे. त्याच्या वाणीत आवेश आहे. शृंगाराचे वर्णन करून त्याचे पर्यवसान परमार्थपर तत्त्वोपदेशात करावयाचे, अशी श्लेषाचा आश्रय करणारी ही रचना असते. संतांच्या भारूड, विराण्या, गौळणी या रचनांशी या लाण्यांचे साम्य आहे.

‘इजला भ्रतार द्यावा करून । बापाआधी लेक जन्मली । नारीआधी पिता । ब्रह्मा विष्णू महेश आदी शिवाची कांता ।’ अशी रहस्यमय रचना करून भाविकांचे मनोरंजन करणे त्याला आवडते. त्याच्या लावणीचे मुखडे बंदिस्त व ठसठशीत असतात. त्यातच लावणीचा मुख्य अर्थ असतो, तर पुढील कडवी कल्पना विस्तार करतात. उदा.

**पुत्र असावा सुपुत्र ज्याचे जन काही अवघे गुण घेती ।**

**काय कामाचे दहा वीस असुनी, अभिमानामध्ये धुळमाती ।।**

परशराम भाषाप्रभू आहे. तो सुभाषितांचा वापर सहज करतो. उदा. ‘मखमली पैजार चांगली उदंड जरि झाली । पायाची पायामधी शोभेल, कोणि बांधिली शिरी ।।’ शब्दचित्रे रेखाटण्यात कुशल असणारा हा शाहीर वक्रोक्तीपूर्ण रचना चांगली करतो. ‘शिपायाच्या फजितीची लावणी’ या लावणीत शुद्ध विनोदाचे दर्शन घडते.

स्त्रीच्या लावण्याचे वर्णन अनेक शाहीर करतात. पण ‘नयन सुरेख दोन्ही लाल अंगावर शाल दुपेटा जरी। उमदा कोणी उमराव दिसे सरदार सौभाग्य घरी’ हे परशरामाने केलेले मर्दानी सौंदर्याचे वर्णन वेगळे व लक्षणीय आहे. उपरोधिक शैली व विनोदी दृष्टी यांमुळे या लावण्या मनात भरतात. जीवनातील विसंगती लावण्यांतून विनोदपूर्ण रीतीने मांडणे, हे परशरामाचे खास वैशिष्ट्य आहे. असा विनोद अन्य शाहिरांना जमला नाही. मानवी प्रवृत्तीचे सूक्ष्म निरीक्षण करून ते तो काव्यात शब्दबद्ध करीत असे. ‘‘त्यामुळे सामान्य जनतेची राहणी, नवससायासाचे प्रकार, लोकसमजुती यांचेही चित्र या लावण्यांतून आले आहे. ‘छपर पलंग झोपाळे साकळ्या चांदीचे लटकती हलके । पडदे चिकाचे रंगीत जणू घट्ट काळीज हलके । खणोखणी तजबिरा काढिल्या आंग्रेजी ऐने जडले । शाल दुशाले महाली बिछायात मखमली तक्के पडले ।।’ परशरामकृत बैठकीच्या या वर्णनातून पेशवेकालीन ऐश्वर्याची सहज कल्पना येते. पतिव्रतेचे अनुकरण करणारी बाष्कळ स्त्री, सवतींचे भांडण, लढाईतून पळून आलेला बढाईखोर शेंदाड शिपाई व नवऱ्याला वेगळे होण्याचा आग्रह धरणारी दुधड नार अशी नमुनेदार विनोदी चित्रे परशरामाच्या लावण्यांतून दिसतात.’’ (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास – ल. रा. नसिराबादकर, पृष्ठ २७२)

**‘‘सांड गावामधील फिरतो भांड रिकामटेकडा असून**

**इडील काडी तिकडे करीना घर कसे चालेल बसून ?’’**

अशा ऐतखाऊ नादान नवऱ्याचे चित्र विनोदी व उपहासपूर्ण शब्दांत रेखाटले आहे. थोड्या शब्दांत प्रभावी व्यक्तिचित्र निर्मितीचे सामर्थ्यही त्याच्याजवळ आहे. ‘निर्मळ मुखडा चंद्राकार । सरळ नाकाची शोभते धार’ किंवा ‘गगनात चांदणी ठळक मारिशी झळक उभी ग अंगणी । किती नटून थटून मारशिल छनाछन नयनाच्या संगिणी ।’ या ओळीतील लावण्यवतींची व्यक्तिचित्रे वेधक आहेत. निपुत्रिक, गरोदर आणि लेकुरवाळ्या स्त्रियांचेही मनोभाव परशरामाने टिपले आहेत. ‘त्याची शाहिरी वाणी तुकारामांप्रमाणे प्रासादिक असून परखड व प्रभावी आहे’, असे म. ना. अदवंत यांचे मत आहे.

**(३) रामजोशी** (इ.स. १७५८ ते १८१३)

पंडित कवी व शाहीर या दोन परंपरांना जोडणारा दुवा म्हणजे रामजोशी ! विद्वत्ता आणि कवित्व यांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला असूनही त्यांची वृत्ती रंगेल व बेछूट होती. संस्कृतचा गाढा व्यासंग असलेला एकमेव शाहीर. मोरोपंतांच्या उपदेशानुसार रामजोशी कीर्तनाकडे वळले. संस्कृतच्या अभ्यासाने त्यांच्या कवनातील शृंगारवर्णनावर संस्कृत वाङ्मयातील शृंगाराची छाया पडली आहे. इतर शाहिरांप्रमाणे त्यांच्या कवनात मराठी वळण व मराठी भावना आढळत नाही. रामजोशी स्वत:ला 'कविराय' म्हणवितात. रसाविष्कारापेक्षा अलंकरणाची हौस व कविकल्पनांचा हव्यास यामुळे त्याची रचना काहीशी कृत्रिम झालेली दिसते.

**पोवाडे :** रामजोशीचे तीन पोवाडे उपलब्ध आहेत. पुण्याचा व शुक्रवार वाड्याचा. ह्या दोन्ही पोवाड्यांत पारंपरिक स्थलवास्तुवर्णनाचे सांकेतिक नमूने दिसतात. १८०२ मधील दुष्काळ व पेंढाऱ्यांच्या अराजकाचे वर्णन करणारा एक पोवाडा त्याने केलेला आहे. प्रजेची झालेली भयंकर अवस्था रामजोशीने बऱ्याच समरसतेने वर्णिली आहे. पण त्यात काल्पनिकता आली आहे. हरिदासी थाटाच्या रचनेमुळे अनेकदा रसहानी झाली आहे. भाषेची कसरतही दिसते. उधा. 'फंद मातले धुंद झालि बेबंद....' 'पुंड घरोघर बंद कुणावर दंड....' 'चिन्ह वाटते भिन्न पुढति जे खिन्न.....' अनुप्रसादाच्या कसरतीने अर्थाची ओढातान होते, त्यामुळे रसहानी झालेली दिसते. रावबाजीच्या काळातील ह्या दुष्काळामुळे झालेली रयतेची भयंकर स्थिती समजण्यास हा पोवाडा उपयोगी पडतो.

**लावण्या :** रामजोशी संस्कृत काव्यपरंपरेत वाढलेला होता. पंडिती काव्याचे गुणदोष घेऊन तो लावणीरचना करू लागला. त्याच्या लावणीच्या संस्कृत वळणामुळे लावणी प्रतिष्ठित लोकांत मान्यता पावू लागली. रामजोशी शाहिरांचा तुरा ठरला तो संस्कृतप्रचुर व सफाईदार भाषा व रचना यांमुळे ! त्याने एक पूर्ण लावणी संस्कृतमध्ये लिहिली आहे. त्याचबरोबर त्याने एक लावणी चार भाषांत लिहिली आहे. 'सुंदरा मनामध्ये भरली' ही रामजोशीची विख्यात व रसिकप्रिय लावणी होय. स्त्री सौंदर्याच्या मोहक व उन्मादक वर्णनाचा तो सुंदर नमुना आहे. 'सुंदरा मनामध्ये भरली जरा नाही ठरली हवेलित शिरली मोत्याचा भांग' किवा 'अंगी तारुण्याचा बहर ज्वानीचा कहर मारिते लहर मदन तलवार' अशा प्रासात्मक रचनेने लावणीच्या सौदर्यात भर पडली आहे. संस्कृतातील संकेत ध्यानी घेऊन मराठमोळ्या स्त्रीचे सौंदर्य व तिचा साजशृंगार रामजोशींनी मोठ्या ढंगदारपणे व्यक्त केला आहे. 'कोण्या ग सुभगाची मदन मंजिरी' ही लावणीही रसिकमान्य आहे. 'मज वाटली विद्युन्नटी । भलि ग रुपाचि उतरली भटी। उरी कंचुकी घट तरतरी । टिळक लल्लाटी सुधारस घटीं । पाहुनि कृशा तव कटी । हरिचा कृश कटिमद लटपटी । अशी अनंत गुण गुर्जरी । कोण्या ग सुभगाची मदन मंजिरी ।।' शृंगाराला भरपूर वाव असणाऱ्या कृष्णलीलावर्णनपर लावण्यांतही रामजोशींनी सद्‌भिरूची सांभाळली आहे. त्यातील शृंगार विप्रलंभ आहे. राधाकृष्ण यांच्या होरीच्या प्रसंगीच्या क्रीडेचे वर्णन त्याने बहारीने केले आहे. राधेने कृष्णाचे व कृष्णाने राधेचे स्वरूप घेतल्यामुळे जो संभ्रम निर्माण झाला त्याने त्या प्रसंगात रंग भरला. 'श्रीरंग गोपिकोत्संग धरुनि करि रंग हरी हा बाई । कुंजात मातला वसंत

सांगु मी काई ।।' अशी प्रासात्मकता व पदलालित्य यांच्यामुळे वसंत ऋतुतील कृष्ण-गोपींच्या रासक्रीडेची लावणी आकर्षक बनली आहे.

छेकापन्हुती या अलंकारातील एका वेगळ्या लावणीत द्वयर्थी शब्दयोजनेमुळे रामजोशींचे भाषाप्रभुत्व प्रकट होते. 'अंबरगतपरि पयोधरातें रगडुनि पळतो दूरी । काय हा धीट म्हणावा तरी । तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हैया हरी । नव्हे गे मारुत मेघोदरी ।' असा नर्म व सूचक शृंगार लावणीत पेरला गेला आहे. 'झाली तरुणपणाची धुळ । पती नाही सेजेवरी सुंदरा रडे मुळमुळ ।' अशी विरहार्त नायिका त्याच्या लावणीत दिसते.

रामजोशींनी देवतावर्णनपर व पौराणिक विषयावरील लावण्य लिहिल्या आहेत. पंढरपूरवर्णन, तुळजापूर वर्णन, गिरीच्या व्यंकटेशाचे वर्णन, बार्शीचा भगवंत यांवरील लावण्या महाराष्ट्रभर कीर्तन करीत असताना घडलेल्या प्रवासात रामजोशींनी लिहिल्या आहेत. त्यांच्या उपदेशपर लावण्या मनाची पकड घेतात. 'नरजन्मामधि नरा करुनि घे नर नारायण गडी । तरीच हे सार्थक मानवकुडी' किंवा 'दो दिवसाची तनु ही साची, सुरतरसाची करुनी मजा । गमजा करिता मनीं उमजाना हे सुख न पुढे पडेल वजा। भाई सावध व्हां' ह्या लावण्या आजही लोकप्रिय आहेत. वैराग्याचे अवडंबर करणाऱ्यांचा समाचार त्याने एका लावणीतून घेतला आहे. तो म्हणतो -

हटातटाने पटा रंगवुनी जटा धरिशी का शिरी । मठाची उठाठेव का तरी । वनात अथवा जनांत हो का मनात व्हावे परी । हरीचे नाव भवांबुधि तरी । काय गळ्यात घालीशी तुळशीची लाकडे। ही काय भवाला दूर करितील माकडे । बाहेर मिरविशी आत हरिशी वाकडे । अशा भक्तीच्या रसासहित तू कसा म्हणविशी बुधा । हरिरस सांडूनी घेसी दुधा ।' अर्थचमत्कृती, खटकेबाजपणा, प्रासात्मकता व भाषेचे लालित्य यांमुळे ह्या लावण्या लोकप्रिय झाल्या आहेत.

बयाबाईशी गाठ ही रामजोशीच्या आयुष्यातील महत्त्वाची घटना होय. 'दैवे ही गाठ बयाबाईची मज पडली साची । कविता इजसंगे रंगा आली ।' असे ते म्हणतात. तिने त्याच्या लावण्या वेधकपणे स्वरबद्ध केल्या असाव्यात. ह्या रामजोशीची दुसऱ्या बाजीरावाने कदर केली होती. त्याला त्याने बिदागी, देणग्या व नेमणूक दिली होती. अशा तऱ्हेने रामजोशीने देवतापर लावण्या रचून लावणीला देवळाच्या आवारात नेले.

**(४) प्रभाकर** (इ.स. १७६९ ते १८४३)

प्रभाकर जनार्दन दातार हा शाहीर नाशिक जिल्ह्यात गंगापूरला जन्मला. वयाच्या बावीसाव्या वर्षी तो पुण्यात कारकून म्हणून राहिला. येथून त्याचा तमाशा जगताशी संबंध आला. तो तमाशा फडाचा कवी होता. 'प्रभाकराचे कवन पसरले सहज शतावधि नगरात' अशी त्याची खाती होती. प्रभाकराने पेशवाईचा उत्कर्ष व अपकर्ष दोन्ही पाहिली होती. सवाई माधवरावांच्या रंगाचा दरबार, खर्ड्याची लढाई, स. माधवरावाचा मृत्यू, रावबाजीची विलासी कारकीर्द, त्याचा उत्तरार्ध ह्या सर्व घटना प्रभाकराच्या हयातीतच घडल्या असल्याने त्याचे प्रतिबिंब त्याच्या कवनात आढळते. तमाशा फडाचा कवी म्हणून सवाई माधवराव व बाजीरावाच्या कारकीर्दीत तो भरपूर लोकप्रिय झाला.

**पोवाडे :** प्रभाकराचे बारा तेरा पोवाडे उपलब्ध आहेत. त्यातील रंगाचा, खर्ड्याच्या लढाईचा व सवाई माधवरावाच्या मृत्यूचा हे पोवाडे प्रसिद्ध आहेत. प्रभाकराने रंगाच्या पोवाड्यात रंगाची स्वारी निघाल्यापासून परत वाड्यात येईपर्यंतची हकीकत फारच सुंदर, सुसंगत व तपशीलवार दिलेली आहे. प्रासादिक भाषा, सफाईदार रचना, अचूक शब्दयोजना व चित्रमय वर्णन यांमुळे प्रभाकराचा पोवाडा याच विषयावरील होनाजीच्या पोवाड्यापेक्षा सरस झाला आहे. 'जसा रंग श्रीरंग खेळले वृंदावनिं द्वापारात। तसा रंग श्रीमंत खेळले कलियुगात अति आदरात' या पोवाड्याच्या मुखड्यात नादमाधुर्य व प्रासादिकता आली आहे. 'हरिपंत तात्यांनी उडविला रंग केशरी अनिवार । हास्यवदन राजेंद्र मुखावरी शेला लाविती वारंवार ।।' हे बाल सवाई माधवरावांचे वर्णन रम्य झाले आहे. खर्ड्याच्या लढाईच्या पोवाड्यातील रचना विस्तृत, तपशीलवार व सुसंगत दिसते. त्यात सवाई माधवरावांच्या कारकीर्दीचा संपूर्ण आढावा घेतल्याने प्रत्यक्ष लढाईचे वर्णन संक्षिप्त झाले आहे. 'दैन्य दिवस आज सरले। सवाई माधवराव प्रतापि कलियुगात अवतरले ।।' हे उद्‌गार खर्ड्याच्या लढाईबद्दलचे असूनही त्यात सर्वसामान्य मराठी मनाचे चित्रच आहे. ''सवाई माधवरावाच्या मृत्यूवरील पोवाडा रसवत्तेच्या दृष्टीने उत्कृष्ट उतरला आहे. सवाई माधवरावाच्या अकाली व अपघाती मृत्यूतील दैवाच्या विपरीत गतीच्या दर्शनाने मराठी मनाला बसलेला धक्का – 'कमि नव्हते पृथ्वींत अवांतर प्राणी न्यायाला । औक्ष कसे कमि झाले सवाई माधवरावाला ।।' ह्या प्रारंभातच व्यक्त होते. मराठी जनतेचा 'वृद्ध तरूण नर नारि बुडाल्या आकांत कहरात । कुंकु गंध किती सूज्ञ पुसूनी धुळ बांधिती पदरांत।।' ह्या ओळीतून जनतेचा शोकावेग प्रकट झाला आहे.'' असे म.पु. वेंदुरकर म्हणतात. (मराठी वाङ्मयाचा इतिहास–खंड तिसरा – संपा. रा.श्री. जोग – पृष्ठ ४३१–४३२)

प्रभाकराच्या इतर पोवाड्यांत पेशवाईचे संक्षिप्त वृत्त व पेशवाईचा पोवाडा हे तीन पोवाडे उपलब्ध आहेत. दुसऱ्या बाजीरावावरील पोवाडा आश्रितांच्या भावनेतून आला आहे. पेशवाईच्या अस्तानंतर मात्र प्रभाकर पोटासाठी लाचार झाला. त्या काळात त्याने थोरले सयाजीराव, दुसरे सयाजीराव, राघोजी आंग्रे सरखेल यांसारख्या आपल्या आश्रयदात्यांवर पोवाडे लिहिले. शेवटी शेवटी तर त्याने नाना शंकरशेट, पेस्तनजी शेट यांसारख्या मुंबईतील धनिकांवर पोवाडे रचून उपजिविका केली. सवाई माधवरावांविषयी नितातं आदर दाखविणारा प्रभाकर रावबाजीच्या स्तवनातही तितकाच तन्मय झालेला दिसतो.

**लावण्या :** दुसऱ्या बाजीरावाची प्रभाकरावरही मर्जी होती. त्यामुळे प्रभाकराने बाजीरावाच्या विलासवर्णनपर पस्तीस लावण्या रचल्या आहेत. अर्थातच त्या शृंगारपर आहेत. त्याच्या काही लावण्यातील शृंगारवर्णन उद्दाम झाले. काही लावण्यांतील प्रसंगचित्रे सुंदर आहेत. 'मोहिनी जसी सुरसभेमधी अमृत वाढी करी। तशी नार पंगतित आग्रह करी ।।' हे खानदानी स्त्रीच्या सौदर्याचे व रुबाबाचे डौलदार वर्णन उल्लेखनीय आहे. स्त्रीसौंदर्याचे वर्णन निवडक शब्दयोजनेतून तो करतो. उदा. 'डुलत खुलत चाले, झुलत झुलत बोलता हले हलकडी' 'कधी प्राणसखे भेटती ?' म्हणून विरहार्त होणारी आणि 'नका जाऊ दूर देशी घरी काय धनद्रव्याला कमी आले हो वर्षाची नागपंचमी ।' असा पतीला घरी थांबण्याचा आग्रह करणारी पत्नी आढळते. स्वारीवर जाताना पतीबरोबर येण्याचा आग्रह धरणाऱ्या स्त्रीची पती समजूत घालतो ती अशी –

‘परम परदेश कठिण कांते । कसे ग तुज न्यावे सगुणशांते ।’ नायक-नायिकांची अशी विविध चित्रे प्रभाकर आपल्या लावण्यांतून रेखाटतो. त्याची लावणी विलासाची चित्रणे सुबकपणे करते. उदा. ‘केलि मजसाठी रंगीत हवेली खासी । छते आरशांची बशिवली रंग गुलबासी । खांब चौगर्दा सरुदार मधिल मजल्यासी । रेशमी दोऱ्या शोभतात झोपाळ्यासी ।’ ह्या वर्णनात समृद्ध, विलास व कलासक्त दृष्टीचे दर्शन घडते. मराठी स्त्रीच्या देहावरील अलंकारांचे चित्रणही एका लावणीत आढळते. – ‘‘गोठ हातसर जवे खिजमत्या मिनेदार करी चुडे । चालता विचित्र दृष्टी पडे । वाकडवेळा बाहुभूषणे बाजुबंद त्या पुढते । बोलितां कोकिळ वृक्षीं दडे। चिंचपेट्या तन्मणी हिऱ्याचे छंदिव कोंदण खडे। तांदळी पोत दृष्टी ना पडे । पायी विरोद्या जोडवी अनवट बिचवे मेंद । रूइफूल विरोद्या भारी नगांची चेंद । जड झाले शरीर मदन तोरें धुंद ।’’ है स्त्रीवर्णन रावबाजीच्या अलंकारांचे (वज्रटिका, पानड्या, पेट्या, मंगळसूत्रे, चंद्रहार, पुतळ्या, मोहनमाळ इ.इ.) दर्शन घडविते.’’ (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास – ल. रा. नासिराबादकर, पृष्ठ २७७)

प्रभाकराच्या पौराणिक लावण्यांत मानवी वृत्तींचे सहज दर्शन घडते. लक्ष्मी-पार्वती संवादात आपला नवरा श्रेष्ठ आहे, हे ठरविण्यासाठी लक्ष्मी व पार्वती एकमेकींच्या नवऱ्याचे दोष काढतात. देवतांच्या ठायी सामान्य स्त्रीच्या भावनांचे रेखाटन प्रभाकर कुशलपणे करतो. त्यात त्याची विनोदी दृष्टीही दिसते. पंढरीच्या विठ्ठलाचे वर्णन तो असे करतो – ‘‘चंद्रभागेच्या तिरी विटेवर कटि कर ठेवुनि उभा । भक्तांचा कैवारी सावळा त्रैलोक्याचा सुभा ।।’’ सूक्ष्म निरीक्षण, भावनांचा उत्कट आविष्कार व प्रासादिक भाषा यांमुळे प्रभाकराची कवने लोकप्रिय झाली. ‘प्रभाकराची जडण अमोलिक जसा शिरीं शिरपेच तुरा,’ ‘प्रभाकर कवीची कविता अमृतासमान’, ‘प्रभाकराचे कवन प्रतिष्ठित सभेत गायाला’ हा त्याचा कवित्वाचा अभिमान तो कवितेत पेरताना दिसतो.

### (५) सगनभाऊ (इ.स. १७७८ ते १८४०)

हा मूळचा जेजुरीचा. धर्माने मुसलमान. त्याचा धंदा शिकलगारीचा, हत्यारांना धार लावण्याचा. त्याचे बरेच वास्तव्य पुणे येथे. कुशल गायक रामा गोंधळी हा त्याचा साथीदार. होनाजी गवळ्याच्या प्रतिस्पर्धी रावळाच्या फडाचा सगनभाऊ हा कवी होता. ‘सगनभाऊ म्हणे होनाजी बाळा उत्तर द्यावे रोकडे’ किंवा ‘होना गवळ्याचा झाला चुना’ असे उद्‌गार सगनभाऊने काढले. त्यावरून त्या दोन फडांतील झटापटीची कल्पना येते. मुसलमान असूनही पेशवाई, मराठा वीर, संत, हिंदू दैवते व धर्मक्षेत्रे यांच्याविषयी त्याला जिव्हाळा वाटे. दुसऱ्या बाजीरावाची मर्जी याला लाभली होती.

**पोवाडे :** बाजीरावाच्या जीवनावर त्याने दोन पोवाडे रचले. खडकीच्या लढाईनंतर अत्यंत चटका लावणारा पोवाडा होनाजीप्रमाणेच सगनभाऊने लिहिला आहे. ह्या लढाईमुळे बाजीराव वनवासी झाला. पुणे पोरके झाले आणि बाजीरावाची ससेहोलपट झाली. ‘दळणासरसे किडे रगडले रडती नरनारी । लेकराला माय विसरली कसा ईश्वर तारी ।।’ असे त्यानंतरच्या बेबंदशाहीचे वर्णन त्याने केले आहे. ‘लक्षांचे अन्न गेले राव अंतरले गादीला । एकटे पक्षावाणी उडाले टाकून मादीला’ असे ब्रह्मावर्तास गेलेल्या बाजीरावाचे वर्णन केले आहे. शिरी दु:खाचे डोंगर ग्रहदशा पाठीला’ अशी त्याची हलाखीची स्थिती शाहीर कळवळून

सांगतो. पुणे नगरीची दीनवाणी अवस्था त्याने पोवाड्यात वर्णिली आहे. पेशवाई बुडाल्यावर तो सातारच्या छत्रपतींच्या दरबारी गेला. तेथे त्याने पानपतचा पोवाडा रचला. काव्यात्म वर्णनाच्या दृष्टीने हा पोवाडा सरस उतरला आहे. 'जंगबहादुर' नावाच्या उर्दू पोवाड्याचे हे स्वैर भाषांतर आहे. त्याने प्रतापसिंह महाराजांवरही दोन पोवाडे रचले आहेत. महाराष्ट्रातील हिंदू लोकांच्या भावनांशी तो एकरूप झाला होता हे त्याने आपल्या पोवाड्यात जे दृष्टांत व उपमा योजिल्या, त्यावरून दिसून येते.

**लावण्या :** सगनभाऊच्या लावण्यांत बाह्यवर्णनापेक्षा व्यक्तीच्या मनोव्यापारांना अधिक प्राधान्य दिले गेले आहे. 'असी कि रे प्रीत वाढलं' या लावणीत 'आली दुनिया उफराटी फार तुम्ही सावधगिरीने असा' असा व्यावहारिक उपदेश करणारी नायिका आहे. एवढेच नाही तर 'परनारीशी भाषण करता विचार नाही बरा' असा नैतिक उपदेशही केला आहे. 'चंद्राचे चांदणे शीतल का उष्ण' या लावणीत नायक-नायिकेच्या सवाल जबाबातून घडणारे शृंगारदर्शन मार्मिक आहे. दौलताबादेच्या साबजी अनंताची प्रीती मिळावी म्हणून बेदरच्या कामसेनेने योजिलेल्या युक्त्यांचे वर्णनही एका लावणीत आले आहे. सवतीसवतीचे भांडण या विषयावर सगनभाऊने एक लावणी रचली आहे. त्यातील नवरा मिस्कील आहे. घोर जीवाला लावून गेली परम जीवाची सखी' म्हणून मुशाफर बनून तिच्या दारी जाणारा नायक अगर मर्दानी पोषाख करून प्रियकराला भेटायला जाणारी नायिका अशी कल्पनारम्य वातावरणातील व्यक्तिचित्रे या लावण्यांत आढळतात. सगनभाऊच्या रचनेत सहजता आहे. भाषेला उत्कटता असली म्हणजे, भाषा कशी अर्थवाही होते, ते सगनभाऊच्या लेखणीवरून दिसते. त्याच्या भाषेत जोम आहे.

**(६) होनाजी बाळा** (कालखंड - १८ व्या शतकाची अखेर ते १९ व्या शतकाचा पूर्वार्ध)

होनाजी सयाजी शिलारखाने. पिढीजात कवित्व करणाऱ्या घराण्यात याचा जन्म. आजा साताप्पा, चुलता बाळा हे विख्यात शाहीर होते. करंजकर शिंपी हा होनाजीचा साथीदार. शब्द होनाजीचे तर स्वर बाळाचा असे. त्यामुळे बाळा हे नाव होनाजी आपल्या नावापुढे लावतो. भरपूर लोकप्रियता व पेशव्यांचा आश्रय यांमुळे होनाजीला पुष्कळ संपत्ती मिळाली.

**पोवाडे :** होनाजीचे पोवाडे गाजले नाहीत. होनाजीचे व्यक्तिमत्त्व लावणीला जवळचे होते. त्याचे चार पाच पोवाडे आहेत. सवाई माधवरावांच्या रंगाचा समारंभ आणि खर्ड्याची लढाई या प्रसंगांवरील पोवाडे पेशवे दरबारात त्याने सादर केले होते. महादजी शिंदे यांच्या रंगाच्या पावाड्यात होनाजीच्या काळातील सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब उमटले आहे.

**लावण्या :** 'बैठकीच्या लावणीत रागदारीचे सूर आणता येतील काय' ही बाजीरावाची इच्छा होनाजीने पूर्ण केली. होनाजीने प्रथमच विविध रागदारीच्या चालींवर लावण्या रचून तमाशाला बैठकी गाण्याचे स्वरूप आणून दिले. तो संगीतज्ञ व कल्पक होता. त्याच्या लावण्यांतील नवे नवे छंद, धाटणी व शब्दांची ठेवण सरस होती, असे दादोबा पांडुरंग आत्मचरित्रात म्हणतात.

होनाजीच्या लावण्यांतून प्रेमभावनेच्या विविध छटा हळूवारपणे व्यक्त झाल्या आहेत. शृंगाराची उत्तम भावना व निपुत्रिकेची करुण आर्तता यांमधील विविध छटा त्याने आपल्या लावण्यांत आणल्या आहेत.

आपल्या गायकी लावण्या घेऊन होनाजी तबल्याच्या साथीवर गात असे. त्यामुळे त्या रसिकांना मुग्ध करीत. त्याच्या रचनेत प्रसाद गुण आहे. त्याच्या लावण्या गोड सुराच्या व सुगम अर्थाच्या आहेत. त्यात शब्दलालित्य आणि अर्थगांभीर्य भरपूर आहे.

होनाजीच्या लावण्यांत प्रेमाने घायाळ करून प्रवासाला निघून गेलेल्या पतीच्या विरहाने झुरणारी, नवोढा, विरहावस्थेत परपुरुषाला चतुर्थीच्या चंद्राप्रमाणे वर्ज्य मानणारी एकनिष्ठ पत्नी, 'गेला जसा तसा कधी पाहिन आपला प्राणविसावा । सत्वर उठा सख्यांनो मजला पक्ष्यांचे पर लावा' असे व्याकुळ उद्‌गार काढणारी विरहांतरिता, अशी सुंदर सुंदर चित्रे साकारली आहेत. 'तुझ्या प्रीतीचे दु:ख मला दाऊ नको रे । वधुन जाई प्राण घेई जगी ठेवू नको रे' या लावणीत प्रेमाची शक्ती व प्रेमाचा परिणाम व्यक्त केला आहे. 'जगी सांगतात प्रीत पतंगाची खरी । झड घालून प्राण देतो दीपकाचे वरी' अशी प्रेमविषयक जाणीवही करून दिली आहे. होनाजीची ''लटपट लटपट तुझं चालणं मोठ्या नखऱ्याचं बोलणं ग मंजुळ मैनेचं'' ही लावणी म्हणजे मराठमोळ्या स्त्रीच्या सौदर्याचे सुंदर वर्णन आहे. या सौंदर्याला डौलदार गतीची साथ आहे. नादमय शब्दयोजना, शब्दांची पुनरुक्ती व समर्पक उत्प्रेक्षा यांतून मराठमोळ्या सौंदर्याचा नखरा ढंगदारपणे साकार झाला आहे. 'सरळ चिरी कुंकवाचि कपाळी लाल जशी पिकली मिरची' किंवा 'बांधीव बुचड्याची लबक पदर अति सुबक खोविला तिपदरी वेणीचा । चंदन ढाळीत जसा लपेटा काळे नागिणीचा' अशा सुंदर पंक्ती या लावणीत सहज दिसतात. 'हिण माझे प्रालब्ध वांझपण कधी फिटेल बाई । एक बालक पोटी नाही' असे निपुत्रिक स्त्रीचे दु:खही इथे दिसते. एका लावणीत निपुत्रिकेला दिवस राहतात त्यावेळचा तिचा आनंद व्यक्त झाला आहे. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास – ल. रा. नासिराबादकर – पृष्ठ २६०) स्त्रीमनाच्या विविध स्तरांचे सूक्ष्म विश्लेषण, हे होनाजीच्या लावण्यांचे वैशिष्ट्य आहे. शरीरनिष्ठ आकर्षणाचे पर्यवसान नीतिप्रद संबोधात व्हावे, असे होनाजीस वाटते. त्याच्या काही लावण्यात शृंगाराचा अतिरेक झाला असला तरी पातिव्रत्याचे व प्रेमाचे सामर्थ्य त्याला मान्य आहे.

शंकर पार्वती संवाद, श्रीकृष्णतुला, द्रौपदीवस्त्रहरण, मल्हारी मार्तंड, दमयंती विलाप अशा काही पौराणिक लावण्याही होनाजीने लिहिल्या आहेत. 'घन:श्याम सुंदरा श्रीधरा अरूणोदय झाला। उठी लौकरी वनमाळी उदयाचली मित्र आला ।।' ही लावणी म्हणजे महाराष्ट्र शारदेचा श्रेष्ठ अलंकार होय. वेधक प्रसंगचित्रे, सहजरम्य वर्णने, प्रभातीच्या वातावरणातील यथातथ्यता, कोमल भावना आणि प्रसादपूर्ण भाषा यांमुळे ही भूपाळी मराठी मनास नित्य नवा आनंद देते, देत राहील. यशोदेच्या अंतरंगातील वात्सल्य इथे रम्यत्वाने नटले आहे. प्रभातीचे पावित्र्य आणि चैतन्य ह्या भूपाळीत काठोकाठ भरले आहे. मात्र होनाजीची ही लावणी मूळची विठ्ठल नरसिंह नाईक केरीकर या प्राचीन गोमंतकीय कवीची असल्याचे दा. अ. कोरे व शिवा फटू पै आंगले यांनी साधार सिद्ध केले आहे. होनाजीची भाषाशैली त्याच्या भावनांना साथ देणारी आहे. ''त्याची लावणी म्हणजे एका सहृदय संगीतज्ज्ञाच्या उदात्त प्रेमविषयक कल्पनांचा सात्त्विक व कलात्मक आविष्कार आहे'' असे ल. रा. नसिराबादकर म्हणतात.

हानोजीने आपल्या सकस प्रतिभेने प्रतिस्पर्ध्यांना निष्प्रभ केले होते. त्यामुळे त्याच्याविषयीचा मत्सर

पराकोटीला गेल्याने विरोधकांनी त्याच्यावर मारेकरी घालून त्याचा वध केला. होनाजी मारला गेला तरी 'अमर भूपाळी'च्या रूपाने तो अमरच आहे. ख्याल, टप्पे, गाणाऱ्या कलावंतिणी बैठकीमध्ये रागदारी लावण्या सादर करू लागल्या; हे होनाजीच्या कर्तृत्वाचे व लोकप्रियतेचे गमक होय.

## ३.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न आणि उत्तरे

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. सामान्यत: पोवाड्यात कशाचे वर्णन येते ?

२. पोवाड्यात मुख्यत: कोणता रस असतो.

३. लावणीत मुख्यत: कोणता रस असतो.

४. होनाजी बाळाने अनंत फंदीचे वर्णन कसे कले आहे ?

५. प्रभाकराने प्रसिद्ध अशी कोणती पौराणिक लावणी लिहिली आहे ?

**उत्तरे** १. पोवाड्यात सामान्यत: वीर पुरुषाच्या पराक्रमाचे वर्णन येते.

२. पोवाड्यात मुख्यत: वीररस असतो.

३. लावणीत प्रामुख्याने शृंगाररस असतो.

४. होनाजी बाळाने 'फंदी अनंत कवनाचा सागर' असे म्हटले आहे.

५. प्रभाकराने 'लक्ष्मी-पार्वती संवाद' ही प्रसिद्ध पौराणिक लावणी लिहिली.

**लघुत्तरी प्रश्न**

**१. शाहीर प्रभाकर यांच्या शाहिरी काव्याचा परिचय करून द्या.**

**प्रास्ताविक :** मराठीमध्ये संत आणि पंत या कवींपेक्षा तंत कवींची उर्फ शाहिरांची कविता सर्वस्वी आगळी वेगळी आहे. शाहीर हे लोकजीवनाशी समरस पावल्याने त्यांनी लोकांच्या भावना लोकांसाठी लोकांच्या शब्दांत मांडल्या. म्हणूनच ही 'मराठ्यांची खरी गाणी' मानली जातात. पोवाडे व लावण्या म्हणजेच शाहिरी कविता. पोवाड्यांत वीररस तर लावण्यांत शृंगाररस असतो. पोवाडा हे वीरांचे कीर्तिकाव्य असते. पोवाडा व लावणी हे श्राव्य व दृश्यकाव्ये आहेत. अनेक शाहीर अशी काव्यरचना करून गेले. त्यात अनंत फंदी, परशुराम, सगनभाऊ, प्रभाकर, रामजोशी व होनाजीबाळा हे सहा शाहीर प्रमुख आहेत. शाहीर प्रभाकर हा मुळचा नाशिक जिल्ह्यातील. वयाच्या बावीसाव्या वर्षी पुण्यात तो कारकून म्हणून नोकरीस राहिला. त्यावेळपासून त्याचा तमाशाशी संबंध आला. प्रभाकरावर दुसऱ्या बाजीरावाची मर्जी होती. लावणीकार म्हणून त्याला प्रसिद्धी मिळाली. प्रभाकरच्या हयातीतच सवाई माधवरावांचा रंगाचा दरबार,

खर्ड्याची लढाई, स. माधवरावाचा मृत्यू, रावबाजीची विलासी कारकीर्द ह्या घटना घडल्या. या घटनांवरच त्याने पोवाडे व लावण्या रचल्या.

**विवेचन :** शाहीर प्रभाकराने तेरा पोवाडे रचले आहेत. तीन सवाई माधवरावांवर, दोन दुसऱ्या बाजीरावावर, दोन पेशवेवंशवर्णनपर. बाकीचे नाना शंकरशेट, पेस्तनजी शेट यांच्यावर आहेत. सवाई माधवरावांचा मृत्यू हा त्याचा पोवाडा करूणरसपूर्ण आहे. हा पोवाडा म्हणजे मराठी भाषेचा एक अलंकार होय. त्याचा खर्ड्याच्या लढाईवरील पोवाडा परिणामकारक आहे. रंगाच्या दरबारातील त्याचा पोवाडा उत्कृष्ट आहे.

प्रभाकराच्या लावण्यांमध्ये शृंगाराच्या विविध छटा आहेत. त्याने दुसऱ्या बाजीरावाच्या विलास वर्णनपर तीस-बत्तीस लावण्या रचल्या आहेत. त्यातील शृंगार उद्दाम व भडक आहे. मात्र अन्य लावण्यांतील स्त्री सौंदर्याचे वर्णन उल्लेखनीय आहे. उदा. 'डुलत खुलत चाले, झुलत झुलत बोलता हले हलकडी', 'नका जाऊ दूर देशी घरी काय धनद्रव्याला कमी । आली हो वर्षाची नागपंचमी' असा पतीला घरी राहण्याचा आग्रह करणारी पत्नी काही लावण्यांत आढळते. त्याची काही शब्दचित्रे - ''टवटवित गाल, नाहि पडलि कुठे वळकटी । स्वादिष्ट सुटे मकरंद मुखातळवटी । कोय आम्रफळाची अति पातळ हनवटी ।'', ''झुळझुळ वारा वाहतो, चांदणे थंड ग ! झगमग तारे करिती आकाशीं उदंड ग !'' अशी आहेत. वर्णनाचा नेमकेपणा, अर्थानुकारी शब्दयोजना, रसनिर्मितीची जाणीव इतर लावणीकारांपेक्षा प्रभाकराकडे जास्त होती. तत्कालीन मराठी स्त्रीच्या अंगावरील विविध दागिन्यांचे वर्णनही एका लावणीत आले आहे. त्याच्या पौराणिक लावण्याही गाजल्या. 'लक्ष्मी-पार्वती संवाद' या लावणीत लक्ष्मी व पार्वती एकमेकींच्या नवऱ्याचे दोष काढतात. कृष्ण-विठ्ठल यांच्या लावण्याही प्रसिद्ध आहेत. सूक्ष्म निरीक्षण, उत्कट भावनाविष्कार व प्रसादिक भाषा यांमुळे त्याची कविता लोकप्रिय झाली.

**समारोप :** प्रभाकरावर विद्येचा संस्कार झाल्याने इतर शाहिरांच्या रचनांपेक्षा त्याची रचना उजवी ठरली आहे. 'प्रभाकराची जडण अमोलिक जसा शिरी शिरपेच तुरा' अशी त्याच्या कवित्वाची ख्याती आहे. तो प्रसंगचित्रे हुबेहुब रेखाटतो. सवाई माधवरावांच्या मृत्यूवरील त्याचा पोवाडा ही मराठी कवितेला त्याची देणगी म्हणावे लागेल. त्याच्या लावण्यांमध्ये शृंगार रसाचे विविध नमूने आकर्षकपणे व्यक्त झाले आहेत. प्रभाकराचे काही पोवाडे व बऱ्याच लावण्या लोकप्रिय झाल्या होत्या, हे मान्यच करावे लागेल.

**२. होनाजी बाळाच्या शाहिरी कवितेचे विशेष स्पष्ट करा.**

**प्रास्ताविक :** अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातील हा शाहीर. याचा आजा साताप्पा आणि चुलता बाळा हे विख्यात शाहीर होते. सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत तमाशा काढून हा नावारूपास आला. याला दुसऱ्या बाजीरावाचाही आश्रय होता. याने रचलेल्या लावण्या बाळा करंजकर हा त्याचा साथीदार सुरेल आवाजात सादर करी. त्याच्या तमाशाला होनाजी बाळाचा तमाशा असेच म्हणत. म्हणून 'होनाजी'च्या नावात 'बाळा' शब्द जोडला गेला आहे. होनाजी सयाजी शिलारखाने हे त्याचे पूर्ण नाव. तो संगीततज्ञ व कल्पक होता. त्याच्या लावण्यांतील नवे नवे छंद, धाटणी व शब्दांची ठेवण सरस आहे, असे दादोबा

पांडुरंग आत्मचरित्रात म्हणतात.

**विवेचन :** होनाजीने पोवाडे लिहिले पण ते गाजले नाहीत. त्याने चार पाच पोवाडे रचले. सवाई माधवरावांच्या रंगाचा समारंभ आणि खर्ड्याची लढाई या प्रसंगांवरील पोवाडे त्याने स्वत: पेशवे दरबारात सादर केले होते. महादजी शिंदे यांच्या रंगाच्या पोवाड्यात तत्कालीन सांस्कृतिक जीवनाचा ठसा उमटला आहे. बाजीरावाबद्दलची कृतज्ञता त्याने बाजीरावाच्या राज्यारोहणावर पोवाडा करून व्यक्त केली. अष्टीची लढाई ही पोवाडेवजा लावणी ही या लढाईवरील रचनांमधील उत्कृष्ट रचना आहे. बाजीरावाबद्दलच्या पोवाड्यात मराठेशाहीच्या दुर्दैवाचे चित्रण अत्यंत हृदयद्रावक आहे. – 'दिन असता अंधार आकाशातळी पडला बाई। विश्व तरंगाकार प्रभुविण शून्य दिशा दाही ।।'

होनाजीच्या लावण्यांत शृंगारपर लावण्या जास्त आहेत. होनाजीनेच प्रथम निरनिराळ्या रागदारीच्या चालीवर लावण्या रचून तमाशाला बैठकीच्या गाण्याचे स्वरूप आणून दिले. त्यामुळेच दुसऱ्या बाजीरावाची त्याच्यावर मर्जी होती. होनाजी कल्पक रचनाकार होता. संगीताचा जाणकार होता. त्याने रेखाटलेली शब्दचित्रे पाहा – 'सरळ चिरी कुंकाची कपाळी लाल जशी पिकली मिरची ।' किंवा 'बांधिव बुचड्याची लबक, पदर अति सुबक । खोविला, तिपदरी वेणीचा । चंदन ढाळित तसा लपेटा काळे नागिणीचा ।' त्याच्या रचनेत सर्वत्र प्रसाद गुण दिसतो. 'लटपट लटपट तुझं चालणं मोठ्या नखऱ्याचं । बोलणं ग मंजुळ मैनेचं' ही त्याची लावणी म्हणजे मराठमोठ्या स्त्रीच्या सौदर्याचे सुबक वर्णन आहे. नादमय शब्दयोजना, शब्दांची पुनरुक्ती व समर्पक उत्प्रेक्षा यांमधून मराठमोळ्या सौदर्याचा नखरा ढंगदारपणे साकार झाला आहे. निपुत्रिक स्त्रीचे दु:ख त्यात आले आहे. स्त्रीहृदयाचे सूक्ष्म विश्लेषण हे त्याच्या लावण्याचे वैशिष्ट्य होय. पातिव्रत्य व प्रेम यांचे सामर्थ्य त्याने वर्णिले आहे. शंकर पार्वती संवाद, श्रीकृष्णतुला, मल्हारी मार्तंड, दमयंती विलाप अशा काही पौराणिक लावण्याही त्याने रचल्या आहेत. 'घन:श्याम सुंदरा श्रीधरा अरूणोदय झाला । उठी लौकरी वनमाळी उदयाचळी मित्र आला' ही त्याची लावणी म्हणजे महाराष्ट्र शारदेचा श्रेष्ठ अलंकार होय. सहजरम्य वर्णने, नाजूक भाव व प्रसादपूर्ण रचना यांमुळे ही भूपाळी मराठी मनाला नित्यनवा आनंद देते. होनाजीची भाषाशैली त्याच्या भावनेला साथ देणारी आहे. त्याच्या उदात्त प्रेमविषयक कल्पनांचा कलात्मक आविष्कार म्हणजे त्याची लावणी होय.

**समारोप :** होनाजी लावण्या रचण्यात व सादर करण्यात खूपच कुशल होता. त्याचे संगीताचे ज्ञान चांगले होते. कवित्व तर बहारीचे होते. त्यामुळे त्याचे प्रतिस्पर्धी खूपच विफल झाले होते. त्यानी त्याच्यावर मारेकरी घालून त्याचा वध केला. पण त्याची लावणी मराठी काव्यप्रांतात सुंदर कल्पनांनी नेहमीच मराठी मुलूखात दरवळत राहील, हे निश्चित ! आपल्या लावण्यांमध्ये त्याने रेखाटलेली शब्दचित्रे सुंदर व उठावदार झाली आहेत. शृंगाराच्या उत्तान भावनेपासून निपुत्रिकेच्या करूण आर्ततेपर्यंतचे कितीतरी वेगळे रंग त्याच्या लावणीत साकार झाले आहेत. प्रेमभावनेच्या अनेक छटा अत्यंत हळूवारपणे त्याने व्यक्त केल्या आहेत.

■ टिपा लिहा

## १. पोवाड्याचे स्वरूप

**प्रास्ताविक :** शाहीर म्हणजे कवी तर शाहिरी वाङ्मय म्हणजे विशिष्ट प्रकारची कविता होय. शाहिरी वाङ्मयात पोवाडे व लावण्या ह्या कविता प्रकारांचा समावेश होतो. पोवाडा म्हणजे 'ठासून स्तुती करणे' उत्तरेतून यादव कालापूर्वी भाट महाराष्ट्रात आले. त्यांचा उत्तरकालीन आविष्कार म्हणजे शाहीर. पोवाडा म्हणजे 'यशोगान' किंवा 'कीर्तीकाव्य' होय. वीरांच्या पराक्रमाचे, विद्वानांच्या बुद्धिमत्तेचे व एखाद्या सामर्थ्याचे काव्यात्म वर्णन, प्रशस्ती, स्तुतीस्त्रोत म्हणजे पोवाडा होय. पोवाड्याच्या सर्वात जुना उल्लेख महिकावतीच्या बखरीत मिळतो. गोंधळ्यांमधूनच हे शाहीर पुढे आले. पौरुषाची अगर पराक्रमाची पूजा करणे ही पोवाड्यामागील प्रेरणा आहे.

**विवेचन :** आपल्या पूजास्थानाचा गौरव करावा आणि कावनाच्या द्वारा मनातील आदर व्यक्त करावा ही यशोगानामागील प्रेरणा आहे. मराठ्यांच्या लौकिक जीवनातील यशापयशाशी मराठी शाहीर एकरूप झाले होते. शाहिरांच्या कवितेत तत्कालीन लौकिक भावनांची प्रतिक्रिया स्पष्टपणे प्रतिबिंबीत झाली आहे. मराठी समाजमनाचे हे भावजीवन आहे. ऐतिहासिक प्रसंग व व्यक्ती हाच पोवाड्याचा विषय होता. पोवाडा हे कथाकाव्य असते. ते श्राव्यकाव्य असते तसे दृश्यकाव्यही असते. पोवाडा हा सादर केला जातो. तो प्रांगणीय काव्यप्रकार आहे. मुख्य शाहीर व त्याचा साथीदार हे दोघे पोवाड्यातील व्यक्तींच्या सोंगाची बतावणी करतात. पोवाड्यात प्रारंभी देवदेवतांना आवाहन व नमन केले जाते. पुढे मुख्य कथेचा विस्तार व प्रसंगनिर्मितीतून कथानिवेदन असा क्रम असतो. 'पहिले नमन माझे देवा नारायणाशी । दुसरे नमन माझे सद्गुरुच्या चरणाशी' असे वंदन यमाजीने बाजी पासलकरच्या पोवाड्यात प्रारंभीच केले आहे. दरवेळी नमन असतेच असेही नाही. क्वचित नमनावेळी एकदम विषयाला प्रारंभ केला जातो. कथाविकासातील प्रत्येक पदबंध एकेका चौकात साकार केलेला असतो. चौकाच्या रचनेत विशिष्ट चरण, ओळी, वृत्त यांचे बंधन पाळलेले नाही. एकेका चौकातील चरणाची लांबीही विषम आहे. पोवाड्यामध्ये चौकाच्या रचनेबाबत विशिष्ट मर्यादा पाळलेली नाही. चौकाच्या पदबंधात कथाविकासाचा एक टप्पा अगर भावनिर्मितीचा एक घटक साकार केला जातो. चौकांच्या संख्येबाबत निश्चित मर्यादा नाही. रचनेसाठी धावती वृत्ते योजिली जातात.

**समारोप :** निवेदनाच्या गरजेपोटी काही शाहीर गद्याचा आश्रय करीत. पण धावती पद्यरचना हाच खरा पोवाडा असे. शाहीर पोवाड्यामध्ये दंतकथा, तात्कालिक सामाजिक संकेत व पापपुण्याच्या कल्पना यांच्याद्वारा मूळ कथासूत्रात रंग भरीत असे. धावत्या रचनेत कधी कधी रंजकता आणण्यासाठी विनोद, रसपरिपोष व प्रसंगनिर्मिती शाहीर करीत असत.

## २. लावणीचे स्वरूप

**प्रास्ताविक :** लावणी ही सामान्यत: स्फूट रचना असते. ती आत्मनिष्ठ व नाट्यगीत स्वरूपाची असू शकते. रचनादृष्ट्या लावणी बंदिस्त असते. ती अधिक काव्यात्मक व सफाईदारपणे रचलेली असते. लावणी प्राधान्याने शृंगार- रसपर असते. तथापि ती लौकिक जीवनाची इतर दृश्येही चित्रित करते. सर्वांत जुनी लावणी एकनाथ कालातील मन्मथ शिवलिंगाची आहे. त्यादृष्टीने लावणीची परंपरा बरीच जुनी आहे. तरीही लावणी बहरली ती उत्तर पेशवाईत !

**विवेचन :** लावणी ही ढोलकी कड्यांच्या तालावर म्हटली जाणारी भृंगावर्तनी वा पद्मावर्तनी रचना असते. लावणीचे मूळ लोकगीतात सापडते. बहुजन समाजाने जनसमुदायाचे मनोरंजन करण्यासाठी हा काव्यप्रकार निर्माण केला असावा. शृंगार हा लावणीचा रसराज आहे. सजन आणि सजणी यांची मनाला धुंद करणारी चित्रे लावणीत आढळतात. सात्त्विक शृंगार, उत्तान शृंगार, संभोग, विप्रलंभ, नैतिक, अनैतिक प्रेम इ. सह गर्भवतीचे सुख व निपुत्रिकेचे दु:खही लावणीत पाहावयास मिळते. लौकिक लावण्यांबरोबर आध्यात्मिक, भक्तिपर व उपदेशपर लावण्याही रचल्या गेल्या आहेत. म्हणून विषयदृष्ट्या पोवाड्यापेक्षा लावणी अधिक व्यापक ठरते. १) शेतात लावणी करताना म्हटली जाते ती लावणी. २) हृदयाला चटका लावते ती लावणी - अ. ब. कोल्हटकर, ३) लवण-सुंदर, लावण्य-सौंदर्य त्याचे दर्शन जीमध्ये होते ती लावणी, ४) लावणे म्हणजे व्यवस्थित मांडणी, सुभग रचना जीमध्ये आहे ती लावणी - प्रा. म. वा. धोंड अशा लावणीच्या काही व्याख्या लावणीचे स्वरूप ठरवितात. गोंधळगीते, भरशडी गीते, लोककथा, संतकाव्य यांच्याशी लावणीचे नातेसंबंध जुळतात. त्यातूनच ती विकसित झाली. लावणीरचना हा गीत, नृत्य व नाट्य यांतून प्रकट होणारा वाङ्मयप्रकार होय. लावणी श्रव्य व दृश्य अशी दुहेरी स्वरूपाची असते. लावणीकार आपला आशय उघडपणे व धीटपणे मांडतो. उदा. - 'गोड वाटसी म्हणून सखे निर्लज्ज लागलो गळी', 'तुम्ही नित माझ्या घरी यावे, सुखशयनी सुरत व्हावे' इ. श्रोत्यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी लावणीकार लावणीचा मुखडा वेधक करतो. मुखड्यातील आशय पुढे विस्तारीत करतो. मुखडा बंदिस्त, आकर्षक व तालबद्ध असतो. उदा. 'झुलत झुलत डौलात कमर हलवित नखऱ्याने ठुमक चाल चौरंगि, खबुतर झडपी कुर्ऱ्याने. लावणीकार कारागीरीला प्राधान्य देतात. ते बहुश्रुत व भाषाप्रभू होते. हे शीघ्र रचना करीत.

**समारोप :** शृंगारिक, उपदेशपर, वैराग्यपर, देवतावर्णनपर, कथनपर, स्थानमाहात्म्यपर, व्यक्तिवर्णनपर, विनोदपर, सामाजिक परिस्थितीपर, भेदिक असे लावण्यांचे अनेक प्रकार आहेत. पण शृंगार हाच लावणीचा प्राधान्याने दिसणारा रस आहे. लावणीत करूण, वत्सल, अद्भूत, हास्य, बीभत्स, शांत असेही रस आले आहेत.

## ३.४ सरावासाठी प्रश्न

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. होनाजी बाळाची विशेष कामगिरी कोणती ?

२. प्रभाकराचा कोणता पोवाडा करूणरसपूर्ण आहे ?

३. रामजोशी कोणाच्या उपदेशानुसार कीर्तन करू लागले ?

४. अनंत फंदीचे 'फटके' म्हणजे काय ?

५. सगनभाऊचा कोणता पोवाडा प्रसिद्ध आहे ?

**लघुत्तरी प्रश्न**

१. रामजोशींच्या लावणी वाङ्मयाचे विशेष स्पष्ट करा.

२. अनंत फंदीच्या वाङ्मयीन कामगिरीचा आढावा घ्या.

**टिपा लिहा.**

१. सगनभाऊची शाहिरी कविता.

२. परशराम शाहिराची शाहिरी कवीता.

## ३.५ समारोप

शाहिरी कविता ही खरी पहिली मराठी कविता ठरावी. पोवाडे आणि लावण्या हे दोन काव्यप्रकार त्यात समाविष्ट होतात. पोवाडा म्हणजे वीरांच्या पराक्रमाचे काव्यात्म वर्णन. ते यशोगान आहे. कीर्तिकाव्य आहे. आपल्या श्रद्धास्थानांचा गौरव करून त्यांच्याविषयी मनातील आदर व्यक्त करावा ही पोवाडे लेखनामागील प्रेरणा आहे. पोवाड्यात वीररस असतो. पोवाड्यात प्रारंभी देवतांना नमन केलेले असते. पुढे कथेचा विस्तार केला जातो. ते एक कथाकाव्य आहे. ते दीर्घ असते.

लावणी स्फुट रचना असते. लावणी काव्यात्म व सफाईदार असते. लावणीत मुख्यतः शृंगाररस असतो. लावणी ही ढोलकी-कड्यांच्या तालावर म्हटली जाणारी भृंगावर्तनी व पद्मावर्तनी रचना असते. लावणीचे मुळ लोकगीतात आहे. लौकिक लावण्यांबरोबर आध्यात्मिक, भक्तीपर व उपदेशपर अशा प्रकारच्या लावण्यांचीही रचना झाली आहे. लावणीकारांची प्रमुख प्रेरणा जनसमुदायाचे मनोरंजन करणे ही होती. उत्तर पेशवाईत लावणी बहरली. पोवाडे राजकीय जीवनातून तर लावणी सामाजिक जीवनातून निर्माण झाली.

अनंत फंदी 'कवनाचा सागर' होता. सात पोवाडे, काही लावण्या व फटके ही त्याची रचना. 'माधवनिधनकाव्य' हा सवाई माधवरावांच्या मृत्यूवरील काव्यग्रंथ त्यानेच लिहिला. त्याचा खड्यांच्या

लढाईचा पोवाडा उल्लेखनीय आहे. त्याची 'चंद्रावळ' लावणी लोकप्रिय आहे. त्याचे फटके म्हणजे प्रापंचिकांना केलेला निर्भीड उपदेश ! परशराम बहुश्रुत होता. देशस्थितीपर पोवाडे रचणारा हा शाहीर परखडपणे लिहीत होता. जीवनातील विसंगती विनोदपूर्ण रीतीने मांडणे हा त्याचा विशेष – त्याची शैली उपरोधिक होती. रामजोशी संस्कृतचा व्यासंग असणारा. 'सुंदरा मनामध्ये भरली' ही त्याची गाजलेली लावणी. अर्थचमत्कृती, खटकेबाजपणा, प्रसात्मकता व भाषेचे लालित्य यांमुळे त्याच्या लावण्या लोकप्रिय झाल्या. प्रभाकराचे पोवाडे जास्त उपलब्ध आहेत. 'सवाई माधवरावांचा मृत्यू' हा त्यांचा पोवाडा मराठी भाषेचा बहुमोल अलंकार आहे. त्याचा खर्ड्याच्या लढाईवरील पोवाडा परिणामकारक आहे. त्याने बाजीरावाच्या विलासपर तीस बत्तीस लावण्या लिहिल्या आहेत. 'लक्ष्मी-पार्वती संवाद' ही त्याची पौराणिक लावणी सुंदर उतरली आहे. सगनभाऊ हा मुस्लीम असूनही मराठी संस्कृतीचा अभिमानी आहे. त्याचा खडकीच्या लढाईवरील पोवाडा प्रसिद्ध आहे. त्याच्या लावण्यांमध्ये मनोभावनेला अधिक प्राधान्य आहे. त्यातून नीतीपर उपदेशही तो करतो. कल्पनारम्य वातावरणातील व्यक्तिचित्रे त्याच्या लावणीत आहेत. होनाजी बाळा 'घन:श्याम सुंदरा' या भूपाळी – लावणीने मराठी काव्यप्रांतात अमर झाला आहे. तो संगीततज्ञ व कल्पक होता. त्याच्या लावण्यांत नवे नवे छंद, धाटणी व शब्दरचना सरस आहे. त्याच्या लावणीत प्रेमभावनेच्या विविध छटा व्यक्त होतात. 'लटपट लटपट तुझं चालणं' हे मराठमोठ्या स्त्रीच्या सौंदर्याचे सुंदर वर्णन आहे. शंकर पार्वती संवाद, मल्हारी मार्तंड इ. पौराणिक लावण्याही त्याने रचल्या आहेत. त्याची लावणी म्हणजे एका सहृदय संगीतज्ञाच्या उदात्त प्रेमविषयक कल्पनांचा सात्त्विक आविष्कार आहे. वरील सर्वच शाहिरांनी अशा तऱ्हेने मराठी लावणी समृद्ध केली आहे.

## ३.६ अधिक वाचन

मराठी शाहिरी वाङ्‌मय – म. ना. सहस्रबुद्धे.

मराठी वाङ्मयाचा इतिहास-खंड तिसरा-संपा.रा.श्री.जोग, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप-ह. श्री. शेणोलीकर, मोघे प्रकाशन, पुणे-कोल्हापूर

प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास-ल. रा. नसिराबादकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर

## ३.७ उपक्रम

१. बावनखणी हे विद्याधर गोखले यांचे नाटक पहा.

❑❑❑

# घटक : ४

# बखर वाङ्मय : स्वरूप व वर्गीकरण

**(अ) शिवपूर्वकालीन बखरी : १. महिकावतीची बखर, २. राक्षसतागडीची बखर, ३. शालिवाहनची बखर, (ब) शिवकालीन बखर : १. सभासदांची बखर, २. शिवदिग्विजय, ३. शिवाजी प्रताप, ४. शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र, (क) पेशवेकालीन बखर : १. पाणिपतची बखर, २. भाऊसाहेबाची बखर, ३. श्रीशाहू महाराज यांची बखर (ड) आज्ञापत्र**

## ४.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रहो, या घटकाचा अभ्यास करत असताना आपणांस बखर वाङ्मय हे मराठी साहित्यातील वेगळे दालन असून तो इतिहासाचा एक अत्यंत महत्त्वपूर्ण दस्ताऐवज आहे; याचा अभ्यास करता येईल. त्यासाठी म्हणून आपणाला खालील मुद्यांच्या आधारे त्याचे वेगळेपण लक्षात घेता येईल.

- बखर वाङ्मय म्हणजे काय ?
- मराठी साहित्याच्या दृष्टीने बखर वाङ्मयाचे स्वरूप कसे आहे.
- ऐतिहासिक वृत्तकथनाच्या गरजेतून मराठी बखरवाङ्मयाची निर्मिती कशी झाली.
- बखर वाङ्मयाचे वर्गीकरण.
- बखर हा इतिहास की वृत्तकथन.
- 'बखर' वाङ्मय प्रकार म्हणून त्याचे महत्त्व.
- शिवपूर्वकालीन बखरी.
- शिवकालीन बखरी.
- पेशवेकालीन बखरी
- बखरवाङ्मयाचे मूल्यमापन व त्याचे महत्त्व.
- मराठी गद्याचा परिचय होईल.

या विशेषाच्या अनुषंगाने बखर वाङ्मयाचे स्वरूप आणि वैशिष्टे ध्यानात घेता येतील.

## ४.१ प्रास्ताविक

मराठीचे अध्ययन करीत असताना प्राचीन मराठी वाङ्मयामध्ये संत, पंत व तंत या तीन संप्रदायांनी प्राचीन मराठी वाङ्मय समृद्ध केले आहे. संतांनी मराठी साहित्याला पद्यरूपाच्या माध्यमाने आध्यात्मिक

दृष्ट्या व पारमार्थिक अर्थाने समृद्ध केले. तर पंडिती वाङ्मयाने मराठी साहित्यात प्रतिभा संपन्न कलावैभवाची भर घातली. वृत्तबद्धता व आलंकारिकता यांनी मराठी भाषेच्या सौंदर्यात मोलाची भर घातली; आणि स्वयंवर काव्य, कथाकाव्य, चंपूकाव्य, केकावली, आर्या यांसारखे नवनवीन रचनाप्रकार व विविध वृत्तांची मराठी साहित्याला वेगळी दालने दिली. पंडिती कवीच्या काव्यसृष्टींचा प्रत्यय त्यांच्या सौंदर्यात आहे; तर शाहिरांची कविता या दोन्हीपेक्षा भिन्न असून, त्यांनी लावणी व पोवाडा हे दोन काव्य प्रकार मराठीला दिले. हे काव्य सर्वार्थाने अस्सल मराठी होते. पण या सर्वांमध्ये सर्वार्थाने भिन्न, तरीही लोकभाषेचे प्रातिनिधिक दर्शन देणारे गद्य-पद्य-मिश्रीत असे बखर वाङ्मय असल्याचे आपणाला दिसून येते. यामध्ये अर्जदस्त, कौलपत्र इत्यादी वाङ्मय प्रकारही आहेत.

## ४.२ विषयविवेचन

सुमारे १८ व्या शतकाच्या पूर्वार्धात पारतंत्र्याचे मध्ययुग संपून स्वातंत्र्याच्या दृष्टीने नवयुगाची सुरूवात झाल्याचे पाहावयास मिळते. या शतकाच्या उत्तरार्धात स्वराज्याची स्थापना होऊन मराठीला राज्यभाषेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे मराठ्यांच्या पराक्रमाचे पवाडे साहित्यात अवतरले. तसेच त्यांच्या कर्तृत्वाचे दर्शन देखील गद्य स्वरूपात आपल्याला घडू लागले. या दृष्टीने शिवकाल व पेशवेकाल हा अत्यंत कलात्मक व तेजस्वी ठरला आहे. राष्ट्रीय भावनेने हा कालखंड भारला होता. हे जसे पहावयास मिळते; तसेच अनेक आक्रमणांमुळे सारा समाज भरडून निघाला होता. त्याचे कारूण्यही पहावयास मिळते. पण तशाही स्थितीत विलक्षण भाबडी बालबोध अशी पक्षनिष्ठा, या साऱ्याविषयी वाटणारी आत्मियता आणि स्वकियांबद्दल वाटणारा अभिमान या साऱ्यांचे दर्शन बखर वाङ्मयात आपणाला घडते. मराठी गद्य सारस्वतांच्या इतिहासातील बखर वाङ्मयाचे स्थान या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे या बखरींचा अभ्यास केवळ इतिहास म्हणून करण्यापेक्षा मराठे शाहीतील गद्य सारस्वताचा एक नमुना म्हणून केला, तर भाषेच्या सौंदर्याने संपन्न भांडारच आपल्यासमोर उघडे होते. म्हणूनच या बखर ग्रंथांना 'मराठेशाहीच्या तेजस्वी पराक्रमाचे नंदादीप' असे ल. रा. नासिराबादकर म्हणतात. (प्राचीन मराठी वङ्मयाचा इतिहास पृ. क्र. २८६).

मराठी साहित्यात बखर हा शब्द अरबी भाषेचा विपर्यास होऊन वापरात आला आहे. याला वार्ता, समाचार, घटना, बातमी, वृत्त असे पर्यायी शब्द होते. **'बक' म्हणजे बोलणे.** या मूळ धातूपासून बखर शब्दाची निर्मिती झाली असावी असे वि. का. राजवाडे यांना वाटते. त्यांच्या मताप्रमाणे फार पूर्वी बखर लिहण्याची पद्धती नव्हती तर, बातमीदार हा घडलेल्या घटनांची माहिती प्रत्यक्षपणेच सांगत असावा. ही मूळ कल्पना मुसलमानांमध्ये तवारीखा लिहिण्याची जी पद्धती होती, त्यातूनच आपणांकडे आली असावी. मराठी गद्य सारस्वताच्या इतिहासातील बखर वाङ्मयाचे स्थान महत्त्वपूर्ण असे आहे. या सर्व बखरींचा अभ्यास केवळ इतिहास म्हणून करण्यापेक्षा मराठे कालिन गद्य सारस्वताचा नमुना म्हणून केला तर भाषिक सौंदर्याचे अफाट भांडार आपणांसमोर उघडले जाते. त्या गरजेतून बखरींची निर्मिती झाली आहे. सद्यस्थितीत मराठ्यांच्या या ऐतिह्य वृत्तांताचा आढावा घेताना इतिहासातील वेगवेगळ्या घटना व प्रसंगांवर आधारित

अशा सुमारे अडीचशे इतक्या बखरी लिहिल्या गेल्याचे सांगितले जाते. अगदी इंग्रजी आमदानीतही काही पौराणिक, मिशनरी, चळवळीविषयक आणि ऐतिहासिक बखरीही लिहिल्या गेल्या आहेत. या साऱ्यांचा विचार करत असताना काळ व रचनेच्या दृष्टीने 'महीकावतीची' बखर ही सर्वात जुनी बखर असल्याचे सर्वमान्य झाले आहे. सर्व बखरींचा अभ्यास करून त्यांचे वर्गीकरण करावयाचे झाले; तर स्थूलमानाने त्याचे पाच भागात वर्गीकरण करता येईल.

(१) बखरकाराने प्रत्यक्षपणे पाहिलेल्या व ऐकलेल्या राजकीय घटना व प्रसंगांवर आधारित असलेल्या बखरी. अशा बखरी ऐतिहासिक दृष्ट्या बऱ्याचशा विश्वसनीय मानल्या जातात. या प्रकारामध्ये सभासदाची बखर, भाऊसाहेबांची बखर अशा बखरींचा समावेश करता येईल. पण हे ही मान्य करावे लागते की, अशा समकालिनांनी लिहिलेल्या बखरींची संख्या अत्यंत मोजकीच आहे. त्यामुळे या बखरींचे विश्वसनीय रूप महत्त्वाचे मानले जाते व त्याचे महत्त्वही उच्च दर्जाचे आहे

(२) केवळ आठवणीवर विश्वास ठेवून लिहिलेल्या बखरी. अशा बखरी स्मृतींवर हवाला ठेवून लिहिलेल्या असतात. त्यामध्ये अख्यायिका, पारंपरिक हकीकती, दंतकथा आठवणी इत्यादींच्या आधारे या बखरी लिहिलेल्या असतात. अशा बखरी उत्तरकालीन असतात. जे पुरावे उपलब्ध होतात त्या पुराव्यांच्या आधारे छाननी करण्यास व त्याची कथनपद्धती अधिक आकर्षक व कलात्मक करण्यास बखरकाराला यामध्ये संधी असते. पण अशा वेळी काळ विपर्यास व व्यक्तिविपर्यास तसेच स्थळविपर्यास होण्याची देखील शक्यता असल्याने अशा प्रकारच्या बखरी अधिक विश्वसनीय मानल्या जात नाहीत. त्याला कारण म्हणजे अशा बखरी स्मृतींवर हवाला ठेवूनच लिहिलेल्या असतात. ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने म्हणावे तसे लिखित पुरावे, टिपणे, कागदपत्रे येथे उपलब्ध होऊ शकत नाहीत. अशा प्रकारच्या बखरींमध्ये कृ. वि. सोहनी यांनी लिहिलेल्या पेशव्यांच्या बखरींचा समावेश करता येईल.

(३) ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे लिहिल्या गेलेल्या बखरी. या वर्गामध्ये ऐतिहासिक कागदपत्रे दप्तरांतील, टीपणे, जुने ग्रंथ, हस्तलिखिते इत्यादींचा समावेश होतो. या प्रकारच्या बखरी या कागदपत्रांच्या आधारे लिहिलेल्या असतात. या बखरी उत्तरकालीन असून अशा प्रकारच्या बखरींना ऐतिहासिक पुराव्यांचा आधार असल्याने त्या अधिकाधिक विश्वसनीय मानल्या जातात. अशा प्रकारच्या बखरीमध्ये मल्हार रामराव चिटणीसांची बखर, सप्त प्रकारणात्मक चरित्र इत्यादींचा समावेश होतो.

(४) **बखर या नावाने केलेले लेखन :**

या प्रकारामध्ये बखर सदृश्य ऐतिहासिक स्वरूपाच्या लेखनाचा समावेश केला जातो. यामध्ये चरित्र, आत्मचरित्र, वाका, हकीकत, कैफियत इत्यादी प्रकारच्या लेखनाचा समावेश होतो. भाऊसाहेबांची कैफियत, पटवर्धनीय वाका, आंग्र्याची हकीकत अशा प्रकारच्या बखरींचा येथे समावेश केला जातो.

(५) ऐतिहासिक व राजकीय विषय नसलेल्या परंतु बखर म्हणून संबोधल्या जाणाऱ्या साहित्याचा या पाचव्या वर्गात समशवेश करण्यात येतो. हे लेख मुख्यत: पौराणिक व सांप्रदायिक स्वरूपाचे असतात.

अशा लेखनावर लोकांची श्रद्धा असते. या श्रद्धेपोटीच या लेखनाला बखर असे संबोधले जाते. वेगवेगळे चमत्कार, अवताराच्या कल्पना, यावर आधारित हे लेखन केलेले असते. यामध्ये बकासुराची बखर, श्रीकृष्णजन्मकथा बखर, श्रीसमर्थांची बखर यांचा समावेश होतो.

वरील सर्व प्रकारचे लेखन हे गद्यमय असून महिकावतीची बखर ही त्याला अपवाद आहे. ही बखर गद्य-पद्यसंमिश्र प्रकारची असून पद्यात्मक मजकूरच त्यात अधिक आहे. बाकी बखरी गद्यातच लिहिल्या आहेत. या सर्व बखरी कुणाच्यातरी सांगण्यावरूनच लिहिल्या आहेत. विशेषत: राजकीय स्त्री पुरुषांच्या आज्ञेवरून या बखरी लिहिल्या आहेत. ते लिहणारे बखरकार देखील राज दरबारात आश्रित होते. त्यांच्यावर ही बखर लेखनाची जबाबदारी सोपवल्यामुळे हे लेखन त्यांच्याकडून करून घेतले आहे. त्यामुळे त्यांचे वाङ्मयीन स्वरूप हे सर्वार्थाने वेगळे आहे. त्यामुळे अशा लेखनात सुरूवात ही पुराण लेखनासारखी करुन शेवटी वाचन, श्रवण यांची फलश्रुती सांगितली गेली आहे. त्याचबरोबर काही वेळेला सृष्टीची उत्पत्ती कशी झाली व त्यामध्ये राजघराण्याचा वंश कसा वाढत गेला या गोष्टी सांगितल्या गेल्या. त्याआधारेच हे वृत्तकथन पुढे केले जाते. आणि मग लोकांनी त्याचे श्रवण मनन, पठण करावे त्यामुळे जन्मोजन्मीचे पुण्य लाभून यश प्राप्त होते. घरी व राज्यात सुकाळ नांदतो अशी फलश्रृती सांगितली जाते. त्यातूनच बखरी जन्माला आल्या आहेत. या साऱ्या विवेचनावरून खालील गोष्टी आपल्या लक्षात येतील.

**(अ) बखर व वृत्तकथन :** बखरलेखन म्हणजे इतिहास नसतो तर ते ऐतिहासिक वृत्तकथन असते. अशा प्रकारच्या लेखनात त्या काळातील व समाजजीवनातील काही महत्त्वपूर्ण घटनांवर प्रकाश टाकलेला असतो. हे ऐतिह वृत्तकथन असल्यामुळे त्यामध्ये सत्याचा अंश सर्वार्थाने अधिक असल्याचे विश्वसनीयरित्या म्हणता येत नाही. असे लेखन स्थळकाळ विपर्यासाच्या दृष्टीने सर्वमान्य असे होऊ शतक नाही. तसे मानने कठीण असते. याला पौराणिक वंशावळीचा संदर्भ दिला गेल्यास त्या काल्पनिक स्वरूपाच्या दंतकथाच समजल्या जातात. त्यामध्ये अद्‌भुतरम्यता अधिक असते. त्यामुळे ऐतिहासिक सत्याला अधिक बाधा येते. असे लेखन राजवाड्यांना बखर म्हणून मान्य नाही. या लेखनामागील बखरकारांची भूमिकाही लक्षात घेणे महत्त्वाचे असते. आजच्या व्यवहाराचे निकष त्याला लावता येत नाहीत. यावर ह. श्री. शेणोलीकर म्हणतात की, बखरकार हे संशोधित असे त्या त्या राजाच्या दरबारी इतिहासकार किंवा वृत्तांत लेखन करणारे अभ्यासकही नव्हते, तर ते कारकूनी करणारे लोक होते. त्यांनी आपल्याला सांभाळणाऱ्या मालकांच्या आज्ञेवरून व्यावहारिक कारणासाठी वृत्तांत व स्मरणशक्तीच्या आधारावर अशा प्रकारचे लेखन केले आहे.

अशा प्रकारच्या लेखनापाठीमागील भूमिका ही आश्रिताची होती. त्यामुळे त्यांनी आपल्या मालकाचा मुक्तपणाने तोंड भरून गौरव केलेला दिसून येतो. तसे करणे स्वाभाविकही होते. त्यामुळे अशा लेखनात अतिशयोक्ती असल्याचे दिसून येते. या लेखनाला शास्त्रशुद्धपणा येऊ शकत नाही. व तशी अपेक्षा करणे चुकीचेच आहे. पण तरीही बऱ्याच बखरकारांनी हे लेखन सुसंगत केले आहे. असे असले तरी काही वेळा ते सत्यास दुरावले आहे. कारण बखरकार हा इतिहासकार नसतो, तर तो प्रतिभासंपन्न कलावंत असतो.

त्यामुळे तो या लेखनात ओघवतेपणा येण्यासाठी चमत्कार, विनोद यांचा कलात्मकतेने वापर करून तो हे लेखन सजवत असतो. त्यात आलंकारिकता, कल्पकता यांचा वापर करतो आणि मग त्यामुळेच त्याला ऐतिहासिक प्रामाण्य रहात नाही. त्यामुळे या बखरींना इतिहास मानता येत नाही. तर ते ऐतिहासिक वृत्तकथनच असते.

**(ब) बखर एक वाङ्मयप्रकार :** बखर हे ऐतिहासिक संदर्भसाधन मानले जात असले तरी तो एक वाङ्मयप्रकार आहे. तो कलावंतांनी रचला असून आपल्या प्रतिभेच्या बळावर त्याने आपले लेखन समजवलेले असते. आणि त्यातून तो प्रसंग, व्यक्ती जिवंत करण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे हे लेखन रसिकांच्या मनाला भिडते. त्यासाठी तो वीर, करुण रसांचा वापर करत असतो. म्हणून ल. रा. नसिराबादकर या लेखनाला गद्य सारस्वतांचा स्वतंत्र विलास असे म्हणतात. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, पृष्ट क्रमांक २८९) हे लेखन करत असताना राजदरबाराचे रितिरिवाज बहुश्रृतता, कल्पकता, सूक्ष्मनिरीक्षण, निवेदनातील कौशल्य या साऱ्यांची जोड असावी लागते. त्या या लेखनाला उत्कटता प्राप्त होते. त्यासाठी तो रसरसीत भाषाशैली, आलंकारिकता, कल्पनारम्यता, म्हणी, सुभाषिते या साऱ्या वाङ्मयीन घटकांचा वापर करतो. त्यासाठी त्याचे कलासक्त मन तो उपयोगात आणतो. त्यातून कल्पनानिर्मिती करून बखरीचा घाट निर्माण करतो. म्हणून गं. ब. ग्रामोपाद्ये म्हणतात की, 'बखरकार हा जाणिवपूर्वक कलानिर्मिती करणारा कलावंत नव्हे, तर बखरीच्या एकंदर घाटावरून व त्यावर चढवलेल्या कल्पकतेच्या भावनात्मक रंगावरून बखरकार हा (Unconcious Artist) आहे. असे अनुमान केले तर ते वावगे होणार नाही. (मराठी बखर गद्य, पृष्ठ क्रमांक ६०) हे त्यांचे विधान बखरींच्या स्वरूपावर प्रकाश टाकणारे आहे.

मराठी वाङ्मयात ज्या दोन अडीचशे बखरी लिहिल्या गेल्या आहेत, त्या बखरींची आपणास मुख्यत: तीन कालात विभागणी करावी लागते.

## ४.३ शिवपूर्वकालीन बखरी

**१) महाकावतीची बखर :** हिंदुस्थानचा इतिहास पाहता छत्रपती शिवाजी हे मराठ्यांच्या इतिहासाचे सोनेरी पान मानावे लागते. पण तत्पूर्वीही काही बखरीचे लेखन केले आहे. त्या बखरींची संख्या अत्यंत थोडी असून त्यांचे वाङ्मयीन दृष्ट्या महत्त्व फार मोठे आहे. आज त्यातील काही उपलब्ध बखरी आहेत. त्यामध्ये रचनाकाळाच्या दृष्टीने सर्वात जुनी बखर म्हणजे महिकावतीची उर्फ माहिमची बखर होय. ही बखर शके १३७० ते १४०० (इ.स. १४४८ ते १४७८) या कालावधित लिहिली गेली आहे. तिचा तीस वर्षांचा कालखंड मानला जातो. ही बखर संपादित स्वरूपाची असून, ती प्रकरण वजा मानली जाते. ती वेगवेगळ्या लेखकांनी लिहिलेली असून तिचे लेखन गद्य-पद्य अशा संमिश्र स्वरूपाचे आहे. या बखरीतील दुसरे प्रकरण सर्वात जुने असून त्या प्रकरणाचा लेखक केशवाचार्य हा आहे. या प्रकरणात तो म्हणतो की, या लेखनासाठी आपणास 'मालाड' चा देसला नायकोजीराव याने सन्मानाने बोलावून महाराष्ट्र धर्माचे रक्षण करण्यासाठी हे लेखन करविले आहे. यामध्ये प्रतापबिंबापासून म्हणजे इ.स. ११३८ ते इ.स. १५०० पर्यंतचा, म्हणजेच

(शके १०६० ते १४२२) इंग्रजांच्या आगमनापर्यंतचा काळ, असा सुमारे सात राजवटींचा इतिहास समाविष्ट करण्यात आला आहे. या बखरीत काळाची नोंद काटेकोरपणे केली असून त्यातील बरीचशी हकीकत ही 'तवारीका'तील हकीकतीशी मिळतीजुळती आहे. त्यामुळे ही बखर ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने अत्यंत विश्वसनीय मानली जाते. यातील 'माहिम' प्रांताचा इतिहास हा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. हे या बखरीचे खरे वैशिष्ट्य मानले जाते. कोकणचा इतिहास पहिल्यांदाच या बखरीमुळे प्रकाशात आला. त्यामुळे तत्कालिन राजव्यवस्था, भूमापनाची पद्धती, संरक्षणासाठी वेगवेगळ्या महालात ठेवलेल्या सैन्याच्या व सरदारांच्या याद्या, त्यांचे पूर्ण पत्ते, एकूण किल्ले, नावागावासहीत उपलब्ध होतात. त्यामुळे या सर्व गोष्टी ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहते. अशी ही मराठी साहित्यातील पहिलीच बखर असून, त्यातील वर्णने अतिशय आकर्षक अशी आहेत. यामधील प्रतापबिंब, महिबिंब, केशवदेव, रामदेव या यादवराजांची व्यक्तिचित्रे अत्यंत आकर्षक चित्रित झाली आहेत. त्याचबरोबर दवण, वाळुकेश्वर, महिकावती या स्थळांचे वर्णन देखील अत्यंत सविस्तर व उल्लेखनीय झाले आहे. यातील 'माहिमजागा उत्तम रम्य स्थळ' असे माहिमचे नेटके वर्णन केले असून, ते अत्यंत आटोपशीर आहे. तसेच ज्या काही घटना घडल्या त्या घटनांचे वर्णनही लेखकाने प्रत्ययकारी व कल्पकतेने केले आहे. केशवदेवाने जसवंत देवाच्या भैसे दुर्गावर स्वारी करून बरेच दिवस झाले तरी तो किल्ला हस्तगत करता येईना; या स्थितीचे 'चिंचवनी खादले खादले। त्या चिंचाऱ्याचे वृक्ष झाले। त्यांच्या चिंचा खादल्या । इतके दिवस राहीले । परि गड हाती येत नाही ।' असे कल्पकतापूर्वक वर्णन लेखकाने केले आहे. हे लेखन अतिशय प्रत्ययकारी असून, त्यातून लेखकाच्या कल्पकतेचा प्रत्यय आपणास येतो.

या बखरीतील पूर्व परंपरा, त्यांचे वंश, उत्पत्ती, त्यांची वर्णव्यवस्था या साऱ्यांचे वर्णन पहिल्या प्रकरणात आले असून तो काव्यमय असा इतिहासच आहे. याविषयी र. वि. हेरवाडकर म्हणतात की, मराठीत पद्यमय इतिहासाची परंपरा शिवकालातील पोवाड्यापासून मानण्यापेक्षा तत्पूर्वीच्या ओवीबद्ध इतिहास असलेल्या या बखरीपासून मानणे अधिक योग्य होईल. (मराठी बखर, पृष्ठ क्र. ९२) वाङ्मय गुणदृष्ट्याही या बखरीतील गद्य हे त्यामध्ये चित्रित झालेल्या पद्याइतकेच श्रेष्ठ मानावे लागेल. ही बखर गद्य-पद्यमिश्रीत अशी लिहली गेली असली, तरीही ती प्रकरणे एकमेकांशी अतिशय एकजीव झालेली आहेत. त्यामुळे त्यातील लेखकाचा भिन्नपणा आपल्या ध्यायात येत नाही. अत्यंत साधी व सोपी भाषा, घटनांचे अत्यंत आकर्षक निवेदन, अल्पाक्षरी व अतिशय सुंदर व्यक्तीचित्ररेखाटन ही या बखरीची वैशिष्टे मानावी लागतात. वि. ल. भावे यांनी या बखरीला बिंबस्थान उर्फ ठाण्याची बखर असे नाव दिले असून, तिचा कालखंड १३ वे शतक असावा असे म्हटले आहे. ही गद्य-पद्यमिश्रीत बखर अत्यंत वाचनीय स्वरूपाची आहे.

**२) राक्षसतागडीची बखर :** ही बखर (इ.स. १५६५-६६ / शके १४८७-८८) या कालावधीत लिहिली गेली आहे. यामध्ये विजयनगरच्या विध्वंसाची माहिती आली असून, ही माहिती कानडी बखरीच्या आधारे दिली आहे. त्यामध्ये जे राजभूवराचे वर्णन आले आहे ते अतिशय विस्तृत असे आहे. पागा, पिलखाना, उस्तरखाना यांची सविस्तर वर्णने केली असून, त्यावरून त्यांच्या सरंजामाची कल्पना आपणाला येते. त्यातील व्यक्ती व घटना यांच्या वर्णनाशी लेखक अतिशय तन्मय झाला आहे. तो लेखक

मूळचा कानडी असल्यामुळे त्या भाषेचे वळणही कानडी सारखेच आहे. त्यातील माहिती निरलंकृत, अत्यंत बनचूक आहे. त्यांची भाषाशैली निरलंकृत अशी असून व्यक्ती व घटना यांची वर्णने अत्यंत रेखीव झाली आहेत. या गुणवैशिष्ट्यांमुळे आजपर्यंतच्या बखरीत या बखरीचे स्थान अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे मानले जाते. मराठी भाषेच्या दृष्टीने ही बखर स्वतंत्र वळणाचीच असल्याचे प्रत्ययाला येते. मराठी भाषेच्या वैभवात या बखरीने मोलाची भर घातली आहे.

**३) शालिवाहनाची बखर :** मराठी साहित्यातील व शिवपूर्वकालीन बखरींपैकी ही आणखी एक महत्त्वाची बखर मानली जाते. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या मते ही मराठी साहित्यातील सर्वात जुनी बखर समजली जाते. त्याचे कारण म्हणजे शालिवाहनाचा काळ हा इ.स. पूर्व पहिल्या शतकापासून इ.स. च्या तिसऱ्या शतकापर्यंत मानला जातो. तो शककर्ता राजा असून आजचे पंचागकर्ते लोक शालिवाहन शकाचा वापर करतात. त्यामुळे या बखरीला आणखीन महत्त्व प्राप्त होते. ही बखर मोडी लिपित लिहिली असून तिचे लेखन शुद्ध देशी कागदावर केले आहे. या बखरीचे ११ बंध असून मराठी साहित्यात तिचे स्थान महत्त्वपूर्ण मानले जाते. याबरोबरच शालिवाहनचरित्र या नावाची आणखी एक पंचवीस पानाची बखर लिहिली गेली आहे. या पंचवीस पानांपैकी पहिली तेरा पाने प्रस्तावना लिहिली असून त्यामध्ये कृत, त्रेता, द्वापार आणि कलियुग या कालाच्या विभागांची माहिती सांगितली आहे. ही माहिती पौराणिक पद्धतीने दिली आहे. त्याचबरोबर युधिष्ठिर, विक्रम, शालिवाहन, विजयाभिनंदन, नागार्जुन, कल्की, महम्मद पैगंबर, येशु ख्रिस्त या शककर्त्या राजांची यादी दिली आहे. पुराणपद्धतीने लिहिलेल्या या बखरीत अद्‌भुतरम्यता आली असून त्याच्या मुद्रणात व हस्तलिखितात बऱ्याच प्रमाणात फरक आहे. त्याची भाषाही अर्वाचीन असून ती बऱ्याच प्रमाणात अशुद्ध आहे.

संख्येने या बखरी अत्यंत कमी असल्या तरी, त्यांचे वाङ्‌मयीन मूल्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. याबरोबरच शिवपूर्वबखरींविषयी महानुभावीय लेखकांनी लिहिलेली सिंघनदेव यादवांची बखर, हेमाड पंडितांची बखर यांचाही समावेश करावा लागतो. परंतु आज या बखरी उपलब्ध नाहीत. यातील अनेक बखरी या गद्यमय असून मराठ्यांच्या इतिहासाला हे लेखन प्रेरणादायी ठरले आहे. किंबहुना मराठी इतिहास लेखनाचा इथूनच प्रारंभ मानला जातो. राजवाड्यांनी तर शालिवाहनाची बखर ही सर्वात जुनी बखर मानली असली तरी, अनेक विचारवंतांनी मात्र मराठीतील गद्य इतिहास लेखनाची मुहूर्तमेढ रोवण्याचे श्रेय महिकावतीच्या बखरीलाच दिले आहे. या लेखनापाठीमागील भूमिका स्वकीयांचा इतिहास लिहून ठेवावा हीच होती. त्यामुळे लेखनप्रामाण्याच्या दृष्टीने या बखरी महत्त्वपूर्ण मानल्या जातात. ऐतिहासिक सत्याला पुष्कळसे प्रमाणभूत असे हे लेखन झाले आहे. त्या कालखंडात लेखनाची साधने उपलब्ध नव्हती. तरीही लेखनाविषयीच्या भावना अत्यंत उदात्त असल्याने अंतरंगाच्या जिज्ञासेपोटी हे लेखन झाले आहे हे महत्त्वाचे मानले जाते.

## ४.४ शिवकालीन बखरी

मराठ्यांच्या इतिहासात व मराठी वाङ्मयात साऱ्या विश्वाला दीपवून टाकणारे आणि आपल्या कर्तृत्वाने स्वत:चे असे हिंदवी स्वराज्य निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे छत्रपती शिवाजी राजे होय. त्या कालखंडातील ते युग प्रवर्तक असे व्यक्तिमत्त्व होऊन गेले. त्यामुळे त्यांचे जीवन आणि चरित्र हा अनेक लेखकांच्या लेखनाचा विषय होऊन राहणे हे ही स्वाभाविकच होते. त्यामुळे त्या कालावधीत जे लेखन करण्यात आले, त्यापैकी निम्म्यापेक्षा जास्त खबरी या शिवछत्रपती वर्णनपर लिहिल्या गेल्या आहेत. त्या कालावधीत कृष्णाजी अनंत सभासद हा अत्यंत महत्त्वपूर्ण असा बखरकार होऊन गेला. त्यामुळे त्याची बखर ही समकालीन बखर म्हणून ओळखली जाते. बाकी जे लेखन केले गेले त्या बखरी उत्तरकालीन बखरी मानल्या जातात. शिवाजी या व्यक्तिमत्त्वाने हा कालखंड अक्षरश: भरला होता. त्यामुळे वाङ्मयीन दृष्ट्या सभासदांची बखर ही महत्त्वपूर्ण मानली जाते.

**१) सभासदांची बखर :** ही बखर शिवकालातील महत्त्वपूर्ण बखर म्हणून ओळखली जाते, कारण ती समकालीन बखर असून, शिवकालातील पहिलीच बखर आहे. समकालीनाने लिहिलेले हे पहिलेच शिवचरित्र होय. त्यामुळे ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने त्याचे महत्त्व अनन्यसाधारण मानले जाते. कृष्णाजी अनंत सभासद यांनी त्याची रचना केली असून, यामध्ये शिव छत्रपतीपासून राजाराम महाराजांच्या अखेरपर्यंतचा वृत्तांत चित्रित केला आहे. कारण सभासद हे शिवाजी महाराजांपासून राजाराम महाराजांच्या अखेरपर्यंत दरबारात सभासद म्हणून कार्यरत होते. त्यांनी लिहिलेली ही बखर त्यांच्याच नावाने सभासदांची बखर म्हणून ओळखली जाते. या बखरीमध्ये शिवाजी महाराजांच्या जीवनातील एकाहत्तर निवडक प्रसंगांचे चित्रण करण्यात आले आहे. त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या अशा सर्व घटनांचा समावेश येथे करण्यात आला आहे. या चरित्राच्या सुरूवातीस शिवाजी महाराजांचे पूर्वचरित्र त्रोटक स्वरूपात वर्णन केले असून अफजलखानाचा वध ही शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटना म्हणून ओळखली जाते त्याचेही वर्णन येते. त्याबरोबरच औरंगजेबाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शिवाजी महाराजांचे दिल्लीला प्रयाण, तिथून त्यांनी करून घेतलेली सुटका, परत आल्यानंतर जयसिंगाबरोबर केलेल्या करारातील किल्ले पुन्हा जिंकून घेणे, स्वत:चा राज्याभिषेक करवून घेणे, भागानगरास त्यांनी दिलेली भेट, व्यंकोजीची भेट इत्यादी अनेक प्रसंग त्यांनी सविस्तर वर्णन केले आहेत. त्यामध्ये शिवराज्याभिषेक (शालिवाहन शके १५९६) जेष्ठ मास शु. १३ व शिवाजी महाराजांचे महाप्रयाण (शालिवाहन शके १६०२) रौद्रनाम संवत्सरे चैत्र शुद्ध १५ रविवार या दोनच घटनांचा कालनिर्देश सभासदांनी आपल्या बखरीत केला असून, बाकी सर्व घटकांचा उल्लेख ते 'पुढे', 'मग', 'त्याजवरी', 'त्याऊपरी', 'तो', 'इतक्यात', अशा शब्दांत करतात. तसेच घटनांचे तपशीलवार वर्णन, विविध असे १८ कारखाने प्राप्त केलेला खजिना, शिलेदार, सुभेदार, कारकून, हुजरे, गडकोट इत्यादींच्या जमा खर्चाचा तपशील त्यांनी या बखरीत दिला आहे. यासर्व घटनांचा कालानुक्रम त्यांनी अत्यंत शिस्तीने पाळला आहे. अफजलखानाचे वर्णन करताना अफजलखान सामान्य नव्हे तर तो केवळ दुर्योधनच जातीने होता असे केले आहे, तर दिलेरखानचे वर्णन, 'दिलेरखान म्हणजे मोठा

बळकट, एका हत्तीचे बळ किंवा जास्तच होईल, आणि हत्तीबराबरी खाणे, पिणे, दररोज हत्ती खातो तेणेप्रमाणे वजन, खाणे, शरीर तरी दुसरा हेडंब राक्षस', असे केले आहे. त्याने चित्रित केलेली अफजलखान आणि दिलेरखानाची व्यक्तिचित्रणे ही महत्त्वपूर्ण मानली जातात. त्यामध्ये शिवाजी व अफजलखानाची प्रतापगडाच्या पायथ्याशी झालेली भेट. त्यासाठी उभारलेल्या मंडपाचे वर्णन थोडक्या पण समर्थ शब्दात सभासदाने केले आहे. या वर्णनाबराबेरच मत्सराने चिडलेला खान आणि त्याच्या मनातील भावही बखरकाराने मोठ्या कलात्मक पद्धतीने टीपले आहेत. हे प्रसंग अत्यंत नाट्यपूर्ण असे असून त्यामुळे ही बखर अत्यंत कलात्मक व वाचनीय अशी सजली आहे. ही नाट्यात्मक चित्रणे जिवंत अशी असून हे सारे प्रसंग साक्षात घडत आहेत असा भास होतो. हे या बखरीचे खरे वैशिष्ट्य मानावे लागेल. यातील अफजलखानाच्या वधाचा प्रसंग अतिशय सामर्थ्याने त्यांनी चित्रित केला आहे. तो प्रसंग रेखाटताना बखरकार म्हणतो की,

''राजीयाने भेटी देता खानाने राजीयांची मुंडी कवटाळून खाकेवाली धरली आणि हत्तीची जामदाड होती तीचे मेन टाकून कुशीस राजीयाचे चालविले. तो अंगात जरीची कुडती होती. त्यावरी रखरखली, अंगास लागली नाही. हे देखोन राजीयानी डावे हाताचे वाघनख होते, तो हात पोटात चालवला. खानाने अंगात झगाच घातला होता. त्यामुळे वाघनखाचा मारा करीताच खानाची चरबी बाहेर आली. दुसरा हात, उजवे हाताचे बिचवियाचा मारा चालविला. ऐसे दोन वार करून मुंडी आसंडून चौथरीया खाली उडी घालोन निघेन गेले. खानाने गलबला केला की, मारिले ! मारिले ! दगा दिधला ! बेगि धावा !''.

अशा प्रसंगातील नाट्य शब्दरूप करण्याचे कौशल्य, छोट्या छोट्या वाक्यांमधून अत्यंत समर्पक असे केलेले वर्णन, आणि त्यातून केलेली प्रसंगनिर्मिती हे या बखरीचे खरे सामर्थ्य आहे. त्याचबरोबर शिवाजीराजांच्या पोशाखाचे आणि त्यांच्या सिंहासनाचे वर्णनही उल्लेखनीय आहे. शिवाजीराजे भेटीस येणार म्हणून त्यांच्या भीतीने 'बादशहाने सदर करून पांच हत्यारे आपणाजवळ ठेवून, कंबरबस्ती करून, अंगा जरीची कुडती घालून खासा तक्ती बैसला. तसेच तक्ताजवळ मोठमोठे शूर मर्दाने व तख्ताचे आसपास दोन हजार माणूस उभे केले.... मनात की, 'शिवाजी सामान्य नाही, सैतान आहे. अफजलखान भेटीमध्ये मारिला. तैसाच उडोन तख्तावीर आला आणि आपणास दगा केला तरी काय करावे ?' ही बादशहाने केलेली तयारी सभासद कौशल्याने सांगतो. त्यामुळे बादशहा आणि शिवाजीमहाराज या दोघांचीही व्यक्तिचित्रे, उत्तम तऱ्हेने साकार होतात. अद्‌भुतरम्य प्रसंगवर्णने हा शिवकालीन बखरीचा महत्त्वाचा विशेष मानावा लागतो. तुळजापूरची भावनी शिवाजीच्या अंगात संचार करून 'आपण प्रसन्न जाहलो, माझे सर्वस्वे सहाय्य तुला आहे. तुझे हाते अफजलखान मारवितो. तुजला यश देतो. तू काही चिंता करू नको,' असे आश्वासन देते. अशी अद्‌भुतरम्य प्रसंगनिर्मिती या बखरीत वर्णन केली आहे. 'ते दिवशी भूकंप जाहला..... श्री-शंभूमहादेवी तळ्याचे उदक रक्तांबर झाले. अशी अतिशयोक्तीपूर्ण वर्णने या बखरीत आलेली आहेत. शिवाजी महाराजांच्या महानिर्वाणाचे वर्णन सभासद पौराणिक पद्धतीने करतो आणि हे शिवचरित्र जे वाचतील व श्रवण करतील त्यास मोठे पुण्य जोडेल, निपुत्रीकास पुत्र होतील, दरिद्रीयास लक्ष्मीवंत होतील

व अपेशीयांस यशवंत होतील व पुण्यश्लोक पराक्रमी होतील, अशी फलश्रुतीही बखरीच्या शेवटी सांगतो. अशा प्रकारची अद्भुतरम्यता, पौराणिकता आणि फलश्रुती यांमुळे बखरीतील ऐतिहासिक प्रामाण्याला बाधा येते. ती विश्वसनीय राहात नाही. त्यामुळेच याला इतिहास असे म्हणता येत नाही, पण तरीही संस्कृत, पारशी शब्दयोजनेमुळे व ओघवत्या शैलीमुळे हे शिवचरित्र वाचनीय झाले आहे. त्याचबरोबर 'ये जातीचा कोणी मागे जाहला नाही पुढेही होणार नाही, अशा प्रकारचा शिवाजी महाराजांच्या बद्दलचा आदर आणि उत्कट भावना यामुळे ही बखर भारलेली आहे. त्यामुळे कृष्णाजी अनंत सभासदापासूनच ऐतिहासिक लेखनाची परंपरा सुरू झाली. मराठीतील ऐतिहासिक लेखन – परंपरेचे ते जनक होते. म्हणून वि. का. राजवाडे कृष्णाजी अनंत सभासदांना 'महाराष्ट्राचे सर टॉमस मोर' असे बिरूद बहाल करतात. ऐवढे सामर्थ्य सभासदांच्या लेखनात आहे. त्यामुळेच मराठ्यांच्या इतिहासाचे संदर्भ साधन म्हणून ही बखर मानली गेली आहे. या बखरीच्या आधारावरच पुढे अनेक विचारवंतांनी व साहित्यकांनी शिवाजीराजांची थोरवी आपल्या साहित्यातून गायली आहे. त्या साऱ्यांचा मुलाधार ही बखर मानली जाते.

**२) शिवदिग्विजय :** शिवकालीन बखरींपैकी हे आणखी एक चरित्र होय. ते इ.स. १७२८ (शके १६४०) मध्ये लिहिले गेले असून, त्याचे लेखन खंडो बल्लाळ चिटणीसांनी केले आहे. या चरित्राचे नायक छत्रपती शिवाजी महाराज हे असून त्याचे लेखन विस्तृत पद्धतीने केले आहे. या चरित्रातील वंशावळी विष्णुपराण, रजपूतांच्या राजावळी व यौवनांच्या तवारिखा यातून घेतल्या आहेत. हे चरित्र आपण बारनिशी दाखले, पत्रे, जुने ग्रंथ यांच्या आधारे लिहित असल्याचे बखरकाराने सांगितले आहे. असे असले तरीही यातील कालनिर्देश व व्यक्तीनिर्देश चुकीचे आहेत. इतर बखरींच्या तुलनेत खंडो बल्लाळ चिटणीसांनी व्यक्ती व स्थलांची वर्णने संक्षिप्तपणे केलेली आहेत. या बखरीत पावनखिंडीतील बाजीप्रभूंचे वर्णन अत्यंत आवेशपूर्ण असून, ओघवते आहे. त्याचबरोबर प्रतापगडावरील अफजलखानाच्या भेटीवेळी रस्ते सुशोभित केले आहेत. त्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लावले होते असे वर्णन तो करतो. तसेच वापी, कूप, तलाव, उद्याने, सघन वृक्ष, निबिड छाया यांचीही वर्णने खंडो बल्लाळ चिटणीसांनी केलेली आहेत. ही वर्णने करताना त्यांची भाषा संस्कृतप्रचुर व प्रौढ वळणाची झाली आहे. हे वर्णन अधिक प्रभावी व्हावे यासाठी अधून मधून बखरकार संस्कृत श्लोकांचाही वापर करतो. त्यांची ही लेखनशैली अत्यंत आकर्षक झाली आहे. बखरकारांच्या ठिकाणी असलेली बहुश्रुतता, त्यांचे भाषा प्रभुत्व आणि प्रामाणिकपणा यांमुळे वाङ्मयीन गुणांच्या दृष्टीने ही बखर अधिक श्रेष्ठ ठरते.

**३) शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र :** शिवकालीन बखरींपैकी ही आणखी एक महत्त्वपूर्ण व उल्लेखनीय बखर आहे. हिचे लेखन मल्हार रामराव चिटणीसांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या आज्ञेवरून शके १७३३ (इ.स. १८११ मध्ये केल्याचा उल्लेख सापडतो. या बखरीच्या प्रारंभी बखरकार लिहितो की, 'स्वति श्री राज्याभिषेक १३७ प्रमोदीनाम, संवत्सरे, जेष्ठ बहुलषष्ठी भृगूवासरे क्षेत्रियकुलावतंस श्रीराजाधिराज श्रीमहाराज प्रतापी शाहू नृपतीयांसी यांनी आज्ञा केली ऐसिजे' असा उल्लेख केलेला आहे. परंतु हे वर्णन व उल्लेख ऐतिहासिक दृष्ट्या सुसंगत नाहीत. कारण शके १७३० मध्ये दुसरे छत्रपती मृत्यू पावले. छत्रपतींच्या कालावधीत बखर लेखनाची आज्ञा झाली असावी व प्रतापसिंह राजांच्या कालावधीत

म्हणजे इ.स. १८११ मध्ये तिचे लेखन केले असावे.

आपण हे सप्त प्रकरणात्मक चरित्र 'शास्त्राधार विष्णुपुराणादी तील दंडनीती, राजधर्म, रमलशास्त्र, पराक्रमकथा यांच्या आधारे लिहिले आहे,' असे लेखक म्हणतो. पण तरीही या चरित्रातील घटनांना कलानुक्रम राहिलेला नाही. या बखरीच्या पहिल्या प्रकरणात पूर्वजवर्णन आणि जन्मकथन आले असून युधिष्ठरापासून वंशावळी दिल्या आहेत. तर दुसऱ्या प्रकरणात स्वराज्य तोरण बांधल्यापासून शिव-समर्थ भेटीपर्यंतचा काल चित्रित केला आहे. तिसऱ्या प्रकरणामध्ये अफजलखानाच्या वधाचे चित्रण केले असून किल्ले, आरमाराची माहिती सांगितली आहे. चौथ्या प्रकरणामध्ये राज्यमर्यादा व पितृदर्शन यांचे वर्णन आले असून, पाचव्या प्रकरणात दिल्लीपतीचा पराभव वर्णन केला आहे. सहाव्या प्रकरणामध्ये दक्षिण दिग्विजयाचे वर्णन आले असून, सातव्या प्रकरणात शिवराज्याभिषेक व शिवाजीच्या महानिर्वाणाचे वर्णन चिटणीसांनी केले आहे. यातील बरीच माहिती तर्कविसंगत असून या चरित्रात घटनांचा कालानुक्रम राहिलेला नाही. त्याचे कारण शिवाजी महाराजांच्या नंतर एकशे पंचवीस वर्षांनी ही बखर रचली असल्यामुळे हे दोष राहून गेले असावेत.

या बखरीतील चिटणीसांनी केलेले वर्णन हे अधिक प्रभावी असून त्यातील प्रसंग प्रत्यक्षपणे आपण पाहत आहोत असेच उतरले आहेत. अफजलखान वधाचा प्रसंग अत्यंत नाट्यात्मक रेखाटला असून त्यांच्या भेटीच्या वेळी उभयतांमध्ये घडलेला संवाद व व्यक्तिदर्शन अत्यंत प्रभावीपणे साधले आहे. त्याचबरोबर संत तुकाराम व शिवाजी महाराजांच्या भेटीचा प्रसंग व कीर्तनातील चमत्कार हे प्रसंगही भावपूर्ण असे रेखाटले आहेत. याला आधार म्हणून संत तुकारामांचे काही अभंगही इथे दिलेले आहेत. शिवराज्याभिषेक प्रसंगाचे वर्णन करत असताना चिटणीसांच्या सूक्ष्मनिरीक्षणशक्तीचा आपणाला समर्थ प्रत्यय येतो. या वर्णनावरून शिवछत्रपतींच्या प्रशासनव्यवस्थेचे दर्शनही आपणाला जसेच्या तसे घडते. राजदरबारातील शिष्टाचार व चालीरीती यांचेही उल्लेख या बखरीत मल्हार रामराव चिटणीसांनी केले आहेत. त्याचबरोबर आपल्या निवेदनातून त्यांनी राजनितीही सांगितली आहे. तसेच आपल्या चरित्रलेखनाविषयी चिटणीसांनी आपला विश्वास व्यक्त केला आहे. त्याचबरोबर शत्रूचा पराभव हा दोन प्रमुख कारणांमुळे होत असतो. त्यातील पहिले कारण म्हणजे दैव होय व दुसरे म्हणजे पुरुषांचे प्रयत्न होय; असेही चिटणीस सांगून जातात. आणि त्यातून लोकमानसाच्या मनावर प्रयत्न व कर्तृत्वाचे संस्कार ते रूजवितात.

या बखरलेखनासाठी धार्मिकता, पौराणिकता या संस्काराचीही आपणाला मदत झाली. असे म्हणून पुराणातील अनेक संदर्भ निवेदनाच्या ओघात ते देतात. चिटणीसांना छत्रपती शिवाजी महाराज हे ईश्वराचे अवतार आहेत असेच वाटते. हा अवतार परमेश्वराने दुष्टांच्या संहारासाठी व धर्मस्थापनेसाठी धारण केला होता, अशी शिवाजी महाराजांच्या अवतारित्वाची मीमांसा त्यांनी केली आहे. त्यासाठी त्यांनी अनेक उपमा व दृष्टांतही दिलेले आहेत.

या बखरीतील चिटणीसांची भाषाशैलीही अत्यंत प्रभावी असून त्यातून त्यांनी अचूक परिणामकारकता साधली आहे. कारकुनीवळणाची साधी भाषा, छोटी छोटी वाक्यरचना, संस्कृत, पारशी मिश्रीत वाक्यांचा

वापर, आलंकारिकता, चित्रमयता, नाट्यात्मकता, मनोज्ञ निवेदन या विशेषांमुळे ही सप्तप्रकरणात्मक बखर आकर्षक व प्रत्ययकारी झाली आहे. शिवाजी महाराजांवरील श्रद्धाही या लेखनातून व्यक्त होते. त्यातून चिटणीसांची स्वामीनिष्ठा आपल्या प्रत्ययाला येते. त्यामुळेच चिटणीसांनी पाचही छत्रपतींची चरित्रे लिहून महाराष्ट्र धर्माची जोपासना केली आहे. त्याचबरोबर मराठी वाङ्मयनिर्मितीतही मोलाची भर घातली आहे.

या बखरीच्या लेखनात काही दोष राहिले असले, तरीही त्यांनी लेखनासाठी आख्यायिकांचा वापर न करता शास्त्राधार प्रमाण मानले आहेत. त्यामुळेच ग्रॅण्ड डफनेही चिटणीसांचा गौरवपूर्ण शब्दात उल्लेख केला आहे. इतके सामर्थ्य चिटणीसांच्या या बखरीत नक्कीच आहे.

**४) शिवाजी प्रतापचरित्र :** शिवकालीन बखरींमध्ये ऐतिहासिक प्रामाण्य नसलेल्या, परंतु वाङ्मयीन दृष्ट्या बखर म्हणून ज्याचा उल्लेख केला जातो अशाही बखरींचे लेखन केले आहे. त्यामध्ये सयाजीराव गायकवाडांच्या आज्ञेवरून लिहिले गेलेले 'शिवाजी प्रताप चरित्र', या बखरींमधून छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू बखरकाराने उलघडले आहेत. अनेक विचारवंतांनी त्यांना ऐतिहासिक प्रामाण्य दिलेले नाही, परंतु ही बखरकार मंडळी शिवाजीराजांच्या सहवासात वाढली होती. त्यांचा कारभार त्यांनी जवळून पाहिला होता. त्यांच्या व्यक्तिमत्वातील अनेक पैलूंचा त्यांनी जवळून अनुभव घेतला होता. त्यातूनच ही बखर रचली गेल्यामुळे महत्त्व प्राप्त झाले आहे. शिवकालीन बखरींचा अभ्यास केला तर ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने ही बखर महत्त्वाची मानावी लागेल.

## ४.५ पेशवेकालीन बखरी

शिवकालात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अतुलनीय कर्तृत्वामुळे तो काळ भारला होता, त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या परिणामातून अनेक बखरी निर्माण झाल्या. त्या बखरींच्या तुलनेने पेशवे कालातील बखरींचे विषय व स्वरूप यांमध्ये मोठ्या प्रमाणात विविधता आढळून येते. त्याला कारण म्हणजे 'पानिपतचा रणसंग्राम होय.' या रणसंग्रामाने संपूर्ण हिंदुस्थानचा इतिहास बदलून गेला. हा रणसंग्राम महनीय असा होता. त्याच्या परिणामातून सारे राजकीय वातावरणच बदलून गेले. त्यामुळे बखरींना वेगवेगळे स्वरूप प्राप्त झाले. परंतु या रणसंग्रामातील महनीय घटनेचा बखरींवर अधिक परिणाम झाला. काही प्रसंगात्मक, चरित्रात्मक, आत्मचरित्रपर, काही घराण्यांच्या हकीकती अशी विविध विषयांची व प्रकारांची विविधता या लेखनात आढळते. याशिवाय काही सांप्रदायिक स्वरूपाच्या बखरींचे लेखन या सुमारास होऊ लागले होते. पानिपतचा रणसंग्राम या साऱ्याच घटनांना कारणीभूत झाला.

मराठ्यांच्या इतिहासातील एक स्वतंत्र पर्व म्हणून पानिपतच्या रणसंग्रामाकडे पाहिले जाते. या रणसंग्रामात मराठ्यांचा सर्वार्थाने पराभव झाला होता. तरीही त्यांच्या क्षात्रतेजाने सर्व भारतवर्षच दीपून गेले. हा पराभव सुद्धा अभिमान वाटावा असाच होता. या पर्वातील ओजस्विता, त्यातील उग्रभीषण

जीवननाट्य, या घटनेतून लोकांच्या वाट्याला आलेले कारूण्य या साऱ्यांमुळे मराठ्यांच्या मनाला व जीवनाला वेगळे वळण लागले. आणि भावना व विचारांचे स्फुलिंग चेतवले गेले. या घटनेने अनेक बखरींना स्वतंत्र असे विषय मिळाले. तसे घडणेही स्वाभाविक होते. त्यातूनच पाणिपतची बखर, भाऊसाहेबांची कैफियत, होळकरांची थैली, काशीराजाची बखर, नाना फडणीसाचे आत्मचरित्र यांसारख्या बखरींची निर्मिती झाली. या साऱ्यांमागे या रणसंग्रामाची सर्वकश हकीकत सांगण्याचा हेतूच स्पष्ट होता. या सर्वांमध्ये भाऊसाहेबांची बखर ही तर पेशवेकालीन बखरीतील मुकुटमनीच मानली जाते.

**१) पाणिपतची बखर :** पेशवेकालीन बखरींपैकी ही समकालीन बखर असून तिचे ऐतिहासिक महत्त्व अधिक मानले जाते. ही बखर गोपिकाबाईंच्या आज्ञेनवरून रघुनाथ यादव, चित्रगुप्त यांनी लिहिली आहे. पाणिपतच्या युद्धावेळी तो प्रत्यक्षपणे रणांगणावर हजर होता. त्यावेळी त्याने जे जे सर्व काही पाहिले, अनुभवले त्या साऱ्यांचे चित्रण त्याने या बखरीत केले आहे. ही बखर या पाणिपतच्या युद्धानंतर अवघ्या दोन वर्षांच्या आत लिहिली गेली असल्याने, ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने ती बरीच विश्वसनीय मानली जाते. श्रीमंतांना रोज घडणाऱ्या घटनांचे निवेदन करावे लागते. त्यामुळे कच्चा मजकूर तयार करून तो सेवेसी सादर करावा लागत असे. चित्रगुप्तांनी तसा उल्लेख बखरीच्या शेवटी केला आहे. जाटांनी भाऊसाहेबास विश्वास दाखवून, इराणींना मोठ्या फौजेविषयी एकाएकी दिल्लीत आणले. असे म्हटले असून, आबदालीच्या पुत्राचे नाव तेजूरशाह होते असा उल्लेख त्यांनी केला आहे.

खरे तर आबदालीच्या मुलाचे नाव तैमुरशाह असे आहे. याबरोबरच पाणिपतच्या लढाईचा वार व तिथी हेही चुकीचेच दिले आहेत. या बखरीत पाणिपतच्या लढाईची तिथी पौष मंगळावर शु. २ अशी आहे. पण प्रत्यक्षात पौष शु. ८ बुधवार असा उल्लेख हवा होता. ही बखरकाराने दिलेली माहिती ऐतिहासिक साधनांशी कुठेच मिळती जुळती नाही. त्याबरोबरच या बखरीत दत्ताजी शिंदेच्या नावाचा उल्लेखही केलेला नाही. ही ऐतिहासिक फार मोठी विसंगती आहे. म्हणून सर यदुनाथ सरकारांनी या बखरीस अफुबाजाने लिहिलेली गोष्ट असे म्हटले आहे. र. वि. हेरवाडकर यांनी ही बखर विश्वसनीय मानली असून तत्कालीन माहितगार व्यक्तीने ही बखर लिहिली असल्याने त्यातल्या काही चुका विसरावयास हव्यात असे स्पष्ट म्हटले आहे.

या बखरीचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आकर्षक अशी वर्णन पद्धती होय. त्याबरोबरच ऐतिहासिक व्यक्ती आणि घटना यांबद्दल बखरकारांच्या मनात विलक्षण आपुलकी आणि जिव्हाळा आहे. ज्या गोष्टीचे वर्णन करावयाचे आहे, त्यांच्याशी बखरकार तादात्म्य पावला आहे. त्यामुळे पक्षनिष्ठा, व्यक्तिवर्णने, प्रसंग या साऱ्यातील जिवंतपणा या लेखनात उतरला आहे. त्यामुळे या सर्व घटना आपण प्रत्यक्षपणे पाहत आहोत इतका चित्रदर्शीपणा आणि त्या बरोबरच जिवंतपणा या बखरीला प्राप्त झाला आहे. व त्यामुळेच ही बखर संस्मरणीय झाली आहे. या युद्धाचे वर्णन करत असताना बखरकार लिहतो की, ''विर रणामध्ये माजले, रणमद चढला. केवळ दशाग्री शताग्रीशी मारू लागले. ते समयी सदाशिवपंत यांनी अंबरीतून उतरून दोहो हाती पट्टे घेवून नीट फौजेत चालून घेतले व बेलाशक हैदोसच केला. त्यात अनेकांची शीरे तुटली,

धडावेगळी जाहली, कोणाची उदरे फुटोन अंतर्माळा लोंबू लागल्या. परंतु अणुमान कोणी लढाई विषयी कसर केली नाही.' अशी वीररसपूर्ण वर्णने पाहावयास मिळतात.'

याबखरीतील वर्णनशैली ही अत्यंत समर्पक असून बहुतेक बारकावे त्यात चित्रित केले आहेत. ही सर्व वर्णने वीरसपूर्ण असून, ती अत्यंत परिणामकारक रीतीने केली आहेत. या बखरीतील व्यक्तिचित्रणे देखील अत्यंत जिवंत असून, भाऊसाहेब, विश्वासराव, जनकोजी शिंदे ही व्यक्तिचित्रणे संस्मरणीय झाली आहेत. काही ठिकाणी केलेली वर्णने ही त्रोटक वाटत असली तरी ती अत्यंत ठासीव अशी आहेत. ही बखर गोपीकाबाईंच्या आज्ञेनवरून लिहिली असल्यामुळे काही ठिकाणी पक्षनिष्ठा आणि गौरवही आला आहे. पण हे काही अवाजवी आहे असे नाही. हे सर्व उल्लेखनीय यथार्थच आहेत.

या युद्धात सदाशिवभाऊंनी आपला पराक्रम गाजवला होता. त्याचे वर्णन बखरकार करतो की, 'या मागे या कलियुगी असा योद्धा कोणी जाहला नाही व पुढेही विरळाच. भारतीय युद्धासमान सदाशिव पंतांनी युद्ध केले. या कलियुगी मानव जातीत ब्राम्हण कुळात जन्म घेवून त्यांनी थोर पराक्रम केला. धन्य त्यांची जननी, की असा पुत्र प्रसवली' हे वर्णन मोजके तितकेच समर्पक व ठासीव आहे. ते अतिशयोक्त वाटत असले तरी, या वर्णनापाठीमागे आवेश व जिव्हाळा असल्याचे दिसून येते. बखरकारांनी जे गौरवपूर्ण वर्णन केले आहे त्यातून त्याच्या व्यक्तिदर्शनकौशल्याची आपणाला सहज कल्पना येते. त्यांच्या वर्णनाची धाटणीही पौराणिक पद्धतीची असून ते वर्ण्य विषयाशी एकरूप झाले आहेत. त्यांच्या या लेखनात आवेशपूर्णतेबरोबरच कारूण्यपूर्ण अवस्थेचेही अतिशय समर्थ शब्दांत वर्णन केले आहे. त्यामुळे ही बखर वाचनीय झाली आहे. केवळ त्यामुळेच या बखरीतील व रणसंग्रामातील अनेक प्रसंग मनात घर करून राहतात.

वाङ्मयाच्या दृष्टीने व भाषासौंदर्याने ही बखर अर्तंबाह्य नटलेली आहे. तिच्यातील कल्पनासौंदर्य तर अजोड आहे. 'त्या समयी भाऊ कसा भासला की केवळ कल्पांतीचा आदित्य' हे वर्णन मनाला भिडल्याशिवाय राहत नाही. याबरोबरच उपमा, दृष्टांत या अलंकारामुळे बखरीच्या वाङ्मयीन सौंदर्यात मोलाची भरच पडली आहे. अप्रतिम वर्णन शैली, बखरकाराची कल्पकता, समर्पक अलंकारांची समर्पक योजना आणि भाषाप्रभुत्व इत्यादी गुणांमुळे प्रस्तुतची बखर वाङ्मयीन दृष्ट्याही सरसच ठरली आहे असे र. वि. हेरवाडकर म्हणतात (मराठी बखर – पृष्ठ क्रमांक १६२) याबरोबरच या बखरीतून ईश्वरनिष्ठा व स्वामीनिष्ठा या बखरकारांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विशेषाची आपणाला पुरेपूर कल्पना येते आणि त्यामुळेच ही बखर वाचनीय व परिणामकारक झाली आहे.

**२) भाऊसाहेबांची बखर :** पेशवेकालीन बखरींपैकी ही आणखी एक महत्त्वपूर्ण बखर. या बखरीचे लेखन कृष्णाजी शामराव यांनी व्यंकाप्पा नाईक दिंडोरे यांच्या आज्ञेवरून केले आहे असे बखरकार म्हणतात. या बखरीमध्येही पाणिपतच्या रणसंग्रामाचा सविस्तर वृत्तांत चित्रित केला आहे. ऐतिहासिक वृत्तांत आणि वाङ्मयीन गुणांनी परिपूर्ण अशी ही समकालीन बखर आहे. ही पाणिपतच्या युद्धानंतर दोन वर्षांनी लिहिलेली असावी. युद्धकालावधीत लेखकाला जी साद्यंत हकीकत माहीत होती ती जशीच्या तशी लेखकाने इथे सांगितली आहे. असे असले तरी ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे बखरीतील कित्येक घटना

विश्वसनीय मानणे कठीण होते. त्याचबरोबर दत्ताजींचे 'बचेंगे तो और भी लडेंगे' हे उद्‌गार या बखरीला जिवंतपणा प्राप्त करून देतात. या बखरीतील बरीचशी माहिती ऐकीव स्वरूपाचीच वाटते. या बखरीत नानासाहेबांच्या मृत्यूचा कालोल्लेख सोडला, तर इतरत्र कुठेच तसा उल्लेख केलेला नाही. त्याऐवजी लेखक 'मग', 'इतकियात', 'दुसरे दिवशी', 'उपरांतिक' या शब्दांचा उल्लेख करतो. या बखरीच्या संदर्भात तिचे श्रेष्ठत्व सांगताना ल. रा. नसिराबादकर म्हणतात. 'व्यक्तिवर्णने, प्रसंगवर्णने आणि वस्तुवर्णने यांनी या बखरीइतकी दुसरी कोणतीही बखर समृद्ध नाही.' (प्राचीन वाङ्मयाचा इतिहास, पृष्ठ क्रमांक ३०२) नजीबखानाचे व्यक्तिचित्र बखरकाराने अत्यंत कलात्मकतेने साकारले आहे.

'नजीबखान रोहीला मात्रा गमनी' एवढ्या शब्दातून तो नजीबखानाचे व्यक्तिचित्र उभे करतो. 'ईश्वरे-यश दिले तरी उत्तम; नाही तरी पुन्हा तुमची आमची भेट स्वर्गी होईल', असे निखराचे उद्‌गार पत्नीजवळ काढून युद्धात जिद्दीने उतरणारे बळवंतराव मेहेंदळे, आणि 'उत्तम आहे. शतवर्षात केव्हां तरी मरावे, त्यास या संग्रामात मुक्ती आली तरी बहुत बरे जाहाले, याची क्षीत कशास करावी ? तुम्ही लौकिक करून गेला तर मीही वाचणार नाही. तुमची सांगातीण होईल', असे उत्तेजनपर तेजस्वी उत्तर देणारी बळवंतरावांची पत्नी, 'बचेंगे तो और भी लढेंगे', असे जिद्दीचे प्रत्युत्तर देणारा दत्ताजी, 'आपले पदरी लौकिक भारी' तुम्ही आपले विणावयाचे स्वकर्म करीत असता तरि सहजच वाचावयाची आस्था धरावी. वाटा तरी शुराचा उचलिला आहे; वाण सतीचे घेतले आहे. हे सांभाळावे, असेच धर्मशास्त्र;' या शब्दात नवऱ्यास (मल्हाररावास) ठणकावून कर्तव्याची जाणीव करून देणारी गौतमाबाई, अशी या बखरीतील किती तरी व्यक्तिचित्रे जिवंत आणि अविस्मरणीय झाली आहेत. दत्ताजी शिंदे, बळवंतराव मेहेंदळे, मल्हारराव होळकर, भागीरथीबाई, गौतमाबाई, बळवंतराव मेहेंदळ यांची पत्नी ही सारी व्यक्तीचित्रे प्रभावी आहेत. त्यांच्या विचारांना आणि वक्तव्याला तेजस्वी कर्तृत्वाची, उदात्त अशा जीवननिष्ठेची धार आहे. या व्यक्तिच्या जीवनातील उग्रभीषण नाट्य, त्या प्रसंगीच्या त्यांच्या निष्ठा आणि मनोबल बखरनवीसने तितक्याच परिणामकारकपणे शब्दांकित केले आहे.

भाऊसाहेबांनी पैशासाठी दिल्लीचे छत पाडले तो प्रसंग, पतिनिधनामुळे 'राव ! तुम्ही आम्हांवर का रूसला ? आमचे हातचा विडा का घेतला नाही ? ईश्वरे आम्हास एवढे निर्वाण का दाखविले.' असा शोक करीत आप्पारावाला (आपल्या मुलाला) भाऊसाहेबांच्या ओटीत टाकून बळवंतरावांची पत्नी सती जाते तो प्रसंग, विश्वासरावांचा मृत्यू, मराठ्यांची कत्तल व त्यांचा पळ, दत्ताजींच्या मृत्यूनंतर 'बाई, काका कोठे आहे ?' असा शोकाकुल प्रश्न विचारून धीर सोडणाऱ्या जानकोजीला पतिनिधनाचे दु:ख घोटून 'बाबा, तू रडतोस काय ? जयाजी शिंदे यांच्या पोटी चौधी लेकी जाहल्या, तसीच तू एक जाहाली असती तरी आणखी एक जावई येता' असे भागीरथीबाईने उत्तर दिले तो प्रसंग; अशा कितीतरी प्रसंगातून उग्रभीषण जीवननाट्याचे प्रखर दर्शन घडते. हे प्रसंग अणि व्यक्तिचित्रे यांचे रेखाटन करताना बखरनवीस त्यांच्याशी इतका समरस होतो की, त्यामुळे त्या प्रसंगातून त्याचा आत्माविष्कारही सहजपणे घडतो आणि या बखरीला श्रेष्ठ वाङ्मयकृतीचे स्वरूप आपोआप प्राप्त हाते. म्हणून 'सखारामबापू केवळ निधडे मनसबेबाज',

'मल्हारराव जे बोलेल ते करील', यासारख्या शब्दयोजनेला बखरकाराच्या व्यक्तिमत्त्वाचा रंग प्राप्त होतो. या व्यक्ति चित्रणाप्रमाणे आणि प्रसंगचित्रांप्रमाणेच वस्तुचित्रांचेही रेखाटन हा बखरकार प्रभावीपणे करू शकतो, हे आग्रयाचा किल्ला व कुंभेरीचा किल्ला यांच्या वर्णनावरून दिसते.

प्रासादिक, जोमदार आणि नाट्यपूर्ण भाषा हे भाऊसाहेबांच्या बखरीचे नजरेत भरण्यासारखे वैशिष्ट्य. 'जसा डुक्कर खळीस येतो तैसे इरेस पडून मारामार केली', 'जैसे भडभुंजे लाहया भाजतात तशी गत केली', 'मुरगी मारी बचडे दाणादाण जैसे जिकडील तिकडे पळाले', 'तुपाचे घागरीवर उदंराचे पिटूकले बसते, तैसा प्रकार जाहला', 'शाळवाचे पिकाप्रमाणे शिरे व्यापली', 'दुधाचे रांजणीत कांज्याचे शिंतोडे', किंवा 'धनलोभीयाचे धन जाते, अथवा राजा दशरथास कैकयेचे शब्दबाण, किंवा जानकीहरिणी राजा रामचंद्र किंवा रुक्मिणी सैंवराचे समयी शिशुपाल राजास जैसी गत आपमान जाला, तैसी गत भाऊसाहेब यांची जाली', अशा मार्मिक लोकव्यवहारातील व पुराणातील उपमा - दृष्टांतांनी ही भाषा सजते. 'विनाशकाली विपरीत बुद्धि', 'भाग्य अभाग्य कालपरत्वे येते जाते', 'जैसे पूर्वाचरण असते तसेच घ्यावे लागे.' 'स्त्री बुद्धिः प्रलयं गता', 'मेरे मनमें कुछ ओर/कर्ता के कछु ओर' यांसारखी समर्पक सुभाषितेही त्यात आढळतात. मधून मधून सुपातील हंसती, जात्यातील रडती', 'येक पंथ दो काज', 'आपण मरावे आणि जग बुडवावे', 'दे माय धरणी ठाय' अशा काही म्हणी व वाक्प्रचारांचेही दर्शन घडते 'हतूतूची घाई घडीभर झाली', 'आत खंदाखंदळ झाली' अशा काही वाक्यातून मूळ प्रसंगातील जोश आणि आवेश प्रकट झाला आहे. यमुनेचे पाणी हातात घेतले याचे सार्थक हेच की काय ?' 'गों घास खाती बेजान करो, अल्ला का डेरा दिखलाव', 'बापा तुम्ही आन पाणी ईश्वराजवळ मागावे आणि ईश्वराजवळ रूसावे, आता आम्हास मिथ्या मायेत गोवू नये, 'बहुत भाऊ आहेत ! परंतु श्रीमंत लोकात यांजप्रमाणे भाऊपणा केले नाही. राम-भरताची साम्यता', 'ही वाक्ये कृष्णाजी शामरावांच्या शैलीचा स्वतंत्रपणा व तीमधील कलात्मकता, नाट्यात्मकता, सांस्कृतिक संदर्भ यांचे दर्शन घडवितात 'यार हो ! भागो मत, मारो ! मारो !' 'यार हो ! आता जिद्दीचा मजकूर आहे;' अशा संबोधनात्मक शब्द योजनेने त्यांच्या भाषेत आवेश आणि वक्तृत्वपूर्णता येते. निवेदनाच्या ओघात मधूनच,

**''जल की शोभा कमल है, दलकी शोभा पील**
**धनकी शोभा धरम है, कुलकी शोभा शील''**

असे काही सुंदर दोहरेही उद्धृत केले जातात. यावरून या बरीचे संस्कार सामर्थ्यही स्पष्ट होते.

या बखरीतून त्यांच्या भाषा आणि विचारसौंदर्याचे साहचर्य प्रत्ययाला येते. तसाच इतिहास आणि वाङ्मय यांचा संगम बखरकाराने या बखरीत साधला आहे. त्यामुळे इतर कोणत्याही बखरीपेक्षा ही बखर वाङ्मय गुणांनी संपन्न झाली आहे. हा केवळ जुन्या गद्याचा नमुना नसून, ते मराठी भाषेचे वैभव आहे, असे हेरवाडकरांना वाटते. यातच या बखरीचे खरे सामर्थ्य सामावले आहे. पानिपतच्या रणसंग्रामामध्ये स्वतः बखरकार हजर होते. त्यामुळे या बखरीत भाषेसहित सर्व बारकावे आले आहेत. बखरकाराचे सूक्ष्म निरीक्षण आणि भाषेच्या दृष्टीने कलात्मक प्रज्ञा प्रतिभेचा अनुभव या बखरीतून येतो.

**३) श्रीशाहूमहाराज यांची बखर :** पेशवेकालीन बखरींमध्ये या बखरीचा समावेश केला जातो. ही बखर गोविंदराव खंडेराव चिटणीस यांनी (इ.स. १७४९ शके १६७१) मध्ये लिहिली आहे. हा खंडोबल्लाळ चिटणीसांचा मुलगा. तो शाहू महाराजांच्या समवयस्क होता. बल्लाळांच्या घराण्यावर छत्रपती शाहूंचा मोठा लोभ होता. बल्लाळांचे सारे कुटुंबच शाहूंच्या पदरी सुरुवातीपासून होते. शाहूंची कैदेतून सुटका झाल्यावर खंडो बल्लाळ हे त्यांना जाऊन मिळाले होते. शाहूला राज्याभिषेक झाल्यावर शाहूने खंडो बल्लाळाची नेमणूक चिटणीस पदावर केली. यानंतर गोविंद खंडेराव हे चिटणीस पदावर रूजू झाले. त्यांनी छत्रपती शाहूंची इमाने ऐतबारे सेवा केली आणि पेशव्यांनाही सहकार्य केले. त्यांचे बंधुही शाहूच्या सेवेतच होते. शाहू महाराजांच्या मृत्यू मार्गशीर्ष वद्य तृतीया, गुरुवार, शुक्ल संवत्सरे शके १६७१ (१५-१२-१७४७) रोजी झाला. त्यानंतर गोविंद खंडेरावांनी  बखरीचा मजकूर तोंडीच सांगितला. त्यावर आधारित शके १६७१ (जानेवारी-फेब्रुवारी १७४९ मध्ये) ही बखर लिहली गेली. यामध्ये छत्रपती शाहू महाराज यांची सविस्तर हकीकत सांगितली असून बखरीच्या प्रारंभीच राजाराम महाराज व संभाजी महाराज यांची त्रोटक स्वरूपाची माहिती दिलेली आहे. या बखरीमध्ये बादशहा व बेगमांच्या सहवासात शाहू महाराज कसे वाढले त्याची विस्तृत हकीकत बखरकार सांगतो. शाहू महाराजांचे पहिले लग्न सकवारबाईंशी झाल्यानंतर त्यांनी दुसऱ्या लग्नाचा आग्रह धरला, तेव्हां त्यांचे दुसरे लग्न सगुणाबाईंशी झाले. हे दोन्ही विवाह बादशहा व बेगम यांनी लावून दिले. अशाप्रकारचा उल्लेख या बखरीमध्ये आला आहे. शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर सकवारबाईंनी सहगमन केले. त्याचे हृदयद्रावक वर्णन बखरकाराने केले आहे. हे प्रसंग इतके भावानोत्कट झाले आहेत की, वाचकांच्या अंतरंगाला हे प्रसंग सद्‌गदित करून जातात. भावनोत्कटता व आवेशपूर्णता ही या बखरीची खास वैशिष्ट्ये मानली जातात आणि त्यामुळेच ही बखर वाचनीय झाली आहे.

## ४.६ आज्ञापत्र

मराठ्यांच्या इतिहासातील आज्ञापत्र हा सुप्रसिद्ध ग्रंथ होय. शंभूछत्रपतींच्या आज्ञेवरून रामचंद्रपंत अमात्य यांनी लिहिला आहे. पण डॉ. वि. भि. कोलते यांनी हा ग्रंथ रामचंद्रपंत अमात्याचा नसून निलकंठ मोरेश्वर पिंगळे यांचा असावा असे म्हटले आहे. हा प्रशासन पद्धतीवर आधारलेला महत्त्वपूर्ण प्रबंध आहे. या ग्रंथाविषयी सुरूवातीस म्हटले आहे की, 'स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४२ मन्मथ नाम संवत्सरे मार्गशीर्ष शुद्ध चतुर्थ गुरूवासरे क्षेत्रीय कुलवंतस श्री. राजा शंभू छत्रपती स्वामी यांनी समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनीधी राजश्री रामचंद्र पंडित अमात्य हुकूमतपन्हा यांसी आज्ञा केली येसीजे' या उल्लेखावरून ग्रंथाचा लेखनकाल १९ नोव्हेंबर १७१५ स्पष्ट होतो. साऱ्या मजकूरावरून हे निश्चित होते की, रामचंद्रपंत अमात्यानीच हा ग्रंथ तयार केला आहे. परंतु विचारवंताच्यामध्ये मात्र कोणतेही एकमत नाही.

आज्ञापत्राचा लेखक कोण याविषयी विचारवंतामध्ये मतभेद आढळतात. आज्ञापत्राचे कर्ते हे रामचंद्र पंत आमात्यच आहेत असे रियासतकार गो. स. सरदेसाई, द. वा. पोतदार, का. ना. साने, ग. ह. खरे. शं. ना. जोशी यांचे मत आहे. पण यावर आक्षेप घेवून वि. भि. कोलते, श्री. ना. बनहट्टी यांनी मात्र आज्ञापत्राचे कर्तृत्व मोरेश्वर पिंगळे यांना दिले आहे. कोलते यांच्या मताला म्हणावा तितका आधार मिळत नाही. त्याचे

कारण म्हणजे नीळकंठ मोरेश्वर पिंगळे यांचा मृत्यू इ.स. १७०८ मध्ये झाला, तर आज्ञापत्र हे इ.स. १७१५ मध्ये लिहले गेले आहे. ग्रंथाचे प्रारंभी रामचंद्रपंत आमात्यांचा उल्लेख सापडतो. त्यामुळे रामचंद्रपंत आमात्य हेच या ग्रंथाचे कर्ते होतात. अलीकडे आज्ञापत्राचे जे संपादन केले आहे त्यात अ. रा. कुलकर्णींनी या मताला दुजोरा दिला आहे.

आज्ञापत्र हे एकूण नऊ प्रकारणात विभागले असून त्याची पहिली दोन प्रकरणे प्रस्तावनेचीच आहेत. यामध्ये शिवाजी महाराजांचे श्रेष्ठत्व कथन केले आहे. दुसऱ्या प्रकरणात छत्रपती राजारामाचे वेळी मराठी राज्य मोठ्या संकटातून कसे बचावले तो इतिहास सांगितला आहे. तिसऱ्या प्रकरणापासून राजा व त्याचे राज्यप्रशासन या विषयाच्या निरूपणाला सुरूवात झाली आहे. त्यात राजाची जबाबदारी, त्याचे कर्तव्य, प्रधान आणि इतर नोकरवर्ग यांची कामे या विषयाची माहिती दिली आहे. राजाने राज्यकारभार हा प्रजेच्या हिताचा करावा आणि त्यातून कीर्ती मिळवावी. अपकीर्तीच्या नादी लागू नये. सर्वांवर सारखा लोभ करावा 'संपादिले पाठीशी घालूनी नित्य नूतन संपादावे हाच उद्योग करावा. राज्यात जे उत्तम प्रतीचे मनुष्य आढळले ते समागमे घेऊन, माया लावून परीक्षा करून मग हुजरातीत ठेवावे. नवीन चाकर ठेवावयाचा झाल्यास त्याचे घर ठिकाण, भाऊबंद, पहिली चाकरी या साऱ्यांचा विचार करावा आणि मगच त्यास चाकरी ठेवावी', अशा अनेक सूचना दिल्या आहेत.

चौथ्या प्रकरणात प्रधान म्हणजे सरकारकून त्याविषयी लेखन केले आहे. प्राधान हे राज्यलक्षगृहाचे स्तंभ आहेत. प्रधान म्हणजे नृपसत्ताप्रसारक, प्रधान म्हणजे प्रजापालन धर्मसंरक्षणाचे अध्ययन, प्रधान म्हणजे राजमदतनीस, प्रधान म्हणजे हस्तीचे अंकुश किंबहुना प्रधान म्हणजे इहलोकी राज्यकृत्य संपादनामुळे नृपाची विश्रांती, धर्मप्रतिपालनामुळे परलोकपंथीची दीपीका, अशा या प्रधानाची भीड सर्वांपेक्षा अधिकोत्तर बाळगावी असे म्हटले आहे. आज्ञापत्राचे पाचवे प्रकरण साहुकारविषयक आहे. साहूकारांच्यामुळे राज्य श्रीमंत होते. असे साहूकाराचे वैशिष्ट सांगून साहूकाराचा बहुमान चालवावा असे म्हटले आहे. सहाव्या व सातव्या प्रकरणात राज्यातील वतनदार देशमुख, कुलकर्णी, पाटील यांच्याविषयीचे धोरण काय असावे ते सांगितले आहे.

आज्ञापत्राचे आठवे व नववे प्रकरण राज्याच्या संरक्षण व्यवस्थेवर आहे. त्यामुळे ते अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. दुर्ग हे संपूर्ण राज्याचे सार आहेत, असे सांगून दुर्ग आणि आरमार हे राज्याचे एक स्वतंत्र अंगच आहेत असे म्हटले आहे. राज्यातील प्रजा तसेच राज्याचा जीवनोपाय; संपूर्ण राज्याचे सार दुर्ग; सानिध्यावासी शत्रू म्हणजे खजिना, गडकोड म्हणजे सैन्याचे बल, गडकोट म्हणजे राजलक्ष्मी, आरमार म्हणजे स्वतंत्र राज्यांगच; यासारख्या सपर्मक वाक्यातून लेखकाचा राज्यप्रशासनाचा अनुभव, सूक्ष्म सृष्टी, डोळसपणा, जागरूकता ही वैशिष्ट्ये प्रगट होतात. 'स्वभावानुसार अधिष्ठित असे हे राज्यशास्त्रविषयक तात्त्विक विवेचन नेटक्या शैलीमुळे ठाशीव बनले आहे, प्रधान म्हणजे राज्यलक्षणगृहाचे स्तंभ,' 'आधी वतनदार हा एक विश्वास' 'ततोपि, प्रामाणिक म्हणजे सोने आणि सुगंध', 'महसूल न्यून होणे हीच राज्याची जिर्णता, तोच राज्यलक्ष्मीचा पराभव', 'राजास भुपति असे भूमीकरिता म्हणावे', ते भूमीच गेल्यावर राज्य कशाचे

करणार? पति कोणाचा होणार? 'ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र' यासारख्या छोट्या वाक्यातून अर्थव्यक्तीचे कौशल्य, समर्पकता, ठाशीवपणा ही वैशिष्ट्ये आढळतात. हा छोटा ग्रंथ म्हणजे राज्यशास्त्रविषयक तसेच राज्यप्रशासनपद्धतीविषयक विचारांचा आणि अनुभवांचा अर्क आहे. शिवछत्रपतीप्रणित राजनीतीचे आणि प्रशासनपद्धतीचे विवरण करणारा हा ग्रंथ भारदस्त, डौलदार आणि अभिजात भाषाशैलीमुळे चिरकाल स्मरणात राहावा असा झाला आहे. राज्यप्रशासनविषयक विवेचन करणारा मराठी गद्यातील हा पहिला ग्रंथ होय. असे ल. रा. नसिराबादकर म्हणतात (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, पृष्ठ क्रमांक ३०१) असे हे अज्ञापत्र रामचंद्रपंत अमात्यांनीच लिहले असल्याचा उल्लेख अ. ना. देशपांडे यांनी देखील नवीन पुराव्यांच्या आधारे केला आहे. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, पृष्ठ क्र. ५२२) या रामचंद्रपंत अमात्यांचा मृत्यू अज्ञापत्राच्या लेखनानंतर थोड्याच दिवसात झाला आहे.

अशा प्रकारे तेराव्या शतकापासून ते अठराव्या शतकापर्यंत पाचशे वर्षांच्या कालखंडात मराठीत फार मोठ्या प्रमाणावर वाङ्मयनिर्मती झाली. त्या लेखनामध्ये अनेक प्रकारची वैविध्यता दिसून येते. यामध्ये ऐहिकाचा विचार करणारा व मार्गदर्शन करणारा ग्रंथ अज्ञापत्र हा एकच आहे. आणि या ग्रंथाने पुढे अनेकांना राजनीतीविषयक ग्रंथलेखनाची प्रेरणा दिली आहे, असे ल. रा. नसिराबादकर म्हणतात (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, पृष्ठ ३०८)

वरील सर्व बखरींचा परिचय करून घेतल्यानंतर आपल्या हे ध्यानात येते की, मराठी साहित्याच्या दृष्टीने तो एक स्वतंत्र वाङ्मय प्रकार आहे. रेखीव रचना, कल्पनाचातुर्य, निवेदनकौशल्य ही या बखरींची वैशिष्ट्ये असून त्यांचे लेखन व्यक्तिदर्शन, वर्णनपद्धती, रसपरिपोष आणि भाषाशैली या वाङ्ममयीन गुणवैशिष्ट्यांकडे लक्ष ठेवून केल्यामुळे हे ऐतीहय वृत्तकथन आकर्षक आणि मनोरंजक झाले आहे. प्रौढ व रसाळ भाषा, संस्कृत आणि पारशी शब्दांचे प्राचुर्य, पौराणिक दाखले, अलंकार, सुभाषिते, वाक्यप्रचार म्हणी यांचा वापर व निवेदनातील आटोपशीरपणा यामुळे बखरीतील भाषा ही साधी, गद्य, निरस, नुसती निर्जीव वर्णन करणारी ललितेतर साहित्याची भाषा नाही, तर रसरशीत आणि मनोहर अशा ललितवाङ्मयाची भाषा आहे. भावनापूर्ण लेखन हे या बखरीच्या यशाचे अमोघ साधन आहे. बखरकार हा कलावंत आहे. एका अर्थी बखरकार हा गद्यातील शाहीरच आहे. वीरांचे दर्शन समोर ठेवून त्यांच्या पराक्रमाचे पोवाडे गावेत, ही त्यांची वृत्ती आहे. 'बखरीतील ओजस्वीपणा हा ज्या वीरयुगात निर्माण झाल्या तो या युगाचा अपरिहार्य परिणाम होता', असे गं. ब. ग्रामोपाध्ये म्हणतात. (मराठी बखर गद्य, प्रस्तावना, पृष्ठ क्र. ४०) या बखरी ज्या वीर युगाची सुरूवात स्वराज्य स्थापनेने झाली त्या वीरयुगाच्या एका अपरिहार्य परिणामातून निर्माण झाल्या आहेत. बखरकारांनी मराठी गद्याला डौलदार, घाटदार, ऐटबाज, भारदस्त, प्रौढ, नाट्यपूर्ण स्वरूप प्राप्त करून दिले. बखरीशिवाय जो पत्रव्यवहार केला गेला ती पत्रेही अधिक महत्त्वाची व प्रमाण मानली पाहिजेत. त्यातून मराठी भाषेतील लेखनाचे एक वेगळेच वळण प्राप्त झाले आहे. त्याचा उत्कृष्ठ नमुना म्हणजे आज्ञापत्र होय. असे हे मराठी गद्य इतिहासाचे दस्तऐवज आहेत. त्यातील भाषावैशिष्ट्यांमुळे

मराठीभाषावैभवात मोलाची भरच पडली आहे. त्यामुळेच या बखरी पुढच्या अनेक पिढ्यांना मार्गदर्शन ठरतील यात शंकाच नाही.

## ४.७ स्वयं अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. रचनाकाळाच्या दृष्टीने सर्वात जुनी बखर कोणती.

**उत्तर :** महिकावतीची बखर ही रचनाकाळाच्या दृष्टीने सर्वात जुनी बखर आहे.

२. चित्रगुप्त हे कोणाचे टोपण नाव आहे ?

**उत्तर :** चित्रगुप्त हे रघुनाथ यादव यांचे टोपण नाव आहे.

३. पानिपतची बखर कोणाच्या आज्ञेवरून लिहली गेली.

**उत्तर :** पानिपतची बखर गोपिकाबाई यांच्या आज्ञेवरून लिहली गेली.

४. आज्ञापत्राचा लेखक कोण ?

**उत्तर :** रामचंद्रपंत अमात्य हे आज्ञापत्राचे लेखक आहेत.

## ४.८ सरावासाठी प्रश्न

**एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. कृष्णाजी शामराव यांचे टोपण नाव काय ?

२. ‘बचेंगे तो और भी लडेंगे’ असे कोण म्हणाले ?

३. बखर वाङ्मयाची विभागणी किती कालखंडात केली जाते ?

४. आज्ञापत्रांच्या आठव्या आणि नवव्या प्रकरणांत कशाचे वर्णन आले आहे ?

**लघुत्तरी प्रश्न**

१. ‘आज्ञापत्रा’चे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करा.

२. ‘सभासदांच्या बखरी’चा थोडक्यात आढावा घ्या.

**टीपा लिहा**

१. शालिवाहनाची बखर.

२. चित्रगुप्ताची बखर

## ४.९ समारोप

विद्यार्थी मित्रांनो, या घटकामध्ये आपण मराठीतील बखर वाङ्मयाचे स्वरूप पाहिले. मराठीतील बखर वाङ्मय हे ऐतिहासिकदृष्ट्या आणि वाङ्मयीनदृष्ट्याही महत्त्वपूर्ण आहे. यातून मराठ्यांचा इतिहास आपणास ज्ञात होतोच, पण त्याबरोबरच, तत्कालीन, राजकारण, लढाया, धर्मकारण, समाजकारण यांचाही परिचय होतो. या बखर वाङ्मयातून मराठ्यांच्या राजकीय जीवनाचा फार मोठा पट आपणासमोर उलगडत जातो. मराठ्यांची अस्मिता, मराठ्यांचे शौर्य, वीरत्व, त्यांचा प्रामाणिकपणा इत्यादी गुणांची आपणास ओळख पटते. बखर वाङ्मयात खऱ्या अर्थाने मराठी जनमानसाचे प्रतिबिंब पडले आहे. म्हणून हे वाङ्मय आजही अभ्यासनीय झाले आहे.

## ४.१० अधिक वाचन

प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप : ह. श्री. शेणोलीकर

मराठी बखर गद्य : गं. ब. ग्रामोपाध्ये.

मराठी बखर : र. वि. हेरवाडकर

आज्ञापत्र : वि. भि. कोलते

## ४.११ उपक्रम

१. विजयनगरला भेट द्या व तेथून विजयनगरच्या राज्याची माहिती मिळवा.

२. प्रतापगड, सिंहगड इत्यादी किल्ल्यांना भेट देऊन छत्रपती शिवाजीराजांच्या राज्यकारभाराविषयी अधिक माहिती मिळवा.

३. पुण्याच्या शनिवार वाड्याला भेट द्या. पेशव्यांच्या राज्यकारभाराविषयीची माहिती मिळवा.

❑❑❑